मयूरकाव्यविवेचन

श्री. ना. बनहट्टी.

मयूरकाव्यविवेचन.

भागवती काव्यांच्या तुलनात्मक विस्तृत निरीक्षणासह.

लेखक

श्रीनिवास नारायण बनहट्टी.

पुणें.

हनुमज्जयंती (मयूर पुण्यातिथि).

शके १८५८.

मुद्रक:—**लक्ष्मण भाऊराव कोकाटे,**
हनुमान छापखाना, ३०० सदाशिव पेठ, पुणें शहर.

प्रकाशक:—**श्रीनिवास नारायण बनहट्टी,**
मयूरमंडळ कार्यालय; ६०२ सदाशिव पेठ, पुणें शहर.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण:—
रा. शंकर आत्माराम पराडकर, चिटणीस मयूरमंडळ,
६०२ सदाशिव पेठ, पुणें शहर.

वैकुंठवासी

मातुःश्री

ती. सौ. लक्ष्मीबाई बनहट्टी

जिचें अंतःकरण सदैव भक्तिरसानें परिपूर्ण असे

व

जुन्या संतकवींच्या कवितेवर जिचें विशेष प्रेम असे

तिच्या प्रेरणेनें व प्रसादानें प्राप्त झालेलें

जुन्या कवींच्या अभ्यासाचें

हें पहिलें फल

तिच्या स्मृतिपूजित चरणकमलांवर

अर्पण केलें आहे.

लेखक.

निवेदन.

नसे तादृक् चेतोहर गुण जरी साधु तरि या
वरू, चूडारत्नीकृत विधुहि जैसा धुतरिया ।

प्रस्तुत पुस्ततकाचें मूळ, येथील मयूर मंडळानें नेमलेल्या 'मूळ श्रीमद्भागवत व पंतकृत मंत्रभागवत (इतर भागवती प्रकरणांसह)' या विषयावर प्रस्तुत लेखकानें लिहिलेला निबंध होय. हा निबंध प्रथम १८४३ सालीं लिहिला गेला. त्याच्या पुढच्या वर्षी त्यावर बरेचसे संस्कार करून तो पुनः मयूर मंडळाकडे पाठविला गेला. मंडळानें नेमलेल्या परीक्षकांनीं तो छापावा अशी सूचना केली. त्यामुळें आणि पंतकवितेविषयींचे आपले विचार महाराष्ट्र वाचकांपुढें व्यवस्थित स्वरूपांत मांडावे अशी इच्छा लेखकाच्याही मनांत प्रादुर्भूत झाल्यामुळें, त्या निबंधावर पुनः एकदां सस्करण करून, तो प्रसिद्ध केला आहे. या पुनःसंस्करणाच्या योगानें मूळ निबंधाच्या स्वरूपांत पुष्कळ पालट झाला व आकारांतही फार वाढ झाली. तथापि रसिक वाचकांच्या आश्रयाच्या भरंवशावर केलेलें हें साहस विशेषशी कातडी सोलून न निघतां निभावून नेतां येईल अशी उमेद वाटत असल्यामुळेंच त्यानें स्वतः हें प्रसिद्धीकरणाचें साहस केलें आहे.

महाराष्ट्र कवींपैकीं मोरोपंतांवर आजपर्यंत जितका ऊहापोह झाला आहे तितका दुसऱ्या कोणत्याही कवीवर झाला नसेल. असें असतांना पुनः हें येवढें भारूड लिहून प्रसिद्ध करण्याचें प्रयोजन काय असा प्रश्न कित्येकांच्या मनांत उभा राहील. प्रस्तुत पुस्तकाचा बीजभूत जो भागवतावरील निबंध तो प्रथम लिहिण्यास कोणतें आनुषंगिक कारण झालें हें वर निवेदन केलेंच आहे. तथापि पंतकवितेच्या बाबतींत आपणास कांहीं नवीन सांगावयाचें आहे अशी जाणीव लेखकास नसती तर त्यानें या मजकुरांतलें अवाक्षरही प्रसिद्ध होऊं दिलें नसतें. प्रस्तुत पुस्तकांतील प्रतिपादन आजपर्यंत झालेल्या चर्चेहून निराळ्या तऱ्हेचें, नवीन प्रश्नांचा उहापोह करणारें व सर्वस्वी स्वतंत्र असेंच महाराष्ट्रकाव्यवाचकांस वाटेल अशी आशा आहे.

मयूरमंडळाचे अध्यक्ष श्री. न. चिं. केळकर यांनीं प्रस्तुत प्रयत्नाविषयीं कौतुक व्यक्त करून प्रस्तावनेदाखल चार शब्दही लिहून दिले, याबद्दल लेखक त्यांचा अत्यंत आभारी आहे. पंतवंशज श्री. रामकृष्णपंत पराडकर यांनीं अत्यंत आस्थेनें

पंतलिखित पोथ्यांचा संग्रह दाखविला व पंतांची अप्रसिद्ध भागवती काव्यें छापण्यास (पहा, परिशिष्ट १) परवानगी दिली याबद्दल त्यांचाही ऋणभार लेखकाच्या शिरावर आहे. मूळ निबंधाचें विकसन होत असतां भ्रातृकल्प मान्यमित्र आचार्य अ. बा. गजेंद्रगडकर यांच्या सूचनांचें व उपदेशाचें अमूल्य साहाय्य झालें. या जुन्या उपकारांची फेड करण्याचा मार्ग म्हणजे आणखी नवीन उपकारांचे बोजे लादून घेणें होय व तसाच क्रम चालू ठेवण्यांत प्रस्तुत लेखकास तरी आनंद वाटेल हें उघड आहे. मयूरमंडळाचे उत्साही चिटणीस रा. शं. आ. पराडकर यांचेंही प्रस्तुत पुस्तकाच्या बाबतींत साहाय्य झालें याबद्दल त्यांचे आभार मानिले पाहिजेत. सरतेशेवटीं, अनेक अवस्थांतून प्रस्तुत कृतीला सध्यांचें स्वरूप प्राप्त होत असतांना जे सदैव तिला ‘ प्रेमें सिंचित होते ’ अशा अनेक ‘ सख्यांचा ’ त्यांच्या अंतःकरणासच समजेल असा मूक उल्लेख करून पुढें जाणें भाग आहे. यांपैकीं प्रियमित्र व्यंकटेश शामराव दलकुन्दी यानें तर जी मदत केली ती सर्वथा अपूर्वच होय. तिचें वर्णन करतां येण्यासारखें नाहीं व माझ्यानें तें करवणारही नाहीं. या सर्व सुहृत्समुदायाचा कृतज्ञताभार असाच शिरावर वाढत गेल्यास तो केवळ असह्य होईल अशी धाकधुक वाटत असतांनाच त्यांच्या कृपाछत्राखालीं या कृतीची कंपित हृदयानें पाठवणी करितों.

हनुमज्जयंति (मयूरपुण्यतिथि)
शके १८४८.

लेखक.

अनुक्रमणिका.

---

* हे आंकडे पुस्तकांतील परिच्छेदांचे आहेत.

१. भागवती काव्यांची पद्यसंख्या. २. मंत्रभागवताचें बाह्यस्वरूप; तीन माळा. ३. स्कंधवार पद्यसंख्येचें कोष्टक. ४. कृष्णविजयाचें बाह्यस्वरूप. ५. भागवती स्फुट प्रकरणांचें परिगणन; बाह्यस्वरूपनिदर्शक कोष्टक. ६. पांगारकरांची याद अपूर्ण; नूतनसंशोधित दोन काव्यें. ७. पांगारकरांचें विस्मरण व गैरसमज. ८. भस्मासुराख्यानाबद्दलचा घोटाळा; पांगारकरांची फसगत. ९. त्यामुळें इतरांचीहि फसगत. १०. भस्मासुरकथा आहे कोठें ? समालोचन. ११. उणें दाखविण्याचा हेतु नाहीं.

विभाग ३. पंतांची भूमिका, उद्दिष्ट हेतु व काव्यरचनेचें धोरण. पृ० ३४ ते ६१.

१. प्रास्ताविक. २. पंतांची विस्तरभीरुता, आटोपशीरपणा. ३. इतर कवींचा पाल्हाळ; त्याचें कारण-भक्तीचा उमाळा. ४. उद्दिष्ट हेतूच्या भिन्नतेमुळें पडणारा फरक. ५. श्रीमद्भागवताची भूमिका व उद्दिष्ट हेतु. ६. भागवताची काव्यविषयक योग्यता. ७. मूळ भागवताच्या उद्दिष्ट हेतूंचें परिगणन. ८. पंतांची भूमिका व उद्दिष्ट हेतु-स्वोन्नत्यर्थ भगवद्यशोगान; ९.-काव्यनिर्मिति;-कथाकथन. १०. संकलन. ११. अनुपयुक्त भागांचा त्याग. १२. विस्तार न करण्याच्या कारणांची पांगारकृत मीमांसा फारशी बरोबर नाहीं. १३. पंतकाव्यनिरीक्षणाची योग्य दृष्टि. १४. कालिदासादिकांच्यासारखी काव्यरचना पंतांनीं कां केली नाहीं ? १५. कथानकें विकृत करण्याची प्रवृत्ति; मयूरमुक्तेश्वरादि कवि व अलीकडील नाटककार यांमधील भेद. १६. पंतांची व कालिदासादिकांची संस्कारभिन्नता. १७. तीन भिन्न संस्कारांचें मिश्रण. १८. मिश्रणामुळें आलेली न्यूनता. १९-२०. पंतांची विद्वत्ता; भिन्न मतांचा उपन्यास; पंतांनीं लिहिलेल्या ग्रंथांची वर्गवारी. २१. वेदान्ताचें ज्ञान. २२. मालाकारांच्या मतांतील सत्याचा अंश. २३. पंतांची ज्ञान लालसा.

विभाग ४. पंतांच्या भागवतीकाव्यांचें स्कंधानुक्रमानें तुलनात्मक अंतरंगनिरीक्षण. ... ... पृ. ६२ ते १८७.

१. पुढील अंतरंगनिरीक्षणाचें धोरण. २. पंतांनीं श्रीधरी टीकेची घेतलेली मदत. [**स्कंध १**] ३. भागवताचा प्रारंभ, नारदाचें पूर्ववृत्त. ४. त्याचें पंतकृत रूपांतर; 'नारदाभ्युदय.' ५. अश्वत्थाम्याचा पराभव; कुंतीची कृष्णस्तुति. ६. त्यांचें पंतकृत रूपांतर. ७,८. भीष्मनिर्याणाचा प्रसंग; 'भीष्मभक्तिभाग्य' ९. अ०

१० ते १५ मधील वृत्तांत. १०. शेवटचे चार अध्याय. ११. प्रथम स्कंधाचें समालोचन. [**स्कंध २**]—१२. स्कंधारंभ. १३. दुसऱ्या व तिसऱ्या स्कंधांतील तत्त्वज्ञान व वेदान्त. १४. द्वितीय स्कंधांतील विषय व त्याचें पंतकृत रूपांतर. १५. ' अवतारमाला ' १६. अ० ८-१०; पंतांची प्रतिकृति; समालोचन. [**स्कंध ३**]—१७. तृतीय स्कंधांतील विषय. १८. पंतांच्या प्रतिकृतीचें स्वरूप. १९. कांहीं काव्यपूर्ण वर्णनांचीं अवतरणें. [**स्कंध ४**]—२०. स्कंधांतील विषयाची रूपरेखा; पंतांच्या प्रतिकृतींत मंडूकप्लुतीचा अभाव. २१. दक्षयज्ञकथा; दक्षाचें व शंकराचें वैर; सतीचा प्राणत्याग. २२. ध्रुवकथा;—मूळ भागवतांतील, २३.—मं. भा. मधील; साकीबद्ध ' ध्रुवचरित्र '. २४. वेन व प्राचीनबर्हि. २५. समालोचन. [**स्कंध ५**]—२६. मूळ व पंतकृति; जडभरताची कथा. २७. गाळागाळीचा प्रकार. [**स्कंध ६**]—२८. मूळ व पंतकृति यांची तुलना; वृत्रवध; दधीचीचें अश्वशिर स्वरूप—टीकेचा आशय घेऊन केलेलें वर्णन. २९. अजामिळाची कथा; मराठी वाङ्मयांतील पंतपंडितांची परस्परपूरक कामगिरी. [**स्कंध ७**]—३०. स्कंधांतील विषय. ३१. प्रह्लादकथा विस्तृतपणें वर्णन करण्याचीं कारणें. ३२,३३,३४. प्रह्लादकथेचें अंतरंगनिरीक्षण. ३५. 'प्रह्लादविरचित भगवत्स्तुति' ३६. ' सत्यं विधातुं ' श्लोकावरील टीकचा अनुवाद. ३७. स्कंधसमाप्ति. [**स्कंध ८**]—३८. स्कंधांतील विषय; गजेंद्रमोक्ष कथा. ३९. समुद्रमंथनाची कथा. ४०. अ० १०—१४ मधील वर्णन. ४१. वामनावतारकथा, मुळांतील व मं. भा. मधील. ४२. ' वामनचरित्र ' ४३. ' अमृतमथन ' ' वामनचरित ' हीं जुळीं भावंडें. [**स्कंध ९**]-४४. स्कंधांतील विषय; राजांच्या वंशावळी. ४५. वंशावळींची विश्वसनीयता. ४६. संक्षेपविस्ताराचें प्रमाण. ४७. कथांची रमणीयता; कांहींची अश्लीलता. ४८. कथांचें परिगणन. ४९. इला—सुद्युम्न कथा; सुकन्या—च्यवन कथा; नाभागाची कथा. ५० ' अंबरीषाख्यान ' व ' भक्तभूषण '. ५१. इतर किरकोळ कथानकें; ' श्रीरामचरित्र ' ५२. स्कंधसमाप्ति. [**स्कंध १०**]-५३. मं. भा. दशम पूर्वार्ध व कृ. वि. उत्तरार्ध हे एकमेकांचे पूरक. ५४, ५५. दशमापुरतीं संक्षेपविस्ताराचीं विशिष्ट धोरणें. ५६. ' निरंकुशाः कवयः ' ५७. **कृ. वि. पूर्वार्धाचें** वृत्त; गीति व आर्यागीति; पंतांचें आर्यावृत्त; पंतयोजित ' आर्या ' ही संज्ञा. ५८. क्लिष्टतेस आर्यागीतिवृत्त कारण नाहीं. ५९. क्लिष्टतेचीं कारणें;—यमक व अलंकार.

६०. रूपांतराचा मासला. ६१. विस्तार संक्षेपाचें परीक्षण. ६२. **मं. भा दशम पूर्वार्ध.** पंतांच्या वयोवस्थेचा काव्याच्या रसोत्कर्षाशीं संबंध. ६३ संक्षेपविस्ताराचें निरीक्षण; वर्णनसौंदर्य; ६४. पंतांचा अप्रतिम शुद्धभाव. ६५. ' नवदान केलि,' 'गोपीगोडवा' इ० ६६. **कृ. वि. उत्तरार्ध**; वर्णनशैलींत बदल. ६७. अ० ५० ते ५४ मधील रचना. ६८. कृ. वि. च्या कच्च्या पोथीमधील विशेष. ६९. अ० ५५ ते ७९ मधील रचना; येथील पंतांची विस्ताराची प्रवृत्ति. ७०. संस्कृत कवींची विस्ताराची तऱ्हा. ७१. पंतांची विस्ताराची तऱ्हा; उदाहरणें. ७२. वेचक उत्कृष्ट अध्याय. ७३. दीर्घवृत्तें योजण्याची पंतांची प्रवृत्ति. ७४. अ० ८० ते ९०; काव्यसौंदर्याचा परमोत्कर्ष. ७५. सुदाम कथा; ' सुदामचरित्र '; ' पृथुकोपाख्यान ' कृ. वि. अ० ८०, ८१. ७६. अ० ८२. ७७. रुक्मिणीविवाहकथा; ' रुक्मिणीगीत '; कृ. वि. अ० ८३. ७८. अ० ८४ ते ८८. ७९. **मं.भा.दशम उत्तरार्ध [स्कंध ११]**–८०. एकादश स्कंधाची महति; पंतांची टीका अत्यंत काळजीपूर्वक तयार केलेली. ८१. अध्यायवार रचनेचें निरीक्षण. ८२. उपसंहार. **[स्कंध १२]**–८३. स्कंधांतील विषय ८४. पंतांचें संग्राहकत्वाचें धोरण. ८५. निवडक स्थलांचा उल्लेख व उतारे.

उतरार्धः–पंतकवितेचें सर्वसामान्य विवेचन. पृ. १९०ते३८८.

विभाग ५. पंतकाव्यांचा कालनिर्णय–पृ. १९० ते २५४.

१. विषयप्रवेश. २. आजपर्यंतचे प्रयत्न. ३. हे प्रयत्न एकधोरणी. पद्धतशीर सर्वमान्य होण्याजोगे नाहींत. ४. पंतकाव्यांचा रचनाक्रम ठरविण्यास उपलब्ध साधनें:–१ काव्याचें अंतरंग व रचनाकौशल्याची परिणति; २ हस्ताक्षर; ३ बाह्य साधनें; पत्रव्यवहार. **[कालखंड १]**–५. काव्यनिर्मितीचा प्रारंभ; कुशलवाख्यान. ६. साररामाणाविषयीं संशय. ७. ब्रह्मोत्तरखंड; रचनाकालाविषयीं प्रमाणें ८. श्रीकृष्णविजय; प्रल्हादविजय; मदालसाचरित्र; हरिश्चंद्राख्यान, देवीमाहात्म्य. ९. या आख्यानांतील वृत्तें; अवांतर पुराणांवर विशेष भर. १०. कृ. वि. पूर्वार्धाचा प्रश्न विशेष वादग्रस्त; प्रत्यक्ष ग्रंथांतील प्रमाण; पंतांच्या अंतःकरणवृत्तीचें प्रमाण; ' हा कालव्यय चांगला इतरथा आयुष्य जातें वृथा;' कृ. वि. चें अपूर्वत्व; विसदृश रचनेचे चार थर; वृत्तसाम्यावरून निघणारें अनुमान; पंतांच्या वृत्तरचनेचा इतिहास. ११. सर्व प्रमाणांचा निष्कर्ष. **[कालखंड २]**–१२. कृ वि. पूर्वार्धाच्या उपसंहारावरून निघणारें अनुमान; वर्णनशैलींत एकदम बदल. १३. श्लोकबद्ध रचनेचा

काल; या रचनेंत आढळणारे गृहस्थास शोभविणारे गुण; त्यांवरून वयोवस्थेचें अनुमान १४. साररामायणाबद्दल विचार; संस्कृत महाकाव्यांच्या पद्धतींचें अनुकरण; वृत्तांची आश्चर्यकारक विविधता; हें काव्य मध्येंच अपुरें कां ठेवलें ? पांगारकरांचें या काव्याविषयीं मत. [**कालखंड ३**]–१५. १६८८ ते १६९४ पर्यंतचा सहा वर्षांचा काल; भक्तीचा परमोत्कर्ष; मंत्ररामायण. १६. पांगारकरांचें मंत्ररामायण-रचनाकालासंबंधीं मत; पंतांची रामोपासना; पांगारकरांच्या निराधार कल्पना. १७. नामरसायनांतील स्वरचित काव्यांचा उल्लेख; 'कृष्णकथा त्या नूतन लिहिल्या मी' याचा अर्थ. १८. कृ.वि. च्या रचनेंतील विजोडपणा व विस्कळितपणा. १९. कृ. वि. बाबा पाध्यांच्या सांगण्यावरून रचला काय ? पांगारकरांचा अभिप्राय व तर्क; त्याची व्यर्थता. २०. मंत्ररामायणच कृ. वि. नंतर रचलें; यास प्रमाणें— १ आदि पर्वांतील उल्लेख; २ रचनाशैली व वृत्तें; ३ मंत्रांची योजना; ४ आत्म-विश्वासाचे उद्गार. २१. आर्या केकावलि; हिचें अंतःस्वरूप; त्यावरून पराडकरांचे तर्क. २२. ' बा ! जीवदान दे गा ! '; विषप्रयोगाची कल्पना; पराडकरांच्या तर्कांची निराधारता; पराडकरांचा खरा विरोध पांगारकरांशीं. २३. प्रस्तुत कालां-तील रचना आर्यावृत्तांतील; अभंगवृत्तांतील तीन गोड गीतें; २४. गीतार्या; पांगारकरांचें शैथिल्य. २५. भीष्मभक्तिभाग्य; आख्यायिकेंतील सत्यांश. [**काल-खंड ४**]–२६. महाभारतरचनेचा काल. २७. अमृतमथन, वामनचरित इ० [**कालखंड ५**]–२८. भारतोत्तरकालीन रचना; काव्यांचा रचनानुक्रम. २९. हरिवंशाच्या रचनाकालाविषयीं भिन्न मतें. ३०. मं. भा. व हरिवंश यांचें सम-कालीनत्व. ३१. मं. भा. दशमाच्या रचनाकालाविषयीं विचार. ३२. दशम इतर सर्व स्कंधांच्या ' कित्येक वर्षें ' अगोदर रचला काय ? पराडकरांचीं प्रमाणें. ३३. पंतलिखित पोथ्यांचा व पंतांच्या हस्ताक्षराचा प्रश्न; ' भागवतमंत्रमुक्तामणि-माला ' याचा अर्थ; उपक्रमोपसंहाराविषयीं विचार; दशमावर एक ग्रंथ लिहिला असतांना दुसरा लिहिण्याचें कारण काय ? वर्णनशैलीचें प्रमाण. ३४. ' मांधाता स महीपतिः ' यावर बसविलेली निराधार कल्पना; दशमरचनाकालाचें आणखी बलिष्ठ प्रमाण. ३५. काशीयात्राप्रकरणांचा रचनाकाल. ३६. संकीर्ण रामायणें; हीं १०८ होतीं काय ? शेवटचें काव्य—केकावलि. विभागाचा सारांश व गोषवारा.

विभाग ६. पंतांची भाषाशुद्धि व पंतभाषेचें व्याकरण पृ.२५६-२८१-

[**१ पंतांची भाषाशुद्धि**] १,२. भाषाशुद्धीचा अर्थ; कवींना दिलेल्या

प्रस्तावना.

कविवर्य मोरोपंत यांजविषयीं चरित्रात्मक व चर्चात्मक असे अनेक ग्रंथ आजवर झाले आहेत. त्यांत आज एका नव्या ग्रंथाची भर पडत आहे हें पाहून मनाला अतिशय संतोष होतो. ही भर फारच मौल्यवान आहे. कारण चरित्र नव्हे पण निवळ चर्चेच्या दृष्टीनें लिहिल्या गेलेल्या मोरोपंतविषयक कोणत्याहि ग्रंथापेक्षां हा ग्रंथ अधिक पूर्ण, भरदार, चिकित्सक व सिद्धांतसंपन्न झाला आहे असे मला वाटतें.

ग्रंथकारानें घेतलेली मूळ भूमिका बोलून चालून मर्यादित आहे. श्रीमद्भागवताच्या आधारें मोरोपंत कवीनें जी निरनिराळीं काव्यें लिहिलीं त्यांचेंच केवळ अंतर्बाह्य निरीक्षण करणें हा ग्रंथकर्त्याचा मूळ हेतु, निदान त्यानें आखून घेतलेलें कार्य होतें. परंतु या काव्यग्रंथाचें सूक्ष्म खोल व तुलनात्मक परीक्षण करण्यास कोणीही मनुष्य प्रवृत्त झाला असतां, अनिच्छेनेंहि त्याची कार्यमर्यादा वाढावी व मूळ न योजिलेल्या अशाहि विषयांच्या चर्चेत त्यानें प्रथम न कळत शिरावें पण मग तेथेंच हौसेनें रमावें, असें होणें अगदीं स्वाभाविक आहे. नदीमुखानें समुद्रांत शिरण्याचाच हा एक प्रकार होय. याच्या उलटहि प्रकार वाङ्मयसेवेंत आपल्या दृष्टीस पडतात ! म्हणजे आरंभीं मांड चौफेर विस्तृत मांडावयाचा. पण शेवटीं अपूर्ण एकांगी व मोडकें तोडकें असेंच विवेचन निष्पन्न व्हावयाचें. अशा प्रकारापेक्षां प्रस्तुत ग्रंथांत आढळून येणारा प्रकार अधिक अनुकरणीय ठरेल.

ग्रंथाच्या प्रथमार्धांत चार विभागांत मिळून ग्रंथकारानें प्रारंभीं उद्देशिलेलें कार्य समाप्त केलें आहे. पैकीं पहिल्यांत भागवताची योग्यता व भागवताचे अनेक मराठी अवतार, दुसऱ्यांत भागवती काव्यांचें बाह्यांग निरीक्षण, तिसऱ्यांत भागवतविषयक काव्यें लिहितांना पंतांनीं स्वीकारलेली भूमिका व मनांत धरलेला उद्दिष्ट हेतु हे विषय आहेत; आणि चौथ्यांत मूळ संस्कृत ग्रंथ व त्याची प्राकृत काव्यमय प्रतिकृति यांचें तुलनात्मक अंतरंगनिरीक्षण स्कंधानुक्रमानें करण्यांत आलेलें आहे. भागवत ग्रंथ हा अगदीं आधुनिक आहे असा जो अपसिद्धांत कित्येकांनीं काढलेला आहे तो खोडून टाकून त्याचें प्राचीनत्व ग्रंथकारानें प्रथम विभागांत निदर्शनास आणलें आहे. नंतर भागवताला जनसेवर

प्रेमसाम्राज्य कां स्थापितां आलें व त्याच्या स्फूर्तीचा उपयोग अनेक भक्तसांप्रदायाला कसा झाला हें त्यांनें दर्शविलें आहे. भागवताच्या मानानें श्रीमद्भगवद्गीतेला लोक अधिक महत्व देतात ही गोष्ट ग्रंथकर्त्याला सयुक्तिक वाटत नाहीं असें दिसतें. परंतु भगवद्गीता हा ग्रंथ लहान असला तरी तो किती व्यापक आहे, आणि श्रीमद्भागवतानें पुरस्कृत केलेला भक्तिमार्ग हा गीतेनें परामृष्ट केलेल्या अनेक मार्गांपैकीं किंवा साधनांपैकीं फक्त एक साधन आहे. शिवाय गीतेनें अध्यात्म व व्यवहार या दोहोंची संगति लावण्याचा केलेला प्रयत्न हा भागवतांतील केवळ भक्तिरसवर्णनापेक्षां तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें अधिक श्रेष्ठ कां ठरतो हें ग्रंथकाराचे लक्षांत सहजच आलें असतें. किंबहुना गीता व भागवत यांची भूमिका व उद्देश हे वेगवेगळेच असल्यानें, भगवद्गीतेला शिरीं धरून सुशिक्षित लोक भागवताला त्यापेक्षां कमी महत्त्वाचें कां मानितात याचा तुलनात्मक विचार उपस्थित होतच नाहीं असें मला वाटतें. बाकी भक्तिरसाचें प्रेमळ खुलासेवार वर्णन, सगुण हरिकथानिरूपण, व आख्यानोपाख्यानें यांची गोडी सामान्य मनुष्याला सहजच विशेष असते या दृष्टीनें भागवताचा उपयोग प्राकृत कवींनीं गीतेपेक्षां अधिक करून घ्यावा हें स्वाभाविकच आहे.

भागवताचा उपयोग आपल्या काव्याला करणाऱ्या कवींमध्यें मोरोपंत हे अधिक श्रेष्ठ आहेत हें दुसऱ्या विभागांत ग्रंथकारानें सिद्ध केलें आहे. नंतर प्रत्येक स्कंध घेऊन मूळचा ग्रंथसंभार व तद्विषयक मोरोपंती काव्य यांचें परस्पर प्रमाण किती पडतें, व त्यावरून मूळ ग्रंथांतील तात्पर्य तर सोडावयाचें नाहीं पण त्याची प्राकृत प्रतिकृति शक्य तितकी आटोपशीर व प्रमाणबद्ध करावयाची, ही गोष्ट मोरोपंतांनीं कशी साधली हें ग्रंथकर्त्यानें दाखविलें आहे.

तिसऱ्या विभागांत भागवताच्या आधारें काव्य लिहिण्यांत मोरोपंतांचा उद्देश काय होता याचें विवेचन करितांना ग्रंथकारानें असें सांगितलें आहे कीं, तारीफ करावयाची ती मोरोपंतांनीं इतकी पुष्कळ कविता लिहिली याची करावयाची नसून त्यांच्या संक्षेपचातुर्याचीच करावी लागते. भागवत हें जरी पुराण या दृष्टीनें, व त्याची व्याख्या सार्थ होईल अशा रीतीनें, लिहिलें असलें तरी मोरोपंतांनीं आपलें काव्य लिहितांना भागवताचीं पौराणिक अंगें विशेष न नटवितां भगवद्भक्तीचें प्रतिपादन व परमेश्वराचें यशोगान हा हेतु मुख्य ठेऊन काव्यनिर्मिती व कथाकथन हे दुय्यम हेतु म्हणून त्यांनीं डोळ्यापुढें ठेविले आहेत. आपली कविता

रसाळ व्हावी व आपण सांगितलेली कथा पाल्हाळिक नसावी; असें धोरण त्यांनीं ठेविलें होतें यामुळें राजवंशवर्णनें, आध्यात्मविवेचन वगैरे अवांतर गोष्टी त्यांनीं संक्षेपांत आणिल्या. उलट भक्तिसुखाचा आनंद मनसोक्त मिळावा म्हणून कित्येक ठिकाणीं त्यांनीं मूळ ग्रंथाहूनंहि अधिक विस्तार केला आहे. एकंदरीनें मोरोपंतांनीं कवीचा निरंकुशत्वाचा अधिकार फारसा गाजविला नाहीं. पण मूळ संभाळून मर्यादित क्षेत्रांत त्यांनीं आपली काव्यबुद्धि हवी तशी खेळविली आहे. तथापि लोक समजतात इतकें मोरोपंतांचें शास्त्राध्ययन खोल नव्हतें असा अभिप्राय ग्रंथकारानीं व्यक्त केला आहे.

चौथा विभाग हा सर्वांत मोठा असून त्यांत स्कंधानुक्रमानें मूळ भागवतांत काय मजकूर आहे व मोरोपतांनीं त्यांत घेतलें सोडलें काय किती याचा निर्देश ग्रंथकारानें केला आहे. या विभागांत सर्व भागवताचें तात्पर्यंच एक प्रकारें दिलें गेलें आहे. दशमस्कंधाची चर्चा विशेष विस्तारानें केलेली असून कवीनें मुळांतील वर्णनें वगैरे घ्यावीं तितकीं घेतलीं नाहींत व या ठिकाणीं संकोचाचा दुरुपयोग झाला असें म्हटले आहे. " नैसर्गिक सृष्टिशोभेनें किंवा मानवनिर्मित नगरादि स्थलांच्या शोभेनें मोरोपंतांचें चित्त आकृष्ट करून घेतलें होतेंसें दिसत नाहीं, " मात्र याचा वचपा अलंकारादि साधनांनीं आपल्या काव्यांत पंतांनीं काढला आहे असें ग्रंथ-कारानें म्हटलें आहे. एकंदरीनें ग्रंथकाराच्या मूळ उद्देशाप्रमाणें चौथा विभाग हा समर्पक झाला असून भागवत व मोरोपंती काव्य या दोहोंचाहि त्यांत घ्यावा तसा परामर्ष घेतला गेला आहे.

पण पंतकाव्यांचा इतका सूक्ष्म अभ्यास ज्यानें केला त्याचें समाधान केवळ भाग-वतीकाव्यांचें निरीक्षण करून संपणें शक्य नव्हतें. याकरितां ग्रंथाच्या उत्तरार्धांत त्यांने इतर अनेक दृष्टींनीं पंतांचीं एकंदर काव्यें जमेस धरून तत्संबंधीं इतर अनेक विषयांची चर्चा केली आहे. पांचव्या विभागांत पंतकाव्यांचा कालनिर्णय व त्यावरून अनुमानितां येणारा पंतांच्या काव्यशक्तीचा विकास हा विषय आहे. यांत नवशिके-पणा, प्रौढावस्था, परिपक्वता, व उतारवय असे चार कालखंड कल्पून त्यांतल्यात्यांत प्रौढावस्थेचा काल हाच पंतांच्या कवित्वशक्तीच्या बहराचा काल असें ग्रंथकर्त्यानें म्हटलें आहे; पण या विभागांतील विषय बराच वादग्रस्त असल्याचीहि जाणीव त्यांनें ठेवलेली आहे. सहाव्या विभागांत प्रथम पंतांची भाषाशुद्धि व पंतभाषेचें व्याकरण हे विषय आहेत. पैकीं भाषाशुद्धिसंबंधानें ग्रंथकारानें मोरोपंतांचे जे

अपप्रयोग दाखविले आहेत ते अपवादात्मक ठरून पंतांची काव्यरचना प्रायः शुद्ध असते असेंच कोणासहि म्हणावें लागेल. पंतांच्या काव्यांना व्याकरणाचे नियम लागू करतांनाहि हें लक्षांत ठेवावें लागतें कीं, मराठी भाषेचें तत्कालीन असें व्याकरण निश्चित कोणीं बनविल्याचें आढळत नाहीं; यामुळें जे अनपेक्षित प्रयोग पंतकाव्यांत आढळून येतात ते विशिष्ट नियमाशीं ताडून पाहतां येणें कठीण, उलट या प्रयोगांच्या आधारानेंच त्याकालीं अमुक प्रयोग हें व्याकरण शुद्ध मानले जात, असेंच कोणी प्रतिपादन करूं लागल्यास त्याला खोडून काढणें कठीण जाईल ! सातव्या विभागांत पंतांच्या काव्यांतील गुण व दोष या दोघांचीहि सूक्ष्म चर्चा ग्रंथकारानें केली आहे. पंतांचे मुख्य दोष म्हणजे क्लिष्टता, दुर्बोधता, अवघड संस्कृत शब्दांचा उपयोग, दीर्घसमास, दूरान्वय, संदिग्धता, कृत्रिमपणा, बोजडपणा, संस्कृत शब्दप्राचुर्य, श्रुतिकटुता, यमकलालसा, मतनियंत्रण, औचित्यहानि, ग्राम्यता, अश्लीलता हे होत; ही यादी बरीच मोठी आहे यांत शंका नाहीं. तथापि दुसऱ्या बाजूस माधुर्य, पदलालित्य, ओजस्विता, संवादचातुर्य, कथाकथनकौशल्य, भाषाप्रभुत्व, अलंकारवैचित्र्य वगैरे ठळक गुणहि पंतांच्या काव्यांत आढळतात. ही गोष्ट ग्रंथकारानें सोदाहरण व समर्पक सिद्ध केलेली असून ही चर्चा त्यानें कवीविषयीं योग्य अभिमान न सोडतां पण दोष दाखविण्यास न कचरतां केली आहे. आठव्या विभागांत काव्यतत्वाच्या दृष्टीनें पंतकवितेची चर्चा करण्यांत आलेली असून, या निमित्तानें जुन्या कवितेच्या सामाजिक परिणामाविषयीं असलेल्या प्रचलित मताची चर्चाहि ग्रंथकारानें केलेली आहे.

असो; प्रस्तावना म्हणजे परीक्षण नसल्यानें ग्रंथकाराची व माझीं कोणचीं मतें जुळतात व कोणचीं जुळत नाहींत हें खुलासेवार सांगण्याचें येथें कारणच नाहीं. शिवाय प्रस्तुत ग्रंथ वाचीत असतां चिकित्सकतेपेक्षांहि माझें मन कौतुकानेंच अधिक भरून गेलें होतें हें स्पष्ट नमूद करण्यास मला आनंदच वाटतो. कारण इतक्या ताज्या पदवीधरानें इतका विद्वत्तापूर्ण व विवेचक ग्रंथ लिहिलेला माझे पाहण्यांत नाहीं. विशिष्ट विषयावर संशोधक व चिकित्सक निबंध लिहिणाराला एम्. ए. ची पदवी देण्याचा प्रघात आजपर्यंत मुंबई विद्यापीठांत नव्हता. तो तसा असता व ग्रंथकर्त्यानें हा निबंधग्रंथ त्या परीक्षेकरितां म्हणून सादर केला असता तर त्याला त्याकरितां एम्. ए. ची पदवी सहज मिळाली असती असें मला वाटतें. या ग्रंथाचें सूक्ष्म अध्ययन करणारास हें तेव्हांच दिसून येईल कीं

ग्रंथकारानें भागवत व मोरोपंतांचे ग्रंथ यांचें बरेंच खोल अध्ययन केलेलें आहे. प्रत्येक अनुमान व सिद्धांत सिद्ध करण्याला जो ग्रंथकार प्रत्यक्ष उदाहरणें देऊं शकतो त्याचा पंतकाव्याचा अभ्यास पद्धतशीर रीतीनें केला गेला असला पाहिजे. मतासंबंधानें पाहतां हंस चिपळूणकर पांगारकर परांजपे पराडकर वगैरे ज्या ज्या लोकांनीं मोरोपंतांविषयीं चर्चा केलेली आहे त्यांच्याशीं जेथें मतभेद झाला तेथें ग्रंथकारानें तो धीटपणानें बोलून दाखविला आहे. अनादर बुद्धि न बाळगतां मतभेद सविनयपणें स्पष्ट बोलून दाखवून आत्मसमर्थन करणें हें कोणाच्याहि विवेचक बुद्धीला शोभेतच, पण तरुण व होतकरू ग्रंथकारांना तें विशेष भूषणावह आहे. असा कोणताहि ग्रंथविभाग नाहीं कीं ज्यांत ग्रंथकारानें स्वतःचें मतस्वातंत्र्य राखलें नाहीं. असो; ग्रंथकाराच्या परिश्रमक्षमतेचें मला फारच कौतुक वाटतें. बाह्यांग निरीक्षणांत कवितांच्या ओळींची संख्या मोजण्यापासून तो अंतरंगांतील शब्दध्वनी, शब्दरीती, शब्दव्याकरण, काव्यगुण, अलंकार इत्यादिकापर्यंत कोणत्याहि बाबतींत बारीक पाहण्याचें ग्रंथकारानें सोडलें नाहीं. आणि कवि मोरोपंतांवर जें चर्चात्मक वाङ्मय आजवर प्रसिद्ध झालें आहे त्यांत या ग्रंथाला जो अग्रमान द्यावासा मला वाटतो तो वरील गोष्टिमुळेंच. शेवटीं मराठी वाङ्मयाचें भक्त व भोक्ते, विशेषतः अधिकारी विद्यापीठ, यांजकडून या ग्रंथाचा योग्य तो परामर्ष घेतला जाईल अशी आशा व्यक्त करून व ग्रंथकाराचें मनःपूर्वक अभिनंदन करून ही प्रस्तावना पुरे करितों.

पुणें, ता. २० मे १९२६. न. चिं. केळकर.

संक्षिप्त अक्षरांचें स्पष्टीकरण.

अ.–अध्याय.
अ.म.–अमृतमथन.
अ. व.–अनेकवचन.
आदि.–आदिपर्व.
इ.–इत्यादि.
इ. स.–इसवी सन.
उ., उदा.–उदाहरणार्थ.
ए. व.–एकवचन.
का. प्र.–काव्यप्रकाश (आंकडे उल्लासांचे).
का. सं.–काव्यसंग्रह.
कृ. वि.–श्रीकृष्णविजय. (आंकडे अनुक्रमें अध्याय व पद्य यांचे.)
द्वि. पु.–द्वितीय पुरुष.
ध्रु. च.–ध्रुवचरित्र.
नं.– नंबर.
ना. भ्यु.–नारदाभ्युदय.
ना. र.–नामरसायन.
पृ.–पृष्ठ.
पृथु.–पृथुकोपाख्यान.
भा.–भागवत (आंकडे अनुक्रमें स्कंध, अध्याय व श्लोक यांचे).
भी. भा.–भीष्मभक्तिभाग्य.
भीष्म.–भीष्मपर्व.
म. भा.–महाभारत.
मं. भा.–मंत्रभागवत. (आंकडे अनुक्रमें स्कंध व आर्या यांचे).
मो. च.–लक्ष्मण रामचंद्र पांगारकरकृत ' मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन. '(अनिर्दिष्ट अंक पृष्ठांचे)
रु. गी.–रुक्मिणीगीत.
वा. च.–वामनचरित्र.
सभा.–सभापर्व.
सुदाम.–सुदामचरित्र.
स्कं.–स्कंध.

⁂ ज्या काव्यामध्यें अंतर्गत विभाग नाहींत त्यांच्या नांवापुढें येणारे आंकडे त्यांतील पद्यांचे अनुक्रमांक आहेत असें समजावें.

पूर्वार्ध

मूळ भागवताचें व पंतांच्या भागवती काव्यांचें सांगोपांग तुलनात्मक विवेचन.

॥ श्री ॥

विभाग पहिला.

श्रीमद्भागवताची अलौकिक योग्यता, भागवताचे मराठींतील अवतार.

निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखादमृतद्रवसंयुतम् ।
पिबत भागवतं रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुकाः ॥

भा. १.१.३.

१. अनादिकालीं प्रकट झालेल्या वैदिक ऋचांपासून तों तहत आजकाल मधुन मधून प्रसिद्ध होणाऱ्या संस्कृत ग्रंथांपर्यंत अफाट पसरलेल्या गीर्वाण वाङ्मयामध्यें श्रीमद्भागवत हा एक अत्यंत महत्त्वाचा व अलौकिक ग्रंथ आहे. भारत व रामायण हे ग्रंथ महान् योग्यतेचे आहेत व आम्हां सर्व आर्यांना ते नित्य पूज्य आहेत. त्या दोहोंचें, विशेषतः महाभारताचें, धर्माच्या, तत्वज्ञानाच्या, नीतिशास्त्राच्या, इतिहासाच्या, राजकारणाच्या व भाषेच्या दृष्टीनें अतिशय महत्त्व आहे. परंतु भागवताचें महत्त्व त्याच्याहूनही विशिष्ट व निराळ्या तऱ्हेचें आहे. महाभारताची भूमिका सर्वस्वीं व्यावहारिक आहे, परमार्थमय नाहीं. या जगांत धर्माझेला व नीतीला न सोडतां नाना तऱ्हेचे उद्योग व खटपटी केल्या, व्यवहारांतले प्रश्न कुशलपणें सोडवून जें काय मिळवावयाचें तें मिळविलें व पराक्रम गाजवावयाचा तो गाजवला तरी देखील या बहिर्मुख व्यापारांमध्यें मनुष्याच्या मनाला पूर्ण शांति प्राप्त होत नाहीं. आपल्या अंतःकरणांतील हितगुज ज्याला सांगवें, विपन्नावस्थेंतील दुःखें व संपन्नावस्थेंतील सुखें सारख्याच समाधानवृत्तीनें ज्याला निवेदन करावीं व ज्याच्या सर्वस्वार्पण करून केलेल्या सेवेंत शाश्वत आनंद प्राप्त

व्हावा, असा जीवींचा विसावा होऊन राहणारा सखा प्राप्त करून घेण्याची मनाला तळमळ लागून राहाते. बाह्य जगाच्या व्यापसंतापापासून अलिप्त असें अंतरींचें समाधान प्राप्त करून घेण्याची ही मनुष्यमात्राची धडपड पूर्वीपासून एकसारखी चालू आहे. अशा निरतिशय समाधानाच्या स्थानाप्रत नेऊन पोचविणारे जे कांहीं मार्गदर्शक वाटाडे आहेत त्यांत श्रीमद्भागवत हा ग्रंथ प्रमुख होय. इहलोकीं आयुष्यभर निरतिशय शांति देणारा व परलोकीं परमपद प्राप्त करून देणारा प्रेममय भक्तवत्सल प्रभु व्यक्तिमात्रास सुलभतेनें मिळवून देणारा व त्या हृदिस्थ परमात्म्याची अनन्यभक्ति करण्यास शिकविणारा असा भागवत हा ग्रंथ आहे. ग्रंथांतील प्रत्येक अध्याय, प्रत्येक श्लोक, प्रत्येक ओळ, किंबहुना प्रत्येक शब्द श्रीकृष्णभक्तीच्याच प्रतिपादनास लावलेला असा भागवतांतच आढळेल; इतरत्र कोठेंही आढळणार नाहीं. श्रीमद्भागवतांतील प्रत्येक पदामध्यें श्रीकृष्णपरमात्म्याचेंच नानातऱ्हांनीं गायन केलेलें आहे अशी अठरा पुराणांपैकीं भागवताच्या जोडीच्या पद्मपुराणाचीच साक्ष आहे.

पुराणेषु च सर्वेषु श्रीमद्भागवतं परम् ।
यत्र प्रतिपदं कृष्णो गीयते बहुधर्षिभिः ॥

(भागवत माहात्म्य); पद्मपुराण, ६.१८९.३.

व्यावहारिक आयुष्यामध्यें शांतता व समाधान प्राप्त होण्याकरितां जन्मल्यापासून मरेपर्यंत परमेश्वरभक्ति, कैवल्यसुख प्राप्त करून घेण्याचें उत्कृष्ट साधन म्हणून भगवंताची भक्ति व मोक्षाची प्राप्ति होऊन कैवल्यपदीं रममाण झाल्यानंतर देखील श्रीहरीची 'अहैतुक्यप्रतिता' अशी निराकांक्ष भक्ति— याप्रमाणें सर्व काळीं, सर्व स्थलीं व सर्व अवस्थांमध्यें भगवद्भक्ति हाच येथून तेथून भागवताचा प्रतिपाद्य विषय आहे. या भागवतधर्मरूपी अमृतप्रपेभोवतीं सर्वांनीं गोळा होऊन भक्तिसुधेचें आकंठ पान करावें म्हणून भागवतकारांनीं रमणीय, काव्यमय वाणीनें वाचकांना आळविलें आहे. निरनिराळ्या भक्तांच्या प्रेमळ कथा उदाहरणादाखल पुढें ठेविल्या आहेत व गहन वेदान्ताचें उद्घाटन करून वेदान्ततत्वांसही आपला भागवतधर्म पूर्णपणें अनुकूलच आहे असें दाखविलें आहे. अशा तऱ्हेचें श्रीमद्भागवताचें अलौकिक स्वरूप आहे.

२. महाभारताची भूमिका अशा तऱ्हेची नसून ती बहुतांशीं व्यावहारिक आहे. लढाया, उलथापालथी, भांडणें, सभा, द्यूत, कारस्थानें वगैरे लौकिक गो-

ष्टींचें तें चित्र आहे. त्यांतही व्यासांनीं भगवद्गीतेमध्यें व शांतिपर्वांतील नारायणीय आख्यानामध्यें भागवतधर्माचें प्रतिपादन केलें आहे; नाहीं असें नाहीं. परंतु हीं दोन्ही प्रकरणें म्हणजे महाभारताचा अंशमात्र होत आणि त्यांत देखील भागवत-धर्माचें व भक्तिमार्गाचें रहस्यच सर्वस्वीं सांगितलें नसून इतर अनेक विषयांचा समावेश त्याबरोबरच केला आहे. आणि हें प्रत्यक्ष व्यासांच्या भागवतांत दिले-ल्या कबुलीवरूनच सिद्ध होतें. सर्वार्थपरिबृंहित असें भारत रचल्यानंतर देखील व्यासांच्या मनाची तळमळ शांत होईना. शेवटीं नारदाला त्यांनीं "सांग मनीं अप्रसन्न कां बा मी" असा प्रश्न केला. तेव्हां नारदांनीं त्यांना उत्तर दिलें --

"तुवां काहीं ।
*प्राधान्यें श्रीभगवन्महिमा अद्यापि वर्णिला नाहीं ॥
वाखाणावें प्रेमें भगवद्यश मुनिवरा तुवां आतां ।
हृदय प्रसन्न होतें प्रभुचा महिमाचि आदरें गातां ॥"

मं. भा. १. ६, ७.

यावरून असें दिसून येतें कीं, भगवच्चारित्राचें वर्णन व भागवतधर्म जो महा-भारतांत अगदीं थोड्याशा अंशानें वर्णिला होता तोच पूर्णांशानें व पृथक्पणें वर्णन करण्याची प्रेरणा व्यासांस नारदांनीं केली व त्या प्रेरणेचेंच फल म्हणजे व्यास-मुखांतून बाहेर पडलेलें हें भागवत होय. भारतांत व्यासांनीं जें थोडेंसें व अपुरें वर्णिलें होतें तेंच भागवतांत विस्तृतपणें वर्णन करण्याला नारदांनीं त्यांना सांगि-तलें. अर्थात् जो भागवतधर्म त्रोटकपणें भगवद्गीतेंत सांगितला होता तोच भाग-वतांत विस्तृतपणें व्यासांनीं सांगितला असें स्वतः भागवतकारांच्या म्हणण्या-प्रमाणें दिसतें. परंतु टिळकांच्या म्हणण्याप्रमाणें हें खरें नाहीं. 'भगवंतांनीं प्रवृत्त केलेला व गीतेंत आणि नारायणीय आख्यानांत उपदेशिलेला निष्कामकर्म-प्रधान भागवतधर्म तो मूळचा व प्राचीन धर्म होय. त्याची परंपरा पुढें लुप्त झाली. व "मूळ म्हणजे भारतांतील भागवतधर्मांत नैष्कर्म्याला [निष्कामकर्माला] जें

---

* येथील 'प्राधान्यें' हा शब्द किंवा मूळ भागवतांतील याच अर्थाचा 'अनु-दितप्रायम्' हा शब्द लक्षांत ठेवण्याजोगा आहे. त्यावरून भारतामध्यें थोडेंसें भगवद्यशोगान व्यासांनीं केलें होतेंच. पण तें मनाची शांति होण्यास पुरेसें नव्हतें असें सूचित होत आहे.

प्राधान्य होतें तें कालांतरानें कमी होऊन त्याऐवजीं भक्तीला जेव्हां प्राधान्य आलें तेव्हां या **दुसऱ्या स्वरूपाचा (म्हणजे भक्तिप्रधान)** भागवतधर्म प्रतिपादन करण्यासाठीं भागवतपुराण ही पुरणपोळी **मागाहून** बनविली." (गीतारहस्य ५४०) असें टिळकांचें म्हणणें आहे * तेव्हां त्यांच्या म्हणण्याप्रमाणें भागवतांतील भागवतधर्म हा भगवद्गीतेंतील भागवतधर्मापेक्षां निराळा होय. अर्वाचीन विद्वन्मुकुटमणींचें हें मत कदाचित् खरें असेल पण आमच्या पूर्वींच्या संतमंडळींस ही विचाराची दिशा मान्य नव्हती असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. भगवद्गीता व भागवत पुराण हीं एकाच धर्माचीं प्रतिपादक आहेत असें त्यांस वाटे. श्रीज्ञानेश्वरांनीं महाराष्ट्रीय भागवत संप्रदायाची स्थापना केली त्यांनीं आपल्या ज्ञानदेवींत भक्तिरसाचा किती उत्कर्ष केला आहे व भक्तिरसास पोषक असे ९ व १८ हे अध्याय लिहीत असतां त्यांच्या वाणीला कसें अलौकिक भरतें आलें आहे हें पाहणाऱ्यांस भगवद्गीतेचा भागवतधर्म भक्तिप्रधान भागवतधर्माहून ते निराळा मानीत असत अशी शंका देखील येण्याचें कारण नाहीं. श्रीज्ञानेश्वरांनीं जो भागवतसांप्रदाय स्थापन केला त्याच सांप्रदायांत एकनाथी भागवत हा ज्ञानेश्वरीइतकाच श्रेष्ठ प्रमाण ग्रंथ मानण्यांत येतो यावरून आमच्या प्राचीन संतमंडळींच्या परंपरेंत तरी गीता व भागवत हे दोन्ही ग्रंथ अगदीं बरोबरीच्या व सलगीच्या प्रेमभावानें अत्यंत उच्च स्थानीं अधिष्ठित झालेले होते हें स्पष्ट दिसून येईल.

३. भगवद्गीतेला शिरीं धरून भागवताला बाजूला टाकून द्यायचें ही प्रवृत्ति अगदीं अलीकडची आहे व अलीकडे सुद्धां पाश्चात्यशिक्षणविभूषित लोकांमध्येंच ती विशेष दिसून येते. अशी प्रवृत्ति होण्याचीं कारणें काय वगैरे विस्तार येथें करण्याची जरूरी नाहीं. येथें येवढेंच पुनः सांगावयाचें कीं ही प्रवृत्ति पूर्वीं मुळींच नव्हती व अजून देखील जुन्या तऱ्हेच्या व कल्पनांच्या लोकांत ती आपल्यास आढळून येत नाहीं. भागवतपुराणाची पुरणपोळी मागाहून बनविली कां आधीं तयार झाली वगैरे विचक्षणा करण्याच्या भानगडींत पूर्वींचे संत व कवि पडत नसत त्या पुरणपोळीच्या सत्वस्थपणाला लोभून जाऊन तिच्यावर यथेच्छ ताव

* भागवत धर्माविषयीं व श्रीमद्भागवताविषयीं टिळकांचें म्हणणें काय आहे हें साकल्यानें जाणावयाचें असल्यास गीतारहस्य पृ. ९–११ व पृ. ५३५–५५३ (विशेषत: ५३९–४०) यांचें अवलोकन करावें.

मारण्याचा सपाटा मात्र त्यांनीं चालविला होता. व जुन्या काळचे सकस व ताठर गडी ते असल्यामुळें तो पुरणपोळीचा आहार त्यांना उत्कृष्टपणें पचतही असे. खरोखर गीता व भागवत या दोन्ही भक्तिप्रधान ग्रंथांचा पूर्वीच्या संतांवर व वाङ्मयभक्तांवर इतका परिणाम झाला होता कीं समर्थ रामदास व त्यांच्या सांप्रदायांतलि ग्रंथकार वगळले असतां बाकीच्या सर्व महत्वाच्या कवींनीं गीता किंवा भागवत यांपैकीं एकावर तरी प्रामुख्यानें रचना केलेली दिसून येते. त्यांतही भागवताचें महत्त्व व त्याचा झालेला परिणाम हा कांकणभर जास्तच मानावा लागतो. कारण गीतेंत फक्त वेदान्त व भक्तियोग यांचें तात्त्विक रीतीचें प्रतिपादन येवढाच विषय आहे; परंतु भागवतांत या दोनही गोष्टी असून शिवाय भगवंतांच्या व अनेक भगवद्भक्तांच्या रमणीय कथांचा समावेश त्यांत झाला असल्यानें तात्विक विचारांच्या गंभीर डोहांत अवगाहन करण्याची ज्यांस शक्ति किंवा इच्छा नव्हती त्यांनीं भगवत्कथांच्या सुलभ वाहत्या गंगेंत हात धुवून घेऊन भगवच्चिंतनाचें व यशोवर्णनाचें आपलें कार्य साधून घेतलें आहे.

> सदा सेव्या सदा सेव्या श्रीमद्भागवती कथा ।
> यस्याः श्रवणमात्रेण मुक्तिरत्नं समाश्रयेत् ॥
> किं श्रुतैर्बहुभिः काव्यैः पुराणैश्च भ्रमावहैः ।
> एकं भागवतं शास्त्रं मुक्तिदानेन गर्जति ॥
>
> (श्रीभागवतमाहात्म्य); पद्मपुराण, ६ १३१.२७,३०.

अशी आमच्या पूर्वीच्या सर्व कवींची दृढ श्रद्धा होती. त्यांची ग्रंथरचना पाहिली तर आपणास असें दिसून येईल कीं भागवतांतलि एकाद्या तरी प्रसंगावर किंवा एकाद्या तरी आख्यानावर बहुधा प्रत्येक कवीनें कविता केली आहे. मराठींतलि भागवताच्या अवतारांचें विहंगावलोकन आपणास पुढें करावयाचेंच आहे त्यावरून अव्वलपासून अखेरपर्यंत मराठी वाङ्मयावर भागवताचा केवढा जबरदस्त पगडा बसलेला आहे हें सहज दिसून येईल. आमचें पूर्वीचें मराठी वाङ्मय सर्व भक्तिरसपरिपूरित आहे. आणि भक्तिरसानें ओथंबलेल्या वाङ्मयाच्या रोमरोमीं भागवताची शिकवण भिनलेली असेल हें काय सांगावयास पाहिजे ?

४. इतर पुराणग्रंथांच्या तुलनेनें पाहिलें तरी देखील भागवताचें अलौकिकत्व स्पष्टपणें लक्षांत येतें. भागवत हें एक पुराण आहे. परंतु इतर पुराणग्रंथांतलि गबाळ व भाकड मजकुराचा फारसा अंश भागवतांत दिसून येत

नाहीं. नानातऱ्हेचीं व्रतें, उद्यापनें, पूजा किंवा उपवास यांचीं अतिशयोक्तिपूर्ण वर्णनें; क्षेत्रांचें, नद्यांचें, मंत्रांचें, देवतांच्या कवचांचें बाहींच्या कांहींच माहात्म्य वर्णन करणाऱ्या कथा, यांनींच इतर पुराणांचा पुष्कळसा भाग व्यापलेला असतो. अनेक जन्म अघोर पापें केलेल्या गलत्कुष्ट चांडाळाचें केवळ यदृच्छेनें एकाद्या क्षेत्रीं जाणें होऊन तेथील शिवलिंगावरचा वारा त्याच्या आंगाला लागला किंवा बिल्वपत्राचा नुसता स्पर्श झाला कीं त्याचीं अनेकजन्मार्जित पापें धुवून जाऊन तो मुक्त होतो—अशा तऱ्हेच्या कथांनीं इतर पुराणें भरलेलीं असतात. अत्यंत निंद्य पातकें करून देखील केवळ भस्म लावल्यानें, किंवा मनाला पश्चात्ताप न होतां असाच कांहीं तांत्रिक विधि केल्यानें मनुष्य पापापासून मुक्त होतो व सायुज्यपदास जातो असें वर्णन करणें म्हणजे पातकें करण्याला एक प्रकारें प्रोत्साहन देणेंच होय. अशा कथा इतर पुराणांतून पुष्कळ आढळतात. परंतु भागवतांत अशा खऱ्या धर्माच्या दृष्टीनें आक्षेपार्ह कथा नाहींत, हाच त्याचा विशेष होय. ‘ देव भावाचा भुकेला ’ हें तत्व लक्षांत ठेवून निर्मळ अनन्य भक्तिभाव, खरें पुण्याचरण, यांचेंच महत्त्व रमणीय कथांच्या रूपानें वर्णन केलेलें वाचून येथें चित्त प्रसन्न होतें, शुचितर होतें व त्यांतील किल्बिषें जळून जातात. ध्रुव, प्रल्हाद, बलि, गजेंद्र यांच्या एकेक कथा म्हणजे मनुष्यास उच्च, उदात्त वातावरणांत घेऊन जाणारीं दिव्य विमानेंच होत. असो.

५. आपल्या प्राचीन वाङ्मयांतलि बहुतेक ग्रंथांप्रमाणे भागवताचाही रचनाकाल निर्णीत झालेला नाहीं. एच्. एच्. विल्सन या पाश्चात्य पंडिताचे मतें भागवत हें बोपदेवानें रचलें व बोपदेव हा इसवी सनाच्या चौदाव्या शतकांत झाला. अर्थात् भागवत चौदाव्या शतकांत लिहिलें गेलें ! याच्या उलट भागवताचा उपसंहार लिहिणारे श्री. यशवंत वेंकटेश कोल्हटकर यांचे मतें सध्याच्या स्वरूपांतल्या भागवताचा रचनाकाल ख्रिस्ती सनापूर्वी एकदोन शतकें तरी असला पाहिजे. पैकीं विल्सनचें म्हणणें आतां रद्द ठरलें आहे. त्याचे म्हणण्याप्रमाणें बोपदेव हा चौदाव्या शतकांत झाला नाहीं व त्यानें भागवत रचलेंहि नाहीं. कारण त्यानें स्वतः आपल्या ग्रंथांत भागवताचा पूज्य व प्रमाण ग्रंथ म्हणून उल्लेख केला आहे. पुराणनिरीक्षणकार त्र्यंबक गुरुनाथ काळे यांनीं पुराणांच्या वंशावळींतलि कैलकिल राजाच्या काळावरून पुराणांचें शेवटचें तिसरें संस्करण

इ. स. ५००–६००च्या सुमारास झालें असें दाखवून दिले आहे. भागवत पुराणांतील वंशावळीचा भाग ८वें शतक अगर त्याहूनही नंतरच्या कालांत रचला असावा असा एफ्. ई. पार्जिटर नामक पाश्चात्य विद्वानाचा अभिप्राय आहे. डिसेंबर १९२३ च्या विविधज्ञानविस्तारांत श्री. दाजी नागेश आपटे यांनीं भागवताचा रचनाकाल ९ वें शतक होय असें ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणें श्री. चिंतामण विनायक उर्फ नानासाहेब वैद्य यांनींही नुकताच मद्रास येथे १९२४च्या नाताळांत भरलेल्या ओरिएण्टल कॉन्फरन्सकरितां 'भागवत पुराणाचा काल' या नांवाचा निबंध लिहिला असून तो रायल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या 'जर्नल'मधून प्रसिद्धही झालेला आहे. त्यांतील वैद्यांचीं प्रमाणें रा. आपटे यांच्या उपर्युक्त लेखांतील प्रमाणांशीं बरींच मिळतीं असून त्यांचा सिद्धान्तही भागवत हें इ. सनाच्या १०व्या शतकांत रचलें असलें पाहिजे असाच आहे. याप्रमाणें सर्व मतांतांचा गलबला आहे.

नवव्या दहाव्या शतकापर्यंत भागवताला ओढणारे श्री. वैद्य इत्यादि संशोधक यांचीं प्रमाणें निर्णायक व बिनतोड आहेत असें ह्मणवत नाहीं. भागवतांत बुद्धाची विष्णूच्या अवतारांमध्यें केलेली गणना, सांख्यतत्वांची त्यांत दिसून येत असलेली परिणति व खुद्द सांख्यमत प्रस्थापक कपिलाची विष्णूच्या अवतारांत केलेली गणना वगैरे प्रमाणें भागवताची अर्वाचीनता ठरविण्यासाठीं देण्यांत येत असतात. शंकराचार्यांच्या ग्रंथांत भागवताचा उल्लेख नाहीं हें एक मोठें प्रमाण पुढें मांडण्यांत येत असतें. परंतु शंकराचार्यांच्या 'सर्वसिद्धांतसंग्रह' नांवाच्या ग्रंथामध्यें भागवताचा उल्लेख आहे असें दाखविण्यांत आलें आहे. खुद्द शंकराचार्यांच्या ग्रंथांत व त्यांच्या गुरूचे गुरु जे गौडपादाचार्य त्यांच्या ग्रंथांत भागवताचे आधार घेतलेले आहेत असें वैकुंठवासी गोपाळाचार्य अण्णा कराडकर यांनीं दाखवून दिलेलें आहे. शंकराचार्यांचा काल म्हणजे इ. स. ७०० च्या सुमारचा होय. त्यांच्या गुरूंचे गुरु गौडपादाचार्य यांचा काल निदान ६५० च्या सुमारचा तरी असला पाहिजे. त्यावेळेस भागवत ग्रंथ प्रमाण मानला जात होता. यावरून त्याच्यापूर्वीं निदान शेंदोनशें वर्षें तरी भागवत झालेलें असलें पाहिजे. ही भागवताच्या कालाची अगदीं अलीकडची मर्यादा होय, असें सध्यांच्या प्रमाणांवरून म्हणावेंसें वाटतें. हिच्यापूर्वीं भागवत किती जाऊं शकतें हें अनिर्णीतच आहे. असो. भागवताच्या रचनाकालाचा प्रश्न येथें बराचसा अप्रस्तुत आहे; त्याचें वर केवळ स्थूलमानानें दिग्दर्शन केलें आहे.

६. रचनाकाल अत्यंत प्राचीन असो अथवा अगदीं अलीकडचा असो ग्रंथाचें स्वयंभू महत्त्व त्यामुळें कमी होत नाहीं. गेल्या हजार-नऊशें वर्षांचा हिंदुसमाजाचा इतिहास अवलोकन केल्यास भागवताचें अलौकिक महत्त्व चटकन् ध्यानांत येईल. वेदकालीन यज्ञमार्गाला समाज केव्हांच पारखा झाला होता. ब्राह्मणेतर वर्णांचें द्विजत्व लोपून ते शूद्रसम बनूं लागले होते व 'कलावाद्यन्तयोः स्थितिः' अशी वस्तुस्थिति झाली होती. कर्ममार्ग दुरावला होता आणि श्रीशंकराचार्यांनीं प्रतिपादिलेला संन्यासमार्ग अति दुस्तर वाटत होता. सारांश, एक हजार वर्षांपूर्वी, प्रेममयतेनें सर्व समाजास एकीकृत करणारा व सर्वांचीं मनें आवर्जून घेणारा, सर्वांच्या अधिकारांतला, सर्वांस अनुसरण्यास सुलभ, अशा तऱ्हेचा परमार्थमार्ग हिंदुसमाजांत प्रचलित होण्याची जरूरी भासत होती. मुसलमानांचे हल्ले सुरू झाल्यानंतर तर धर्मरक्षणाकरितां अशा एकाद्या सर्वसामान्य तत्त्वाची अधिकच आवश्यकता उत्पन्न झाली. अशा स्थितींत भागवतधर्म व भक्तिमार्ग यांचें पुनरुज्जीवन होऊन त्यांच्यामुळें धर्मरक्षणाचें व समाजधारणेचें महत्कार्य सिद्धीस गेलें. हा जो भागवतधर्माचा प्रसार व जयजयकार आर्यावर्तभर झाला त्यास मुख्य कारण श्रीमद्भागवत हा ग्रंथ होय. भागवतधर्माच्या प्रसारार्थ निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळे पंथ निघाले; परंतु सर्वांची करणी व कार्य हीं मूलतः एकाच स्वरूपाचीं झालीं. मूळ सुरुवात दक्षिणेंत झाली. द्रविड देशांत रामानुजाचार्यांनीं भक्तिमार्गाची वेदान्ताच्या पायावर स्थापना केली. तेराव्या शतकांत तुलव देशांत मध्वाचार्यांनीं वैष्णवमत प्रस्थापित केलें याच सुमारास ज्ञानेश्वर–नामदेवांनीं महाराष्ट्रांत भागवतधर्माचा पुकारा केला. पंधराव्या शतकांत वल्लभाचार्यांनीं केवळ भागवतावर आधारलेला पुष्टिसंप्रदाय गुर्जर देशांत प्रसृत केला. महाभगवद्भक्त मिराबाई राजपुतान्यांत 'गिरिधर' कृष्णाला आळवूं लागली, व चैतन्यदेवांनीं बंगाल्यांत कृष्णभक्तीचें चैतन्य ओतलें.

भागवतधर्माचें जें हें प्रेमसाम्राज्य दोनतीन शतकांत भरतखंडभर पसरलें त्याचा अधिराजा श्रीमद्भागवत हा ग्रंथ होय. प्रांतोप्रांतीचे निरनिराळे पंथ यांना (एक रामानुज खेरीजकरून) स्फूर्ति मुख्यतः, निदान बऱ्याच अंशीं तरी, भागवतापासून मिळाली होती. मध्वाचार्य व वल्लभाचार्य यांनीं उघड उघड भागवतावर ग्रंथ लिहून त्याविषयींचा आपला परमादर प्रकट केला आहे. महाराष्ट्रीय भागवतधर्मी संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ इत्यादिकांवर भागवताचा किती दृढ परिणाम

झालेला आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं. ज्ञानेश्वरांना भागवत माहीत नव्हतें असा शुष्क वाद कांहींनीं पूर्वीं उपस्थित केला होता. परंतु खुद्द ज्ञानेश्वरांवर भागवताचा झालेला दृढ परिणाम ठिकठिकाणीं दिसून येतो असें पांगारकर यांनीं दाखवून दिलें आहे. याचप्रमाणें इतर प्रांतींही भागवतानें श्रीकृष्णभक्तीची पाखर घालून सर्वांस भक्तिमार्गरूपी राजरस्त्यास लावून सायुज्यपदाचें साध्य सुलभ करून दिलें.

७. हा जो भागवतधर्माचा महापूर येऊन गेला त्यांत महाराष्ट्रांतील भागवत-धर्माचा इतिहास विशेष उज्ज्वल व स्पृहणीय झाला इतर कित्येक प्रांतांतल्या-प्रमाणें त्यास येथें अमर्याद व नीतिदृष्ट्या अनुचित स्वरूप आलें नाहीं. ज्या परंपरेचा प्रारंभ श्रीज्ञानेश्वरासारख्या योगिश्रेष्ठ व परमभक्त महात्म्यापासून झाला त्या परंपरेंतील संत मंडळींमध्यें गैरवाजवी प्रकार शिरणें अशक्यच होतें. आणखी दुसरी गोष्ट म्हणजे इतर कांहीं ठिकाणांप्रमाणें येथील भागवतधर्माला संकुचित, सांप्रदायिक व आग्रहीपणाचें स्वरूप आलें नाहीं. महाराष्ट्रीय संतांनीं निराळें वेदान्तमत स्थापन करण्याचा आव कधीं घेतला नाहीं किंवा एकादे स्वामी अगर आचार्य स्थापन करण्याचा बडेजाव कधीं केला नाहीं. गीतेवरील व भागवता-वरील अमुकच टीका प्रमाण, बाकीच्या सर्व अप्रमाण, अशा तऱ्हेचा आग्रहही कोणी धरला नाहीं. ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथास जी सर्वमान्यता प्राप्त झाली ती त्याच्या अतुलनीय योग्यतेमुळें आपोआप प्राप्त झाली. बाकी विचाराचें व मतप्रतिपादनाचें रान सर्वांस सारखेंच मोकळें होतें. याचें स्पष्ट दिग्दर्शन वामनपंडितांनीं यथार्थदीपिका लिहून ज्ञानेश्वरांस कित्येक ठिकाणीं विरोध केला यांत उत्कृष्ट रीतीनें दिसून येतें. आमच्या संतांच्या अशा उदार बुद्धीमुळें व जनहिततत्परतेमुळें महाराष्ट्र वाङ्मयास मोठाच फायदा झाला. संतपरंपरेंतून पुढें जरी वारकरी संप्रदाय परिणत झाला तरी वाङ्मयप्रांतांत विचारस्वातंत्र्याची पूर्ण मुभा असल्यामुळें परमेश्वर-भक्तीचा खरा भागवतधर्म कोणत्याहि संप्रदायापुरता केव्हांच आकुंचित झाला नाहीं आणि त्यामुळें गीतेवर व भागवतावर नवी नवी सर्वांगसुंदर ग्रंथनिर्मिति व्हावयाचें कधींच बंद पडलें नाहीं. वारकरी संप्रदायानें गीतेची टीका 'ज्ञानेश्वरी' व भागवताची टीका 'एकनाथी भागवत' हे दोनहि प्रमाण ग्रंथ मानण्यास सुरु-वात केल्यानंतर वारकरी संप्रदायांत गीतेवर व भागवतावर मुळींच टीका निर्माण

झाल्या नाहींत. परंतु वारकरी समाज म्हणजे अखिल भगवद्भक्तांच्या समाजाचा केवळ एक अंश होय. तेव्हां सांप्रदायाचे आणि परंपरेचे दृष्टीनें पुष्कळ अंशीं हितकर असे निर्बंध वारकरी समाजास जरी लागू झाले तरी इतरांच्या विचारस्वातंत्र्यावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. अर्थात् वारकरी संप्रदायाचे बाहेर सर्व समाजांत तळापर्यंत जाऊन पोंचलेला जो संप्रदायरहित व्यापक भागवतधर्म तो वाङ्मयदृष्ट्या वांझ राहिला नाहीं. तो ग्रंथरूपी फलपुष्पांच्या बहारानें डवरून जाऊन रसिक भक्तांस आनंद देण्यास कारणीभूत झाला. आपणास केवळ वाङ्मयाच्या दृष्टीनेंच सर्व भागवती अवताराचें अवलोकन करावयाचें आहे. अर्थात् सांप्रदायिक, असांप्रदायिक, सर्वांसच येथें पाचारण आहे.

८. ज्ञानेश्वरमहाराजांनीं भागवतसंप्रदायाची स्थापना केली त्याच काळीं किंवा त्याच्यानंतर थोडेच दिवसांत भागवताच्या आधारें मराठींत विस्तृत रचना सुरू झाली असली पाहिजे. कारण अजमासें त्याच काळांतील दशमस्कंधावरील एक सर्वांगसुंदर टीका आजतागाईत उपलब्ध आहे. ज्ञानेश्वरांनीं ज्या काली भागवत धर्माची स्थापना केली तो काल म्हणजे एक प्रकारें पुनरुज्जीवनाचा (Renascence) काल होय. भगवद्भक्तीचें भांडार सर्वांस— लहानापासून थोरापर्यंत, ब्राह्मणापासून चांडाळापर्यंत, सर्वांस— खुलें केल्याची द्वाही जेव्हां त्यांनीं आपल्या ग्रंथांच्या योगानें व सर्व जातींच्या साधुसंतांस बरोबर घेऊन ज्या तीर्थयात्रा त्यांनीं केल्या त्यांच्या योगानें सर्व महाराष्ट्रभर फिरविला, त्या वेळेस सर्वत्र मोठी जागृति होऊन भगवद्भक्तीच्या उमाळ्यानें व सात्विक प्रेमाच्या स्फूर्तीनें सर्व महाराष्ट्र हालून गेलें असलें पाहिजे. आणि खरोखर अशी स्थिति त्यावेळेस झाली होती, प्रेमळ भगवद्भक्तांच्या सात्त्विक नामस्मरणाच्या घोषानें सर्व महाराष्ट्र त्यावेळेस गरजून गेलें होतें, असेंच त्या काळची आपल्यास जी माहिती आहे व त्या कालचें जें कवित्व उपलब्ध आहे त्यावरून दिसून येतें. मग अशा वेळेस या सर्व प्रेमळ संत मंडळींच्या अलोट कृष्णभक्तीचा पायाच जो भागवत त्याकडे कित्येक संतकवींचें लक्ष गेल्याशिवाय राहणें कसें शक्य आहे ? त्यावेळेस जे कांहीं फुटकळ किंवा सविस्तर ग्रंथ निर्माण झाले त्यांपैकीं कांहीं कदाचित् लयाला गेले असतील. परंतु वर सांगितल्याप्रमाणें भागवताच्या दशमावरील एक गोड टीका आजतागायत उपलब्ध आहे. प्रस्तुत टीका बहिरंभट किंवा बहिरा पिसा उर्फ जातवेद नामक

ब्राह्मणानें केलेली आहे. ही अर्थात् ओवीबद्ध असून हिची ओवीसंख्या सुमारें पाऊण लक्ष आहे. ही टीका शके १३०० च्या सुमारास अस्तित्वांत आली असावी, असें श्री. विनायक लक्ष्मण भावे यांचें म्हणणें आहे. भावे यांनीं कृष्णजन्मप्रसंगींचा या ग्रंथांतला एक उतारा दिला आहे त्यावरूनच ही टीका किती प्रेमळ व रसाळ आहे तें दिसून येतें. या सविस्तर ग्रंथाशिवाय त्या वेळची संत मंडळी कृष्णचरित्रावर फुटकळ अभंग अनेकशः रचीत असतच. नामदेवाचे कृष्णलीलेवरील अभंग प्रसिद्धच आहेत. अशा प्रकारें फुटकळ रचलेली कृष्णचरित्रपर कविता भागवतापासून मिळालेल्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्फूर्तीचेंच फळ होय, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

९. यानंतरचा भागवताचा मराठींतील ठळक अवतार म्हणजे श्री एकनाथ-महाराजांचा होय. ज्ञानेश्वर, नामदेव यांच्या कालापासून एकनाथांच्या कालापर्यंत साधारणपणें दोनशें किंवा थोडीं अधिक वर्षें होतात. मध्यें कोठें थांबायचें महत्वाचें ठिकाण न आढळतां एकदम एवढी मजल मारायची म्हणजे थोडेसें कष्टाचेंच खरें परंतु त्याला कांहीं इलाज नाहीं. हीं दोन अडीचशें वर्षें म्हणजे मुसलमानांच्या धामधुमीचा काळ होय. या कालामध्यें कदाचित् वाङ्मयाची निपज अगदीं कमी झाली असेल. किंवा पुष्कळ झाली असूनही धामधुमीमुळें व छळामुळें नष्ट झाली असेल. सध्यां त्या कालांतील म्हणतां येईल असें फारसें वाङ्मय उपलब्ध नाहीं व उपलब्ध माहितीप्रमाणें भागवताचा कोणी अवतार त्या कालामध्यें होऊन गेला असावा असें दिसत नाहीं. * तेव्हां एकदम एकनाथांपर्यंतच आपणाला येऊन ठेपलें पाहिजे. एकनाथांचा दशमस्कंध अलीकडे नुकताच उपलब्ध झाला आहे तो पुष्कळांच्या पहाण्यांत नसेल, पण त्यांची एकादश स्कंधावरील टीका जगन्मान्य असून रुक्मिणीस्वयंवर, चतुःश्लोकी भागवत वगैरे ग्रंथहि प्रसिद्धच आहेत. एकनाथांच्या योग्यतेविषयीं व त्यांच्या वाणीच्या महिम्याविषयीं मी

---

* पराडकरांच्या आवृत्तीमध्यें रा. पोतदार यांनीं मंत्रभागवताला जो उपोद्घात लिहिला आहे त्यांत पंधराव्या शतकांतील कवि विष्णुदास नामा याचा त्यांनीं भागवताचा अवतार म्हणून उल्लेख केला आहे (पृ. २). विष्णुदास नाम्यानें मराठींत भारत रचिलें आहे परंतु भागवतावर त्याची कांहीं विशेष रचना आहे असें उपलब्ध माहितीवरून दिसत नाहीं.

काय लिहावें ? भागवतधर्मीयांस, व सामान्यतः सात्त्विक प्रवृत्तीच्या रसिकांस तर राहोच पण प्रत्यक्ष सुधारकांसही ज्यांच्या प्रांजळपणानें व निर्मळ भावानें वश करून घेतलें व ' एकनाथ हेही आमच्यांतलेच सुधारक होते ' असें म्हणावयास लावलें त्यांच्या वाणीच्या व चरित्राच्या प्रभावाची यापरती दुसरी कोणती खूण असणार ? The times produce the man; 'वेळ आली म्हणजे त्यावेळेस जरूर अशी व्यक्तीहि उत्पन्न होते' अशी इंग्रजींत म्हण आहे. नाथांच्या बाबतींत या म्हणीचीच सत्यता अनुभवास येते. परचक्राच्या संकटानें ग्रस्त झालेल्या महाराष्ट्रास व कालाच्या प्रातिकूल्यानें मलिन झालेल्या भागवतधर्मास एकीचे, समाधानाचे व निर्मळ कृष्णभक्तीचे धडे शिकविणाऱ्या प्रेमळ व शुद्ध भावाच्या शिक्षकाची जरूरी होती. ज्ञानेश्वरांनीं गीतेला हातीं धरून भागवतसंप्रदायाची प्राणप्रतिष्ठा केली; व ती या भावनापूर्ण महाराष्ट्र देशांत लगेच दृढमूल झाली यांत संशय नाहीं. तथापि भागवत धर्माची उज्ज्वलता निर्मळ भावानें, प्रेमानें, कळवळलेल्या हृदयानें व सात्विक, प्रसादपूर्ण वाणीनें घोळून घोळून महाराष्ट्राच्या हृदयांत पूर्णपणें बिंबवणारा कोणी तरी पाहिजे होता व तो नाथांच्या रूपानें महाराष्ट्रास मिळाला. मूळ गीतेनें प्रतिपादिलेल्या भक्तियोगाचें जसें मूळ भागवतानें विस्तृत विवरण करून भक्तियोग पराकोटीला नेऊन पोंचविला त्याचप्रमाणें ज्ञानेश्वरांनीं प्रथम गीतेच्या आधारानें सुरू केलेल्या भक्तिसांप्रदायाला नाथांनीं भागवताच्याच आधारें ग्रंथरचना करून परिपूर्ण व सर्वांगसुंदर असें स्वरूप दिलें व त्याचा प्रसार महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यापर्यंत केला ही एक अत्यंत समुचित अशीच गोष्ट महाराष्ट्रीयांच्या सुदैवानें घडून आली यांत शंका नाहीं. असो. नाथांचें भागवत (एकादश स्कंध) सुमारें वीस हजार म्हणजे मूळ भागवती एकादश स्कंधाच्या चौदा पट येईल. नाथांचे इतर भागवती ग्रंथही याप्रमाणेंच विस्तृत आहेत. नाथांचा काल म्हणजे शके १५०० च्या सुमाराचा किंवा किंचित अगोदरचा होय.

१०. नाथांनंतर नांव घ्यायचें म्हणजे मुक्तेश्वराचें. यानें भागवत लिहिलें आहे असा प्रवाद मात्र आहे. बाकी शुकरंभासंवादासारख्या एक दोन किरकोळ प्रकरणांशिवाय याची भागवती रचना कांहीं उपलब्ध नाहीं. परंतु मुक्तेश्वराचें नांव याप्रमाणें सोडून द्यावें लागलें तरी भागवतावर रचना करणारे इतर अनेक कवि व संत याच नाथोत्तर कालांत आपल्याला आढळतात. गीतेवर देखील अवाढव्य ग्रंथरचना करणारे दासोपंतासारखे खंदे साहित्यवीर याच

कालांत होऊन गेले. ही सर्व ग्रंथरचनेस आलेली अलौकिक भरती पाहिली म्हणजे नाथांच्या जागृतीच्या व भागवतधर्मवृद्धीच्या कार्याचें खरें महत्त्व लक्षांत येतें. असो. नाथांनंतर व वामनपंडितांच्या अगोदर म्हणजे शके १५०० ते १६०० च्या दरम्यान भागवतावर मराठींत रचना करणारे पुष्कळच ग्रंथकार होऊन गेले पैकीं बहुतेकांनीं दशमस्कंधावरच रचना केली आहे. जयरामस्वामी वडगांवकर (शके १५२१–१५९४) यांनीं दशमस्कंध टीका (ग्रंथसंख्या १००००) व रुक्मिणीस्वयंवर (ग्रं. सं. ४०००) असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. वेदान्तविषय सोपा करून सांगण्याची व कथानक गोड करून सांगण्याची हातोटी यांना चांगली साधलेली आहे. शामाराध्य नांवाचा एक अवाढव्य ग्रंथरचना करणारा भागवती कवि १५५० च्या थोडासा अगोदरच होऊन गेला. याची स्कंध २ व स्कंध १० यांवरील टीका उपलब्ध असून बरींच फुटकळ आख्यानेंही आहेत. याच्या ग्रंथरचनेंत विशेष रमणीयत्व जरी नसलें तरी रचनावैपुल्याच्या दृष्टीनें हा कवि खरोखरच आदर करण्याजोगा आहे यांत शंका नाहीं. परंतु रचनावैपुल्याकरितां या एकाच कवीकडे आपल्याला बघितलें पाहिजे असें नाहीं. याच सुमारास होऊन गेलेल्या शिवकल्याणस्वामींची (रचनाकाल शके १५५०–६०) दशमावरील टीका अशीच विस्तृत आहे. हिची ओवीसंख्या जवळ जवळ एक लक्ष असून हिचा मुख्य विशेष हा आहे कीं, सर्व कृष्णलीलांचा अर्थ परमार्थपर लावून, लीलांच्या मिषानें भगवंतांनीं अज्ञानी लोकांस निवृत्तिपर वेदांताचा कसा उपदेश केला हें त्यांत दाखवून दिलें आहे. अशा खुबीदार रीतीनें एक लक्ष ग्रंथरचना करणाऱ्याचें सामर्थ्य व बुद्धिमत्ता केवढी असेल ! हे शिवकल्याणस्वामी ज्ञानेश्वरादिक चान्ही भावंडें ज्या परंपरेंतील होतीं त्याच मच्छिंद्रनाथांच्या परंपरेंतील साधु होते. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांशीं यांचा विशेष परिचय होता व त्यांची छायाही यांच्या ग्रंथांत पुष्कळच दिसून येते. याखेरीज दशकनिर्धार (दशमावर आधारलेला ग्रंथ; रचनाकाल १५५५) या ग्रंथाचा कर्ता रमावल्लभदास, वैद्यकजीवनकर्ता लोलिंबराज वगैरे कांहीं दशमस्कंधावर रचना करणारे कवि याच कालांत होऊन गेले.

११. ही सव सोळाव्या शतकांतील कवींची रचना ओवीबद्ध आहे. मराठीमध्यें ग्रंथरचना करण्यास सुरवात झाली त्या वेळेपासूनच ओवीछंदासही प्रारंभ झाला व आजपर्यंत एकसारखा ओवीचा प्रचार चालूच आहे, हें जरी खरें असलें

तरी ओवीबद्ध रचना सोळाव्या शतकामध्यें उत्कर्षाच्या परमोच्च बिंदूला जाऊन पोंचली होती व सोळाव्या शतका अखेरीस ओवीला ओहोटी लागूं लागली हें मराठी कवितेच्या इतिहासाचें अवलोकन करणाऱ्याच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

१२. आतांपर्यंत अप्रतिहत रीतीनें चालू असलेल्या ओवीच्या सार्वत्रिक प्रचारास आळा घालण्याची प्रवृत्ति या सोळाव्या शतकाच्या अखेरीसच सुरू झाली. यमकानुप्रासांसहित अक्षरगणवृत्तांचा मराठींत प्रसार करून निदान वाङ्मयाच्या कांहीं प्रांतांपुरता तरी ओवीला परिणामकारक शह देणारे वामनपंडित या शतकाच्या अखेरीसच विद्यमान होते. अक्षरगणवृत्तें अगदीं प्रथम मराठींत आणण्याचा मान कोणासही असो, त्यांचा इतका झपाट्यानें प्रसार होण्यास वामनपंडितांची सुंदर श्लोकरचनाच कारणीभूत झाली. आणि ही सर्व श्लोकरचना बहुतांशीं भागवती आख्यानांवरच आहे ही लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. पंडितांनीं एकाद्या सबंध स्कंधावर रचना केलेली उपलब्ध नाहीं. परंतु भागवतांतील, विशेषत: कृष्णचरित्रामधील, लहान लहान आख्यानांवर केलेली श्लोकबद्धरचना मात्र उपलब्ध असून तीमुळेंच त्यांचें नांव अजरामर होऊन बसलें आहे. हीं फुटकळ आख्यानेंच इतकीं रमणीय व मोहक आहेत कीं त्यांमुळें जुन्या कवींपैकीं वामनपंडित हे एक अत्यंत लोकप्रिय कवि होऊन बसले आहेत व त्यामुळेंच भागवताच्या मराठी अवतारामध्यें फार महत्त्वाचें स्थान त्यांस देणें प्राप्त झालें आहे. यापुढें वामनांच्या लोकप्रियतेमुळें श्लोकरचनेचा चांगलाच पायंडा पडल्यासारखा झाला व अजूनही तो अगदींच मोडला आहे असें नाहीं. अक्षरगणवृत्तात्मक काव्यें आजकालही बरींच बाहेर पडतात. वामनपंडितांनंतर साम्राज्य वामन, अनंत, आनंदतनय वगैरेसारखे कांहीं श्लोकबद्ध आख्यानें रचणारे कवि झाले. प्रसंगोपात्त त्यांची कविताही चांगल्यापैकीं उतरली आहे.

१३. याप्रमाणें सतराव्या शतकाच्या प्रारंभापासून श्लोकरचनेस सररास सुरवात झाली. तथापि ओवी अगदीं मागें पडली असें नाहीं. श्लोकबद्धरचनेचा उपयोग वामनानें लहान लहान पौराणिक आख्यानांपुरताच केला होता व तेवढ्यापुरताच त्यांचा प्रसारही वामनाच्या पुढें चालू झाला. वाचकांचें मनोरंजन करण्याचाच प्रमुख हेतु असल्यामुळें जेथें बाह्यांग खुलविणें आवश्यक असेल अशा ठिकाणीं, म्हणजे केवळ लौकिक दृष्टीनें पौराणिक कथांवर रचलेलीं काव्यें वगैरे

सारख्या ग्रंथांतून, मुख्यत: श्लोकांचा उपयोग होऊं लागला. परंतु भाविक संतांचे ईशचरित्रपर विस्तृत ग्रंथ किंवा परमार्थपर प्रबंध वगैरे सर्व अजूनही ओवीमध्येंच सररास लिहिले जात असत. व प्रत्यक्ष पंतकाळीं, किंवा त्यानंतर, किंबहुना आजकालच्या गद्याच्या काळांतसुद्धां ओवी अगदींच बंद पडली आहे असें नाहीं. वामनपंडितांनंतर सुमारें ५० वर्षांनीं रचली गेलेली कृष्णदयार्णवाची दशमस्कंधावरील प्रसिद्ध ' हरिवरदा ' नामक टीका ओवीबद्धच आहे. ही टीका फार विस्तृत म्हणजे सुमारें बेचाळीस हजार ओव्या आहे. व इतकें असून अतिशय सुंदर, रसाळ व मधुर आहे. कृष्णदयार्णवाप्रमाणेंच सर्व ओवीबद्ध ग्रंथरचना करणारा याच काळचा दुसरा अतिप्रसिद्ध कवि म्हणजे श्रीधरस्वामी हा होय. याचा भागवतावर आधारलेला ग्रंथ म्हणजे सुप्रसिद्ध ' हरिविजय ' हा होय. हा त्यानें शके १६२४ मध्यें लिहून पुरा केला. हा ग्रंथ म्हणजे सर्वस्वीं दशमस्कंधाची टीका नसून दशमस्कंधांतील कृष्णचरित्राला इतर कांहीं पौराणिक ग्रंथांतल्या कथांची पुस्ती जोडून सर्वांच्या मिश्रणानें तयार केलेलें एक सुंदर कथामृत आहे. श्रीधरांच्या अत्यंत सुगम, रसाळ व अर्थोत्कट वर्णनशैलीविषयीं येथें कांहीं विवेचन करण्याची जरूर नाहीं. त्यांचे हे गुण सर्वत्र प्रसिद्धच आहेत.

१४. यानंतर कालानुक्रमानें पाहिलें तर सुमारें ५० वर्षांची मजल मारून आर्यापति श्रीमयूरेश्वर यांच्या भव्य व मनोरम प्रासादांत आपल्यास प्रवेश करावयाचा. आपण जर ' सारज्ञ असूयोज्झित ' असूं तर विनयाची केवळ मूर्तीच असे पंत आपल्याला स्वतः ' नमस्कार ' करतील व त्यांची 'आर्या'ही आपलें यथोचित स्वागत करील यांत शंका नाहीं. आपणही या स्वागतासाठीं अधीर झालों आहोंतच; तथापि पुढच्या मार्गावर दृष्टि फेकून आणखी कांहीं उतरण्याचीं ठिकाणें उर्फ अवतार दिसतात कीं काय तें बघूं या. पंतांचे समकालीन ज्योतीपंत दादा म्हणून एक महाभागवत सद्गृहस्थ होऊन गेले. यांनीं सबंध भागवतावर दोन टीका केल्या आहेत. एक ओवीबद्ध असून दुसरी अभंगरचित आहे. या ज्योतीपंत दादांच्या नंतर पेशवाई संपेपर्यंत आणखी कोणी भागवताचा अवतार निपजला नाहीं. हा वेळपर्यंत भागवतावर रचलेले ग्रंथच इतके मुबलक व सर्वोत्कृष्ट होते कीं त्यांवरच भाविकांची व रसिकांची सर्व तहानभूक भागूं लागली. व अवनतीच्या काळच्या प्रवृत्तीस अनुसरून यानंतरचे थोडीबहुत प्रतिभा असलेले कवि

लावण्या वगैरेच्या फंदांत पडूं लागल्यामुळें जुन्या पद्धतीचें निर्मळ पौराणिक वाङ्मय निर्माण होण्याचा मार्ग किंचित् खुंटल्यासारखाच झाला. यानंतर पेशवाईची इतिश्री होऊन खालसातीस सुरवात झाली व वाङ्मयनिर्मितीचें चक्र एकदम बंद पडल्यासारखें होऊन जिकडे तिकडे स्तब्धता व स्तिमितता पसरली.

१५. सुदैवानें ही स्तिमितता फार वेळ टिकली नाहीं. आपण अगदीं नादान व बेवकूब; म्हणण्यासारखें चांगलें असें आमच्यांत पूर्वी फारकरून झालेंच नाहीं; आमचा धर्म, आमचें वाङ्मय, आमच्या कला, आमचा इतिहास वगैरे सर्व टाकाऊ; आमच्या नालायकीच्या या खाणाखुणा पुसून टाकून कोरे करकरीत होऊन विलायती सुधारणेचा आमूलाग्र स्वीकार केल्याशिवाय आमचें डोकें वर निघणें शक्य नाहीं;— अशा तऱ्हेच्या कल्पना अव्वल इंग्रजींतल्या शिक्षित समाजाच्या मनांत सैराट वावरत होत्या. व बाकीचा सर्व समाज म्हणजे 'एक थंड गोळा होऊन पडला होता.' सुमारें पन्नास वर्षे अशी स्थिति टिकली. त्यानंतर बिथरलेल्या नवशिक्षितांस सणसणीत फटकारे लगावून ताळ्यावर आणणारे व मूर्छित समाजाच्या डोळ्यांत चरचरीत अंजनशलाका फिरवून त्यास जागृत करणारे विष्णुशास्त्रीबोवांसारखे धुरंधर पुरुष सुदैवानें आमच्यांत जन्मास आले. त्यांनीं आपलेपणाची व स्वाभिमानाची भावना उत्पन्न करून लोकांच्या विचारांस इष्ट दिशा लाविल्यामुळें आमचे भारत भागवतादि ग्रंथ मोठ्याच संकटांतून बचावले व आमच्या प्राचीन वाङ्मयाचा आर्यभूमींत कधीं काळीं लोप होईल कीं काय अशी घोर कुशंका येण्याजोगी जी परिस्थिति उत्पन्न झाली होती ती नाहींशी झाली. यानंतर अलीकडच्या कालास अनुसरून व्यासवाणीचें, विशेषतः भागवताचें, मराठी गद्यांत रूपांतर होण्याची आवश्यकता भासूं लागली. व एकदोन महत्त्वाचे भागवताचे गद्यावतारही उत्पन्न झाले. यांपैकीं पहिला व अतिशय स्तुत्य प्रयत्न म्हटला म्हणजे रा. गणेश महादेव जानोरीकर यांनीं छापलेलें मूल व अन्वयसहित भागवताचें भाषांतर हा होय. हें भाषांतर वे. शा. सं. रा. गोविंदशास्त्री फडके यांनीं श्रीधरीला अनुसरून केलें असून मुळांतला अर्थ न सोडतां, अवश्य तर मुळाचा कोठें कोठें थोडासा विस्तार करून केलें आहे. योग्य मनुष्याकडून झालें असल्यानें हें फार सुंदर वठलें असून संस्कृतामध्यें ज्यांचा अगदींच जुजबी प्रवेश झाला आहे, अशांस फार उपयोगाचें आहे. हें शके १८१७ मध्यें प्रसिद्ध झालें. दुसरा स्तुत्य प्रयत्न म्हणजे

वा. वि. चिपळूणकर आणि मंडळी यांचा होय. यांचें 'श्रीमद्भागवताचें मराठी सुरस भाषांतर' प्रसिद्धच आहे. तें १८२५ सालीं प्रसिद्ध झालें. हें भाषांतर अनेकांनीं केलेलें असून चांगल्यापैकीं उतरलें आहे. तें आज सर्वत्र प्रचलित असल्यामुळें त्याच्याविषयीं विशेष लिहिण्याची जरूरी नाहीं.

१६. आतांपर्यंत भागवताच्या अवतारांबद्दल जें विवरण केलें त्यावरून मूळ भागवतावर आजतागायत जी मराठींत ग्रंथरचना झालेली आहे तिच्या इतिहासाची रूपरेषा स्थूलमानानें ध्यानांत येण्यास हरकत नाहीं. या सर्व भागवतीं अवतारांमध्यें मोरोपंतांचें स्थान फार महत्त्वाचें आहे. एक तर सबंध भागवतावर मराठींत ग्रंथरचना करणारे बहुधा तेच पहिले ग्रंथकार होत. शिवाय भाविकपणा व रसिकपणा या दोन गोष्टींचा अत्यंत उत्कृष्ट मिलाफ त्यांचे ठिकाणीं दिसून येत असल्यानें त्यांचे ग्रंथ भाविकांस व सहृदयांस सारखेच आवडणारे असे उतरले आहेत. वामनामध्यें हे सर्व गुण आहेत भगवद्भक्ति व काव्यसौंदर्य या दोनही गोष्टी त्यांजमध्यें असून प्रसंगविशेषीं पंतांपेक्षांही त्यांची वाणी प्रेमळ व नादसुंदर होत असेल. पण वामनांची रचना त्रुटित आहे. सबंध भागवताचा तर नाहींच पण नुसत्या दशमाचा देखील सामग्र्यानें परामर्श त्यांनीं घेतलेला नाहीं. एकनाथांची ग्रंथरचना केवळ वरच्या वातावरणांतली, प्रासादिक तऱ्हेची होय. त्यांच्या रचनेंत काव्य येत असलें तर तें 'ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति' अशा तऱ्हेनें त्यांच्या वाणीमागून धावत येणार. तेव्हां पंतांशीं त्यांची तुलना करतांच येत नाहीं. शिवाय त्यांच्या भागवतांत कथासूत्र नसून वेदांत व भक्ति यांचें विवरण असल्यानें प्राकृत सहृदयांस तें जरा जड असेंच वाटणार. नाथांनंतरचे जयरामस्वामी, शिवकल्याण, शामाराध्य वगैरे मंडळी घेतली तर त्यांच्यामध्यें भक्तिभाव व प्रसंगविशेषीं काव्यसौंदर्य दिसून येतें. पण या सर्वांचे ग्रंथ अतिविस्तृत; व भाषेच शैथिल्य व प्राचीनपणाही बराचसा नडविणारा असा दिसून येतो. कृष्णदयार्णवांचे ठिकाणीं भाविकपणा व रसिकपणा यांचा मिलाफ आढळून येतो व पुष्कळ ठिकाणीं काव्यही अप्रतिम आढळतें. परंतु एकसारखें चांगल्या दर्जाचें असें काव्य सर्वत्र आढळत नाहीं. शिवाय अतिविस्तार व पाल्हाळिकपणा यांमुळेंही वाचक नाउमेद होण्याचा संभव विशेष. श्रीधरांचा हरिविजय उत्कृष्ट आहे. ग्रंथही प्रचंड नसून काव्यही उत्तमांतील. परंतु श्रीधरांचें लिहिणें रेखीव व टापटिपीचें नाहीं. रूपकें करूं लागले म्हणजे रूपकेंच, उत्प्रेक्षा

करूं लागलें म्हणजे उत्प्रेक्षाच त्यांच्या ग्रंथांत पान पानभर आढळावयाच्या. तारतम्यभाव जरा कमी असल्यामुळें भलत्याच प्रसंगीं भलतेंच अतिशयोक्तिपूर्ण वर्णन यावयाचें. सौंदर्याचें वर्णन म्हटलें म्हणजे ठराविक अतिशयोक्तीच्या उपमा यावयाच्या, अरण्य आलें कीं ठराविक साच्याचें अरण्यशोभेचें वर्णन यावयाचें. कोणच्या प्रसंगास व कोणच्या स्थलास काय उचित होईल याचा विचार जरा कमीच. गोड गोष्टी सांगण्यांत मात्र श्रीधरांचा हातखंडा आहे. अशी स्थिति असल्यामुळें अज्ञान कथाप्रिय जनांस त्यांचें काव्य जितकें रुचतें तितकें सुसंस्कृत अभिरुचीच्या रसिकांस आवडण्यासारखें तें नाहीं. शिवाय त्यांनीं आपला ग्रंथ केवळ भागवताच्या आधारानें लिहिलेला नसून

दशम आणि हरिवंश । पद्मपुराणींच्या कथा विशेष ।
त्याचि हरिविजयीं सुरस । श्रोतीं सावकाश परिसावें ॥ हरिविजय ३४.१४८

याप्रमाणें भागवत दशम, हरिवंश आणि पद्मपुराण इतक्या ग्रंथांतील कथांचा उपयोग केल्याचें त्यांनीं स्वतःच सांगितलें आहे. तेव्हां भगवद्भक्तीच्या सात्त्विकपणानें युक्त असून काव्यदृष्टीनेंही उत्तम दर्जाचे, त्याचप्रमाणें आटोपशीर, रेखीव व तरतमभावयुक्त असे पंतांचे भागवतावरील ग्रंथ एकंदर भागवती वाङ्मयामध्यें अलौकिक होत यांत शंका नाहीं.

शिवाय पंतांची भाषासरणी अर्वाचीन तऱ्हेची असून अत्यंत शुद्ध असल्याकारणानें त्यांचे ग्रंथ आधुनिक रसिकांस व भाषाभिमान्यांस विशेष पसंत होण्याजोगे असे उतरले आहेत. विशेषतः त्यांच्या भागवती काव्यांमध्यें मुख्य जें मंत्रभागवत तें तर भाषेच्या, मांडणीच्या व काव्यकौशल्याच्या दृष्टीनें इतकें सुगम, इतकें आटोपशीर व रसाळ उतरलें आहे कीं मराठींतून भागवताचा आस्वाद ज्याला घ्यावयाचा आहे असा रसिक वाचक तेंच प्रथम पसंत करील. लहान लहान आख्यानेंच ज्यांना अधिक पसंत पडतात त्यांनाही पंतांचीं निरनिराळ्या वृत्तांत रचलेलीं चोवीस सुंदर भागवती प्रकरणें म्हणजे उत्कृष्ट मेवाच वाटेल यांत संशय नाहीं.

———

विभाग २.

पंतांच्या भागवती काव्यांचें बाह्यांगनिरीक्षण.

१. मागील विभागांत केलेल्या विवेचनावरून महाराष्ट्र भाषेंत श्रीमद्भागवतावर अवलंबून जी ग्रंथरचना झाली आहे तिच्यांत मोरोपंतांच्या रचनेचें स्थान कोठें आहे हें स्थूलमानानें लक्षांत येईल. आतां पंतांनीं भागवतावर एकंदर काय काय लिहिलें आहे तें आपण पाहूं व पंतांच्या समग्र काव्यसमूहांतला एक घटक या दृष्टीनें त्यांच्या भागवती रचनेचें बाह्यांगापुरतें निरीक्षण करूं. सबंध भागवतावर रचलेलें पंतांचें सुप्रसिद्ध काव्य 'मंत्रभागवत' हें होय. फक्त दशमस्कंधावर म्हणजे श्रीकृष्णचरित्रावर रचलेला 'कृष्णविजय' उर्फ 'बृहद्दशम' हा पंतांचा दुसरा मोठा भागवतावरील ग्रंथ होय. मंत्रभागवताची एकंदर पद्यसंख्या ३६०४ असून कृष्णविजयाची ३६७५ आहे.* या दोन मोठ्या

---

* पंतांच्या हस्तलिखित पोथीबरहुकूम छापलेल्या मंत्रभागवताच्या पराडकरी प्रतींत मंत्रभागवताची पद्यसंख्या ३५९४ दिली आहे. परंतु हा आंकडा चूक असून मंत्रभागवताच्या एकूणएक पद्यांची बेरीज ३६०४ च होते. काव्यसंग्रहांत छापलेल्या मंत्रभागवताच्या पद्यांची बेरीज ३५९२ होते व पांगारकरांनी हीच संख्या प्रमाण धरून आपल्या 'मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन' या ग्रंथांत सर्वत्र दाखल केली आहे. पराडकरी प्रतींत दशमस्कंधाच्या आरंभीं १२ आर्यांचा जो उपोद्घात छापला आहे तो काव्यसंग्रह प्रतींत नसल्यामुळें त्यांची पद्यसंख्या साहजिकच ३६०४ – १२ = ३५९२ इतकी भरते. परंतु उपोद्घात उपसंहारांची कशीही उलट सुलट बेरीज वजाबाकी केली तरी पराडकरांनीं दिलेली ३५९४ ही संख्या प्राप्त होत नाहीं. छापखानेवाल्याच्या हातूनही ही चूक झालेली असणें शक्य नाहीं. तेव्हां ही चूक म्हणजे बेरीज करणाऱ्याच्या हातून निष्काळजीपणानें झालेला प्रमाद असला पाहिजे. कृष्णविजयाच्या बाबतींतही असाच अव्यवस्थितपणा नजरेस येतो. अगोदर कृष्णविजयाच्या एकंदर पद्यसंख्येचा आंकडाच कोठें दिलेला नाहीं. फक्त पूर्वार्धाची पद्यसंख्या व उत्तरार्धाची पद्य

काव्यांशिवाय भीष्मभक्तिभाग्य, वामनचरित्र, भक्तभूषण वगैरे भागवतांतील निरनिराळ्या लहान कथांवर लिहिलेलीं पंतांचीं २४ खंडकाव्यें असून त्यांची एकंदर पद्यसंख्या १५९२ आहे. याप्रमाणें पंतांच्या भागवती रचनेचा विस्तार असून या सर्व रचनेची पद्यसंख्या ९२७१ होते. पंतांचा उपलब्ध कवितासंग्रह सुमारें ५७००० आहे अशी पांगारकरांनीं मोजदाद केली आहे. तेव्हां पंतांच्या सर्व काव्यविस्ताराच्या मानानें त्यांची भागवती रचना एकषष्ठांशापेक्षां किंचित् कमी इतकी भरते. हरिवंशासह महाभारतावर पंतांनीं केलेल्या काव्यरचनेची संख्या सुमारें २४००० भरेल; त्याचप्रमाणें रामायणावरील उपलब्ध रचना अंदाजें १६००० असावी. (पांगारकरांचा अंदाज. पहा, मो. च., पृ. १९१.) या मानानें पाहिलें असतां पंतांच्या भागवतावरील सर्व काव्यांची संख्या ९२७१ ही बरीच लहान आहे. हरिवंशाची आर्यासंख्या ५४४६ आहे. तेव्हां भागवती काव्यें व हरिवंश दोन्ही मिळून एकंदर श्रीकृष्णचरित्रावरील पंतांची रचना १४५७० इतकी, म्हणजे त्यांच्या एकंदर काव्यसंख्येच्या एकचतुर्थांश आहे असें दिसून येतें. असो.

२. समग्र श्रीमद्भागवताच्या आधारानें रचलेलें पंतांचें सुप्रसिद्ध काव्य 'मंत्रभागवत' हें होय. त्याच्याकडे आपण प्रथम वळूं. यांत मुळांतील १ ते १२ स्कंध मराठींत संक्षेपानें उतरलेले असून मूळ भागवतांत एकंदर काय काय विषय आले आहेत याची कल्पना थोडक्यांत सर्वांस यावी अशी योजना केली आहे. मंत्रभागवतांत सर्वत्र (दशमस्कंधाच्या शेवटचा उपसंहारात्मक १ श्लोक व सर्व भागवताच्या शेवटचे उपसंहाराचे ५ श्लोक खेरीज करून) पंतांनीं आपलें आव-

---

संख्या अनुक्रमें १७१३ व १९५७ अशी दोन ठिकाणीं दिली आहे परंतु यांत निंदकपंचकाचे ५ श्लोक कोठेंच जमेस धरलेले नाहींत. निंदकपंचकाचे श्लोक कृष्णविजयाच्या पुस्तकांत जर छापले आहेत व अनुक्रमणिकेंतही जर त्यांचा उल्लेख केला आहे तर पद्यांची एकंदर बेरीज करतांनाच मात्र त्यांना कां वगळण्यांत यावें हें समजत नाहीं. अशा रीतीनें प्रमाण म्हणून छापलेल्या या आवृत्तीच्या प्रत्येक खंडांत जर पद्यसंख्येचे आंकडे देतांना चुका होऊं लागल्या तर सर्व खंड छापून झाल्यावर पंतांच्या एकंदर कवितासंग्रहाची नक्की मोजदाद करतांना आंकड्यांची चूक पुष्कळच मोठी होईल. प्रमाण म्हणून छापलेल्या आवृत्तींत असे प्रमाद रहावे ही शोचनीय गोष्ट होय.

डतें आर्यावृत्त योजिलें असून आपला आवडता चित्रकाव्याचा प्रकारही त्यांनीं यांत आणला आहे. हा आवडता चित्रकाव्याचा प्रकार म्हणजे काव्यांतील पद्यांमध्यें विशिष्ट अक्षरांनीं कोणचा तरी एकादा पवित्र मंत्र साधणें हा होय. प्रस्तुत काव्यामध्यें ' नमो भगवते वासुदेवाय ' हा एकादशाक्षरी मंत्र सर्वत्र आर्यांच्या आद्याक्षरांनीं साधला असून त्या मंत्ररूपी सूत्रामध्यें ओवलेल्या सर्व मंत्रभागवताच्या पंतांनीं तीन माला कल्पिल्या आहेत.* पहिली माला एक ते नऊ स्कंधांपर्यंतची करून तिच्यामध्यें वरील मंत्र १३८ वेळां साधला आहे. दुसरी माला केवळ दशमस्कंधाचीच कल्पिली असून तिच्यांत १०८ वेळां मंत्राची आवृत्ति केली आहे. या दुसऱ्या मालेस ' भागवतमंत्रमुक्तामणिमाला ' अशा अन्वर्थक संज्ञेने पंतांनीं स्वतः संबोधिलें आहे.§ तिसरी माळ राहिलेल्या एकादश व द्वादश स्कंधांची बनविली असून त्यांत ७९ वेळां मंत्र साधला आहे. याशिवाय मंत्रभागवताच्या प्रारंभीं पंतांनीं मंगलाचरणाच्या ज्या ११ आर्या लिहिल्या आहेत त्यांमध्यें प्रत्येक आर्येंत नियमित स्थलीं सहा अक्षरें मंत्रांकित करून हाच मंत्र सहा वेळां साधला आहे. ' नमो भगवते वासुदेवाय ' या मंत्रांतील ' वा ' हें ७ वें अक्षर साधणारी सातवी आर्या येथें उतरून घेतों म्हणजे त्यावरून या प्रकाराची कल्पना येईल.--

> **वा**ग्देवीच्या नमितों **वा**ळक मी रम्यपादराजीवा ।
> **वा**रुनि जडत्व जी दे **वा**त्सल्यें ज्ञान सादरा जीवा ॥ ७ ॥+

पंतांचीं मंत्रग्रथनलालसा येवढ्यानेंही पूर्ण झालेली नाहीं. दशमस्कंधाच्या आरंभीं जो १२ आर्यांचा उपोद्घात त्यांनीं लिहिला आहे त्यांतही ' श्रीमानुरुगायो

---

* माळात्रय प्रभुवरा रुचलें; करानें ।
कंठीं पिता धरि दिलें निज लेंकरानें ॥ मं. भा.; उपसंहार १.
ऐसे साष्टशताच्छमंत्रमणि हे यांची असी वोविली ।
माळा स्वच्छयशोगुणीं कविकरें अत्यादरें गोविली ॥ मं. भा.; १०.११८९.

§ यश गाउनियां ज्याची करिति कवि व्यास शुक सदा सेवा ।
' भागवतमंत्रमुक्तामणिमाला' त्याचि वाहिली देवा ॥ मं.भा.;१०.११८८.

+ अगदीं नेमल्या ठिकाणीं सहादां एक विशिष्ट अक्षर साधलें असूनही ही आर्या किती सोपी उतरली आहे इकडे वाचकांनीं लक्ष द्यावें.

मुकुंदो जयति ' हा मंत्र आद्याक्षरांनीं साधला आहे. तेव्हां एकंदरींत पंतांनीं मंत्रभागवतांत ६ + १३८ + १ + १०८ + ७९ = ३३२ इतके मंत्र साधले आहेत असें झालें.

३. पंतांच्या मंत्रभागवताचें बाह्यस्वरूप, त्याची पद्यसंख्या व मुळाशीं तुलना करतां पंतकृतीच्या संक्षेपाचें आढळून येणारें प्रमाण वगैरे गोष्टी स्पष्टपणें लक्षांत याव्या म्हणून कांहीं पद्यसंख्येचे आंकडे खालीं देतों.

स्कंधानुक्रम.	मूळ भागवताची पद्यसंख्या.	मंत्रभागवताची पद्यसंख्या.	मं. भा. च्या एका आर्येशीं मूळ भागवताच्या श्लोकांचें पडणारें प्रमाण.
१	८१० ...	१२१	१:७.
२	३९१	१२१	१:३$\frac{1}{4}$.
३	१४११ ...	१३२	१:११.
४	१४४५ ...	१७६	१:८$\frac{1}{2}$.
५	६६८ ...	६६	१:१०.
६	८५१ ...	१९८	१:४$\frac{1}{2}$.
७	७५० ...	१७६	१:४$\frac{1}{2}$.
८	९२९ ...	१५४	१:६.
९	९५४ ...	३७४	१:२$\frac{1}{2}$.
१० (पूर्वार्ध)	२०१२ ...	६६०	१:३.
१० (उत्तरार्ध)	१९३४ ...	५२८	१:४.
११	१३६७ ...	६४९	१:२.
१२	५६६ ...	२२०	१:२$\frac{1}{2}$.
स्कंध १–१२	१३५२२	३५७५	१:३$\frac{3}{4}$.

(मंत्रभागवताची पद्यसंख्या — स्कंध १ ते १२— ३५७५; ग्रंथारंभींचें मंगलाचरण—११; दशमस्कंधाचा उपोद्घात—१२; दशम उपसंहार—१; समग्रग्रंथोपसंहार — ५. एकूण पद्यसंख्या ३६०४.)

या आंकड्यांच्या कोष्टकांत दोन तीन गोष्टी लक्षांत ठेवण्याजोग्या आहेत. पैकीं पहिली म्हणजे मूळ श्रीमद्भागवताची श्लोकसंख्या १८००० आहे या सर्वसामान्य कल्पनेचें वैयर्थ्य ही होय. संस्कृतामध्यें श्लोक किंवा ग्रंथ याचा अर्थ ३२

अक्षरें असा होतो. तेव्हां कोणच्याही ग्रंथाची श्लोकसंख्या जेथें सांगितली असते तेथें ३२ अक्षरांचा एक श्लोक अर्थ धरून त्या समग्र ग्रंथांत किती श्लोक भरतात त्याची गणती करून जितकी संख्या येईल तितकी सांगितलेली असते. पण आपण सामान्यत: मराठींत ग्रंथसंख्या किंवा श्लोकसंख्या म्हणजे पद्यांची संख्या येवढाच अर्थ घेतों. त्यामुळें आपण शार्दूलविक्रीडितालाही एकच श्लोक गणतों व अनुष्टुभालाही एकच श्लोक गणतों. मूळ संस्कृतांत असें नसल्यानें तेथें अनुष्टुभापेक्षां जास्त अक्षरांचीं वृत्तें आलीं असतां त्यांची अक्षरगणती करून ३२ अक्षरांस एक ग्रंथ याप्रमाणें ग्रंथसंख्या ठरवतात. अर्थात् अशा रीतीनें ग्रंथसंख्या ठरवल्यास ती १३५२२ या आंकडयापेक्षां बरीच जास्त भरेल. कदाचित् १८००० ही भरण्याचा संभव आहे. हें मूळ भागवताच्या श्लोक संख्येविषयीं झालें. मंत्रभागवत'ची पद्यसंख्या ३५७'१ आहे. म्हणजे मुळांतील पावणेचार पद्यांस पंतांची एक आर्या पडते, इतका पंतांनीं संक्षेप केला आहे. पंतांच्या मोठ्या काव्यांपैकीं प्रथम लिहिलेल्या मंत्ररामायणाची आर्यासंख्या १९१३ असून त्यांमध्यें मूळ वाल्मीकिरामायणाचा संक्षेप बारांस एक या प्रमाणांत केला आहे. पंतांच्या आर्याभारतांत हेंच संक्षेपाचें प्रमाण पांचांस एक असें आहे त्यानंतर लिहिलेल्या मंत्रभागवतांत हें प्रमाण पावणेचारांस एक असें झालें आहे. यावरून उत्तरोत्तर पंतांची विस्ताराची प्रवृत्ति कशी वाढत चालली होती हें दिसून येतें.

४. पंतांनीं आपल्या परिणतावस्थेंत लिहिलेल्या मंत्रभागवतास सोडून ऐन उमेदीच्या व उत्साहाच्या भरांत लिहिलेल्या त्यांच्या कृष्णविजयाकडे आतां आपण वळूं. कृष्णविजय हें काव्य 'दिव्य कृष्णकथां'नीं भरलेल्या दशमस्कंधाच्या आधारें लिहिलें आहे दशमस्कंधाच्या९० अध्यायांतील कथाभागाचें रूपांतर तसेंच अध्यायवार मराठींत केलें आहे; व पूर्वार्धाच्या म्हणजे ४९व्या अध्यायाच्या शेवटीं ६ श्लोक उपसंहारात्मक लिहिले असून सर्व ग्रंथाच्या शेवटींही ५ श्लोकांचा उपसंहार जोडला आहे कृष्णविजयाची पद्यसंख्या साधारणपणें मंत्रभागवताएवढीच, म्हणजे ३६७० इतकी आहे. परंतु सारख्या पद्यसंख्येवरून हीं दोन्ही काव्यें सारख्याच आकाराचीं आहेत असा समज करून घेतल्यास तो चुकीचा होईल. मंत्रभागवत अथपासून इतिपर्यंत आर्यावृत्तांत ग्राथित केलेलें आहे. परंतु कृष्णविजयाच्या पहिल्या ५४ अध्यायांत आर्यागीतिवृत्त योजिलेलें असून पुढचे पंचवीस म्हणजे ५५-७९ अध्याय विविध श्लोकांत रचलेले आहेत, व शेवटचे ८० ते

९० नेहमींच्या आर्यावृत्तांत गुंफलेले आहेत. यांपैकीं आर्यागीतिवृत्त हें सामान्य मोरोपंती आर्येपेक्षां लांब वृत्त आहे; व श्लोकात्मक अध्यायांतील वृत्तें तर शार्दूलविक्रीडित, स्रग्धरा यांसारखीं फारच मोठमोठीं आहेत. तेव्हां पद्यसंख्या जरी सामान्यतः सारखीच असली तरी आंतील मजकुराच्या प्रमाणानें पाहिलें तर मंत्रभागवतापेक्षां कृष्णविजय हा दीडपटीनें मोठा ग्रंथ झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. भागवत दशमस्कंधाच्या आधारानें संपूर्ण कृष्णचरित्रावर हा ग्रंथ लिहिला असल्यानें बाह्यतः जरी एकच ग्रंथ म्हणून याची गणना होत असली तरी याचें अंतःस्वरूप कांहीं निराळेंच आहे. एकसूत्रीपणाचा व एक धोरणाचा कृष्णविजयांत केवळ अभाव असून अत्यंत भिन्न स्वरूपाचे असे तीन चार विभाग त्यांत दिसून येतात. पहिला विभाग— अध्याय १–५४, आर्यागीतिवृत्तात्मक (त्यांतही १–४९ व ५०–५४ असे आणखी पोटविभाग पडतात;); दुसरा विभाग—अ० ५५-७९, विविध श्लोक वृत्तें; तिसरा विभाग – अ० ८०–९०, पंतांचें नेहमींचें आर्यावृत्त; याप्रमाणें भिन्न विभाग कृ. वि. मध्यें दिसून येतात. रचनाकालाविषयीं विचार करतांना याविषयींचें सविस्तर विवेचन होईलच.

५. आतां भागवतांतील कथांश घेऊन त्यांवर पंतांनीं जीं स्फुटकाव्यें लिहिलीं आहेत त्यांच्या स्वरूपाचें निरीक्षण करूं. हीं भागवती आख्यानें, त्यांची पद्यसंख्या, त्यांचीं वृत्तें, तीं मूळ भागवतांतील ज्या कथाभागांवर रचलेलीं आहेत त्यांचा स्थलनिर्देश, मुळाच्या तुलनेनें संकोच विस्ताराचें प्रमाण वगैरेंसह खालीं स्कंधानुक्रमानें दिलीं आहेत.

[पंतांचीं जीं विविध श्लोकांत रचलेलीं आख्यानें आहेत त्यांत बहुधा त्यांनीं स्रग्धरा, शार्दूलविक्रीडित, शिखरिणी वगैरे मोठीं वृत्तें योजिलीं आहेत. परंतु मुळांत बहुतेक अनुष्टुभ्, फार झालें तर उपजाति व वसंततिलका, हींच लहान वृत्तें आहेत. तेव्हां वृत्तांच्या लहानमोठेपणाचा विचार करून संकोच विस्ताराचें प्रमाण पुढील यादींत ठरवलें आहे. जेथें पंतांचें आर्या किंवा साकी वृत्त आहे तेथें मुळांतील श्लोक व पंतांचें पद्य हीं सामान्यतः बरोबरच धरलीं आहेत.]

१ आख्यानाचें नांव.	२ भागवतांतील कोण-च्या अध्यायांवर रचलें त्यांचा स्थलनिर्देश.	३ मूळ भागवतांतील श्लोकसंख्या.	४ पंतकाव्याचें वृत्त व पद्य संख्या.	५ विस्ताराचें अगर संक्षेपाचें प्रमाण.
१. नारदाभ्युदय	स्कंध. १; अ. ५-६.	७९.	आर्या ४७.	संकोच ८:५.
२. भीष्मभक्तिभाग्य	स्कंध. १; अ. ९.	४९.	आर्या.१९८.	विस्तार १:४.
३. अवतारमाला	स्कंध. २; अ. ७.	५३.	आर्या.३१०.	विस्तार १:६.
४. कलिगौरव	स्कंध. ३; अ. २५.	१.	श्लोक ६.	
५. ध्रुवचरित्र	स्कं. ४; अ ८-१२.	२६६.	साक्या.१०७	संकोच २$\frac{१}{२}$:१.
६. ,, स्फुटार्या	स्कं. ४; अ. ८-९.		आर्या. ६.	
७. प्रल्हादचरित्र	स्कं. ७;अ.८;श्लो. १८	१.	आर्या. २०.	
८. प्रल्हादविरचित भगवत्स्तुति	स्कं. ७; अ. ९	४८.	आर्या. १३५	विस्तार १:३.
९. अमृतमथन	स्कं. ८; अ. ५-९	२१०.	आर्या. १५८	संकोच ४:३.
१०. वामनचरित्र	स्कं. ८; अ. १५-२३.	३३६.	आर्या. १९९	संक्षेप ३:२.
११. अंबरीषाख्यान	स्कं. ८; अ. ४-५.	९८.	साक्या. ४०	संक्षेप २:१.
१२. भक्तभूषण	स्कं.८;अ. ४-५.	९८.	विविध ११०	विस्तार १:२.
१३. सुदामचरित्र	स्कं.१०; अ. ८०-८१	८६.	वि.श्लोक.८५	विस्तार १:२
१४. पृथुकोपाख्यान	,, ,,	,,	साक्या. ८८	मुळाबरोबर.
१५. सुदामकथेवरील स्फुट साक्या	,, ,,	,,	साक्या. ११	
१६. रुक्मिणी-हरणगीत	स्कं. १०; अ ८३. ,, ,, अ. ५३-५४.	२. ११७	ओवी. १३१	मुळाबरोबर.
१७. भस्मासुराख्यान (गिरित्रमोक्ष)	स्कं. १०; अ. ८८.	३०.	विविध श्लोक. ४२	विस्तार १:२.
१८. भृगुचरित्र	स्कं. १०; अ. ८९.	६६.	विविध श्लोक ४७.	विस्तार१:१$\frac{१}{२}$
१९. मंत्रमय भागवत दशमस्कंध.		३९४६	आर्या.१०९.	अत्यंत संक्षेप.

कृष्णचरित्रपर परंतु स्वतंत्र अशीं आख्यानें.

२०. गोपीप्रेमोद्गार	स्कंध. १०; अ. ४७		आर्या. ११.
२१. गोपीगोडवा	मधील कांहींसा आधार.		आर्या. ६९.
२२. नवदानकेली	...	...	आर्या. ४८.
२३. मुरलीपंचक	...	...	आर्या. ५.
२४. मुरलीनवरत्नमालिका	...	...	आर्या. १०.

एकंदर भागवती प्रकरणांची पद्यसंख्या १९९२.

वरील यादी पंतांच्या सर्व मुद्रित व अमुद्रित ग्रंथसंग्रहाचें आलोडन करून त्यावरून तयार केली आहे. तेव्हां ती पूर्ण आहे असें समजण्यास हरकत नाहीं. पंतवंशज रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर यांजजवळ असलेला पंतांचा हस्तलिखित काव्यसंग्रह प्रस्तुत लेखकास पाहावयास मिळाला. तथापि कांहीं थोडे कागदपत्र व पोथ्या त्यावेळीं त्यांजजवळ नसून पंढरपूर येथील पंतवंशजांकडे होत्या. त्या पोथ्या व चातुर्मास्ये बोवांच्या मठांतील ग्रंथसंग्रह प्रस्तुत लेखकास पहातां आला नाहीं. तथापि स्फुट काव्यें सर्व रामकृष्णपंत पराडकर यांनीं स्वतः-जवळ गोळा केलीं असल्यानें त्यावरून केलेल्या या यादींत अपूर्णता राहण्याचा विशेष संभव दिसत नाहीं असें असलें तरी नजरचूक, किंवा अपुरी माहिती यामुळें होणारें स्खलन मनुष्यमात्राच्या मागें लागलेंच आहे, हेंही विसरतां येत नाहीं.

६. हरिभक्तिपरायण रा. पांगारकर यांनीं आपल्या मोरोपंत चरित्रांत भागवती प्रकरणांची जी याद दिली आहे (मो. च., पृ. ३८५) तींत त्यांनीं १९ च प्रकरणें नमूद केलीं असून प्रल्हादचरित्र, प्रल्हादविरचित भगवत्स्तुति, सुदाम-कथेवरील स्फुट साक्या, रुक्मिणीगीत व भस्मासुराख्यान (गिरित्रमोक्ष) या पांच काव्यांचा निर्देश केलेला नाहीं. यांपैकीं प्रल्हादकृत स्तुति व सुदामकथेवरील साक्या यांचा पंतांच्या हस्तलिखित संग्रहांत शोध लागल्यावरून तीं या यादींत नमूद केलेलीं आहेत. तीं अजून अप्रसिद्धच आहेत. त्यांपैकीं प्रल्हादविरचित भगवत्स्तुति ही चातुर्मास्ये यांच्या अनन्यास असलेल्या बाडांमधून अलीकडे मिळ-विण्यांत आली आहे असें कळतें.* तेव्हां ती पांगारकरांच्या नजरेस पडली अस-

* या स्तुतीची ही पोथी (अनन्याहून आलेली) परलिखित असून तिची पंत-लिखित प्रत उपलब्ध नसावी असें वाटतें.

ण्याचा संभव दिसत नाहीं या भगवत्स्तुतीची पोथी पांगारकरांच्या दृष्टीस पडणें संभवनीय नव्हतें असें मानलें तरी सुदामकथेवरील साक्यांसंबंधानें मात्र तसें म्हणतां येण्याजोयें नाहीं. या साक्या स्वतः पंतांच्या हस्ताक्षरांत उपलब्ध असून साकीबद्ध 'पृथुकोपाख्यान' पंतांनीं ज्या वहींत ढोबळ अक्षरांनीं लिहिलें आहे त्याच वहींत पृथुकोपाख्यान संपल्यानंतर या साक्या त्यांनीं लिहिलेल्या आहेत. अर्थात् पंतांचें सर्व दप्तर सूक्ष्मपणें नजरेखालीं घातलेल्या पांगारकरांच्या दृष्टींतून या सुटावयास नको होत्या असें वाटल्याखेरीज राहात नाहीं. या साक्या पुढें परिशिष्टांत पहिल्या प्रथमच छापल्या आहेत.

७. वरील दोन्हीं प्रकरणें अप्रसिद्ध तरी होतीं. परंतु प्रल्हादचरित्र, रुक्मिणीगीत व भस्मासुराख्यान यांच्या संबंधानें तीसुद्धां सबब सांपडण्याजोगी नाहीं. हीं तीन्ही काव्यें छापलेलीं असूनही पांगारकरांच्या भागवती प्रकरणांच्या यादींतून गळून जाण्यास कांहींसें विस्मरण व कांहींसा गैरसमज कारण झाला असावा असें वाटतें. प्रल्हादविजय हें वीस आर्यांचें काव्य काव्यसंग्रहांत छापलेलें असून § व त्याच्या पंतकर्तृत्वाविषयीं कांहीं संशय नसूनही तें ज्या अर्थीं गळलें

---

§ काव्यसंग्रह ग्रंथ ४४; मोरोपंतकृत स्फुटकाव्यें भाग २ पृ. १९३–१९६. हें 'प्रल्हादविजय' उर्फ 'प्रल्हाद प्रकरण' पांगारकरांच्या दृष्टींतून कसें गळलें हें कांहीं समजत नाहीं. तथापि पांगारकर यांनीं त्याचा निर्देश केला नाहीं म्हणून तें आजपर्यंत अगदीं अप्रसिद्ध होतें असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. रा. रामचंद्र महादेव आठवले नामक एका लेखकांनीं गेल्या जुलै व आगष्टच्या विविधज्ञानविस्तारांत 'मोरोपंतांचीं स्फुट भागवती काव्यें' म्हणून लेख लिहिला आहे त्यांत जणूं काय 'प्रल्हादचरित' हें भागवती काव्य प्रथमच आपण लोकांच्या नजरेस आणीत आहों अशा रोखानें त्यांनीं मजकूर लिहिला असून तें काव्य सबंध उतरूनही घेतलें आहे. वर दर्शविल्याप्रमाणें तें काव्य काव्यसंग्रहांत भागवती प्रकरणांमध्येंच प्रसिद्ध झालेलें असल्यामुळें हा सर्व आयास करण्याची कांहीं जरूरी नव्हती. त्याचप्रमाणें पंतांचें भस्मासुराख्यान म्हणून प्रसिद्ध असलेलें प्रकरण ब्रह्मोत्तरखंडांतील नसून भागवतांतील आहे हें सिद्ध करण्याविषयीं त्यांनीं पुष्कळच खटाटोप केलेला दृष्टीस पडतो. परंतु रा. रामकृष्णपंत पराडकर यांनीं ही गोष्ट पूर्वींच दाखवून दिलेली आहे हें त्यांना माहीत असावेंसें दिसत नाहीं.

आहे त्या अर्थी विस्मरण हेंच त्याला कारण झालें असलें पाहिजे हें उघड आहे. रुक्मिणीगीताचा तर त्यांनीं 'सतीचीं गाणीं' या सदराखालीं अन्यत्र उल्लेखही केला आहे. (मो. च. प्रकरण ११, 'ग्रंथकर्तृत्वाचा पहिला भर.' पृ. २१०–११.) तें भागवती काव्यांच्या यादींत पूर्णतेसाठीं समाविष्ट करावयास पाहिजे होतें. परंतु तसें करावयाचें विसरून राहून गेलें असें वाटतें. तिसरें भस्मासुरोपाख्यान गळण्याला मात्र विस्मरण कारण नसून गैरसमज कारणीभूत झालेला आहे. हें भस्मासुराख्यान भागवतांतलें नसून स्कंदपुराणांतर्गत ब्रह्मोत्तरखंडांतलें आहे अशी पांगारकरांनीं समजूत करून घेतली आहे; व तें पंतांच्या आरंभींच्या काव्यांपैकीं एक असावें अशी त्याबरोबर दुसरी समजूत करून घेऊन त्यांनीं 'ग्रंथकर्तृत्वाचा पहिला भर' नांवाच्या आपल्या पुस्तकाच्या अकराव्या प्रकरणांत त्या काव्याचा परामर्श घेतला आहे. (मो. च. पृ. २०१–२०३). परंतु या दोन्ही समजुती रास्त नाहींत.

८. वस्तुतः या भस्मासुराख्यानाच्या बाबतींत सर्वांचाच घोटाळा झाला आहे. काव्यसंग्रहकारादिकांनीं व पांगारकरांनीं त्याला दिलेलें 'भस्मासुरा'ख्यान हें नांवही बरोबर नसून गैरसमज उत्पन्न करणारें आहे. या काव्यांत भागवत दशमाच्या ८८ व्या अध्यायांत आलेली वृकासुराची कथा वर्णिली आहे. वृक नांवाच्या असुरानें एकदां नारदांस गांठून 'सर्वांत लवकर प्रसन्न होणारा देव कोणता?' असें विचारलें असतां नारदांनीं शंकराचें नांव सांगितलें. तेव्हा वृकासुरानें केदारक्षेत्रीं जाऊन स्वशरीराचे अवयव हवन करून शंकराची घोर आराधना केली. शंकर प्रसन्न झाले व वर माग म्हणाले. 'ज्याच्या डोक्यावर मी हात ठेवीन तो प्राणी मरावा,' असा त्यानें वर मागितला व शिवपत्नी पार्वती इचा अभिलाष धरून तो शिवाच्याच डोक्यावर हात ठेवण्यासाठीं त्याच्या पाठीस लागला. शंकर पळूं लागले व आश्रयार्थ वैकुंठीं गेले. तेव्हां श्रीनारायणानें बटूचें रूप धारण करून आपल्या गोड भाषणानें वृकासुराला मोहून टाकलें. 'त्या प्रेतपिशाचांच्या राजाचा वर खरा असणें शक्य नाहीं; तूं स्वतःच पाहिजे तर आपल्या मस्तकावर हात ठेवून प्रचीती पहा,' असें म्हणतांच त्या मूर्खानें आपल्या डोक्यावर हात ठेवून स्वतःचा नाश करून घेतला. अशी भागवतांतील कथा असून ती पंतांनीं मंत्रभागवतांत (१०, १०६८–१०८९) व कृष्णविजयांत (अ. ८८) यथास्थल वर्णिली आहे. व तीच कथा तंतोतंत या आख्यानांत पंतांनीं वर्णिली आहे. मूळ

भागवताच्या या अध्यायाला ‘ रुद्रमोक्षण ’ असें नांव आहे. त्यांतच थोडासा फरक करून पंतांनीं आपल्या काव्याला ‘ गिरित्रमोक्ष ’ असें नांव हस्तलिखित प्रतीमध्यें दिलेलें आहे. तथापि आजपर्यंत सगळीकडे ‘भस्मासुराख्यान’ याच नांवानें त्याचा उल्लेख झालेला असल्यामुळें आम्हीं प्रत्यभिज्ञासौकर्यार्थ तेंच नांव येथें योजिलें आहे. अजून पराडकरांच्या प्रमाण आवृत्तींतील स्फुट काव्यांचे खंड प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. ते प्रसिद्ध होण्याचा योग आल्यास या आख्यानाचें ‘ भस्मासुराख्यान ’ हें नांव काढून त्याला उचित असें व स्वतः ग्रंथकर्त्यानें योजलेलें ‘ गिरित्रमोक्ष ’ हें नांव द्यावें अशी त्या आवृत्तीच्या संपादकांस सूचना आहे.

परंतु हें आख्यान भागवतांतील आहे, ही गोष्ट कोणाच्याच लक्षांत आलेली नाहीं. काव्यसंग्रहकारांनीं आपल्या टीपेंत तसें स्पष्ट म्हटलेलें नाहीं. व पांगारकर तर त्याला स्कंदपुराणांतील समजून भलतीकडेच त्याचा निर्देश करीत आहेत. ‘ हें (आख्यान) ब्रह्मोत्तरखंडांतूनच घेतलें आहे. ’ असें ते स्पष्टच म्हणतात. याच्यांतली कथा भागवतांतून घेतली आहे हें त्यांच्या गांवींही नाहीं. भस्मासुराच्या इतरत्र उपलब्ध असलेल्या कथेंत व प्रस्तुत आख्यानांत वर्णिलेल्या कथेंत फरक असल्याचें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं असें मात्र नाहीं. इतरत्र विष्णूनें मोहिनीरूप घेऊन नाचतां नाचतां बेसावधपणानें त्या असुराला डोक्यावर हात ठेवावयास लावलें असें वर्णन आहे तर येथें विष्णूनें बटुरूप घेतलें असल्याचें वर्णन आहे. हा महत्त्वाचा फरक पांगारकरांच्या लक्षांत येऊन त्यांनीं तो नमूदहि केला आहे. (मो. च. पृ २०२ टीप १). खरोखर म्हटलें असतां या फरकावरून प्रस्तुत काव्याच्या मुळाविषयीं जास्त शोध करण्याची त्यांना बुद्धि व्हावी. परंतु तसें झालें नाहीं. कोणचेंही पौराणिक कथानक सांगतांना पंत अगदीं मुळाबरहुकूम वर्णन करतात. असें असतांना या ठिकाणीं मुळांतील महत्त्वाच्या प्रसंगांत पंतांनीं बदल कसा केला याबद्दल पंतकवितेशीं पूर्णपणें तन्मय झालेल्या पांगारकरांस तरी मोठें आश्चर्य व कौतूहल वाटावयास पाहिजे होतें; म्हणजे त्या कौतूहलानेंच त्यांना त्याच्या मूलाविषयीं जास्त शोध करण्यास प्रवृत्त केलें असतें. परंतु पंतकाव्याचा एवढा ठळक स्वभाव त्यांच्या लक्षांत राहूं नये व त्याच्याशीं विसंगत अशी गोष्ट दिसून आली असतांही तिच्याविषयीं शोध करण्याची प्रवृत्ति त्यांना होऊं नये हा मोठा विस्मयजनक प्रकार झाला यांत संशय नाहीं.

परंतु यापेक्षांही विस्मयजनक प्रकार पुढेंच आहे ! भस्मासुराख्यान ब्रह्मोत्तर-खंडांतून घेतलें असें पांगारकर म्हणताहेत. अर्थात् भस्मासुराची कथा (विष्णूनें मोहिनीरूप घेतल्याची) ब्रह्मोत्तरखंडांत आहे असेंच कोणासही वाटेल. परंतु खरा प्रकार असा आहे कीं भस्मासुराची कथा ब्रह्मोत्तरखंडांत देखील मुळींच नाहीं, इतकेंच नव्हे तर तिच्याशीं कोणच्याही प्रकारचें साम्य असलेली कसलीही कथा ब्रह्मोत्तरखंडांत आलेली नाहीं ! कोणच्याही प्रकारचें भस्मासुराख्यान जर ब्रह्मोत्तरखंडांत मुळीं सांपडतच नाहीं तर पंतांनीं तें ब्रह्मोत्तरखंडांतून घेतलें असें विधान करणें म्हणजे एका असत्याच्या पायावर दुसऱ्या असत्याची इमारत उभी करणें होय.

इतकें शोचनीय स्खलन हातून घडून येण्याला पांगारकरांची अनेक बाबतींतली असावधानता कारणीभूत झालेली आहे. ब्रह्मोत्तरखंडांत भस्मासुराची कथा आहे असें विधान त्यांनीं केलें आहे यावरून तो ग्रंथ त्यांनीं मुळांत वाचला नव्हता हें तर उघडच दिसतें आहे. तथापि ते जर इतके बेसावध नसते तर मूळ ब्रह्मोत्तरखंड न वाचतांही आपली चूक त्यांना टाळतां आली असती. मूळ ब्रह्मोत्तरखंडाच्याच आधारानें पंतांनीं आपलें ' ब्रह्मोत्तरखंड ' काव्य लिहिलें आहे. तें मुळाबरहुकूम २२ अध्यायांचेंच असून मूळांतलि गोष्टी त्यांनीं गाळलेल्या नाहींत. हें पंतांचें ब्रह्मोत्तरखंड अर्थात् पांगारकरांनीं पाहिलेलें असून भस्मासुराख्यानाच्या आधीं त्याला लागूनच मोरोपंतचरित्रांत त्यांनीं त्याचा परामर्शही घेतला आहे. (मो. च. पृ १९५–२०१). या पंतकृत ब्रह्मोत्तर-खंडांत भस्मासुराख्यान अर्थातच नाहीं, तेव्हां यावरून तरी मूळ ब्रह्मोत्तर-खंडांत भस्मासुरकथा नाहीं, निदान नसावी, अशी कोणासही कल्पना आली असती. आतां पंतकृत ब्रह्मोत्तरखंडही पांगारकरांनीं साग्र वाचलें नसावें, असाही कोणाचा तर्क धावेल. परंतु आमच्या तर्काला आम्ही इतका पिटाळूं इच्छीत नाहीं.

पांगारकरांना बेसावधपणें पकडून अशा रीतीनें कोणी फसविलें हें समजून घेण्यासही फार दूर जावयास नको. त्यांना असें बेमालूम फसविणारा धूर्त म्हणजे श्रीधरांचा शिवलीलामृत ग्रंथ होय. ' मुळांत स्त्रीवेष घेतल्याचें वर्णन आहे. श्रीधरांनींही शिवलीलामृताच्या १२ व्या अध्यायांत भस्मासुराख्यान वर्णिलें आहे. त्यांत विष्णूनें मोहिनीरूप धरिलें असेंच आहे. ' (मो. च. पृ. २०२ टीप १)

या टीपेवरूनच पांगारकर या धूर्त साक्षीदारावर विश्वास ठेवून कसे फसल आहेत हें दिसून येतें. शिवलीलामृतरूपी साक्षीदार भस्मासुराचा वृत्तांत सांगत आहे ही गोष्ट खरी; तथापि तो मुळाबरहुकूम हकीकत सांगणारा टापटिपीचा जबानीदार नसून, आजूबाजूच्या पुष्कळ गोष्टी मिसळून ऐकणाऱ्यांना गोड वाटतील अशा कथा सांगणारा गोष्टीवेल्हाळ आहे, ही गोष्ट पांगारकरांच्या लक्षांत आली नाहीं. येथें पांगारकरांनीं श्रीधरस्वामींची रचनाशैली मुळींच लक्षांत घेतली नाहीं. पंत कोणत्याही ग्रंथाचा मुळाबरहुकूम तरजुमा उतरणारे कारकुनी बाण्याचे सारांशलेखक आहेत, तर श्रीधरस्वामी हे चोहोंकडच्या गोड गोड गोष्टी गोळा करून आणून एका ग्रंथांत वर्णन करणारे ग्रथनकुशल कथाकार आहेत. पंतदेखील गोष्टी सुंदर सांगतात हें खरें; तथापि मुळांत असतील तेवढ्याच व तशाच सांगतात. परंतु पांगारकरांनीं पंतांच्या रचनेचें हें मर्म लक्षांत घेतलें नाहीं व श्रीधरस्वामींच्या रचनेचा स्वभावही त्यांस उमगला नाहीं. दोन्हीकडे ते फसले आहेत. श्रीधरस्वामींनीं शिवलीलामृतांत प्रारंभीं

> श्रोतीं असावें सावचित्त । स्कंदपुराणीं बोलिला श्रीशुकतात ।
> अगाध शिवलीलामृत ग्रंथ । ब्रह्मोत्तरखंड जें ॥ अ० १.३४.

याप्रमाणें ब्रह्मोत्तरखंडाचा आधारभूत ग्रंथ म्हणून उल्लेख केला आहे हें खरें; तथापि त्यांनीं त्यांत १२ व्या अध्यायाच्या मध्यापर्यंतच ब्रह्मोत्तरखंडांतील कथा वर्णिल्या आहेत; तेथपासून पुढें ग्रंथाच्या अंतापर्यंत इतर ठिकाणच्या मनोरम कथा आणून गोवल्या आहेत. भस्मासुराची कथा ही असल्या बाहेरून आणलेल्या कथांपैकीं पहिलीच होय.

९. याप्रमाणें स्वतः फसून आपल्या हजारों वाचकांसही पांगारकरांनीं आजपर्यंत या बाबतींत फसविलें आहे. पंतांच्या काव्यांवर शोधपूर्वक लिहिणारे एक लेखक रा. रा. म. आठवले हेही असेच फसले आहेत. पंतांचीं स्फुट भागवती काव्यें (अर्थात् प्रसिद्ध झालेलीं) १९ नसून २२ आहेत ही गोष्ट त्यांनीं विविधज्ञानविस्तारामधून (जुलै १९२५) एका लेखाच्या द्वारें पुढें मांडली आहे. तथापि भस्मासुराख्यानाच्या बाबतींत पांगारकरांप्रमाणेंच त्यांची गैरसमजूत झालेली आहे. '(पंतांचें) ब्रह्मोत्तरखंड हें स्कंदपुराणाच्या २३ ते ४४ या अध्यायांवरून रचिलेलें असल्याबद्दल वाद नाहीं, आणि त्यांत भस्मासुराची कथा आलेली आहे, ही गोष्टही खोटी नाहीं,' असें ते म्हणतात. परंतु ही गोष्ट खोटीच आहे असें ब्रह्मोत्तरखंड

वाचल्यास त्यांस दिसून येईल सर्वांत काव्यसंग्रहकार मात्र शहाणे व सावध दिसतात त्यांना भस्मासुरकथेवर दोनतीनदां टीपा देण्याचा प्रसंग आलेला असून ती कथा नक्की कोठें आहे हें त्यांनीं लिहिलेलें नाहीं

१०. तर मग भस्मासुरनाशार्थ विष्णूनें मोहिनीरूप घेतल्याची कथा आहे तरी कोठें ? श्रीधरांनीं शिवलीलामृतांत ती वर्णिली आहे व इतरत्रही तीच कथा विशेष प्रसिद्ध आहे. तेव्हां ती कोठल्या तरी पौराणिक ग्रंथांत आहे यांत शंकाच नाहीं. परंतु अद्याप प्रस्तुत लेखकास तिचा ठावठिकाणा लागला नाहीं एवढें खरें. भागवतांत अशा तऱ्हेची कथा नाहीं, स्कंदांतर्गत ब्रह्मोत्तरखंडांत नाहीं, पद्मपुराणांतही नाहीं. येवढींच पुराणें हाताशीं असलेलीं तपासून पाहतां आलीं. बाकीच्या पुराणांचें आलोडन करणें यासाठीं जरूर आहे.

अल्प महत्त्वाच्या विषयाचा हा बराच विस्तार झाला. मुद्याची गोष्ट येवढीच कीं भागवती प्रकरणें पांगारकरांनीं म्हटल्याप्रमाणें १९ नसून २४ आहेत व भस्मासुराख्यान नामक प्रकरण ब्रह्मोत्तरखंडांतून घेतलेलें नसून भागवतांतूनच घेतलें आहे; ब्रह्मोत्तरखंडांत भस्मासुराची कथाच मुळीं आलेली नाहीं.

येथें ही गोष्ट मात्र नमूद करून ठेवणें जरूर आहे कीं 'भस्मासुराख्यान' या नांवानें प्रसिद्ध असलेलें प्रकरण ब्रह्मोत्तरखंडांतून घेतलेलें नसून भागवतांतूनच घेतलेलें आहे हें प्रथम दाखवून देण्याचें श्रेय प्रस्तुत लेखकाला, किंबहुना रा. म आठवले यांनाही नसून तें रा. रामकृष्णपंत पराडकर यांनाच आहे. पंतलिखित पोथ्यांचा संग्रह तपासून पाहून त्यांनींच १ फेब्रुवारी १९१० च्या केसरींत हा शोध जाहीर केला होता.

११. या बाबतींत आम्ही वर जें विवेचन केलें आहे तें केवळ सत्याचें आविष्करण करण्याच्या उद्देशानेंच केलें आहे. छिद्रान्वेषीपणा करून पांगारकरांचें कांहीं तरी उणें दाखवावें असा त्यांत मुळींच हेतु नाहीं. समग्र पंतकवितेसारख्या अवाढव्य विषयाचें विवेचन करतांना प्रत्येक लहानसान बाब सुद्धां पडताळून पाहाणें व मुळापर्यंत तिचा ठाव घेणें शक्य नसतें. अर्थात् अशा समयीं अंदाजावरून केलेल्या विधानांपैकीं कांहीं क्षुल्लक विधानें दुरुस्त करावयास पाहिजेत असें दिसून आल्यास ग्रंथकार मोठ्या दोषास पात्र होतो असेंच केवळ आम्हांस वाटत नाहीं. त्यांतून महाराष्ट्रकवितेच्या, विशेषतः पंतकवितेच्या उद्धाराच्या बाबतींतलें पांगारकरांचें कर्तृत्व इतकें महनीय आहे कीं त्यांत असल्या नजरचुका म्हणजे क्षीर-

समुद्रांत मिठाची कणिका पडावी त्याप्रमाणें कोठच्या कोठें विरून जाणाऱ्या होत. पंतकवितेच्या अभ्यासकांना पांगारकरांचें साहाय्य केवळ बिनमोल होऊन राहिलें आहे. हें तर काय परंतु आजोबाच्या खांद्यावर बसलेल्या नातवानें मला जास्त लांबचें दिसतें म्हणून फुशारकी मिरवावी त्याप्रमाणेंच पांगारकरांच्या नंतर त्यांच्यापेक्षां चारदोन अधिक गोष्टींचें प्रतिपादन करूं पाहणाऱ्या लेखकांची स्थिति होय. आणि ही गोष्ट लक्षांत घेऊन पितामहसदृश क्षमाशील वृत्तीनेंच स्वतः पांगारकरही प्रस्तुत लेखकाच्या कांहींशा निर्भीड व मोकळ्या मनाच्या उद्गारांकडे पहातील व त्यांत कांहीं ग्राह्य अंश आढळल्यास त्याचें कौतुक करतील असा भरंवसा आहे.

विभाग ३.

पंतांची भूमिका, उद्दिष्ट हेतु व काव्यरचनेचें धोरण.

१. मागील विभागांत केलेल्या विवरणावरून पंतांच्या भागवती काव्यांचें बाह्यस्वरूप, त्यांचा विस्तार वगैरे गोष्टींची वाचकांस यथार्थ कल्पना येईल असें वाटतें. आतां त्यांच्या काव्यांचें अंतरंगनिरीक्षण करण्यास आरंभ करूं. काव्य लिहितांना पंतांची भूमिका व धोरण कशाप्रकारचें असे याचा प्रथम साकल्यानें आढावा घेऊं व नंतर पंतांचें भागवतावरील सर्व काव्य सूक्ष्म दृष्टीनें न्याहाळून पाहून त्यांतील दिव्य काव्यानंदाचा अनुभव घेऊं.

२. प्रारंभींच पंतांच्या काव्यांमध्यें सर्वत्र दिसून येणारा ठळक गुण म्हणजे विस्तरभीरुता हा होय या विस्तरभीरुत्वाबद्दल थोडेसें लिहिणें अवश्य आहे. पंतांचा काव्यविस्तार फारच प्रचंड आहे असा एक अस्फुट समज क्वचित् प्रचलित असलेला आढळतो. पंतांची एकंदर कविता तीन लाखांवर आहे, असा लोकांमध्यें रूढ असलेला एक समज निबंधमालेंत नमूद झालेला आहे. या, पंतांचा काव्यसमुद्र केवळ अफाट आहे अशा तऱ्हेच्या समजावरूनच पंत हे मोठे पाल्हाळिक व लांबच लांब भारुडें रचणारे कवि आहेत अशीही कित्येकांची कल्पना झाल्याचें आढळतें. वस्तुतः या दोन्ही कल्पना अगदीं निराधार आहेत. आतां जन्मभर एकसारखीं काव्यें लिहून त्यांची संकलित आवृत्ति प्रसिद्ध करण्याचा मोठ्या महोत्सवाचा प्रसंग एकदांचा आला असतांना लेखकाचे ‘दोन शब्द’, प्रस्तावना, उपोद्घात, चरित्र वगैरे गोष्टींची भरती करूनसुद्धां शेंदोनशें पृष्ठांच्या पलीकडे ज्यांच्या एकीकृत काव्यांची मजल जाऊं शकत नाहीं अशांना पंतांचा काव्यविस्तार कल्पनेपलीकडे अफाट वाटेल; पंचवीसतीस ओळींचे छोटेंसें, नाजूक व आटोपशीर काव्य निर्माण केल्यानंतर सर्व पाणी गळून गेलेल्या फुटक्या तपेलीप्रमाणें ज्यांना आपलें प्रतिभेचें भांडार सर्वस्वीं रिक्त झालेलें आढळतें अशा प्रतिभासंपन्न कवींना किंवा आपल्या आवडत्या कवीची एक पानभर कविता वाचल्यानंतर ज्यांच्या मेंदूना श्रम होऊन जरा हायशी विश्रांति घ्यावीशी वाटते

अशा रसिकांना पंतांचीं काव्यें म्हणजे असह्य भारुडें वाटतील यांत संशय नाहीं. परंतु अशा कवींचें व रसिकांचें माप पंतांना लावून काय उपयोग ? पंतांची साजिरी कवितासुता धडधाकट, सशक्त व उफाड्याची असून पित्यानें ज्याला आपलें समर्पण केलें त्या परमेश्वररूपी वराकडे जाण्यास अत्यंत उत्सुक अशी होती. कितीही प्रावरणें घातलीं तरी रोडच दिसणाऱ्या अशा प्राकृत रसिकांकडे जाणाऱ्या कविकन्यकांशीं तिची तुलना करतांच येत नाहीं. पंतांसारखेच जे सकस, परमेश्वरप्रेमांत रंगून जाणारे व आपल्या कविताकन्यका श्रीकृष्णचरणींच अर्पण करणारे कवि आपल्यांत होऊन गेले त्यांच्याशींच पंतांची तुलना करणें योग्य; आणि अशी तुलना करून पाहिली म्हणजे आटोपशीरपणा, पाल्हाळाचा तिटकारा वगैरे पंतकवितेचे विशेष आपल्यास सहजच आढळून येतात. कृष्णदयार्णवांची हरिवरदा पहा, एकनाथांचा एकादशस्कंध पहा, मुक्तेश्वरांचें आदिपर्व पहा किंवा पंडितांचीं भागवती आख्यानें पहा, पंतांच्या इतका संक्षेप व टापटीप आपणांस कोठें आढळावयाची नाहीं. नुसत्या पद्यसंख्येवरून पाहिलें तरी हीच गोष्ट लक्षांत येईल. कृष्णविजय हा ग्रंथ पंतांच्या सर्व काव्यांमध्यें मुळाशीं तुलना करतां जास्त विस्तृत आहे असें दिसून येतें. मूळ भागवत दशमस्कंधाची श्लोकसंख्या ३९४६ आहे. व कृष्णविजयाची त्याच्या जवळ जवळ म्हणजे ३६७० आहे. पण याच दशमावर रचलेल्या इतर मराठी काव्यांची पद्यसंख्या पहा. बहिरा–जातवेद याच्या दशमाची संख्या ७५०००, शिवकल्याणाची एक लाख, कृष्णदयार्णवाची हरिवरदा ४२०००, याप्रमाणें इतर टीकांचा विस्तार आहे ! एकादशस्कंध मूळ याची ग्रंथसंख्या १३६७ आहे. व पंतांची सुमारें त्याच्या निम्मे म्हणजे ६४९ आहे. पण एकनाथी भागवत म्हणजे १९००० ओवी आहे. आतां पंतांच्या एकंदर काव्यसमुदायाची संख्या सुमारें ६०००० भरते. व हा आंकडा दिसण्याला थोडा जास्त दिसतो हें खरें, पण त्याचें कारण म्हणजे पंतांचा जबरदस्त उद्योग व सर्वव्यापीपणा हें होय. समग्र महाभारत, समग्र भागवत मराठींत आणून रामायणाचा एकशें आठ वेळां अनुवाद करणारा हा एकच एक कवि होय ! त्यांनीं साठ हजार कविता लिहिली यांत त्यांच्या रचनावैपुल्याची विशेष तारीफ करावयाची नसून संस्कृतांतलें येवढें जगड्व्याळ वाङ्मय ते इतक्या थोडक्यांत मराठींत आणूं शकले या गोष्टींत दिसून येणाऱ्या त्यांच्या संक्षेपचातुरीची व उरकाचीच अवश्य

प्रशंसा केली पाहिजे. इतर जे एकनाथ,कृष्णदयार्णव, वगैरे विस्तरशील कवि आहेत त्यांनीं दशमस्कंधासारखा मुळांत आटोपशीर असा ग्रंथ घेऊन त्याचा वाटेल तसा विस्तार केला आहे; पण पंतांनीं मुळांतील प्रचंड ग्रंथ अत्यंत संकुचित अवकाशांत खेंचून त्यांच्या बरोबर उलट कामागिरी करून दाखविली आहे.

३. आतां तूं नाहीं तर तुझ्या बापानें हा न्याय स्वीकारून यथाकथंचित् ज्यांना प्राचीन कवींवर कसल्या तरी दोषाचें टेपर ठेवावयाचें आहे त्यांना निदान येवढें तरी समाधान होईल कीं पंत नाहींत तर नसोत परंतु एकनाथ, कृष्णदयार्णव, शिवकल्याण वगैरे मंडळी तरी पाल्हाळाच्या व कंटाळवाण्या विस्ताराच्या दोषाला पात्र होतीलच. अशा रीतीनें ज्यांचें समाधान होत असेल त्यांचें खुशाल होवो. आमच्या कवींच्या वाग्विस्तारांत, त्या भक्तिरसाच्या महापुरांत निमज्जन करून आनंदनिर्भर होण्याचें भाग्य थोडें तरी ज्याला लाधलें आहे त्याला असें समाधान करून घेण्याची जरूर वाटत नाहीं. आमचे कवि भक्तिरसानें तल्लीन होऊन गेले म्हणजे त्यांना आपण किती विस्तार करीत आहों व कोठवर वहात जात आहों याचें भान रहात नसे व वाचकांनाही तसें भान रहात नाहीं.

प्रेमें गाइन युष्मदद्भुत यशें नाचेन युष्मज्जनीं ।

अशा निर्मळ आकांक्षेनें प्रवृत्त झालेल्या आमच्या कवींना तें परमेश्वराचें अद्भुत यश ' गाइलें तरि पुन्हां गावें चि ' असें सतत वाटत असे ! नाथांना मुळांत १३६७ श्लोक असलेल्या अकराव्या स्कंधाचा वीस हजार ओव्यांइतका विस्तार करतांना मुळींच कंटाळा आला नाहीं. उद्धवास सांगितलेल्या भक्तियोगाचें वर्णन किती करूं व किती न करूं असें त्यांना झालें. चोविसाव्या अध्यायांत चवदाव्या श्लोकांतील ' भक्तियोगस्य महतिः ' या पदाचें विवरण करतांना नाथांच्या वाणीस जें भरतें आलें आहे तें कांहीं अनिवारच ! या दोन पदांवर नाथांनीं एकंदर २५२ ओव्या भाष्य लिहिलें आहे. श्रोत्यांना कदाचित् हें फार वाढविलें असें वाटेल अशी शंका येऊन ते श्रोत्यांना बजावतात व त्यांची क्षमाही मागतात.—

भक्तियोगस्य महती । हे मूळपदींची स्थिती ।
तेंचि तें वाढविलें किती । ऐसें श्रोतीं न म्हणावें ॥ ४१९ ॥
महती या पदाची व्युत्पत्ती । कोण आहे जाणे किती ।

हें रहस्य जाणे विरळा क्षिती । यालागीं क्षमा श्रोतीं करावी ॥४२०॥
पुढें थोड्याच अवकाशानें नाथ भक्तिभावाच्या उमाळ्याचें वर्णन करतात.

निज आवडी वाडें कोडें । वानितां भक्तीचे पवाडे ।
तुज नाठवे मागेंपुढें । हें प्रेम गाढें जाणवलें ॥ ४३८ ॥
जंव जंव भक्तीचें निरूपण । अधिकाधिक वाढतां जाण ।
तंव तंव येतसे स्फुरण । तेथ कोण पुरे म्हणेल ॥ ४३९ ॥
जंव जंव निरूपणाची वाढी । तंव तंव भक्तीची अधिक गोडी ।
तेणें श्रोत्यांची आवडी । चढोवढी वाढली ॥ ४४० ॥
करितां भक्तिसुख निरूपण । श्रोते वक्ते लांचावले जाण ।
होतां अमृताची आरोगण । पुरे कोण म्हणों शके ॥ ४४१ ॥ अध्याय२४

अशाच तऱ्हेनें कृष्णभक्तीच्या लोंढ्यांत वाहवत गेल्याकारणानें बहुतेक भागवतावर लिहिणाऱ्या कवींचे ग्रंथ विलक्षण वाढले आहेत. पंतांना देखील अशा तऱ्हेचा भक्तीचा उमाळा कमी येत असे असें नाहीं.

वाढेल ग्रंथ म्हणुनि आवरितों मी बळेंचि रसनेला ।
परि म्यां भागवतवरें भागवतांतलि फार रस नेला ॥ मं. भा. १०.४२८

अशी अभिमानगर्भ कबुली पंतांनीं दशमांतलि प्रेममय कृष्णकथा वर्णन करतांना दिली आहेच. तथापि पंत मोठे टापटिपीचे व आवरशक्तीचे गृहस्थ होते. त्यांनीं आपल्या भागवती काव्यांत किंवा इतरत्र कोठेंही स्वतः योजून ठेवलेल्या प्रमाणाबाहेर विस्तार होऊं दिलेला नाहीं. पंतांनीं काव्यें पुष्कळच केलीं; पण बहुधा प्रत्येक ठिकाणीं

'स्वल्पांतचि आणितों कथा सारी'

ही भारतरचनेच्या वेळीं केलेली प्रतिज्ञा त्यांनीं अमलांत आणून दाखविली आहे. तेव्हां आटोपशीरपणा व विस्तरभीरुत्व हा पंतांच्या सर्वच काव्यांचा मोठा विशेष होय.

४. आतां भागवती काव्यें लिहितांना पंतांनीं कोणच्या तऱ्हेची भूमिका स्वीकारली होती व एकंदर कशा तऱ्हेचें धोरण डोळ्यांपुढें ठेवलें होतें, हें आपण थोडेंसें पाहूं. वर्ण्यविषय एकच असला तरी उद्दिष्ट, धोरण व प्रतिपादनशैली हीं भिन्न असल्यानें ग्रंथांत किंवा काव्यांत अतोनात फरक पडूं शकतो. महाभारताच्या वनपर्वांत ३० ते ४२ अध्यायांमध्यें अर्जुनास पाशुपतास्त्र प्राप्त

झाल्याचा जो विषय आलेला आहे तोच विषय व तेंच कथानक भारवीनें आपल्या किरातार्जुनीय काव्यामध्येंही वर्णिलें आहे. परंतु व्यासांची भूमिका व भारवीची भूमिका या आपाततः व मूलतः इतक्या भिन्न आहेत कीं त्यामुळें त्या दोघांच्या प्रतिपादनांत कांहींच साम्य राहिलें नाहीं. बैबलाच्या नव्या करारांत सांगितलेली ख्रिस्तजन्माची गोष्ट अगदीं त्याच स्वरूपांत-पण विस्तारानें–मिल्टन नामक कवीनें आपल्या Paradise Regained या काव्यांत सांगितलेली आहे. परंतु मिल्टनचें Paradise Regained हें काव्य म्हणून परधर्मी लोक देखील आनंदानें वाचतात व बैबलांतील कथा ही केवळ ख्रिस्तधर्मीय भाविक लोकांकरितांच राखून ठेवल्याप्रमाणें आहे. तेव्हां मूळ भागवताची भूमिका कशा प्रकारची आहे व पंतांनीं भागवताचें रूपांतर करतांना कोणच्या तऱ्हेची भूमिका स्वीकारली आहे याचें निरीक्षण केलें म्हणजे पंतांचीं भागवती काव्यें कोणच्या दृष्टीनें वाचावयाचीं व कोणत्या धोरणानें वाचलीं असतां त्यांचें सौंदर्यसर्वस्व आपल्या ध्यानांत येईल, याचा निर्णय करणें सोपें जाईल.

५. मूळ श्रीमद्भागवत हें पुराण आहे. अर्थात् पुराणाच्या बाह्य स्वरूपाचें लक्षण —

सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च ।
वंशानुचरितं चेति पुराणं पञ्चलक्षणम् ॥

यास अनुसरून श्रीमद्भागवताची रचना व प्रतिपादन आहे हें कांहीं सांगावयास नको. १ सर्ग, म्हणजे परमात्म्यापासून अमूर्त तत्वांची उत्पत्ति; २ प्रतिसर्ग म्हणजे अमूर्त तत्वांपासून व्यक्त सृष्टीचा प्रादुर्भाव; ३ राजवंश; ४ मन्वंतरें आणि ५ वंशानुचरित इतक्या गोष्टींच्या वर्णनानें युक्त असलेलें तें पुराण होय. भागवतामध्यें मुख्यतः दुसऱ्या व तिसऱ्या स्कंधामध्यें सर्ग व प्रतिसर्ग यांचें वर्णन असून आठव्या स्कंधामध्यें मन्वंतरांचें कथन आहे. चवथ्या, पांचव्या व सहाव्या स्कंधांत पूर्वीच्या मनूंतील राजवंशाचें वर्णन असून मुख्यतः नवव्या स्कंधांत सध्यांच्या वैवस्वत मन्वंतरांतील सूर्यवंशी व चंद्रवंशी राजांच्या वंशावळी त्यांच्या चरित्रांसह दिल्या आहेत. तेव्हां पुराणाच्या लक्षणास अनुसरून या पांच गोष्टींचें प्रतिपादन करणें हें भागवताचें अगदीं प्राथमिक उद्दिष्ट होय. परंतु हें उद्दिष्ट केवळ भागवताच्या बाह्य स्वरूपामुळें त्याला चिकटलेलें आहे. भागवत

हें एक पुराण आहे येवढें सांगितल्यानें त्याचें पूर्ण किंवा अंशतः देखील वर्णन केल्याप्रमाणें होत नाहीं. मनुष्य हा एक हाडामासाचा पुतळा आहे असें मनुष्याचें लक्षण केलें असतां तें जसें व्यर्थ होय त्याचप्रमाणें भागवत हें एक पुराण आहे असें म्हणून थांबणें होय. भागवताचें प्रतिपाद्य व रहस्य या सर्गादि पांच विषयांच्यापेक्षां अगदीं निराळें आहे. मंगलमय प्रभूची निरपेक्ष भक्ति व त्या विश्वात्म्याचेंच शरीरभूत जें हें अंतर्बाह्य जग त्याच्याविषयीं निरंतर प्रेमभाव या दोन गोष्टी म्हणजे भागवताचें प्रतिपाद्य व रहस्य असें म्हणतां येईल. केवळ वैषयिक भक्तीनंतर निर्विषय परंतु सगुण भक्ति, सगुण भक्तीनंतर ईश्वराची निर्गुण भक्ति, निर्गुणभक्तीनें ज्ञान व निरामयता प्राप्त झाल्यानंतर, परमहंसपदवीला पोंचल्यानंतर देखील निराकांक्ष, निर्विकल्प अशी परमेश्वराची भक्तीच भक्ति– भक्ति व प्रेम हेंच आदीपासून अंतापर्यंत मनुष्याचें ध्येय, असें भागवतास मुख्यतः सांगावयाचें आहे. याच्याशिवाय बाकीचे सर्व उद्दिष्ट हेतु भागवतामध्यें केवळ गौण होत.

हे गौण हेतु स्थूलमानानें पुढीलप्रमाणें सांगतां येतील. भागवत हें पुराणांत मोडलें जावें अशा दृष्टीनें रचलें असल्यामुळें पुराणाच्या लक्षणास अनुसरून सर्गादि पांच गोष्टींचें वर्णन करणें हा एक गौण हेतु भागवताच्या रचनेंत दिसून येतो त्याचा वर उल्लेख केलाच आहे. दुसरा म्हणजे वेदान्ताचें, तत्त्वज्ञानाचें व सृष्ट्युत्पत्तिलयाचें मुख्यतः सांख्यतत्वांस धरून प्रतिपादन हा होय. संधि सांपडेल तेथें साधकाला अध्यात्मविचाराच्या मार्गाला लावण्याचें भागवतकारांचें धोरण सर्वत्र दिसून येतें. द्वितीय स्कंधामध्यें प्रतिपादलेला वेदान्त, तृतीय स्कंधांतील ५ ते १० अध्यायांपर्यंतचें सृष्ट्युत्पत्तीचें वर्णन व त्याच स्कंधांतील अ० २५ ते ३१ पर्यंत कपिलानें देवहूतीला केलेला मनोहर उपदेश; त्याचप्रमाणें अकराव्या स्कंधभर पसरलेला अद्वितीय उद्धवश्रीकृष्णसंवाद हीं भागवताच्या तत्वज्ञानाविषयींच्या प्रीतीचीं उदाहरणें होत. दुसरें भागवतकारांचें गौण उद्दिष्ट म्हणजे श्रीकृष्णचरितानुवर्णन हें होय. वस्तुतः कांहीं अंशीं भक्तियोगाच्या पहिल्या मुख्य धोरणांतच याचा समावेश करण्यास हरकत नाहीं; पण परमेश्वराचें यशोगान ही दृष्टि बाजूस ठेवून एका सामान्य व्यक्तीचें चरित्र या दृष्टीनें पाहिलें तरी सुद्धां भागवतकारांनीं निवेदन केलेलें कृष्णचरित्र इतकें मनोहर, हृद्य व मार्मिक आहे कीं सुंदर रीतीनें चरित्राचें वर्णन करणें हा एक भागवताचा उद्दिष्ट हेतु मानल्यास भागवताच्या दशमस्कंधांतील कथासौंदर्याची व्यवस्थित उपपत्ति बसविल्या-

सारखें होईल. भागवताच्या दशमस्कंधांत भक्तिभावामुळें व प्रेमामुळें येणारें सौंदर्य जरी सोडून दिलें तरी नुसती कथा या नात्यानें श्रीकृष्णचरित्र इतक्या मनोरम रीतीनें सांगितलें आहे कीं अलीकडच्या काळची उत्कृष्ट लेखकाची कादंबरी त्यापुढें रद्द वाटेल. कथानकांतील व्यक्तींचीं स्वभाववर्णनें, अद्भुत व मनोहर प्रसंगांचा उठाव, कुशल लेखकास भूषणास्पद होईल अशी दिव्य वर्णनपद्धति या गोष्टींमुळें भागवतास, विशेषतः दशमस्कंधास, सामान्य वाङ्मयग्रंथ या नात्यानें देखील इतकी वरच्या दर्जाची योग्यता प्राप्त झालेली आहे कीं विलायती दृष्टिकोणाचा स्वीकार करून या ग्रंथाकडे किंचित् हेलनेनें नजर फेकणारे लोक सर्व तऱ्हेनें अभागीच होत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

६. सामान्य वाङ्मयांतील ग्रंथ या नात्यानें विचार करूं लागलें म्हणजे भागवताची काव्याविषयक योग्यताही सहज ध्यानांत येते. केवळ भक्तिप्रेमांत रंगून गेलेल्या महाभाग्यवान् व्यक्तींस व्यावहारिक काव्याची तादृश क्षिति नसते हें तर खरेंच पण तितक्या उच्च पदवीपर्यंत ज्यांचा अजून प्रवेश झाला नाहीं त्यांना प्रलोभन दाखवून कृष्णभक्तीचा ओलावा त्यांच्या हृदयांत उत्पन्न करण्याकरितां उत्तमोत्तम काव्याचें आमिषही भागवतकारांनीं त्यांच्यापुढें ठेवलें आहे. यांत सांठविलेला ईश्वरविषयक प्रेमाचा लाहो ज्यांच्या ठिकाणीं ईश्वरविषयक रति सुषुप्तावस्थेंत तरी आहे अशांनाच प्राप्त होईल.

किमलभ्यं भगवति प्रसन्ने श्रीनिकेतने ।
तथापि तत्परा राजन्नहि वाञ्छन्ति किंचन ॥

हा साधा श्लोक, किंवा

विपदः सन्तु नः शश्वत्तत्र तत्र जगद्गुरो ।
भवतो दर्शनं यत्स्यादपुनर्भवदर्शनम् ॥

'तुझें स्मरण नित्य व्हावें यास्तव आपत्तींच्या राशी सदोदित आमच्यावर येऊन कोसळूं देत!' ही कुन्तीनें केलेली जगदीश्वर श्रीकृष्णाची प्रार्थना किती साधी आहे! यांत विशेष खुबीदार असा कांहीं अलंकार नाहीं, एखाद्या रम्य वस्तूचें वर्णन नाहीं किंवा मनोहर, श्रुतिसुभग अशी वर्णरचनाही नाहीं. तथापि भक्तीचा ओलावा असलेल्या गृहस्थास यांत काव्यसर्वस्व भरलेलें आहे असें वाटेल. हे श्लोक खरोखर इतके उदात्त आहेत कीं पुनः पुनः घोळून दिवसचे दिवस त्यांत घालवले तरी त्यांतील सर्व गोडी आपण घेतली असें वाटणार

नाहीं. परंतु एखाद्या पाखंडी, नास्तिक गृहस्थास असल्या श्लोकांतील माधुरीचें काय होय! मधुर निर्झराच्या शेजारीं असून सुद्धां पाषाण आंतून सर्वस्वीं कोरडाच असतो त्याप्रमाणें असले शेंकडों श्लोक वाचूनसुद्धां त्याचें हृदय शून्यच रहाणार. तेव्हां असल्या भक्तिप्रेमाचा टिपूससुद्धां नसलेल्या गृहस्थांस आकर्षण करून घेण्याकरितां भागवतकारांनीं लौकिक काव्याची योजना ठिकठिकाणीं केली आहे. उपमा, अतिशयोक्ति, स्वभावोक्त्यादि अलंकार, मधुर वर्णरचना, कोठें कोठें संसारी जनांस रुचतील अशा तऱ्हेच्या कल्पना, प्रसंगानुरूप शृंगारवीरादि प्राकृत रसांचा आविर्भाव इत्यादि प्रकारांनीं भागवतकारांनीं आपल्या ग्रंथाला मंडित केलें आहे. कारण निदान या निमित्तानें तरी प्राकृत जनांनीं या ग्रंथाकडे वळावें व त्यांतील श्रीकृष्ण परमात्म्याकडे त्यांचें लक्ष जावें. सर्व दशमस्कंध पूर्वार्ध, चवथ्या, सातव्या व आठव्या स्कंधांतील अनुक्रमें ध्रुव, प्रल्हाद व बलि यांच्या कथा या सर्व प्रेमानें द्रवणाऱ्या आहेत. काव्याचा आत्मा रस होय हें साहित्यशास्त्रज्ञांमध्यें बहुधा सर्वमान्य असलेलें तत्व स्वीकारून जर आपण या भागांकडे पाहिलें तर हे सर्व उत्कृष्ट काव्यांत जमा करण्याजोगेच आहेत असें आपल्यास दिसून येईल.

७. तेव्हां भगवद्भक्तीचें व विश्वप्रेमाचें प्रतिपादन ही मूळ भागवताची सर्वांत मुख्य व व्यापक अशी भूमिका होय. यानंतर : १. पुराणाच्या लक्षणाप्रमाणें आवश्यक असलेल्या सर्गप्रतिसर्गादि पांच विषयांचा यथास्थल समावेश करणें; २. आत्मानात्मविचाराचें विशेषतः सांख्यतत्त्वज्ञानास अनुसरून प्रतिपादन करणें; ३. एखाद्या प्रसिद्ध लौकिक व्यक्तीचा जीवनवृत्तांत सांगावा त्याप्रमाणें श्रीकृष्णाचें चरित्र सुंदर रीतीनें कथन करणें; व ४. प्राकृत काव्याच्या सरणीचें अवलंबन करणें;—हीं भागवताच्या रचनेच्या मुळाशीं असलेलीं गौण तत्त्वें म्हणून दाखल करण्यास हरकत नाहीं.

८. परंतु पंतांनीं भागवताचा मराठींत अनुवाद निराळ्या दृष्टीनें व निराळ्या हेतूनें केला आहे. भगवद्भक्तीचें प्रतिपादन व परमेश्वराचें यशोगान करण्याचा मूळ भागवतकारांप्रमाणें पंतांचा हेतु होताच, पण त्यांतदेखील आपल्या योग्यतेस अनुसरून पंतांनीं आपली दृष्टि थोडी निराळी ठेवली होती असें त्यांच्या भागवताचें जरा सूक्ष्म अवलोकन केलें म्हणजे दिसून येतें. मूळ भागवत सांगणारे श्री-

शुक हे कैवल्यधामीं पूर्णत्वानें रत झालेले परिनिष्ठित योगी होते. त्यांनीं भागवत सांगितलें व परमात्म्या गोविंदाच्या यशाचें संकीर्तन केलें त इतर जनांस तारण्याकरितां व भक्तिमार्गास लावण्याकरितां. पंत हे स्वतः भक्तीचा मार्ग चोखाळणारे साधक होते, परमेश्वरानें आपल्या अगदीं अंतर्यामींच्या गाभाऱ्याचें दार उघडून आपल्याला कैवल्यपदीं स्थान द्यावें म्हणून बाहेरून धडपड करणारे आतुर होते अर्थात्, त्यांनीं उगीच भलताच आव न आणतां आपल्या अधिकारास अनुसरून. **आपलें स्वतःचें** कल्याण व्हावें म्हणूनच वारंवार परमेश्वराचें यशोगान केलें आहे. ईश्वराचें चरित्र ' आपण कांहीं तरावया गावें ' असें त्यांस वाटत असे ! उगाच आकाशास गवसणी घालण्यासारखा आपल्या अधिकाराच्या बाहेर इतरांस उपदेश करण्याचा आव त्यांनीं घातला नाहीं. खरोखर पंतांच्या सात्विकतेचा व यथार्थ आत्मपरीक्षणशक्तीचा हा एक उत्कृष्ट पुरावाच होय. आम्हांसारख्या अगदीं प्राकृत संसाररत जनांच्या मानानें ते मोठेच भगवद्भक्त होते; तथापि आपला अधिकार स्वतःच्या उन्नतीचा मार्ग आपण चोखाळून उदाहरणद्वारा अप्रत्यक्ष उपदेश करणें येवढाच होय; शुकाचार्यासारखा स्वतः आत्मज्ञानानें उज्ज्वलित होऊन केवळ दुसऱ्यांकरितांच भक्तिमार्गाचा प्रकाश पाडण्याचा अधिकार आपणास नाहीं हें ते जाणून होते. आणि ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदासादि संतांच्या वाणीमध्यें व पंतांच्या काव्यद्वारांमधील फरक तरी कांहींसा अशाच रीतीचा होय. हे सर्व संत आपल्या ग्रंथांच्या योगानें भक्तिमार्गाचें व परमार्थाचें परार्थ प्रतिपादन करीत असत तर पंत हे आपल्या ग्रंथांमध्यें केलेल्या भगवद्गुणगानाच्या योगानें तो परमार्थाचा मार्ग स्वतः आक्रमीत असत.

९. याप्रमाणें श्रीकृष्णभक्तीचें प्रतिपादन हा जो मूळ भागवताचा मुख्य हेतु तो आपल्या स्थितीस अनुरूप असा त्यांत बदल करून पंतांनीं कायम ठेवला आहेच. पण त्याबरोबरच इतर एकदोन उद्देश डोळ्यांपुढें ठेवून त्यांनाही परमेश्वरभक्तीच्या इतकेंच त्यांनीं महत्त्व दिलें आहे. हे उद्दिष्ट हेतु म्हणजे काव्यनिर्मिति व कथाकथन हे होत. भागवतकारांनीं ईशभक्तीला व विश्वप्रेमाला अतिशय उच्च स्थान देऊन त्या मानानें इतर हेतूंना गौणत्व दिलें आहे. परंतु पंतांनीं असें न करितां आपला ग्रंथ म्हणजे एक सुश्लिष्ट व सुंदर काव्य तयार व्हावें या उद्देशालाही तितकेंच महत्त्व दिलें आहे असें त्यांच्या ग्रंथांच्या वाचनानें सहज दिसून येतें.

सुयश न जयांत हरिचें अपटु गुणभवन कवन तें अशुचि ।

हा भागवतकारांचा सिद्धांत तर त्यांस पसंत होताच परंतु त्यामुळें 'रसिक-चकोरांचें अत्यंत पालन करणारा कविहृदयपयोराशिसंतोषहेतु असा काव्येंदु' त्यांना कधी आल्हादक वाटत होता असें मात्र नाहीं. आपल्या कवनाच्या योगानें दोघेही

रसिक कवि, परमसज्जन भगवद्भक्त प्रसन्न होतील ।

अशी त्यांस अपेक्षा व आकांक्षा वाटत असे.

भेटो रसिक लवहि जो ग्रंथीं चषकांत नूरवि प्राशी ।
ऐसा वर दे, वरदेश्वरचरणा ! या मयूरविप्राशीं ॥

असा रसिकप्राप्तीचा वरच ते परमेश्वरापाशीं मागत असत.

काव्यनिर्मितीप्रमाणेंच कथाकथनाचें धोरणही पंतांनीं एकसारखें मनांत वागविलें आहे. पंत हे एक फार वरच्या दर्जाचे कथाकार (Story teller) आपल्या वाङ्मयांत होऊन गेले. पंतांचा जीवनव्यवसायच मुळीं पुराणिकाचा होता. शिवाय गोष्टी सांगण्याची आवड व त्यांतील कुशलता निसर्गतःच त्यांच्या अंगीं वसत होती. वर्णनाविर्णनांचा त्यांना कंटाळा असे परंतु गोष्ट किंवा कथानक म्हटलें कीं कोठूनही उचलून घेऊन त्यांनीं काव्यामध्यें गोवलेंच म्हणून समजावें. एकादी गोष्ट सरळ, सुंदर, घोटाळा न होईल अशा रीतीनें कशी सांगावी याचा कित्ता पंतांच्या पासून अवश्य घेण्याजोगा आहे. वामनानें इतकीं आख्यानें रचलीं आहेत परंतु कथाकथनाचा नैसर्गिक गुण त्याच्यामध्यें दिसून येत नाहीं. कथाकथनाविषयीं नैसर्गिक प्रवृत्ति असलेले व त्यांत कौशल्य संपादन केलेले असे जुन्या कवींपैकीं पंतांखेरीज मुक्तेश्वर व श्रीधर हेच नांव घेण्यासारखे होत विशेषतः श्रीधरांचा तर अत्यंत मनोरंजक रीतीनें गोष्टी सांगण्यामध्यें हातखंडा आहे. व त्यांच्या लोकप्रियतेचें बीजही विशेषेंकरून यांतच आहे. परंतु पंतांच्या रचनेंत असलेला एक गुण म्हणजे आटोपशीरपणा हा मात्र यांच्याही ग्रंथांत दृष्टीस पडत नाहीं. पंतांचा संक्षेपाबद्दलचा कटाक्ष फार विलक्षण आहे. तथापि संक्षेपाकरितां मूळ ग्रथांतील कथासूत्राचा मात्र त्यांनीं कधींही अव्हेर केला नाहीं. मूळांतील कथानक ते अत्यंत टापटिपीनें आपल्या काव्यांत वर्णितात इतकेंच नव्हे तर मूळांत नसलेली एकादी गोष्टही टीकेतून उतरून घेण्यास ते वेळेनुसार कमी करीत नाहींत. अशा तऱ्हेचें एक उदाहरण म्हणजे सहाव्या स्कंधांतील अश्वशिर नामक अवताराच्या कथेचें होय. त्याविषयीं विवेचन पुढील विभागांत येईलच.

१०. तेव्हां (१) स्वोन्नत्यर्थ श्रीभगवताच्या यशस्कर लीलांचें गान,

(२) रमणीय, प्रमाणबद्ध अशी काव्यनिर्मिति, व

(३) मुळांतील कथाभागाचें म(?)ळ, पौराणिक तऱ्हेचें वर्णन

हे तीन हेतूच प्रामुख्यानें पंतांनीं आपल्या डोळ्यांपुढें ठेवले होत. हें तिहेरी धोरण लक्षांत ठेवूनच पंतांनीं आपल्या भागवती काव्यांची रचना केली आहे. किंबहुना पंतांच्या एकंदर काव्यरचनेंतही हेंच धोरण सर्वत्र दृष्टीस पडतें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पंतांचें भागवत व कृष्णविजय यांबरोबरच, त्यांचें महाभारत, हरिवंश, मंत्ररामायण, ब्रह्मोत्तरखंड इत्यादि काव्यांच्या रचनेमध्यें कोणतें धोरण व कोणते उद्दिष्ट हेतु दिसून येतात याचें वर्णन करावयाचें झाल्यास तें वरच्याप्रमाणेंच करावें लागेल यांत संशय नाहीं.

११. वर वर्णिल्यांप्रमाणें पंतांचें काव्यरचनेचें सार्वत्रिक धोरण असल्यामुळें या धोरणास अननुरूप असे जे मूळ ग्रंथांतील भाग त्यांस आढळले त्यांचा साहजिकच त्यांनीं त्याग केला आहे. आणि आपल्या धोरणाशीं विसंगत अशा गोष्टींचा सर्वत्र त्याग केल्यामुळें त्यांच्या ग्रंथाचा आयताच संक्षेप झाला आहे. मूळ भागवतांत १, पुराणांच्या पद्धतीस अनुसरून सर्गप्रतिसर्गादि पांच विषयांचें वर्णन, व २, साधकोपयोगी अध्यात्माचें, वेदान्ताचें उपपादन या दोन गोष्टी त्यांतील धोरणास अनुसरून आल्या आहेत हें आपण पाहिलेंच आहे. परंतु या दोन्ही पंतांच्या रचनेच्या धोरणास अगदीं विसंगत असल्यामुळें त्यांनीं त्यासंबंधींचा सर्व भाग गाळला आहे. व यामुळेंच त्यांना आपल्या काव्यांत कितीतरी संक्षेप करतां आला आहे. मूळ भागवत हें एक पुराण असल्यामुळें त्यांत निरनिराळ्या व्यक्तींच्या संवादाच्या रूपानें नानातऱ्हेच्या गोष्टींचें वर्णन आलेलें आढळतें. नेहमीं येणाऱ्या वेदान्ताखेरीज, सृष्ट्युत्पत्तीचें सांख्य तत्त्वांस अनुसरून वर्णन, सृष्टि ज्याच्यापासून उत्पन्न झाली त्या विराट्पुरुषाचीं वर्णनें; कालमर्यादा, युगगणना, कल्पांत वगैरेंचें वर्णन; सप्तस्वर्ग, सप्तपाताळें, सप्तद्वीपा पृथिवी इत्यादिकांचें वर्णन; मूळ कथानकाशीं अगदीं बारीक धाग्यानें जोडलेल्या अशा असंबद्ध कथा; निरनिराळ्या पात्रांच्या तोंडीं वारंवार येणारीं ईशस्तवनें वगैरे नाना तऱ्हेचे विषय असल्या पौराणिक ग्रंथांत पुनः पुनः येत असतात व भागवतांतही ते आलेले आहेतच. पण पंतांनीं असल्या सर्व अप्रस्तुत गोष्टींना निष्ठुरपणें बाजूस सारून मुख्य कथासूत्रावरील आपली निश्चल दृष्टि एकसारखी कायम ठेवली आहे. महाभारतांत, हरिवंशांत, ब्रह्मोत्तरखंडांत व इतरत्रही हाच देखावा दिसून येतो.

मूळ महाभारतांतील शांति व अनुशासन हीं दोन्ही पर्वे फारच मोठीं आहेत. परंतु त्यांत केवळ नीति, धर्म, तत्वज्ञान, वेदान्त यांची भरती असल्यामुळें स्वहेतूस अनुपयुक्त अशा या सर्व विषयांचा त्याग करून पंतांनीं तीं पर्वे अगदीं त्रोटक केलीं आहेत. इतकीं कीं मुळांतील २२००० श्लोकांचा त्यांनीं केवळ ११००आर्यांत संक्षेप केला आहे. एकादा दीर्घदृष्टि मुत्सद्दी ज्याप्रमाणें मार्गांत येणाऱ्या अडचणींची पर्वा न करतां आपल्या कार्याचें सुकाणूं एकसारखें प्रातव्य अर्थाच्या रोखानें स्थिर ठेवीत असतो त्याप्रमाणें पंतांनीं आपली भूमिका व आपला उद्दिष्ट हेतु यांचें पूर्णपणें भान ठेवून आपल्या कथानकाचें सुकाणूं सतत स्थिर व अढळ ठेवलें आहे. आणि असें केल्यामुळेंच मूळ कथाभागाची मुळींसुद्धां घडी विसकटूं न देतां त्यांना मुळाचा येवढा आश्चर्यकारक संक्षेप करतां आला आहे व इतका संक्षेप करून सुद्धां आपल्या स्वतःच्या अलंकारांची व कल्पनांची भर त्यांत सामावतां आली आहे

वर वर्णिल्याप्रमाणें नाना तऱ्हेच्या अवांतर गोष्टींचा संक्षेप पंतांना मंत्रभागवतांतच मुख्यतः करतां आला आहे. कृष्णविजयासाठीं किंवा स्फुट आख्यानांसाठीं त्यांनीं मुळांतला कथाप्रधान व श्रीकृष्णयशोवर्णनाचें अगर भक्तचरित्रांचें आगरच असलेला भाग आधारास घेतला आहे. त्यामध्यें मुळांतच असंबद्ध कथा किंवा वर्णनें कांहीं आलेलीं नाहींत. तेव्हां कृष्णविजयांत किंवा भागवती आख्यानांत मुळांत आलले साद्यन्त विषय कायम ठेवण्यास त्यांस मुळींच अडचण पडली नाहीं. आणि यामुळेंच त्यांचा कृष्णविजय व स्फुट आख्यानें जवळजवळ मुळाइतकींच किंबहुना कोठें कोठें मुळापेक्षांही जास्त विस्तृत झालीं आहेत. असें आहे तरी सुद्धां क्वचित् एकादे वेळेस दशमस्कंधांत जेथें वेदान्ताचें अगर चर्वितचर्वणात्मक ईशस्तवनांचें भारूड आलेलें पंतांस आढळलें तेथें त्यांनीं तें गाळण्यास कमी केलेलें नाहीं. याच धोरणास अनुसरून दशमस्कंधापैकीं १४व्या अध्यायांतील लांबलचक ब्रह्मस्तुति त्यांनीं अतिसंक्षिप्त केली आहे व ८७व्या अध्यायांतील बिकट वेदस्तुति तर गाळूनच टाकली आहे. पण याच्या उलट जेथें भगवद्यशाचें प्रेमपूर्ण गान करण्यास सवड असेल अशा रासपंचाध्यायी, रुक्मिणीविवाहकथा वगैरे सारख्या ठिकाणीं पंतांनीं मनसोक्त विस्तारही केला आहे. असो. या दोन्ही तऱ्हांचीं उदाहरणें मुळाशीं पंतकृतीची विस्तृत तुलना करतांना पुढें आपणास दिसून येणारच आहेत.

१२. पंतांनीं आपल्या एकंदर काव्यांत, विशेषतः मंत्रभागवतांत संक्षेपाचें धोरण स्वीकारण्यास त्यांची भूमिका व उद्दिष्ट हेतु कारणीभूत झाले, असें वर ध्वनित करण्यांत आलें आहे. ही भूमिका व उद्दिष्ट हेतु १. केवळ ईशचरित्र वर्णनपर मुख्य कथासूत्राविषयींच आस्था; व २. काव्यास आवश्यक अशी टापटीप व आटोपशीरपणा; असे दोन प्रकारचे आहेत, असें आपण वर पाहिलेंच आहे. आतां विस्तार न करण्याविषयीं पंत स्वतः जीं ठिकठिकाणीं कारणें किंवा सबबी सांगतात त्यांची पांगारकरांनीं छाननी केली असून पंतांचीं अशीं कारणें एकंदर चार प्रकारचीं असतात असा त्यांनीं निष्कर्ष काढला आहे. ते म्हणतातः–" वर्णनसंक्षेपाचीं पंतांनीं चार कारणें सामान्यतः जागोजाग सांगितलीं आहेतः– १. मराठी काव्यें अति विस्तृत केलीं तर वाचक कंटाळतात. २. कवि स्वतः विस्तरभीरु आहे. ३. 'वाचा शुद्ध कराया थोडेंही वर्णिलें पुरे यश तें' (स्कंध ९. सोन्याचा गुण जो एक तोळ्यांत आहे, तोच एका वालांत आहे, किंवा अमृताच्या सरोवरांतील जळांतले गुण एका बिंदूंत येतात, या न्यायानें 'अल्पहि बहुफल होते कृष्णार्पित, चुकवितेंहि कष्ट महा' (स्कंध. ८). ४. मंत्र साधायला कोठें अडचण पडते." (मो. च. पृ. ४१४) आतां हीं कारणें आपण सुचविलेल्या कारणांपेक्षां आपाततः निराळीं भासतात खरीं. पण यांच्यासंबंधीं कांहीं गोष्टी लक्षांत ठेवण्याजोग्या आहेत. एक तर हीं कारणें पंतांनीं स्वतः आपल्याबद्दल सांगितलेलीं असून तीं पुष्कळ अंशीं सबबीच्या स्वरूपाचीं आहेत. मनुष्य स्वतः आपल्या कांहीं कृत्यांचें समर्थन करितांना निरनिराळ्या तऱ्हेच्या सबबी सांगत असतो किंवा एकाद्या वेळेस तो स्वतःच्या समजुतीनें खरें कारण सांगत असतांनासुद्धां स्वतःच्या हेतूची बरोबर मीमांसा न करतां आल्याकारणानें न समजून चुकीचें कारण सांगत असतो. येथें वर दिलेलें चौथें कारण तर केवळ वेळ मारून नेण्याकरितां पंतांनीं सांगितलेली सबब आहे हें उघड दिसतें.

वानावीं पाताळें सप्त बळिश्री अनंत वानावे,
परि मंत्रवर्ण अडविति, आदरिले गुरु कसे न मानावे ? ॥ मं. भा. ५.६२.

असें पंत म्हणतात. परंतु जलयंत्रोद्गारांप्रमाणें नाना तऱ्हेच्या कृत्रिम शब्दरचना करून त्यांतून कथाभाग वर्णन करण्यामध्यें, हत्तीला आपल्या शुंडादंडावरून पुष्पमाळा खेळविण्यामध्यें जितका श्रम व्हायचा तितका देखील ज्यास

आयास पडत नसे त्यानें केवळ आर्येच्या आद्याक्षरांत साधावयाच्या मंत्राबद्दल अशी कुरकूर केलेली कोणास खरी तरी वाटेल काय ? शिवाय येथें एका ठिकाणीं पाताळांची विल्हेवाट लावतांना मंत्रवर्णाची सबब पंत पुढें करतात पण अशाच तऱ्हेनें अनेक ठिकाणीं सृष्ट्युत्पत्तीचीं, चौदा भुवनांचीं, युगगणनेचीं, कल्पांतांचीं, वर्णाश्रमधर्माचीं वर्णनें गाळून टाकून पंत पुढें जातात तेथें काय हेच मंत्रवर्ण त्यांना पुन: पुन: अडवतात ? आणि असे जर ठिकठिकाणीं ते अडवीत असतील तर मुख्य कथाभाग वर्णन करण्याच्या वेळेस मात्र ते कसे गप्प बसतात ? त्यावेळेस कां अडवीत नाहींत ? तात्पर्य, मंत्रवर्णाबद्दलची तक्रार ही एक क्षणभर वाचकांना रंजविण्यासाठीं पंतांनीं एके ठिकाणीं केलेली कोटि होय. यापेक्षां तिच्यांत जास्त अर्थ नाहीं.

आतां नं. २ व ३ चीं जीं कारणें पंत सांगतात तीं अगदींच सामान्य आहेत. कवि स्वत: विस्तरभीरु आहे असें पंत म्हणतात. पण यांत काय सांगितल्यासारखें झालें ? मुळांतील पुष्कळ भाग सोडून देऊन जो कवि अतिशय थोडक्यांत वर्णन करतो तो कवि विस्तरभीरु आहे हें तर वाचकांना दिसून येतेंच. पण तो असा विस्तरभीरु कां बनला आहे हेंच जाणण्याची सर्वांना जिज्ञासा असणार. आणि या पंतांच्या विस्तरभीरुत्वाचेंच कारण त्यांनीं मंत्रभागवतांत स्वीकारलेलें वरतीं अनेकवार ज्याचा उल्लेख केला आहे तें दुहेरी धोरण होय. ‘ वाचा शुद्ध कराया थोडेंही वर्णिलें पुरे यश तें ’ हें जें पंतांनीं कारण दिलें आहे तें तर आपल्याला अनुकूलच आहे. त्यावरून एक तर त्यांचा भगवद्यशोवर्णनाविषयींचा कटाक्ष दिसून येतो व दुसरें त्यांचें विस्तरभीरुत्वही सिद्ध होतें. वाचा शुद्ध करण्यास यशोवर्णनाची तर जरूरच आहे. पण ती वाचा थोड्याही यशोवर्णनानें पुनीत होते किंवा पुष्कळानेंही होते. तेव्हां मग थोडक्यांतच वर्णन कां न आटपून टाका ? अशा रीतीनें सरतेशेवटीं विस्तरभीरुत्वाच्या पंतांच्या अगदीं अंगीं मुरलेल्या प्रवृत्तीवरच सर्व येऊन ठेपतें. व ही विस्तरभीरुत्वाची प्रवृत्ति पंतांमध्यें कशी उत्पन्न झाली याचीं कारणें सर्व बाजूंनीं विचार करतां आपण दिलीं आहेत तशींच द्यावीं लागतात.

आतां रसिक व गाढे वाचक मराठीमध्यें अगदीं थोडे आहेत; मराठी काव्यें विस्तृत केलीं तर वाचक कंटाळतात; अशा तऱ्हेचें जें कारण पंतांनीं दिलें आहे तें अगदीं अंशत:मात्र खरें आहे. अगोदर खरा हाडामासाचा कवि असें कधीं म्हणणार नाहीं.

वर्णनाच्या भरांत समरस होऊन जो रंगून जातो तो वाचकांबद्दल अशा तऱ्हेची कुरकूर करणारच नाहीं. कारण वाचक नाहींत म्हणून काव्यरसाच्या ब्रह्मानंदावर पाणी सोडण्यास तो तयार होणार नाहीं. आणि पंतांसारखा खरा कवि जर अशी कुरकूर करीत असेल तर ती अगदीं मनापासून नव्हे असें समजण्यास हरकत नाहीं. निदान मराठींत तरी खऱ्या योग्यतेच्या कवीस, मग त्याचा ग्रंथ कितीही विस्तृत असो, वाचकांबद्दल कुरकूर करण्याचा प्रसंग कधीं आलेला नाहीं. शिवाय पंतांच्या अशा कुरकुरींत हसूं येण्याजोगी आणखी दुसरी एक गोष्ट आहे. जो कवि रसिक वाचक थोडे आहेत व अतिविस्तृत काव्यांचें मराठींत चीज होत नाहीं असें एकीकडे रडगाणें गाऊन संक्षेप करीत असतो तोच दुसरीकडे गुपचूप रीतीनें मनास वाटेल तसा विस्तारही करीत असतो ही मोठी आश्चर्याची गोष्ट नव्हे काय ? विस्तृत काव्य कोणी वाचीत नाहीं म्हणून भागवताचा जर संक्षेप करतां तर तिकडे कृष्णविजयामध्यें मुळाचा मन मानेल तसा विस्तार कां केला ? शिवाय मंत्रभागवतामध्यें जे पंत नाना तऱ्हेच्या सबबी सांगून व सर्व वाचकांबद्दल तक्रार करून आपण कसा तरी नाइलाजानें संक्षेप करीत आहों असें दाखवीत आहेत तेच भारतामध्यें ‘ स्वल्पांतचि आणितों कथा सारी ’ असें म्हणून आपल्या संक्षेपकौशलाचा अभिमानानें उल्लेख करीत आहेत याची वाट काय ? तात्पर्य, पंतांनीं जीं हीं कारणें दिलीं आहेत तीं अगदीं वरवरचीं व गमतीदाखल दिलेलीं असून मंत्रभागवतामधील त्यांच्या संक्षेपाचें कारण व कृष्णविजयामधील विस्ताराचें कारण हीं दोन्ही पंतांची एकंदर भूमिका व त्यांचे उद्दिष्ट हेतु लक्षांत घेतले म्हणजेच खरीं खुरीं लक्षांत येतात. दशमस्कंधामध्यें प्रत्यक्ष श्रीभगवंतांचेंच चरित्र वर्णिलेलें असल्यानें त्या स्कंधावर रचलेल्या कृष्णविजयांत भगवद्यशोगानाची पंतांना पर्वणीच सांपडल्यासारखी झाली. त्यामुळें तेथें फारसा संक्षेप करण्याची प्रवृत्तीच होणें शक्य नव्हतें. परंतु सर्व भागवत मराठींत आणतांना त्यांना सर्वत्र यशोगानाची अशी संधि अर्थात्च सांपडूं शकली नाहीं. नाना तऱ्हेचीं वर्णनें, अध्यात्मविषय, वेदान्त वगैरे स्वतःच्या हेतूंस अनुपयुक्त अशा गोष्टी पंतांना ठिकठिकाणीं आढळूं लागल्या. अर्थातच त्या गाळून त्यांना पुष्कळ संक्षेप करावा लागला. आणि मंत्रभागवतांत सर्वत्र असें संक्षेपाचें प्रमाण फार ठेवणें भाग पडल्याकारणानें त्यांतील दशमस्कंधही त्यांना इतर स्कंधांस शोभेल अशा रीतीनें संक्षिप्तच ठेवावा लागला. नाहीं तर सर्व ग्रंथास सध्यां आहे इतकी प्रमाणबद्धता

आली नसती. शिवाय दशमस्कंधामध्यें ठरीव (१०८) मंत्रसंख्या साधण्याचें बंधन त्यांनीं लावून घेतल्याकारणानें त्यांना कमजास्त विस्तार करतां आला नाहीं.

१३. वरील एकंदर विवरणावरून पंतांनीं आपलीं काव्यें कोणच्या धोरणानें लिहिलीं आहेत याचें स्पष्टीकरण होण्यास हरकत नाहीं. पुराणग्रंथ म्हणून किंवा भागवतधर्मप्रतिपादक आगम म्हणून जसें एक प्रकारचें धार्मिक महत्त्व भागवताला आहे किंवा पुण्यशील संतांची प्रासादिक वाणी म्हणून मराठींतील ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत इत्यादि ग्रंथांस जसा एक प्रकारचा अधिकार आला आहे तशा तऱ्हेचें महत्त्व किंवा अधिकार स्वतःच्या ग्रंथांस यावा किंवा येणें संभवनीय आहे असें त्यांस वाटत नव्हतें. एका भाविक मुमुक्षूनें स्वतःच्या उन्नतीसाठीं केलेलें भगवद्यशोगान व एका सात्विक महाराष्ट्र कवीनें आपल्या प्राकृत देशबांधवांच्या मनःसंतोषार्थ लिहिलेलें काव्य या दोन दृष्टींनींच कोणालाही झालें तरी पंतांच्या भागवती ग्रंथांचें निरीक्षण करावें लागेल. या दृष्टीनें पाहतां पंतांनीं भगवच्चारित्रवर्णनाची संधि साधण्याकरितां किंवा काव्यसौंदर्याचा उत्कर्ष करण्याकरितां मुळांतील मजकुरांत कोठें छाटाछाट केली असेल, कोठें वाढावा केला असेल तर तो पाहून त्या ठिकाणीं दिसून येणाऱ्या पंतांच्या मार्मिकपणाबद्दल त्यांची तारीफ केली पाहिजे. याच्या उलट भगवद्यशोगानाच्या व काव्योत्कर्षाच्या हेतूला पोषक होणारे असे सुद्धां मुळांतील भाग जर पंतांनीं निरर्थक गाळले असतील तर त्याबद्दलच्या दोषाचेंही योग्य माप पंतांच्या पदरांत घातलें पाहिजे. अशाच रीतीनें पंतकाव्याचें विवेचन करण्याचा पुढील भागांत यत्न केला आहे.

१४. पंतांनीं आपल्या भूमिकेस अनुसरून मूल भागवतामध्यें पाहिजे तसा विस्तार किंवा संकोच केला आहे असें वर म्हटलेंच आहे. असें करण्यास जर त्यांनीं अनमान केला नाहीं तर मग याच्या थोडेंसें पुढें जाऊन रघुवंश, किरातार्जुनीय किंवा शिशुपालवध यांसारखीं काव्यें पंतांनीं कां निर्माण केलीं नाहींत अशा तऱ्हेची शंका कित्येकांच्या मनांत येण्याचा संभव आहे. परंतु अशी शंका घेणाऱ्यांस पंतांची भूमिकाच पूर्णपणें आकलन झाली नाहीं असें म्हणणें भाग आहे. वरील कवींची भूमिका जर सर्वस्वीं व्यावहारिक होती तर पंतांची भूमिका निम्मी किंबहुना अधिकच पारमार्थिक होती. ग्रंथ रचण्यांत उत्कृष्ट काव्यनिर्मिति हा जसा त्यांचा हेतु होता तसाच किंवा त्याहीपेक्षां जास्त महत्वाचा हेतु भगवन्नामसंकीर्तन करण्याचाही होता, हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

वरील कालिदासभारव्यादि कवींची पद्धति काय आहे कीं, भारतरामायणांतील कोठला तरी एकादा अगदीं लहान प्रसंग हुडकून काढावयाचा; त्याच्यावर आपलें कल्पनासर्वस्व खर्च करावयाचें, मोठ्या टापटिपीनें संस्कृतांतील शब्दभांडाराचें सारसर्वस्व त्याच्यासाठीं उपयोगांत आणावयाचें; व अशा रीतीनें बनलेलें तें काव्य मार्मिक व अलंकारशास्त्रज्ञ रसिकांपुढें मांडावयाचें. अशा कवींचीं महाकाव्यें बहुतेक

सर्गबन्धो महाकाव्यमुच्यते तस्य लक्षणम् ।
आशीर्नमस्क्रिया वस्तुनिर्देशो वापि तन्मुखम् ॥

नगरार्णवशैलर्तुचन्द्रार्कोदयवर्णनैः । उद्यानसलिलक्रीडामधुपानरतोत्सवैः ॥
विप्रलम्भैर्विवाहैश्च कुमारोदयवर्णनैः । मन्त्रदूतप्रयाणाजिनायकाभ्युदयैरपि ॥
अलंकृतमसंक्षिप्तं रसभावनिरन्तरम् । सर्गैरनतिविस्तीर्णैः श्रव्यवृत्तैः सुसंधिभिः ॥
सर्वत्र भिन्नवृत्तान्तैरुपेतं लोकरंजनम् । काव्यं कल्पोत्तरस्थायि जायते सदलंकृति ॥

काव्यादर्श; प्रथमपरिच्छेद, १४ व १६ ते १९.

या संस्कृतांतील एका प्रसिद्ध काव्यशास्त्रमर्मज्ञानें केलेल्या महाकाव्याच्या लक्षणास अनुसरून असतात. अशीं ऋतूंचीं, उद्यानांचीं, जलक्रीडांचीं, नगरांचीं, मधुपानरतोत्सवांचीं वर्णनें ज्यांच्यामध्यें मनसोक्त करतां येतील अशाच तऱ्हेचीं त्रोटक व लवचीक संविधानकें बहुधा हे कवि शोधून काढतात व त्याच्यावर सावकाशपणें आपल्या करामतीचें सर्वस्व खरचीत बसून सरतेशेवटीं एखादें साहित्यशास्त्रमर्मज्ञांस मान्य होणारें काव्य निर्माण करून विश्रांति घेतात. अशा तऱ्हेचा माघभारवींसारखा क्रम पंतांस अंगीकारावयाचा नव्हता. या मनुष्यजन्मास आल्यासरसें शक्य तितकें भगवद्यशोगान त्यांस आटपून टाकायचें होतें; अर्थात् ईशचरित्रपर जितके होतील तितके ग्रंथ झपाट्यानें आपल्या हातून होऊन जावे अशी त्यांची मनीषा होती. तेव्हां जितकी त्वरा करतां येईल तितकी करून व त्यांतच जितकी करामत साधतां येईल तितकी साधून ते एका मागून एक ग्रंथ करून टाकीत असत. एकच पायरी परंतु तिच्यांत बघितलें असतां आरशासारखें प्रतिबिंब दिसेल अशा तऱ्हेची घोंटीव होण्यापेक्षां जरा टाकीं ओबडधोबड राहून कां होईना पण सबंध भगवद्यशोमंदिराचा सोपान आपल्या हातून घडून व्हावा असें त्यांस वाटे. अशाच ईशचरित्रवर्णनाच्या आकांक्षेनें त्यांनीं भारत, भागवत, रामायणासारखे सबंध जगड्व्याळ ग्रंथ आपल्या आधारासाठीं घेतले व त्यावर काव्यें केलीं. असें केल्यानें मूळ कथानकांच्या बाहेर जाऊन स्वतःचा

कल्पनाविस्तार करणें तर दूरच परंतु मुळांतलीं कथानकेंच कशींबशीं तरी संदर्भ-रूपानें मराठींत आणण्यास त्यांस अतोनात श्रम पडले. अशा स्थितींत मुळापेक्षां जास्त विस्तार करण्याच्या भरीस पडून ' गंडस्योपरि पिटिका: संवृत्ता: ' अशी स्थिति करून घेणें युक्त झालें नसतें. शिवाय पंत हे भाविक ग्रंथकार होते. केवळ कल्पनारम्यत्वाच्या भरीस पडून मुळामध्यें वाटेल तसा फेरबदल करणें त्यांस कधींहि पसंत पडणें शक्य नव्हतें. मुळांत जेथें कृष्णाच्या आगमनाबद्दल रुक्मिणीला चिंता वाटत होती, असा एक श्लोक असेल तेथें पंत फार झालें तर तीच कल्पना वाढवून पांच श्लोक करतील पण मुळांत जेथें अवाक्षरानेंसुद्धां कांहीं उल्लेख केलेला नाहीं तेथें स्वतःच्याच कल्पनेचा प्रसंग निर्माण करून त्याचें मनसोक्त वर्णन खास करीत बसणार नाहींत. असें करणें भारत भागवतादिक पूज्य मूळग्रंथांचा कांहींसा अवमान करणेंच होय, असें त्यांस वाटत असलें पाहिजे. असो; तर याप्रमाणें कालिदासभारविमाघादिक कवि व पंत यांच्या प्रकृतींत व भूमिकेंत मूलतःच भेद असल्यानें कालिदासादिकांसारखीं काव्यें पंताच्या हातून झालीं नाहींत, ही मोठी नवलाची गोष्ट नाहीं. आतां पंतांच्या हातून तशा तऱ्हेचीं काव्यें झालीं नाहींत या गोष्टीबद्दल कित्येकांस बरेंच वाटेल व कित्येकांस खेदही वाटेल. ज्या रसिकांच्या हृदयांत भाविकपणाचा ओलावा बराच आहे व ज्यांस भगवद्भक्तिप्रेरित काव्य मान्यतर वाटतें त्यांना पंतांनीं केलें हें चांगलेंच केलें असें वाटेल. परंतु ज्या रसिकांच्या बुद्धीला पाश्चात्य काव्यांचा व पाश्चात्य साहित्यशास्त्राचा विशेष संस्कार झाल्याकारणानें ज्यांना उत्तम काव्य म्हणजे वर्डस्वर्थ, शेली वगैरे कवींच्या भावनागीतांच्याच धर्तीवर गेलेलें असावें असें वाटतें त्यांना पंतांचा सर्व खटाटोप निरर्थक व शुष्क वाटेल. याच्या उलट कालिदासभारवींच्या राजविलासी संगतींतच आजपर्यंत ज्यांचा काल गेला आहे व भामहमम्मटांचें सूक्ष्म अलंकारशास्त्र वाचूनच ज्यांची मति काव्याविषयीं मार्मिक बनली आहे त्यांनाही भाविक मोरोपंतांचे काव्यविषयक आयास फारसे हृद्य वाटणार नाहींत. किंवा केवळ ज्ञपूर्व्यामध्येंच ज्यांची बुद्धि रंगून जाते अशा रसिकांनाहि पंतांच्या काव्यांकडे ढुंकून देखील पहावेंसें वाटणार नाहीं. असो. हे सर्व संस्कारभेदाचे प्रकार आहेत. त्यांबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं किंवा एका प्रकाराचा अभिमान धरणाऱ्यांनीं दुसऱ्यांना तुच्छ लेखण्याचीही आवश्यकता नाहीं.

१५. पंत हे कवि होते. तेव्हां निरंकुशत्वाचा अधिकार निसर्गतःच त्यांना प्राप्त झाला होता. तथापि व्यासवाल्मीकिशुककृतींबद्दलच्या निरतिशय पूज्यभावामुळें व भगवत्कथा शक्य तितक्या भाविकजनमान्य अशा शुद्ध स्वरूपांत त्यांना गावयाच्या असल्यामुळें त्यांनीं आपला निरंकुशत्वाचा अधिकार आपल्या काव्यांमध्यें फारसा गाजवला नाहीं. मुळामध्यें त्यांनीं अगदीं बदल केला नाहीं असें नाहीं; पण जो कांहीं बदल केला तो बहुधा कांहीं विशिष्ट धोरणास अनुसरून केला व तोही मुळास न दुखवितां केला. केवळ कथानकाच्या सोईकरतां व काव्यसौंदर्याकरितां मुळांतील कथेमध्यें वाटेल तसा बदल करणें; पात्रांच्या स्वभावांचा व हेतूचा देखील कोठें कोठें विपर्यास करून आपल्या मनाच्या कल्पना त्यांच्यावर लादणें ही गोष्ट निराळी व मुळांतीलच कथानकाचें स्वरूप कायम ठेवून प्रसंगोपात्त अवांतर वर्णनादिकांचा विस्तार अगर संक्षेप करणें ही गोष्ट निराळी. अलीकडे पौराणिक कथांवर रचलेलीं जीं नाटकें होत असतात त्यांमध्ये वरीलपैकीं पहिल्या प्रकाराचा स्वीकार केलेला असतो. पंतांनीं व बहुधा सर्व प्राचीन कवींनीं दुसऱ्या प्रकारचा अवलंब केलेला आहे. प्राचीन कवींनीं कचोपाख्यानावर केवढींही विस्तृत किंवा संक्षिप्त काव्यें लिहिलीं असलीं तरी त्यांत कच हा एक विद्यासंपादनतत्पर, एकनिष्ठ, नम्र व एकमार्गी असा विद्यार्थीच असलेला आढळेल; मद्यपाननिषेधावर व्याख्यानें झोडणारा किंवा युवतीच्या प्रेमपाशांत सांपडून स्वतःच्या हेतुसिद्धीकरितां तिचें सहाय्य घेऊं इच्छिणारा तरुण अशा स्वरूपानें आमचे प्राचीन कवि कधींही त्याला नटविणार नाहींत. अलीकडील नाटककार पौराणिक कथांवर नाटकें लिहितात त्यांत अगोदर मूळच्या कथानकामध्यें मनास मानेल तसा बदल केलेला असतो. पात्रांचे मूळचे स्वभाव बदलून त्यांना वाटेल तसें स्वरूप देण्यांत येतें व कथेचें पौराणिक वातावरण बदलून टाकून आधुनिक समाजांतील विचार, कल्पना व ध्येयें यांचें दाट आवरण तिजवर चढविण्यांत येतें. अशा रीतीनें पौराणिक कथेचें स्वरूप विकृत करून तिजवर काव्यरचना अगर नाटकरचना करणें दोषास्पद आहे कीं काय याचा आपणास येथें विचार कर्तव्य नाहीं. जुन्या मराठी कवींच्या काव्यग्रंथांमध्यें असा प्रकार आढळत नाहीं येवढेंच आपणास पाहावयाचें आहे. एखाद्या छायाचित्राची (फोटोची) विवर्धित प्रमाणांत किंवा संकुचित प्रमाणांत प्रत काढली तरी तिचें स्वरूप मूळ चित्राहून कांहीं निराळें होत नाहीं तद्वतच

जुन्या कवींच्या काव्यांची गोष्ट होय. त्यांच्या काव्यांत वर्णनें कितीही फुगवलेलीं अथवा आकुंचित केलेलीं असलीं तरी कथानकाचें स्वरूप केव्हांही मुळाप्रमाणेंच कायम राखलेलें असतें. याचा अर्थ असा मात्र नाहीं कीं ह्या कवींचीं काव्यें केवळ भाषांतररूप असून स्वतंत्र रचना त्यांत बिलकुल नसते. फक्त कथानकाची रूपरेखा, पात्रांचा स्वभाव वगैरे मुळांतल्याप्रमाणेंच कायम ठेवून अवांतर वर्णनांत आमचे कवि पूर्ण स्वातंत्र्य गाजवितात. शिवाय कथानकाचासुद्धां मतलब जरी मुळाप्रमाणेंच कायम ठेवला तरी तो स्वतंत्र रीतीनें भिन्न शब्दांनीं वर्णन करतां येत नाहीं असें नाहीं; आणि आमचे कवि अशा स्वतंत्र रीतीनेंच कथासूत्र देखील मराठींत उतरतात ही गोष्ट जुन्या महाराष्ट्र कवींच्या वाचकांच्या परिचयाचीच आहे. असो; तेव्हां अलीकडील मराठी नाटककारांची, किंबहुना कालिदास भारविभवभूत्यादि प्राचीन नाटककार व कवि यांचीही, भूमिका व आमचे जुने मराठी कवि यांची भूमिका यांजमध्यें असा मूलतःच भेद आहे. दोघांच्या तत्वांत याप्रमाणें फरक असला म्हणून त्यांपैकीं एकजण भाषांतऱ्या ठरतो असें कांहीं नाहीं. खाडिलकरादि अर्वाचीन किंवा कालिदासभवभूत्यादि प्राचीन नाटककार यांना जसें कोणी भाषांतरे म्हणत नाहीं तद्वतच वामनमयूरादि मराठी कवींना भाषांतरे म्हणणें अनुचित होय. कालिदास, भारवि, भवभूति हे जर स्वतंत्र प्रतिभेचे कवि होत तर मुक्तेश्वर, वामन, मयूर हे स्वतंत्र प्रतिभेचे कवि ठरण्याला काय प्रत्यवाय आहे हें समजणें कठीण आहे. येवढेंच मात्र म्हणतां येईल कीं कालिदासादिकांनीं मूळच्या पौराणिक कथांमध्यें काव्यसौंदर्यास पोषक असे बदल करून व पात्रांच्या स्वभावांत रसानुकूल फेरफार करून जें कथानकरचनाकौशल्य प्रकट केलें तसें आमच्या मुक्तेश्वरादि प्राकृत कवींनीं केलें नाहीं. तेव्हां कथानकरचनेचें कौशल्य प्राकृत कवींच्यामध्यें दिसून येत नाहीं येवढ्यापुरताच काय तो त्यांचा कमीपणा कबूल करितां येईल. बाकी कवित्वाच्या इतर अनेकविध गुणांमध्यें कोणत्याही भाषेंतल्या कवींना आमचे प्राकृत कवि रेंसभरही हार जाणार नाहींत ही सहस्रावधि वाचकांच्या अनुभवाची गोष्ट आहे.

१६. पंतांनीं संस्कृत शब्दरचना, नानातऱ्हेचे शब्दालंकार, अर्थालंकार यांनीं परिपूर्ण अशी जी प्रौढ काव्यरचना मराठींत केली तिलाच आणखी वळण देऊन त्यांनीं कालिदासादिकांसारखी महाकाव्यांची अगर नाटकांची रचना का केली नाहीं याबद्दल अनेक रसिकांना आजपर्यंत कुतूहल वाटत आलें आहे. खुद्द निबंध-

मालाकारांच्या ही गोष्ट लक्षांत आली असून पंतांची कविता कालिदासादिकांच्या वळणावर गेली नाहीं यावरून पंतांना या कवींच्या कवितेची ओळखसुद्धां नसावी असा त्यांनीं निष्कर्ष काढला आहे. पंतांची कविता संस्कृत पंचमहाकाव्यांच्या धर्तीवर गेली नाहीं ही गोष्ट तर खरीच; परंतु यावरून पंचमहाकाव्यांशीं पंतांचा परिचयदेखील नव्हता असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. पंतांची काव्यस्फूर्ति सर्वस्वीं स्वतंत्र व जन्मासिद्ध होती. त्यांची उपजत प्रवृत्ति, त्यांचे संस्कार कालिदासादिकांच्याहून फार भिन्न होते. केवळ याच कारणामुळें कालिदासादिकांच्यासारखीं राजविलासी काव्यें त्यांच्या हातून निर्माण झालीं नाहींत. नाहींतर अशा तऱ्हेचीं काव्यें लिहिण्यास त्यांना सर्वस्वीं अनुकूल परिस्थिति होती. नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा, लोकशास्त्रकाव्यादिकांच्या अवलोकनानें आलेली निपुणता व काव्यज्ञ गुरूच्यापाशीं केलेला दृढ अभ्यास हे मम्मटाचार्यांनीं सांगितलेले काव्योत्पत्तीचे तीन्ही हेतु त्यांच्या ठायीं पूर्णत्वानें वसत होते. गुणज्ञ व उदार प्रभूचा दुर्मिळ आश्रय त्यांस लाभला असल्यानें निर्वाहाविषयींही लेशमात्र चिंता उत्पन्न होण्याचें कारण नव्हतें. इतकेंच काय, पण काशीनाथ पाध्यांसारख्या जिवलग व आदरणीय आप्तांनीं खुद्द संस्कृतांत पंचमहाकाव्यें निर्माण करण्याबद्दल पंतांस विनंती केली होती. (पहा. मो. च. पृ. ३४). तथापि या विनंतीचाही पंतांवर कांहीं परिणाम झाला असल्याचें दिसून येत नाहीं. संस्कृतांत पंचमहाकाव्यें रचणें तर राहोच परंतु मराठींतही महाकाव्यांच्या धर्तीचें कांहीं काव्य त्यांनीं केलें नाहीं. आपल्या प्रवृत्तीनुसार स्वीकारलेला धोपटमार्ग त्यांनीं अखेरपर्यंत चालू ठेवला.

१७. खरें म्हटलें तर शब्दालंकार, अर्थालंकार, मनोहर कल्पनाविलास, अनेकविध वैचित्र्यपूर्ण छंदोरचना वगैरे संस्कृत काव्यांतील प्रकार पंतांनीं जितके आत्मसात् करून घेतले आहेत तितके महाराष्ट्र कवींपैकीं दुसऱ्या कोणींही घेतलेले दिसत नाहींत. परंतु बाह्यवेषांत त्यांनीं संस्कृत कवितेचें वळण जितकें स्वीकारलें आहे तितकेंच अंतरंगांत व वर्ण्यविषयांत ते तिजपासून विमुख झालेले आहेत. पंतांच्या कवितेंत एकंदर तीन भिन्न प्रवृत्तींचें व संस्कारांचें मिश्रण दिसून येतें. त्यांच्या कवितेचें अंतरंग व आत्मा जिच्यापासून उत्पन्न झाला ती मुख्य स्फूर्ति त्यांना व्यासवाल्मीकिशुक यांच्यापासून मिळाली होती. त्यांच्या कवितेचे विषय व रचनेची धाटणी यांत सर्वस्वीं व्यासादिकांच्याच वाणीचा प्रभाव दिसून येतो. कवितेचे विषय तर त्यांनीं भारतरामायणभागवतांतून

जसेच्या तसेच घेतले आहेत हें सांगावयास नकोच. वर्णनाची धाटणी, काव्याचे विभाग इत्यादिकांतही त्यांची रचना भारतभागवतादिकांशीं फार साम्य पावते. त्यांच्या काव्यांत प्रतिबिंबित झालेली अंत:करणाची शांत, विरक्त व प्रेमळ वृत्ति, त्याचप्रमाणें भगवद्यशोगानाची लालसा हीं देखील पुष्कळशीं भारतभागवतांच्या अवलोकनानें आलेलीं होत. परंतु या बाबतींत त्यांच्या मनावर मुख्य संस्कार ज्ञानेश्वर एकनाथादि संत कवींच्या वाणीनें केला असला पाहिजे. त्यांच्या कवितेंत प्रकट झालेली निर्मळ वृत्ति व भगवद्गुणगानाची तळमळ पाहिली म्हणजे आमच्या पूर्वीच्या शांतिजलधि साधुसंतांच्या वृत्तीचीच छटा त्यांच्या मनावर उमटलेली आहे असा प्रत्यय आल्याखेरीज रहात नाहीं. पंतांच्या मनावर झालेला तिसरा संस्कार म्हणजे वर उल्लेखिलेला, संस्कृत काव्यनाटकांचा व साहित्यशास्त्राचा होय. संस्कृतांतील काव्य नाटक चंपू भाण इत्यादिकांचें व अलंकारशास्त्राचें पंतांचें गाढ अध्ययन झालें होतें. काव्याचें शब्दार्थात्मक बाह्य शरीर निरुपम सौंदर्यशालि करण्याची संस्कृत काव्यमर्मज्ञांची कला पंतांनीं आत्मसात् करून घेतली होती. व तिचा उपयोगही त्यांनीं आपल्या कविता-सुंदरीचें शरीर सजविण्यांत भरपूर रीतीनें केला आहे.

अशा रीतीनें तीन विसदृश संस्कारांचें मिश्रण झाल्याचा देखावा पंतकवितेंत दिसून येत असल्यामुळें तिला एक प्रकारची अपूर्व शोभा प्राप्त झाली आहे व तीन प्रकारच्या भिन्न अभिरुचींच्या लोकांनाही प्रिय होण्यासारखें तिचें स्वरूप वठलें आहे. पुराणप्रिय लोकांना पंतांची पौराणिक धाटणी पसंत पडेल, भगवद्भक्त, साधुवृत्तीचे लोक त्यांनीं केलेल्या भगवद्यशोगानांत रंगून जातील व काव्यालंकार-विचक्षण रसिक त्यांच्या कवितेच्या बाह्यभूषेनें मोहून जातील यांत संशय नाहीं. विनोदप्रिय टवाळांना किंवा शृंगारलोलुप अक्कडबाजांना पसंत पडण्याजोगा अंश मात्र त्यांच्या कवितेंत आढळणार नाहीं हें कबूल करणें भाग आहे.

१८. तीन भिन्न प्रवृत्तींचें मिश्रण झाल्यामुळें एका दृष्टीनें मात्र पंतांच्या कवितेस न्यूनता आली आहे हें येथें नमूद करणें उचित होईल. ती न्यूनता म्हणजे येवढीच कीं तीन्ही प्रकार काव्यांत आणल्यामुळें त्यांपैकीं कोणचाही एक परमोत्कर्षास गेलेला त्यांच्या कवितेंत दृष्टीस पडत नाहीं. पौराणिक धाटणी त्यांनीं स्वीकारली खरी तरी पण सरस व सालंकृति असें काव्य निर्माण करण्याकडेही लक्ष पोंचविल्याकारणानें पौराणिक तऱ्हेचा पूर्ण उत्कर्ष त्यांच्या काव्यांत

होऊं शकला नाहीं. पौराणिक तऱ्हेला न शोभण्याजोगीं कृत्रिम, जराशीं कठिण, अशीं स्थानें त्यांच्या काव्यांत आढळतात. कल्पनाविलास, अलंकारांचें प्राचुर्य व वृत्तवैचित्र्य हेंही साध्या धोपटमार्गी पौराणिक वर्णनास बाधकच झालें आहे. बरें संस्कृत काव्यांच्या रचनाविशेषांचें तरी पूर्णपणें अवलंबन करून

निर्दूषणा गुणवती रसभावपूर्णा
सालंकृतिः श्रवणकोमलवर्णराजिः ।

अशी कविता त्यांनीं सर्वत्र निर्माण केली आहे असेंही दिसत नाहीं. संस्कृत काव्यांप्रमाणें नगरोत्साहयुद्धादिकांचीं, राजसभा, अंतःपुर, स्वयंवरांचीं स्वतंत्र व मनोरम वर्णनें त्यांनीं मुळींच केलीं नाहींत. पौराणिक पद्धतीनें मूळ कथासूत्र तेवढें घाईनें धरून ठेवलें आहे. त्यामुळें रसालंकारमर्मज्ञांचें मन पूर्णपणें प्रसन्न होण्यासारखी रचनाही त्यांच्या हातून उतरली नाहीं. त्याचप्रमाणें भगवद्गुणगानाचीही गोष्ट. संस्कृतकाव्यपद्धतीकडे, अलंकाराकडे व यमकानुप्रासांच्या कृत्रिम शब्दरचनेकडे लक्ष ठेवल्यामुळें ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादि संतांच्या वाणीप्रमाणें शांतरसाचा व भगवद्भक्तीचाही परमोत्कर्ष झालेला त्यांच्या काव्यांत दिसून येत नाहीं. याप्रमाणें वरील सर्व तऱ्हेच्या अभिरुचीच्या लोकांना साधारण आवडण्यासारखें त्यांचें काव्य झालें असलें तरी कोणत्याही एका विशिष्ट रुचीच्या वाचकांना अगदीं प्रियतम व जिवलग होऊन रहाण्यासारखी त्यांची रचना झालेली नाहीं.*

---

* वरील विवेचन साकल्यानें व स्थूलमानानें केलेलें आहे. पंतांच्या ब्रह्मोत्तरखंडांत साध्या पौराणिक पद्धतीचें जवळ जवळ पूर्णांशानें अनुकरण केलें आहे; कृष्णविजयाच्या ५५ ते ९० अध्यायांत व सारारामायण, सीतारामायण यांसारख्या कांहीं काव्यांत पंतांनीं रघुकिरातादि काव्यांची वर्णनशैलीही बरीचशी उचलून उत्कृष्ट परिपाक वठवून दाखविला आहे; व भीष्मभक्तिभाग्य, आर्याकेकावलि, श्लोककेकावलि इत्यादि त्यांच्या काव्यांत भक्तिरसाचा परमोत्कर्ष झालेलाही दिसून येत आहे तथापि वरील स्थळें त्यांच्या एकंदर काव्यसमूहांत अपवादभूत होत. तेव्हां त्यांच्या एकंदर काव्यसमूहांत वर म्हटल्याप्रमाणें या तीन्ही प्रवृत्तींचा मिलाफच दिसून येतो व त्यामुळें कोणतीही एक पद्धति पूर्णत्वास गेलेली आढळत नाहीं हें विधान खरेंच आहे.

१९. पंतांच्या विद्वत्तेविषयीं दोन शब्द लिहून हा विभाग आटोपता घेऊं. ह्या प्रश्नासंबंधीं निबंधमालाकारांनीं पूर्वपक्ष करून प्रथम वाद उपस्थित केला. त्यावर निबंधमालेंतच कडाक्याचें वाग्युद्ध होऊन मोठी रणधुमाळी माजली. कानेटकर, वामन दाजी ओक, 'शोधक' इत्यादि गृहस्थांनीं मालाकारांच्या विरुद्ध पक्षाचा उपन्यास केला. बाळकृष्ण मल्हार हंसांनीं त्याच सुमारास आपला मोरोपंतावरील निबंध लिहिला त्यांतही मोरोपंत हा शास्त्री पंडित नसून साधा पुराणिक होता या मालाकारांच्या सिद्धान्ताचें मोठ्या आवेशानें खंडन केलें आहे. (पहा, हंसकृत मोरोपंतावरील निबंध; पृ. ५७–७४.) यानंतर पांगारकरांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक पंतांच्या चरित्राची माहिती जुळवून व पंतकवितेचें सूक्ष्म अध्ययन करून पंतांच्या विद्वत्तेविषयींच्या प्रश्नावर अपूर्व प्रकाश पाडणारा मजकूर प्रथम केसरी पत्रांत व नंतर आपल्या मोरोपंतचरित्रांत प्रसिद्ध केला. (पहा, मो. च. प्रकरण ३). पांगारकरांच्या विवेचनानें या प्रश्नाचा बहुतेक कायमचा निकाल झालाच आहे; व या वादांतील मालाकारांखेरीज इतरांचे लेख इतिहास-जमा झाले आहेत. येथें फक्त पांगारकरांच्या लेखांत राहिलेल्या थोड्याशा संदिग्धतेविषयीं स्पष्टीकरण करावयाचें आहे.

पंतांचें अध्ययन व विद्वत्ता हीं कितपत व कोणच्या प्रकारचीं होतीं याविषयीं विचार करूं लागलें असतां खालील तीन पक्ष संभवनीय दिसतात.

१. मालाकार म्हणतात त्याप्रमाणें मोरोपंतांची विद्वत्ता साध्या व्युत्पन्न पुराणिकापेक्षां जास्त नव्हती. भारत भागवत रामायण चांगलें समजण्यापुरतें फक्त त्यांचें संस्कृताचें ज्ञान होतें.

२. पंत हे उत्तम तऱ्हेचे व्युत्पन्न असून काव्यनाटकांशीं त्यांचा दृढ परिचय होता. अलंकारशास्त्राचें त्यांचें गाढ अध्ययन झालेलें असून छंदःशास्त्रही त्यांना उत्कृष्ट अवगत होतें. वेदान्ताचेंही त्यांनीं चांगलें अवलोकन केलें होतें.

३. पंत हे महापंडित असून अनेकशास्त्रप्रवीण होते. काव्यालंकारमर्मज्ञ असूनही षड्दर्शनांत निष्णात होते; इ० इ०.

यांपैकीं पहिला पक्ष त्याला जबरदस्त विरोधी पुरावा उपलब्ध झाला असल्या-मुळें त्याज्य ठरतो; तर तिसरा पक्ष उपोद्बलक पुराव्याच्या अभावीं असमर्थनीय ठरतो. मिळून अवशिष्ट राहिलेला दुसरा पक्षच ग्रहण करणें प्राप्त होतें व तोच अनुकूल प्रमाणांनीं बलिष्ठ असल्याचें दिसून येतें. पंतांच्या अध्ययनाचें व विद्व-

त्तेचें माप अजमावण्याला त्यांनीं स्वतः लिहिलेले किंवा स्वतः करितां लिहवून घेतलेले ग्रंथ हें एक मोठेंच साधन उपलब्ध झालें आहे. पांगारकरांच्या व पराडकरांच्या लेखांवरून पंतांनीं स्वतःकरितां एकंदर ५६ ग्रंथ लिहिले किंवा लिहविले असें दिसून येतें.* या ५६ ग्रंथांची वर्गवारी पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.—

काव्य १३; नाटक १०; चंपू, भाण इत्यादि ३; अलंकारशास्त्र ६; छंदःशास्त्र २; कोश २; वेदान्त, तत्वज्ञान ११; ज्योतिष १; पुराण, धर्मशास्त्र २; मराठी २; धार्मिक पाठाचे ग्रंथ व इतर ४.

२०. ही वर्गवारी म्हणजे पंतांचें कोणच्या विषयाचें अध्ययन किती होतें याचें प्रमाण बसविण्याचें एक साधनच होय असें स्थूलमानानें समजण्यास हरकत नाहीं. यांत काव्यनाटकादि वाङ्मयग्रंथ, कोश, छंद इत्यादि साहित्यग्रंथ व अलंकारग्रंथ यांची एकंदर संख्या ३५ भरते. म्हणजे जुन्या पद्धतीच्या लोकांत ज्याला व्युत्पत्ति असें नांव देण्याचा प्रघात आहे त्याचें व अलंकार शास्त्रांचें पंतांचें अवलोकन किती विस्तृत होतें हें सहज दिसून येईल. पंत हे कवि होते, अर्थात् कवित्वशक्तीस साहाय्यभूत होणाऱ्या या विषयांवरचा त्यांचा अभ्यास सर्वांत दृढ होता हें सहजच आहे. उपजत स्फूर्ति किंवा प्रतिभा त्यांच्या ठायीं विलसत होतीच; परंतु दृढ अभ्यासाचा घर्षणसंस्कार आपल्या प्रतिभारत्नावर केला तरच तें उज्ज्वल होऊन चमकेल हें ध्यानांत वागवून त्यांनीं आमरण काव्यानुकूल विषयांचें परिशीलन चालविलें होतें. आपली प्रतिभा कांहींतरी अलौकिक आहे तेव्हां आपणास अभ्यासाची जरूर काय अशा घमेंडींत जाऊन त्यांनीं

---

* पांगारकरकृत मो. च., प्र. ३ यांतील पंतालिखित पुस्तकांची यादी व पंतकाव्यांच्या पराडकरी आवृत्तींतील खंड ६ 'कृष्णविजय' यांत 'चमत्कारिक रीतीनें लागलेला एक शोध' या मथळ्याखालीं आलेलें टिपण; या दोन्ही ठिकाणच्या ग्रंथांची बेरीज ५६ होते. पांगारकरांनीं मुरारि नाटक व अनर्घराघव हा एकच ग्रंथ असतां ते दोन म्हणून दिले आहेत. परंतु पंतांनीं पिंगलप्रणीत छंदःसूत्र व वाणीभूषण ह्या एकाच पोथींत लिहून घेतलेल्या ग्रंथांपैकीं वाणीभूषण पांगारकरांनीं जमेस धरलेलें असून छंदःसूत्र गाळलें आहे. या उणें अधिकांची फिटंफाट होऊन पंतालिखित ग्रंथांची संख्या ५६च कायम राहाते.

ज्ञान संपादण्याची व ग्रंथावलोकन करून मार्मिक कल्पनांचा संग्रह करण्याची हेळसांड केली नाहीं ही त्यांची खरी थोरवी होय.

२१. व्युत्पत्ति, साहित्य व अलंकार यांच्या खालोखाल पंतांचें वेदान्ताचें वाचन होतें असें दिसतें. त्यांनीं लिहून घेतलेल्या 11 वेदान्तग्रंथांमध्यें अद्वैताचे मोठमोठे आकरग्रंथ फारसे नाहींत. पंचदशी, अपरोक्षानुभूति, वेदान्तसारसटीक, बृहदारण्यकभाष्य, सांख्यतत्वकौमुदी हेच काय ते महत्त्वाचे ग्रंथ त्यांमध्यें दिसून येतात. यावरून शास्त्र या नात्यानें पद्धतशीर रीतीनें त्यांचें वेदान्ताचें अध्ययन झालें नसावें असें वाटतें. तथापि त्यांचें एकंदर शिक्षण जसें बहुविध, चतुरस्र व मनाचा खरा विकास करणारें झालें होतें त्याचप्रमाणें त्यांचें वेदांताचें ज्ञानही बहुविध, व्यापक व मार्मिक होतें याविषयीं संशय घेण्यास जागा नाहीं. केवळ ठरीव ग्रंथांच्या पंक्ति घोकल्यानें, ठरीव कोटया व वादविवाद करतां आल्यानें कोणत्याही विद्येचें खरें ज्ञान झालें असें होत नाहीं. भारत व भागवत हे अध्यात्मविद्येचीं आगरेंच असलेले ग्रंथ पंतांना करतलामलकवत् होते. या ग्रंथांतून प्राप्त झालेल्या ज्ञानामध्यें त्यांनीं लिहून घेतलेले अकरा ग्रंथ व लिहून न घेतां नुसते वाचून टाकलेले अनेक ग्रंथ यांची मिळवणी केली म्हणजे त्यांचा ज्ञानराशि किती भव्य असावा याची कांहींशी कल्पना होते. तेव्हां पंतांचे वेदान्तविषयक ज्ञान केवळ वरवरचें होतें असें फाजील चिकित्सेखोर गृहस्थांखेरीज कोणी म्हणणार नाहीं.

आतां पंतांनीं भारतभागवतांचा जो काव्यरूपानें अनुवाद केला आहे त्यांत मुळांतील वेदान्तविषय गाळून टाकला आहे यावरून त्यांना वेदान्ताचें फारसें ज्ञान नसावें असा तर्क करण्याकडे कित्येकांची मति धावते. परंतु पंतांनीं वेदान्तविषय जो गाळला आहे तो आपल्या भूमिकेस व उद्दिष्ट धोरणास अप्रस्तुत म्हणून गाळला आहे, हें यापूर्वींच स्पष्ट केलें आहे. वेदान्ताप्रमाणेंच पंतांनीं वर्णाश्रमधर्म, व्रतांचे विधि, सप्तद्वीप, सप्तपाताल इत्यादिकांचीं वर्णनें, असले अगदीं साधे विषयही गाळले आहेत. मग हेही विषय न समजण्याइतके महामूढ पंत होते असें समजावयाचें कीं काय? परंतु याबद्दल जास्त वाद करीत बसण्याची जरूरीही नाहीं. पंतांनीं ज्या कांहीं थोडक्या ठिकाणीं वेदान्ताचा आदर केला आहे त्या ठिकाणीं तो विषय किती उत्कृष्ट रीतीनें आकलन करून घेऊन मराठींत वर्णन केला आहे हें पाहिलें म्हणजे त्यांच्या वेदान्तज्ञानाविषयीं कोणास शंका घेण्याचें कारण उरणार नाहीं. भागवताचा एकादशस्कंध गहन वेदान्तविचारांनीं भरलेला आहे. परंतु पंतांनीं

या ठिकाणीं नेहमींप्रमाणें वेदान्ताचा अव्हेर न करतां त्याचा सुंदर रीतीनें मराठींत अनुवाद केला आहे. तो पाहिला असतां आमच्या वरील म्हणण्याची सहजच सत्यता पटणार आहे. आतां पंत हे मोठे तत्ववेत्ते नव्हते, त्यांनीं तत्वज्ञानाचे गहन ग्रंथ लिहिले नाहींत असें कोणास पाहिजे तर त्यानें म्हणावें. परंतु त्यांत कांहीं मतलब नाहीं. कारण तत्त्ववेत्याच्या पदवीवर त्यांना अधिष्ठित करण्याचा कोणीच प्रयत्न केलेला नाहीं.

२२. 'पांडित्याचा शिरोभाग जीं न्यायमीमांसादि शास्त्रें' त्यांचें पद्धतशीर सांगोपांग अध्ययन पंतांचें झालें नसावें असें म्हणण्यास जागा आहे. ते पन्हाळगडीं अजमासें १० वर्षें गुरुमुखानें विद्या शिकले. इतक्या अवकाशांत रूपावलि, समासचक्रापासून आरंभ करून, उत्कृष्ट व्युत्पत्ति तयार करून कोणत्याही एका शास्त्रामध्यें निष्णात होण्यास त्यांना वेळ मिळाला असेल हें शक्य दिसत नाहीं. शिवाय त्यांनीं लिहून घेतलेल्या पुस्तकांमध्यें वेदान्ताशिवाय इतर शास्त्रांचें अगर दर्शनांचें एकही पुस्तक दिसत नाहीं. त्यांचा जर कोणत्याही एका शास्त्राबद्दल बाणा असता तर त्या शास्त्रावरील बऱ्याचशा ग्रंथांच्या पोथ्या त्यांच्या संग्रहीं असलेल्या आढळत्या. त्यांचें घराणेंही विद्वानांचें अगर शास्त्रीपंडितांचें नव्हतें. बारामतीस आल्यावरही त्यानीं न्यायव्याकरणादि शास्त्रांचें कधीं अध्ययन अगर अध्यापन चालविलें असल्याचें दिसून येत नाहीं. त्यांच्या काव्यसमुद्राचें आलोडन केलें असतांही व्याकरणन्यायमीमांसादि शास्त्रांच्या अध्ययनाची प्रतीति येत नाहीं. उलट ' अनुष्ठितुं ' ' पुनीते ' या व अशाच इतरत्र अगदीं क्वचित् आढळणाऱ्या अपाणिनीय प्रयोगांवरून त्यांनीं व्याकरणशास्त्र पढलेलें नसावें असेंच अनुमान होतें. व्याकरणशास्त्रांत पारंगत झालेला मनुष्य असले प्रयोग कधींही करताना.

आणि निबंधमालाकारांनीं प्रतिपादिलेल्या मतांत अजूनही जो सत्याचा अंश आहे, असें आम्हांस म्हणावेंसें वाटतें तो हाच होय. मालाकारांचें प्रतिपादन दुहेरी होतें. ' १ मराठी कवींस व मोरोपंतांस ' पांडित्याचा शिरोभाग जीं न्यायमीमांसादि शास्त्रें ' त्यांचें मुळींच ज्ञान नव्हतें; २ अगदीं अव्वलपासून अखेरपर्यंत कोणत्याही मराठी कवीस रघुकिरातादि पंडितमान्य काव्यांची बिलकुल ओळख होतीशीसुद्धां दिसत नाहीं. नामदेव, तुकाराम यांची गोष्ट तर बोलायलाच नको; पण पंडित मंडळींत बरेच मोडण्यासारखे जे वामन, मोरोपंत, रामजोशी वगैरे

त्यांच्या ग्रंथांतही कालिदासादिकांचा मागमूसही नजरेस येत नाहीं.' या दुहेरी समजुतीचा दुसरा भाग सध्यां उपलब्ध झालेल्या माहितीप्रमाणें निराधार व त्याज्य ठरतो. परंतु पहिला भाग निदान मोरोपंतांच्या बाबतींत तरी खरा आहे, असें आजही म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. या विद्वत्तेच्या प्रश्नाचा विचार करतांना बा. म. हंसांनीं व पांगारकरांनीं मालाकारांस अगदींच झिडकारून टाकलें आहे व पंतांच्या पांडित्याचा अतिशयोक्तिपूर्ण शब्दांत सर्वत्र गौरव केला आहे. त्यांच्या विवेचनावरून उत्पन्न होणारी संदिग्धता नाहींशी व्हावी यासाठींच येथें येवढा ऊहापोह केला आहे. (याविषयीं आणखी परिशिष्ट ३ पहा.)

२३. परंतु पंतांचें शास्त्राध्ययन फारसें नव्हतें येवढी मर्यादा निर्दिष्ट केल्यावर दुसरी कोणतीच मर्यादा त्यांच्या विद्वत्तेस किंवा ज्ञानलालसेस नव्हती हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जुन्या तऱ्हेचें शास्त्राध्ययन कितीही गाढ असलें तरी एकदेशीय असतें. त्यामुळें मनुष्य संकुचित मनाचा बनण्याचा संभव असतो. तेव्हां त्याचा संपर्क पंतांस झाला नाहीं यांत सर्वस्वी हानीच झाली असें म्हणतां येत नाहीं. पंतांचें शिक्षण अत्यंत व्यापक, उदार व खऱ्या ज्ञानसंग्रहेच्छेनें पेरा केलेलं होतें. भारत, भागवत व रामायण हे तीन जगड्व्याळ ग्रंथ व अनेक पुराणें ज्याच्या दृष्टीसमोर नाचत होतीं त्याचें ज्ञान किती विशाळ असेल हें काय सांगावयास पाहिजे ? त्यांनीं फक्त ५६ च ग्रंथ लिहून घेतळे होते यावर फसून जातां उपयोगी नाहीं. यांच्याशिवाय अनेकविध ग्रंथ त्यांच्या वाचनांत आले असले पाहिजेत. त्यांना करतलामलकवत् असलेले भारतभागवतादि ग्रंथ देखील त्यांच्या वंशजांच्या संग्रहीं असल्याचा उल्लेख नाहीं. यावरून त्यांनीं संग्रह केलेळे बरेचसे ग्रंथ त्यांच्या पुत्रांनीं बारामतीहून वास्तव्य हालविलें त्यावेळीं नष्ट झाले असावे अगर पांगळे असावे असें अनुमान होतें. कसेंही असो, त्यांच्या विद्वत्तेबद्दल साक्ष देणारे प्रत्यक्ष त्यांनीं रचलेले ग्रंथच अस्तित्वांत आहेत त्यांत नुसत्या दृष्टांता-दाखल घेतलेल्या विषयांचा संग्रह केला तरी अनेक विषयांवरील ज्ञानाचा तो एक विस्तृत कोशच होईल इतकी बहुश्रुतता, चतुरस्रता त्यांच्या ग्रंथांत भरली आहे. विशेषत: सध्यां उच्च व उदार म्हणून सर्वत्र तोंड भरून नांवाजलें जाणारें शिक्षण किती वरवरचें, तगलुपी व भाडोत्री असतें याचा विचार केला असतां जन्मभर निरपेक्षपणें ज्ञानाची लालसा बाळगून व्यासंग करणाऱ्या आणि निःस्वार्थ बुद्धीनें व निरलसपणानें ग्रंथरचना करणाऱ्या पंतांसारख्या पूर्वकालीन साधुपुरुषांविषयीं धन्यता बुद्धीनें कोणाचेंही मन भरून गेल्याखेरीज राहाणार नाहीं.

विभाग ४.

मूळ भागवताचें व पंतकृत भागवती काव्यांचें स्कंधानुक्रमानें तुलनात्मक अंतरंगनिरीक्षण.

१. आतापर्यंत आपण पंतांच्या सर्व भागवती काव्यांचें परिगणन व बाह्य-स्वरूपवर्णन केलें. काव्यरचना करण्यांतील त्यांचे उद्दिष्ट हेतु वगैरे संबंधानेंही यथामति विवेचन केलें. आतां या सर्व भागवती रचनेच्या अंतरंगांत शिरून तिचें अंतर्यामींचें स्वरूप आपणास अवलोकन करावयाचें आहे.

पंतकवितेच्या अंतर्यामांत शिरून व विशेषतः मूळ संस्कृत ग्रंथांशीं तिची सांगोपांग तुलना करून पंतांच्या काव्यांचें हार्द (केकावलीशिवाय) प्रबंधरूपानें अजून कोणी प्रकट केलेलें नाहीं. निदान प्रस्तुत लेखकानें येथें जसा प्रयत्न केला आहे तशा धोरणानें पंतकवितेचें विवेचन कोणी केलेलें दिसत नाहीं असें म्हट-ल्यास सत्यापलापाचा किंवा आत्मश्लाघेचा दोष त्याच्यावर येईल असें वाटत नाहीं. पंतकवितेवर आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं लिहिलें त्यांनीं साकल्यानें व सामान्य तऱ्हेनें तिच्या गुणदोषांचें विवेचन केलें. अशा सामान्य विवेचनाच्या व गोळाबेरीज गुणवर्णनाच्या पुढें पांगारकर प्रथम एक पायरी गेले. त्यांनीं पंतांच्या मोठ्या ग्रंथांपैकीं प्रत्येक ग्रंथावर एकेक पृथक् प्रकरण लिहिलें आहे व लहान काव्यांचे चार पांच गट करून त्या सर्वांचा वेगवेगळ्या प्रकरणांत यथोचित परामर्श घेतला आहे. त्यांचें विवेचन किती रसाळ व बहुमोल आहे याविषयीं अभिप्राय देणें म्हणजे सूर्याच्या तेजाळपणाविषयीं मत प्रकट करण्या-सारखेंच आहे. तथापि सामान्य विवेचनापलीकडे त्यांनाही बहुधा जातां आलें नाहीं. मोरोपंतांच्या एकून एक लहान मोठ्या काव्यांचा उल्लेख करून त्यांतील विषयाचें दिग्दर्शन करणें, त्यांचें सामान्य गुणवर्णन करून त्यांतील थोड्याशा उत्कृष्ट स्थलांचे उतारे दाखल करणें येवढेंच काम त्यांना करणें शक्य झालें आहे. प्रस्तुत प्रबंधांत केलेलें विवेचन म्हणजे पांगारकरांच्या पुढची एक पायरी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कवींच्या काव्याचें जास्त सूक्ष्म, विस्तरशः

अवलोकन करून प्रथमपासून शेवटपर्यंत काव्य कसकसें बनत गेलें, त्याचा प्रत्येक भाग कोणत्या हेतूनें व कसा रचला गेला याचें संपूर्ण चित्र वाचकांच्या डोळ्यांपुढें उभें करण्याचा हा प्रयत्न आहे. व त्याबरोबरच कवींच्या कृतींतील निवडक स्थलांशीं वाचकांचा परिचय व्हावा या हेतूनें शक्य तेवढे उतारे देण्याचेंही धोरण ठेवलें आहे. वरील उद्देश डोळ्यांपुढें ठेवून केलें जाणारें येथपासून सुरू होणारें भागवती काव्यांचें निरीक्षण कोणत्या विशिष्ट मुद्यांवर लक्ष ठेवून केलें आहे तें खालीं जास्त स्पष्ट केलें आहे. त्यावरून वाचकालाही पुढील विवेचन वाचतांना कोणच्या तऱ्हेच्या प्रतिपादनाची अपेक्षा करावी याचा निःसंदेहपणें बोध होईल.

(१) आपल्याला जिचें निरीक्षण करावयाचें आहे ती काव्यरचना सर्व रूपांतरात्मक आहे. अशा रूपांतरात्मक रचनेचें खरें स्वरूप मूळ ग्रंथाशीं तुलना केल्याखेरीज कधींही यथार्थ प्रकट होत नाहीं हें लक्षांत घेऊन पंतकृतीबरोबरच मूळ भागवतांतील वर्णित विषयही एकसारखा वाचकांच्या नजरेसमोर ठेवला आहे. किंबहुना अथपासून इतिपर्यंत मूळ भागवताचा सारांशच पुढील विवेचनांत समाविष्ट केला आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. मूळ भागवत एकसारखें नजरेसमोर ठेवून पंतकृति सर्वत्र त्याच्याशीं ताडून पाहिल्याकारणानें पंतांच्या काव्यरचनेचें रहस्य तर प्रकट होईलच पण भागवतकथाश्रवणाचें फलही वाचकांस आयतेंच येथें मिळेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. सतत मुळाशीं तुलना करण्याची दृष्टि ठेवल्याकारणानें भागवतांतील कोणता विषय पंतांनीं गाळला आहे, कोणचा संक्षिप्त केला आहे, कोणचा विस्तृत केला आहे वगैरे गोष्टी स्पष्ट होऊन पंतांचें धोरण व त्यांची रचनाचातुरी रेखल्याप्रमाणें वाचकांच्या नजरेस येईल. प्रस्तुत निरीक्षणांतला हा सर्वांत महत्त्वाचा अंश होय.

(२) पंतांची भूमिका व त्यांच्या काव्याचे उद्दिष्ट हेतु आपण सामान्यतः यापूर्वींच पाहिले आहेत. त्यांनीं केलेली काव्यरचना त्यांच्या भूमिकेस व उद्दिष्ट हेतूंसच कशी अनुसरून आहे हें दाखविण्याकडे येथें विशेष लक्ष ठेवलें आहे.

(३) त्यांच्या काव्याची परिणति, निरनिराळ्या काव्यांचा परस्पर संबंध व परिणाम या गोष्टींकडेही अवश्य तेथें लक्ष पुरविलें आहे. उदाहरणार्थ, पंतांनीं अगोदर रचलेल्या भागवतावरील स्फुट प्रकरणांचा मंत्रभागवताच्या रचनेवर परिणाम झालेला दिसून येतो. अमुक ठिकाणीं अशीच रचना पंतांनीं कां केली याचें

स्पष्टीकरण पुष्कळ वेळां स्फुट काव्यांकडे लक्ष दिल्यानें आपणास मिळतें. तेव्हां या दृष्टीनेंही येथें विचार केला आहे.

(४) क्वचित् पंतांच्या वयोवस्थेवरून व मनोरचनेवरून त्यांच्या काव्यांतील कांहीं विशेषांचा छडा लावतां येतो. उदाहरणार्थ, मंत्रभागवताचा दशम पूर्वार्धच विशेष रमणीय व कृष्णविजयाचा उत्तरार्धच जास्त भरदार व सुंदर, असें कां हें पंतांच्या आयुःक्रमाकडे लक्ष दिल्यानें तेव्हांच समजतें.

इतरत्र फारसे न आढळणारे पुढील विवरणाचे हे चार विशेष झाले. याशिवाय, ५ यथार्थ स्वरूपाविष्करण; ६ गुणदोषविवेचन व ७ निवडक स्थलांचें अवतरण या इतरांनीं अंगीकारलेल्या गोष्टीही येथें आढळून येतील.

(५) यथार्थ स्वरूपाविष्करण, म्हणजे निरीक्षणास घेतलेल्या काव्यांतील विषय व त्याची अंतर्बाह्य रूपरेखा वाचकांच्या दृष्टीसमोर उभी करणें. हें कार्य पांगारकरांनीं केलें आहेच; त्यापेक्षां अधिक सूक्ष्मतेनें येथें करण्याचा मानस आहे.

(६) गुणदोषविवेचन, अर्थात् ' उत्तम ' ' मध्यम ' ' कनिष्ठ ' इत्यादि ' सर्टिफिकिटां ' चा यथायोग्य बटवडा. हा देखील वामन दाजी ओक इत्यादिंकरून काव्यसंग्रहाच्या संपादकांनीं टीपांच्या द्वारा व पांगारकरांनीं आपल्या काव्यविवेचनपर प्रकरणांच्या द्वारा केला आहेच. तथापि पूर्वींचे सर्व प्रयत्न जमेस धरून अधिक सूक्ष्मपणानें येथील निरीक्षण केलें असल्यानें यांतील गुणदोषविवेचन अधिक ग्राह्य ठरेल असा भरंवसा आहे.

(७) निवडक स्थलांचें अवतरण; हेंही हंसादिक रसिकांनीं व मुख्यत्वेंकरून पांगारकरांनीं केलेंच आहे. काव्यसंग्रहकारांनींही टीपांमध्यें अलंकारादिकांचें विवेचन करून अशा पद्यांचें दिग्दर्शन केलें आहेच. तथापि प्रस्तुतचा प्रयत्न वरील प्रयत्नांपेक्षां जास्त सूक्ष्म व विस्तृत असल्यानें तो निष्फळ ठरण्याची भीति नाहीं.

२. भागवतासारख्या महत्वाच्या, प्रसंगविशेषीं क्लिष्ट व वेदान्तप्रचुर अशा ग्रंथाचें रूपांतर करतांना स्वभावतःच टीकेची मदत कोणीही घेईल. त्याप्रमाणें पंतांनींही अद्वैतमतप्रतिपादक प्रसिद्ध श्रीधरी टीकेची मदत घेतली आहेच. टीकेंतील आशय पंतांनीं काव्यग्रंथांत आणला असल्याचीं कांहीं ठिकाणें पुढील विवरणांत आपल्याला आढळून येतीलच. शिवाय प्रल्हादचरित्र नामक आपल्या

ल्हानशा स्फुट प्रकरणांत पंतांनीं स्वत: श्रीधरी टीकेला आपण अनुसरलें असल्याचें आदरपूर्वक नमूद केलें आहे.

सत्यं विधातुमिति ज्या पद्याचें मूळ हें तयावरिल ।
श्रीश्रीधरकृतरम्यव्याख्यान, विशुद्धबुद्धि या वरिल ॥ १९ ॥

[पुढील विवेचनांत आरंभीं आरंभीं कंसामध्यें जाड ठशांत जे आंकडे छापले आहेत ते मूळ भागवतांतील अध्यायांचे आहेत. बहुधा त्या त्या अध्यायाचें विवेचन संपल्यावर अध्यायाचा आंकडा टाकला आहे. शिवाय पुढील विवेचनांत जागोजाग कवितांचे जे उतारे घेतले आहेत त्यांत मंत्रभागवतांतील कवितांचा स्थलनिर्देश मुळींच केलेला नाहीं. फक्त स्कंधांतील आर्यांचा क्रमांक तेवढा दिला आहे. अशा स्थलनिर्देश न केलेल्या कविता मंत्रभागवतांतील व ज्या स्कंधाच्या विवेचनांत त्या आल्या असतील त्या स्कंधांतील आहेत असें समजावें. दशमांतील विवेचनांत कृष्णविजयांतील उतारे घेतांनाही कोठें कोठें असाच प्रकार केला आहे. तथापि ज्या काव्याच्या विवेचनांत कवितेचा उतारा घेतला आहे त्याच काव्यांतील ती कविता आहे हें वाचकांच्या सहज लक्षांत येण्याजोगें आहे.]

[प्रथम स्कंध]

३. आतां आपणांस 'सूत उवाच' करण्यास हरकत नाहीं. आपल्या सर्व अष्टादश पुराणांस सूत व शौनक या जोडीच्या संवादानें प्रारंभ होतो हें सुप्रसिद्धच आहे. नैमिषारण्यांत सहस्रवार्षिक सत्र चालू असून तत्प्रीत्यर्थ मोठमोठे पावन महर्षि तेथें जमले असतां सूत पुराणिकांचें तेथें आगमन होतें. तेव्हां यज्ञदीक्षित ऋषींचे प्रमुख शौनक ऋषि, पुढें पुराणांत जो प्रतिपाद्य विषय यावयाचा असेल तो ज्याचें सुसंगत उत्तर होईल अशा तऱ्हेचे प्रश्न सूतास विचारतात; व नंतर सूत त्यांचें आदरानें उत्तर देऊं लागतात. अशा रीतीनें पुराणास प्रारंभ होतो. या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें भागवतांतही पहिल्या अध्यायांत शौनकांनीं सूतांला बरेच प्रश्न केले आहेत. शौनक विनंति करतात:—हे सूता, १ सर्व पुराणांचें, इतिहासाचें, शास्त्रादिकांचें सारभूत व मनुष्याला नि:श्रेयसकर असें जें ज्ञान तुम्ही विनिश्चित केलें असेल तें आम्हांला सांगा. २ भगवंतांनीं वसुदेवदेवकीच्या पोटीं कशाकरितां अवतार घेतला व ३ त्या अवतारांत बलरामासह त्यांनीं कोणकोणचीं वीरकृत्यें

केलीं तीं आम्हांस निवेदन करा. ४ त्याचप्रमाणें श्रीहरीच्या इतर सर्व अवतारांच्या कथाही आम्हांस कथन करा. याप्रमाणें प्रश्न करून शौनकांनीं

ब्रूहि योगेश्वरे कृष्णे ब्रह्मण्ये धर्मवर्मणि ।
स्वां काष्ठामधुनोपेते धर्मः कं शरणं गतः ॥ भा. १.१.२३.

कृष्ण निजधामास गेल्यानंतर सध्यां धर्म कोणाच्या आश्रयास गेला आहे ? अशीही शेवटीं पृच्छा केली आहे. यच्चयावत् भागवत ज्याचें उत्तर होऊं शकेल असेच हे प्रश्न आहेत हें त्यांच्या या दिलेल्या सारांशावरुन दिसून येईलच. (१). सूतांनीं शुकाचार्यांस वंदन करून उत्तर देण्यास प्रारंभ केला. विरक्त होऊन अधोक्षजाची निर्हेतुक भक्ति करणें हाच सर्वश्रेष्ठ मार्ग असें सूतांनीं प्रतिपादन केलें. (२). प्रथम सृष्टि करण्याच्या इच्छेनें प्रेरित होत्सात्या भगवानानें पुरुषस्वरूप धारण करून योगनिद्राशयन केलें तो इतर सर्व अवतारांचा बीजभूत असा नित्य अवतार सांगितला व नंतर त्याच्या चोवीस अवतारांचें परिगणन करून अशा परमात्मस्वरूपाचें शुद्ध ज्ञान तर्कादिकांनीं होणारें नसून त्याच्या पादसरोजगंधाचा आश्रय केल्यानेंच होईल असा सिद्धांत कथन केला. व, " याकरितांच

सर्ववेदेतिहासानां सारं सारं समुद्धृतम् ।
निःश्रेयसाय लोकस्य धन्यं स्वस्त्ययनं महत् ॥ भा. १. ३. ४१,४२.

असें हें भागवत व्यासांनीं रचून आपला पुत्र जो शुक त्याला पढविलें; तें शुकाचार्य परीक्षितीला कथन करीत असतां मी त्यांच्या अनुग्रहानें ऐकलें; तेंच यथामति तुम्हांला सांगतों, " असेंही सूत म्हणाले. (३). भागवताचें नांव ऐकतांच शौनकांनीं अधीरतेनें, भागवताची रचना व्यासांनीं केव्हां कोठें व काय हेतूनें केली; त्यांचे पुत्र शुकाचार्य, जे गोदोहनकालपर्यंतदेखील एका ठिकाणीं ठरावयाचे नाहींत, त्यांनीं इतका काल एका स्थानीं वास्तव्य करून परीक्षितीला भागवतसंहिता कशी सांगितली; व परीक्षितराजाला तरी राज्यत्याग करून प्रायोपवेशन करण्यास काय कारण झालें होतें; असे प्रश्न सूतांना केले. सूतांनीं क्रमानें त्यांच्या प्रश्नांस उत्तरें देण्यास आरंभ करून प्रथम भागवतरचनेचा प्रसंग कसा घडून आला तें सविस्तर वर्णन केलें. पूर्णपणें व्रतस्थ राहून वेदांची व गुरूची सेवा केल्यानंतर व ' सर्वार्थपरिबृंहित ' असें भारत रचल्यानंतर देखील स्वतःच्या मनास शांतता प्राप्त होत नाहीं असें आढळून आल्याकारणानें व्यास महर्षि आपल्या आश्रमांत चिंताक्रांत होऊन बसले असतां अकस्मात् नारदमुनि त्यांच्या

आश्रमांत येऊन पातले. (४). व्यासकृत सत्काराचा स्वीकार करून नारदांनीं "आपण असे खिन्न कां दिसतां ?" असें त्यांना विचारिलें. तेव्हां "कांहीं केल्या माझ्या आत्म्याला शांति मिळत नाहीं, तर याचें कारण काय तें आपण सांगा." असा काकुळतीचा प्रश्न भगवान् व्यासांनीं त्यांस केला. व्यासांनीं भारत रचून, वेदांची व्यवस्था लावून या जड जगतावर अनंत उपकार केले होते व स्वतः ब्रह्मज्ञानही प्राप्त करून घेतलें होतें; तथापि सर्वस्वीं भक्तिमय, परमार्थमय असें त्यांचें अंतःकरण अजून झालें नव्हतें. आणि या दृष्टीनें नारदांची भूमिका त्यांच्याहून वरचढ होती. जिकडे तिकडे श्रीकृष्णभक्तीचा प्रसार करण्यासाठीं नारदांचा संचार त्रिभुवनांत असावयाचा; त्यांनीं अर्थातच व्यासांच्या मनःस्थितींतील दोष तेव्हांच ओळखला व निरामय मनानें भगवद्यश वाखाणण्यास त्यांस सांगितलें. ईशभक्तीचें परमभाग्य कसें असतें तें सोदाहरण सांगण्याकरितां नारदांनीं आपलेंच पूर्वजन्मीचें चरित्र व्यासांस सांगितलें. नारद हे पूर्वजन्मीं केवळ एक दासीपुत्र होते व त्यांची आई हरिभक्तिपरायण अशा कांहीं साधूंच्या आश्रमीं कामास होती. फक्त चातुर्मास्यांत साधु आश्रमीं येत व त्यांची सेवा करणें त्यावेळीं छोट्या नारदास भाग पडे. पण हळुहळू ते संत जें परमेशाचें भजन करीत त्याची गोडी बाल नारदास लागूं लागली व त्या संतांची सेवा करणें हें त्याचें अत्यंत आवडीचें काम होऊन बसलें. अशा रीतीनें परमात्म्याच्या ठायीं रति उत्पन्न झाल्यानंतर साधूंनीं त्या 'अनुरक्त, नम्र, निष्पाप, श्रद्धाळू, निग्रही व सेवाशील' अशा बालकास ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला व ते आश्रमांतून निघून गेले. त्यावेळीं नारद केवळ पांच वर्षांचा बालक होता. कर्मयोगानें त्याची आईही सर्पदंशानें मरण पावली. तथापि हा आयताच एक मायापाश नाहींसा झाला म्हणून त्या लोकविलक्षण मुलानें आनंद मानून अरण्याचा रस्ता धरला. भक्तिप्रेमाची पराकाष्ठा झाल्यानंतर भक्तवत्सल परमात्मा त्याच्या हृदयांत हळुहळू प्रकट झाला. परंतु दर्शन होतें न होतें तोंच तें परमेश्वरस्वरूप त्याच्या हृदयांतून नष्ट झालें. तथापि लवकरच "कर्मप्राप्त भोग सरल्यानंतर ही शूद्रतनु सोडून पुढच्या जन्मीं तूं माझा परमभक्त होशील," अशी भगवंताची वाणी त्याच्या कानीं पडली व तो स्वस्थ झाला. नंतर भोग सरेपर्यंत हरिनामस्मरण करीत नारदानें काळ कंठला व अंतीं शूद्रतनु सोडून पुढील जन्माचे वेळीं ब्रह्मदेवाचा मानसपुत्र या नात्यानें त्रिभुवनांत ईशभक्तीचा प्रसार करण्यासाठीं त्या नित्यमुक्त मुनीचा अवतार या

जगतीतलावर झाला. याप्रमाणें नारदांनीं आपलें पूर्ववृत्त व्यासांस सांगितलें व त्याच्या योगानें भगवद्भक्तीचें माहात्म्य केवढें मोठें आहे हें त्यांच्या मनावर बिंबवून आपण अंतर्धान पावले. (५, ६). तदनंतर व्यासांनीं सरस्वतीच्या तीरीं शम्याप्रास नामक आश्रमामध्यें ही मनास शांति देणारी सात्वतसंहिता रचली व आपला मुलगा शुक याला ती पढवली.

४. याप्रमाणें भागवतरचनेची हकीकत प्रथमच्या सवासहा अध्यायांत भागवतकारांनीं वर्णिली आहे. आतां पंतांनीं मंत्रभागवतांत याचा कसा काय तर्जुमा वठविला आहे तो पाहूं. सवासहा अध्यायांपैकीं पहिल्या चार अध्यायांतील सूतशौनकांचीं प्रश्नोत्तरें, सूतांचा वेदान्त व त्यांनीं केलेलें चोवीस अवतारांचें वर्णन वगैरे गोष्टींची पंतांनीं पहिल्या चारच आर्यांत वासलात लावून टाकली आहे त्यानंतर व्यास सचिंत बसले असतां नारद त्यांस येऊन भेटतात व त्यांचें प्रश्नोत्तर होतें तो प्रसंग मात्र पांच आर्यांत पंतांनीं मनोहर रीतीनें वर्णिला आहे.

वाखाणावें प्रेमें भगवद्यश मुनिवरा तुवां आतां ।
हृदय प्रसन्न होतें प्रभुचा महिमाचि आदरें गातां ॥ ७ ॥

ही सुंदर आर्या स्वतःचच रचून घालून नंतर नारदांच्या तोंडच्या मुळांतील दोन श्लोकांचें बहारीचें भाषांतर पंतांनीं दोन आर्यांत केलें आहे. पैकीं दुसरा श्लोक—

मूळ—तद्वाग्विसर्गो जनताघविप्लवो यस्मिन्प्रतिश्लोकमबद्धवत्यपि ।
नामान्यनन्तस्य यशोऽङ्कितानि शृण्वन्ति गायन्ति गृणन्ति साधवः ॥
भा. १. ५.११.

पंतकृति—देवाचीं ज्यामध्यें नामें सुयशोंकितें प्रतिश्लोकीं ।
अघ नुरवीच अबद्धहि असतां तो वाग्विसर्ग या लोकीं ॥ ९ ॥

चवथ्या चरणाखेरीज सर्व श्लोकाचें पंतांनीं अक्षरशः परंतु सुंदर भाषांतर केलें आहे. यानंतर मुळांत नारदांचें भाषण पुष्कळ लांब पण सुंदर आहे. तथापि संक्षेपाकरितां पंतांनीं तें गाळलें आहे. त्यानंतर नारदांनीं सांगितलेल्या पूर्वजन्मींच्या आत्मचरित्राचा (मूळ श्लोक ४१) पंतांनीं एकाच आर्येंत खुबीदार संक्षेप केला आहे.

वाक्यें भागवतांचीं कृष्णयशोमृतपरिप्लुतें प्यालों ।
धालों, असोनि दासीसुत, मी वा ब्रह्मपुत्र कीं झालों ॥ १० ॥

मुळांतील ही नारदचरित्राची हकीकत फार रमणीय असूनही पंतांनीं तिचा अतिसंक्षेप केला याचें कारण याच हकीकतीवर बरोबर ४७ आर्यांचेंच '**नारदाभ्युदय**' नांवाचें स्फुट प्रकरण पंतांनीं लिहिलें आहे हें होय. हें प्रकरण मुळाच्या आधारानेंच रचलें असलें व याची पद्यसंख्याही मुळाइतकीच असली तथापि हें केवळ भाषांतररूप नाहीं. आर्या १० ते १४ पर्यंत पंतांनीं प्रथम महत्सेवा, त्यानंतर महत्कृपा, त्यामुळें धर्मश्रद्धा वगैरे जो भगवत्कृपा होईपर्यंतचा आत्मोन्नतीचा क्रम सांगितला आहे त्यास मुळांत फारसा आधार नाहीं. असें असूनही पंतांनीं या आर्या स्वतःच्या कल्पनेनें सुंदर वठविल्या आहेत. मुळामध्यें नारद अरण्यांत ज्या वाटेनें गेला तिनें लागलेल्या प्रदेशांचें स्वभावोक्तिपूर्ण वर्णन आहे. (अ. ६, श्लो. ११–१४) पंतांनीं तें प्रधान कथाभागास अनुपयुक्त म्हणून गाळून टाकलें आहे. असें आहे तरी कांहीं ठिकाणीं मुळाचें सुंदर रूपांतरही पंतांनीं केलेलें आहे. एक उदाहरण,—

मूळ— तस्मिंस्तदा लब्धरुचेर्महामुने प्रियश्रवस्यस्खलिता मतिर्मम ।
ययाहमेतत्सदसत्स्वमायया पश्ये मयि ब्रह्मणि कल्पितं परे॥ भा.१.५.२७

पंतकृति—करितां नित्य हरिकथाश्रवण न वाटेचि अन्य रुचिर मला ।
श्रीकृष्णींच महात्मा, व्यासमुनिवरा, धरूनि रुचि रमला ॥ ना भ्यु.८

येथें पंतांनीं मुळांतील ब्रह्माची व अद्वैतप्रतिपादनाची भानगड ('मयि परे ब्रह्मणि') काढून टाकून त्या ठिकाणीं मार्मिकपणें भाविक लोकांस समुचित वाटणाऱ्या श्रीकृष्णाची योजना केली आहे. अशा रीतीनें ठिकठिकाणीं मुळांत स्वतःच्या भूमिकेस अनुकूल अशा सुधारणा करून, कोठें कोठें

ज्यांच्या बुद्धींत सुनय शोभति मणिदीप जेविं समयांत । ना. भ्यु. २

असे स्वतःचे समर्पक दृष्टांत घालून पंतांनीं हें आख्यान फार सुंदर केलें आहे. तथापि मूळही अत्युत्कृष्ट आहे. केव्हां केव्हां मुळांत एका तऱ्हेचें वर्णन असतें तर पंत जरा निराळ्या तऱ्हेनें, त्यांत थोडासा अलंकार वगैरेचा चटकदारपणा घालून वर्णन करतात. दोन्ही वर्णनें अत्युत्कृष्टच; त्यांत सरस कोणचें निरस कोणचें हें निवडण्याची पंचाईत पडते. ध्यानधारणेच्या योगानें नारदास प्रथम भगवद्दर्शन झालें तो प्रसंग पहा --

ध्यायतश्चरणाम्भोजं भावनिर्जितचेतसा ।
औत्कण्ठयाश्रुकलाक्षस्य हृद्यासीन्मे शनैर्हरिः ॥ भा. १.६.१७.

प्रेमातिभरनिर्भिन्नपुलकाङ्गोऽतिनिर्वृतः ।
आनन्दसंप्लवे लीनो नापश्यमुभयं मुने ॥ भा. १.६.१८.

हें साधेंच पण सद्भावानें आर्द्र झालेलें वर्णन उत्कृष्ट नाहीं असें कोण म्हणेल ? पण पंतांनीं त्या प्रसंगाचें

पांचा वर्षांचा मीं दासीसुत काय ! विश्वगुरु काय ! ।
ध्यातां हळुहळु हृदयीं स्फुरला सच्चित्सुखैकमय काय ॥ ना. भ्यु २०.

असें विषमालंकाराची थोडीशी चटक घालून जें वर्णन केलें आहे तेंही सुंदरच आहे. तथापि एकादेवेळेस यमकाकरितां पंत रसहानिकर दृष्टांताची योजना करतात.

थोरीं तसाचि दावी देव दयानिधि अनुग्रह ल्हानीं ।
काय लघूचि क्षेत्रीं न करी, होउनि अनुग्र, हल हानी ? ॥ ना भ्यु २१.

या ठिकाणीं नांगराचा दृष्टांत केवळ यमकाकरितां आणला आहे तो लहान मोठ्या सर्वांशीं सारखें वागण्याची प्रवृत्ति येवढ्यापुरता समर्पक आहे. पण नांगर क्षेत्रांची ' हानी ' करतो, त्यांना खणून काढतो, त्याचा दृष्टांत ईश्वराला देणें म्हणजे औचित्याची हानीच करणें होय. नांगराच्या खणण्यामुळें पुढें शेतें चांगलीं पिकतात हें खरें पण अलंकाराची समर्पकता ठरवण्यास इतक्या दूरचे व कवीनें उल्लेख न केलेले परिणाम शोधीत बसणें हेंही इष्ट नाहीं. कवीनें तर उलट ' देव दया दावी ' व ' हल हानी करी ' असें म्हणून दृष्टान्त व दार्ष्टान्तिक यांचे धर्म अगदीं विरुद्ध असल्याचें वर्णन केल्यामुळें येथील अलंकार दुष्ट व रसहानिकर झाला आहे. वस्तुतः येथें शेतांवर सर्वत्र सारख्या पडणाऱ्या पावसाचा दृष्टांत समुचित दिसला असता. पण यमकाकरितां पंतांना नांगर (हल) ओढून आणणें भाग पडलें आहे. याच्या उलट केवळ यमकाकरितां आणलेले पंतांचे कांहीं दृष्टान्त अत्यंत समर्पकही असतात. उदाहरणार्थ,—

बहु वाढेल प्रेमा, हा गेला जेंवि मंडपा वेल ॥ ना. भ्यु. २२.

येथें पूर्वींच्या ओळींतील ' खंड पावेल ' या अक्षराशीं जुळण्याकरितां वेलाची व मंडपाची उपमा योजिली आहे. पण ती समर्पक व सुंदर असल्यानें येथें फार शोभली आहे.

तेव्हां याप्रमाणें हें साधेंच परंतु मधून मधून पंतांनीं आपल्या स्वतंत्र कल्पनांनीं सजविलेले ' नारदाभ्युदय ' प्रकरण फार सुंदर वठलें आहे.

येथें शौनकांच्या भागवतरचनेविषयींच्या पहिल्या प्रश्नावरील सूतांचें उत्तर संपलें. यापुढें दुसऱ्या प्रश्नास उत्तर देण्याकरितां सूत पुराणिक परीक्षितीच्या हकीकतीकडे वळले आहेत.

५. अश्वत्थाम्यानें द्रौपदीच्या सर्व पुत्रांचा घात केल्यामुळें ती अतिशय विह्वल झाली, तिचें सांत्वन करून श्रीकृष्णासहित अर्जुन अश्वत्थामावर चालून गेला. अश्वत्थामानें सोडलेल्या ब्रह्मास्त्राचें श्रीकृष्णकृपेनें परिमार्जन करून अश्वत्थामाला बांधून अर्जुनानें द्रौपदीसमोर आणिलें पुत्रशोकानें अगोदरच विह्वल झालेल्या त्या प्रेमळ माउलीचें हृदय अश्वत्थामाची, आपल्या गुरुपुत्राची, ती करुण स्थिति पाहून जास्तच कळवळून गेलें. अश्वत्थामाला नमस्कार करून आपल्या पतींना ती म्हणाली,—" मुच्यतां मुच्यतामेष ब्राह्मणो नितरां गुरुः ।

मा रोदीदस्य जननी गौतमी पतिदेवता ।

यथाहं मृतवत्सार्ता रोदिम्यश्रुमुखी मुहुः ॥ " भा. १.७.४७.

आईचें हृदय आईला कळतें. अश्वत्थामानें जरी तिचा घोर अपराध केला होता तरी त्याला मारून त्याच्या आईला आपल्यासारखेंच दुःख करायला लावावें ही कल्पना तिला सहन झाली नाहीं. नंतर अश्वत्थामाला त्याच्या मस्तकांतील मणि काढून घेऊन सोडून देण्यांत आलें. (७). पुढें युधिष्ठिराच्या राज्याची सर्व व्यवस्था लावून श्रीकृष्ण द्वारकेला जावयास निघाला. तो रथांत पाय टाकतो आहे इतक्यांत निष्पांडवी पृथ्वी करण्याच्या उद्देशानें अश्वत्थामानें सोडलेलें ब्रह्मास्त्र पांडवांना व उत्तरेच्या गर्भाला ताप देऊं लागलेलें पाहून आपल्या सुदर्शनाच्या योगानें त्यानें ब्रह्मास्त्राचें निवारण केलें व पुनः तो जाण्यास निघाला. परंतु कुंतीनें व इतरांनीं त्याची प्रार्थना करून त्याला राहवून घेतलें.

विपदः सन्तु नः शश्वत्तत्र तत्र जगद्गुरो ।

भवतो दर्शनं यत्स्यादपुनर्भवदर्शनम् ॥ भा. १.८.२५.

अशा रीतीनें कुंतीनें केलेली कृष्णाची प्रार्थना सर्वच अतिशय प्रेमळ व हृदयद्रावक आहे. भागवतांत देखील तिला तोड क्वचितच सांपडेल. (८).

६. पंतांनीं हा सर्व मुळांतील अतिसुंदर कथाभाग २१ आर्यांत वर्णिला आहे. व पंतांच्या नेहमींच्या धावत्या पद्धतीनें तो सुंदरही वठला आहे. द्रौपदीनें अश्वत्थामाला सोडून दिल्याचा प्रसंग पंतांनीं एकाच आर्येंत उत्कृष्ट रेखाटला आहे.

यद्यपि बंधादि उचित कृष्णेला दैन्य तें पहावेना ।

' सोडा ' म्हणे ' गुरुसमचि गुरुसुत, अपमान मज सहावेना ' ॥२२॥

तथापि एकुलता एक पुत्र मेल्यानें अश्वत्थामाच्या आईला जें अपरंपार दुःख होईल त्याची कल्पना येऊन द्रौपदीचें हृदय कळवळल्याचा मुळांतील उल्लेख पंतांनीं अगदींच गाळला आहे. त्याचप्रमाणें कुंतीची हृदयस्पर्शी कृष्णप्रार्थनाही गाळून टाकली आहे. पंतांस केव्हां केव्हां घाई फार होते त्यामुळें मुळांतील सुंदर काव्यस्थळेंही कित्येकवेळां सुटून जातात.

७. यानंतर युद्धांत मारले गेलेल्या बांधवांबद्दलची धर्मराजाच्या मनाची तळमळ कांहीं केल्या शांत होईना तेव्हां तो व इतर मंडळी स्यमन्तपंचकीं भीष्माकडे उपदेश ऐकण्याकरितां जातात. भीष्म या मंडळींना सर्व धर्मांचें व तत्वज्ञानाचें कथन करून व अंतकाळीं श्रीकृष्णाची स्तुति करून प्राण सोडतात. (९). श्रीकृष्णाची स्तुति करून त्याच्या डोळ्यासमोर हा जडदेह सोडून त्याच्याच कैवल्यस्वरूपीं मिळून जाण्याचें हें भीष्मांचें भाग्य पंतांनीं आपल्या एका सुंदर स्फुट प्रकरणांत वर्णिलें आहे. मुळांत भीष्मनिर्याणाच्या अध्यायाचे ४९ श्लोक असून पंतांनीं त्याचीं २०० पद्यें केलीं आहेत. पहिल्या १९० आर्या असून पुढील श्लोक आहेत. पहिल्या सहा आर्यांनीं मंगलाचरण करून सत्कथा गाण्याचा झालेला आपला निश्चय पंत नंतर प्रकट करतात.

भगवद्भक्तानुज्ञा कीं गाव्या सत्कथा यथामति तें ।
स्वीकारिलें स्वहित म्यां नमुनि स्वसुरद्रुमा रमापतितें ॥ भी. भा. ७.

यानंतर, शुकभाषणानुकार प्रेमें करितो मयूर हें चित्र । भी. भा. ९.

असें स्वतःच्या कृतीविषयीं धन्यतामूलक आश्चर्य प्रकट केलें आहे. वस्तुतः या भीष्मनिर्याणाच्या कथेंत शुकभाषणाचा कांहींएक संबंध नाहीं. सध्या सूताचेंच भाषण चाललें असून शुकाचार्यांना कथाप्रांतात येण्यास अजून पुष्कळ अवकाश आहे. तथापि सर्व भागवत हें शुकाचार्यांचें, तेव्हां उपलक्षणानें येथेंही आपण शुकभाषणाचाच अनुवाद करितों आहों असें पंतांनीं वर्णन केलें असावें. नंतर ' आर्या आर्यांसि रुचे ' या सुप्रसिद्ध आर्येनें आर्याच्छंदाची प्रशंसा करून

म्हणऊनि याचि च्छंदें नवमींची वर्णितों कथा सुरसा ।
त्यजिन कदापि न अर्थां कृपण जसा, कीं नभःपथा सुरसा ॥ भी.भा.११

असा आपला उद्देश निवेदन केला आहे. याप्रमाणें प्रास्ताविक (भी. भा.१-११) झाल्यानंतर, पंतांनीं मुळांतील कथाभागास आरंभ केला आहे. प्रथम कौरवांच्या मनांत दुराग्रह दृढ करून युद्धापर्यंत पाळी आणावयाची; युद्धामध्यें पांडवांकडून

कौरवांस मारवून नंतर त्याबद्दल धर्मराजाच्या मनांत खंती उत्पन्न करावयाची व आपला भक्त जो भीष्म त्याला यश प्राप्त करून देण्याकरितां त्याच्या तोंडून धर्मराजाच्या सांत्वनार्थ तत्वज्ञान वदवायचें – वगैरे सर्व श्रीकृष्णाच्या योजनेचें मुळांत नसलेलें वर्णन पंतांनीं पुढील तेरा आर्यांत फार मार्मिकपणें केलें आहे. (भी. भा. १२–२५)

भगवदभिप्राय असा कीं झाला तप्त दुःसहें ग्रीष्में ।
तो जेंवि मयूर घनें, बोधावा धर्म सज्जनें भीष्में ॥ भी. भा. २१.
कुरुगुरु कवि रवितेजा संप्रति करणार देहसंन्यास ।
धन्यास त्यास द्यावें हें यश देवूं नयेचि अन्यास ॥ भी. भा. २२.

अशा मायावी श्रीकृष्णाच्या योजनेच्या अधीन असलेले सर्व, स्वतः श्रीकृष्ण सुद्धां, उपदेशग्रहणार्थ नंतर भीष्माकडे जातात. तो प्रसंग ओळखून अनेक तपोधन ऋषींही तेथें येतात. (भी. भा. २६–४१) भक्तश्रेष्ठ भीष्मांनीं श्रीकृष्णाची मनोमय पूजा केली तो उदात्त प्रसंग दोघांनींही एकेका पद्यांत गंभीर रीतीनें वर्णिला आहे.

मूळ–कृष्णं च ' तत्प्रभावज्ञ ' आसीनं जगदीश्वरम् ।
हृदिस्थं पूजयामास माययोपात्तविग्रहम् ॥ भा. १. ९. ५.

पंतकृति–मायायोगें मानववेष धरुनि ' भार भूमिचा हरिला ' ।
ज्या जगदीशें कृष्णें पूजी हृदयांत भीष्म त्या हरिला ॥ भी. भा.४२.

' तत्प्रभावज्ञ ' याचा अर्थ पंतांनीं जरी मार्मिक रीतीनें विशद केला आहे तथापि त्या मुग्धार्थक शब्दानेंच मुळाला जी गोडी आली आहे, ती अप्रतिम आहे. नंतर भीष्म ' निर्मळ विवेकमानसहंस कसे शोककर्दमें किटलां । ' अशी पांडवांस पृच्छा करून अत्यंत गोड, प्रेमळ व वात्सल्ययुक्त वाणीनें त्यांचें सांत्वन करतात. (भी भा. ४३-८४). मुळांत हें भीष्मांचें भाषण १२ श्लोकांचें आहे, व तें उत्कृष्टच आहे. पण येथें पंतांनीं वात्सल्यांत व प्रेमळपणांत, मुळावर ताण केला असें म्हणावें लागतें. या ४१ आर्या आम्हांस तरी या प्रकरणांत अति उत्कृष्ट वाटतात. कुंतीनें पतिनिधनानंतर पुत्रांकरितां जे अनेक कष्ट सोसले त्यांचा भीष्म कळवळ्यानें उल्लेख करितात. पतिनिधनोत्तर अनाथ झालेली स्त्री हें संसारांतील नेहमींचें करुण दृश्य होय.

मूळ— संस्थितेऽतिरथे पाण्डौ पृथा बालप्रजा वधूः ।
युष्मत्कृते बहून्क्लेशान्प्राप्ता तोकवती मुहुः ॥ भा. १. ९. १३.

पंतकृति– बहुकष्ट तुम्ही बाळांकरितां त्या पांडुमृत्युपासून ।
अद्यापि पावती ती माझी सुगुणामृतप्रपा सून ॥ भी भा. ५१.

यानंतर, मुलगे शोकग्रस्त किंवा संसारांत उदास असले म्हणजे आईला फार दुःख होतें तेव्हां तुह्मी दुःखी होऊं नका, असें भीष्म सांगतात.

मातेचें मन असतां संसारीं सुत उदास कळकळते ।
गंगेच्या वात्सल्यावरुनि असें मज, बुधा, सकळ कळतें ॥ भी. भा.५७

येथें प्रकट झालेली पंतांची सहृदयता केवळ अनुपम आहे. मुलांच्या उदासीनतेमुळें मातेच्या मनाला फार दुःख होतें, हें वर्णन व त्याच्या समर्थनाकरितां भीष्मांनीं स्वमाता गंगा इचा दिलेला दाखला मुळांत नाहीं. कौटुंबिक प्रेमाचा उल्लेख करण्याचा प्रसंग आला कीं पंतांच्या सहृदयतेला कसा पाझर फुटतो व ते कसें हृदयंगम वर्णन करतात याचा आर्या ५५–६० हा एक उत्कृष्ट मासला आहे.

" होणार जाणार सर्व कालरूपी परमेश्वराच्या अधीन असतें तेव्हां तुम्ही परमेश्वराची भक्ति करा. अंतकाळीं प्रत्यक्ष श्रीकृष्ण मज भक्तापुढें येऊन उभा राहिला आहे हें माझें केवढें भाग्य ! " येथें पंतांनीं एका श्लोकाचें भाषांतर मुळाशीं जरा विसंगत असें केलें आहे.

मूळ — तस्मादिदं दैवतन्त्रं व्यवस्य भरतर्षभ ।
तस्यानुविहितोऽनाथा नाथ पाहि प्रजाः प्रभो ॥ भा. १. ९.१७.

यांतील उत्तरार्धाचा अर्थ, ' त्याचा (श्रीकृष्णाचा) अनुवर्ती होऊन, हे राजा, **आपल्या अनाथ प्रजांचें पालन कर** ' असा उघड असतांना पंतांनीं त्याचें

व्हावें अनुवर्ती या प्रभुचें, याचि प्रभूत्तमा गावें ।
' स्वामी प्रभुजी, पाळा प्रजा अनाथा ' असेंचि मागावें ॥ भी. भा.६६

असें भाषांतर केलें आहे. येथें ' श्रीकृष्णापाशीं असें मागावें ' असा अर्थ पंतांनीं कोठून उसना आणला आहे व असें विपर्यस्त भाषांतर कशाच्या आधारानें केलें आहे याचा कांहीं बोध होत नाहीं. पुढें पंतांनीं उत्कृष्ट भाषांतराचा एक नमुना दाखविला आहे.

मूळ—तथाप्येकान्तभक्तेषु पश्य भूपानुकम्पितम् ।
यन्मेऽसूंस्त्यजतः साक्षात्कृष्णो दर्शनमागतः ॥ भा. १. ९. २२.

पंतकृति—जे निरुपाधिक सेवक देव करी त्यांवरीच फार कृपा ।
आला मरणावसरीं मज भेटाया पहा मुकुंद, नृपा! ॥ भी. भा.७९

नंतर, जेव्हां मानेल मना तेव्हां टाकीन या शरीरा हो ।
तोंवरि मदग्रभागीं हा गीतामृतनिधी उभा राहो ॥ भी. भा. ८४.

असें म्हणून भीष्म स्वस्थ राहतात. मुळांत नसलेला गीतेचा उल्लेख पंतांनीं येथें फार मार्मिकपणें केला आहे.

यापुढें युधिष्ठिर चतुर्विध पुरुषार्थ, बहुविध धर्म वगैरे जाणण्याकरितां भीष्मांस प्रश्न विचारतो. भीष्म त्याचें व सभोंवार जमलेल्या मंडळींचें ज्ञानसंतर्पणानें समाधान करतात (भी. भा. ८४–१०२). भीष्मांकडून वदविण्याची ही सर्व श्रीकृष्णाचीच योजना होती असें एक मनोहर कल्पना योजून पंत सांगतात.

वाजविला कृष्णें तो **सद्वंशज** मधुर **शांत नव** पावा ।
कीं बहु सुखासि, जन हो, सेवुनि हा स्वहित बोधपर, पावा ॥भी.भा. ९७

ही कल्पना व हें वर्णन पंतांचें स्वतःचेंच आहे. येथें श्लेषानुप्राणित रूपक अलंकार आहे. अशा तऱ्हेचे सुंदर रूपक, अतिशयोक्ति, इत्यादि अलंकार या काव्यांत पुष्कळच आढळतात. नंतर कृष्णाच्या ठिकाणीं निश्चल ध्यान लावून भीष्म श्रीकृष्णाची स्तुति करूं लागतात. (१०३–१२०) श्रीकृष्णानें कृपादृष्टीनें भीष्मांकडे अवलोकन केलें तेव्हां

प्रभुदृष्टि माय, भीष्मा वत्साला होय भव्य थारा हे ।
आलिंगी करुणार्द्रा, देहीं कांहींच न व्यथा राहे ॥ भी. भा. १०८.

यानंतर मुळांत पुष्पिताग्रा वृत्तामध्यें ११ श्लोकांत भीष्मांनीं श्रीकृष्णाची स्तुति केली आहे. या ‘ गंगासुतकृत भगवन्नुतिची गोडी उदंड आसि कांहीं । अमृतनदींतहि नाहीं ’ असें जें पंतांनीं म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे. ही स्तुति मराठींत उतरतांना ‘ वृत्त जरि तेंच । अवलंबावें तरि तें अडचण कांहीं तरीहि करितेंच ॥ ’ म्हणून पंतांनीं आपल्या सवयीच्या आर्यावृत्तामध्येंच त्या स्तुतीची रचना केली आहे. मुळांतील ११ श्लोकांच्या पंतांनीं ५२ आर्या केल्या आहेत. पंतांच्या आर्या चांगल्या साधल्या आहेत. पण मुळांतील सुश्लिष्ट श्लोकाचा अर्थ ४।५ आर्यांमध्यें वांटावा लागल्याकारणानें जरा फाकटपसारा झाल्यासारखा वाटतो. शिवाय या स्तुतीच्या बाबतींत मुळामध्यें फारशी भर घालावयाची नाहीं व मुळांतील एक अक्षरही वर्ज करावयाचें नाहीं असा पंतांनीं बेत केलेला दिसतो.

यामुळें प्रतिभेस थोडें बंधन पडल्यासारखें झालें आहे. तथापि अशा बंधनाच्या स्थितींत पंतांनीं केलें आहे तें काम खरोखरच आश्चर्यजनक आहे. रूपांतर करतांना प्रथम अंगीकारलेला आटोपशीरपणा पुढें तसाच कायम राहिलेला दिसत नाहीं. प्रथमच्या श्लोकांपेक्षां पुढील पुढील श्लोकांचा पंतांनीं अधिक अधिक विस्तार केला असल्याचें दिसून येतें. मुळांतील तिसरा श्लोक पंतकृत भाषांतरासहित येथें देतों. म्हणजे त्यांची एकंदर धाटणी कळून येईल.

मूळ—युधितुरगरजोविधूम्रविष्वक्कचलुलितश्रमवार्यलंकृतास्ये ।
मम निशितशरैर्विभिद्यमानत्वचि विलसत्कवचेऽस्तु कृष्ण आत्मा ॥
भा. १. ९. ३४.

पंतकृति - युद्धीं अश्वखुरांनीं धूळ उडविली, तिणें सकळ भरले ।
मुखरुचि न मळो म्हणउनि, जाणों रक्षावया पुढें सरले ॥
सर्वत्र चपल धांवति, अलक हरिति परि पुनः पुन्हा येती ।
श्रमजलबिंदु जयाच्या वदना शोभा मनोहरा देती ॥
माझ्या तीक्ष्णशरांहीं ज्याचें खंडूनि कवच, वपु भग्न ।
केलें त्या कृष्णीं हो मन जैसें लवण सागरीं मग्न॥ भी.भा.१२७–१२९.

येथें पहिल्या आर्येतील मनोहर उत्प्रेक्षा पंतांचीच आहे. तिला मुळामध्यें ‘विष्वक्लुलित’ या शब्दांमध्यें किंचित् आधार आहे. मुळांतीलच वर्णन आपल्या कल्पनाशक्तीनें किंचित् वळवून पंत त्याचे अलंकार कसे घडवतात याचें हें एक सुंदर उदाहरण आहे. मूळ भागवतामध्यें अलंकार थोडे आढळतात पण पंतांनीं आपलीं भागवती काव्यें त्याच्याच आधारानें लिहिलीं असूनही त्यांच्या ग्रंथांत चमत्कृतिपूर्ण व आल्हादक अलंकार रूचून भरले आहेत. भीष्मभक्तिभाग्यांतच कांहीं नाहीं तरी पन्नास एक अलंकार सहज आढळतील. त्यांपैकीं कांहीं तर फार सहृदय व रसपोषक असे आहेत. स्तुति संपल्यावर भीष्मांच्या देहावसानाचा प्रसंग मुळाप्रमाणेंच पंतकृतींतही उत्कृष्ट साधला आहे. (१७२–१९०). पुढील आर्यांतील वर्णन अत्यंत उदात्त असून त्यांतील अलंकारही बहारीचे आहेत.

(उपमा) भगवान् कृष्णचि साक्षात् ब्रह्म म्हणुनि भीष्मराय तो यांत ।
मिसळे जसें नभ नभीं, कीं तेजीं तेज, तोय तोयांत ॥
भी. भा. १७४

(उत्प्रेक्षा) पुष्पांची वृष्टि गमे ये खगमेला रडे अनावर तें ।
तद्बाष्पबिंदुवृंदचि पडले तत्पुत्रसज्जनावरतें ॥ भी. भा. १८०.

या आर्या स्वतंत्र पंतांच्याच आहेत. स्वपुत्राचें निधन पाहतांच आकाशांतील गंगेला रडें आलें व पुष्पांच्या रूपानें जणूं काय तिनें ढाळलेले अश्रूच तिच्या प्रियपुत्राच्या शवावर पडले ही दुसऱ्या आर्येंतील कल्पना अत्यंत हृदयंगम आहे पंत स्वतः वात्सल्याची मूर्तीच होते. त्यांनीं या काव्यांत मातापुत्रांच्या प्रेमाचा अनेकवार उल्लेख मोठ्या सहृदयतेनें केला आहे (वर उद्धृत केलेल्या आर्या ५७, १०८ पहा.) याप्रमाणें **भीष्मभक्तिभाग्य** हें काव्य सर्व बाजूंनीं सुंदर व रसिकांस वेड लावणारें झालें आहे. त्याच्याबद्दल येथें फार विस्तार झाला, परंतु त्याच्या गुणांस अनुरूप अशी त्याची प्रसिद्धि अद्यापि सर्वत्र झाली नसल्याकारणानें वाचकांच्या लक्षांत येण्याकरितां त्याचें विवरण येथें जास्त विस्तारानें केलें आहे. अगोदर श्रीकृष्णपरमात्मा व भक्तश्रेष्ठ भीष्म यांचा अति उदात्त प्रसंग; त्यांतून भागवतकारांची अलौकिक वाणी त्याचें वर्णन करणारी व पंतांसारखे प्रेमळ व भाविक सहृदय त्याचा विस्तार करणारे मग तो परिपाक उत्कृष्ट कां उतरूं नये ?

८. मंत्रभागवतांत पंतांनीं या भीष्मनिर्याणाच्या अध्यायाचें चारच आर्यांत वर्णन केलें आहे. हा संक्षेप अर्थातच ' भीष्मभक्तिभाग्य ' पंतांनीं निराळें लिहिलें असल्यामुळें केला आहे. बहुतेक ठिकाणीं असें दिसून येतें कीं पंतांनीं जेथें जेथें स्फुट आख्यानें अगोदर लिहिलीं होतीं तेथें तेथें मंत्रभागवतामध्ये त्यांनीं अतिसंक्षेप केला आहे. पंतांच्या एकंदर संक्षेपाच्या धोरणास हें अनुरूपच आहे.

९. भीष्मनिर्याणानंतर श्रीकृष्ण द्वारकेस निघून जातात. हस्तिनापुरांतील त्यांची पांडवप्रमुख सर्वांनीं केलेली पाठवणी व द्वारकेंत प्रजेनें त्यांच्याप्रीत्यर्थ केलेला स्वागतमहोत्सव यांचें भागवतकारांनीं सुंदर वर्णन केलें आहे (१०, ११). पंतांनीं हे दोन्ही अध्याय तीनच आर्यांत आणले आहेत; व स्वागतोत्सवाचें वगैरे सर्व वर्णन गाळून टाकलें आहे. कृष्णाच्या द्वारकेप्रत गमनाचें पंत एकाच खुबीदार उपमेनें वर्णन करितात.

वत्सलवर विभु गेला निज नगरीप्रति पुसोनि धर्मातें ।
जेंवि उदयगिरिपासुनि विधु द्याया कुमुदिनीस शर्मातें ॥ ३८ ॥

येथें चंद्राप्रमाणें श्रीकृष्णही पूर्वेकडून पश्चिमेकडेच गेला होता हें साम्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे. नंतर बाराव्या अध्यायांत परीक्षिज्जन्माचें, त्याच्या विष्णुरात, परीक्षित् इत्यादि नामकरणाचें वर्णन असून तें मात्र पंतांनीं बऱ्याच विस्तारानें म्हणजे १२ आर्यांत केलें आहे. येथें पंतांनीं काव्यसौंदर्यापेक्षां कथाभागाकडे अधिक लक्ष दिलें आहे. कारण परीक्षितीची हकीकत पुढील कथाभागास आवश्यक आहे. (१२). तेराव्या अध्यायांत विदुर तीर्थयात्रेहून येऊन धृतराष्ट्रास अरण्यांत घेऊन जातो; त्यामुळें युधिष्ठिर शोकमग्न झाला असतां त्रिकालज्ञ नारद त्याचें येऊन सांत्वन करतात व धृतराष्ट्रनिधनाचा पुढें घडून येणारा वृत्तांत सांगतात, वगैरे हकीकत आहे व आपल्या पौराणिक कथाप्रिय वृत्तीस अनुसरून पंतांनीं ती नेहमींच्या मानानें बऱ्याच विस्तारानें सांगितली आहे. (१३). यानंतर श्रीकृष्णनिधनाचा काल येतो, कलि प्रवृत्त होऊन सगळीकडे अशुभ चिन्हें व उत्पात दिसूं लागतात. युद्धिष्ठिर शोकाकुल होतो व सरतेशेवटीं अर्जुन येऊन भयंकर निस्तेज व फटफटीत चेहेऱ्यानें ती सर्वनाशाची हकीकत सांगतो. परीक्षितीस हस्तिनापुरीं व वज्रास इंद्रप्रस्थीं राज्यावर बसवून पांडव महाप्रस्थानास जातात. (१४, १५.) ही हकीकत पंतांनीं आपल्या नेहमींच्या धावत्या पद्धतीनें १६ आर्यांत (मूळ श्लोक ९५) वर्णिली असून ती चांगली साधली आहे. नगरांत दिसणाऱ्या अशुभ चिन्हांचें पंत अलंकारमय वाणीनें वर्णन करतात:—

वार्ता नकळे कांहीं दुष्ट व्यवहार आयके पाहे ।
बा, हे विपरीता क्षिति असतीसी नवनवा गुणा बाहे ॥ (उपमा) ७३ ॥

कृष्णनिधनानें पांडवांस अत्यंत दुःख झालें व कुंतीनें तर दुःखानें प्राण सोडला ! तेथें विस्तार न करण्याबद्दल पंत सबब सांगतात.—

वदले हा ! माद्रीसुत, बहु दीनचि धर्म भीम गमला हो ।
शोकें मरे पृथा, कां तद्विस्तर दे न भी मग मला हो ॥ ८२ ॥

अर्थात् ही केवळ चातुर्याची एक कोटि होय. खरोखरच पंतांस भीति वाटून त्यांची लेखणी स्तब्ध झाली असें कोणी म्हणणार नाहीं.

१०. यानंतर शेवटल्या चार अध्यायांत परीक्षितीचें चरित्र आलें आहे. त्याच्या राज्यांत कलीचा कसा प्रादुर्भाव व्हावयाला लागला व तो दृष्टोत्पत्तीस आल्यानंतर परीक्षितीनें कलीचें दमन करून त्यास आपल्या राज्यांतून हद्दपार करून लावलें पण

त्याचा वध कां केला नाहीं वगैरे गोष्टींचें वर्णन मुळांत गाईचें व शूद्राचें (पृथ्वी व कलि) रूपक योजून केलें आहे. व पंतांनींही तें तसेंच परंतु संक्षेपानें केलें आहे. पुढें परीक्षितीची मृगया, त्यानें शमीक ऋषीची, त्याच्या गळ्यांत मेलेला सर्प घालून केलेली थट्टा व त्या थट्टेचा शमीकपुत्र शृंगीनें शापाच्या रूपानें दिलेला घोर मोबदला, वगैरे सर्व गोष्टी मोठ्या सुंदर रीतीनें मुळांत सांगितल्या आहेत. (१६-१८). पंतांनींहि त्या अगदीं थोडक्यांत म्हणजे १८ आर्यांत आणल्या आहेत. यानंतर एकोणिसाव्या अध्यायांत शाप झालेला कळल्यानंतर परीक्षितीला झालेली उपरति, त्यानें केलेला प्रायोप्रवेशनाचा निश्चय, गंगातीरीं प्रायोप्रवेशनार्थ आसन घालून बसल्यानंतर सभोंवार जमलेल्या ऋषींस निःश्रेयसाचा उपदेश करण्याबद्दल त्यानें केलेली प्रार्थना या गोष्टी आल्या आहेत, व सरतेशेवटीं त्या जमलेल्या ऋषिवर्यांच्या मेळ्यामध्यें शुकाचार्यांचें झालेलें आकस्मिक आगमन वर्णिलें असून परीक्षितीनें त्यांस केलेली प्रार्थना आली आहे (१९). मुळांत ४० श्लोक असलेल्या या अध्यायाप्रीत्यर्थ पंतांनीं १६ आर्या खरचल्या आहेत. ' देवनदीच्या तीरीं अनशनसंकल्प ' करून बसलेला तो परीक्षित् राजा ' जातों, म्हणे शरण मी हरिस, विषाग्नीस तूं शरीरा जा ॥ १०८ ॥ ' येथें तुल्ययोगिता अलंकार उत्कृष्ट साधला आहे. ऋषींची प्रार्थना करतांना त्यांच्या प्रभावाचें परीक्षितीनें केलेलें वर्णन—

हरितां गुहागत तुम्ही कवि रविहि न हरिल कोण अन्य तम ॥१११॥

येथें श्लेषयुक्त व्यतिरेक आहे. रवीदेखील गुहांच्या आंतलें तम (म्हणजे अंधार) नाहींसें करीत नाहीं परंतु तुम्हीं गुहागत (म्ह० हृदयांतील) तम (म्ह० अज्ञान) नाहींसें करतां असें वर्णन आहे. तसेंच परीक्षितीनें ऋषींसमोर बोलून दाखविलेली आपली अंतिम आकांक्षा —

गति भलती हो, श्रीमत्कृष्णयशोमृतनिधींत मज्जन हो ।
सत्संग घडो, मैत्री सर्वत्र तुम्हां नमोऽस्तु सज्जन हो ॥ ११५ ॥

ही आर्या वाचून ' सुसंगति सदा घडो ' इत्यादि केकावलींतील शेवटच्या तीन केकांचें कोणासही स्मरण होईल. ही आर्या म्हणजे त्या सुप्रसिद्ध श्लोकांची छोटीशी छबीच आहे.

११. याप्रमाणें पहिला स्कंध पंतांनीं वठविला आहे. मुळांत हा स्कंध काव्याच्या दृष्टीनें फार उत्कृष्ट व सुगम आहे. व पंतांनीं मंत्रभागवतांत भीष्मस्तुति, कुंतीची

प्रार्थना वगैरे मुळांतील कांहीं उत्कृष्ट भाग गाळले आहेत. तेव्हां मुळाच्या मनानें पंतकृति थोडीबहुत फिकी दिसल्यास नवल नाहीं. कांहीं झालें तरी मूळ भागवताचें तेजच अलौकिक आहे. शिवाय अत्तर एका कुपींतून दुसऱ्या कुपींत ओततांना जसा कांहीं सुगंध बाहेर जावयाचाच त्याप्रमाणें रूपांतर करतांनाही मुळांतील कांहीं रस नष्ट होणें अपरिहार्य आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. मंत्रभागवताच्या प्रथम स्कंधाबरोबरच नारदाभ्युदय व भीष्मभक्तिभाग्य हीं गोड प्रकरणें जर विचारांत घेतलीं तर सर्वांचें मूल्य एकदम पुष्कळच चढेल हीहि गोष्ट ध्यानांत धरणें अवश्य आहे.

[द्वितीय स्कंध]

१२. पहिल्या स्कंधाच्या शेवटीं, अंतकालीं मनुष्यास जें कांहीं श्रेयस्कर ज्ञान व कर्तव्यकर्म असेल तें आपण मला सांगा अशी पृच्छा परीक्षित् शुकाचार्यांस करतो व दुसऱ्या स्कंधाच्या प्रारंभापासून शुकाचार्यांचें उत्तर सुरू होतें. अर्थात् श्रीशुकप्रणीत भागवताला प्रारंभ खरा दुसऱ्या स्कंधापासूनच असून पहिला स्कंध केवळ प्रस्तावनारूप होय हें उघड आहे. असो. शुकाचार्यांनीं उत्तर द्यावयास आरंभ केला तो जरा व्याघ्रमुखानेंच केला. द्वितीय व तृतीय स्कंधांत शुकाचार्यांनीं बहुतेक सर्व वेदान्ताचें, तत्वज्ञानाचें व सृष्ट्युत्पत्तिस्थितिलयाचेंच वर्णन केलें आहे. प्रारंभीं ' माझ्या पित्यापासून जें भागवतपुराण मी पढलों तेंच तुला संशयनिवृत्त्यर्थ निवेदन करतों; ' असें म्हणून शुकाचार्यांनीं अंतकालीं साधकानें कशी ध्यानधारणा करावी तें सांगितलें आहे. नंतर ब्रह्मांडरूपी परमेश्वराच्या विराट्स्वरूपाचें वर्णन केलें आहे, व चराचर सृष्टीचे सर्व भाग परमेश्वराच्या अंगप्रत्यंगांचे ठायीं कसे स्थित आहेत तें सांगितलें आहे. (१). परमेश्वराचें विराट्स्वरूपवर्णन तर पंतांनीं अजीबात गाळलेंच आहे. इतर मजकुराचा मात्र ८ आर्यांत त्रोटक उल्लेख केला आहे.

१३. या विराट्स्वरूपवर्णनाविषयीं थोडेंसें लिहिणें आवश्यक आहे. सर्व विश्व हें परमेश्वराचें शरीर होय अशी कल्पना मूलभूत धरून ह्या विश्वांतील निरनिराळीं तत्वें व निरनिराळ्या वस्तु परमेश्वराच्या म्हणजे विराट्पुरुषाच्या निरनिराळ्या अवयवांच्या ठिकाणीं आहेत अशा तऱ्हेचें वर्णन करणारीं विराट्स्वरूपें भागवतांत

अनेक ठिकाणीं सांगितलेलीं आढळतात. कोठें कोठें हें विश्व सध्यां आहे तसेंच विराट्पुरुषाच्या ठिकाणीं कल्पून त्याच्या निरनिराळ्या अवयवांचें वर्णन केलेलें आढळतें. (याप्रमाणेंच वरील अध्यायांत वर्णन केलें आहे.) तर कोठें कोठें सृष्टीच्या उत्पत्तीची कल्पना त्याच्याशीं जोडून, परमात्म्यानें प्रथम हिरण्मय अंड उत्पन्न केलें, त्यांतून विराट्पुरुष उत्पन्न झाला व त्याच्या शरीराच्या ठिकाणीं विश्वांतील सर्व वस्तु व सर्व तत्वें आविर्भूत झालीं असें वर्णन करण्यांत येतें. कोठें कोठें या परंपरेमध्यें सांख्यतत्वांचा समावेश करण्यांत येऊन विराट्पुरुषापासून प्रकृति, प्रकृतीपासून महत्, महत्पासून अहंकार, अहंकारापासून मन व सत्वरजस्तमादि गुण व त्यांपासून सृष्टि अशा क्रमानें वर्णन करण्यांत येतें. केव्हां केव्हां, परमेश्वरानें पंचतन्मात्रें व पंचभूतें उत्पन्न केल्यानंतर त्यांच्यामध्यें एकमेकांमध्यें मिसळून जाऊन सृष्टि उत्पन्न करण्याची शक्ति येईना तेव्हां परमेश्वरानें आपल्या संकल्पानें विराट्पुरुष उत्पन्न केला व त्या पुरुषापासून अव्यक्त अथवा प्रकृति, प्रकृतीपासून महत्, त्याच्यापासून अहंकार उत्पन्न झाला; नंतर त्या अहंकाराचे वैकारिक, राजस व तामस असे तीन भाग होऊन ते, अमिश्र स्थितींत असलेलीं जीं पंचतन्मात्रें व पंचभूतें, त्यांच्याशीं संयुक्त झाले व अहंकाराशीं संयोग झाल्यानंतर त्यांच्यांत परस्पर संयुक्त होण्याचें व परिणाम पावण्याचें सामर्थ्य येऊन त्यांपासुन सृष्टि उत्पन्न झाली असेंही वर्णन आलें आहे. क्वचित् हिरण्मय अंडांतून नारायण नामक तत्व अथवा व्यक्ति उत्पन्न झाली व तिच्या शरीरापासून हें विश्व प्रादुर्भूत झालें असेंही वर्णिलें आहे. (पद्य; भा. स्कंध २ अ. ५, ६; भा. स्कंध ३अ. ६, ७; वगैरे). या सर्व तऱ्हेच्या विस्तीर्ण, व सृष्टीच्या उगमाशीं जाऊं पाहणाऱ्या कल्पना आपल्या पूर्वजांच्या व्यापक, अफाट व सूक्ष्म विवेचकबुद्धीची साक्ष पटवतात. या, ऋग्वेदांतील पुरुषसूक्त (मं. १०, सू. ९०), हिरण्यगर्भसूक्त, (मं. १०, सू. १२१) नासदीयसूक्त, (मं. १०, सू. १२९) वगैरे सूक्तांतून उगम पावलेल्या असून पुढें उपनिषदादि ग्रंथांतून विस्तार पावलेल्या आहेत हें उघड आहे. ऋग्वेदांतील पुरुषमेधाची कल्पनाही भागवतांत घेतलेली दिसून येते, (भा. स्कं. २ अ. ६). याशिवाय अगाध जलामध्यें शेषशायी भगवान् सुषुप्तावस्थेंतून किंचित् जागृतावस्थेंत आला असतां ' बहु स्याम् । प्रजायेय, ' ' सृष्टि उत्पन्न करावी, ' अशी त्याला इच्छा झाली, तेव्हां त्याच्या नाभींतून नालासहित कमळ उत्पन्न झालें व त्यांत ब्रह्मदेव निर्माण झाला. त्या सर्वलोक-

पितामहास आपण कोठें, कशासाठीं, केव्हां उत्पन्न झालों, आपलें कर्तव्य काय वगैरे गोष्टींचें प्रथम कांहीं आकलन होईना तेव्हां त्यानें शतसंवत्सरपर्यंत तपश्चर्या केली; त्या तपश्चर्येच्या अंतीं परमेश्वराचा अनुग्रह त्याच्यावर होऊन तो जगत् उत्पन्न करण्यास समर्थ झाला व त्यानें नंतर सर्व सृष्टि उत्पन्न केली.—अशा प्रकारचींही वर्णनें भागवतांत आहेत. (पहा; स्कं. ३ अ. ८,९.; स्कं. २ अ. ९; वगैरे.) सर्व भागवतभर असल्या तऱ्हेचीं वर्णनें मधून मधून येतातच; पण दुसरा व तिसरा स्कंध यांमध्यें तीं विशेष प्रामुख्यानें येतात; कारण या दोन स्कंधांत बहुतेक वेदांत व सृष्ट्युत्पत्तिविषयक तत्वज्ञान हेंच मुख्यत्वेंकरून सांगण्याचा भागवतकारांचा हेतु दिसतो. वेदांत या शब्दानें येथें साधकास आपल्या परमपुरुषार्थ प्राप्त करून घेण्याच्या इच्छेस उपकारक होईल अशा तऱ्हेचें धारणा, उपासना व भक्तियोग यांचें प्रतिपादन अशा तऱ्हेचा अर्थ घेतला आहे. अशा तऱ्हेचा साधकोपयोगी वेदांत हा वर सांगितलेल्या नानातऱ्हेच्या सृष्ट्युत्पत्तिविषयक सिद्धान्तांहून अगदीं भिन्न होय. सृष्ट्युत्पत्तिविषयक वर्णनें हीं बहुधा निरपेक्ष व या विश्वाच्या उत्पत्तीच्या गहन प्रश्नाविषयीं निरनिराळ्या तऱ्हेचे कसकसे सिद्धान्त रूढ आहेत याचें ज्ञान करून देण्याच्या उद्देशानें सांगितलेलीं असतात. व निरनिराळ्या ठिकाणीं त्यांचें स्वरूप अगदीं भिन्न तऱ्हेचें आढळतें. अनेक ठिकाणीं आढळणाऱ्या सृष्ट्युत्पत्तिविषयक कथांचा वर सारांश सांगितलाच आहे त्यावरून या गोष्टी किती भिन्न तऱ्हांनीं वर्णन केल्या आहेत हें लक्षांत येईल; पण साधकोपयोगी वेदान्त हा खरोखरच एकाद्या परमार्थपर साधकास उपयोगी पडण्याजोगा सांगितला असतो व तो भागवतांत सर्व ठिकाणीं एकाच स्वरूपाचा सांगितला आहे. कदाचित् किरकोळ बाबतींत कांहीं भिन्नता आढळेल पण साधकानें मुख्य आचरण्याचा जो भक्तियोग व तत्सिध्यर्थ करण्याच्या ज्या ध्यान, धारणा, उपासना, त्यांच्या वर्णनांत कोठेंही बदल व्हावयाचा नाहीं. आणि या बाबतींत सर्वत्र दिसून येणाऱ्या ऐक्यावरून कांहीं तरी विशिष्ट, व्यवहार्य, सर्वांस सुलभ व सामान्य मनुष्यांसमुद्धां प्रेममयतेनें व सद्भावानें लोभविणारें असें प्रतिपाद्य भागवताचें असल्याचा क्षणोक्षणीं भास होतो. व हा भक्तियोग भागवतकार जसा जास्त जास्त मनावर ठसवितात तसतसा तो सुलभ रीतीनें ठसत जाऊन जर कांहीं पूर्वकर्मार्जित सुकृत असेल तर मनुष्य भक्तिवश होऊन परमात्मपदीं लीन होतो.

१४. सृष्ट्युत्पत्तीचे सिद्धान्त व साधकोपयोगी वेदान्त या दोन्ही गोष्टींचा भागवतकारांच्या उद्दिष्ट हेतूंत समावेश होत असल्यामुळें भागवतांत जें ठिकठिकाणीं त्या तऱ्हेचें वर्णन आलें आहे तें सर्व युक्तच आहे; परंतु पंतांनीं आपल्या मंत्रभागवताची रचना मूळ भागवताहून निराळ्या तत्वांवर केली आहे हें आपण पाहिलेंच आहे. आत्मोन्नत्यर्थ श्रीकृष्णगुणानुवर्णन, कथाकथन व सुश्लिष्ट काव्य-निर्मिति हे उद्देश त्यांनीं डोळ्यापुढें ठेवल्याचें दिसून येतें. तत्वज्ञानाचें चर्वित-चर्वण हें या दृष्टीनें अगदीं अप्रस्तुत होय. अर्थातच त्यांनीं सृष्ट्युत्पत्तीचीं वर्णनें व भक्तियोगप्रतिपादक वेदान्त हे दोन्ही विषय बहुतेक सर्व ठिकाणीं गाळले आहेत. द्वितीय स्कंध बहुतेक वेदान्तमय व तत्वज्ञानमयच आहे. पहिल्या चार अध्यायांत शुकाचार्यांनीं साधकोपयोगी वेदान्ताचा विस्तार केला असून, कर्म-फलाचा निषेध, विरक्ति, भक्तियोग, सगुणोपासना, परमेश्वरमूर्तीचें ध्यान वगैरे गोष्टी सांगितल्या आहेत. दुसऱ्या अध्यायांत सद्योमुक्ति व क्रममुक्ति या मोक्षास पावलेल्या लोकांच्या दोन मार्गांचें वर्णनही त्यांनीं केलें आहे. पांचव्या अध्यायाचे आरंभीं नारदांनीं ब्रह्मदेवास परमात्मस्वरूपाविषयीं व सृष्ट्युत्पत्तिस्थिति-लयाच्या गूढ तत्वांविषयीं पृच्छा केली आहे. त्यानंतर ब्रह्मदेवाच्या सृष्ट्यु-त्पत्तिविषयक वर्णनास प्रारंभ झाला आहे. हें वर्णन पांचव्या व सहाव्या अध्यायभर पसरलेलें असून त्यांत सात्विक राजस तामस अशी तीन प्रकारची सृष्टि, विराट्पुरुषाची उत्पत्ति, वगैरे सर्व कांहीं आलें आहे. येथपर्यंतच्या सहा अध्यायांचे मुळांत २१६ श्लोक असून ते पंतांनीं फक्त ३८ आर्यांत आणले आहेत. प्रत्येक अध्यायांतील विषयांचा त्यांनीं अगदीं त्रोटक व निसटता उल्लेख केला असून मुळाच्या प्रत्येक अध्यायामध्यें काय काय प्रतिपादन केलें आहे याची वाचकाला स्पष्ट परंतु थोडक्यांत कल्पना यावी अशी योजना ठेवली आहे. पुढें सातव्या अध्यायांत ब्रह्मदेवानें परमेश्वराच्या चोवीस अवतारांचें वर्णन केलें आहे. या अवतारांचें मुळांत ३८ श्लोकांत वर्णन केलें असून पुढें ईश्वराची स्तुति आहे व परमेश्वराचें स्वरूप ज्यांनीं परमार्थतः जाणलें अशा परम-भक्तांची नामावलि शेवटीं दिली आहे. सर्व अध्यायाचे श्लोक ५३ आहेत. पंतांनीं याच अध्ययाचा विस्तार ६१ आर्यांइतका केला असून त्यांपैकीं ५३ आर्या चोवीस अवतारांच्या वर्णनार्थ खरचल्या आहेत. बाकीच्या ८ पैकीं १ प्रास्ताविक असून राहिलेल्या सातांमध्यें शेवटीं ईश्वरमहिम्याचें वर्णन आहे. चोवीस

अवतारांपैकीं बहुतेकांना मूळ भागवतांत एक एक, (क्वचित् दोन), श्लोक दिला असून रामावतारास ३, कृष्णावतारास १० याप्रमाणें जास्त श्लोक दिले आहेत. पंतांनींही रामावतारास ३ व कृष्णावतारास १४ आर्या दिल्या असून नारायणावतारास ५ व पृथ्ववतारास ४ याप्रमाणें जादा वांटणी केली आहे. मूळांतील वृत्त वसंततिलका हें जरा मोठें, व भागवतकारांची भाषा सूत्रमय असल्यानें पंतांस मुळाइतकाच अर्थ आणण्यास जास्त पद्यें घालावीं लागलीं आहेत. उदाहरणार्थ मुळामध्यें नरनारायणअवताराचें दोन श्लोकांत वर्णन केलें आहे; परंतु पंतांनीं त्याच्याकरितां पांच आर्या खरचल्या असून देखील मुळापेक्षां जास्त अर्थ त्यांना आणतां आलेला नाहीं. तथापि पंतांनीं मुळापेक्षां जास्त अर्थ कोठेंच घातलेला नाहीं असें मात्र नाहीं. ध्रुवावताराच्या एका श्लोकाचा अनुवाद पंतांनीं पांच आर्यांत केला आहे त्यांमध्यें पुष्कळच नवीन अर्थ त्यांनीं आपल्या पदरचा घातला आहे.

मूळ——विद्धः सपत्न्युदितपत्रिभिरन्ति राज्ञो
बालोऽपि सन्नुपगतस्तपसे वनानि
तस्मा अदाद्ध्रुवगतिं गृणते प्रसन्नो
दिव्याः स्तुवन्ति मुनयो यदुपर्यधस्तात् ॥ भा. २.७.८.

पंतकृति—तेजस्वी शिशुहि जनकनिकट दुजा आइनें उरीं विद्ध ।
शब्दशरांहीं करितां त्यजि गृह, होउनि तपोर्जना सिद्ध ॥ ५० ॥
बाळा स्वाराधनपथदर्शक सद्दर्शन प्रथम घडवी ।
नेउनि सिद्धक्षेत्रीं स्वध्यानीं तत्सुबुद्धिला जडवी ॥ ५१ ॥
सुखमूर्तिदर्शन निजस्तवनीं निपुणत्व पदहि दे वरि तें ।
जें परमर्षिजनमहित, नतकामित दे पडों न देव रितें ॥ ५२ ॥
देता झाला ध्रुवगति देव ध्रुवबालकासि अवतारी ।
तो भक्तवत्सल प्रभु दीना घडवूनि दास्यलव तारी ॥ ५३ ॥
वात्सल्य प्रभुचें बहु, बा, करुणेचा अगाध अर्णव तो ।
महिमा न सहस्रास्या मज चतुरास्यासि काय वर्णव तो ॥ ५४ ॥

हें ध्रुवावताराचें पंतकृत वर्णन मोठें सुंदर आहे. याच्या उलट मुळांतील पद्यास पद्य कायम ठेवावयाचें असलें म्हणजे पंतांना कसें गोळाबेरीज वर्णन करावें लागतें याचें उदाहरण —(व्यास अवतार)–

मूळ--कालेन मीलितधियामवमृश्य नृणां
स्तोकायुषां **स्वनिगमो बत दूरपारः ।**
आविर्हितस्त्व**नुयुगं** स हि **सत्यवत्यां**
वेदद्रुमं विटपशो विभजिष्यति स्म ॥ भा. २.७.३६.

पंतकृति--नष्टायु नष्टमति जे त्यांही याया निका मह व्यास ।
प्रभु आपण होइल, कीं आर्तत्राणीं निकाम हव्यास ॥ ८९ ॥

मुळांतील ज्या पदांचें भाषांतर पंतकृतींत आलें नाहीं तीं जाड ठशांत छापलीं आहेत. त्यावरून पंतकृति किती त्रोटक झाली आहे तें समजेल. मुळांतील वेद-विभागाचा उलेख टाळून पंतांनीं कांहींतरी गोळाबेरीज वर्णन केलें आहे.

सर्वांत प्रमुख जे रामकृष्णांचे अवतार त्यांचें वर्णनही चांगलें साधलें आहे. कृष्णावताराचें वर्णन तर भागवतकारांपेक्षां पंतांनीं अधिक सूक्ष्मपणानें केलें असून दशमस्कंधाचा सारांशच त्यांनीं येथें कथन केला आहे. परंतु बाकीच्या अवतारांचीं वर्णनें मात्र सरळ व प्रसन्न दिसत नाहींत. पंतांची आर्या येथें फिकट व नीरस वाटते. कांहीं आर्या तर (उदा० ४७, ५८, ६३; इ. इ.) अगदीं क्लिष्ट व पंतांच्या कीर्तीस न साजेशा म्हणून काढून दाखवितां येतील

१५. या अवतारवर्णनाच्या सातव्या अध्यायावर पंतांनीं **'अवतारमाला'** म्हणून एक स्वतंत्र प्रकरण रचलें आहे. मुळांतील आशय येथें पुष्कळच विस्तृत करून ३१० आर्याइतका पंतांनीं त्याचा वाढावा केला आहे. मुळांतला सातवा अध्याय फक्त ५३ श्लोकांचा आहे व त्यांत प्रत्येक अवताराचें अगदीं त्रोटक वर्णन केलें आहे. परंतु या सर्व चोवीस अवतारांच्या, भागवतामध्यें निरनिराळ्या स्कंधांत आलेल्या, साग्र कथांचा आधार घेऊन पंतांनीं आपली 'अवतारमाला' इतकी विस्तृत केली आहे. हर्यवतार (गजेंद्रमोक्ष), कूर्मावतार व मत्स्यावतार या तिघांच्या विस्तृत कथा आठव्या स्कंधांत आल्या आहेत. नृसिंहावतार सातव्यामध्यें, पृथ्ववतार चौथ्यामध्यें व ऋषभावतार पांचव्या स्कंधामध्यें वर्णन केला आहे. त्याचप्रमाणें वराहावतार, यज्ञावतार व कपिलावतार हे तिसऱ्या स्कंधांत विस्तृत वर्णिले आहेत हे ठिकठिकाणचे सविस्तर कथाभाग पंतांस करतलामलकवत् असल्यानें त्यांतील आशयाची भरती पंतांनीं आपल्या या प्रकरणांत केली आहे. या प्रकरणाच्या ३१० आर्यांपैकीं शेवटच्या २० आर्या ईशस्मरणपर आहेत. त्या सोडून दिल्या म्हणजे बाकीच्या २९० आर्यांत पंतांनीं २४ अवतारांचें वर्णन केलें आहे. पहिला यज्ञवराहावतार व राम, कृष्ण हे दोन प्रसिद्ध

अवतार यांखेरीज सर्व अवतारांचें वर्णन पंतांनीं बहुशः पांच पांच आर्यांत केलें आहे. यज्ञवराहावतार सर्व अवतारमालिकेंत पहिलाच म्हणून पंतांनीं त्यास १२ आर्या दिल्या आहेत. पण राम व कृष्ण या अवतारांचें वर्णन पंतांनीं खऱ्या विस्तारानें केलें आहे; आणि तें साहजिकच आहे. मुळांत रामचंद्रावताराचें फक्त ३ श्लोकांत वर्णन आहे, व कृष्णावताराकडे १० श्लोक दिले आहेत; हें भागवतकारांच्या कृष्णपरतेस अनुरूपच आहे. पण पंत हे रामभक्त होते तेव्हां त्यांनीं रामचंद्राच्या वर्णनास ११० आर्या दिल्या आहेत व कृष्णावताराचें ५५ आर्यांत वर्णन केलें आहे या अवतारमालेंतील वर्णनपद्धति वगैरे सामान्यच आहे. भीष्मभक्तिभाग्य, अंबरीषोपाख्यान, पृथुकोपाख्यान वगैरे प्रकरणांतली तन्मयता व रचनाकौशल्य येथें उतरलें असल्याचें दिसून येत नाहीं. काव्यस्फूर्ति झाली नसतांना, भवगद्गुणगानाची जी लालसा पंतांच्या मनांत नेहमीं वसत असे तिलाच केवळ वश होऊन पंतांनीं हें काव्य लिहिलें असावें असें वाटतें. शेवटच्या उपसंहारांत त्यांनीं नामस्मरणावर जो कटाक्ष ठेवला आहे त्यावरूनही हाच ग्रह दृढ होतो. 'पंतांचे मित्र जगन्नाथपंत यांच्या सांगण्यावरून पंतांनीं ही अवतारमाला लिहिली' असें पांगारकरांनीं म्हटले आहे (मो. च. पृ. ३९२) तें कशाच्या आधारानें हें कांहीं समजत नाहीं.

१६. मुळांतील अवतारवर्णनाच्या सातव्या अध्यायासंबंधीं येवढा विस्तार झाला. पुढें ८ व्या अध्यायांत परीक्षितीनें शुकाचार्यांना नानातऱ्हेचे कर्मकांडविषयक व तत्वज्ञानविषयक प्रश्न केले आहेत. तो अध्याय दोन आर्यांचा त्रोटक उल्लेख करून पंतांनीं गाळलाच आहे. पुढें नवव्या अध्यायांत, परमेश्वराच्या नाभिकमलांतून ब्रह्मदेव उत्पन्न झाला; उत्पन्न झाल्यावर आपण कोठें, कशासाठीं उत्पन्न झालों, आपलें कर्तव्य काय वगैरे गोष्टींचें त्याला मुळींच ज्ञान होईना; तेव्हां त्याला तप करण्याची प्रेरणा झाली; प्रेरणा होतांच त्यानें शंभर वर्षें तप केलें; नंतर त्यास भगवद्दर्शन झालें; ब्रह्मदेवानें आपल्या अज्ञानाची व निर्बळीपणाची स्थिति भगवंतांस निवेदन केली तेव्हां भगवंतांनीं त्यास चतुःश्लोकी भागवताचा उपदेश करून सृष्टि उत्पन्न करण्यास सांगितलें;—इतका कथाभाग आला आहे. हें जें भागवत भगवंतांनीं ब्रह्मदेवास सांगितलें तेंच ब्रह्मयानें नारदास, नारदानें व्यासांस व व्यासांनीं शुकाचार्यांस सांगितलें अशी भागवताची परंपराही येथें सांगितली आहे. (९). याप्रमाणें सर्व द्वादशस्कंधात्मक भागवताचें मूळ जें

चतुःश्लोकी भागवत तें यांत अंतर्भूत होत असल्यामुळें या अध्यायाचें महत्त्व फार मोठें आहे. जरी हा सृष्ट्युत्पत्तिविषयक असला तरी अतिशय सुंदर व काव्यमय आहे त्यामुळें काव्यसौंदर्यलोलुप अशा पंतांनीं तो न गाळतां १९ आर्यांमध्यें त्याचा सुंदर संक्षेप केला आहे. दहाव्या अध्यायांत, भागवतांत कोणकोणचे अध्यात्मविषय प्रतिपादिले आहेत त्यांची परिगणना केलेली आहे. तो पंतांनीं गाळलाच आहे. एवंच द्वितीय स्कंधांत अवतारवर्णनाचा ७ वा अध्याय व ब्रह्मदेवास भगवद्दर्शन झाल्याचा ९ वा अध्याय हे दोन खेरीज करून पंतांनीं सर्वत्र अतिसंक्षेप केला आहे. अ० ७ व ९ यांची मुळांत श्लोकसंख्या ९८ असून पंतांची आर्यासंख्या ८० आहे. पण बाकीच्या अध्यायांची मुळांतील श्लोकसंख्या २९३ असून पंतांनीं मात्र ते ४१ च आर्यांत आणले आहेत.

[तृतीय स्कंध]

१७. मूळ श्रीमद्भागवतामध्यें तृतीयस्कंध फार महत्त्वाचा आहे. यांत प्रारंभीं विदुराच्या तीर्थयात्रांचें वर्णन असून तो फिरत फिरत यमुनेच्या तीरीं आल्यानंतर उद्धवाची व त्याची भेट होते असें वर्णन आहे. पहिल्या चार अध्यायांत उद्धवविदुरांचा संवाद सर्व आलेला असून त्यांत श्रीकृष्णाचें अल्पचरित्र, श्रीकृष्णनिधन, यादवांचा नाश वगैरे हकीकती उद्धवानें विदुरास सांगितलेल्या आल्या आहेत. पुढें भक्तश्रेष्ठ उद्धव बदरिकाश्रमीं जाण्यास निघाला असतां विदुरानें त्याला विनंती केली कीं, योगेश्वर कृष्णानें जें आत्मस्वरूपबोधक ज्ञान तुला सांगितलें तें तूं मला सांग. उद्धवानें मैत्रेय ऋषींवर हवाला दिला व तो स्वतः बदरिकाश्रमीं गेला. पुढें परम जिज्ञासु असा विदुर गंगातीरीं हरिद्वार येथें मैत्रेयांकडे गेला. (१–४). पांचव्या अध्यायापासून विदुरमैत्रेयांच्या संवादास सुरवात झाली असून हा तिसऱ्या व चौथ्या, दोन्ही स्कंधभर चालू राहातो. विदुर हा प्रष्टा असून मैत्रेय ऋषि विदुरास सर्व प्रकारचें ज्ञान सांगतात. या ज्ञानाचा पहिला हप्ता अ. ५ ते ७ यांत आला आहे. परमेश्वरानें प्रथम महदादिक तत्वें व त्यांच्या अभिमानी देवता उत्पन्न केल्या. परंतु संघशक्तीच्या अभावामुळें त्या सृष्टीची उत्पत्ति करण्यास समर्थ झाल्या नाहींत; व त्यांनीं परमेश्वराची स्तुति केली. तेव्हां परमेश्वरानें त्या तेवीस तत्वांच्या समुदायांत प्रवेश केला व त्यांत चलन उत्पन्न

करून त्यांच्या अंशांपासून विराट्पुरुष उत्पन्न केला. त्या विराट्पुरुषाचे ठायीं सर्व सृष्टि प्रादुर्भूत झाली. (५–७). पुढें विदुरानें आणखी प्रश्न केला असतां, " भगवान् शेषापासून सांख्यायनऋषींना, सांख्यायनांपासून पराशरांना व पराशरापासून मला जें भागवतपुराण ऐकण्यास मिळालें तें मी तुला सांगतों," अशी आपली पूर्वपीठिका कथन करून परमेश्वराच्या नाभिकमलांतून उत्पन्न झालेल्या ब्रह्मदेवानें कसकशी सृष्ट्युत्पत्तीस सुरवात केली तें मैत्रेयऋषि सांगते झाले. (८–९). पुढें १० १२ अध्यायांपर्यंत याच ब्रह्मदेवाच्या सृष्ट्युत्पत्तीचें वर्णन असून कालमान, आयुर्गणना वगैरे गोष्टीही कशा उत्पन्न होऊन चालू झाल्या त्याचें वर्णन आलें आहे. बाराव्या अध्यायाच्या शेवटीं स्वायंभुव मनु व शतरूपा या प्राथमिक जोडप्याचें वर्णन आहे. मनूला राहाण्यास व राज्य करण्यास पृथ्वी पाहिजे होती म्हणून जलांत बुडालेली पृथ्वी वर काढण्याकरितां श्रीविष्णूनें यज्ञवराहाचा अवतार घेतला. या अवताराचें वर्णन, हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु या दैत्यांची उत्पत्ति, वराहाचें हिरण्याक्षाशीं झालेलें युद्ध, हिरण्याक्षाचा वध, पृथ्वीचा उद्धार, वगैरे गोष्टींचें वर्णन १३ ते १९ या सात अध्यायांत आहे. पुढें ब्रह्मदेवानें निरनिराळीं शरीरें धारण केलीं व त्यापासून सात्विक, राजस, तामस वगैरे सृष्टि उत्पन्न झाली त्याचें वर्णन २० व्या अध्यायांत आहे. यानंतर कथाप्रिय लोकांस पसंत होण्याजोगें कर्दमदेवहूतीचें आख्यान २१ ते २४ अध्यायांत आलें आहे. पत्नीप्राप्तीसाठीं कर्दमऋषि घोर तपश्चर्या करितात. त्यांस भगवद्दर्शन व इष्टवरप्राप्ति होते व लगेच स्वायंभुव मनूचें त्यांजकडे आगमन होऊन मनु आपली कन्या देवहूति कर्दमऋषींस अर्पण करतो. याप्रमाणें कपिलावताराच्या उत्पत्तीची योजना सिद्ध होते. दीर्घकालपर्यंत खडतर व्रताचें आचरण केल्यानंतर देवहूतीची भोगविलासविषयींची उत्सुकता पाहून, कर्दमऋषींनीं योगसिद्धीनें सर्व तऱ्हेच्या विलाससामग्रीनें परिपूर्ण असें अद्भुत विमान उत्पन्न केलें; व त्या विमानामध्यें वसति करून शेंकडों वर्षें देवहूतीसह विहार केला. नंतर देवहूतीपासून नऊ कन्यांची उत्पत्ति व शेवटीं महर्षि कपिलाचें जन्म वगैरे हकीकत आली आहे. (२१–२४). पंचविसाव्यांत देवहूतीनें ज्ञानप्राप्त्यर्थ आपला पुत्र कपिल यास विनवणी केलेली असून कपिलाचा आपल्या मातेस वेदान्तोपदेश त्याच अध्यायांत सुरू होतो. हा अत्यंत महत्त्वाचा, भागवताच्या प्रतिपाद्याचा सारभूत असा उपदेश बत्तिसाव्या अध्यायापर्यंत एकसारखा चालू असून त्यांत सांख्यांच्या सव्वीस तत्वांचें

वर्णन, सृष्ट्युत्पत्तीचे सिद्धान्त व साधकास उपयोगी असे वैराग्य, भक्तियोग, सगुणोपासना, ईश्वराच्या ध्यानाचें वर्णन वगैरे विषय आले आहेत. (२५-३२). तेहतिसाव्या अध्यायांत देवहूतीचें निर्याण वर्णिलेलें असून स्कंधसमाप्ति झाली आहे. याप्रमाणें या स्कंधांत प्रारंभीं ५ ते १२ अध्यायांत सृष्ट्युत्पत्तीचें तत्वज्ञान वर्णिलें असून पुढें २५ ते ३२ अध्यायांत कपिलाचा वेदान्तोपदेश सांगितला असल्यानें भागवताच्या प्रतिपाद्याच्या दृष्टीनें हा स्कंध फार महत्त्वाचा झाला आहे. अकराव्या स्कंधांत भक्तश्रेष्ठ उद्धवास श्रीकृष्णांनीं केलेल्या उपदेशाप्रमाणेंच हा कपिल महर्षींनीं आपल्या मुमुक्षु मातेस सांगितलेला सांख्ययोग अतिशय महत्त्वाचा आहे. वेदान्ताच्या कांथ्याकूटांत आपल्याला येथें शिरावयाचें नाहीं. तथापि भागवतांत या ठिकाणीं व इतर अनेक ठिकाणीं प्रतिपादिलेला सांख्यवेदान्त सांख्य कारिकांतील मतांशीं, त्याचप्रमाणें महाभारतांत जें सांख्यतत्वांचें प्रतिपादन आलें आहे त्याच्याशीं व शंकराचार्यादिकांनीं ज्या सांख्याचें खंडन केलें आहे त्याच्याशीं कितपत सुसंगत आहे व कोणच्या बाबतींत भिन्न आहे वगैरे गोष्टी अवश्य पाहण्यासारख्या आहेत. त्यामुळें पुष्कळ अनिर्णीत गोष्टींवर, कदाचित् भागवताच्या रचनाकालावरही, कांहीं प्रकाश पडण्याजोगा आहे. भागवतकार हे अर्थात् सेश्वर सांख्यवादी आहेत हें येथें नमूद करण्याजोगें आहे.

१८. याप्रमाणें मूळ भागवतांतील विषयाच्या दृष्टीनें तिसरा स्कंध जरी कितीही महत्त्वाचा असला तरी पंतांनीं त्याला तितकें महत्त्व दिलेलें नाहीं असें आपणास दिसून येतें. मुळांतील १४११ श्लोकांचा स्कंध त्यांनीं केवळ १३२ आर्यांत आणला आहे म्हणजे मुळाचा एक अकरांशाइतका आश्चर्यकारक संक्षेप त्यांनीं येथें करून दाखविला आहे. शिवाय या स्कंधांतील कथाभागावर एकही स्फुट आख्यान पंतांनीं लिहिलेलें नाहीं हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. या सर्व गोष्टी पंतांनीं आपल्या मंत्रभागवतास जें धोरण आखून घेतलें आहे व जे उद्दिष्ट हेतु पुढें ठेवले आहेत त्यांना सुसंगतच आहेत हें सहज ध्यानांत येईल. पंतांना जाणूनबुजून तत्वज्ञान व भक्तियोगाचें साधकास उपयोगी असें प्रतिपादन टाळावयाचें होतें. तेव्हां त्यांनीं अशा वेदान्तप्रचुर स्कंधाचा अतिसंक्षेप केला असल्यास नवल नाहीं. या स्कंधांत ज्या ज्या अध्यायांत वेदान्त व सृष्ट्युत्पत्तिवर्णन आलें आहे तेच अध्याय नेमके निवडून काढल्यासारखें पंतांनीं त्यांजकडे कसें दुर्लक्ष केलें आहे व बाकीचा कथामय भाग कसा विस्तारानें वर्णिला आहे हें पुढील आंकड्यांवरून दिसून येईल.

अध्याय.	प्रतिपाद्य विषय.	मंत्रभागवतांतील आर्यासंख्या.	दर अध्यायास पंतांच्या आर्यांचें पडणारें प्रमाण.
१ ते ४.	उद्धवविदुरसंवाद. श्रीकृष्णनिधनकथन....	३०	७½.
५ ते १२	**तत्वज्ञान. सृष्टीची उत्पत्ति इ० ...**	**११**	**१⅜.**
१३ ते १९.	यज्ञवराहावतार हिरण्याक्षाची उत्पत्ति व वध.	४७	७.
२०.	**ब्रह्मदेवापासून प्रजांची उत्पत्ति...**	**०**	**०.**
२१ ते २४.	कर्दमदेवहूतीचें आख्यान कपिलाचें जन्म.	३५	९.
२५ ते ३२.	**सांख्यतत्वज्ञान, भक्तियोग यांचें प्रतिपादन.**	**४**	**½**
३३.	देवहूतीचें निर्याण वगैरे.	५	५.

यावरून वेदान्तानें व्यापलेल्या ५ ते १२, २० व २५ ते ३२ या अध्यायांत मोरोपंतांच्या आर्यांचें प्रमाण किती कमी पडतें व बाकीच्या कथामय अध्यायांत तें कसें एकदम वाढून ७, ७॥, ९ पर्यंत जातें हें चटकन लक्षांत येईल वेदान्तमय अध्याय पंतांनीं गाळल्यासारखेच केले आहेत त्यांतही प्रत्यक्ष वेदान्ताचें विवरण अजीबात गाळलें असून प्रष्टा व श्रोता यांचीं परस्पर अभिनंदनपर प्रश्नोत्तरें, तत्वज्ञानाची पूर्वपीठिका वगैरे अवांतर गोष्टींनींच सर्व जागा अडवून टाकली आहे. (उदा० आर्या ३१ ते ३७ पहा.) प्रथमारंभींचीं उद्धवविदुरांचीं प्रश्नोत्तरें, विदुरतीर्थयात्रा, त्यानंतर यज्ञवराहाचें कथानक हीं पंतांनीं आपल्या नेहमींच्या सुंदर धांवत्या पद्धतीनें वर्णिलीं आहेत. त्याचप्रमाणें सनत्कुमारांच्या शापानें पदभ्रष्ट झालेल्या जयविजयांचा हिरण्यकशिपु व हिरण्याक्ष दैत्यांच्या रूपानें दितीच्या उदरीं जन्म झाला ती कथाही बऱ्याच विस्तारानें सांगितली आहे. कर्दमदेवहूतीचें आख्यानही योग्यरीतीनें थोडक्यांत, परंतु मुळांतील सौंदर्य न सोडतां आणलें आहे.

१९. धृतराष्ट्रगृहीं दुर्योधनानें अपमान केल्यानंतर विदुर तीर्थयात्रेस जातो. प्रभासक्षेत्रीं त्याला कौरवक्षयवार्ता कळते, नंतर तेथून तो यमुनातीरीं गेला असतां उद्धवाची व त्याची गांठ पडते. त्यावेळेस श्रीकृष्णाचें निधन झालें होतें. उद्धवास त्यानें अजाणतेपणीं श्रीकृष्णाची व यादवांची वार्ता विचारली असतां उद्धवाचा कंठ दाटून येतो; त्याच्यानें कांहीं बोलवत नाहीं, तथापि तो कशीतरी बोलण्यास सुरवात करतो. या प्रसंगाचें वर्णन पंतांनीं फार सहृदयतेनें केलें आहे.

देवाचें सेवटिल प्रेमळभक्तासि वृत्त नच कथवे ।
अप्रिय वदतां देती दुःखाचे सज्जनास वचक थवे ॥ २० ॥
बाष्प गळां बहु दाटे, फाटे उर सांगतां, तथापि कसा ।
न वदेल ? विस्तर वदे स्ववसंतवियोगविषकथा पिकसा ॥ २१ ॥

पहिल्या आर्येंत अर्थांतरन्यास व दुसऱ्यांत उपमा हे अलंकार सहज आलेले फार शोभादायक होत असून एकंदर वर्णनच फार करुण व कोमल असें केलें आहे. मुळांतही उद्धवाच्या या प्रसंगींच्या प्रेमनिर्भर स्थितीचें अत्यंत प्रेमळ पण अगदीं निराळ्या तऱ्हेचें वर्णन केलें आहे. त्यांत बाललीलेंतही उद्धवाचें कृष्णाविषयींचें अनुपम प्रेम कसें प्रकट होत असे याचा उल्लेख फारच मनोहर रीतीनें केला आहे.

यः पंचहायनो मात्रा प्रातराशाय याचितः ।
तन्नैच्छद्रचयन्यस्य सपर्यां बाललीलया ॥
स कथं सेवया तस्य कालेन जरसं गतः ।
पृष्टो वार्तां प्रतिब्रूयाद्भर्तुः पादावनुस्मरन् ॥
स मुहूर्तमभूत्तूष्णीं कृष्णांघ्रिसुधया भृशम् ।
तीव्रेण भक्तियोगेन निमग्नः साधुनिर्वृतः ॥ भा. ३.२.२,३,४.

या उदाहरणावरून प्रसंगविशेषीं मुळांतील व पंतकृतींतील वर्णनें किती निरनिराळ्या तऱ्हेचीं परंतु आपआपल्या तऱ्हेनें उत्कृष्ट असतात याची कल्पना येईल. उद्धव शोकमग्न झाला येवढ्या एकाच कल्पनेवर दोघांनीं अगदीं निरनिराळ्या तऱ्हेचें काव्य रचलें आहे. पुढें वराहावताराच्या कथानकांत हिरण्याक्षास मारून यज्ञवराह जेव्हां वर येतो तेव्हां त्याचें वर्णनः—

वधुनि तया ये त्याच्या घनरक्तें सर्व वदन सरबटुनी ।
अवगाहिलें सुकविनीं सुयश जसें स्वगुरुसदनसर बटुनीं ॥ ४९ ॥

शेवटच्या चरणांतलि उपमा मोठी विनोदपर व समर्पक आहे. 'जयविजयांना शाप दिला हें आपण योग्यच केलें,' असें विष्णूनें सनत्कुमारांना म्हटलें.—

मोटा अपराध इहीं प्रभुनीं यां योग्य दंड हा केला ।
योग्य प्रतिक्रिया हे, नभ दे अनुरूप हाक हाकेला ॥ ६८ ॥

वातावरणांतून मिळणाऱ्या अनुरूप प्रतिध्वनीचा दृष्टान्त येथें अत्यंत उचित व हृद्य आहे. हिरण्याक्षाच्या जलक्रीडेचें वर्णनः—

तेजस्वी कनकाक्ष क्रीडे निःशंक अर्णवामाजी ।
जाणों लहरींस म्हणे, ' कीर्तिच वर्णूनि वर्णवा माजी ' ॥ ८३ ॥

ही आर्या अतिशयच सुंदर आहे. निःशंक या एका शब्दानें हिरण्याक्षाची निर्भय, उद्दाम व बेफिकिरीची वृत्ति उत्कृष्ट व्यक्त केली आहे. उत्तरार्धांतील कल्पना तर बहारीचीच आहे. पाण्यावरील लहरी एकापुढें एक अशा उमटत जातात. मागची जेथें लुप्त होते तेथेंच तिचाच वेग घेऊन पुढची उत्पन्न होते. व अशा लहरी एकापुढें एक सर्व बाजूंनीं पसरत जातात. या साध्या निसर्गांत दिसून येणाऱ्या व्यापारावर पंतांनीं येथें हृद्य उत्प्रेक्षा केली आहे. लाटांचा सळसळ असा शब्द होत असल्यामुळें त्यांना कीर्ति वर्णन करावयास सांगणें याच्यामध्यें औचित्य दिसून येतें. मागच्या लाटेची शक्ति घेऊन पुढची उत्पन्न होते हा नैसर्गिक क्रम लक्षांत घेतला असतां ' तुम्ही स्वतः कीर्ति वर्णन करून तीच क्रिया पुढच्यांकडून-ही करवा ' असा आदेश लाटांना करणें किती समर्पक आहे हें सहज लक्षांत येईल. पुनः, लाटा अत्यंत दूरवर, जलाशयाच्या सीमेपर्यंत सर्व दिशांना पसरत जातात; तेव्हां लाटांबरोबर कीर्तीही अशीच दूरवर पसरत जाईल असा इष्ट अर्थ येथें सुंदर रीतीनें ध्वनित होतो. पंतांनीं येथें अत्यंत हृद्य असा कल्पनाविलास प्रकट केला आहे. निसर्गाचें इतकें मार्मिक निरीक्षण व त्याचा काव्यांत हृदयंगम उपयोग महाकवींसच साध्य होय यांत शंका नाहीं.

कर्दमदेवहूतीच्या कथेमध्यें देवहूतीची दृढ निष्ठा व पतिसेवातत्परता पाहून कर्दमऋषींनीं आपण होऊन तिला वर मागावयास सांगितलें तेव्हां पतीच्या वैराग्यानें व व्रताचरणानें भिऊन गेलेली संसारसुख इच्छिणारी ती–

यमनियमवती प्रार्थी पूजाया पुरुष अनव संतानें ।
' स्वकलत्र शोभवावें त्वां प्रभुनें जेंवि वन वसंतानें ॥ ९९ ॥
मोकलिलें आपण हें स्पष्ट विरक्तिस मनांत वाटावें ।
बहु शांतिच्याहि कंठीं बाष्पें, कल्पूनि विरह दाटावें ' ॥१०१॥

हेंही सुंदर ध्वनिकाव्य आहे. दुसऱ्या आर्येत पर्यायोक्त अलंकाराचा अवलंब करून पंतांनीं फारच खुबीदार वर्णन केलें आहे. विरक्ति व शांति या जणूं देवहूती-च्या सवती. 'त्या दोघींचा आपण त्याग करावा (अर्थात् भोगविलासांचा अंगीकार करावा), व त्यांना विरहाचें दुःख कसें असतें याचा चांगला अनुभव घडवावा.' अशा तऱ्हेची विनंति देवहूतीसारख्या उत्सुक स्त्रीच्या तोंडीं फार शोभते यांत संशय नाहीं.

अशा मधुनमधून आढळणाऱ्या सुरम्य वनःस्थलींखेरीज प्रस्तुत स्कंधांतील बाकीचा प्रदेश साधारणच आहे. आणि त्यावरून पंतांची गाडी अत्यंत द्रुतगतीनें धावत असल्यामुळें त्याचें बारकाईनें निरीक्षण करण्यास सवडही मिळण्यासारखी नाहीं.

[चतुर्थ स्कंध]

२०. तृतीय स्कंधाप्रमाणें चतुर्थ स्कंध वेदान्तप्रचुर नाहीं. याच्यांत मुख्यतः स्वायंभुव मनूचा पहिला मुलगा जो उत्तानपाद त्याचा वंश सांगितला आहे. आमच्यांतल्या आबालवृद्धांसही ज्याची कथा परिचित आहे व आमच्या जुन्या कवींनींही ज्याच्या कथेचें शतशः गायन केलें आहे तो ध्रुवबालक या उत्तानपादाचा तनय होय. त्याची कथा अर्थात् याच स्कंधांत आली आहे. याप्रमाणें हा स्कंध बहुतेक कथाभागानें व्यापलेला असल्याकारणानें यांत पंतांनीं मंडूकप्लुतीचा प्रकार कोठें केलेला नाहीं. इतर स्कंधांत जेथें वेदान्तमय भाग असतो तेथें त्यास फारसा स्पर्श न करितां पंत बहुधा त्याच्यावरून उडी मारून जातात. येथें वेदान्ताच्या बहुतेक अभावामुळें त्यांस तसें करण्याचें कारणच पडलें नाहीं. तथापि अध्याय २५ ते २९ पर्यंत जें वेदान्तमय रूपक आलें आहे त्याचा निर्देश मात्र करून त्यांनीं तें गाळलेंच आहे शिवाय निरनिराळ्या व्यक्तींनीं केलेल्या ईशस्तुत्या या स्कंधांत बऱ्याच आल्या आहेत; त्याही पंतांनीं गाळल्या आहेत. अशा रीतीनें गाळागाळ करून व मूळ कथाभागाचा संक्षेप करून पंतांनीं आपला चतुर्थस्कंध मुळापेक्षां ८॥ पटींनीं आकुंचित केला आहे मुळाची श्लोकसंख्या १४४५ असून पंतांची प्रतिकृति सारी १७६ आर्या आहे. तथापि मुळांतील कोणताही कथाभाग अजीबात सोडून न देतां पंतांनीं सर्व आशय इतक्या अल्प अवकाशांत, घोटाळा न करितां, अगदीं व्यवस्थित रीतीनें आणिला आहे! इतकेंच नव्हे तर त्याला काव्यकल्पनांचें मधुनमधून लेणें लेववून सजविलाही आहे.

२१. मुळामध्यें पहिल्या अध्यायांत स्वायंभुव मनूच्या दोन कन्या आकूति व प्रसूति यांचा वंशविस्तार सांगितला असून स्वायंभुव मनूची तिसरी मुलगी जी देवहूति तिच्या नऊ कन्यांचीही संतति वर्णन केली आहे. तो पंतांनीं सर्व व्यवस्थितपणें आपल्या काव्यांत आणला आहे (आर्या १ ते २७). पुढें अ. २ ते ७ पर्यंत स्वायंभुव मनूचा जावई व प्रसूतीचा पति जो दक्ष प्रजापति त्याच्या व शंक-

राच्या जंगी वैराची हकीकत आली आहे. दक्षाची मुलगी सती नांवाची शंकरास दिली होती. एके प्रसंगीं दक्षाला त्याच्या जामातानें म्हणजे शंकरानें योग्य उत्त्थापन दिलें नाहीं म्हणून श्वशुरांची स्वारी गरम झाली व भांडण सुरू झालें. या भांडणाच्या पायीं सतीनें आपला देहांत करून घेतला व त्यामुळें रागावून शंकरानें आपल्या जटेंतून 'वीरभद्र' नामक राक्षस उत्पन्न करून त्याजकरवीं दक्षाचा शिरश्च्छेद करविला. पुढें ब्रह्मदेवानें व इतर देवांनीं मनधरणी केल्यामुळें शांत होऊन शंकरानें दक्षास मनुष्याच्या मस्तकाऐवजीं बोकडाचें मस्तक देऊन जिवंत केलें. याप्रमाणें हें सासराजावयांचें भांडण मिटलें पण त्यांत मुलगी बिचारी मेली ती मेलीच. पुढच्या जन्मीं तिनें हिमालयाच्या पोटीं पार्वतीच्या रूपानें जन्म घेतला. हा सर्व मुळांतील २४० श्लोकांचा कथाभाग पंतांनीं ४८ आर्यांत सुंदर रीतीनें वर्णिला आहे. शंकर नको म्हणत असतां बाप आपला कांहीं तरी सत्कार करील या आशेनें सती दक्षाचा यज्ञ चालला होता तेथें गेली. परंतु,

भगवत्कथित समस्तहि जातांचि प्रत्यया तिच्या आलें ।
कीं होय तिचें दर्शन दुःसह शिवशत्रुलोचनीं आलें ॥ ४७ ॥

आल्याचा क्षुल्लक दृष्टान्त केवळ यमकाकरितां आणिलेला आहे तरी तो समर्पक व अर्थोत्कर्षकारक आहे. शिवद्वेषाबद्दल तिनें केलेली दक्षाची निर्भर्त्सना व दक्षासारख्या दुष्टापासून प्राप्त झालेल्या स्वशरीराचा धिक्कार फार जोरदार व सणसणीत आहे.

ते पाय सुमंगल तुज काय खळशिरोमणीस हातनया ।
हा ! तनया तव मी, हें वपु अघ, लावू महेश हात न या ॥ ५० ॥

नंतर तिनें 'हृदयीं शिवमूर्ति धरुनि' आपल्या शरीराचा योगाग्नीनें दाह करून टाकला. पुढें रुद्रजटोत्पन्न वीरभद्रानें दक्षाचा वध केला. तेव्हां सुरांसह ब्रह्मदेव दक्षाला उठवावें म्हणून कैलासीं शिवाकडे रदबदली करण्याकरितां गेले. या वजनदार शिष्टमंडळाला शंकरांनीं योग्य आश्वासन दिलें.

गरहि गिळायाचा जो प्रभु न गिळिल काय तदपराधा त्या ? ।
विधिस म्हणे, 'हा ईश्वर नच दंडी, मदचि मदपरा, धात्या !' ॥ ५८ ॥

'परमेश्वराची करुणा व क्षमाशीलता अपार आहे. मनुष्याला भोगावें लागणारें शासन हें सदोदित त्याच्याच दुर्गुणाचें फळ असतें.' हें उदात्त तत्व या आर्येंत किती सुंदर रीतीनें गोवलें आहे ! या दक्षयज्ञाच्या कथेवरील शिवमहिम्नांतला 'क्रियादक्षो दक्षः ...' इ० सुंदर श्लोक प्रसिद्धच आहे.

२२. दक्षाच्या कथेनंतर मनुपुत्र उत्तानपादाच्या वंशास आरंभ होतो; व आठव्या अध्यायापासूनच उत्तानपादाचा मुलगा ध्रुव याच्या कथेस सुरवात होते. ध्रुवाची कथा सर्वश्रुतच आहे, परंतु प्रचलित समजापेक्षां एकदोन ठिकाणीं मुळांतील कथेचें स्वरूप थोडेंसें भिन्न आहे. ध्रुव रागावून चालता झाल्यानंतर उत्तानपाद राजा त्याच्या मागून त्याची समजूत काढण्याकरितां गेला असें वर्णन सामान्यजनांत प्रचलित असलेलें आढळतें व कांहीं कवींनींही तसा उल्लेख केला आहे. पण भागवतास हें अभिप्रेत नाहीं. (कदाचित् पुराणांतरीं तसा उल्लेख असल्यास न कळे.) ध्रुव निघून गेला तो प्रथम बापास न कळतांच. व बापही त्याची समजूत काढण्याकरितां त्याच्या मागून कधीं गेला नाहीं. अर्थात्

फीर मागें देईन एक गांव । ध्रूव बोले देईल देवराव ॥
पांच गांवें दीधलीं फीर आतां । ध्रूव बोले मागेन जगन्नाथा ॥

अशा तऱ्हेच्या पितापुत्रांच्या संवादास मुळांत जागाच नाहीं. दुसरी गोष्ट, परमेश्वरस्वरूपाचें दर्शन झाल्यानंतर निश्चल स्थानाची प्राप्ति होऊन तेथेंच ध्रुवाचें चरित्र संपतें असें सामान्यतः समजण्यांत येतें. पण वस्तुतः ध्रुवाचें चरित्र सगळें त्याच्या पुढें व्हावयाचें असून छत्तीस हजार वर्षें सिंहासनावर बसून त्यास राज्य करावयाचें होतें. त्याच्या या दीर्घ कारकीर्दीचें व त्यानें केलेल्या युद्धाचेंही वर्णन भागवतांत आलें आहे; असो. या ध्रुवोपाख्यानाचे मुळांत पांच अध्याय (८–१२) असून श्लोक २६६ आहेत. पैकीं तपश्चर्या करून श्रीनारायणदर्शन होईपर्यंतचे १४९ श्लोक असून पुढील हकीकतीचे ११७ आहेत. पंत ध्रुवचरित्राचें वर्णन करितांना यांतील पूर्वार्धाला अतिशय महत्त्व देतात व उत्तरार्ध अगदीं त्रोटक रीतीनें वर्णितात. ध्रुवचरित्राचा पूर्वार्धच काव्यमय असून उत्तरार्ध युद्धादिकांच्या वर्णनांनीं भरलेला नीरस असा आहे. तेव्हां पंत उत्तरार्धाचा अतिसंक्षेप करतात हें त्यांच्या धोरणास अनुरूपच होय.

२३. पंतांनीं ध्रुवचरित्र दोनदां वर्णन केलें आहे. एकदां ' ध्रुवचरित्र ' नामक १०७ साक्यांच्या स्वतंत्र प्रकरणांत व दुसऱ्यांदा मंत्रभागवतांत. पैकीं मंत्रभागवतांतील वर्णन अगदीं त्रोटक, केवळ ३० आर्यांचें असूनही काव्यदृष्टीनें सुंदर वठलें आहे. बापानें मांडीवर बसूं दिलें नाहीं व सापत्नमाता टोंचून बोलली तेव्हां

रडत सुनीतिकडे जाय तिचा जो बहिश्चर प्राण ॥ ७२

मुलाची छळणूक व सपत्नीकृत अपमान ऐकून ध्रुवमाता

> वार्ता परिसुनि तेही रडली, बहु कांपली जसी कदली ।
> 'पदलीनासि पदप्रद हरिच' म्हणे 'बा खरेंच ती वदली' ॥ ७३॥

असें सुंदर व थोडक्यांत चित्र वठवणारें वर्णन मुळांत नाहीं. ध्रुवमातेचें भाषण तर पुष्कळच लांब आहे. पुढें ध्रुवानें भगवद्ध्यानपूर्वक प्राणनिरोध केल्यामुळें श्वासाचा अवरोध होऊन सर्व सृष्टि पीडित झाली.

> गडबडले बहु याच्या प्राणनिरोधें सुरादि चट सारे ।
> विदुरा, प्रपंच होऊं पाहे निश्चेष्ट चित्रपटसा रे ॥ ८१ ॥

इतकें झालें तेव्हां श्रीनारायण गरुडस्कंधावर बसून दर्शन देण्याकरितां पुढें येऊन उभे राहतात. पण ध्रुव डोळे उघडून बाहेर कशाला पाहतो आहे ! तो हृदयस्थ मूर्तीच्या चिंतनानंदांत गढून गेला होता. नारायणानें हृदयांतली मूर्तीच काढून घेऊन अंधार केला. तेव्हां

> सुटतां थान मुखींचें शिशुसा ध्रुव गडबडोनि जों पाहे ।
> तों जो ध्यानीं होता सुखमूर्ति तसाचि तो पुढें आहे ॥ ८५ ॥

येथील ध्रुवासारख्या लहान मुलाला शोभणारी सुंदर उपमा पंतांची आहे. ती मुळांत नाहीं. पुढें आनंदातिशयानें ध्रुवाला वाचा फुटेना ! तेव्हां

> बालमनोरथ पुरवी श्रुतिमयशंखें सिवोनि गल्ल हरी ।
> उठवी स्तुतिसूक्ति जसा अनिळ क्षीरार्णवांत सल्लहरी ॥ ८७ ॥

ही 'स्तुतिसूक्ति' अर्थात् आपल्या नेहमींच्या रिवाजास अनुसरून पंतांनीं गाळली आहे.

दुसरें साकीमय ध्रुवचरित्रही सुंदर साधलें आहे. यांतही नारदाचीं दोन तीन भाषणें अतिसांक्षिप्त केलीं असून ध्रुवानें केलेली 'योऽन्तः प्रविश्य मम वाचम्' इत्यादि स्तुति गाळलीच आहे. ही स्तुति तरी सबंध गाळायला नको होती असें पांगारकर म्हणतात. पण ईशस्तुति, मग ती कितीही सुंदर असो, गाळून टाकण्याचा पंतांचा प्रघातच आहे. असो. बाकी सर्व ध्रुवाचा कथाभाग श्रीनारायणदर्शनापर्यंतचा ७० साक्यांत वर्णिला असून पुढील ध्रुवानें यक्षाशीं केलेल्या युद्धाचा इतिहास वगैरे ३७ साक्यांत वर्णिला आहे. बहुधा वर्णन मुळास अगदीं धरून केलें असून कित्येक ठिकाणीं मुळांतील शब्द देखील वापरले आहेत. तथापि पुष्कळ ठिकाणीं संक्षेपही केला आहे. ध्रुव आईकडे रडत गेला त्याचें वर्णनः—

मूळ—मातुः सपत्न्याः सुदुरुक्तिविद्धः श्वसन्रुषा दंडहतो यथाहिः ।
हित्वा मिषन्तं पितरं सन्नवाचं जगाम मातुःप्ररुदन्सकाशम् ॥भा.४.८.१४.
पंतकृति—अहिसा खवळुनि मातेपाशीं तेथुनि रडताचि गेला । ध्रु. च. १२
येथें मुळांतील पहिला व तिसरा चरण सोडून देऊन दुसऱ्या व चवथ्या चरणाचा आशय फक्त साकीमध्यें आणला आहे. पुढें मातेचा विलाप—
मूळ—सोत्सृज्य धैर्यं विललाप शोकदावाग्निना दावलतेव बाला ।
वाक्यं सपत्न्याः स्मरती सरोजश्रिया दृशा बाष्पकलामुवाह ॥भा.४.८.१६.
पंतकृति—दवदहनांत लता तैसी ती बाला शोकीं पडली ।
आलिंगुनि बाळातें, सोडुनि धैर्यातें, बहु रडली ॥ ध्रु. च. १३.
येथेंही मुळांतील शेवटचे दोन चरण बहुतेक गाळलेच आहेत. पण पहिल्या दोन चरणांतील शब्द व उपमा देखील भाषांतरांत आणलीं आहेत. पुढें ध्रुव वैतागून अरण्यांत निघून गेला तेथें त्यास नारद भेटले.

संसृतिपारद परमविशारद भेटे श्रीनारद या ।
शारदयामवतींश चकोरीं, तेंवि करीं फार दया ॥ ध्रु. च. २५

पंतांच्या अनुप्रासाचें हें सुंदर उदाहरण आहे. परमेश्वर पुढें येऊन उभा राहिल्यानंतर ध्रुवाच्या हृदयांतली मूर्ति माहींशी झाली. तेव्हां

हृदयीं भगवन्मूर्ति न दिसतां पावे व्युत्थानातें ।
ध्रुव गडबडला चुकला शोधी बाळ जसा थानातें ॥ ध्रु. च. ५४
नेत्रें उघडी घाबरला तो ध्रुव सहसा जों पाहे ।
तों आंत जसी तसि बाहेर प्रभुमूर्ति उभी राहे ॥ ध्रु. च. ५५

या साक्या सुंदर आहेत, व स्तनाची आणि बाळकाची उपमाही समर्पक आहे. पण याच अर्थाची हुबेहूब पुनरुक्ति मंत्रभागवतांत झालेली आहे. (वर उद्धृत केलेली आर्या ८५ पहा). यानंतर ध्रुवानें केलेल्या स्तुतीचें तिन्हाईतपणानेंच पंतांनीं सुरेख वर्णन केलें आहे.

जागविली निजली होती त्या बाळाची जी वाचा ।
बोध दिला ऐसा लाजावा ज्या महिमा जीवाचा ॥ ५९ ॥
बालमुखींचीं जरि अव्यक्तें अक्षररूपें साधीं ।
केवळ अमृताचि होतीं वत्सल गुरुजनकर्णीं आधीं ॥ ६१ ॥
परमानुग्रह करुनि शिकविलें प्रभुनें भाषण मग तें ।
किति वर्णावें अमृत कसें हो त्या सूक्तिपुढें तगतें ॥ ६२ ॥

याप्रमाणें 'ध्रुवचरित्र' सुंदर वठलें आहे. परंतु पुढें येणाऱ्या साकीबद्ध अंबरीषाख्यानापेक्षां किंवा सुदामचरित्रापेक्षां काव्यगुणांत व प्रेमळपणांत हें जरा कमीच भरेल.

२४. ध्रुवकथेनंतर चतुर्थस्कंधांत त्याच्याच वंशांतील दुष्ट वेनराजाची कथा सांगितली आहे.

प्रकृति नव्हेचि तयाची बा जैसी धावदुरगतनु सरला ॥ ९८ ॥

म्हणून ऋषींनीं त्यास मारून त्याच्या बाहूचें मंथन करून पृथु नामक पुत्र उत्पन्न केला. हा ईश्वरावतार असून यानें गोरूप धारण केलेल्या पृथ्वीचें दोहन करून धान्यें, औषधि वगैरे क्षुधित प्रजांच्या पोषणाकरितां बाहेर काढल्या. हें वर्णन पंतांनीं मोठें ठसठशीत केलें आहे. पृथु राजा रागावून पृथ्वीस म्हणतो—

वासरुवा हि न पाजीं भूप म्हणे खाय यवस आंबोण ।
तीं दंडार्हाचि; अगे, लावावें मांदळ्यासि कां बोण ? ॥ ११७ ॥
सुजल्या अन्नाकरितां त्या आल्या मजकडे प्रजा मिळुन ।
विधिसृष्टौषधिबीजें, दुष्टे ! गेलीस तूं कसी गिळुन ? ॥ ११८ ॥

नंतर पृथु राजानें अश्वमेध करून इंद्रपद मिळविण्याचा संकल्प केला. शंभराव्या अश्वमेधास ढोंगी ऋषीचें रूप घेऊन इंद्रानें अनेकवार विघ्न केलें तेंव्हां दोघांचें मोठेंच वैर जुंपलें. पण ब्रह्मदेव व श्रीविष्णु यांनीं मध्यें पडून त्यांचा समेट करून दिला—

ते पृथु शक्र स्वांश प्रभुनें स्वकरें धरूनि भेटविले ।
अभिमान शमविला ज्या वातें दोघे दवाग्नि पेटविले ॥ १२७ ॥

यापुढें पृथूच्याच वंशांतील ' विश्वप्रख्यात ' प्राचीनबर्हि राजाचें कथानक आहे. हा मोठा कर्मकांडवादी व योगाभ्यासी होता. त्यास नारदानें पुरंजनाच्या गोष्टीच्या रूपानें वेदान्तोपदेश करून विरक्तिमार्गास लावलें. हें पुरंजनाचें रूपक मुळांत पांच अध्यायभर आलें असून (२५–२९) पंतांनीं त्याचा केवळ उल्लेख एका आर्येत करून तें गुंडाळून टाकलें आहे. प्राचीनबर्हीचे दहा मुलगे प्रचेते हे पित्याच्या आज्ञेवरून तप करण्यास जातात. तेथें त्यांस श्रीशंकर दर्शन देतात व ' विष्णुवशीकरणा ' चें लांबलचक गीत सांगून अंतर्धान पावतात. पुढें दहासहस्र वर्षेंपर्यंत तपश्चर्या करून प्रचेत्यांनीं विष्णूला प्रसन्न करून घेतल्यानंतर कंडु ऋषीची कन्या मारिषा हिच्याशीं विवाह करण्याची आज्ञा विष्णु त्यांना करतो. त्याप्रमाणें विवाह केल्यानंतर ती मारिषा ' दक्षातें प्रसवे, तो व्यापी निर्मुनि प्रजा जगतीं । ' नंतर

प्रचेते विरक्त होऊन नारदाचा उपदेश घेऊन मुक्त होतात. ही सर्व हकीकत पंतांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें संक्षेपानें परंतु सुंदर सांगितली आहे. (आर्या १५७ ते १७६).

२५. याप्रमाणें चवथा स्कंध साररूपानें पंतांनीं आपल्या भागवतांत उतरला आहे. मूळ भागवतांत हा स्कंध कांहीं विशेष रमणीय किंवा विशेष महत्त्वाचा असा नाहीं. तथापि पंतांनीं आपल्या संक्षेपकुशल वर्णनशैलीनें याचा सुंदर अनुवाद केला आहे. दशमशिवाय करून बाकी सर्व स्कंधामध्यें मुळांत हा चवथा स्कंधच मोठा आहे. परंतु पंतांनीं आपल्या मंत्रभागवतांत याला मोठेपणाचा मान मिळूं दिलेला नाहीं. मुळामध्यें याच्यापेक्षां लहान असलेला एकादशस्कंध किंबहुना येवढासा द्वादशस्कंध देखील पंतांनीं या स्कंधापेक्षां जास्त विस्तृत केला आहे. प्रस्तुत स्कंधांतलि पंतांची आर्या सुगम व प्रसादयुक्त आहे. हें विशेष रीतीनें येथें सांगण्याचें कारण येवढेंच कीं असा प्रसादपूर्ण ओघ पहिल्या व दुसऱ्या स्कंधांत सर्वत्र आढळत नाहीं. कांहीं ठिकाणीं तर (उ० द्वितीय स्कंध, ५४-६५ पहा) बरीचशी क्लिष्ट व नीरस रचना झाली आहे. तिसऱ्या स्कंधापासून आर्येचा ओघ निवळत जातो व यापुढें एकसारखें पंतांच्या आर्येचें सौंदर्य दशमस्कंधापर्यंत वाढतच असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें.

[पञ्चम स्कंध.]

२६. पंचमस्कंध तर पंतांनीं अगदींच त्रोटक केला आहे. चतुर्थस्कंधांत ज्याप्रमाणें उत्तानपादाच्या वंशाचा इतिहास सांगितला आहे त्याप्रमाणें पंचमस्कंधांत स्वायंभुव मनूचा दुसरा पुत्र जो प्रियव्रत त्याच्या वंशाची कथा सांगितली आहे. हा स्कंध २६ अध्यायांचा असून त्यांपैकीं पहिल्या पंधरा अध्यायांत प्रियव्रताच्या वंशजांचीं चरित्रें निवेदन केलीं आहेत. पुढें सोळाव्या अध्यायापासून सव्विसाव्या अध्यायापर्यंत चौदा भुवनांचें, स्वर्गनरकांचें, भुवनकोश, सप्तद्वीप वगैरेंचें वर्णन आहे. पंतांनीं हें सरतेशेवटचें दहा अध्यायांचें वर्णन अजीबात गाळलें आहे व फक्त प्रियव्रताच्या वंशाची हकीकत ५७ आर्यांत आटोपून पुढील ८।९ आर्यांत आपल्या संक्षेपप्रवृत्तीचें नानातऱ्हेनें समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे.

पृथ्वीवर ज्यानें सप्तद्वीपें व सप्तसमुद्र निर्माण केले त्या भगवद्भक्तिरत प्रियव्रत राजाची कथा मुळांत पहिल्याच अध्यायांत सांगितलेली पंतांनीं १९ आर्यांत वर्णन केली आहे. अतिशय उग्र तप केल्यानंतरही अप्सरेला पाहतांच तिच्यावर भाळून स्त्रैण बनलेला त्याचा पुत्र आग्नीध्र याची कथा त्याच्यापुढें थोडक्यांत सांगितली आहे. आग्नीध्राचा मुलगा नाभि व नाभीचा मुलगा ऋषभदेव हा होय. हा ऋषभदेव पृथ्वीवरील लोकांस योगमार्गाचा व जीवन्मुक्त स्थितीचा उपदेश करण्यासाठीं झालेला परमेश्वराचा अवतार होय. हा जेव्हां नाभिराजाच्या भार्येच्या पोटीं आला तेव्हां ती,

वाळे, बहु पुष्टि धरी भग कीं ती अमृत मूर्त सेवी तें ॥ २१ ॥

ऋषभदेवानें आपल्या मुलांस केलेला वेदान्तोपदेश मुळांत दोन तीन अध्यायांत वर्णिला आहे, पण पंतांनीं तो सर्व गाळला आहे. ऋषभदेवाचा पुत्र अतिविख्यात भरत हा होय. या भरतामुळेंच भारतवर्ष हें नांव या देशास प्राप्त झालें. तत्पूर्वी यास अजनाभवर्ष असें नांव होतें. रामचंद्राचा धाकटा भाऊ भरत किंवा दुष्यन्त शकुन्तला यांचा पुत्र सर्वदमन भरत यांजपासून भारतवर्ष हें नांव या देशास मिळालेलें नाहीं ही लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. भरताला ऐतिहासिक दृष्ट्या जें हें महत्व आहे तें जरी सोडून दिलें तरी त्याचें एकंदर चरित्रसुद्धां फार सुंदर व बोधप्रद आहे. दहा कोटि वर्षे राज्य केल्यानंतर भरत विरक्त होऊन आपला पुत्र सुमति याच्यावर राज्य सोपवून परमार्थ साधण्याकरितां पुलहाश्रमीं गेला. पण त्याच्या नशिबांत त्या जन्मीं तपश्चर्या व ईश्वरभक्ति लिहिलेली नव्हती. नदीकांठीं ईश्वराराधन करीत बसलेला असतां भरतास एकदां एक आईपोरकें मृगबालक सांपडलें आणि त्याचा कळवळा येऊन त्यानें त्याला स्वतःच्या आश्रमांत नेऊन वाढविलें. हळुहळू त्या हरिणशिशूवर त्याची इतकी प्रीति बसली कीं स्वप्नीं, आसनीं, शयनीं त्याला त्या हरिणशिशूचाच ध्यास लागला व ईश्वराराधना बाजूसच राहिली. मृगाच्या ध्यासामुळें भरत मेल्यानंतर पुढील जन्मीं मृगयोनींत जन्मास आला. मात्र गेल्या जन्मीं कांहीं दिवस हरिस्मरण घडल्यामुळें ईश्वराच्या प्रसादानें या जन्मांत देखील मागील जन्माची त्याला स्मृति होती. ती स्मृति असल्यामुळें या जन्मीं त्याला उपरति झाली व तो

ती हरिण तनु त्यजितां पावे सुब्राह्मणालयीं जनुतें ।
होती हरिप्रसादें स्मृति चुचकारीत धरुनियां हनुतें ॥ ३९ ॥

येथें पूर्वजन्मींच्या स्मृतीवर सचेतनत्वाचा आरोप सुंदर रीतीनें केला आहे. जडभरत या नावानें, एका विद्वान् ब्राह्मणाच्या कुलांत तो जन्मास आला. या जन्मांत मात्र कोणाचा संग न करितां केवल जडाप्रमाणें वागून त्यानें परमार्थाचा मार्ग चोखाळला व अंतीं तो सायुज्यपदास पावला. हा जडभरत धष्टपुष्ट असून नेहमीं वेडयासारखा वागत असे. एकदां सामान्य मजूर समजून त्याला रहूगण नामक सिंधुसौवीर देशाच्या राजाची पालखी वाहण्यास लाविलें होतें. त्याची योग्यता न समजून रहूगण त्याला पालखी नीट न वाहिल्याबद्दल दुरुत्तरें बोलला तरी त्यानें रहूगणाचा राग न धरितां त्याला अमृतोपम वाणीनें आत्मज्ञानाचा उपदेश केळा, व मुक्तिमार्गाला लाविलें. पंत म्हणतात—

> वाहे स्कंधीं, बाळ न जाणुनि भलतेंचि जरि वदे काय ।
> स्त्रसुखामृतें तयातें निववी, सत्पुरुष का नव्हे माय ॥ ५४ ॥

ही आर्या फारच सुंदर आहे. अनुमान अलंकारानें युक्त असें रूपक येथें साधलेलें असून रहूगणाला खांद्यावर वाहणाऱ्या सत्पुरुष जडभरताचें मुलाला खांद्यावर घेऊन वागविणाऱ्या मातेशीं साम्य फारच सहृदयतेनें वर्णन केलें आहे. मातेच्या साम्याची कल्पना मुळांत अर्थातच नाहीं. जडभरतानें रहूगणाला केलेला उपदेश व भवाटवीच्या रूपकाच्या द्वारें प्रतिपादिलेली संसाराची अनर्थकता वगैरे गोष्टी मुळांत बऱ्याच विस्तारानें वर्णिल्या आहेत. परंतु हा सर्व वेदान्त पंतांनीं आपल्या नेहमींच्या प्रवृत्तीस अनुसरून गाळला आहे. पुढें पंधराव्या अध्यायांत भरतराजाचा पुत्र जो सुमति त्याच्या वंशाचें वर्णन आहे.

२७. यापुढील सोळाव्या अध्यापासून सुरू होणारें भुवनकोशादिकांचें वर्णन पंतांनीं गाळलें आहे हें वर सांगितलेंच आहे. ही गाळागाळ पंतांनीं वस्तुतः आपल्या धोरणास अनुसरून हेतुपुरस्सरच केली आहे. पौराणिक तऱ्हेचीं सृष्टिवर्णनें वगैरे आपल्या ग्रंथांत आणून आपला ग्रंथ म्हणजे एक सर्वसंग्राहक बाड तयार व्हावें अशी त्यांची योजना नव्हती. अर्थात् केवळ पौराणिक तऱ्हेस अनुसरून जीं वर्णनें मुळांत आलीं आहेत, मग तीं कितीही मोठीं असोत, तीं गाळणें त्यांना प्राप्तच होतें. तथापि एकदम दहा अध्यायांइतका बराच मोठा भाग आपण गाळून टाकतों आहोंत हें वाचकांना चमत्कारिक वाटेल म्हणून त्यांनीं प्रत्येक विवक्षित गोष्ट गाळल्याबद्दल निरनिराळ्या सबबी सांगून वाचकांना भुलविण्याचा

थोडासा प्रयत्न केला आहे. पृथ्वीचें वर्णन गाळल्याबद्दल त्यांची सबब पहा.--

वसुधेवरील लोकालोकापर्यंत जे पदार्थ, तथा ।
गगनांत जे तयांची कथिली श्रीमच्छुकेंचि सांग कथा ।। ६० ।।
ते जरि पदार्थ इतरें वर्णावे, ग्रंथ बहु न कां वाढे ।
रसिकहि निरलस सादर साधु सदा स्वस्थ थोडके गाढे ॥ ६१ ॥

सप्त पाताळें वर्णन न करण्याबद्दल पंत सांगतात—

वानावीं पाताळें सप्त बळि श्री अनंत वानावे ।
परि मंत्रवर्ण अडविति, आदरिले गुरु कसे न मानावे ।। ६२ ॥

फक्त पाताळेंच वर्णन करितांना मंत्रवर्ण अडवीत होते काय ?

देवांच्या कीं गातीं तद्भक्तांच्या यशास नर कां तें ।
हर्षद सोडुनि वर्णू तापद जे त्या कशास नरकांतें ।। ६४ ।।

देवांच्या व भक्तांच्या यशास सोडून तापदायक नरकांचें मी कशास वर्णन करूं ? प्रत्येक गोष्टीबद्दल भिन्नभिन्न तऱ्हेनें सांगितलेल्या या सबबी मोठ्या मजेदार आहेत व त्या क्षणभर वाचकांस रिझवतात यांत शंका नाहीं. परंतु यापलीकडे, पंतांनीं आपल्या संक्षेपाचीं सर्व तत्त्वें त्यांत सांगितलेलीं आहेत असें मानतां येत नाहीं. पंत म्हणतात कीं इतर कोणी कांहीं म्हणो, श्रीहरि व सुज्ञ रसिक लोक तरी संक्षेप केल्याबद्दल माझा अव्हेर करणार नाहींत.

सुज्ञ समाज सुरसिक श्रीहरिच म्हणेल न लघु पृथु कांहीं ।
स्वल्पार्थस्कंधाहीं तृप्तचि होईल जेंवि पृथु कांहीं ।। ६३ ॥

श्रीहरि व सुज्ञ रसिक लोक यांचीच पर्वा पंतांना वाटत होती यावरूनही भगवद्यशोगान करावें व रसिकमान्य असें सुंदर आटोपशीर काव्य निर्माण करावें हेंच पंतांचे दोन मुख्य हेतु होते असें सूचित होतें.

[षष्ठ स्कंध]

२८. पंचमस्कंधाप्रमाणें षष्ठस्कंधांत कांहीं विशेष गाळण्यासारखा भाग पंतांस आढळला नाहीं. कारण तो कथामय आहे. आतां या कथांमध्यें मधुनमधून ज्या ईशस्तुत्या व लहान लहान वेदान्त प्रकरणें आलीं आहेत तीं पंतांनीं नेहमींप्रमाणें अतिसंक्षिप्त केलीं आहेतच; पण पंचमस्कंधांत ज्याप्रमाणें पौराणिक तऱ्हेचें स्वर्ग,

भूमि, पाताळांचें अध्यायचे अध्याय विस्तृत पसरलेलें वर्णन पंतांनीं अजीबात सोडून दिलेलें आहे असा प्रकार यांत कोठें केला नाहीं. म्हणूनच या स्कंधाची आर्यासंख्या १९८ झाली असून मंत्रभागवताच्या पहिल्या आठ स्कंधांमध्यें हा सर्वांत मोठा झाला आहे. रचनेची धाटणी नेहमींप्रमाणेंच असून भाषेचा धावता ओघ अस्खलित वहात आहे.

प्रारंभींच

नरपति म्हणे, 'शुकसुने, भ्यालों श्रवणाचि करुनि नरकास ।
वद तरतो कोणाची पापसमुद्रीं धरूनि नर कास ' ॥ १ ॥

असा परीक्षितीनें प्रश्न केल्यावरून शुकाचार्यांनीं अजामिळाची कथा सांगितली आहे, ही कथा पहिल्या चार अध्यायांत आली असून पंतांनीं ती ४४ आर्यांत वर्णिली आहे. पुढें प्राचेतस दक्ष प्रजापतीची हकीकत असून त्यानें दोनदा निर्मिलेले हजार हजार पुत्र नारदोपदेशानें विरक्त झाले हें पाहून त्यानें साठ कन्या उत्पन्न करून त्या धर्म, कश्यप वगैरेंस दिल्या व त्या कन्यांपासून पुढें सर्व सृष्टि उत्पन्न झाली वगैरे वृत्तांताचें वर्णन पुढील २५ आर्यांत केलेलें आहे. यापुढें लांबलचक वृत्राख्यानास प्रारंभ होतो. हें सातव्या अध्यायापासून तेराव्या अध्यायापर्यंत मुळांत वर्णिलेलें असून पंतांनीं तें ६७ आर्यांत वर्णन केलें आहे. (आर्या ६९–१३६) सर्व देव वृत्राच्या भयानें परमेश्वरास शरण जातात व तो त्यांना अभय देऊन वृत्रवधाचा उपाय सांगतो. दधीचि ऋषीपासून त्यांच्या अस्थि मिळवून त्या अस्थींचें वज्र करावें म्हणजे त्या वज्रानें वृत्र मारला जाईल अशी युक्ति शेषशायी भगवान् देवांस सांगतात. त्याप्रमाणें महास्वार्थत्यागी दधीचीकडून अस्थि घेऊन तन्निर्मित वज्राच्या योगानें इंद्र वृत्राला मारतो—याप्रमाणें मुळांत हकीकत आली आहे व पंतांनींही त्याचप्रमाणें वर्णन केली आहे. पण ब्रह्मोपदेश करणाऱ्या दधीचि ऋषीच्या अश्वशिर नामक स्वरूपाची हकीकत त्यांनीं मध्येंच आणली आहे. देवांचे वैद्य अश्विनीकुमार हे एकदां दधीचीकडे गेले व त्यांनीं त्याला ब्रह्माचा उपदेश करण्याची प्रार्थना केली. तेव्हां ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यास अश्विनीकुमार हे आपल्यापेक्षा वरचढ होतील अशा भयानें इंद्र दधीचीकडे आला व 'तुम्हीं जर अश्विनीकुमारांना ब्रह्मज्ञानाचा उपदेश कराल तर मी तुमचें शिर तोडून तुम्हांला ठार करीन ' अशी त्याला धमकी देऊन निघून गेला. यावर अश्विनीकुमारांनीं पुढील युक्ति काढली. प्रथमतःच दधीचि ऋषीचें मस्तक कापून त्या जागीं

घोड्याचें मस्तक लावावें व त्या मस्तकानेंच दधीची ऋषींनीं कुमारांना ज्ञान सांगावें; ज्ञान सांगतांच इंद्र येऊन तें मस्तक छाटून टाकील; तें छाटून टाकल्या-नंतर दधीचि ऋषींनीं पुन: आपलें पहिलें मानवाचें मस्तक धारण करावें; याप्रमाणें युक्ति योजून शेवटीं ती त्या गुरुशिष्यांनीं अमलांतही आणली व इंद्रास फजीत केलें. ही पंतांनीं वर्णिलेली समग्र हकीकत (आर्या ८९-९८) मूळ भागवतांत नाहीं. परमेश्वराच्या भाषणामध्यें फक्त एका श्लोकांत दधीचि ऋषीच्या अश्वशिर-स्वरूपाचा उल्लेख आहे. पंतांनीं आपली विस्तृत हकीकत फक्त टीकेस अनुसरून दिली आहे असें दिसतें. टीकेचा आशय घेऊन व इतर ठिकाणच्या माहितीचा समावेश करून मुळांत नसलेल्या गोष्टींचें वर्णन पंतांनीं केल्याचें हें एक ठळक उदाहरण होय.

२९. तृतीय स्कंधाप्रमाणेंच या स्कंधांतील कथाभागावरही पंतांनीं कांहीं स्फुट आख्यान लिहिलेलें नाहीं. स्फुट काव्य लिहिण्याजोग्या या स्कंधांत दोन कथा आहेत. एक अजामिळाची कथा व दुसरें वृत्रासुराख्यान. अजामिळाची कथा भगवन्नाममहिम्याचें उत्कृष्ट रीतीनें वर्णन करणारी असून पंतांसारख्या नामस्मरण-लोलुप प्रेमळ भगवद्भक्तानें आपल्या सद्भावपूर्ण वाणीनें गावी अशीच ती आहे यांत शंका नाहीं. तथापि याच नामस्मरणमहिमा दाखविणाऱ्या गोष्टीवर वामन-पंडितांनीं सुरस व विस्तृत असें ‘ हरिनामसुधा ’ नांवाचें प्रकरण रचिलें आहे. याकरितांच पंतांनीं या कथेवर स्फुट रचना केली नाहीं असें दिसतें. सामान्यत: पहातां वामनपंडितांनीं ज्या ज्या कथाभागांवर काव्यरचना केली आहे त्याच्या-वर पंतांनीं स्फुट रचना करण्याचें टाळलें आहे असें दिसतें. हा कांहीं अगदीं निरपवाद असा नियम नाहीं; तथापि सामान्यत: पंडितांनीं वर्णन केलेले भाग सोडून इतर भागांवर रचना करण्याचीच पंतांची प्रवृत्ति विशेष दिसून येते. पंडि-तांचा भर दशमपूर्वार्धावर व कृष्णाच्या बाललीलांवर जास्त; तेव्हां पंतांनीं दशम पूर्वार्धांतील कथांस आधारभूत धरून एकही स्फुट काव्य रचिलेलें नाहीं. अजामिळाची कथा त्यांनीं सोडून दिली आहे हेंही त्याच प्रवृत्तीचें द्योतक होय. उलट ध्रुवकथा, नारदकथा, दशम उत्तरार्धांतील सुदामकथा, भृगुचरित्र वगैरे अनेक पंडितांनीं न वर्णिलेलीं आख्यानें पंतांनीं आदरून मराठींत आणलीं आहेत. अशी ही पंतपंडितांची परस्परपूरक कामगिरी मोठी अपूर्व व लक्षांत ठेवण्याजोगी आहे. वृत्रासुराख्यान पंतांनीं सोडून दिलें याचें कारणही अगदीं स्पष्ट

आहे. वृत्राच्या कथेंत रमणीयता मुळींच नसून काव्यास उपयुक्त असे गुण तिच्यांत दिसून येत नाहींत; आणि भगवद्भक्तांस प्रिय होण्याजोगा असाही कोणताच भाग त्यांत आढळून येत नाहीं; भगवद्यशोगान नाहीं, नाममहिमा नाहीं, भगवद्भक्ताचें चरित्र नाहीं, कांहींच नाहीं. उलट देवांच्या, विशेषतः इंद्राच्या मत्सरीपणाचें व दुष्टपणाचें उदाहरण मात्र त्यांत भरपूर आहे अशी स्थिति असल्यामुळें पंतांनीं, किंबहुना सद्भावपूर्ण अशा आमच्या इतर सर्व मराठी कवींनींही वृत्रकथेचा आदर केलेला दिसून येत नसल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

पंतांनीं स्वतंत्र आख्यान जरी लिहिलें नसलें तथापि सहाव्या स्कंधांत या कथांचें यथाक्रम वर्णन करण्यांत कसूर केलेली नाहीं. पंतांची आर्या उत्तरोत्तर अधिकच सोपी, सुंदर व मधुर होत चाललेली दृष्टीस पडते. व अशा मोहक वाणीनें अजामिळ व वृत्र या दोन्ही कथा त्यांनीं बऱ्याच विस्तारानें वर्णिल्या आहेत.

[सप्तम स्कंध]

३०. चवथ्या स्कंधामध्यें ज्याप्रमाणें आमच्या प्राकृत कवींना अत्यंत प्रिय झालेली ध्रुवाची कथा आहे त्याप्रमाणें सातव्या स्कंधांतही कवींना तितकीच प्रिय झालेली प्रह्लादाची रमणीय कथा आहे. ध्रुवाच्या कथेनें चवथ्या स्कंधाचा केवळ एक लहानसा भाग व्यापला आहे. आमच्या प्राकृत कवींना अत्यंत आवडलेला ध्रुवाच्या लहानपणींचा वृत्तांत व त्याची ईश्वराराधना यांनीं चवथ्या स्कंधाच्या ३१ अध्यायांपैकीं फक्त २ अध्याय व्यापले आहेत. पण हिरण्यकशिपूच्या व प्रह्लादाच्या कथेनें जवळ जवळ सर्व सप्तमस्कंध व्यापला आहे. पंतांच्या मंत्रभागवतांत तर सातव्या स्कंधांत सर्वस्वीं प्रह्लादकथाच वर्णन केली आहे. मुळामध्यें हिरण्यकशिपूच्या कथेस प्रत्यक्ष सुरवात अशी दुसऱ्या अध्यायांत झाली असून प्रह्लादाख्यानाचा उपसंहार दहाव्या अध्यायांत झालेला आहे. यानंतर त्याच अध्यायांत त्रिपुरासुराख्यान नामक एक लहानसें आख्यान आलेलें असून बाकी उरलेल्या ११ ते १५ अध्यायांत वर्णाश्रमधर्म, श्राद्धविचार, वगैरे धर्मशास्त्रांतील विषयांचें विवेचन आलें आहे. अगदीं शेवटीं थोडेंसें प्रवृत्तिमार्ग, निवृत्तिमार्ग वगैरे वेदान्तविषयांचें विवेचन करून स्कंध समाप्त केला आहे.

३१. 'यथामति सत्कथा गाव्या' ह्या उद्दिष्ट हेतूस अनुसरून पंतांनीं या

स्कंधांत फक्त प्रह्लादकथा तेवढी गायिली आहे. बाकी शेवटचें धर्मशास्त्रविषयक विवेचन व वेदांतप्रतिपादन हें त्यांनीं जवळ जवळ गाळून टाकलें आहे. भक्तश्रेष्ठ प्रह्लादाचें चरित्र फारच सुंदर व प्रेमळ; तेव्हां पंतांसारख्या सहृदय कवीनें व प्रेमळ भक्तानें तें कोठें तरी निराळें गायिलें असायचेंच. त्याप्रमाणें त्यांनीं तें 'प्रह्लादविजय' नामक काव्यांत मंत्रभागवत लिहिण्याच्या फार पूर्वी गाऊन ठेविलें होतेंच. पण प्रस्तुत 'प्रह्लादविजय' हा काव्यदृष्ट्या कांहीं फार उत्तम साधलेला ग्रंथ नाहीं. शिवाय तो आर्यागीतिवृत्तांत रचलेला असून दुसरी मोठी गोष्ट ही कीं, तो भागवतांतील कथेला आधार धरून लिहिलेला नव्हे. विष्णुपुराणांतील कथा पाहून हा ग्रंथ मी लिहिला असें पंत स्वतःच म्हणतात.—

श्रीमद्विष्णुपुराणीं पाहुनि अत्यंत आदरें रचिला ।
प्रह्लादविजयनाम ग्रंथ पद्य नगचि मणिगणीं खचिला ॥ ना.र. १०५

खुद्द प्रह्लादचरित्राच्या शेवटींही पंतांनीं खालीलप्रमाणें उल्लेख केला आहे:—

श्रीमद्विष्णुपुराणसागरसुधा प्रह्लादजीची कथा ।
साधुश्रोत्रपथासि येउनि हरी संसाररोगव्यथा । इ० प्रह्लादविजय.

तेव्हां विष्णुपुराणाच्या आधारानें रचलेला हा ग्रंथ पंतांच्या भागवती काव्यांत कांहीं समाविष्ट होऊं शकत नाहीं. ही गोष्ट लक्षांत येऊनच पंतांनीं प्रह्लादाच्या आख्यानाचा मंत्रभागवतांत बराच विस्तार केला असावा. पहिल्या स्कंधांतील नारदाभ्युदय व भीष्मभक्तिभाग्य यांचे कथाभाग पंतांनीं मंत्रभागवतांत अगदींच संक्षिप्त केले आहेत. व आठव्या स्कंधांतही अमृतमथन, वामनचरित वगैरे जीं प्रकरणें त्यांनीं स्वतंत्र लिहिलीं आहेत त्यांचे कथाभाग मंत्रभागवतांत आखडतेच घेतले आहेत. अंबरीषाच्या कथेवर पंतांनीं 'अंबरीषाख्यान' व 'भक्तभूषण' हीं दोन प्रकरणें रचलीं आहेत. त्यामुळें मंत्रभागवतांत त्यांनीं ती कथा, इतर सर्व नवमस्कंधांतील कथांचा बराच विस्तार केला असतांनाही, केवळ १० आर्यांत आटपून टाकली आहे. दहाव्या स्कंधांतील सुदामचरित्राचाही तोच प्रकार झाला आहे. कृष्णविजयांत व इतरत्र सुदामचरित्र विस्तृतपणें वर्णिलें असल्यामुळें मंत्रभागवतांत पंतांनीं त्याचाही केवळ संक्षेप केला आहे. तेव्हां ज्या आख्यानावर स्वतंत्र खंडकाव्यें रचलीं असतील त्यांचा मंत्रभागवतांत अतिसंक्षेप करावयाचा अशी बहुधा सर्वत्र पंतांची प्रवृत्ति दिसत असल्याकारणानें येथें सातव्या स्कंधांत जो प्रह्लादकथेचा पंतांनीं बराच विस्तार केला आहे त्याचें कारण दुसरीकडे

भागवताच्या आधारानें त्यांनीं ती कथा गायिली नव्हती हेंच असलें पाहिजे. शिवाय सप्तमस्कंधांत ही प्रह्लादकथाच काय ती मुख्य आहे. शेवटच्या सहा अध्यायांत आलेलें धर्मशास्त्रांतील विषयांचें विवेचन पंतांच्या हेतूला अगदीं अनभिप्रेत, तेव्हां तें गाळणेंच भाग; त्रिपुरासुराख्यान तर अगदींच क्षुल्लक, तेव्हां सातव्या स्कंधांतलि वर्णनीय असें कथानक म्हणून प्रह्लादाच्या कथेवरच टेकणें पंतांस भाग होतें. आणि हें पंतांच्या सातव्या स्कंधाच्या रचनेकडे बघितलें म्हणजे तेव्हांच लक्षांत येतें. प्रथमाध्याय केवळ प्रास्ताविक असल्यानें पंतांनीं तो एका पहिल्या आर्येतच आटपून टाकला आहे. प्रह्लादाच्या कथेस मुळामध्यें दुसऱ्या अध्यायापासून सुरवात होऊन दहाव्या अध्यायांत तिचा उपसंहार होतो. पंतांनीं आपल्या सातव्या स्कंधाच्या दुसऱ्या आर्येपासून प्रऱ्हादकथेस सुरवात केली आहे व १५६ व्या आर्येपर्यंत तिचा विस्तार केला आहे. तेव्हां एकंदर १५५ आर्यांत पंतांनीं प्रह्लादचरित्र वर्णिलें आहे असें झालें. आणि या स्कंधाच्या एकंदर आर्या पंतांनीं १७६ केल्या आहेत अर्थात् प्रह्लादचरित्राशिवाय बाकीचा भाग केवळ २१ आर्यांत आणिला आहे. यावरून प्रह्लादचरित्राचा जर पंतांनीं अगदीं संक्षेप केला असता तर हा सर्व स्कंध पंतांना कसा अगदींच रोडका बनवावा लागला असता हें लक्षांत येतें. द्वितीयस्कंधांतही पंतांची हीच स्थिति झाली आहे असें आपण मागें पाहिलेंच. तेथें बाकीचे सर्व अध्याय वेदान्तमय असल्याकारणानें पंतांनीं त्यांचा अतिसंक्षेप केला आहे पण सर्व स्कंध अगदींच रोडका दिसूं नये म्हणून सातव्या अध्यायांतील चोवीस अवतारांचें–इतर स्फुट प्रकरणांत त्यांचें वर्णन केलें असून सुद्धां–६१ आर्यांत विस्तृत विवरण केलें आहे.

३२. असो. या भक्तश्रेष्ठविषयक पंतकृतीचें आतां आपण नीट अवलोकन करूं. प्रह्लादकथेचे स्वभावतः तीन निराळे भाग पडतात. त्यांपैकीं पहिला भाग म्हणजे हिरण्यकशिपूसंबंधाच्या हकीकतीचा होय. हिरण्यकशिपु घोर तपश्चर्या करून त्यामुळें मिळालेल्या सामर्थ्यानें सर्व जगास भारी होतो इतका कथाभाग यांत आलेला आहे:– अध्याय २,३,४. दुसऱ्या भागांत प्रह्लादाची विष्णुभक्ति व तत्प्रीत्यर्थ त्याचा बापाकडून झालेला छळ यांचें वर्णन आहे:–अ० ५,६,७. नृसिंहरूपी परमेश्वराचें स्तंभांतून प्रकट होणें, हिरण्यकशिपूचा वध, देवांनीं व प्रह्लादानें केलेली नृसिंहस्तुति, प्रह्लादास वरदान इ० अंतिम वृत्तांत ज्यांत आलेला आहे तो तिसरा भाग मानतां येईल:— अ० ८, ९, १०.

पंतांनीं येथें प्रारंभ जरा सूचीमुखानेंच केला आहे. दुसऱ्या अध्यायांत मुळा-मध्यें, भ्रातृवधामुळें हिरण्यकशिपूचा झालेला संताप, त्यामुळें त्यानें केलेली विष्णु-वधाची प्रतिज्ञा, भावाच्या मरणाबद्दल त्याच्या पत्नीपुत्रादि परिवाराचें केलेलें सांत्वन व मानवीआयुष्याच्या वैयर्थ्याबद्दल त्यानें सांगितलेली सुयज्ञ राजाची गोष्ट इतका कथाभाग आलेला आहे. या सर्व गोष्टींचें पंतांनीं केवळ दिग्दर्शन मात्र केलें आहे. सुयज्ञ राजाची गोष्ट तर अजीबात गाळलीच आहे. याप्रमाणें ६१ श्लोकांचा अध्याय पंतांनीं फक्त ४ आर्यांत आटपला आहे. पुढें हिरण्यकशिपूनें विष्णूवर दांत धरून घोर तपास सुरवात केली. त्याच्या तपाच्या उग्रतेनें सर्व जग तप्त होऊन प्रलय होण्याचा समय येऊन ठेपला. तेव्हां ब्रह्मदेवानें त्याला तपा-पासून परावृत्त करण्यासाठीं इच्छित वर मागण्यास सांगितलें. हिरण्यकशिपु हर्ष-निर्भर मनानें ब्रह्मदेवाची स्तुति करून वर मागतो.—

वरदा, जी त्वन्निर्मित भूतें व्यसु सासु भूमिवर, देहा ।
त्यांपासुनि मृत्यु नसो, न नभीं, रात्रिहि, दिसाहि वर दे हा ॥ १६ ॥

येणेंप्रमाणें कथाभाग असलेल्या तिसऱ्या अध्यायाचा (श्लोक ३८) पंतांनीं १५ आर्यांत फार सुंदर संक्षेप केला आहे. मुळांतील कांहीं विशेष गोष्टी पंतांनीं गाळल्या नाहींत. फक्त हिरण्यकशिपुकृत ब्रह्मस्तुति मात्र गाळली आहे.

पुढें हिरण्यकशिपु उन्मत्त होऊन इंद्रपद बळकावून बसला. हिरण्यकशिपूच्या भयानें देवांची कशी लाचारीची स्थिति झाली त्याचें थोडक्यांत परंतु ठसठशीत वर्णन,—(मुळांत हें वर्णन बरेंच विस्तृत आहे.)—

भजली जे सुरमुनिवर यांची सुज्ञानसिंधु राजी जी ।
भव विधिविष्णु निराळे करुनि म्हणे असुरसिंधुरा जी जी ॥ २५ ॥
गट करि आपणचि कनककशिपु प्रभु यज्ञभाग, दे खाया ।
लवहि न सुरांसि, लावी घोटाया लाळ, तोंड देखाया ॥ २६ ॥

यापुढें देवांस आश्वासन देणारी आकाशवाणी झाली असून हिरण्यकशिपूचा पुत्र प्रह्लाद याच्या ईश्वरभक्तीचें वर्णन नंतर आलें आहे. त्याचा मात्र पंतांनीं अतिसंक्षेप केला आहे. याप्रमाणें हा ४६ श्लोकांचा अध्याय १२ आर्यांत आट-पला आहे.

३३. येथून पुढें हिरण्यकशिपूचा वृत्तान्त संपून प्रह्लादाच्या छळाचा भाग सुरू होतो. हिरण्यकशिपु प्रह्लादास 'तुला सर्वांत काय उत्तम वाटतें ?' असा

एकदां प्रश्न करतो. ' श्रीविष्णुभक्ति ' असें प्रल्हादानें उत्तर दिल्यावर त्याला चांगला ताळ्यावर आणण्याकरितां गुरुपुत्र जे शंड व अमर्क त्यांच्या ताब्यांत पिता त्याला देतो. तरीही तो वठणीवर येत नाहीं असें दिसून आल्यानंतर प्रह्लादाच्या अनन्वित छळास सुरवात होते; त्याचाही कांहीं उपयोग होत नाहीं व इतके आसुरी उपाय केले तरी तो मरतही नाहीं असें पाहून हिरण्यकशिपु घाबरतो व शुक्राचार्य परत येईपर्यंत शंडामर्कांच्या सल्ल्यावरून त्यास बांधून ठेवण्याची आज्ञा करतो. हा सर्व कथाभाग जवळ जवळ मुळाइतक्याच विस्तारानें पंतांनीं आर्यांत उतरला आहे. या आर्यांत कित्येक ठिकाणीं पंतांनीं मुळाचें श्लोकाबरहुकूम भाषांतरही केलें आहे. मंत्रभागवताच्या पहिल्या आठ स्कंधांत संक्षेप फारच केला असल्यामुळें असें मुळास धरून केलेलें भाषांतर क्वचित्च आढळतें. एक नमुना–(तुला ईश्वरभक्ति कोणी शिकवली असें गुरुपुत्रांनीं विचारलें असतां प्रल्हाद सांगतो.)—

मूळ—यथा भ्राम्यत्ययो ब्रम्हन्स्वयमाकर्षसंनिधौ ।
तथा मे भिद्यते चेतश्चक्रपाणेर्यदृच्छया ॥ भा. ७. ५. १४.

पंतकृति—वाडव हो चुंबकमणिसंनिधि असतां जसें अय भ्रमतें ।
हरिसंन्निधिनें मम मन भेद तसें पावतें, पदीं रमतें ॥ ४३ ॥

येथें मुळांतील दृष्टान्त पंतांनीं जशाचा तसा उचलून घेतला आहे. पण मुळांत ' स्वयम् ' व ' यदृच्छया ' या पदांवर विशेष जोर आहे. ज्याप्रमाणें चुंबकमण्यासंनिध लोखंड **स्वतः होऊन** भ्रमण पावतें त्याप्रमाणें **आपोआप, ईश्वरेच्छेनेंच** माझें मन ईश्वराच्या ठिकाणीं रत झालें आहे, दुसऱ्या कोणी त्याला शिकवून तयार केलें नाहीं, असें प्रह्लादास सांगावयाचें आहे. पण पंतांच्या भाषांतरांत हीं मुद्याचीं पदें राहून गेलीं आहेत. पुढें ' श्रवणं कीर्तनं विष्णोः ' इ० दोन श्लोकांचें भाषांतर-

मूळ—श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥
इति पुंसार्पिता विष्णौ भक्तिश्चेन्नवलक्षणा ।
क्रियते भगवत्यद्धा तन्मन्येऽधीतमुत्तमम् ॥ भा. ७. ५. २३, २४.

पंतकृति—तेव्हां प्रह्लाद म्हणे, श्रीहरिचें श्रवण कीर्तन स्मरण ।
स्वार्पण सख्य समर्चन पदसेवन दासता नमस्करण ॥ ५० ॥

बापा, असी नवविधा भक्ति करावी, समर्पिली हरितें ।
उत्तम अध्ययन जनीं सर्वाध्ययनांत मानितों तरि तें ॥ ५१ ॥

या पांचव्या अध्यायाचे मुळांत ५७ श्लोक असून पंतकृतींत ४० आर्या आहेत. यापुढें सहाव्या अध्यायांत, एकेसमयीं आपल्या बरोबरीच्या इतर दैत्यपुत्रांना बोलावून त्यांना प्रल्हादानें जो ईश्वरभक्तीचा उपदेश केला तो आलेला आहे. मुळांतील ३० श्लोकांचें सार पंतांनीं १३ आर्यांत खुबीनें आणलें आहे. हें अलौकिक ज्ञान तुला कोठून प्राप्त झालें असें प्रल्हादाच्या सोबत्यांनीं त्याला विचारिलें. तेव्हां, " माझी माता माझ्या वेळेस गर्भिणी असतां इंद्र सर्व दैत्यांचा पराभव करून तिचा वध करण्याकरितां तिला घेऊन चालला होता; वाटेंत इंद्राला नारद भेटले. त्यांनीं त्याचा निषेध केला व त्याच्या हातून माझ्या आईस सोडवून तिला ते आपल्या आश्रमीं घेऊन गेले. तेथें गर्भाचें क्षेम व इच्छाप्रसूति हे दोन वर माझ्या आईला नारदांनीं दिले आणि तिला व मला उद्देशून ब्रम्हज्ञानाचा व ईशभक्तीचा उपदेश केला. स्त्रीत्वामुळें व बराच काळ लोटल्यामुळें आईचें ज्ञान सर्व विसरलें, पण नारदांनीं उपदेश केला त्यावेळीं मी जवळ (मातेच्या गर्भांत) असल्यामुळें तें मला ऐकायला मिळून ऋषींच्या अनुग्रहामुळें माझ्या मनांत मात्र तें दृढ होऊन बसलें." अशी हकीकत सांगून प्रल्हादानें आणखीही नारदानें सांगितलेलें ज्ञान विस्तरशः आपल्या सोबत्यांस सांगितलें. येणेंप्रमाणें सातव्या अध्यायांत मजकूर आला आहे. पैकीं प्रल्हादानें सांगितलेला आपल्या जन्माचा व ज्ञानप्राप्तीचा वृत्तान्त मात्र पंतांनीं १० आर्यांत सांगितला आहे. परंतु आपल्या नेहमींच्या धोरणास अनुसरून नारदकथित ब्रह्मज्ञान मात्र एकाच आर्येंत त्याचा निसटता उल्लेख करून गाळून टाकलें आहे.

३४. सर्व दैत्यपुत्र सुद्धां प्रल्हादाच्या उपदेशानें विष्णुभक्ति करूं लागलेले पाहून हिरण्यकशिपु फारच चिडला. प्रल्हादाच्या अंगावर धावून जाऊन त्याला ठार करण्याच्या बेतांत असतां त्याची व प्रल्हादाचीं प्रश्नोत्तरें झालीं तीं प्रसिद्धच आहेत. माझा रक्षणकर्ता परमेश्वर खांबांत देखील आहे असें शांतपणें त्या भक्तश्रेष्ठानें उत्तर दिल्यानंतर त्याच्या पित्यानें खांबास लात मारिली. खांबांतून ईश्वर नरसिंहरूपानें प्रकट होऊन त्याचें व त्या दैत्यशिरोमणीचें घनघोर युद्ध झालें. शेवटीं नखांनीं आतडीं विदारण करून परमेश्वरानें हिरण्यकशिपूला स्वस्वरूपीं मिळवून टाकलें. येथपर्यंत मुळाच्या आठव्या अध्यायांतील १ ते ३६ श्लोक होतात व पंतांनीं

याच प्रसंगाचें विस्तृत वर्णन करून त्याच्या बरोबर ३६ च आर्या केल्या आहेत. मुळांतील सर्व हकीकत पंतांनीं विस्तारानें आणली आहे इतकेंच नव्हे तर प्रह्लादाच्या व त्याच्या पित्याच्या तोंडीं मुळांत नसलेलीं एकदोन प्रश्नोत्तरें पंतांनीं स्वतःचीं घातलीं आहेत. हिरण्यकशिपुवधानंतर या (आठव्या) अध्यायांत ब्रह्मदेवादिकांनीं केलेली ईशस्तुति आहे (मूळ श्लोकः ३६ ते ५७). ती सर्व पंतांनीं गाळली आहे.

नवव्या अध्यायांत, कोपानें उग्र झालेल्या प्रभूजवळ जाण्यास ब्रह्मादिकही असमर्थ झाले असतां प्रह्लाद निर्भयपणें प्रभूजवळ जातो व त्याची स्तुति करून त्याला शांत करतो असें वर्णन आहे. त्याचें पंतकृत सुंदर शब्दचित्र—

यद्यपि भक्त, सकळ सुर भ्याले, प्रभुच्या पुढें न ये कोणी ।
श्रीदृष्टि म्हणे प्रीतिस ' बसत्यें नेत्रांविया, सये, कोणीं ' ॥ १३२ ॥
शिव विधि सरकति मागें, करि जेव्हां प्रभु तयांकडे दृष्टी ॥ १३३ ॥
मोठा उत्सव सर्वां वाजविलीं दानवारिनीं वाद्यें ।
गाती नाचति दूरचि, कीं व्हावें सुप्रसन्न त्या आद्यें ॥ १३४ ॥
भगवंतातें स्तविती ब्रह्मादि समस्त परि तयाजवळ ।
जाया कोणी न शके वाटे प्रभु करिल आपला कवळ ॥ १३५ ॥
तेव्हां प्रह्लाद महाभागवत हळूच हरिकडे जाय ।
पाय प्रभुचे वंदी, हरिभय हरिबाळकास हो काय ॥ १३८ ॥

दुरून दुरूनच वाद्यें वाजविणें, नाचणें, गाणें वगैरे चेष्टा त्या देवांनीं चालवलेल्या होत्या. देवांच्या घाबरलेल्या स्थितीचें हें वर्णन मोठें सुंदर आहे; असें मुळांत नाहीं. या अध्यायांत मुख्य प्रह्लादकृत ईशस्तुति जरा अवघड पण अत्यंत प्रेमळ व भक्तिरसपरिपूरित आहे. तथापि तीही नेहमींच्या पद्धतीप्रमाणें पंतांनीं गाळून टाकली आहे. यानंतर दहाव्या अध्यायांत प्रल्हादास ईप्सित वर मागण्यास परमेश्वरानें सांगितलें तेव्हां,—

बाळ प्रल्हाद वदे प्रार्थूनि, करून कोमळा वाणी ।
निष्कामा कामवरें लोभवुनि करूं नको मला वाणी ॥ १४२ ॥
यज्ञेशा, कामांचा उद्भव चित्तीं नसो असा याला ।
देणें तरि वर दे, हा वांछी पादांबुजीं वसाया ला ॥ १४३ ॥

अंतर्यामींचा अर्थ जितका प्रेमळ व उदात्त तितकीच आर्यांची बाह्यरचना व ठेवणही गंभीर, कोमल व सुंदर झालेली येथें दिसून येते. प्रह्लादाबरोबरच पंतांनीही

आपलें हृद्गत येथें प्रकट केलें आहे कीं काय असें वाटूं लागतें. त्याशिवाय इतकी तल्लीनता दिसून यावयाची नाहीं. असो. नंतर प्रल्हादानें माझा पिता अपराधी असला तरी त्याला शुद्ध करावें अशी विनंति केली असतां त्याला आश्वासन देऊन नरहरिस्वरूप परमेश्वर अंतर्धान पावतो. नंतर तेथें जमलेले सुरादिक लोकपालही स्वस्थळीं जातात व पंतही येथें प्रल्हादकथेची समाप्ति करितात.

नरहरिभक्तासि सकळ पुसुनि तदर्चित निजस्थळा गेले ।
त्या सुयशोमृतनिधिचे कण हे गोळा सुदुर्बळें केले ॥ १५५ ॥

३५. भगवत्स्तुति, विशेषतः वेदान्ततत्त्वांनीं युक्त अशी स्तुति, पंत नेहमीं गाळसात त्याप्रमाणें प्रल्हादाची स्तुतीही मंत्रभागवतांत गाळली आहे हें आपण पाहिलेंच. परंतु या स्तुतीचें एक निराळेंच आर्याबद्ध रूपांतर पंतांनीं केलेलें आहे. हें भागवती प्रकरणांच्या मागें दिलेल्या यादींत '**प्रह्लादविरचित भगवत्स्तुति**' म्हणून दाखल केलें आहे. मुळांतील प्रल्हादानें केलेली स्तुति नवव्या अध्यायांत ८ ते ५० पर्यंतच्या ४३ श्लोकांत आलेली आहे. पंतांनीं प्रत्येक श्लोकाचें सरळ भाषांतर बरोबर तीन आर्यांत केलेलें आहे; अर्थात् १२९ आर्यांमध्यें ही स्तुति संपविली आहे. पुढें ५ आर्यांत प्रल्हादास परमेश्वरानें वर मागण्यास सांगितलें तो वृत्तांत असून शेवटीं उपसंहाराची एक आर्या घालून हें प्रकरण संपविलें आहे. या प्रकरणांतील आर्यांची रचनाशैली अगदीं साधी व सोपी असून त्यांत मुळाचें भाषांतर करण्याकडेच मुख्य लक्ष ठेवलें असल्यानें त्याविषयीं विशेष लिहिण्याजोगें असें कांहीं नाहीं. नमुन्यादाखल मुळांतील एक सोपा श्लोक व त्याचें पंतकृत भाषांतर येथें उतरून घेतों.

मूळ—कुत्राशिषः श्रुतिसुखा मृगतृष्णिरूपाः क्वेदं कलेवरमशेषरुजां विरोहः ।
निर्विद्यते न तु जनो यदपीति विद्वान्कामानलं मधुलवैः शमयन्दुरापैः ॥

भा. ७. ९. २५.

पंतकृति—कोठें ज्यांत श्रवणाचि सुख ऐसे दुष्ट सर्वही भोग ।
कोठें वपु ज्यामध्यें वसतात सदा समस्तही रोग ॥ ५२ ॥
जरिही ऐसें जाणे तरि जन न विरक्त होय हा कांहीं ।
नोहेचि सद्गुरुश्रीवेदांच्या सावधान हाकांहीं ॥ ५३ ॥
कामानल शमवितसे दुर्लभ मधुतुल्य विषयसुखलेशीं ।
पळही अवकाश नसे धाडाया मन विरक्तजनदेशीं ॥ ५४ ॥

प्रल्ह.दस्तुति.

हें भाषांतर मुळाबरहुकूम नसून ५३ व ५४ या आर्यांच्या उत्तरार्धींतला मजकूर पंतांनीं स्वत:चा घातला आहे हें सहज लक्षांत येईल. अशीच मूळ अर्थास पुष्टि आणणारी शोभादायक भर इतर अनेक ठिकाणींही पंतांनीं घातली आहे. प्रस्तुत काव्याचा उपसंहारही मोठा गोड व सुंदर वठला आहे. ही प्रल्हादस्तुति पंतांच्या पूर्ववयांतली, ज्या वेळीं पंत आपली लेखणी लहान लहान प्रकरणांवर चालवून पहात होते व ज्या वेळीं त्यांची कविताशक्ति स्वतंत्र कल्पनेच्या भराऱ्या न मारतां मुळाबरहुकूम रूपांतर करण्यांतच समाधान मानीत होती अशा वेळीं रचलेली, दिसते. ही आजपर्यंत अप्रसिद्धच होती, इतकेंच नव्हे तर हिच्या अस्तित्वाचाही कोणास पत्ता नव्हता. तिचा वृत्तांत या पुस्तकांत प्रथमच बाह्य जगास ज्ञात होत आहे.

३६. यानंतर प्रल्हादकथेवरील आणखी एक स्फुट प्रकरण म्हणजे 'प्रल्हादचरित्र' या नांवानें काव्यसंग्रहकारांनीं प्रसिद्ध केलेला 'सत्यं विधातुं' या श्लोकावरील श्रीधरस्वामींच्या टीकेचा आर्याबद्ध अनुवाद होय. यास का. सं. कारांनीं दिलेलें प्रल्हादचरित्र हें, किंवा इतरांनीं दिलेलें 'प्रल्हादप्रकरण' हें, नांव अगदीं अनुचित आहे. वस्तुत: परमेश्वरानें नृसिंहावतार कोणच्या हेतूनें घेतला हें प्रतिपादन करणाऱ्या एका श्लोकावरील टीकेचा हा अनुवाद आहे. दुसरें कांहीं देतां येण्यासारखें नांव न दिसल्यामुळें कांहीं तरी नांव द्यायचें म्हणून प्रकाशकांनीं वरील नांवें दिलेलीं दिसतात. असो.

मूळ श्लोक असा आहे—

सत्यं विधातुं निजभृत्यभाषितं व्याप्तिं च भूतेष्वखिलेषु चात्मन: ।
अदृश्यतात्यद्भुतरूपमुद्वहन्स्तम्भे सभायां न मृगं न मानुषम् ॥
भा. ७. ८. १८.

यावरील टीकेचा विशेष येवढाच आहे कीं, निजभृत्य या शब्दानें १ प्रल्हाद, २ सनत्कुमार, ३ हिरण्यकशिपु, ४ ब्रह्मा, ५ नारद अशा निरनिराळ्या व्यक्ति घेऊन त्यांनीं निरनिराळ्या वेळीं बोललेले शब्द खरे करण्याकरितां ईश्वर 'स्तम्भे सभायां, न मृगं न मानुषम्' अशा रीतीनें प्रकट झाला असें टीकाकारांनीं दाखविलें आहे. या टीकेचा सरळ अनुवाद पंतांनीं २० आर्यांत केला आहे. यापेक्षां या प्रकरणांत विशेष कांहीं नाहीं.

३७. यापुढें मयासुरानें उत्पन्न केलेल्या मायावी त्रिपुरांपुढें श्रीशंकर हतवीर्य

झाले असतां परमात्म्या विष्णूनें त्यांस शक्ति देऊन त्यांजकडून त्रिपुरांचा पराभव करविला ही दहाव्याच अध्यायांत वर्णिलेली लहानशी कथा पंतांनीं संक्षेपानें कथन केली आहे. एकंदर १० व्या अ० चे ७१ श्लोक मुळांत असून पंतांनीं तो २६ आर्यांत आणला आहे.

यापुढें पांच अध्यायांत वर्णाश्रमधर्म वगैरेंचें विवेचन आलें असून पंतांनीं तें गाळलें आहे असें वर सांगितलेंच आहे. फक्त अकराव्या अध्यायांत धर्माचीं सत्य, दया, तप इ० तीस लक्षणें सांगितलीं आहेत त्यांचें मात्र ४ आर्यांत परिगणन केलें आहे. ज्यांचा अवलंब केल्यानें समाज शुद्ध होतो असे वर्णाश्रम-धर्म नारदमुनींनीं धर्मराजास निवेदन केले असें परभारेंच सांगून पंत त्या वर्णाश्रम-धर्मांना दुरूनच नमस्कार करतात.

> वाखाणावे किति ते म्यां विस्तरभीरुनें ? जयां न मन ।
> विसरे क्षणहि कवींचें, केलें साष्टांग हें तयां नमन ॥ ७. १७५.

[अष्टम स्कंध]

३८. सातव्या स्कंधापेक्षां आठवा स्कंध मोठा असून त्यांत चार महत्वाचीं आख्यानें भगवंताच्या पांच अवतारांच्या वर्णनासह आलीं आहेत. अ० २,३,४, यांत गजेंद्रमोक्षाचें लहानसेंच परंतु सुंदर आख्यान आलें असून पांचव्या अध्याया-पासून नवव्या अध्यायापर्यंत अमृतमंथनाची भव्य कथा कूर्मावताराचे वर्णनासह आली आहे. दहाव्या व अकराव्या अध्यायांत देवदैत्यांच्या संग्रामाचें वर्णन असून बाराव्यांत विष्णूचें मोहिनीस्वरूप पाहून शंकरांची झालेली त्रेधा वर्णन केली आहे. पुढें १५ व्या अध्यायापासून २३ व्या अध्यायापर्यंत वामनावतारासह बलि-राजाचें अत्यंत रमणीय व उदात्त कथानक वर्णिलें असून २४ व्या अध्यायांत श्राद्धदेव नामक मनूचें व मत्स्यावताराचें वर्णन आलें आहे. हीं सर्व ८ व्या स्कंधां-तील कथानकें मन्वंतरवर्णनाच्या सूत्रामध्यें गोवून शुकाचार्यांनीं परीक्षितीला निवेदन केलीं आहेत. मन्वंतरांचें वर्णन हें पुराणांच्या प्रसिद्ध पंचलक्षणांपैकीं आहे. तें लक्षण पूर्ण करणारा भागवताचा स्कंध हा आठवाच होय. यांत शुकाचार्यांनीं प्रस्तुतच्या कल्पामधील चौदा मन्वंतरांचें वर्णन, प्रत्येक मन्वंतरांतील मनूचें नांव त्याचे पुत्र, देव, ऋषि व ईश्वरावतार या सर्वांच्या परिगणनासह केलें आहे; व वर उल्लेखिलेल्या चार मुख्य आख्यानांच्या कथा मन्वंतरांचें परिगणन चाललें असतां मध्यें ओघास आल्या म्हणून शुकाचार्यांनीं सांगितल्या असें दाखविलें

आहे. गजेंद्रमोक्षाची कथा ही चौथ्या तामस मन्वंतरांतील असून कूर्मावताराची व अमृतमंथनाची कथा ही सहाव्या चाक्षुष मन्वंतरांतील होय. वामनावताराची कथा सातव्या, म्हणजे सध्याच्या, वैवस्वत मन्वंतरांतील होय. मत्स्यावताराची कथा मात्र चौदाही मन्वंतरांच्या आधींची, या कल्पाच्या प्रारंभींची होय.

हें सर्व कथांभोंवतींचें मन्वंतरांचें वेष्टन पंतांनीं अगदींच काढून टाकलें नसलें तरी अगदीं झिरझिरीत केलें आहे. अगोदर, पहिल्या अध्यायामध्यें मुळांत पहिल्या सहा मन्वंतरांचें ऋषि, देव, अंशावतार वगैरेंच्या नामावळ्यांसह वर्णन केलें आहे तें गाळून पंतांनीं फक्त त्या मन्वंतरांचा दोन आर्यांत उल्लेख मात्र केला आहे. आणि लगेच तिसऱ्या आर्येंत गजेंद्रमोक्षास प्रारंभ केला आहे. ही अत्यंत प्रेमळ व मोहक कथा पंतांनीं अवघ्या २४ आर्यांत आणली आहे; (मूळ श्लोक ९१). गजेंद्र ज्या पर्वतावर वनामध्यें विहार करीत असे त्या पर्वताचें व वनाचें मुळांतील काव्यमय विस्तृत वर्णन पंतांनीं गाळलें असून गजेंद्राचा पाय नक्रानें धरल्यानंतर गजेंद्रानें केलेली सुंदर ईशस्तुति (मूळ श्लोक २९) देखील पंतांनीं बाजूस सारली आहे. ईशस्तुति पंत शक्य तितकी टाळतात हें आपण पाहिलेंच आहे. असो; मोठ्या कष्टानें शुंडाग्रानें कमल उचलून गजेंद्रानें ईश्वरास अर्पण केलें तेव्हांचें दोघांनीं केलेलें वर्णन —

मूळ—सोऽन्तःसरस्युरुबलेन गृहीत आर्तो दृष्ट्वा गरुत्मति हरिं ख उपात्तचक्रम् ।
उत्क्षिप्य साम्बुजकरं गिरमाह कृच्छ्रान् नारायणाखिलगुरो भगवन्नमस्ते ॥
भा. ८. ३. ३२.

पंतकृति—वारिज धरुनि करातें कष्टें उचलूनि बैसतां झोले ।
स्तवुनि विलोकुनि गरुडीं, ' नारायण, ते नमोऽस्तु' हें बोले ॥ १० ॥

मुळांतील केवळ संदर्भ मात्र घेऊन त्यास आपल्या कल्पना सौष्ठवानें खुलवून बहारीचें वर्णन करण्याची पंतांची शैली—

मूळ—एवं गजेंद्रमुपवर्णितनिर्विशेषं ब्रह्मादयो विविधलिङ्गभिदाभिमानाः ।
नैते यदोपससृपुर्निखिलात्मकत्वात्तत्राखिलामरमयो हरिराविरासीत् ॥
भा. ८. ३. ३०.

पंतकृति—मौलकरीसे लोकप, तातचि पाहुनि मुलास कळकळतो ।
तैसा हरिच कवि म्हणाति, ' देवा, प्रेमा तुला सकळ कळतो ' ॥१३॥

३९. यानंतर मुळांत ५ ते ९ अध्यायांत वर्णन केलेले अमृतमथनाचें भव्य आख्यान पंतांनीं४६ आर्यांत वर्णिलें आहे मुळांत याचे २१० श्लोक असून पंतांनीं

याच कथानकावर जें 'अमृतमथन' नामक खंडकाव्य लिहिलें आहे त्याच्या आर्या १५८ आहेत. याशिवाय महाभारताच्या आदिपर्वांतील १७, १८ व १९ या अध्यायांत अमृतमथनाची कथा आली आहे व तीस अनुसरून सुमारें २७ आर्यांत पंतांनीं आपल्या महाभारतांत ही कथा आणखी एकदां वर्णिली आहे. अमृतमथनाची व कूर्मावताराची गोष्ट सुप्रसिद्धच आहे. महाभारतांतील व भागवतांतलि या कथेमध्यें कांहीं विशेष फरक नाहीं. भारतापेक्षां भागवतामध्यें ही कथा सुमारें दुप्पट विस्तार करून सांगितली आहे येवढेंच. दोन्ही कथांमध्यें समुद्रमंथनानंतर निघालेल्या चवदा रत्नांचीं नांवें दिलेलीं नाहींत. फक्त नऊ रत्नांचीं नांवें सांपडतात. असो. मुळांतील समुद्रमंथनाची हकिकत अतिशय सुंदर, सरळ व द्राक्षापाकसम भाषेंत वर्णिली आहे. देवांचे व खोट्या आशेस लावलेल्या दैत्यांचे ते दीर्घ प्रयत्न, परमेश्वराचें वरून सर्वांना सारखें परंतु आंतून दैत्यांना फसवेगिरीचें असलेलें साहाय्य, वगैरे गोष्टी मूळ भागवतांत व पंतकृतींतही मोठ्या सुंदर रीतीनें वर्णिल्या आहेत. त्यांतल्या त्यांत '**अमृतमथन**' नामक स्फुट आख्यानांत पंतांना अवकाश चांगला सांपडल्याकारणानें तेथें वर्णनास जास्त रंग चढला आहे. मुळांत ब्रह्मादिक देवांनीं केलेल्या तीन ईश्वरप्रार्थना आल्या आहेत त्या अर्थांत्च पंतांनीं गाळल्या आहेत. या तीन्ही स्तुति बहुधा वेदान्तमय व चर्वितचर्वणात्मक असल्यानें त्या गाळल्याबद्दल कांहीं खेद वाटण्याचें कारण नाहीं.असो;ब्रह्मदेवादिकांनीं प्रार्थना केल्यानंतर ईश्वर त्यांच्या पुढें प्रगट झाला त्यावेळच्या भगवान् श्रीहरीच्या ध्यानाचें वर्णन पंतांनीं फार सुंदर केलें आहे. (अ. म. १; ७-१७). इंद्रादि देव बलीकडे साम करण्याकरितां गेले तेव्हां बलीचे अनुयायी दैत्य त्यांना मारावयास धांवले. आपल्या अनुयायांची ही अनुचित प्रवृत्ति पाहून बलीस फार वाईट वाटलें.

धवला कीर्तिदुशाला टाकवुनि अकीर्तिकांबळीला जे।
पांघुरविते न ते बुध, त्या कर्में तो न कां बळी लाजे ॥ अ. म. १. २९.

कूर्मरूप ईश्वरानें मंदरपर्वत पाठीवर स्थिर धरला. त्याच्यावर पंत सुंदर कल्पना करतात--(ही आर्या निदर्शनालंकाराचें सुंदर उदाहरण आहे.)--

भरमग्न गिरिस पृष्ठीं धरि, होय क्षिरधींत कासवसा।
उपदेशी कीं माझी स्वस्थ सुजनहो धरूनि कास वसा ॥ अ. म. १.४०.

कालकूटापासून रक्षण करण्याबद्दल देवांनीं प्रार्थना करितांच कोमल मनाच्या भोळ्या शिवास दया आली.

तत्काळचि करुणार्णव देव वतंसीकृतेंदुकळ वळला।
तें विश्वप्राणहर व्यसन विलोकूनि फार कळवळला ॥ अ. म. १.५५.
व जग, जगदीश्वरि, वांचो त्वदधरमधुसेंचि सेवितों विष मी । १.६२.
असें आपल्या अर्धांगीला सांगून लोककल्याणास्तव शंकरानें तें विष पिऊन टाकलें. येथपर्यंत मुळांतील ५ ते ७ अध्याय व ' अमृतमथन ' काव्याचा पहिला अध्याय होतो.

पुढें त्या क्षीरोदधींतून लक्ष्मी प्रकट झाली. तिला सर्व देवतांनीं उपायनें दिलीं व अभिषेक केला. हातांत माला घेऊन तेथें जमलेल्या त्रैलोक्यांतील सर्व प्रसिद्ध व्यक्तींचें स्वयंवरार्थ तिनें अवलोकन केलें. सर्व देवदानवसिद्धगंधर्वमानवांमध्यें प्रत्येकीं कांहींना कांहीं तरी दोष तिला आढळलाच. फक्त पुरुषोत्तम श्रीहरि हाच कायतो एक निर्दोष व सर्वगुणसंपन्न पुरुष तिला दिसला व ती

चित्तीं म्हणे, " सुमंगळ वर हाचि न अन्य धन्य याहूनि ॥ अ. म. २.३८.
" जरि हा आत्मरत प्रभु याला माझी नसे तिळहि परवा ।
" पर वाहेन वपु पदीं, ऐसा कैसा मिळेल वर बरवा ॥ २.३९.
" जावें शरण प्रभुतें जाशि गेली सुरनदी नदीनातें ।
"शोभे महत्तमातें आश्रय करितां न दीन दीनातें ॥ ४० ॥
"स्वरताहि मुकुंदातें वरत्यें कीं आधि हा सरो, वर हो ।
" स्नातातें निवर्वी, जरि अपरापेक्षक, सुधासरोवर हो " ॥ ४१ ॥
यद्यपि आत्मरत प्रभु हरि तरि वरिला परासि न वरी हो ।
कंठीं घालुनि माळा झाली श्रीविष्णुचीच नवरी हो ॥ ४२ ॥

सुरनदीचा (आर्या ४०) व सुधासरोवराचा (आ. ४१) हे दोन्ही दृष्टान्त किती समर्पक व मनोहर आहेत ! मुळांत लक्ष्मीची उत्पत्ति व तिचें स्वयंवर यांचें वर्णन अत्यंत मोहक आहे. पंतांचेंही उत्कृष्ट परंतु अगदीं निराळ्या तऱ्हेचें आहे. यानंतर मोहिनीस्वरूप धारण करून दैत्यांना भुरळ पाडून त्यांना फसविल्याचें वर्णन नवव्या अध्यायांत आहे तेंही मुळांतल्याप्रमाणें सुंदर वठलें आहे. दैत्यांच्या समुदायांत अमृतकलश घेऊन मोहिनी वाढावयास आली तेव्हां

मूर्तिमती ती मंजुळ गीतिच जाणों मृगव्रजीं आली । अ. म. ३.१७.

तिच्या रूपयौवनचेष्टांनीं सर्व दैत्य मोहून गेले.

लीलाविलोकनस्मितनर्मांहीं न भुलला न आढळला ।
त्यांत पदर तद्वैर्याकरवीं म्हणवावयासि हा ! ढळला ॥ अ. म. ३.१९.

इतकें झाल्यावर मग काय ? सर्व दैत्य अगदीं पागलच बनले व हातांतलें अमृत गमावून हात चोळीत परत गले.

' अमृतमथन ' काव्य येणेंप्रमाणें फार सुंदर साधलें आहे. तथापि भाषेची व आर्यारचनेची घाटणी यांत इतकी सफाईदार व घटलेली दिसत नाहीं. व्याकरण-दृष्ट्या कांहीं दोषही यांत राहिले आहेत. यांतील पुष्कळसे दोष अशुद्ध पाठा-मुळेंच उत्पन्न झालेले असले पाहिजेत यांत शंका नाहीं. ते पराडकरांची प्रमाण आवृत्ति प्रसिद्ध होईल तेव्हांच नाहींसे होणारे आहेत.

४०. ' अमृतमथना'स सोडून आतां आपण मंत्रभागवतांतील पुढच्या कथे-कडे वळूं. १० व ११ अध्यायांत देवदैत्यांचा पुनः संग्राम झाला तो वर्णिला आहे. पंतांनीं मंत्रभागवतांत तो त्रोटकपणें आणला आहेच. नंतर १२ व्यांतली मोहिनीस्वरूप पाहून शंकरांची उडालेली गाळण पंतांनीं फार मजेदार रीतीनें परंतु मर्यादेनें वर्णिली आहे. १३ व १४ हे अध्याय पुनः मन्वंतरांच्या परिगण-नाचे असून ते पंतांनीं गाळलेच आहेत. अ० १५ पासून वामनावतारचारित्रास सुरवात झाली आहे.

४१. वामनावताराचें कथानक हें मूळ भागवतांतील अत्यंत सुंदर रीतीनें वर्णिलेल्या कथानकांपैकीं एक आहे. मूळ कथानक तर उदात्त आहेच पण भाग-वतकारांनीं तें वर्णन करण्यांत आपल्या सहृदयतेची व कौशल्याची अगदीं हद्द दाखविली आहे. सहाव्या स्कंधापासून उत्तरोत्तर त्यांच्या वाणीला अधिकाधिक रंग चढत चालला असून येथें तर त्याची परमावधि झाली कीं काय असें वाटतें. तथापि नवव्या स्कंधांतील अंबरीषाचें आख्यान, पुरूरव्याचे चरित्र इत्यादि कथा देखील अशाच सुंदर आहेत. त्या सर्व वाचून भागवतकारांच्या वाणींत अवगाहन घडल्याकारणानें मन प्रसन्न झाल्यावांचून रहात नाहीं. प्रस्तुत वामनावतारकथा ही १५ ते २३ या नऊ अध्यायांत आलेली असून या अध्यायांची एकंदर श्लोक-संख्या ३३५ आहे. या ३३५ श्लोकांच्या वामनावतारकथेचें सार मंत्रभागवतांत पंतांनीं केवळ २८ आर्यांत सांगितलें आहे. अर्थात् पंतांच्या अतिसंक्षेपकौशलाचें कौतुक करण्यापलीकडे या आर्यांचें फारसें महत्त्व नाहीं. आणि पंतांनीं तरी इतरत्र वामनचरित्र विस्तारानें वर्णिलें होतें म्हणूनच मंत्रभागवतामध्ये त्याचा असा अतिसंक्षेप केला. अर्थात् मंत्रभागवताच्या वाचकांना या अतिसंक्षेपानें दचकवून ' माझें दुसरें विस्तृत वामनचरित्र आहे तें आपण वाचा ' अशी सूचना देण्याचें काम हें अतित्रोटक वामनचरित्र चांगलं बजावील यांत शंका नाहीं.

तथापि त्यांतल्यांत्यांत थोडीशी गंमत केल्याशिवाय पंतांना राहवलें नाहीं. बळिराजाचे गुरु कवि ऊर्फ शुक्राचार्य यांनीं अनेक यज्ञ व तपें करून बळीचें बळ वाढविलें या गोष्टीस अनुलक्षून पंत म्हणतात—

> वाढविलें बळ कविनें बळिचें, अनिळें जसें चि अनळाचें ।
> कीं सुरस वाहणें तें गुरुजळदाधीन शिष्यपनळाचें ॥ १०६ ॥

मेघ जर पाऊस पाडील तर पन्हळ चांगला वाहील. येथें पंतांनीं गुरूला मेघाचा व शिष्याला पन्हळाचा दृष्टान्त दिला आहे. तो जरी समर्पक आहे तरी इतका क्षुल्लक व चमत्कारिक आहे कीं तो वाचून हसूं आल्याखेरीज रहात नाहीं.

४२. आतां आपण पंतांच्या '**वामनचरिता**'कडे वळूं. सातव्या स्कंधांतील प्रल्हादकथेप्रमाणें वामनकथेचेही तीन भाग पडतात. पहिला भाग वामनजन्मापर्यंतचा प्रास्ताविक स्वरूपाचा होय. यांत बळीचा इंद्रावर जय व त्यास इंद्रपदप्राप्ति, त्यामुळें देवमाता अदिति हिचा खेद, अदितीला पयोव्रताचा उपदेश व त्यामुळें तिला गर्भसंभव, इतकी हकीकत येते. ही १५, १६, १७ या अध्यायांत आली आहे. पुढें दुसरा भाग म्हणजे १८, १९ व २० या अध्यायांचा. यांत बटु वामनाचें बळीकडे गमन, त्रिपाद भूमीची याचना व शुक्राचार्य निषेध करीत असतांही बळीनें केलेलें त्रिपाद भूमीचें दान, इतके विषय आले आहेत. पुढें अंतिम भागांत म्हणजे २१, २२ व २३ अध्यायांत वामनाच्या दुसऱ्या पावलाचें स्वर्गलोकास व्यापून सत्यलोकीं गमन, वामनाचें हें कपट पाहून बळीच्या अनुयायी दैत्यांचा वामनावर झालेला रोष, तिसऱ्या पावलाकरितां बळीनें केलेलें स्वमस्तकदान, बळीचें इंद्रपदापासून उच्चाटन व त्याची सुतळीं स्थापना इ० वृत्तान्त आला आहे. या एकंदर आख्यानाची श्लोकसंख्या ३३५ आहे हें वर सांगितलेंच आहे. पंतांच्या 'वामनचरित्रा'ची संख्या १९९ आहे. पंतकृतीची पद्यसंख्या जी ही इतकी कमी दिसते ती मुळांतील अनवश्यक, बिनमहत्त्वाचे व काव्यहानिकारक प्रसंग गाळून टाकल्यामुळें झालेली आहे. पंधराव्याच अध्यायांतील अमरावती नगरीचें वर्णन, १६ व्या अध्यायांतला अदितीला पयोव्रतोपदेश, ब्रह्मदेवकृत गर्भस्तुति इ० प्रकरणांचा पंतांनीं अतिसंक्षेप केला आहे. परंतु इतर सर्व कथानक त्यांनीं मुळाइतकेंच किंबहुना कित्येक ठिकाणीं मुळापेक्षांही जास्त विस्तारानें वर्णिलें आहे. या आख्यानांतील पुष्कळशा आर्या मुळाच्या अगदीं भाषांतररूप अशा सुद्धां उतरल्या आहेत. मुळाचें बरोबर

भाषांतर केलेलें पहावयाचें असल्यास पंतांच्या या आख्यानांतील ९८, ९९, १०४, १०५ या आर्या मुळांतील अ० २० श्लोक ८, ९, ११ यांच्याशीं ताडून पहाव्या. त्याचप्रमाणें आर्या १३४, १४०, १४१, १४२ या मूळ अ० २२ श्लोक १५, २१, २२, २३ यांच्याशीं अनुक्रमें पडताळून बघाव्या. विस्तारभयास्तव येथें उतारे देतां येत नाहींत. पुष्कळ वेळां मूळ श्लोकांच्या अर्धांतला आशय पंत आपल्या आर्येच्या पूर्वार्धांत आणतात व उत्तरार्धांत स्वतःच्या कल्पनासौष्ठवानें एकाद्या सहृदय व सुंदर अशा अलंकाराची योजना करतात. अशा तऱ्हेची पद्धति स्वीकारल्यानें पंतांच्या हातून पुष्कळ ठिकाणीं मुळापेक्षां विस्तारही झाला आहे. कांहीं ठिकाणीं पंतांनीं संक्षेप अतिशय मार्मिकपणानें केला आहे. मुळांतील १६ व १७ हे लांबलचक अध्याय काव्यदृष्टीनें खरोखर हानिकारक आहेत. सोळाव्यांत कश्यप व अदिति यांचीं लांबच लांब भाषणें असून अदितीला केलेला पयोव्रतोपदेश आहे. हा पयोव्रतोपदेश अलीकडल्या एकाद्या दक्षिणालोलुप उपाध्यानें आपल्या भोळ्या यजमानस्त्रीस व्रतांचा व उद्यापनांचा उपदेश करावा त्याप्रमाणें दिसतो. पुढें १७ व्या अध्यायांत भगवंतांनीं प्रकट होऊन अदितीस केलेलें वरदान आहे तें जरी सुगम व कथानकाच्या दृष्टीनें अवश्य असलें तरी काव्य या नात्यानें विशेष रमणीय नाहीं. तेव्हां ९० श्लोकांचें हें दोन अध्यायांचें भारूड पंतांनीं संकुचित करून केवळ ९ आर्यांत आणलें आहे. (वा. च. १६–२४). पुढें १८ व्या अध्यायांत मात्र वामनजन्म, वामनाचें उपनयन व त्याचें बलियज्ञाप्रत गमन वगैरे सुंदर कथाभाग असल्यानें तो पंतांनीं विस्तारानें वर्णन केला आहे. वामनजन्मप्रसंगींचें वर्णन––

मूळ—श्रोणायां श्रवणद्वादश्यां मुहूर्तेऽभिजिति प्रभुः ।
सर्वे नक्षत्रताराद्याश्चक्रुस्तज्जन्म दक्षिणम् ॥ भा. ८. १८. ५.

पंतकृति—भाद्रपद शुक्ल पक्षीं मध्याह्नीं द्वादशीदिनीं श्रवणीं ।
प्रकटे प्रभु वर्षाया अमृत जनीं स्वपदपंकजप्रवणीं ॥ वा.च.२५

त्यावेळीं, दिशः प्रसेदुःसलिलाशयास्तदा प्रजाः प्रहृष्टा ऋतवो गुणान्विताः ।
द्यौरन्तरिक्षं क्षितिरग्निजिह्वा गावो द्विजाः संजहृषुर्नगाश्च ॥
भा ८. १८. ४.

(पंतकृत रूपांतर)—प्रभुच्या प्रादुर्भावीं झाल्या विमला दिशा, प्रजा मुदिता ।
गोद्विजसुरग्रहगणीं सुखशोभा ज्ञानसंपदा उदिता ॥
वा. च. २७.

अर्थात् हें रूपांतर मुळाबरहुकूम नाहीं, बरेंचसें गाळलें आहे. जन्मतः तो वामन उपनयनयोग्य असा बटु झाला व त्याचें ऋषींनीं उपनयन केलें; तेव्हां--

सावित्री सविता दे भिक्षा जगदंबिका उमा त्याला । वा. च. ३१

याप्रमाणें त्या 'मायामाणवक प्रभूला' सर्व देवांनीं ब्रह्मचाऱ्याचें साहित्य दिलें. लगेच तो बळीच्या यज्ञमंडपांत गेला. तेव्हां तेथील सभ्यांनीं त्याच्या तेजानें धर्षित होऊन त्याला उत्थापन दिलें.

तेजें धर्षित झाले ग्रह कोण असा रवीस जो साहे ॥ ३८ ॥
भार्गव सशिष्य उठले, सभ्य जनहि, अग्निहि स्वकुंडांत ।
देहांत सर्व सात्विक भाव 'नमस्तेऽस्तु' सर्व तुंडांत ॥ वा. च. ३९ ॥

या आर्येच्या दोन्ही अर्धांतील क्रियादीपक अलंकारानें बहार केली आहे येथील शब्दचित्र इतकें उठावदार आहे कीं, तो यज्ञमंडपाचा व चमकून जाऊन एकदम धडपडून उठणाऱ्या त्या ऋत्विजांचा देखावा रेखल्यासारखा डोळ्यापुढें उभा राहातो.

याप्रमाणें पुढें हें सर्व काव्य उत्कृष्ट उतरलें आहे. एकोणिसाव्या व विसाव्या अध्यायांतील शुक्राचार्य व बलि यांचा धर्मनीतिविषयक संवाद तर फारच सुंदर वठला आहे.पंतांनीं बहुतेक मुळाचाच अनुवाद केला आहे.कोठें कोठें मात्र स्वतः-च्या कल्पना शिरकवून दिल्या आहेत. पूर्वार्धांत मुळाचें भाषांतर करून उत्तरार्धांत स्वतःची कल्पना गोवण्याच्या पंतांच्या शैलीचा मागें उल्लेख केलाच आहे. तिचें एक उदाहरण--

मूळ--यदृच्छालाभतुष्टस्य तेजो विप्रस्य वर्धते ।
तत्प्रशाम्यत्यसंतोषादम्भसेवाशुशुक्षणिः ॥ भा. ८. १९. २६.

पंतकृति-जो संतुष्ट यदृच्छालाभें ब्राह्मण सदैवही असतो ।
वाढे तत्तेज, असा बहुतेजस्कर नव्हे सुधारस तो ॥ ६७ ॥
द्विजतेज असंतोषें शमतेंचि ज्वलन जेवि तोयांत ।
हालाहलांत दुर्गुण जो जैसा काय तेंवि तो यांत ॥वा.च.६८॥

या दोन्ही आर्यांच्या पहिल्या अर्धांत मुळांतील अर्थ समाविष्ट केला असून दुसऱ्या अर्धांत स्वतःच्या कल्पनेनें अलंकार घातले आहेत. केव्हां केव्हां मुळां-तील संदर्भास अनुकूल अशी एकादी स्वतःचीच आर्या पंत रचून घालतात व ती फार सुंदरही असते. उदाहरणार्थ.-

वित्त प्रयोजनाधिक जें तें संरक्षणें असुख रचितें।
किंबहुना जो लोभी जन त्याचे सर्वथा असु खरचितें ॥ ७० ॥

या आर्येस मुळांत आधार नाहीं. एके ठिकाणीं मात्र पंतांचा थोडासा घोटाळा झाला आहे. शुक्राचार्य बळीला श्रेयस्कर नीति कोणची याचा उपदेश करीत असतांना सांगतात.–

सत्यमोमिति यत्प्रोक्तं यन्नेत्याहानृतं हि तत् ॥ भा. ८. १९. ३८.

'ओम्' ('ठीक आहे' 'देतों') असें म्हणणें म्हणजे सत्य होय व 'न' ('नाहीं,' 'देत नाहीं') असें सांगणें म्हणजे अनृत होय. अशा तऱ्हेचा 'सत्य व 'अनृत' यांचा या प्रकरणापुरता पारिभाषिक अर्थ करून मग शुक्राचार्य पुष्कळ ठिकाणीं 'अनृता' नें वर्तन करणें (म्हणजे मागितलें असतां दान देत नाहीं असें म्हणणें, खोटें बोलणें नव्हे) श्रेयस्करच असतें असें प्रतिपादन करतात. पण सत्य व अनृत यांच्या येथें मुद्दाम ठरवलेल्या अर्थाकडे पंतांचें दुर्लक्ष झालें आहे. त्यांनीं खरें बोलणें व खोटें बोलणें असे नेहमींचे अर्थ घेऊन विवेचन केलें आहे तें मुळास अनभिप्रेत आहे. खरें किंवा खोटें बोलण्याचा येथें प्रश्नच निघत नव्हता; दान द्यायचें कीं नाकारायचें हा मूळ प्रश्न होता. (पहा वा. च. ८४ ते ८७).

तिसरें पाऊल बळीच्या मस्तकीं दिल्यानंतर वामनस्वरूपी भगवंतांनीं बळीस सुतळीं जावयास सांगितलें त्यावेळचें वर्णन पंतांनीं फार सुंदर केलें आहे.

प्रभुवर बळिस स्वमुखें प्रथम 'महाराज इंद्रसेन' असें।
संबोधन करुनि वदे करुणेच्या प्रीतिच्या द्रवोनि रसें ॥ १५४ ॥

प्रह्लादज्ञातीसह तूं सुतळा वसिव जा सुरमणीया।
रमविल तुज वसति जशी म्हणणारी कामुका सुरमणी 'या' ॥ १५६ ॥
निश्चिंत रहा सुतळीं रक्षीन सदा तुला सपरिवारा।
माता आपण मागे लागोंचि न दे मुलास परि वारा ॥ वा. च. १५९ ॥

शेवटीं शेवटीं या काव्याला जास्त रंग चढत गेला आहे व पंतांची लेखणीही पुढच्या भागांतच जास्त विस्तार पावली आहे. तेविसाव्या अध्यायांतील शेवटची बळीची एका श्लोकाची प्रार्थना पंतांनीं सहा आर्यांइतकी विस्तृत केली आहे.

४३. 'अमृतमथन' व 'वामनचरित' हीं खंडकाव्यें दोन जुळीं भावंडें असल्याप्रमाणें भासतात. आर्यांची सुबक व प्रौढ परंतु जराशी कृत्रिम धाटणी,

कल्पनांचा विलास, उपमादि अर्थालंकारांचें व यमकादि शद्वालंकारांचें प्राचुर्य, इत्यादि अनेक लक्षांत भरण्याजोगे गुण दोन्ही काव्यांत ठळकपणें दिसून येतात. यावरून हीं दोन्हीं काव्यें एकाच वेळीं, बहुधा काव्यरचनेच्या पूर्वकालांत, अलंकारांची हौस कायम असतांना लिहिलेलीं असावींत असें वाटतें. अर्थालंकारांचें प्राचुर्य तर पदोपदीं दिसून येतें; सहृदयहृदयाह्लादक अलंकारांनीं दोन्हीं काव्यें खचून भरलीं आहेत. दीर्घ यमकाचा मासलाही पंतांनीं अनेकवार दाखविला आहे. एक उदाहरण--

दे प्रभुसि, कवींच्या सुख व्हाया बहु मानसा, वळी काय। (काय--शरीर)
सांगा देवावांचुनि पावे बहुमान सांबळी काय ॥ वा. च. १९१ ॥

येथें नऊ अक्षरांचें यमक साधलें असून द्वितीयार्धातील दृष्टान्ताची योजनाही फार समर्पक झाली आहे.

वामनचरित काव्याचें निरीक्षण संपलें. आतां यापुढें आपल्याला पुनः मंत्रभागवताकडे वळलें पाहिजे. पण तेथेंही यानंतर अष्टमस्कंधांत विशेष प्रेक्षणीय असा भाग राहिलेला नाहीं. चोविसाव्या अध्यायांत, प्रलयकालीं परमेश्वरानें मत्स्यरूप घेऊन, श्राद्धदेव नांवाचा वैवस्वत मनु, सप्तर्षि, औषधी, व बीजें यांचें रक्षण केलें ती कथा आली आहे व पंतांनीं ती नेहमींप्रमाणें सुंदर रीतीनें वर्णिली आहे.

[नवम स्कंध]

४४. श्रीमद्भागवताचा नवमस्कंध हा सूर्यवंशी व चंद्रवंशी राजांच्या वंशावळींनीं व चरित्रांनीं भरलेला आहे. 'वंश' आणि 'वंशानुचरित' हीं पुराणाच्या लक्षणांतील दोन महत्त्वाचीं अंगें पूर्ण करणारा हाच स्कंध असें म्हणण्यास हरकत नाहीं. चवथ्या व पांचव्या स्कंधांतही स्वायंभुव मनूच्या वंशांतील राजांचीं चरित्रें सांगितलीं आहेत. पण ते राजे सर्व प्राचीन व स्वायंभुव मन्वंतरांतील होत. नवव्या स्कंधांत सध्यां चालू असलेल्या म्हणजे वैवस्वत मनूंतील राजवंशांचें वर्णन आहे. अगदीं वैवस्वत मनूपासून आरंभ करून श्रीकृष्णाच्या कालापर्यंत व श्रीकृष्णानंतरच्या कांहीं पिढ्यांपर्यंत देखील सर्व राजवंशांच्या विस्तृत वंशावळी सांगितल्या असून त्यांतील महत्त्वाच्या व्यक्तींनीं काय काय कृत्यें केलीं तींही मधून मधून नमूद केलीं आहेत. नवव्या स्कंधांत भारतवर्षांतील राजवंशांचें वर्णन

श्रीकृष्णाच्या कालापर्यंत आणून सोडल्यानंतर दहाव्या स्कंधांत भागवतकारांनीं ओघास आलेलें श्रीकृष्णाचें चरित्र कथन केलें आहे व अकराव्या स्कंधांत श्रीकृष्णाचें निर्याण व यादवकुलांचा नाश वर्णन केला आहे. श्रीकृष्णचरित्राचें कथन करण्याकरितां नवमस्कंधाच्या शेवटीं अपुऱ्या सोडलेल्या वंशावळींचे धागे-दोरे बाराव्या स्कंधांत भागवतकारांनीं पुनः हातीं घेतले असून राजांच्या वंशावळी अगदीं आधुनिक कालापर्यंत कथन केल्या आहेत. भागवत हें श्रीशुकांनीं परीक्षित् राजाला सांगितलें तेव्हां बाराव्या स्कंधांत सांगितलेल्या परिक्षित् राजाच्या काळानंतरच्या वंशावळी भविष्यद्रूपानें कथन केल्या आहेत.

४५. वंश आणि वंशानुचरित हें पुराणाचें सर्वसामान्य लक्षण असल्यामुळें राजांच्या वंशावळी सर्व पुराणांत आल्या आहेतच. त्यांत भारतीयुद्धकालानंतरच्या राजांचे वंश भविष्यकाळाचा उपयोग करून ' पुढें होणार ' अशा स्वरूपानें सांगण्याचा प्रघात हाही सर्व पुराणांस सामान्यच आहे. या भविष्यद्रूपानें सांगितलेल्या वंशावळी बहुतेक पुराणांत ख्रिस्ती शकाच्या पांचव्या, सहाव्या शतकापर्यंत आणून पोंचविलेल्या आढळतात. भागवतामध्यें कांहीं राजांच्या वंशावळी नवव्या शतकापर्यंत आणलेल्या आहेत असेंही कांहीं संशोधकांचें* म्हणणें आहे. या सर्व पुराणांत सांपडणाऱ्या वंशावळी इतिहासाच्या दृष्टीनें अगदीं व्यर्थ व कुचकामाच्या आहेत असें एक मत पाश्चात्य संशोधकांमध्यें जारीनें प्रचलित होतें व अजूनही आहे. पुराणें म्हणजे मतलबी ब्राह्मणांनीं स्वतःचें स्तोम माजविण्याकरितां लिहिलेलीं बाडें असा जो एक समज पाश्चात्य संशोधकांमध्यें व संस्कृतज्ञांमध्यें दृढमूल झालेला असतो त्याचेंच वरील मत हें एक पिल्लूं होतें असें समजण्यास प्रत्यवाय नाहीं. सर्व पुराणाविषयींची ही तुच्छता व वंशावळींसंबंधाचा हा अविश्वास अजूनही नाहींसा झाला आहे असें नाहीं; परंतु समग्र पुराणांचा नसला तरी निदान त्यांतील वंशावळींचा कैवार घेण्याची बुद्धि पाश्चात्यांपैकीं कांहीं चिकित्सकांना होऊं लागली आहे ही अश्रुतपूर्वच गोष्ट समजली

---

* नवव्या दहाव्या शतकांतील कैलकिल यवनांचा वंश भागवतात विस्तारानें वर्णन केला आहे असें दाखवून त्यावरून भागवताचा काल ठरविण्याचाही यत्न श्री. रा. चिंतामणराव वैद्य यांनीं केला आहे. भागवताच्या कालाची चर्चा करतांना वैद्यांच्या या मताचा उल्लेख व त्याची माहिती दिली आहेच. (पहा, मागें पृ. ८, ९.).

पाहिजे. एफ्. ई. पार्जिटर नांवाचे एक विद्वान् साहेब हिंदुस्थानच्या सनदी नोकरांच्या मालिकेंतले एक मणि होते. त्यांनीं पुराणांतील वंशावळींचा अभ्यास करून कांहीं पुस्तकें व लेख लिहिले आहेत. * हे साहेबही, 'ब्राह्मण लबाड, ब्राह्मण आपमतलबी, ब्राह्मणांनीं धर्माच्या नांवानें देश अज्ञानांत व दास्यांत ठेवला' वगैरे महातत्वांशीं बेइमान झालेले नाहींतच; उलट, 'ब्राह्मण हे मूळचे अनार्य होते, त्यांचा धर्म रानटी, जादूटोण्याचा होता; व वैदिक धर्म हा मूळचा क्षत्रिय आर्यांचा होता;' या स्वतः शोधून काढलेल्या नव्या सिद्धांतांची पुस्ती त्यांनीं जुन्या तत्वांना जोडली आहे! तथापि पुराणांतलि वंशावळींवर त्यांचा विश्वास असून त्यांमध्यें खरा इतिहास ग्रथित झालेला आहे असें त्यांचें म्हणणें आहे. मूळ क्षत्रिय राजांनीं व त्यांच्या भाटांनीं रक्षण केलेल्या वंशावळी ब्राह्मणांनीं पुराणांत घेतांना विकृत केल्या आहेत असा त्यांचा ब्राह्मणांवर टपका आहेच! परंतु निदान क्षत्रियांस तरी ते विश्वसनीय मानतात व त्यांनीं स्वतःच्या केलेल्या वंशावळी खऱ्या आहेत असें त्यांना वाटतें ही तरी समाधानाचीच गोष्ट आहे! असो. वंशावळी खऱ्या आहेत कीं नाहींत हा आपल्यापुढें प्रश्न नाहीं. जशा आहेत तशा त्या सुंदर रीतीनें, स्पष्टपणें व निःसंदेहतेनें सांगितल्या आहेत ही

---

* या साहेबांचीं 'The Purana text of the dynasties of the Kali Age', व 'Ancient Indian Historical Tradition' अशीं दोन पुस्तकें प्रस्तुत लेखकाच्या अवलोकनांत आलीं आहेत. याखेरीज यांनीं पुराणांच्या वंशावळींवर Journal of the Royal Asiatic Society नामक विलायती त्रैमासिकांत बरेच फुटकळ लेख लिहिलेले आहेत. पण ते सर्व वरील दोन पुस्तकांमध्यें गतार्थ झाले आहेत. शिवाय साहेबमजकुरांनीं 'Ancient Indian genealogies—are they trustworthy ?' या नांवाचा एक लेख भांडारकरांच्या ८० व्या जन्म दिनीं त्यांच्या स्मरणार्थ जो ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आला त्यांत लिहिला आहे. या लेखांत पार्जिटर साहेबांनीं आपले कांहीं महत्त्वाचे सिद्धान्त साररूपानें सांगितले आहेत. हा 'भांडारकर स्मारक-ग्रंथ' इकडे कोठेंही सुलभतेनें मिळण्याजोगा आहे. तथापि साहेबबहादुरांचीं विशेष मूल्यवान् मुक्ताफळें पहावयाचीं असल्यास त्यांनीं लिहिलेल्या उपरिनिर्दिष्ट दोन ग्रंथांकडेच वळलें पाहिजे.

गोष्ट त्या सहज वाचून पहाणारासही दिसून येईल. आपल्याला या वंशावळींच्या याद्यांपेक्षां निरनिराळया राजांच्या चरित्रांत ज्या मनोरम कथा सांगितल्या आहेत त्यांजकडेच विशेष लक्ष पुरवावयाचें आहे.

४६. पंतांनीं वंशावळींचा अर्थात् मुळाइतका विस्तार केला नाहीं. तथापि १ ते ८ स्कंधांतील पंतांच्या घाईचा व संक्षेपाच्या प्रमाणाचा विचार करतां पंतांनीं या स्कंधांत लेखणीला बरीच सैल सोडून तिला वावरण्याला बरीच मुभा दिली आहे असें दिसून येतें. स्कंध १ ते ८ पर्यंतची मूळ भागवताची श्लोकसंख्या ७२५४ आहे व पंतांच्या मंत्रभागवताची ११४४ आहे. अर्थात् पंतांनीं मुळाचा ६॥ पटींनीं संकोच केला आहे असें दिसून येतें. नवमस्कंधाचे हेच आंकडे बघितल्यास मूळ ९५४ व पंत ३७४ याप्रमाणें आहेत. म्हणजे येथें पंतांनीं मूळाचा फक्त २॥ पट संक्षेप केला आहे. यापुढील स्कंधांतही पंतांची विस्ताराची प्रवृत्ति अशीच दिसून येते. दशमस्कंधांतील संक्षेप ३॥ : १ याप्रमाणें आहे. एकादशांत तर २ : १ व द्वादशांत २॥ : १ याप्रमाणें पंतांच्या रचनेचें मूळ भागवताशीं प्रमाण पडतें. एकंदर ९ ते १२ स्कंधांची पद्यसंख्या पाहिल्यास मूळ ६८३३ व पंतकृति २४३१ अशी आहे. अर्थात् मुळाशीं पंतकृतीचें प्रमाण २।॥ : १ असें पडतें. हेंच प्रमाण पहिल्या आठ स्कंधांत ६॥ : १ आहे या तुलनेवरून नवव्या स्कंधापासून पंतांची विस्ताराची प्रवृत्ति कशी एकदम वाढली हें दिसून येतें. विस्ताराकडे प्रवृत्ति होण्यास भागवतांतील कथांची उत्तरोत्तर वाढत चाललेली मनोरमता हें कांहीं अंशीं कारण असावेंसें वाटतें.

४७. आणि कवीला विस्तार करावासा वाटेल अशा रमणीय कथा नवम स्कंधांत पुष्कळच आल्या आहेत. आतां कांहीं ठिकाणचीं कथानकें व वर्णनें अलीकडच्या वाचकांना कदाचित् मर्यादेबाहेर गेललीं अशीं वाटतील; पण त्याला कांहीं इलाज नाहीं. सुद्युम्न किंवा इला, सोम व तारका, पुरुरवा व उर्वशी, ययाति व देवयानी, बृहस्पति व ममता, इत्यादि कामुक युगलांचे वृत्तान्त सध्यांच्या वाचकांना अश्लीलच वाटतील यांत संशय नाहीं. पण पुराणें वाचावयाचीं असतील तर पूर्वींच्या लोकांसारखें खंबीर व शुद्ध मनाचें आपण बनलें पाहिजे. शिवाय ज्या ग्रंथांत सोम व तारका यांचा वृत्तान्त सांगितला आहे त्यांतच सुकन्या, पृषध्र, नाभाग, अंबरीष, रंतिदेव, भगीरथ, रामचंद्र इत्यादि अनेक अलौकिक धीरोदात्त व पवित्र व्यक्तींचेंही गुणानुवर्णन केलें आहे हेंही

लक्षांत ठेवलें पाहिजे. पंतांचीं वर्णनें वाचतांना तर मुळांतील अमर्याद वर्णनांचा मुळींच अनुभव येणार नाहीं; कारण अशा ठिकाणीं मुळांतील स्पष्टोक्ति गाळून पंतांनीं अगदीं मर्यादित वर्णन केलेलें आढळतें.

४८. वंशावळींच्या याद्यांमध्यें पंतांनीं पुष्कळच गाळागाळ केली असून मुळांतील कथात्मक भागच खऱ्या विस्तारानें वर्णन केला आहे. कांहीं थोड्या ठिकाणीं मात्र त्यांनीं कथा सांगतांनाही हेतुपुरःसर अतिसंक्षेप केला आहे. अंबरीषकथेचा ती इतरत्र दोनदां वर्णिली असल्यानें व रामचरित्राचा ती इतरत्र अनेकदां वर्णिली असल्यानें पंतांनीं फार संक्षेप केला आहे. एकोणिसाव्या अध्यायांतील ययातीनें सांगितलेलें बोकडाचें रूपक व ययातीचा पश्चात्ताप जरा घृणा उत्पन्न करणारा अश्लीलशब्दयुक्त असल्यामुळें त्याचाही पंतांनीं अतिसंक्षेप केला आहे. असो; नवव्या स्कंधांतील कथांपैकीं रमणीय कथा पुढील होत.—
१ इला–सुद्युम्न कथा; २ सुकन्या–च्यवन कथा; ३ नाभागाची लहानशी कथा; ४ अंबरीषाख्यान; ५ युवनाश्व, मांधाता व सौभरि यांची कथा; ६ हरिश्चंद्राख्यान ७ सगराचा अश्वमेध व गंगावतरण; ८ कल्माषपादाचें कथानक; ९ श्रीरामचरित्र १० निमि व विदेह यांचा वृत्तांत; ११ सोमतारका कथानक; १२ पुरूरवाउर्वशी कथानक; १३ सत्यवती व ऋचीक यांची कथा; १४ परशुरामचरित; १५ ययाति आख्यान; १६ दुष्यन्तशकुंतला आख्यान; व १७ रंतिदेवाची कथा.

४९. यांपैकीं ज्या ज्या कथांना पंतांनीं महत्त्व देऊन त्यांचें थोडें फार विस्तारानें वर्णन केलें आहे अशांचें थोडेसें निरीक्षण करूं. [१] मनूची मुलगी इला, जी वसिष्ठकृपेनें मुलगा म्हणजे सुद्युम्न झाली व शिकारीच्या निमित्तानें शंकराच्या उपवनांत गेल्यावर जिला पुन्हां महिनाभर पुरुषत्व व महिनाभर स्त्रीत्व असें दुहेरी जीवन स्वीकारावें लागलें, तिची ही पहिलीच कथा पंतांनीं सुरेख रीतीनें सांगितली आहे. मुळापेक्षां बराच संक्षेप केला आहे. [२] शर्याति राजाच्या महापतिव्रता सुकन्या नामक कन्येची दुसरी कथा होय. ही पंतांनीं १६ आर्यांत मुळापेक्षां थोड्या संक्षेपानें कथन केली आहे. लहान बालिका असतांना सुकन्येनें अज्ञानानें वारुळांत लकाकणाऱ्या च्यवन ऋषींच्या डोळ्यांना कांटे टोंचले होते. तेव्हां—

देखे नृप, तों केला स्वसुतेनें च्यवन आंधळा कष्टी ।
तदनुग्रह संपादी, अर्पी त्याच्या करीं सुतायष्टी ॥ ३१ ॥

वाचा अर्थांसि तसी त्यासि सुकन्या कदापि सोडीना ।
करुनि प्रसन्न घे ती पतिची आज्ञा कदापि मोडींना ॥ ३२ ॥

येथें 'वागर्थाविव संपृक्तौ' या कालिदासाच्या अत्युत्कृष्ट उपमेची आठवण पंत करून देतात. [३] स्वतःच्या भावांनीं दायभाग न देऊन फसविलें असतां बापाच्या आज्ञेवरून अंगिराऋषींच्या यज्ञांतल्या उरलेल्या वस्तु घेण्यास जाणारा व रुद्रानें त्यांतही अटकाव केला असतां प्रामाणिकपणें रुद्राचा हक्क कबूल करणारा सत्यव्रत्यांचा शिरोमणि नाभाग याची कथा तिसरी होय. ही पंतांनीं मुळाइतक्याच विस्तारानें सांगितली आहे. येथें पंतांनीं

यज्ञवास्तुगतं सर्वमुच्छिष्टमृषयः क्वचित् ।
चक्रुर्विभागं रुद्राय स देवः सर्वमर्हति ॥ भा. ९.४.८.

या मूळ श्लोकाचें भाषांतर

नभग पित्यासि पुसे, तो सांगे, 'यज्ञावशिष्ट हा भाग ।
कोठें रुद्रासि असे, सर्वांही पात्र तो महाभाग' ॥ ५६

असें केलें आहे. या ठिकाणीं मुळांतलि 'क्वचित्' याचा अर्थ केव्हां तरी, एके समयीं असा कालवाचक असून 'कोठें' असें त्याचें केलेलें स्थलवाचक भाषांतर बरोबर झालेलें नाहीं. 'यज्ञशाळेंतल्या उरलेल्या वस्तु ऋषींनीं एके प्रसंगीं (दक्षयज्ञांत) रुद्राला ठरवून दिल्या होत्या तेव्हांपासून रुद्रच त्यांचा अधिकारी झाला आहे," असा या श्लोकाचा आशय आहे तो पंतांच्या आर्येंत नीट आलेला नाहीं. मुळाचा अनुवाद करतांना अर्थाचा अंदाज असा चुकल्याचें पंतकृतींत कोठें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. येथेंच हें लहानसें स्खलन कसें झालें कोण जाणे !

५०. [४] अंबरीषाख्यान मंत्रभागवतामध्यें पंतांनीं १० च आर्यांत आटपलें आहे. कारण याच कथानकावर 'अंबरीषाख्यान' नामक साकीबद्ध व 'भक्तभूषण' नामक विविधश्लोकबद्ध अशीं दोन खंडकाव्यें पंतांनीं रचलीं आहेत. मूळ भागवतांतलि अंबरीषाचें कथानक अतिशय सुंदर आहे याबद्दल वाद नाहीं. पण या दोन्ही पंतकृतींची खुमारी अशी कांहीं उतरली आहे कीं भागवतकारांनाही त्याबद्दल मान डोलवावी असेंच वाटलें असतें. पैकीं साकीबद्ध आख्यानाच्या अवघ्या ४० साक्या असून तें फारच कोमल, प्रेमळ व सरस झालें आहे. विशेषतः शेवटीं शेवटीं तर त्यांत कमालीचा रस उतरला आहे. 'भक्तभूषण' काव्याचे मोठमोठ्या वृत्तांतले ११० श्लोक आहेत. हीं दोन्हीं काव्यें आपापल्या

बरीनें सारखींच मनोहर व हृद्यंगम वठविलेलीं पाहून पंतांच्या कौशल्याचा चमत्कार वाटतो. वामनचरित्रांत किंवा कृष्णविजय पूर्वार्धांत मुळाचें जसें पुष्कळ ठिकाणीं बरहुकूम रूपांतर केलें आहे तसें या दोन्ही काव्यांत केलेलें नाहीं. मुळांतील कथाभाग साकल्यानें लक्षांत घेऊन मग पंतांनीं आपल्या कल्पनेस व प्रतिभेस मोकळेपणीं चालना देऊन हीं काव्यें निर्माण केलेलीं दिसतात. दोघांमध्यें सरस कोणचें याची निवड करणें मोठें कठीण आहे. संक्षिप्त, साधी, कोमल व क्वचित् बहारीच्या कल्पनाचमत्कृतीनें युक्त अशी कविता ज्याला पसंत पडत असेल त्याला साकीबद्ध अंबरीषाख्यान मोहून टाकील. विस्तारशील (elaborate), भरदार, ठिकठिकाणीं कल्पनाचमत्कृति, अलंकार व भाषेच्या कसरती यांनीं नटलेल्या काव्याची ज्यास आवड असेल तो 'भक्तभूषणा'कडे अधिक साभिलाष नजरेनें पाहील. तथापि सद्भाव, प्रेमळपणा हे दोघांतही आहेतच हें सांगण्याची जरूरी नाहीं.

'अंबरीषाख्याना'ला उत्तरार्धांत विशेष बहार आली आहे. सुदर्शन पाठीमागें लागल्यानंतर दुर्वासऋषि प्रथम ब्रह्मयाकडे, नंतर शिवाकडे व तेथून श्रीहरीकडे जातो. परंतु श्रीहरीनेंही त्याची उपेक्षा केली.

> शरणागतवत्सलहि, प्रभुहि, ब्रह्मण्यहि, परि हरि तो ।
> सच्छलकासि उपेक्षी, जरि निजरिपुभवहि परिहरितो ॥ १९ ॥

संतांपुढें विष्णु आपला स्वतःचा सुद्धां दुर्बलपणा कबूल करतो व संतच मला माझ्या स्वतःच्या मूर्तीपेक्षांही मान्य आहेत असें सांगतो.

> 'शरणागतरक्षणदक्ष प्रभु संतचि हरिती तापा ।
> संत क्षमादयाशांतीचे सागर विनवी बापा ! ॥ २५ ॥
> जनतापा अमृतकरद्वारा तपनाचा कर हरितो ।
> माझा प्रसाद साधुद्वारा तैसा, लाभे जरि तो' ॥ २६ ॥

सूर्य ज्याप्रमाणें चंद्राच्या द्वारा लोकांचा ताप निवारण करतो त्याप्रमाणें मी साधूंच्या द्वारा लोकांवर अनुग्रह करतों ही उपमा फारच सुंदर आहे. पुढें दुर्वास

> शरणार्थी संवत्सरभरि तो मुनि सर्वत्र भ्रमला ।
> गेला साधुप्रति नौदंडाप्रति खग तैसा गमला ॥ २९ ॥

ही उपमा वाचल्यानंतर 'उपमा कालिदासस्य' असेंच कोण हटानें म्हणत बसेल! तारवांतूनच निघालेल्या, अफाट सागरावर भ्रमण करून निराधार व हताश स्थितींत

यरत डोलकाठीच्याच आश्रयासाठीं येणाऱ्या पक्ष्याची दुर्वासाला दिलेली अत्यंत समर्पक उपमा खरोखर रसिकाला डोलायला लावणारीच आहे यांत शंका नाहीं. पुढें दुर्वास अंबरीषाला शरण आल्यावर त्याला वांचविण्यासाठीं अंबरीष सुदर्शनचक्राची प्रार्थना करतो.--

‘ श्रुतिसाधूदित शक्य विहित म्यां केलें असेल कार्य ।
तरि त्या पुण्यें सुदर्शना त्वां रक्षावा हा आर्य ॥ ३४ ॥
प्रणताभयदमुकुंदबहुमता, चक्रा ! द्विज रक्षावा ।
हें जरि करणें नसेल, आधीं अंबरीष भक्षावा ’ ॥ ३५ ॥

यानंतर **‘भक्तभूषण’** काव्य. या काव्याचें निरीक्षण जरा दुरूनच करणें जरूर आहे. कारण मधून मधून उतारे देतां येण्याजोगें याचें सौंदर्य नाहीं. तें सर्व काव्य-भर जवळ जवळ सारखें भरलेलें आढळून येतें. शिवाय लांब लांब अशीं पुष्कळ भाषणें यांत आहेत तीं सबंध उतरणें तर अशक्यच. बरें मधलाच एकादा उतारा देऊं म्हटल्यास मागील पुढील संदर्भ नष्ट होऊन त्याचें स्वारस्य नाहींसें होतें. असो. मुळांतील ८४ श्लोकांचें आख्यान पंतांनीं ११० श्लोकांपर्यंत वाढविलें आहे. पण पंतांचीं वृत्तें बहुधा स्रग्धरा, शार्दूलविक्रीडित, शिखरिणी अशीं मोठीं असतात. तेव्हां विस्ताराच्या दृष्टीनें मुळाच्या निदान दुप्पट तरी हें आख्यान झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुळाबरहुकुम रूपांतर केलेलीं वर्णनें यांत नाहींत हें वर सांगितलेंच आहे. उदाहरणार्थ प्रारंभींचेंच, श्लोक ४-७ यांत आलेलें अंबरीषराजाचें वर्णन पहावें. हें अत्यंत सुंदर व या काव्यांतील उत्तमांपैकीं एक आहे. परंतु त्याला मुळाचा आधार कांहीं नहीं. मुळांत अंबरीषाचें वर्णन आहे पण तें सर्व त्याच्या विष्णुभक्तीस अनुलक्षून आहे. पंतांचें वर्णन अवांतर गोष्टींसंबंधानें व विशेषतः दानशूरत्वासंबंधानें आहे. दुसरी या काव्यासंबंधानें लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे अलंकारवैपुल्य ही होय. शब्दालंकारांनीं व अर्थालंकारांनीं हें काव्य अक्षरशः खचललें आहे. अर्थालंकार तर बहुतेक प्रत्येक श्लोकांत योजिले आहेत. एक उदाहरण---

प्रथम अमृतीं कालिंदीच्या करी मातिमज्जन--
स्तुतपद मग ब्रह्मध्यानामृतीं अतिमज्जन ।
उठविल कसा सुप्त स्पर्शी महा अहि, साधुंनीं
शुचिपण दिले तीथां गंगादिकांसहि स धुनी ॥ १५ ॥

पूर्वार्धामध्यें यमुनेंत स्नान करणें व ब्रह्मध्यान करणें अशा दोन्ही प्रस्तुत क्रियांचा ' अतिमज्जन करी ' या एकाच क्रियापदानें उल्लेख केला असल्यामुळें तुल्ययोगिता अलंकार झाला आहे. उत्तरार्धांत अप्रस्तुतप्रशंसा आहे. या श्लोकांत यमकाची देखील कौशल्यपूर्ण घडण केली आहेच. तरी प्रेक्षणीय शाब्दिक कसरतीचें आणखी एक लहानसें उदाहरण—

अमळा कमळाकेलिभवना भवनाशना ।
पावना, पाव, नाशीं या व्यसनास सनातना ॥ ५३ ॥

येथें यमक व अनुप्रास या दोन्ही शब्दालंकारांचा सुंदर विलास दृष्टीस पडत असूनही अर्थास काठिन्य आलेलें नाहीं हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. मुळांतील लहानशा कथेच्या मानानें हें आख्यान बरेंच विस्तारलेलें असल्याकारणानें थोडी-बहुत पुनरुक्ति, तीच ती कल्पना घोळून घोळून वर्णन करण्याची प्रवृत्ति, येथें बरीच दृष्टीस पडते. उ० साधूंचें सामर्थ्य व विरोधी दुष्टांचा नाश करण्याची त्यांची शक्ति एकसारखी ७२ ते ७५ या श्लोकांत पुनः पुनः निरनिराळ्या दृष्टान्तांनीं वर्णिली आहे.अशीं जरी कांहीं क्षुल्लक न्यूनें असलीं तरी एकंदरीनें हें आख्यान अत्यंत सुंदर झालें आहे यांत शंका नाहीं. आणि पंतांनीं आपल्या प्रतिभेला मुळांतील मजकुरानें जखडून न टाकतां स्वच्छंदपणें वावरूं दिल्यामुळेंच हा अशा तऱ्हेचा उत्कृष्ट परिपाक त्यांना वठवितां आला आहे. प्रारंभींचें अंबरीष राजाचें वर्णन (श्लोक ४-७), दुर्वासःक्रोधाचें वर्णन (श्लो० १९-२५), श्रीविष्णूचें भाषण (श्लो० ६०-७७) व शेवटची अंबरीषाची दुर्वासाचें रक्षण करविण्याविषयीं चक्रास प्रार्थना (श्लो० ८३-९०) हे भाग त्यांतल्या त्यांत विशेष सुंदर वठले आहेत.

५१. अंबरीषाच्या आख्यानास सोडून आतां आपण मंत्रभागवतांतील पुढच्या कथांकडे वळूं. [५] इक्ष्वाकुवंशांतील महापराक्रमी ककुत्स्थ राजाचा पुत्र युवनाश्व याला मांधाता नामक पुत्र झाला. पत्नीसाठीं मंतरलेलें पाणी स्वतःच प्याल्या-कारणानें युवनाश्वाला पत्नीपासून मुलगा न होतां बिचाऱ्याला स्वतःच गर्भधारणा करावी लागली व पुत्रजन्माचे वेळेस कुक्षिभेद करून घेऊन हाल सोसावे लागले ! पंत या प्रसंगाचें विनोदानें वर्णन करतात.—

मोटें पोट नृपाचें जों जों तों तों प्रजेस भय मोटें ।
दक्षिण कुक्षि विदारुनि जन्मे शिशु साधुयश नव्हे खोटें ॥ ७९ ॥

पुढें इंद्रानें आपली अमृतस्राविणी अंगुलि चोखावयास देऊन वाढविलेला तो युवनाश्वपुत्र मांधाता व त्याच्या पन्नास कन्यांना वरणारा त्याचा एकच जांवई सौभरि ऋषि यांच्या मजेदार हकीकती पंतांनीं संक्षेपानेंच वर्णन केल्या आहेत. [६] मांधात्याच्या वंशांतील त्रिशंकूचा पुत्र हरिश्चंद्र याचें कथानक मात्र पंतांनीं मुळाइतक्याच विस्तारानें वर्णिलें आहे. भागवतांतील ही हरिश्चंद्राची कथा, आपल्याला नेहमीं पुराणांत आढळते त्या करुणरसमय सत्वपरीक्षेच्या कथेहून अगदीं भिन्न आहे. आपल्याला मुलगा झालेला वरुणास अर्पण करण्याचें प्रथम कबूल करून पुत्र झाल्यानंतर हरिश्चंद्र टाळाटाळ करूं लागतो. तेव्हां वरुणाच्या अवकृपेनें त्याला उदररोग होतो. हें पाहून त्याचा मुलगा रोहित शुनःशेप नांवाच्या मुलाला आणून त्याचा वरुणप्रीत्यर्थ मेध (यज्ञ) करण्याचा विचार करतो. त्या शुनःशेपास विश्वामित्र व वरुणदेव हे पाशांतून सोडवितात. अशा स्वरूपाची ही कथा आहे. ही शुनःशेपाची कारुण्यपूर्ण कथा ऐतरेय ब्राह्मणांत आलेली आहे. वेदांमध्यें शुनःशेपाच्या वरुणप्रार्थनेचें एक सूक्त आहे व उदररोगापासून मुक्त करण्याबद्दलच्या प्रार्थनेचीं कांहीं सूक्तें आहेत. तीं याच संबंधाचीं असावीं असें म्हणतात. स्वप्नांत दिलेल्या वचनाच्या पूर्ततेबद्दल विश्वामित्रानें केलेल्या हरिश्चंद्राच्या छळाची कथा जरी भागवतांत नाहीं तरी तिचा निर्देश मात्र त्यांत केला आहे. (भा. ९. ७. २४.) [७] सगराचा अश्वमेध, कपिलाच्या नेत्राग्नीनें सगरपुत्रांचें दहन, भगीरथाचे गंगेला आणण्याविषयींचे प्रयत्न व गंगेचें भूलोकीं अवतरण वगैरे सर्व कथाभाग मुळांत यापुढें ८ व ९ अध्यायांत आला असून पंतांनीं तो ३० आर्यांत सुंदर रीतीनें वर्णिला आहे. मूर्ख सगरपुत्र कपिलाचा अवमान करतात तें वानराची व पिंपळाच्या झाडाची उपमा देऊन पंत वर्णितात.—

बळमत्त सगरसुत ते लंघिति मानूनि चोर कपिलातें ।
न गमे अलंघ्य चळदळनग, दैवत जरिहि, कपिला तें ॥ १५ ॥

वानराचें उपमान घेऊन साधलेला प्रतिवस्तूपमालंकार येथें फार शोभादायक व समर्पक झाला आहे. [८] त्यानंतर वसिष्ठानें शापलेल्या कल्माषपादाचें लहानसें कथानक पंतांनीं ९ आर्यांत वर्णिलें आहे. [९] यापुढें सूर्यवंशांतील मधल्या पुष्कळ पिढ्या टाकल्यानंतर श्रीरामचरित्रापर्यंत आपण येऊन ठेपतों. रामचरित्र १० व ११ अध्यायांत फार प्रेमळ व हृदयंगम रीतीनें भागवतकारांनीं वर्णिलें असून पंतांनींही आपल्या वर्णनांत बराच रस ओतला आहे. मात संक्षेप

पंतांनीं फारच म्हणजे ९० श्लोकांच्या २४ आर्या इतका केला आहे. भागवतकारांनीं एकंदर रामचरित्र संक्षेपानेंच सांगितलें आहे. तरी त्यांतल्या त्यांत रावणवधापर्यंतचें पूर्वचरित्र त्यांनीं फारच संकुचित करून केवळ पहिल्या २३ श्लोकांत आटपून टाकलें आहे; व रावणवधानंतरच्या उत्तरचरिताचा, विशेषतः भरतभेट, राज्यारोहणोत्साह यांसारख्या प्रेमळ प्रसंगांचा जास्त विस्तार केला आहे (श्लोक ६७). पंतांनीं याच्या अगदीं उलट क्रम स्वीकारून पूर्वचरित्र विस्तारानें १७ आर्यांत वर्णिलें आहे व उत्तरचरित्रास ६ च आर्या दिल्या आहेत. असें करण्यांत पंतांनीं विशेष रसिकपणा दाखवला आहे असें म्हणतां येत नाहीं. मूळ भागवतांत सीतेच्या आग्निदिव्याचा उल्लेख नाहीं ही लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. पण पंतांनीं त्या अग्निदिव्याचा उल्लेख केला आहे (आर्या १५९). शिवाय वाल्मीकींचाही उल्लेख मुळांत नसतांना पंतांनीं उगीच केला आहे (आ. १६४). सूक्ष्मपणें पाहिल्यास आणखी एक अवश्य ध्यानांत धरण्याजोगी गोष्ट दिसून येते. रामाच्या चरित्रांतील सीतात्यागाचा जो हृदयद्रावक व ज्याची युक्तायुक्तता अत्यंत संशयित आहे असा प्रसंग, त्याचें भागवतकारांनीं केलेलें वर्णन पहा.—

इति लोकाद्बहुमुखाद् दुराराध्यादसंविदः ।
पत्या भीतेन सा त्यक्ता प्राप्ता प्राचेतसाश्रमम् ॥ भा. ९. ११. १०.

' हजार तोंडें असलेल्या, दुराराध्य, यथार्थ ज्ञान करून न घेतां आरोप करणाऱ्या अशा लोकांना भ्यालेल्या पतीनें टाकलेली ' असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त करून भागवतकारांनीं रामाच्या कृत्याविषयीं नापसंती दर्शविली आहे. पण पंतांनीं येथेंही मुळास सोडलें असून सीतात्यागाबद्दल त्यांनीं रामाची तितक्याच स्पष्टतेनें पाठ थोपटली आहे.

सुज्ञांची मर्यादा किती सांगों ? भी जडाहि परिटा कीं ।
अघ लावी, राम म्हणे ' सौमित्रे, हे सतीच परि टाकीं ' ॥ १६२ ॥

रामचंद्राविषयीं लवमात्र अनादर दाखवावयाचा नाहीं म्हणून असो किंवा कोणत्याही कारणामुळें असो पंतांनीं येथें मुळांतील अभिप्रायाचा विपर्यास केला आहे असें म्हणणें भाग पडतें.

एकंदरींत सहृदयतेच्या दृष्टीनें, प्रेमळपणाच्या दृष्टीने व काव्याच्या दृष्टीनेंही येथें मूळ भागवत पंतकृतीपेक्षां फार सरस वठलें आहे.

[१०] पुढे गुरुशापानें मेलेल्या निर्मीची लोकांच्या नेत्रांमध्यें स्थापना व

त्यामुळें सर्वांच्या पापण्यांची उघडझांक; निमीच्या शरीराचें मंथन करून त्यापासून विदेह नामक पुत्राचें उत्पादन; वगैरे कथा पंतांनीं १० आर्यांत सांगितली आहे. [११] येथें सूर्यवंशाचा वृत्तान्त संपून सोमवंशास प्रारंभ होतो. सूर्यवंशाचे जे राजे वर सांगितले ते सर्व पराक्रमी, शुद्धाचरणी, अनेक धीरोदात्त सद्गुणांनीं युक्त असे वर्णिले आहेत. पण सोमवंशास सुरवात होतांच व्यभिचार, परदारहरण, कपट वगैरे दुर्गुणांनीं भरलेल्या राजांच्या चरित्रांस प्रारंभ होतो. पहिलें सोमाचेंच कथानक नीतिदृष्ट्या किती गर्ह्य गोष्टींनीं भरलेलें आहे ! चंद्रवंशाचा मूळ पुरुष जो बुध तोच सोम व बृहस्पतीची बायको तारा यांपासून व्यभिचारानें जन्मलेला ! असो. या हकीकतींच्या जास्त अंतरंगांत शिरून कोमल प्रकृतीच्या वांचकांस न दुखविणेंच बरें. [१२] यापुढील पुरूरवा-उर्वशीची कथा तरी याच मासल्याची आहे. पुरूरवा हा, बुध व मागें अगदीं प्रथमच उल्लेखलेली मनूची कन्या इला यांचा पुत्र. त्याची हकीकतही पंतांनीं मुळापेक्षां संक्षेपानें पण एकंदरींत चांगल्या रीतीनें सांगितली आहे. कालिदासाच्या विक्रमोर्वशीय नाटकावरून याची कथा सर्वांच्या परिचयाची असतेच. ही कथा अत्यंत प्राचीनांपैकीं असून ऋग्वेदांतही तिचा उल्लेख आहे. [१३] पुरूरव्याचा ज्येष्ठ पुत्र आयु. त्या आयूच्या वंशांतील कन्या सत्यवती ही ऋचीक नामक ऋषीस दिलेली असून तिच्यापासून जमदग्नि उत्पन्न झाले. सत्यवतीची आई म्हणजे क्षत्रिय स्त्री; तिच्याकरितां मंत्रांनीं सिद्ध केलेला चरु सत्यवतीनें खाल्ला त्याचा परिणाम, तिचा साक्षात् पुत्र नव्हे, पण नातू (परशुराम) अत्यंत उग्र, क्षत्रियांपेक्षांही जबरदस्त योद्धा होण्यांत झाला. [१४] यानंतर परशुरामचरितच गायिलें आहे. पंतांनीं तें बरेंच विस्तारानें म्हणजे ३४ आर्यांत वर्णिलें असून तें फार सुंदर साधलें आहे. पित्याच्या वधानें क्रुद्ध झालेल्या सहस्रार्जुनाच्या मुलांनीं जमदग्नीचा वध केला तेव्हां जमदग्नीचा पितृनिष्ठ सुत परशुराम,

> यमसा खवळे, शवसह बंधूंच्या करुनियां अधीन रडीं ।
> उसळे म्हणे ' अरींचीं कापीन असींच मी कधीं नरडीं ' ॥ २४२ ॥

पूर्वार्धांतील रसोत्कर्षकारक सहोक्ति अलंकार, भाषेचा आवेश व वीररसानुकूल शब्दयोजना यांच्या योगानें ही आर्या चित्तवेधक झाली आहे. नंतर तो खवळलेला जामदग्न्य

मोटा प्रळयचि करि अरिमूर्ध्यांच्या भांतिदायका ढोंगा ।
अयुनहि मारुनि परिभवपंकांतुनि कीर्ति गाय काढी गा ! ॥ २४४ ॥

येथेंही कीर्तीवर गाईचें रूपक पंतांनीं फार सहृदयतेनें योजलें आहे.

[१५] यापुढील ययातीचें आख्यानही पंतांनीं फार सुंदर रीतीनें मराठींत उतरलें आहे. भारतांतील ययाति आख्यानापेक्षा हें कांहीं बाबतींत निराळें आहे. स्त्रियांच्या व मुलींच्या स्वभावरेखनाच्या बाबतींत पंत फार कुशलता दाखवितात. देवयानी व शर्मिष्ठा या दोघी जलक्रीडार्थ गेल्या होत्या. महादेवास समोरून जातांना पाहून त्या लाजल्या व ' वस्त्र गुरुसुतेचें तें राजसुता नेसली गडबडून. ' तेव्हां बायकांच्या स्वभावास अनुसरून त्या ' दोघी पितृभाग्यमदें स्नेह बुडविती वृथा बडबडून २५८. ' नवऱ्याच्या किंवा बापाच्या भाग्यामुळें ताठून जाऊन स्त्रिया असें करतात हें कोणास माहीत नाहीं ? या दोघींचें हें भांडण पंतांनीं एकाच आर्येत मार्मिकपणें आणलें आहे.

तें कविजा तीस म्हणे, ' सिंहीतें लंघिती शिवा दासी ' ।
राजसुताहि म्हणे, ' कां करिसी तूं भिक्षुकी विवादासी ' ॥ २५९ ॥

या दोघींच्या भांडणाच्या मुळांतील लांबलचक वर्णनाच्या मानानें पंतांनीं दोनच आर्यांत रेखाटलेलें हें शब्दचित्र कितीतरी सुंदर आहे ! [१६] दुष्यंत-शकुंतलाख्यानही पंतांनीं रेखीवपणें १० आर्यांत आणलें आहे. त्यांचा पुत्र भरत याची हकीगत मात्र मुळांत जरा विस्तृत आहे तो पंतांनीं अगदीं संकुचित केली आहे [१७] रंतिदेवाची गोष्ट अति करुण व सुंदर असून पंतांनीं तो फक्त पांचच आर्यांत आटपून टाकली आहे तेव्हां आपणासही तिचा येथें उगीच विस्तार करण्याचें कारण नाहीं.

५२. रंतिदेवाच्या हकीकतीनंतर मुळांत व पंतकृतींतही निरनिराळ्या राजवंशांच्या लांबलचक वंशावळ्या असून त्यांत ऋष्यशृंग, ज्यामघ वगैरे कांहीं राजांच्या त्रोटक कथा आहेत. शेवटीं कौरववंशांतील शंतनु आदिकरून अलीकडच्या राजांपर्यंत वर्णन येऊन ठेपलें असून अखेरीस कौरव, पांडव, यादव यांच्यांतील दुर्योधन धर्म, भीम, अर्जुन, वसुदेव, उग्रसेन, व सरतेशेवटीं श्रीकृष्ण येथपर्यंत नामावळी येऊन पोंचली आहे. मुळांत कित्येक पुढच्या पिढ्यांचेंही आधीं भविष्यरूपानें कथन करण्यांत आलें आहे. शेवटीं श्रीकृष्णाच्या मंगल चरित्राचा

कर्माण्यपरिमेयाणि मनसापि सुरेश्वरैः । सहसंकर्षणश्चक्रे भगवान्मधुसूदनः ॥

कलौ जनिष्यमाणानां दुःखःशोकतमोनुदम् । अनुग्रहाय लोकानां सुपुण्यं व्यतनोद्यशः॥
स्निग्धस्मितेक्षितोदारैर्वाक्यैर्विक्रमलीलया । नृलोकं रमयामास मूर्त्या सर्वांगरम्यया ॥
भा.९.२४.६०,६१,६४.

असा पुढील स्कंधांतील विषय-ची सूचना देणारा त्रोटक उल्लेख करून शुकाचार्यांची वाणी विराम पावली आहे. पंतांच्या लेखणीनेंही

वाराया भूमीचा भर, शरणागत अशेष ताराया ।
माराया दैत्यांतें, अवतरला श्रीनिवास बा राया ॥ ३७४ ॥

अशा रीतीनें श्रीकृष्णचरित्राचा उच्चार करून या स्कंधापुरता विसावा घेतला आहे.

[दशमस्कंध पूर्वार्ध]

९३. दशमस्कंध म्हणजे श्रीमद्भागवताचा गाभाच होय. जसा मूळ भागवताचा त्याचप्रमाणें मंत्रभागवताचाही तो गाभाच झाला आहे. कृष्णविजय हा तर दशमावरचा पंतांचा स्वतंत्रच ग्रंथ आहे. कृष्णविजयाच्या रचनेकडे लक्ष दिलें असतां एकमेकांशीं विसदृश असे रचनेचे अनेक विभाग त्यांत आपल्याला दिसून येतात, हें आपण मागें पाहिलेंच आहे. या निरनिराळ्या विभागांची काव्यविषयक योग्यताही सारखी नाहीं हें अल्प अवलोकनानें सहज दिसून येणारें आहे. स्थूल-मानानें पाहिले तर या ग्रंथाचा पूर्वार्ध बोजड, क्लिष्ट व नीरस असा झाला आहे; व उत्तरार्ध अतिशय सुंदर, सोपा व रसाळ असा उतरला आहे. कृष्णविजयाचा पूर्वार्ध अशा रीतीनें रसिक वाचकांच्या दृष्टींत तात्काळ न भरण्यासारखा झाला आहे ही गोष्ट मंत्रभागवताच्या रचनेच्या वेळीं पंतांच्या चांगली लक्षांत असली पाहिजे. कारण मंत्रभागवताचा दशमस्कंध हा कृष्णविजयांतील न्यूनतेचा उत्कृष्ट रीतीनें पूरक होईल अशाच तऱ्हेनें लिहिलेला दिसतो. कृष्णविजयाचा **उत्तरार्ध,** तर मंत्रभागवत दशमाचा **पूर्वार्ध** अतिशय सुंदर व रसाळ उतरला आहे. पंतांनीं बुध्याहोऊन असें केलें असो वा नसो, कृष्णविजयपूर्वार्धाच्या नीरसतेमुळें व क्लिष्टते-मुळें झालेलें व्यंग सव्याज भरून निघावें अशीच मंत्रभागवतांतील दशमपूर्वार्धाची रचना झालेली आहे यांत संशय नाहीं. समग्र दशमाची उत्कृष्ट गोडी घ्यावयाची असेल तर मंत्रभागवतांतील पूर्वार्ध व कृष्णविजयाचा उत्तरार्ध असा जोड ग्रंथ करून वाचावा म्हणजे पंतांच्या काव्यकौशल्याची पूर्ण प्रतीति येईल. कृष्ण-

विजयाच्या पूर्वार्धात पंतांनीं थोडेंबहुत संक्षेपाचेंच धोरण ठेवलें आहे तर उत्तरार्धांत त्यांनीं अगदीं मनसोक्त विस्तर केला आहे. याच्या उलट मंत्रभागवतामध्यें पूर्वार्ध जास्त विस्तारानें वर्णिलेला असून उत्तरार्ध त्या मानानें जरा जास्त संक्षिप्त केला आहे.

५४. पंतांनीं मूळ कथानकाचा केलेला संक्षेप किंवा विस्तार हा केवळ मन मानेल तसा केलेला नसून स्वतःच्या भूमिकेस व विशिष्ट धोरणास अनुसरून केला आहे हें आपण मागील विभागांत पाहिलेंच आहे. आतां दशमस्कंधापुरतेंच संक्षेपविस्तार करण्याचे त्यांचे विशिष्ट नियम काय दिसून येतात हें पाहूं. हे विशिष्ट नियम अर्थात् मागील सामान्य नियमांवरूनच निघालेले, किंबहुना त्यांचींच निराळीं स्वरूपें आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

(१) मंत्रभागवतांत, व कृष्णविजयांतही, खुद्द बलरामकृष्णांशीं संबंध असलेल्या मुख्य कथेचा तेवढा पंतांनीं आदर केला आहे. कृष्णचरित्राशीं तादृश संबंध नसलेल्या ज्या लहान लहान कथा मधुनमधून क्वचित् येतात त्यांचा बहुधा अतिसंक्षेप केला आहे. उ०, कृष्णानें उलथून पाडलेल्या यमलार्जुनांची पूर्वजन्मींची कथा मुळांत विस्तृत असून पंतांनीं अतिसंक्षिप्त केली आहे (अ० १०); त्याचप्रमाणें द्रोण व धरा या वसूंची (पूर्वजन्मींचे वसुदेवदेवकी) कथा (अ० ८).

(२) कृष्णचरित्राच्या कथेमध्यें सुद्धां जेथें जेथें अध्यात्माचा किंवा वेदान्ताचा संबंध आला आहे तेथें पंतांनीं बहुधा आटपतें घेतलें आहे उ०, ब्रह्मस्तुति (अ० १४); अ० ६० मधील रुक्मिणीच्या भाषणांतलि वेदान्तमय भाग; वेदस्तुति (अ० ८७); वगैरे. हीं सर्व अध्यात्मपर प्रकरणें पंतांनीं गाळलीं आहेत किंवा त्यांचा अगदीं संकोच केला आहे. केव्हां केव्हां अध्यात्मपर ईशवर्णनामधील अध्यात्मविषयक भाग काढून टाकून त्याच्या जागीं साध्या, भाविकांस प्रिय अशा भगवद्यशोवर्णनाची योजना केली आहे; उ०, अ० ८६ मधील वसुदेवकृत कृष्णस्तुति, इ०. एकंदरीनें दशमामध्यें वेदान्तप्रचुर असा भाग फार नाहीं त्यामुळें अशा तऱ्हेच्या गाळागाळीचा प्रकार पंतांस फार करावा लागलेला नाहीं.

(३) भागवतामध्यें निरनिराळ्या देवांनीं, भक्तांनीं अथवा साधकांनीं केलेलीं ईश्वराचीं स्तोत्रें फार येतात. हीं स्तोत्रें बहुधा गाळण्याची पंतांची प्रवृत्ति असते असें आपण पूर्वी अनेकदां पाहिलेंच आहे. ब्रह्मस्तुति (अ० १४), कालियसर्पकृत व कालियस्त्रीकृत कृष्णस्तुति (अ० १६), अक्रूरस्तुति (अ० ४०);—हीं

अतिशय संक्षेप केलेल्या किंवा गाळलेल्या स्तुतींचीं दशमांतली उदाहरणें होत.

(४) नानातऱ्हेचीं सुंदर सृष्टिशोभेचीं वर्णनें, त्याचप्रमाणें नगरें, अंतःपुरें, राजसभा वगैरेचीं वर्णनें भागवतांत कोठें कोठें येतात. हींही बहुधा पंतांनीं गाळलीं आहेत किंवा अतिसंक्षिप्त केलीं आहेत. अशा तऱ्हेचीं वर्णनें काव्यास खरोखर अनुकूल होत व तीं पंतांनीं टाळलीं नसतीं तर बरें झालें असतें असेंही वाटतें. तथापि भगवद्यशोगानाचा प्रमुख हेतु त्यांत साधत नाहीं यामुळें पंतांनीं त्यांजकडे दुर्लक्ष केलें असावें. उ०, अ० २० व २१ मधील अत्यंत सुंदर शरद्वर्णन व कृष्णक्रीडांनीं पुनीत झालेल्या स्थलांचें वर्णन पंतांनीं कृष्णविजयांत व मंत्रभाग- वतांत जवळ जवळ गाळलेंच आहे. हे २० व २१ अध्याय मुळांत इतके सुंदर आहेत कीं, काव्यस्फूर्तीचा लवलेशही नसलेल्या माणसाला ते लोभवून टाकतील व आपण स्वतः त्याचा आशय कांहीं तरी स्वभाषेंत उतरावा अशी प्रेरणा उत्पन्न करतील. परंतु पंतांचें तिकडे विशेष लक्ष गेलेलें दिसत नाहीं. त्यांच्या एकंदर काव्यसमूहाचें अवलोकन करून पाहिलें असतां नैसर्गिक सृष्टिशोभेनें किंवा मानवनिर्मित नगरादि स्थलांच्या शोभेनें त्यांचें चित्त आकृष्ट करून घेतलें होतें असें दिसत नाहीं. सृष्टिवर्णनाची] बहार करून सोडणारा आपल्यांतील मुक्तेश्वर हाच कवि होय.

५९ या चार बाबी पंतांच्या संक्षेपाच्या धोरणासंबंधीं झाल्या. पण पंतांनीं सर्वत्र एकजात संक्षेपच केला आहे असें दिसून येत नाहीं विशेषतः कृष्णविजयांत त्यांनीं पुष्कळ ठिकाणीं विस्तारही केला आहे. मंत्रभागवतांत व कृष्णविजयांत, मुळांत नसलेल्या कांहीं गोष्टी त्यांनीं ठिकठिकाणीं आपल्या काव्यांत समाविष्ट करून देण्यास मागें पुढें पाहिलेलें नाहीं.

(१) अशांपैकीं पहिली गोष्ट म्हणजे पंतांनीं आपल्या काव्यांस लेवविलेली स्वतःची बाह्यभूषा होय. ही बाह्यभूषा बहुधा अलंकारात्मक आहे. मूळ भागवत- काराचें काव्य बहुधा अगदीं साधें, क्वचित् एखाद्या सुंदर दृष्टान्तानें युक्त असें असतें. नानातऱ्हेच्या कल्पनांची गर्दी व अलंकारांचें वैपुल्य ज्यांत आहे असे भागवताचे अध्याय फारच थोडे सांपडतील. पण पंतरचनेची स्थिति याच्याहून अगदीं उलट आहे. मुळामधील कल्पना, मधुन मधून कोठेंतरी दृष्टीस पडणारा उपमादृष्टान्तादि अलंकार तर पंतांनीं आपल्या काव्यांत उतरून घेतला आहेच पण त्याखेरीज स्वतः निर्माण केलेल्या अशा शेंकडों सुंदर अलंकारांची पूजा त्यांनीं आपल्या

अभीष्ट कवितादेवीस बांधली आहे. अर्थात् मुळांत नसलेल्या अशा शेंकडों सुंदर कल्पना, उपमादि अलंकार पंतांच्या काव्यांत दिसून येतात यांत नवल नाहीं. पुष्कळ वेळां पंतांच्या आर्यांचे प्रथमार्ध कथेंतील असून दुसऱ्या अर्धांत पंतांनीं कांहीं तरी सुंदर कल्पना, एकादा बहारदार दृष्टान्त अगर आणखी एकादा अलंकार यांची योजना केलेली असते. रसिकवर्य हंस यांच्या ही गोष्ट लक्षांत आलेली असून ती त्यांनीं नमूद केलेली आहे.

(२) मुळांत वाढावा करण्याचा दुसरा प्रकार म्हणजे टीकेस अनुसरून मुळांतील विषयास पुष्टिकारक असा मजकूर नवीन घालणें हा होय. पंतांनीं भागवत लिहितांना श्रीधरी टीका स्वतःपुढें ठेविली होती. टीकेंतील मजकूर आपल्या काव्यांत आणलेला आहे अशीं ठिकाणें दशमापेक्षां एकादश स्कंधांतच आपल्यास विशेष आढळून येतील. अशा तऱ्हेचें एक उदाहरण सहाव्या स्कंधांत आपण पाहिलेंच आहे.

(३) याशिवाय फक्त कृष्णविजयापुरतेंच पाहिल्यास मुळांतील धोरण न बदलतां कथानकाचा देखील त्यांनीं काव्यसौंदर्यास अनुकूल अशा अनेक ठिकाणीं विस्तार केलला आढळतो. बहुधा सर्व उत्तरार्ध व पूर्वार्धांतील उद्धवगोपींच्या भेटीचा प्रसंग (अ० ४६, ४७, ४८,) पाहिल्यास मुळांतीलच कथानक त्यांनीं एकसारखें वाढवून कसें लिहिलें आहे तें लक्षांत येईल व संक्षेपाप्रमाणेंच विस्तारही पंतांस सुंदररीतीनें कसा करितां येतो याची खात्री पटेल. सुपारीयेवढ्या कापसाच्या बोंडाचा पिंजरून पेरूयेवढाही विस्तार करतां येतो; तशाच तऱ्हेची कृति पंतांनीं केली आहे. किंवा अधिक समर्पक दृष्टांत द्यावयाचा म्हटला तर अगदीं लहानशा रव्याच्या चकतीचा विस्तार करून त्यांत काव्य कल्पनाचें गोड भरण घालून त्याची चांगली फुगीर करंजी पंतांनीं पुष्कळ वेळां बनविली आहे असेंही म्हणतां येईल. असो. या विस्ताराचें विशेष विवेचन पुढें आणखी केलें आहे. (पहा, परिच्छेद ६९, ७०, ७१.)

५६. पंतांच्या संक्षेपविस्ताराबद्दलच्या धोरणाचा इतका विस्तार केला तरी सरतेशेवटीं ' निरंकुशाः कवयः ' या महासूत्राचा उच्चार करून न्यूनसंपूर्णता करावी लागतेच. कांहीं ठिकाणीं त्यांनीं विस्तार कां केला व तशाच तऱ्हेच्या दुसऱ्या कित्येक ठिकाणीं त्यांनीं संक्षेप कां केला याचीं कारणें पुष्कळ वेळां समर्पक रीतीनें देतां येत नाहींत. मंत्रभागवतांत पूतनावध, कालियदमन किंवा गोवर्धनोद्धार हे

प्रसंग विस्तारानें वर्णिले असुन यमलार्जुनोद्धार, अग्निग्राशन, किंवा नंदाची वरुण-शापापासून मुक्तता हे प्रसंग अगदीं संक्षेपानें वर्णिले आहेत. याला कारण बहुधा कवीची लहरच होय. कदाचित् पूतनावधाचे वगैरे प्रसंग यमलार्जुनोद्धार इत्यादि प्रसंगापेक्षां जास्त महत्त्वाचे व काव्यसौंदर्यास जास्त अनुकूल आहेत असें म्हणून समाधान करून घेतां येईल. परंतु कृष्णविजयांत रासक्रीडेसारख्या रमणीय प्रसंगाचें वर्णन तितकें विस्तारानें न करिता उद्धवगोपींच्या भेटीचा त्या मानानें कमी महत्त्वाचा प्रसंग (अ. ४७) कंटाळवाणा होईल इतका लांबविण्यांत पंतांचा काय हेतु होता हें सामान्य तर्कानें मुळींच कळण्यासारखें नाहीं. केवळ कवीची लहर असें म्हणून अशा ठिकाणीं स्वस्थ बसणें भाग येतें. दुसरी उपपत्ति तेथें काय बसवणार ?

संक्षेपविस्ताराच्या बाबतींत पंतांच्या धोरणाचा सामग्र्यानें विचार केला. आतां त्यांच्या दशमपूर्वार्धावरील काव्यांचें एकैकशः निरीक्षण करूं.

५७. प्रथम कृष्णविजयाकडे वळूं. कृष्णविजयाच्या पूर्वार्धाकडे पाहिलें म्हणजे त्यांतील प्रथमच लक्षांत येणारी गोष्ट त्यांत योजलेलें अपूर्व वृत्त ही होय. हें वृत्त '**आर्यागीति**' नामक असून पंतांच्या कृष्णविजय, प्रल्हादविजय व आर्यागीतिमुक्तामाला या काव्यांशिवाय मराठींत दुसरीकडे कोठेंही आढळून येत नाहीं. पंतांनीं आपल्या काव्यांत सर्वत्र वापरून मराठी वाचकांना अगदीं परिचित करून सोडलेल्या गीतिवृत्ताचीही गोष्ट जवळ जवळ अशीच आहे. पंतांनीं गीतिवृत्ताची योजना करून तिला मराठींत रूढ करून टाकीपर्यंत गीतिवृत्तांत बहुधा कोणीही काव्यरचना करीत नसत. फार काय पण खुद्द संस्कृतांतही गीति व आर्यागीति या वृत्तांचा प्रचार असल्याचें दिसून येत नाहीं. संस्कृतामध्यें चिररूढ असलेलें मात्रागणवृत्त म्हणजे छन्दःशास्त्रांत ' आर्या ' हें नांव खरोखर ज्याला दिलेलें आहे तें वृत्त होय. या वृत्ताच्या चवथ्या चरणांत १८ मात्रांच्या ऐवजीं १५ मात्रा असतात; म्हणजे चौथा चरण सामान्य मोरोपंती आर्येपेक्षां (म्हणजे छन्दःशास्त्रोक्त गीतीपेक्षां) तीन मात्रांनीं आखूड असतो. हीच छन्दःशास्त्रोक्त आर्या संस्कृतांतील सर्व कवींनीं उपयोगांत आणली आहे. कालिदासाच्या शाकुन्तल व विक्रमोर्वशीय या नाटकांत वारंवार येणारी आर्या ती हीच व गोवर्धनानें आपली 'आर्यासप्तशती' ज्या वृत्तांत रचली आहे तें आर्यावृत्तही हेंच होय. शंकराचार्यांनीं आपलें सुप्रसिद्ध षट्पदीस्तोत्रही याच वृत्तांत रचलेलें आहे. पिंगलमुनिप्रणीत

छंदःशास्त्रांत मात्रागणवृत्तें पांच प्रकारचीं सांगितलीं आहेत. त्यांचीं नांवें व अंतर्गत रचना खालीं लिहिलीं आहेत त्यावरून त्यांच्या स्वरूपाचा नीट बोध होईल.

१. आर्या—प्रथमार्ध, मात्रा ३० (१२, १८); द्वितीयार्ध मात्रा २७ (१२, १५).

उदाहरण--(१) आर्येच्या प्रथमपदीं। द्वादशमात्रा, तशाच तिसऱ्याही ॥
अष्टादश दुसऱ्याला। आणिक चवथ्यास पंचदश ॥
परशुरामपंत गोडबोले.

(२) ऐसें वदोन वंदिति। ते सारे रामपादपद्मातें।
भक्तमयूरेश्वरकृति-। चित्ताच्या केलिसद्मातें ॥
मोरोपंत, कुशलवाख्यान २,५०.

२. गीति—प्रथमार्ध, मात्रा ३० (१२, १८); द्वितीयार्ध, मात्रा ३० (१२, १८).

उदाहरण—आर्यकथाछंदानें। आर्याच्छंदेंचि जन्मलीं सरलें।
यांहीं माझें तनुवाक्-। कर्ममनःपापं सर्वथा सरलें ॥
मोरोपंत; मंत्ररामायण उपोद्घात १६

३. उपगीति—प्रथमार्ध, मात्रा २७ (१२,१५); उत्तरार्ध, मात्रा २७ (१२, १५).

उदा०—पृथ्वीवरि चापातें। स्वशिरातें वा तऱ्ही लववा।
तुम्ही द्रुत सोडावा। निजजीवितकाम तो लव वा ॥
मोरोपंत; कुशलवाख्यान ८, २८.

४. उद्गीति—प्रथमार्ध, मात्रा २७ (१२,१५); द्वितीयार्ध, मात्रा ३० (१२, १८).

उदा०— जैमिनिकृतभारतगत। हयमेधीं कुशलवाख्यानीं।
हा पहिला अध्याय। श्रवण करावा रसज्ञमुख्यांनीं ॥
मोरोपंत; कुशलवाख्यान १, १७.

५. आर्यागीति—प्रथमार्ध, मात्रा ३२ (१२, २०); द्वितीयार्ध, मात्रा ३२ (१२, २०).

उदा०—तत्सेवाला भरतें। आणविले पांच दूत तेव्हां भरतें।
बोले हतभूभर तें। ऐका येतें कृपांबुनिधिला भरतें।
मोरोपंत; कुशलवाख्यान १२, १.

या पांच वृत्तांपैकीं गीर्वाण साहित्यांत विशेष प्रचलित असलेलें वृत्त, पहिलें आर्या हें होय हें वर सांगितलेंच आहे. पण पंतांना हें खरेंखुरें आर्यावृत्त पसंत नव्हतेंसें दिसतें. त्यांनीं वर निर्दिष्ट केलेल्या पांचही मात्रावृत्तांत पद्यें रचलीं आहेत हें वर उदाहरणादाखल दिलेल्या कवितांवरूनच स्पष्ट होत आहे; व त्यावरून त्यांचें

छंदःशास्त्राचें अध्ययन किती सूक्ष्म होतें हेंही दिसून येत आहे. तथापि त्यांनीं विस्तृत रचना करण्याकरितां या पांचांपैकीं गीति व आर्यागीति हीं दोन वृत्तें आरंभीं पसंत केलीं व त्यांतूनही पुढें आर्यागीतीचा त्याग करून गीति हेंच वृत्त शेवटपर्यंत कायम ठेवलें. यांत लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट येवढीच कीं पंतांनीं जणूं काय गीति व आर्यागीति या नांवांची आपल्याला ओळखच नाहीं अशा रीतीनें या दोन्ही वृत्तांना ' आर्या ' या एकाच नांवानें संबोधण्याचा सर्वत्र क्रम ठेवला आहे. छंदःशास्त्रोक्त ' गीती 'ला ते सर्वत्र आर्या म्हणतात हें सुप्रसिद्धच आहे. त्याचप्रमाणें 'आर्यागीती'चाही त्यांनीं आर्या याच नावानें कृष्णविजयात उल्लेख केला आहे.

वृत्तीं आधीं **आर्या** । श्राव्या सेव्याचि फार साधी आर्या ।
युक्ता सद्यमकानीं । प्यावी रसिकीं करूनी उद्यम कानीं ॥ कृ. वि.१,५.

तथापि पंतांनीं या दोन्ही मात्रावृत्तांचा ' आर्या ' या सामान्य संज्ञेनें जो निर्देश केला आहे त्याला कांहींच आधार नाहीं असें मात्र नाहीं. मात्रावृत्तांमध्यें आर्या (३० व २७ मात्रांची) हीच मुख्य असल्यामुळें ' प्राधान्येन व्यपदेशा भवन्ति ' या न्यायानें सर्व मात्रावृत्तांनाच केव्हां केव्हां संस्कृतांतही ' आर्या ' या सामान्य नांवानें संबोधण्यांत येतें. आर्या ही जाति व गीत्यादिक तिचे प्रकार असेंच मानण्याचा छंदःशास्त्राचा सर्वत्र प्रघात आहे. छंदोमंजरीकारानें आर्या हीच मुख्य धरून बाकीचे गीत्युद्गीत्यादि तिचेच प्रकार आहेत असें स्पष्टच सांगितलें आहे. तेव्हां संस्कृतांतही सर्व मात्राछंदांना आर्या असें म्हणण्याचा प्रघात असल्यामुळें पंतांनींही तेंच सुंदर नाव आपलेंसें करून घेऊन आपण उपयोगांत आणलेल्या मात्राछंदांना लावून दिलें असें दिसतें.

आर्यकथाछंदानें आर्याछंदोंचि जन्मलीं सरलें ।

या कवितेंत आर्याछंदाचा अनेकवचनीं प्रयोग केला आहे यावरूनही आर्या हें नांव त्यांनीं कोणत्या ही एकाच पोटभेदास उद्देशून वापरलें नसून सर्व मात्रावृत्तांना उद्देशूनच वापरलें आहे असें स्पष्ट दिसतें. मात्र संस्कृतामध्यें खरोखरीची छंदःशास्त्रोक्त आर्या हीच सर्वत्र प्रचलित असल्यामुळें ' आर्या ' या सामान्य संज्ञेनें चूकभूल होण्याचा संभव रहात नाहीं. मराठींत पंतांनीं सर्वसामान्य संज्ञा म्हणून ' आर्या ' हें नांव प्रचारांत आणलें, परंतु छंद मात्र ' गीति ' हा प्रचारांत आणून तो सर्वत्र रूढ केला. त्यामुळें गीतीचेंच खरेखुरें नाव आर्या अशी मराठी

वाचकांची समजूत झाली व 'गीति' हें मूळ नांव सामान्य मराठी वाचकांना कधीं माहीतच झालें नाहीं. अशा रीतीनें संस्कृतांत जी गीति तीच पंतांच्या करामतीनें मराठींत 'आर्या' होऊन बसली.

५८. पंताच्या पूर्वी अक्षरगणवृत्तें म्हणजे विविध श्लोक हे फार प्रचारांत होते. त्यांचा त्यांनीं अव्हेर केला नाहींच. पण आपल्या स्वतःचें विशिष्ट असें एकादें मात्रागणवृत्त आपल्या काव्यरचनेसाठीं उपयोगांत आणावें असा त्यांचा प्रथमपासूनचा हेतु दिसतो. त्यांनीं ब्रह्मोत्तरखंड, मदालसाचरित्र वगैरे काव्यांत गीतिवृत्त वापरून पाहिलें व कृष्णविजय, प्रह्लादविजय इत्यादि काव्यांत आर्यागीतिवृत्त पडताळून पाहिलें. यांपैकीं अर्थात् गीतिवृत्तच पंतांना अखेरीस पसंत पडलें आणि असें होणें केवळ साहजिकच होतें. तथापि आर्यागीतीबद्दलही पंतांना कमी अभिमान वाटत होता असें नाहीं. तिलाही 'आर्या' याच नावानें संबोधून ते कृष्णविजयाच्या प्रारंभीं 'वृत्तीं आधीं आर्या **श्राव्या सेव्याचि फार साधी आर्या'** असें म्हणून तिचा गौरव करितात. यावरून कांहीं दिवस तरी आर्यागीतीनें पंतांच्या मनाला वश करून घेतलें होतें असें उघड दिसतें.

यावरून असें दिसुन येतें कीं कृष्णविजय पूर्वार्धांत जी इतकी क्लिष्टता दिसून येते तिला आर्यागीतासारख्या अवघड वृत्ताची योजना फारशी, किंबहुना मुळींच कारणीभूत झालेली नाहीं. सकृद्दर्शनीं आपल्यास असें वाटतें कीं आर्यागीतासारख्या नीरस व अवघड वृत्तांत रचना करणें पतांस फार कठीण गेलें असेल. परंतु आपल्यासारख्यांच्या अनुभवाचें प्रमाण पंतांस लावून उपयोगीं नाहीं. भाषेला इवींतशी खेळविण्याचें त्यांचें सामर्थ्य खरोखरीच अचाट होतें आर्यागीति हें मोठें श्राव्य (ऐकण्यास गोड) व साधें वृत्त आहे असा त्यांनीं स्वदस्तूरचाच शेरा मारून ठेवला आहे. शिवाय हा शेरा अगदीं अक्षरशः खरा आहे हें सिद्ध करणारे कृष्णविजयाचे उत्तरार्धांतील ५०–५४ अध्याय आहेतच. त्यांच्यामधली द्राक्षापाकसम रचनाच आर्यागीतिवृत्तामध्यें पंतांना किती सोज्वळ व सोपें काव्य करता येत होतें हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

५९. मग कृ. वि. पूर्वार्धास इतका कठीणपणा आला कशानें? मला वाटतें यमकरचनेच्या अतिरिक्त बंधनामुळें, अलंकारादिकांची खचून भरती करण्याच्या उद्देशामुळें व कदाचित् ओजोगुणपूर्ण रचना करण्याचा कवीनें स्वतःच बेत ठरविल्यामुळें. यांपैकीं यमकांचा हव्यास हें काव्यास काठिन्य येण्याचें कारण, कृष्णविजय काव्य

जो वर वर पाहील त्याला देखील पटेल. भाषेला वाटेल तशी वळविण्याचें किती ही जरी सामर्थ्य असलें तरी अमुक ठिकाणीं अमुकच अक्षर आलें पाहिजे अशा तऱ्हेचा सात सात आठ आठ अक्षरांपर्यंत निर्बंध पडूं लागला तर त्या रचनेस काठिन्य आल्याखेरीज राहाणार नाहीं. शिवाय आर्यागीति रचतांना प्रत्येक चरणाच्या अंतीं यमक साधण्याची पंतांनीं रीत ठेवली आहे. पंतांच्या नेहमींच्या गीतीमध्यें दुसऱ्या व चवथ्या चरणाच्या अंतींच यमक असतें, तें येथें प्रत्येक चरणांत साधण्याचा कटाक्ष ठेवल्यामुळें अगोदर यमकाचें बंधन दुपटीनें जास्त झालें त्यांत आणखी दीर्घ यमकांचा सोस धरल्यामुळें ' गंडस्योपरि पिटकाः संवृत्ताः ' अशी स्थिति झाली असल्यास नवल नाहीं. कृ. वि. पूर्वार्धांत, पांच, सहा अक्षरांचें तर सर्वत्रच, पण क्वचित् सात आठ अक्षरांचेंही यमक साधलेलें आढळतें.-

वरितिल वर मानव, स-। प्रेम भजुनि तुज; तूंहि परमा नवस ।
सद्भाव पुरविशील, । स्वजनाघतमीं धरूनि वपु रविशील ॥ कृ. वि. २. १६.

ही कृ. वि. पूर्वार्धांतील अगदीं सोपी आर्यागीति. हिच्यांत पहिल्या अर्धांत पांच अक्षरांचें व दुसऱ्या अर्धांत सहा अक्षरांचें यमक साधलें आहे. आर्यागीतीचा पहिला चरण अगदीं लहान, फार तर ८, ९, अक्षरांचा असतो, त्याच्यांत प्रसंगविशेषीं सात आठ अक्षरांचें यमक गुंफणें किती अवघड जात असेल याची कल्पना करावी. कृष्णविजयांत बहुतेक ठिकाणीं जे अवघड शब्द किंवा क्लिष्ट रचना आली आहे ती बहुतेक यमकाकरितां आली आहे हें उदाहरणें घेऊन दाखवितां येईल. धृतवारिरुडर्यकीं (३९. ८), हृदओकामधुनीं (१६. ५२), घोटकरीन (१८. १३), वगैरे सारखे क्लिष्ट व कर्णकटु प्रयोग; शिवाय कशा (३७. २), अहार्य (२४. ७), अशनाया (२३. १२), पाटीर (४८. १), क्षणनीं (१. ३९), वाळीं (१. ३२), अलिक, (२९. २), अवकेशी (३६, २१), लकुच (४८. १), सिचय (३२ ५), शर (पाणी या अर्थीं) (२९. १), शरारु (४४. १६), लंबा (४७. ५१), यांसारखे सामान्य मराठी वाचकांस अवघड वाटणारे शब्द केवळ यमकाकरितां सर्वत्र आणलेले असून त्यामुळें काव्याच्या क्लिष्टतेंत बरीच भर पडली आहे. शिवाय यमकरचनेकरितां सरळ वाक्यरचनेची उलटापालट करावी लागते, दूरान्वयाचा दोष पत्करावा लागतो, सर्वनामांचा, क्रियापदांचा वगैरे ठिकठिकाणीं अध्याहार करावा लागतो. अशा अनेक खटपटी करून पद्यरचना

कशी तरी जमवावी लागते. यमकाच्या पाठीमागें लागल्यामुळें येणारे हे सर्व दोष कृ. वि. पूर्वार्धामध्यें आलेले आहेत. उत्तरार्धामध्यें ५० ते ५४ अध्यायांत आर्यागीति वृत्त कायम असून देखील दीर्घ यमकांचा आग्रह सोडल्यामुळें पंतांच्या रचनेस अतिशय सुगमता आली आहे. या अध्यायांत एकदोन अक्षरांपलीकडे जास्त मोठीं यमकें साधण्याचा अट्टहास पंतांनीं मुळींच केलेला नाहीं. एखादे वेळेस सहजगत्या साधलेंच तर तीन चार अक्षरांपर्यंत यमक साधलें आहे. पण यापेक्षां जास्त फार करून नाहीं. आणि असें सहज, अर्थास क्लिष्टता न आणता साधलेलें यमकच गोड लागतें. मुद्दाम खटपट करून साधलेल्यांत तितकी शोभा येत नाहीं. यमकाचा लकडा नाहींसा झाल्यामुळें ५०–५४ अध्यायांतील आर्यागीति कशा सोप्या झाल्या आहेत याचें एक उदाहरण.

तों यवनांचा भूप । प्रभुचें पाहे जगन्मनोहर रूप ।
नारद कथितें सारीं । ओळखिलीं लक्षणें भगवदाकारीं ॥ कृ.वि.५१.१.

अलंकार साधण्याच्या खटपटीमुळें देखील कृष्णविजय पूर्वार्धाच्या क्लिष्टतेंत बरीच भर पडली आहे असें म्हणावें लागतें. एखादें सर्वांगीण रूपक किंवा सर्व अंगांनीं पूर्ण अशी उपमा साधण्याच्या खटाटोपांत पंत पडले म्हणजे वाक्यरचना बोजड व अवघड होऊन प्रसादाची हानि व्हावयाची हें बहुधा कृष्णविजयामध्यें ठरलेलें असतें. हीं रूपकेंही पुष्कळ वेळां मोठीं अलौकिक किंवा बहारीचीं असतात असें नाहीं. चांदण्या रात्रींचीं, सूर्यप्रकाशविकसित कमळांचीं किंवा अशींच सामान्य कल्पनांनीं युक्त असलेलीं रूपकें कृष्णविजयांत पुष्कळदां येतात व तीं काव्याच्या क्लिष्टतेस कारण होतात.

केशहि शरदमळ न, भा । धवळी अमृतांशुचीहि शरदमळनभा ।
अंबर सितरुचि रजनी । विलासिनी धरि भमौक्तिकें रुचिर, जनीं ॥

(शर (पाणी)+द=जलद, मेघ; शरदमळ=मेघांचा मळ) कृ. वि. २९.१.

यांतील रूपक साधारणपणें परिचित असेंच पण सुंदर आहे. अर्थाकरितां मात्र काव्यसंग्रहकारांनीं या एका पद्यावर दहा टीपा दिल्या आहेत. पराडकरी आवृत्तींत टीपा अगदीं कमी असतात तरी इच्यावर सात टीपा तेथेंही दिल्या आहेत. यावरून या आर्येच्या कठीणपणाची कांहीं कल्पना येईल.

---

* येथपासून पुढें आर्यागीति या वैशिष्ट्यदर्शक नांवाचें कांहीं प्रयोजन नसल्यामुळें पंतांनीं प्रचलित केलेल्या ' आर्या ' याच सुटसुटीत नांवानें आर्यागीतीला संबोधण्याचा या पुस्तकांत क्रम ठेवला आहे.

६०. अशा तऱ्हेच्या क्लिष्टपणामुळें कृष्णविजयपूर्वार्ध जरा अप्रीतिकारक झाला आहे. ' उत्कट प्रीतीमुळें सदर ग्रंथाला (कृष्णविजयाला) एक प्रकारचा विलक्षण साधेपणा आला आहे व वाचकांच्या दृष्टीनें पूर्वार्ध कठीण झाला असला तरी त्यांत मुद्दां प्रसाद आहे ' असे उद्गार पांगारकरांनीं काढले आहेत. (मो. च. पृ. २५७). हे पांगारकरांचे उद्गार अर्थवादात्मक आहेत असेंच मानलें पाहिजे. येथें पांगारकरांना प्रसाद म्हणजे केवळ काव्यसौंदर्य असा अर्थ अभिप्रेत असावा असें वाटतें. ' स्वच्छजलवत् सहसैव यो व्याप्नोति ' अशा तऱ्हेचा, वाचल्याबरोबर सर्व चित्ताला व्यापून टाकून तात्काळ रसाविर्भाव उत्पन्न करणारा गुण पूर्वार्धात दिसून येत नाहीं. त्याचप्रमाणें पंतांच्या अंगीं जन्मतःच असलेली निर्मळ चित्तवृत्ति व भक्तिरसार्द्रता याही काव्यांत दृष्टोत्पत्तीस येत असलीं, तरी त्यामुळें काव्यास विलक्षण साधेपणा आलेला आहे हें पांगारकरांचें म्हणणें फारच थोड्यांस पसंत पडेल. यमकांमुळें, क्लिष्ट कल्पनांमुळें व अलंकारांच्या अवडंबरामुळें कृ. वि. पूर्वार्धाचा साधेपणा नष्ट झालेला असून त्यास बोजडपणा आलेला आहे, असाच कोणीहि रसिक वाचक अभिप्राय देईल यांत संशय नाहीं. असें आहे तरी काव्यसौंदर्य, प्रेमळपणा, भक्तीचा ओलावा हे गुण त्यांत नाहींत असें नाहीं. अनेक ठिकाणीं मुळांत नसलेला असा सुंदर कल्पनांचा विस्तारही दिसून येतो. बहुधा पंतांनीं मुळाला अनुसरलें आहे. तथापि मुळांतील अर्थाला थोडेंबहुत वळण देऊन स्वतःच्या दृष्टांतांच्या योगानें त्याला जास्त शोभा आणण्याची पंतांची खुबीही पुष्कळ ठिकाणीं प्रकट झाली आहे. असो. या काव्यांतील पंतांची धाटणी कशी काय आहे हें पाहण्याकरितां त्याची थोडीशी शलाकापरीक्षा करून पाहूं. कृष्णाकडून निरोप घेऊन गोपींचें सांत्वन करण्याकरितां उद्धव गोकुळांत आला त्या वेळच्या उद्धवाच्या व गोपींच्या भेटीचें वर्णन—

मूळ —तं वीक्ष्य कृष्णानुचरं व्रजस्त्रियः प्रलंबबाहुं नवकंजलोचनम् ।
पीताम्बरं पुष्करमालिनं लसन्मुखारविंदं मणिमृष्टकुण्डलम् ॥

भा. १०. ४७. १.

पंतकृति—वदति असें, तो सुरसा-। पुष्करमालाधर स्मितानन सुरसा ।
पाहे भगवदनुग या । अंतर्धृतविष्णुचरण युवतितनु गया ॥

कृ. वि. ४६.४६.

दृगतिथि उद्धव यांहीं । केला कृष्णोपभुक्तशुद्धवयांहीं ।
जेंवि विशदयज्ञानीं । निर्मळ मोक्षेच्छुनींच सदय ज्ञानी ॥ कृ.वि.४७.१.

मुळांत फक्त उद्धवाला गोपींनीं पाहिलें असें वर्णन आहे. पंतांनीं पहिल्या आर्येंत उद्धवानें गोपींना पाहिलें असें म्हणून दुसरींमध्यें गोपींनीं उद्धवास पाहिल्याचा उल्लेख केला आहे. पहिल्या आर्येंत गोपींना 'अंतर्धृताविष्णुचरण' असें द्व्यर्थी विशेषण देऊन त्यांचें गयेशीं साम्य दाखविलें आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्या आर्येंत गोपींना यज्ञादिक कर्मकांड आचरून भागलेल्या मोक्षेच्छु साधकांची उपमा दिली आहे. या दोन्ही कल्पना मोठ्या मार्मिक व सुंदर असून समर्पक आहेत. मुळांतील उद्धवाचें कृष्णासारखें केलेलें स्वरूपवेषवर्णन पंतांनीं बरेंचसें गाळलें आहे. पण 'कृष्णोपभुक्तशुद्धवयांहीं' हें विशेषण मात्र अर्थपोषक नसून उलट वाईट अर्थ सुचविणारें, केवळ यमकाकरितां आणलेलें आहे. पुढें—

मूळ–शुचिस्मिताः कोऽयमपीव्यदर्शनः कुतश्च कस्याच्युतवेषभूषणः ।
इति स्म सर्वाः परिवव्रुरुत्सुकास्तमुत्तमश्लोकपदाम्बुजाश्रयम् ॥
भा. १०.४७.२.

पंतकृति–म्हणति हतनयन रमणी, । 'हा अच्युतवेषभूत कोण नरमणी ?'।
देववधूप्रतिमा त्या । वेष्टिति त्याला, जशा मधूप्रति माशा ॥
कृ. वि. ४७–२.

हें अर्थात् मुळाबरहुकूम नाहींच; तथापि पंतांनीं स्वतःच्या कल्पनेनेंच सुंदर साधलें आहे. गोपींना दिलेला माशांचा दृष्टांत मात्र चांगला नाहीं. याच्यापुढचाच तिसरा श्लोक—

मूळ–तं प्रश्रयेणावनताः सुसत्कृतं सव्रीडहासेक्षणसूनृतादिभिः ।
रहस्यपृच्छन्नुपविष्टमासने विज्ञाय संदेशहरं रमापतेः ॥ भा. १०.४७.३.

पंतकृति–ते गोपस्त्रीजनता । जाली हरिदासचरणसरसीजनता ।
सस एकांतीं बसका । केली, प्रकटावया निजाशय असका ॥
कृ. वि. ४७.३.

हें रूपांतर मात्र गचाळ झालें आहे. यांत मुळांतील अनेक महत्त्वाच्या पदांचा

अर्थ सुटला असून ' सरसीज ' (कमळ) असला अश्रुत प्रयोग, असका वसका या कटु व रसह्यानिकारक शब्दांची योजना यांच्या योगानें हें पद्य अगदींच वैरस्यावह झालें आहे. यापेक्षां मूळ श्लोक किती तरी सुंदर अर्थानें भरगच्च भरलेला असा आहे !

अशा रीतीनें नमुन्यादाखल पंतांच्या रूपांतरांतील तीन आर्या ओळीनें दिल्या आहेत. त्यावरून पंतांचें एकंदर रूपांतर कसें झालें आहे हें लक्षांत येईल. अगदीं मुळाबरहुकूम रूपांतर करण्याच्या भानगडींत पंत येथें फार करून पडत नाहींत. आर्यागीति वृत्तांत, त्यांतून यमकाच्या कैचीमध्यें सर्वत्र मुळाबरहुकूम भाषांतर होणें शक्य झालें नसतें. अध्याय ३१ मधील गोपीगीत मात्र पंतांनीं अगदीं मुळास धरून पद्यास पद्य याप्रमाणें मराठींत आणलें आहे. पण तें मुळापेक्षांही जास्त क्लिष्ट झालें आहे. अध्याय ३२ मध्यें देखील मुळाबरहुकूम रूपांतर करण्याचा क्रम पुढें चालविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे, पण तो फक्त १८ आर्यांपर्यंतच टिकला आहे. पुढें पंतांनी मनास येईल तसा विस्तार करण्यास आरंभ केला आहे.

६१. आतां समग्र पूर्वार्धामध्यें विस्तारसंक्षेपाच्या बाबतींत पंतांनीं कसकसें धोरण ठेवलें आहे तें अध्यायांच्या क्रमानें थोडेंसें पाहूं व नंतर मंत्रभागवताकडे वळूं. प्रारंभापासून कृष्णविजयामध्यें पंतांनीं थोडेंबहुत संक्षेपाचेंच धोरण ठेवलें आहे आणि रासक्रीडेच्या अध्यायापर्यंत बहुधा तें त्यांनीं कायम राखलें आहे. मधले कांहीं अध्याय तर त्यांनीं अजीबात गाळले किंवा अतिसांक्षिप्त केले आहेत. दहावा ब्रह्मस्तुतीचा अध्याय गाळल्यासारखाच केला आहे. विसावा वर्षाऋतुवर्णनाचा अत्यंत सुंदर अध्यायही गाळला असून केवळ नांवाला तीन आर्या त्याच्या वाट्यास दिल्या आहेत; व यापुढील माधववेणुवादनाच्या मोहक अध्यायाचाही अप्रशस्त संक्षेप केला आहे. सव्विसाव्या अध्यायांत गोपांना श्रीकृष्णाचें ईश्वरत्व गर्गमुनींनीं सांगितल्याप्रमाणें कळून येतें असें वर्णन आहे; तोही अध्याय पंतांनीं गाळलाच आहे. याप्रमाणें कांहीं अध्याय जरी सोडून दिले असले तरी एकंदर वर्णन साग्र परंतु थोड्याशा संक्षेपानें करण्याची पद्धति ठेवली आहे. रासक्रीडेच्या २९ ते ३३ अध्यायांत मात्र पंतांनीं मुळापेक्षां बराच अधिक विस्तार केला आहे; आणि तेथें त्यांच्या काव्याला रंगही जरा जास्त चढला आहे. परंतु रासपंचाध्यायी

आपल्यानंतर पंतांनीं पुन:आपल्या संक्षेपाच्याच धोरणाला चिकटून वर्णन चालू ठेवलें आहे. पसतिसाव्या अध्यायांतील अत्यंत प्रेमळ व भक्तिरसार्द्र गोपिकायुगलगीताचा मात्र पंतांनीं अप्रशस्त असा अतिसंक्षेप केला आहे; त्याचप्रमाणे चाळिसाव्या अध्यायांतील अक्रूरकृत सुंदर स्तुतीचाही. या गोपिकागीतावर व ईश्वरस्तोत्रावर पंतांची मर्जी अगदीं नाराज दिसते. का कोण जाणे! असो. चवेचाळिसाव्या अध्यायापर्यंत असें संक्षेपाचेंच धोरण चालू ठेवल्यानंतर त्या अध्यायापासून पंतांनीं एकदम विस्तार करण्यास सुरवात केली आहे. कंसवधाचा अध्याय (४४) गुरुपुत्रानयनाचा अध्याय (४५) हे दोन्ही अध्याय विस्तारानें वर्णिले आहेत. पुढील ४६ व ४७ या अध्यायांत तर पंतांनीं विस्ताराची कमाल केली आहे. या दोन अध्यायांत उद्धवानें गोकुळाला भेट दिली व नंदयशोदा यांचा आणि गोपींचा शोक नाहींसा केला वगैरे वर्णन आहे. मुळांतील ११८ श्लोकांच्या पंतांनीं १८२ आर्या केल्या आहेत. पुढें अक्रूराला कृष्णानें हस्तिनापुरीं पांडवांचा समाचार घेण्याकरितां पाठविलें ती कथा ४८,४९ अध्यायांत आहे, तीही पंतांनीं मुळापेक्षां विस्तारानें वर्णिली आहे.

६२. आतां मंत्रभागवताच्या दशमपूर्वार्धाविषयीं लिहावयाचें. पण त्याच्याविषयीं कसें व काय लिहावयाचें याचीच मोठी पंचाईत पडणार आहे. खरोखर येथील पंतांची संक्षेपविस्ताराची चातुरी इतकी अप्रतिम आहे, काव्यसौंदर्याची येथें इतकी बहार झालेली आहे व प्रेमळ भक्तिभावाचा व वात्सल्याचा येवढा ओघ वहात चालला आहे कीं त्याची इत्थंभूत कल्पना सर्व काव्य मुळांत वाचल्यानेंच येईल. थोडक्याशा विवरणानें कधींही येणें शक्य नाहीं. मंत्रभागवताच्या पूर्वार्धांत वात्सल्याचा व सात्विक प्रेम्याचा अपार सांठा पंतांनीं लुटविला आहे. मंत्रभागवत हें पंतांनीं अजमासें आपल्या वयाच्या ५४-५५ या वर्षांत लिहिलें. अर्थात् या परिणत वयामध्यें त्यांच्या हातून इतकें वात्सल्यपूर्ण काव्य निर्माण झालें हें योग्यच झालें. उत्कृष्ट कवि हा खरोखर वयाच्या किंवा संसारांतील स्थितीच्या मर्यादेनें बांधलेला असतो असें नाहीं. त्याचें चित्त तन्मय झालें, प्रतिभा उद्दीपित होऊन रचनेचें स्फुरण होऊं लागलें ह्मणजे कोणत्याही रसाचें, कसल्याही प्रसंगाचें वर्णन त्याच्या हातून उत्कृष्ट वठतें. मग त्यास स्वतःच्या वयोवस्थेचा कसलीही अट बांधूं शकत नाहीं. तथापि त्यांतल्यात्यांत वात्सल्यपूर्ण प्रेमाचें वर्णन मंत्रभागवतांत इतकें बहारीचें झालेलें आहे व कृष्णविजयांत तें तितकें

झालेलें नाहीं या गोष्टीच्या खुलाशाकरितां किंचितसें पंतांच्या वयोवस्थेकडे लक्ष पुरविल्यास तेथें त्याचें कांहींच स्पष्टीकरण आढळणार नाहीं असें नाहीं. कृष्णविजय साधारणपणें प्रौढावस्थेत, पूर्ववयांतच पंतांनीं रचला. तेव्हां मित्रप्रेम, दंपतीप्रेम, गृहपतीचें एकंदर आपल्या संसारावर असलेलें सात्विक प्रेम या प्रेमाच्या प्रकारांचा सांठा असलेला कृष्णचरित्राचा उत्तरार्ध पंतांच्या मनास त्यावेळीं आकर्षण करून घेता झाला व तो त्यांनीं कृष्णविजयांत अत्यंत बहारीनें वर्णून दाखविला. कृष्णविजयाचा उत्तरार्ध रचला त्यावेळीं पंतांचें वय पसतिशीच्या आंतबाहेर असावें असें पुढें कृष्णविजयाच्या रचनाकालाविषयीं विवेचन केलें आहे त्यावरून दिसून येईल. हें वय म्हणजे गार्हस्थ्यसुखाचा व तदंगभूत सात्विक प्रेमाच्या अनुभवाचा परमावधीचा काल होय. कृष्णविजयाचा उत्तरार्ध फार मनोहर झाला आहे व त्यांतल्या त्यांत विशेषतः कृष्णाचें संसारचित्र, रुक्मिण्यादींच्या विवाहकथा, सुभद्राहरणासारखे सांसारिक प्रसंग, सुदामदर्शनासारखे बाळमित्राच्या भेटीचे प्रेमळ प्रसंग हे पंतांच्या लेखणींतून अत्यंत मनोहर रीतीनें बाहेर पडले आहेत, हें तें काव्य पहातांच कोणाच्याही ध्यानांत येईल. आणि याचा उलगडा थोडासा तरी त्यांच्या वयःप्रवृत्तीवरून व्हावा असें वाटतें. याच्या उलट, प्रौढपणीं योग्य तऱ्हेनें संसार केलेल्या गृहस्थास परिणत वयामध्यें पुत्रप्रेम, वात्सल्य, सात्विक व निरिच्छ भक्तिभाव यांचा उत्कृष्ट अनुभव घडतो व त्यांच्यामध्येंच त्याचें मन विशेष रंगतें; तेव्हां वात्सल्यानें ओथंबलेल्या पूर्वार्धाचा पंतांच्या हातून उत्तर वयामध्येंच उत्कृष्ट परिपाक उतरावा हीही त्यांच्या वयःस्थितीला अनुसरून योग्यच गोष्ट झाली असें मानण्यास हरकत नाहीं.

६३. मंत्रभागवताच्या दशमपूर्वार्धाची आर्यासंख्या ६६० आहे. म्हणजे मूळ भागवत पूर्वार्धाच्या (श्लोक २०१२) बरोबर एकतृतीयांशाइतका संक्षेप पंतांनीं येथें केला आहे असें दिसून येतें. कृष्णविजयामध्यें जे जे अध्याय पंतांनीं गाळले आहेत किंवा अतिसंक्षिप्त केले आहेत ते ते पंतांनीं येथेंही गाळले आहेतच. शिवाय यमलार्जुनवृक्षांना उखळीनें उलथून पाडल्याचा १० वा अध्यायही पंतांनीं एका आर्येत उल्लेख करून संपविला आहे. ब्रह्मस्तुतीचा १४ वा अध्याय,-प्रावृट्शोभेचा २० वा, माधववेणुनादाचा २१वा, या अध्यायांवरून कृष्णविजयाप्रमाणें पंतांनीं कातरी फिरवली आहेच. पण धेनुकासुराचा वध, वृंदावना-

-तील वनशोभा इत्यादि (अ. १५); कालियमर्दनाबद्दल कृष्णाचें अभिनंदन (अ. १७); नंदाची वरुणशापबंधनापासून मुक्तता (अ. २८) वगैरे अध्याय देखील पंतांनीं अगदीं संपुष्टांत आणले आहेत. रासक्रीडेचें वर्णनही पंतांनीं अतिशय संक्षेपानें पण तितक्याच बहारीनें केलें आहे. मुळांतील रासपंचाध्यायीचे श्लोक १७४ असून त्यांतील सर्व रस पंतांनीं केवळ ३२ आर्यांत (३७५-४०७) उतरला आहे. येथें पंतांच्या संक्षेपकौशलाची खरोखर धन्य म्हणावीशी वाटते. रासपंचाध्यायीपैकीं तिसऱ्या, म्हणजे पहिल्यापासून ३१ व्या अध्यायांत गोपींनीं गायिलेलें प्रेमळ गीत आहे. पंतांनीं तें गीत गाळलेलें आहे पण त्या गाळलेल्या भागाची पुरेपूर भरती करून देणारी एकच मनोरम आर्या त्यांनीं घातली आहे.

भक्तांनें आळवितां गातां गुण चिंतुनी मनीं मूर्ती ।
प्रकटे गोपींत प्रभु होतां तद्बुद्धि निर्मळा पूर्ती ॥ ३९९ ॥

याच्यापुढें ३२ व्या अध्यायांत कृष्णानें प्रकट होऊन गोपींचें समाधान केलें त्याचें सुंदर वर्णन आहे, तेंही पंतांनीं एकाच आर्येत खुबीदार रीतीनें आणलें आहे.

गलदंजनाश्रुमलिनें नयनें त्यांचीं पुसी स्वपाणीनें ।
सांत्वन करी प्रियांचें परमेश्वर अमृतमधुर वाणीनें ॥ ४०० ॥

रासक्रीडेनंतरही पंतांच्या वाणीची मनोहरता कांहीं कमी झालेली नाहीं. पस्तिसाव्या अध्यायांतील अतिशय सुंदर गोपिकायुगलगीत पंतांनीं मंत्रभागवतांत उतरलें नाहीं. पण त्या मधुर प्रेमोद्गारांचें पंतांनीं तिऱ्हाईतपणेंच इतकें मनोहर वर्णन केलें आहे कीं तेथें पंतांना स्वतःलाच आपली धन्य झाली असें वाटलें

ते प्रेमोद्गार मधुर मधुरतर मुकुंदयशहि आधीं तें ।
गात्यांच्या, श्रोत्यांच्या दूर करिति तत्क्षणींच आधींतें ॥ ४२४ ॥
वाहों नये जळांनीं, डोलावें फण करुनि उरगांनीं ।
अश्रूंनीं देवींचे नित्य भिजावें सवस्त्र उर गानीं ॥ ४२५ ॥
सुर अनिमेष तसे खग मृगहि. बसति अहि मयूरही जवळ ।
प्रभुवेणुरवश्रवणीं गायीं वत्सहि न भक्षिती कवळ ॥ ४२६ ॥

या अत्यंत कोमल व प्रेमरसानें ओथंबलेल्या आर्यांपैकीं पहिलींत पंतांनीं गोपिकांच्या युगुलगीताच्या मधुरतेचें वर्णन केलें आहे, तें पंतांचें स्वतःचेंच आहे-

दुसऱ्या आर्येत देखील कृष्णलीलागानानें गोपींची व त्यांच्या भोंवतालच्या चेतन अचेतन सृष्टीची कशी बेभान स्थिति होत असे याचें वर्णन आहे व तें पंतांचें स्वतंत्रच आहे. त्यास मुळांत आधार विशेष नाहीं. तिसरींत कृष्णाच्या वेणुगानानें सर्व सृष्टि नादावून जाऊन कशी स्तब्ध होते याचें वर्णन आहे व तें मात्र कांहींसें गोपींच्या गीतांतून पंतांनीं घेतलें आहे. सर्व सृष्टि नादानें मोहून गेल्याचें गोपींच्या गीतांत पुढीलप्रमाणें वर्णन आहे.—

वृंदशो व्रजवृषा मृगगावो वेणुवाद्यहृतचेतस आरात् ।
दन्तदष्टकवला धृतकर्णा निद्रिता लिखितचित्रमिवासन् ॥ भा. १०.३५.५.

यांतीलही सर्व वर्णन जसेंचें तसें पंतांनीं उतरलेलें नाहीं हें मार्मिकांच्या लक्षांत येईलच या ठिकाणीं पंतांना खरोखरच आपण भागवतांतील रस लुटून नेत असून त्याच्यांत आपली स्वतःची उत्कृष्ट भर घालीत आहोंत असें वाटलें. कारण येथेंच ते म्हणतात–

वाढेल ग्रंथ म्हणुनि आवरितों मी बळेंचि रसनेला ।
परि म्यां भागवतकरें भागवतांतील फार रस नेला ॥ ४२८ ॥

सदातिसाव्या अध्यायांत केशिदैत्याच्या वधाची हकीकत विस्तारानें वर्णन करण्याची पंतांना लहर आली आहे. मुळांत या प्रसंगाचें वर्णन विशेष सरस नसतां पंतांनीं त्याचें वर्णन अत्यंत बहारीचें केलें आहे; (आर्या ४५५–४६४). पुढें त्याच अध्यायांतील व्योमासुराचें वर्णन सुद्धां पंतांनीं सुंदर केलें आहे; (४७०–७७). व्योमासुरास मारून कृष्ण गोकुळीं परत येतो त्यावेळेस गोपींनीं त्याचें स्वागत कसें केलें तें पंत वर्णन करतात.

बर्हप्रसूनपल्लवगुंजास्रग्धातुभूषणा विभुला ।
भुलति तरुलता गोपी किति ज्यां मुरली म्हणे प्रियासि ' भुला ' ॥४७८॥
तेजःपुंज श्रीमत्कुंजविहारी व्रजासि ये सांजे ।
तें गोपी ओवाळुनि सांडिति तनु तदनु हातिंचे सांजे ॥ ४७९ ॥
वाटेत उभी गोपी जी जी घेउनि करांत आरतिला ।
नयनेंचि पी अनंता, ' सद्गुरु ' न म्हणेल कोण आर तिला ॥४८०॥

दुसऱ्या आर्येंतील उत्तरार्धांत गोपींची श्रीकृष्णावरील परमावधीची भक्ति किती वेंचक शब्दांनीं वर्णन केली आहे! दैत्यांना मारून विजयी होऊन आलेल्या कुमार कृष्णाच्या स्वागतविधीच्या या वर्णनांत गोपींची उत्कंठा, उत्सुकता,

धन्यता व कृष्णाबद्दलची काळजी दूर झाल्यामुळें झालेला संतोष हे सर्व भाव अस्फुटरमणीय रीतीनें प्रतिबिंबित झाले आहेत. गोपींनीं केलेल्या स्वागतोचित क्रियांचें वर्णनही सहजसुंदर, समर्पक व मार्मिक आहे. मुळाला अनुसरून जरी अशा तऱ्हेचें सुंदर वर्णन कोणी केलें असतें तरी त्याची कोणीही प्रशंसाच केली असती. पण पंतांच्या या वर्णनाला मुळांत एका अक्षराचाही आधार नाहीं! मुळांत फक्त 'स्तूयमानः सुरैर्गोपैः प्रविवेश स्वगोकुलम्' या शब्दांपलीकडे कृष्णाच्या स्वागताविषयीं अवाक्षर देखील नाहीं. याउपर पंतांस भाषांतरें म्हणूनच जे म्हणणार असतील त्यांच्या पुढें डोकें फोडून घेतलें तरी त्यांचें समाधान होईल असें वाटत नाहीं.

मथुरेंत गेल्यावर कृष्णानें रस्त्यांत भेटलेल्या रजकाकडून वस्त्रें हिसकावून घेतलीं व आपल्याला पाहिजे होतीं तितकीं परिधान करून उरलेलीं तशींच रस्त्यावर टाकून दिलीं. मुळांत या गोष्टीचें केवळ साधें वर्णन आहे.

मूळ—वसित्वात्मप्रिये वस्त्रे कृष्णः संकर्षणस्तथा
शेषाण्यादत्त गोपेभ्यो विसृज्य भुवि कानिचित् ॥भा.१०.४१.३९.

पण पंत येथें एक चातुर्याची कोटि करून म्हणतात.—

पंतकृति—सुहृदां गोपांसह विभु वस्त्रें घेती यथेष्ट, तीं पुरलीं।
लोळति धूळींत पथीं जाणों शोकेंचि अंबरें उरलीं ॥ ५१४ ॥

ही उत्प्रेक्षा पंतांच्या सहृदयतेची व चातुर्याची उत्कृष्ट निदर्शक आहे. मुळांतील कथेचें वर्णन आर्यांच्या पूर्वार्धांत करून उत्तरार्धांत पंत कशा स्वतःच्या उत्कृष्ट कल्पना गोवीत असतात याचेंही हें नमुनेदार उदाहरण आहे.

६४. पंतांच्या सद्भावाचें व प्रेमळ वर्णनशैलीचें आणखी एकच उदाहरण पाहून आपण पूर्वार्धाची रजा घेऊं. कृष्ण तान्हा असतांना एक दिवस यशोदा स्वतः ताक घुसळीत बसली होती; इतक्यांत स्तनपानाकरितां कृष्ण आला व त्यानें आईची रवी धरली. त्या प्रसंगाचें वर्णन भागवतकार करतात.—

क्षौमं वासः पृथुकटितटे बिभ्रती सूत्रनद्धं
पुत्रस्नेहस्नुतकुचयुगं जातकंपं च सुभ्रूः।
रज्ज्वाकर्षश्रमभुजचलत्कंकणौ कुंडले च
स्विन्नं वक्त्रं कबरविगलन्मालती निर्ममन्थ ॥

तौ स्तन्यकाम आसाद्य मथ्नंतीं जननीं हरिः
गृहीत्वा दधिमंथानं न्यषेधत्प्रीतिमावहन् ॥ भा. १०.९.३,४.

हें वर्णन सुंदर आहे यांत शंका नाहीं. पण पंतांचें अत्यंत शुद्ध व प्रेमळ वर्णन पहाः--

मोत्यें मोटीं मोटीं पाच हिरे नीळ माणिकें यांहीं ।
खचित नग सकळ देहीं, गेहीं तद्दीप्ति मायिना कांहीं ॥ १६७ ॥
भरली वरि आनखशिख नंदवधू शुद्धमणिगणें हेमें ।
आंतहि पुत्रीभूतब्रह्माच्या दिव्यगुणगणप्रेमें ॥ १६८ ॥
गळती नेत्रांतूनि प्रेमाश्रुजळें फुलें शिराहूनि ।
ऐसें मथन करी तों श्रीकृष्ण धरी रवीस बाहूनीं ॥ १६९ ॥
बसवी बळेंचि तीस स्तन्यार्थी देव तो धरूनि रवी ।
शिशुपण तिच्या न केवळ उद्धारा आमुच्याहि तें मिरवी ॥ १७० ॥

यांतील दुसऱ्या व तिसऱ्या आर्येतील यशोदेचें वर्णन किती उत्कृष्ट साधलें आहे याची रसिक वाचक तेव्हांच साक्ष देतील. मुळामध्यें यशोदेचें वर्णन एक सुंदर व रमणीय कामिनी या दृष्टीनें विशेष केलें आहे, तर पंतांनीं श्रीकृष्णाची वात्सल्यपूर्ण माता या दृष्टीलाच आपल्या वर्णनांत प्राधान्य दिलें आहे. अर्थात् विशेष अंगांचा व अवयवांचा उल्लेख न करितां सामान्य आभरणाचें वर्णन करून पंतांनीं यशोदेच्या श्रीकृष्णप्रेमावर जो जास्त भर दिला आहे त्यांत त्यांचा अप्रतिम शुद्ध भाव प्रकट होत आहे असें कोण म्हणणार नाहीं ?

६५. येथेंच पंतांच्या गोपीगोडवा, नवदानकेलि, गोपीप्रेमोद्गार वगैरे गोपीजनविषयक स्फुट आख्यानांचा थोडासा उल्लेख करून पुढें जाणें रास्त होईल. यांपैकीं **'नवदानकेलि'** हा श्रीकृष्ण व राधा यांचा संवाद असून त्यांत श्रीकृष्ण राधेला आत्मदान मागत आहे व राधा तें नाकारीत आहे असें वर्णन आहे. अशा तऱ्हेचें हें काव्य असल्यामुळें तें अर्थात्च पंतांच्या भागवती काव्यामध्यें समाविष्ट करतां येत नाहीं. अगोदर राधा हें नांव किंवा या नांवाची व्यक्ति भागवतांत मुळींच आलेली नाहीं व त्यांतून कृष्णानें तिची विनवणी करणें हें तर भागवतांतील वर्णनाच्या धोरणास अगदीं विरुद्ध आहे. शिवाय प्रस्तुत काव्यही साधारणांतलें असून त्याच्यांत विशेष रस प्रकट झालेला नाहीं. **'गोपीप्रेमोद्गार'** हें अगदीं किरकोळ प्रकरण असून त्यांत गोपींचे कृष्णाबद्दलचे रागाचे उद्गार

आहेत. 'गोपीगोडवा' हें ६९ आर्यांचें प्रकरण मात्र अत्यंत सुंदर झालें आहे. श्रीकृष्णप्रेमानें अगदीं वेडावून गेलेल्या गोपींचे कुब्जेला श्रीकृष्णानें अंगसंग दिल्याची बातमी ऐकून निघालेले प्रणयकोपाचे उद्गार यांत आहेत. अर्थात् हे मुळांतील ४७ व्या अध्यायास कांहींसे धरून आहेत. वर्णन सर्व पंतांचें स्वतः-चेंच आहे. शेवटीं श्रीकृष्णावरील सर्व राग शांत होऊन गोपी म्हणतात,—

सर्प जसा सदनांतुनि, चित्तांतुनि वैरभाव, सखि, जावा।
तेव्हां मानें तैसा आतांहि सखा मुकुंद न खिजावा ॥ ६५ ॥
श्रीकुब्जे, श्रीकृष्णा, हा जन चुकला तुम्हांसि निंदून।
नमितों क्षमा करा हो, क्षमित्याचें यश नसेचि निंदून ॥ ६६ ॥

[दशमस्कंध उत्तरार्ध]

६६. 'अभय दिधलें आहे, वाहे शुचिप्रतिभा झरा' असा पूर्वार्धाच्या अंतीं रसिक वाचकांस निर्वाळा देऊन ठेवून बऱ्याच काळानंतर पंत श्रीकृष्णविजयाच्या उत्तरार्धाला आरंभ करतात; व शुचिप्रतिभेचा झरा अस्खलित वहात आहे असा प्रत्यक्ष अनुभव वाचकांना लगेच आणून देतात. आर्यागीति वृत्त अजून कायम आहे. पण दीर्घ यमकांचें स्वतःच्या मागें लावून घेतलेलें झेंगट त्यांनीं आतां टाकून दिलें असून ओजोगुणसिद्धीचीही त्यांची आवड नाहींशी झाल्यासारखी दिसते. कृष्णविजयाच्या उत्तरार्धाची गोष्ट तर राहोच; त्यामध्यें क्लिष्टतेचें नांव देखील नाहीं. पण याच्यापुढें बहुधा केव्हांही त्यांनीं ओजोगुणविशिष्ट असें क्लिष्ट काव्य फारसें रचल्याचें दिसून येत नाहीं. कृष्णविजयपूर्वार्धाची पद्धत त्यांनीं एकदां टाकून दिली ती कायमची दिली. आर्यागीतिवृत्त मात्र त्यांनीं अजून पांच अध्याय कायम ठेवलें आहे. परंतु यमकांचा सोस नाहींसा झाल्यामुळें या पांच अध्यायांतील आर्यागीति अत्यंत सुगम व प्रसादपूर्ण झाल्या आहेत. पूर्वींच्या ४९ अध्यायांतील आर्यागीतींशीं या साध्या आर्यागीतींचा विरोध किती ठळकपणें नजरेस येतो हें मागें ५९ व्या परिच्छेदांत दाखविलेंच आहे. असो. या पांच (५०–५४) अध्यायानंतर आर्यागीतीलाही रजा दिली असून अक्षरगणवृत्तांची योजना केली आहे.

६७. पंतांची वर्णनाची तऱ्हाही ५० व्या अध्यायापासून निवळली असून अलंकार साधण्याचा खटाटोप यापुढें ते फारसा करीत असलेले दिसत नाहींत. काव्यरचनेंत

तन्मय होऊन सहजासहजीं आलंकारिक उद्गार तोंडातून बाहेर आले असतां ते अतिशय शोभादायक होतात. मंत्रभागवतांतले बहुतेक अलंकार असेच स्वाभाविक-पणानें आलेले आहेत. ते साधण्याकरितां खटाटोप करावा लागलेला नाहीं; आणि म्हणूनच मंत्रभागवतामध्यें प्रेमळपणाचे व काव्याच्या उत्कर्षाचे जे सहजस्फूर्तीनें रचलेले भाग आहेत त्यांमध्येंच अत्यंत हृद्य अशा अलंकारांचीं उदाहरणें पुष्कळ सांपडतात. पण कृष्णविजयपूर्वार्धामध्यें तशी स्थिति नव्हती. अलंकार साधण्या-करितां ते खटपट करीत असत. 'लेशहि शरद्मळ नभा' हें मागें दिलेलें कृ. वि. पूर्वार्धांतील उदाहरण अशांपैकींच होय. पण ही अशा प्रकारची मारून मुटकून अलंकार लादण्याची प्रवृत्ति कृष्णविजयउत्तरार्धांत कमी झालेली आहे. आतां येथें देखील आलंकारिक कविता म्हणजे पंतांच्या तोंडातून आपोआप बाहेर पडते असें नाहीं, तथापि अलंकार साधण्याकरितां जो विशेष अट्टहास पूर्वार्धांत केव्हां केव्हां केलेला दिसून येत असे तो आतां नाहींसा झाला आहे. शिवाय ५० ते ५४ अध्यायांत बहुतेक मुळास धरून कथाभाग वर्णन करण्याची पंतांनीं शिस्त ठेवली आहे. या पांच अध्यायांत जरासंधाच्या व कृष्णाच्या झटापटी, मुचुकुंदाची भेट व रुक्मिणीस्वयंवर इतक्या गोष्टी आल्या आहेत. त्या सर्व पंतांनीं सुंदर रीतीनें वर्णिल्या आहेत. मुचुकुंदाच्या हकीकतीपैकीं मुचुकुंदकृत ईशस्तुति पंतांनीं गाळली आहे. रुक्मिणीविवाहकथा मात्र पंतांनीं मुळापेक्षां विस्तारानें वर्णिली आहे,तथापि ५४ व्या अध्यायांत, बलरामानें, रुक्मिणीचें तिच्या भावाच्या झालेल्या दुर्दशेबद्दल सांत्वन करतांना, जो १४ श्लोकांचा वेदान्त सांगितला आहे तो पंतांनीं गाळला आहे. बावन्नाव्या अध्यायांतील रुक्मिणीनें कृष्णाला पाठविलेल्या सप्तश्लोकात्मक पत्रिकेचें पंतांनींही सात आर्यागीतींत सुंदर भाषांतर केलें आहे. पंत कांहीं नेहमीं असें बरोबर भाषांतर करीत नाहींत, तथापि ते जेव्हां भाषांतर करतात तेव्हां त्यांची सरणी कशी असते तें कळावें व अवघड वृत्तांतही भाषांतर करण्याचें पंतांचें कौशल्य कसें अप्रतिम आहे हें दिसून यावें, यास्तव मूळ रुक्मिणीपत्रिकेंतील पहिलाच श्लोक व त्याचें भाषांतर देतों.

मूळ—श्रुत्वा गुणान्भुवनसुंदर शृण्वतां ते निर्विश्य कर्णविवरैर्हरतोऽङ्गतापम् ।
रूपं दृशां दृशिमतामखिलार्थलाभं त्वय्यच्युताविशति चित्तमपत्रपं मे ॥
भा. १०. ५२. ३७.

यंसकृति-श्रोतृमनस्तापहर । त्वद्गुण ऐकोनि, रूप दृष्टिरुचिकर ।
रुचिरवरा मन शिरते । तुजमाजि अलज्ज जें सुखेच्छु सुचिर तें ॥
कृ. वि. ५२. ३४.

हें भाषांतर मुळाबरहुकूम असून फार गोड झालें आहे. असेंच सातही श्लोकांचें भाषांतर सुंदर आहे.

६८. येथें एक मोठी चमत्काराची व मौजेची गोष्ट निवेदन करण्याजोगी आहे. पंतांच्या हस्तालिखित पोथ्यांचा जो संग्रह आहे त्यांत पूर्वार्धाची व उत्तरार्धाची अशा दोन पक्क्या पोथ्या पंतांच्या सुंदर घोटीव हस्ताक्षरांत लिहिलेल्या आहेतच. परंतु जमाखर्चाच्या वहीसारखे उभे धरून लिहिलेले कच्चे खर्डेही कृष्णविजयाच्या कांहीं भागापुरते उपलब्ध आहेत. ह्या खर्ड्यांवर कृष्णविजयाच्या ५० व्या अध्यायापासून म्हणजे उत्तरार्धाच्या प्रारंभापासून ७३ व्या अध्यायापर्यंतच मजकूर लिहिलेला आढळतो. ही कच्ची प्रत म्हणजे पक्क्या प्रतीसारखीच खाडाखोड न करतां सुवाच्य व्यवस्थित लिहिलेली आहे. तरी केव्हां केव्हां पक्क्या प्रतींतील पाठापेक्षां निराळे व अगोदरचे असे पाठ हिच्यांत सांपडतात. अशा पाठभेदांच्या दृष्टीनें ही प्रत बारकाईनें पहात असतां एक मौजेचा प्रकार आढळून आला. ५४ वा अध्याय सर्व आर्यागीति वृत्तांत लिहून काढल्यानंतर त्याच्या पुढें ५५ व्या अध्यायांतला मजकूरही पंत तसाच आर्यागीतींत लिहीत गेले आहेत! सहा आर्यागीति अशा लिहिल्यानंतर ओळ अपुरीच सोडून लिहिणे बंद केलें आहे. त्याच्या खालीं थोडीशी जागा सोडून मग 'पूर्वी रुद्रललाटलोचनाशिखिज्वालामुखीं जो जळे' अशा श्लोकबद्ध रचनेस सुरवात करून ५५ व्या अध्यायास पुनः प्रारंभ केला आहे. पंतांच्या पक्क्या पोथींत व छापील प्रतींतही 'पूर्वी रुद्रलालाट' या श्लोकानेच ५५ व्या अध्यायास प्रारंभ होत आहे व हीच श्लोकरचना पुढे एकसारखी चालू राहिली आहे हें प्रसिद्धच आहे. परंतु पंतांच्या कच्या प्रतीची जी स्थिति वर वर्णन केली आहे तिजवरून असें दिसून येतें कीं पंतांनीं पहिल्या प्रथम पूर्वीच्या चोपन्न अध्यायांप्रमाणें ५५वा अध्याय आर्यागीतींतच लिहिण्यास सुरवात केली होती; परंतु एकदम बेत बदलून त्यांनीं आधीं लिहिलेल्या ६ आर्यागीति मोडून टाकून श्लोकवृत्तांत रचना करण्यास सुरवात केली. त्यांचें कच्या प्रतींतील जें आर्यागीतीचें लेखन आहे त्याच्याच पुढें, त्याच टाकांत, त्याच शाईनें व त्याच अक्षरांत श्लोकात्मक मजकूरही लिहिण्यास सुरवात झालेली आहे. यावरून एकदम बेत बदलून त्यांनीं आर्यागीति

सोडून विविध श्लोकांत रचना करण्यास लगेच सुरवात केली असें दिसतें. आर्या-गीतिवृत्तात्मक ५०-५४हे अध्याय व श्लोकांत रचलेले पुढील ५५ पासूनचे अध्याय यांच्या रचनाकालांत कांहीं अंतर नसून ते लागोपाठ लिहिले गेले आहेत असें यावरून दिसून येईल. वर सांगितल्याप्रमाणें कच्च्या प्रतींत असलेल्या पंतांच्या ६ आर्यागीति व कच्च्या प्रतींत आढळलेले इतर पाठभेद परिशिष्ट १ यांत समाविष्ट केले आहेत. पंतांनीं लिहिलेल्या कच्च्या तावांमध्यें असा कांहीं विशेष प्रकार आहे अशी कल्पना आजपर्यंत कोणासही आली नव्हती असें दिसतें. कारण या कच्च्या प्रतींतील पाठभेदांचा व सहा आर्यागीतींचा आजपर्यंत कोणीही पंतकाव्य-संशोधकानें उल्लेख केलेला दिसत नाहीं.

६९. असो. तेव्हां याप्रमाणें ५५ व्या अध्यायापासून पंतांचा बेत एकदम बदलून त्यांच्या वाणीनें सर्वस्वीं निराळें स्वरूप धारण केलें आहे. ५५ ते ७९ या अध्यायांत पंतांनीं विविधश्लोकात्मक रचना केली आहे. त्यांतील मुख्य वृत्तें शार्दूलविक्रीडित व स्रग्धरा हीं होत. तथापि आठ अक्षरी अनुष्टुभापासून तों एकवीस अक्षरी स्रग्धरेपर्यंत बहुतेक प्रसिद्ध लहान मोठ्या वृत्तांचा पंतांनीं यथारुचि उपयोग केला आहे. या पचवीस अध्यायांतील कथाभाग प्रथित करतांना पंतांच्या स्फूर्तीला बरेंच चालन मिळालें असून बहुतेक ठिकाणीं त्यांनीं मुळापेक्षां विस्तार केला आहे. मुळापेक्षां पंतांच्या अध्यायांची श्लोकसंख्या जरी थोडीबहुत कमी असली तरी पंतांनीं वृत्तें फारच मोठीं धरलीं असल्याकारणानें मुळांतील कथाभागांत पुष्कळच विस्तार करण्यास पंतांना वाव मिळाला आहे. मुळांत बहुतेक ठिकाणीं अनुष्टुभ वृत्त असतें तर पंतांचें अतिशय बाहुल्यानें योजिलेलें वृत्त शार्दूलविक्रीडित होय. अनुष्टुभाचीं चारी चरणांचीं अक्षरें ३२ व शार्दूलविक्रीडिताचीं ७६ असतात. म्हणजे या गणिती हिशोबानें श्लोकसंख्या दोन्हीकडे सारखी असल्यास पंतांना मुळापेक्षां सुमारें अडीचपट विस्तार करण्यास वाव मिळतो असें सिद्ध होतें. पण पंत आपल्या श्लोकांची संख्या मुळांतील श्लोकांच्या पेक्षां नेहमीं कमी ठेवून सरसकट दीडपटीपासून दुपटीपर्यंत मुळाचा विस्तार करतात. मुळांतील शुकाचार्य व परिक्षिति यांचीं प्रश्नोत्तरें, वेदान्तविषयक मजकूर वगैरे पंतांनीं आपल्या नेहमींच्या धोरणास अनुसरून गाळलाच आहे. त्यामुळें इतर कथानकांत वाढावा करण्यास पंतांना तितका जास्त अवकाश मिळाला आहे.

मुळाचा संक्षेप करण्याची पंतांची पद्धत आपणास पुष्कळ ठिकाणीं पहावयास

मिळाली आहे व तिची थोडीबहुत छाननीही आपण केली आहे. परंतु मुळापेक्षां कथानकाचा विस्तार करून लिहिण्याची पद्धत कृष्णविजय उत्तरार्धाखेरीज इतरत्र विस्तृत प्रमाणांत कोठेंही दिसून येत नाहीं. मुळांतलें कथासूत्र तेवढें वर्णून पंतांना सर्व ग्रंथ थोडक्यांत आणावयाचे असल्यानें प्रत्येक ठिकाणीं त्यांना संक्षेपच करावा लागला आहे. महाभारत, रामायण, भागवत, हरिवंश हे सर्व ग्रंथ मुळांत बरेच मोठे असल्यामुळें व त्या सर्वांत लांबलचक, पाल्हाळिक वर्णनें, वेदान्तप्रतिपादक भाग वगैरे बराच असल्यानें पंतांनीं त्या ग्रंथांचा सर्वत्र संक्षेपच केला आहे. पण केवळ दशमस्कंधाची स्वतंत्र ग्रंथ या नात्यानें भारतभागवतादि ग्रंथांपेक्षां अगदीं निराळी स्थिति आहे. अगोदर दशमस्कंधाची ग्रंथसंख्या केवळ चार हजार आहे. शिवाय तो ग्रंथ म्हणजे मुळांतच एक अत्युत्तम काव्य आहे. आणखी तिसरी गोष्ट म्हणजे त्या ग्रंथांत लांबलचक, पाल्हाळिक व मुख्य कथेस सोडून असलेला असा पौराणिक भाग फारसा नाहीं. सर्वत्र केवळ श्रीकृष्णाच्या चरित्रकथा गोड वाणीनें सांगितलेल्या भरल्या आहेत.असा सुश्लिष्ट व आटोपशीर ग्रंथ आधारास घेऊन पंतांना स्वतंत्र, विस्तृत काव्य रचावयाचें होतें. तेव्हां या सर्व गोष्टी लक्षांत घेतां पंतांना त्यांच्या इतर काव्यग्रंथांत संक्षेप करण्यास जितकीं कारणें होतीं तितकीं, किंबहुना त्यांपैकीं एकही, कृष्णविजय रचतांना नव्हतें. वेदान्ताचा भाग पंत गाळून टाकतात; पौराणिक वर्णनें त्यांस नकोशीं असतात; धर्माधर्माचें विवेचन त्यांस मराठींत उतरावेंसें वाटत नाहीं; पाल्हाळिक वर्णनाचा त्यांस संक्षेप करावासा वाटतो; या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; पण या सर्व पंतांना त्याज्य असणाऱ्या गोष्टी अगोदरच दशमस्कंधांत नसल्यामुळें त्याचें रूपांतर करतांना संक्षेप करण्याकडे कटाक्ष ठेवण्याची त्यांस फारशी जरूरी भासली नाहीं. तथापि मूलतःच पंतांची प्रवृत्ति गौरवाकडे नसून लाघवाकडे व आटपशीरपणाकडे आहे. तेव्हां कृष्णविजयामध्यें जरी विस्तार करण्यास त्यांस कशाचीही हरकत आलेली नसली तथापि त्यांच्या स्वाभाविक लाघवप्रवण वृत्तीनें त्यांना कृष्णविजयामध्यें इतर कवींसारखा अफाट विस्तार करूं दिलेला नाहीं. अगोदर पूर्वार्धामध्यें आर्यागीतिसारखें वृत्त स्वीकारून व यमकाचा अतिशय काचणारा असा पायबंद बांधून घेऊन काव्यविस्ताराकरितां विशेष हालचाल करणें त्यांनीं आपण होऊनच अशक्य करून घेतलें होतें. उत्तरार्धामध्यें त्यांनीं अगोदर यमकाचा जाचक पायबंद तोडून टाकला, नंतर चार पांच अध्यायांत

आर्यागीतीचा किंचितसा अटकाव करणारा लगामही भिरकावून दिला आणि मग आपल्या काव्यवारूस त्यांनीं स्वैरपणें संचार करण्यास मुभा दिली.

७०. अशा तऱ्हेचा एकंदर पंतांच्या प्रवृत्तीचा इतिहास असल्यामुळें इतरत्र त्यांना जी विस्ताराची सवड सांपडलेली नाहीं ती कृष्णविजयाच्या उत्तरार्धामध्यें जरा मोठ्या प्रमाणावर मिळालेली असतांना* त्यांनीं विस्तार कोणच्या दृष्टीनें कसकसा केला आहे हें पहाणें मनोरंजक होईल. मागें या विस्ताराच्या बाबतीचा थोडासा उल्लेख केलाच आहे. पण एथें एक दोन उदाहरणें देऊन विवेचन केल्यास अस्थानीं होणार नाहीं. पंत मुळाचा विस्तार करतात म्हणजे कोठेंही कथासूत्रामध्यें स्वतःच्या अधिक गोष्टी घुसडून देतात असें नाहीं. कालिदासाच्या शाकुन्तलांत किंवा भवभूतीच्या उत्तररामचरितामध्यें मूळांत नसलेल्या अनेक गोष्टींची भरती करून कवीनें नवेंच कथानक निर्माण केलें आहे; तशा तऱ्हेचा प्रकार पंत कधीं करीत नाहींत. नाटककारांची गोष्ट एक असो. त्यांना दृश्यकाव्याच्या सोयीकरितां वाटेल तो बदल करण्याची जवळजवळ (कांहीं मर्यादा राखून) मुभाच असते. पण भारवीसारख्या महाकवींनींही मुळांत नसलेले प्रसंग कथानकांत घालण्याचा प्रघात अवलंबिलेला आहे. किरातार्जुनीयाच्या प्रथम सर्गांत धर्मानें दुर्योधनाचें राज्य कसें चालल आहे याची बातमी काढण्याकरितां पाठविलेला हेर आपलें काम करून परत येऊन धर्मराजास दुर्योधनाची सर्व हकीकत सांगतो आहे असें वर्णिले आहे. परंतु हा, हेर पाठविण्याचा व त्यानें आणलेला निरोप ऐकण्याचा प्रसंग महाभारतांत मुळींच नाहीं. तर अशा तऱ्हेचा मुळांत नसलेला प्रसंग नवीन घालून मुळाचा विस्तार पंत कधींही करणार नाहींत. केवळ पंतच नव्हे तर आपल्या महाराष्ट्र कवींपैकीं बहुधा कोणताही कवि अशा तऱ्हेनें विस्तार करण्यास धजणार नाहीं. बहुतेक महाराष्ट्रकवि भारतभागवतादि ग्रंथांतील कथा पवित्र व पावन मानून भक्तिप्रवण चित्तानें त्यांचा मराठींत अनुवाद करण्यास सिद्ध झालेले; त्यांस मूळ कथेंत नसलेले प्रसंग नवीन घालणें व असलेल्या प्रसंगांत वाटेल तो बदल करणें हें कधींच पसंत पडण्याजोगें नव्हतें.

७१. अशा तऱ्हेनें नाहीं तर मग पंत विस्तार करतात तरी कसा ? तर मुळांत

---

* लहान प्रमाणावर त्यांना विस्ताराची सवड भक्तभूषण, सुदामचरित्र, वामनचरित्र, भीष्मभक्तिभाग्य वगैरे स्फुट प्रकरणांत मिळालेली आहेच.

थोडक्यांत सांगितलेल्या गोष्टीच आपल्या काव्यमय वर्णनानें वाढवून, आपल्या कल्पनांनीं खुलवून पंत त्यांना विस्तृत स्वरूप देतात. अशा तऱ्हेच्या विस्ताराचा अनुभव आपणांस भीष्मभक्तिभाग्य, भक्तभूषण, वामनचरित इत्यादि प्रकरणांमध्यें आलाच आहे. आतां येथेंही त्याचीं एकदोन उदाहरणें देऊं. कृष्णविजयाच्या ५५व्या अध्यायांतच, शंबरासुराशीं युद्ध करून रुक्मिणीचा पुत्र प्रद्युम्न आकाशमार्गानें द्वारावतींत श्रीकृष्णाच्या अंतःपुरीं येऊन उतरतो, असें वर्णन आहे. तेथें आल्यानंतर 'हा कोण ?' असें म्हणून श्रीकृष्णस्त्रिया, विशेषतः रुक्मिणी, आश्चर्य करतात. इतक्यांत तेथें कृष्ण येतो पण गंमत पहाण्याकरितां तो स्तब्ध राहतो. त्यानंतर नारदमुनि तेथें प्राप्त होतात व हा 'यदुपतिसम नरमणि' खरोखर यदुपतीचाच पुत्र होय असें सांगून सर्वांचा संशय दूर करतात. या वृत्तान्ताचे मूळांत फक्त दोन श्लोक आहेत.—

> एवं मीमांसमानायां वैदर्भ्यां देवकीसुतः ।
> देवक्यानकदुंदुभ्यामुत्तमश्लोक आगमत् ॥
> विज्ञातार्थोऽपि भगवांस्तूष्णीमास जनार्दनः ।
> नारदोऽकथयत्सर्वं शंबराहरणादिकम् ॥ भा. १०.५५.३५,३६.

यापैकीं पहिल्या दीड श्लोकाचा अर्थ पंत खालीलप्रमाणें आणतात.—

> प्रभुप्रियतमा असा मनिं विचार जों ते करी
> स्वतातजननीसह त्वरित तेथ आला हरी ।
> कळे परि न तो वदे किमपि विश्वसाक्षी, धरी
> अविज्ञजनरीतिला, तरि चरित्र तें उद्धरी ॥ कृ. वि. ५५.३७.

येथपर्यंत विशेष विस्तार झाला आहे असें म्हणतां येत नाहीं. पण पुढें 'नारद येऊन शंबराहरणादिक सर्व वृत्तान्त सांगतात,' एवढ्या मजकुराचा मोठमोठे आठ श्लोकपर्यंत पंतांनीं विस्तार केला आहे. अगोदर नारदांचें सुंदर वर्णन—

> जो लोकत्रितयीं फिरे, स्थिर नसे तारीं, जसा पारद
> स्वातें ध्येयपदींच निश्चळ, भवांभोधींत जो पारद ।
> जो वर्णें गगनोदरीं क्षण दिसे पूर्णेंदु कीं शारद
> श्रीशांतःपुरचत्वरींच उतरे तो सन्मुनी नारद ॥ ३८ ॥

नारदमुनींच्या चरित्रविशेषांचें इतकें थोडक्यांत परंतु मोहक वर्णन मराठींत तर काय पण संस्कृतांतही क्वचित्च आढळेल. असो. येथपर्यंत 'नारदः' या

शब्दावरचें पंतांचें काव्यमय भाष्य झालें. यापुढें ७ श्लोक ' अकथयत्सर्वं शंबराहरणादिकम् ' या शब्दांवर भाष्यरूप आहेत येथें प्रद्युम्नाचा शंबराहरणादिक सर्व वृत्तान्त पुनः नारदाच्या मुखें पंतांनीं बोलविला आहे. त्यांतील दोन तीन श्लोक उदाहरणादाखल येथें घेतों.——

नाभिस्थानासि नेणे मृग हुडकि जसा घेत रानांत वास
तैसें दोघेहि नेणा जवळिहि, हृदयीं या धरा नातवास ।
शौरे, हा वासुदेवात्मज, सुतसुत हा, देवकी, वोळखावा
तो हा, वैदर्भि, जेणें प्रथमचि तुजला लागला बोळ खावा ॥ ३९ ॥
वर्णाकारनिरीक्षणस्मितगतिव्याहार हे सांगती
कीं कृष्णप्रतिबिंब हा, न कळला, सर्व भ्रमा मागती । (भ्रमा- भ्रमत आहां)
जो निःशंक गृहांत ये इतर तो कैसा ? तुम्ही धीरधी
नेणा हे बळकृष्ण ? कौतुक करा लोकांत चिन्नीरधी ! ॥ ४० ॥
म्या सारें कथिलें रहस्य; न म्हणे निद्रा शरीर क्षण;
स्नेहें माय तशी रति स्वपतिचें तेथें करी रक्षण ।
झाली आपुलि आपण प्रियपरित्राणार्थ सासू, न ती
स्तुत्यर्हा, परि गौरवा समुचितें, सासू असा, सून ती ॥ ४५ ॥

याप्रमाणेंच आणखी एक लहानसें उदाहरण पारिजातहरण वृत्तान्ताचें आहे. भौमासुराला मारल्यानंतर कृष्ण स्वर्गांत गेला व इंद्राशीं युद्ध करून त्यानें पारिजातवृक्ष हरण करून आणला. मुळांत ही हकीकत याप्रमाणें वर्णिली आहे.

गत्वा सुरेंद्रभवनं दत्वाऽदित्यै च कुण्डले ।
पूजितस्त्रिदशेंद्रेण सहेन्द्राण्या च सप्रियः ॥ भा. १०.५९. ३८ ॥
चोदितो भार्ययोत्पाट्य पारिजातं गरुत्मति ।
आरोप्य, सेन्द्रान्विबुध न्निर्जित्योपानयत्पुरम् ॥ ३९ ॥
स्थापितः सत्यभामाया गृहोद्यानोपशोभनः ।
अन्वगुर्भ्रमराः स्वर्गात्तद्गंधासवलम्पटाः ॥ ४० ॥
ययाच आनम्य किरीटकोटिभिः पादौ स्पृशन्नच्युतमर्थसाधनम् ।
सिद्धार्थ एतेन विगृह्यते महानहो सुराणां च तमो ! धिगाढ्यताम् ! ॥४१॥

ही त्रोटक हकीकत पंतांनीं नऊ मोठमोठ्या श्लोकांत वर्णिली आहे. मुळांतील शेवटच्या श्लोकांत केलेल्या इंद्राच्या अधिक्षेपाचा तर पंतांनीं खूपच विस्तार केला आहे व त्याच्या द्रव्यमदांधतेवर सपाटून तडाखे उडवले आहेत.—

पायींही लोळतांही सतत सुरतरू लेश चिंता न वारी
तीं सर्वेष्टप्रदाता हरि हरि सहज प्रार्थितां दानवारी।
वृक्षा शिक्षा कराया निजगुरुवर ने, भद्र तें हें न मानी
कार्यासाठींच भक्ति स्वरधिप खळ हा दूर पाहे न मानी ॥ १४ ॥
हो सच्चिय कुलीन मानव सुर ज्ञानी तऱ्ही लोभला
प्रायः प्राज्ञ म्हणोनि मद्य म्हणति द्रव्य, त्यजी तो भला।
स्वर्गी इंद्रपदीं यदीयचरणांभोजाश्रयें शोभला
तो हा शक्र पहा, अहा! शिव शिव! स्वामींवरि क्षोभला ॥१५॥
सर्वेष्टप्रद आपण प्रभु असें चित्तांत चिंतामणी
हा काय द्रुम मूढमान्य कळवि स्पष्ट प्रतापें धणी।
स्त्रीचा आग्रह यास्तव प्रिय तिचें व्हाया तिच्या आंगणीं
लावावा इतुकेंचि इंद्र न मनीं, ये प्राण घ्याया रणीं ॥ १६ ॥

याप्रमाणें मुळांतील एका लहान श्लोकाचे तीन मोठे श्लोक पंतांनीं केले आहेत. आणि त्यांत कांहीं विशेष बाहेरचा अर्थ आणला आहे असेंही नाहीं. मुळांतीलच अर्थ वक्तृत्वपूर्ण व जोरदार वाणीनें खुलवून सांगितला आहे तर पंतांची विस्ताराची प्रवृत्ति अशाच तऱ्हेची सर्वत्र आढळते.

७२ येणेंप्रमाणें विस्ताराविषयीं विचार झाला. असा विस्तारच उत्तरार्धामध्यें बहुतेक ठिकाणीं केला असल्यामुळें मुळाबरहुकूम रूपांतर असें फार करून कोठेंही आलेलें नाहीं हें सांगावयास नकोच. काव्यदृष्ट्या जर पाहिलें तर हा विविध श्लोकात्मक भाग (अ० ५५ ते ७९) पंतांच्या अत्युत्तमांपैकीं जरी नसला तरी उत्तमांपैकीं गणण्याजोगा खास उतरला आहे. सर्वच अध्याय सरस आहेत तथापि प्रद्युम्नचरित्र (अ० ५५), रुक्मिणीप्रेमकलह (अ. ६०), उषा अनिरुद्ध यांचा गांधर्वविवाह (अ० ६२), कृष्णाचा गार्हस्थ्यधर्म व नारदानें केलेलें कृष्णलीलावलोकन (अ० ६९) हे अध्याय सांसारिक सुखांमध्यें जे विशेष रसज्ञ आहेत त्यांना पसंत पडतील वीररसाची गोडी बाळगणारे जे असतील त्यांना बाणासुरयुद्ध (अ० ६३), बलदेवविजय (अ० ६८), शाल्वाचा वध व त्याच्या विमानाचा नाश (अ० ७७), हे विशेष प्रिय होतील. स्यमंतकोपाख्यान व कृष्णजांबवानांचें युद्ध (अ० ५६), बलरामाच्या तीर्थयात्रा (अ० ७९) हेही भाविकांस व अद्भुतरसप्रियांस पसंत होण्याजोगे अध्याय आहेत.

७३. कृष्णविजयाच्या ७९ व्या अध्यायापर्यंत विविधश्लोकात्मक रचना आहे. याच्यापुढील ८०–९० या अकरा अध्यायांत पंतांनीं श्लोकांचाही त्याग करून आपल्या आवडत्या आर्यावृत्ताचा अवलंब केला आहे. येथें पंतांच्या श्लोकरचनेविषयीं थोडा विचार करून मग कृष्णविजयाच्या शेवटच्या आर्याबद्ध विभागाकडे आपण वळूं. श्लोकरचनेचें नांव काढलें कीं वामनपंडितांची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. इतकें श्लोकरचनेशीं त्यांनीं आपलें नांव अजरामरपणें बद्ध करून ठेवलें आहे. आणि हें खरोखर योग्य असेंच झालें आहे. आर्यारचनेचे मोरोपंत जसे अगदीं सार्वभौम सम्राट् होत तसे जरी पंडित श्लोकरचनेचे 'एकमेवाद्वितीय' अधिपति नसले तरी आपल्या गुणसमुच्चयानें सर्व मराठी कवींत श्लोकरचना अशी त्यांचीच चमकते यांत शंका नाहीं. आजपर्यंत हंस, ओक, पांगारकर इत्यादि रसिकांनीं पंडितांच्या श्लोकरचनेशीं पंतांच्या श्लोकरचनेची तुलना करून सोज्वळ व सलगीचा भक्तिभाव, वर्ण्यविषयाशीं तादात्म्य, वर्णनाचा मधुर विस्तार करण्याची हातोटी वगैरे पंडितांच्या कवितेंत दिसून येण्याऱ्या गुणांची तारीफच केली आहे. याच्या उलट पंतांच्या श्लोकरचनेंतही प्रौढपणा, भारदस्तपणा, अलंकारसौष्ठव, मोहक कल्पनाविलास, भाषाशुद्धि इत्यादि गुण असून त्यांची श्लोकरचनाही कांहीं कमी दर्जाची नाहीं असें पांगारकरादि रसिक पंतभक्तांनीं दाखवून दिलेंच आहे. पंडितांची कविता वाचूं लागलें कीं त्यांचाच 'सुश्लोक' सर्वोत्तम वाटावयास लागतो; त्याला बाजूस ठेवून पंतांच्या श्लोकरचनेचें आलोडन करूं लागावें तों त्यांचाच श्लोक अगदीं अप्रतिम असा भासूं लागतो ! असें कांहीं भूल पाडणारें माधुर्य दोघांच्या श्लोकांत आहे. असो. पण येथें अशा सामान्य विषयावर फारसें लिहिण्याचा उद्देश नाहीं. इतरांनीं उल्लेख केलेला नाहीं अशी एक लहानशी गोष्ट विशेष रीतीनें सर्वांच्या नजरेस आणावयाची आहे. पंतांचीं श्लोकरचनेमधील सर्वांत आवडतीं वृत्तें म्हणजे शार्दूलविक्रीडित व स्रग्धरा हीं होत. श्लोकरचनेकडे पंत वळले म्हणजे त्यांना लांबलचक वृत्तेंच फार योजावींशीं वाटत. शार्दूलविक्रीडित व स्रग्धरा हीं अतिशय मोठीं वृत्तें आहेत. पहिलें ७६ अक्षरांचें असून दुसरें तर ८४ अक्षरांचें आहे. केव्हां केव्हां येवढीं मोठीं वृत्तेंही त्यांना पुरेशीं न वाटून दंडकासारख्या १२० किंवा जास्त अक्षरांच्या वृत्ताचीही त्यांना योजना करावीशी वाटते. (पहा; सुदाम. ५३ व ७३). अगदीं कमी म्हणजे ६८ अक्षरांच्या शिखरिणी पृथ्वी वगैरे

वृत्तापर्यंत ते क्वचित् उतरतात. त्याच्या खालीं बहुतकरून नाहींच. मोठ्या वृत्तामध्यें वर्णनाला मोकळेपणा सांपडतो, जोरदार भाषणें त्यांत उत्कृष्ट रीतीनें वठवितां येतात, पुष्कळ कथाभागाचें एकदम वर्णन करतां येतें, अशा तऱ्हेच्या कांहीं सोयी असल्यामुळें बहुधा पंतांनीं मोठीं वृत्तेंच आपल्या काव्यासाठीं पसंत केलीं असावीं. परंतु इतर कोणच्याही कवींची अशी गोष्ट नाहीं. संस्कृतांत अनेकसर्गात्मक जीं महाकाव्यें आहेत त्यांत सर्वत्र लहान वृत्तेंच योजिलेलीं आढळतात. फार झालें तर वसंततिलका या ५६ अक्षरी वृत्ताची योजना क्वचित् करण्यांत येते; पण यापलीकडे कोणी जात नाहीं. प्रत्येक सर्गाच्या शेवटीं मात्र शार्दूलविक्रीडित, शिखरिणी, यांसारख्या लांब वृत्तांतले एक दोन श्लोक घालण्यांत येतात. मराठींतही पाहिलें तरी वामनपंडित किंवा त्यांच्यासारखे श्लोकरचना करणारे इतर कवि हे बहुधा इंद्रवज्रा, उपजाति, वंशस्थ, द्रुतविलंबित वगैरे (११, १२ अक्षरी चरणांचीं) हलकीं व लहान वृत्तेंच फार करून काव्यासाठीं योजतात, असें आढळून येतें. फार झालें तर वसंततिलका व मालिनी यांची योजना होते व क्वचित् केव्हांतरी शिखरिणी इत्यादि लांब वृत्तांची. संस्कृतामध्यें मेघदूत, गंगालहरी वगैरे सारखीं खंडकाव्यें तरी मंदाक्रान्ता, शिखरिणीसारख्या वृत्तांत सररास येतात. पण मराठींत तसें सुद्धां होत असल्याचें दिसत नाहीं. तेव्हा सर्वत्र लांब लांब वृत्तांत रचना करण्याची पंतांची ही केवळ अगदीं चमत्कारिक व अनन्यसामान्य प्रवृत्ति म्हणावी लागते. साधारणपणें तोच विषय असलेल्या व कांहींशी समान श्लोकसंख्या असलेल्या काव्यांचीं उदाहरणें घेऊन प. हू. कृष्णविजयांतील जरासंधवधाचे ७१, ७२ व ७३ हे अध्याय एकत्र केले तर त्यांची श्लोकसंख्या ८४ होते. या ८४ श्लोकांपैकीं फक्त ६ श्लोक लहान वृत्तांतील असून बाकीचे ७८ मोठ्या वृत्तांतील (बहुतेक शार्दूलविक्रीडित व स्रग्धरा) आहेत. आतां याच कथानकावर वामनपंडितांचें ६७ श्लोकांचें ' मुकुंदविलास ' नामक प्रकरण आहे. त्यांत फक्त ७ श्लोक मोठ्या म्हणजे शिखरिणी वृत्तांतील असून शार्दूलविक्रीडितांतील तर मुळींच नाहींत. ' द्वारकाविजय ' नामक वामनपंडिताचें नारदगार्हस्थ्यदर्शनाच्या अध्यायावर खंडकाव्य आहे. त्याचे एकंदर २५० श्लोक असून मोठ्या वृत्तांतले (शिख० व शार्दूल०) २५ आहेत. बाकीचे सर्व उपजाति, वंशस्थ वगैरे लहान वृत्तांतील आहेत. याच कथानकावरील मोरोपंतांच्या ६९ व्या अध्यायांत ३४ श्लोकांपैकीं

फक्त एक कायतो छोट्या वृत्तांत आहे. ही उदाहरणें कांहीं मुद्दाम निवडून दिलेलीं नसून सामग्र्यानें कृष्णविजयाकडे पाहिलें तरी हाच प्रकार दिसून येतो. कृष्णविजयांतील एकंदर श्लोकमय रचनेची संख्या ८३७ आहे. त्यांपैकीं ६०७, म्हणजे एकंदर संख्येच्या तीनचतुर्थांश श्लोक केवळ शार्दूलविक्रीडित व स्रग्धरा या वृत्तांतील आहेत. याशिवाय शिखरिणी, पृथ्वी इत्यादि वृत्तांतील श्लोकांची गणना निदान १०० तरी होईल. तेव्हां कृष्णविजयांतील श्लोकरचना बहुतेक सर्व मोठ्या वृत्तांतील आहे असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

आतां नेहमींच्या संप्रदायाविरुद्ध वृत्तयोजना करण्याची जी ही पंतांची प्रवृत्ति दिसून येते ती काव्यसौंदर्याच्या दृष्टीनें विशेष उपयुक्त आहे असें म्हणवत नाहीं. कदाचित् कवीला मोठ्या वृत्तांत रचना करणें जास्त सोपें जात असेल. पण वाचकाला लहान वृत्तेंच जास्त पसंत पडतात. लांबलचक वृत्तें वाचण्याचा तेव्हांच कंटाळा येतो. लहान वृत्तांत कोमलता व माधुर्य हीं जास्त प्रमाणांत आणतां येतात व काव्याचें सौंदर्य श्रवणमधुरतेवर पुष्कळसें अवलंबून असल्यामुळें लहान वृत्तें नेहमीं योजणेंच जास्त इष्ट होय यांत शंका नाहीं. मोठीं वृत्तें एकंदरीनें पहातां क्वचित् प्रसंगींच शोभतात व तशींच तीं योजण्याचा प्रघात आहे. शिवाय एका पद्यांत एक कल्पना किंवा एकच गोष्ट गोवण्याची कविजनांची रीत आहे. लहान पद्यांतच अशी कल्पना आटोपशीरपणानें गोवली जाते. मोठ्या श्लोकांची योजना केली म्हणजे, त्यांत पाल्हाळास व विस्तारास बराच अवकाश सांपडण्यासारखा असल्यामुळें, निष्कारण शब्दांचें अवडंबर माजून ' बहुवचनमल्पसारं ' अशा कोटींत कविता जाण्याचा फार संभव असतो.

७४ कृष्णविजयाच्या ८० ते ९० अध्यायांच्या शेवटच्या आर्याबद्ध विभागाकडे आतां वळण्यास हरकत नाहीं. वृत्ताप्रमाणेंच येथें पंतांची रचनाशैलीही पुनः एकदां बदललेली दिसते. आतांपर्यंतच्या श्लोकरचनेचा ओघ जोरदार, भारदस्त व प्रौढ असा होता. यापुढची आर्यारचना अत्यंत सौम्य, कोमल, प्रेमळ व रसिकाच्या गळीं पडून त्याचें मन वश करून घेणारी आहे. हे पंतकवितेचे अकरा अध्याय ज्यानें वाचले आहेत तो पंतांच्या काव्यरसमाधुरीची आठवण जन्मभर विसरणार नाहीं. ऐशींव्या अध्यायापासून पंतांच्या आर्येंस जी कांहीं बहार चढत चालली आहे, ती ८७, ८८ अध्यायांपर्यंत तशीच चढत जाते व आर्यांच्या कोमल नादानें व त्याहूनही मधुर व प्रेमळ अर्थानें मनुष्य वेडावून

जातो. या अकरा अध्यायांत पंतांनीं मनास वाटेल तसा विस्तार केला आहे. वेदस्तुतीचा ८७ वा अध्याय गाळून त्याबद्दल ८६ व्या अध्यायांतील कथानकाचे दोन भाग करून त्याचे दोन अध्याय केले आहेत.

७५. प्रथम ८० व ८१ या अध्यायांत पंतांनीं सुदामदेवाची कथा वर्णन केली आहे. ध्रुव किंवा प्रल्हाद यांच्या कथेप्रमाणेंच सुदामदेवाची प्रेमळ कथा आमच्या जुन्या कवींची अत्यंत आवडती होय. पंतांना देखील ही फार प्रिय होती असें दिसतें. कारण समग्र पंतकाव्यांत हिचें चारदां वर्णन आलें आहे. पैकीं कृष्णविजयांतील एक, मंत्रभागवतांतील दुसरें व बाकीचीं दोन स्फुट प्रकरणें, एक श्लोकबद्ध 'सुदामचरित्र' या नांवाचें, व दुसरें आर्याबद्ध 'पृथुकोपाख्यान' या नांवाचें, अशीं आहेत. या सर्वांमध्यें कृष्णविजयांतील सुदामदेवाची कथा हीच विस्तारानें व सौंदर्यानें श्रेष्ठ आहे. मंत्रभागवतांतील सुदामदेवाची हकीकत अगदींच त्रोटक–केवळ १४ आर्या–असून धावत्या पद्धतीनें लिहिलेली आहे. ती आहे तेवढीच जरी मधुर वठलेली असली तरी काव्यसौंदर्याचा परिपाक साहजिकच इतक्या थोडक्या अवकाशांत पूर्णपणें उतरूं शकला नाहीं. श्लोकबद्ध 'सुदामचरित्र' साधारण बऱ्यापैकीं वठलें आहे. तथापि याच्याचसारखें श्लोकबद्ध जें भक्तभूषण नामक अंबरीषाख्य नावरील बहारीचें प्रकरण आहे त्याच्याशीं याची तुलना होण्याजोगी नाहीं. पंतांचे ते लांबलचक श्लोक व विस्तृत वर्णनें जरा कंटाळवाणींशींच भासतात. यांत एकंदर ८८ मोठमोठ्या वृत्तांचे श्लोक असून सुमारें ८।९ श्लोकांचें एक अशीं कथाभागास अनुसरून दहा छोटीं प्रकरणें केलीं आहेत. मुळांतील सुदामकथेचे श्लोक ८६ च आहेत तथापि पंतांचीं वृत्तें मोठीं असल्यानें त्यांच्या काव्यांत मुळाचा दुप्पट विस्तार झाला आहे. या 'सुदामचरित्रां'त, सुदामदेव आपल्या घरीं आल्यानंतर त्यास त्याची स्त्री, 'कृष्णाकडे एकंदर काय हकीकत झाली?' असा प्रश्न विचारीत असून, सुदामदेव त्याचें उत्तर देत आहे अशा स्वरूपांत कथाभाग वर्णन केला आहे ही कल्पना पंतांनीं मोठी सुंदर केली आहे; तिच्यामुळें भागवतकारांनीं जी हकीकत तिऱ्हाईतपणें वर्णिली आहे तीच सुदामदेव आपल्या स्वतःच्या दृष्टीनें वर्णीत असतां त्यांत कसकसा मधुरिमा येतो तो आपणास येथें पहावयास मिळेल अशी अपेक्षा वाचकाच्या मनांत उत्पन्न होते. पण दुःखाची गोष्ट ही कीं वाचकाची ही अपेक्षा येथें मुळींच तृप्त होत नाहीं. भागवतकारांनीं सांगितलेली हकीकत 'तो गेला' अशा तृतीय पुरुषी प्रयोगाऐवजीं

'मी गेलों' असा प्रथम पुरुषी प्रयोग घालून जशीची तशी पंतांनीं सुदामाच्या तोंडून वदविली आहे. त्यांत वक्ता व श्रोता यांना अनुकूल असा कांहीं बदल केला नाहीं. वस्तुतः येथें पंतांनीं स्वतःची कल्पना चालवून तसा कांहीं बदल अवश्य करावयास पाहिजे होता. असो. या सुदामचरितामध्यें व कृष्णविजयाच्या ८०, ८१ अध्यायामध्यें कित्येक ठिकाणीं बरेंच विचारसाम्य व वर्णनसाम्य दिसून येतें. कदाचित् दोन्हींही प्रकरणांचा रचनाकाळ एकमेकांच्या जवळचा असूं शकेल. तथापि दोघांच्या काव्यसौंदर्याचा दर्जा बराच निराळा आहे.

सुदामकथेवरील दोन काव्यांचें निरीक्षण झालें. तिसरें काव्य '**पृथुकोपाख्यान**' नामक स्फुट प्रकरण होय. याच्या ८८ साक्या आहेत; म्हणजे हें जवळ जवळ मुळाइतकेंच विस्तृत काव्य झालें आहे व बहुतेक ठिकाणीं मुळास अगदीं अनुसरूनच लिहिलें आहे. तथापि वर्णनाची भाषा अगदीं साधी व गोड असल्यामुळें व वर्णन करणाऱ्या पंतांचें अंतःकरणच त्या कथेच्या सौंदर्यांत रंगलें असल्यामुळें या आख्यानाचा परिपाक फार उत्कृष्ट उतरला आहे. कृष्णविजयाच्यामधील जरा जास्त लांबलेल्या सुदामकथेचा आस्वाद घेण्याइतका धीर ज्यांना निघण्यासारखा नसेल त्यांना पंतांच्या वर्णनाची गोडी याच आख्यानांत पूर्णपणें कळून येण्यास कांहीं हरकत नाहीं. प्रथमच मुळाच्या आधारें वर्णन करण्याची खुबी पहा. सुदामाच्या पत्नीचें वर्णन—

मूळ—पतिव्रता पतिं प्राह म्लायता वदनेन सा ।
दरिद्रा सीदमाना सा वेपमानाभिगम्य च ॥ भा. १०. ८०. ८.

पंतकृति—ते एकदा पतीच्यापाशीं बहु भीत भीत गेली ।
अवाङ्मुखी कंपिततनु साध्वी कर जोडुनियां ठेली ॥ पृथु. ३.

तथापि पंतांनीं मुळांत स्वतःच्या कल्पनांची भर घातली नाहीं असें नाहीं. पहा—

हरिला हृदयीं चिंतित जातां मार्ग जाहला थोडा ।
बहुधा केला हरिसंदर्शनकामप्रेमा घोडा ॥ पृथु. १४ ॥

हरिदर्शनाविषयींची परमप्रीति हाच जणूं काय घोडा, त्यावर आरूढ झाल्यामुळें सुदामदेवानें मार्ग तेव्हांच आक्रमण केला ही कल्पना फारच सहृदयतेची आहे. पुढें सुदामा कृष्णाच्या अंतःपुरांत येऊन पोंचला तेव्हांच्या प्रेमळ मित्रांच्या भेटीच्या प्रसंगाचें मधुर वर्णन—

झडकरि उठला दयालु माधव वस्त्रादिक नावरितां ।
धावत आला पुढें, रमेला सांडुनि, दासाकरितां ॥ पृथु. २३ ॥
' ये ये बंधो ' ऐसें सद्गद बोलत धांवत आला ।
कडकडुनी भुजयुग्में स्वसखा हृदयीं धरिता झाला ॥ पृथु. २४.

यापुढील सर्व वर्णनही असेंच बहारीचें आहे. सर्व मनोरथ संपूर्ण होऊन कृष्णाची अगाध लीला करून आल्यानंतर प्रसन्नचित्त होऊन सुदामा म्हणतो—

सौहृद मैत्री सख्य दास्य त्या देवाचेंचि असावें ।
जन्मोजन्मीं तद्भजनाचें प्रेम मनांत वसावें ॥ पृथु. ८४.

या पृथुकोपाख्यानाशिवाय सुदामचरित्रास अनुलक्षून पदाच्या चालीवर रचलेल्या व अजून अप्रसिद्ध असलेल्या कांहीं साक्या पंतांच्या हस्तलिखित संग्रहांत सांपडल्या त्या पुढें परिशिष्ट १ मध्यें दिल्या आहेत.

कृष्णविजयांतील सुदामचरित्र हें बाकीच्या तीहींपेक्षां सरस आहे. हें अ० ८० व ८१ यांत आलेलें असून दोन्ही अध्यायांची मिळून आर्यासंख्या १९४ आहे. म्हणजे मुळाच्या दुपटीपेक्षां याचा अधिक विस्तार आहे असें झालें. व तितका विस्तार आहे ही कवींच्या व वाचकांच्या मोठ्या फायद्याचीच गोष्ट झालेली आहे. कारण कवीला आपलें सर्व कल्पनासामर्थ्य खर्चून कथाभाग सजवण्यास त्यामुळें अवकाश झाला व वाचकालाही कवीच्या रमणीय वचःसुधेचा आतृप्ति आस्वाद घेण्याची सोय झाली. प्रस्तुत सुदामकथा ही मुळापेक्षां विस्तारलेली असल्यानें मुळास अगदीं धरून लिहिलेली नाहीं. अर्थात् स्वतःच्या कल्पनेस वाटेल तसा व वाटेल तितका स्वतंत्र संचार करण्यास पंतांनीं मुभा दिली आहे. सर्वच वर्णन सुंदर साधलें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत सुदामाच्या श्रीकृष्णानें केलेल्या सत्काराचें व तो सत्कार पाहून चकित होऊन आश्चर्योद्गार काढणाऱ्या कृष्णपत्न्यांचे वर्णन (आर्या ३७-४३); व रात्रभर वादळांत फिरल्यानंतर सकाळीं जेव्हां सांदीपनी गुरु भेटले तेव्हां त्यांनीं केलेला उपदेश (अ० ६२-७१); या दोन गोष्टी पहिल्या अध्यायांत अप्रतिम वठल्या आहेत. ते प्रेमळ आचार्य शिष्यांच्या भक्तीनें प्रसन्न होऊन आशीर्वाद देतात. —

मजहूनि त्रिजगांत प्रख्यात यशें असाल, कविराजे ।
गातिल, कां मत्करुणाश्रींचे लोकीं न बालक विराजे ? ॥ ७० ॥

मी बहु न प्रकट जगीं व्हाल तुम्ही सर्ववंद्य, न ख्यात ।
तात क्षीराब्धि, परि हरशूकारूढ प्रसिद्ध तज्जात ॥ ७१
कर्मी वसा, नसो परमर्मी लोचन, असा दयाधर्मी ।
नर्मीहि मृषोक्ति न यो, शर्मी नांदा, शिरा क्षमावर्मी ॥ ६९. कृ वि. ८०.

ऐंशीव्या अध्यायापेक्षां ८१ व्या अध्यायांत आर्येला जास्त तेज चढून जास्त कोमलपणाही आलेला आहे. मंत्रभागवतांतील आर्येइतकी सफाईदार आर्या अजून वठत नाहीं. वर्षानुवर्षे अक्षर घटवलेल्या मनुष्याचें लिहिणें ज्याप्रमाणें सहज वळणदार येतें त्याप्रमाणें मंत्रभागवतांतील आर्या अगदीं घटलेली व वळणदार आलेली आहे. कृष्णविजयामध्यें किंचित् का होईना पण अजून प्रयत्न दृग्गोचर होतो. बाकी सौंदर्यांत व प्रेमळपणांत अणुमात्रही कमी नाहीं. असो. कृष्णाच्या घरीं सुदामदेवाचा जो अपूर्व सत्कार झाला व प्रेमानें गहिंवरून येऊन त्याची जी पाठवणी कृष्णानें केली त्याचें फार सुंदर वर्णन आर्या २० ते ३५ पर्यंत आलें आहे. त्यापुढें सुदामा घरीं परत जात असतां कृष्णानें आपल्याला द्रव्य कां दिलें नाहीं याबद्दल त्याच्या मनांत आलेले विचारतरंग विस्तृतपणें वर्णिले आहेत. त्यानंतर स्वतःची सुवर्णनगरी पाहून प्रथम त्याला वाटलेलें आश्चर्य (६०–७४), पुढें त्याचें पौरजनांनीं केलेलें स्वागत (७५–७९), पत्नीची व त्याची भेट (७९–८९), त्याच्या रत्नखचित प्रासादाचें वर्णन (९०-१०३), व शेवटीं सुदामदेवाचे प्रेमळ उद्गार (१०४-११९), इतक्या विषयांचें मनोहारि वर्णन या अध्यायांत आलें असून तें अतिशयच बहारीचें वठलें आहे. कल्पनासौष्ठव, भाषेची कोमलता, भावाची प्रेमळता व अलंकारांची हृद्यता हे सर्व गुण येथें एकत्रित झालेले दिसून येतात. उतारे देणें अशक्यच आहे, तरी पण सुदामाच्या भक्तिपूर्ण उद्गारांपैकीं शेवटच्या दोनच आर्या देतों:—

मद्दत्त पृथुकतंडुलकण कृपणपणें पडों न दे वेंची ।
जन्मोजन्मींहि असो मज एक प्रेम त्या सख्याचेंची ॥ ११०
कृष्णा सख्या उदारा सदया, पद या मनांत राहों दे ।
पाहों दे मग हा द्विज कर्मफळें, भवनदींत वाहों दे ॥ ११९

७६. यापुढील ८२ वा अध्याय, स्यमंतपंचकीं सूर्यग्रहणपर्वाचे वेळीं मंडळी जमली असतां तेथें सर्व यादव व गोकुळवासी नंदादि गोप यांच्या भेटीचा

प्रसंग झाला, त्याच्या वर्णनपर आहे. तोही फार प्रेमळ उतरला असून मुळापेक्षांही त्यांत गोडी जास्त आली आहे.

७७. याच्या पुढचा ८३ वा अध्याय विवाहकथाकथनाचा असून, त्यांत श्रीकृष्णाच्या अष्टनायिकांनीं व इतर स्त्रियांपैकीं एकीनें आपल्या विवाहाच्या कथा द्रौपदीस तिनें विचारल्यावरून सांगितल्या आहेत, असें वर्णन आहे. मुळांत सर्व कृष्णस्त्रियांच्या विवाहकथा अत्यंत त्रोटक रीतीनें एकेका श्लोकांतच सांगितल्या आहेत. पण पंतांनी येथें फार मार्मिकपणा दाखवून सर्व स्त्रियांच्या विवाहाच्या कथा त्यांच्या तोंडून अति विस्तारानें वदविल्या आहेत. त्यांतल्या त्यांत रुक्मिणीची विवाहकथा तिच्या तोंडून ९१ आर्यांत वदविली असून ती अत्यंत बहारीची वठली आहे. बायकांच्या तोंडीं शोभेल अशी भाषा लिहिण्यांत व बायकांचे मनोविकार त्यांच्याच तोंडून अकृत्रिम रीतीनें वदविण्यांत पंत फार कुशल होते. त्याप्रमाणें ही रुक्मिणीविवाहकथा सर्वत्र स्त्रियांच्या बोलीनें सजविलेली व स्त्रियांना पटतील अशा उद्गारांनीं भरलेली असल्यामुळे हिला एक प्रकारचें स्वभावसहज माधुर्य प्राप्त झालें आहे. बाकी रुक्मिणीस्वयंवराची जी कथा पूर्वी अ० ५२, ५३ मध्यें आलेली आहे तीच आधारास घेतली असून तिच्यांत कांहीं फरक केलेला नाहीं.

अशाच प्रकारचें पंतांचें आणखी ' रुक्मिणीगीत ' म्हणून एक लहानसें अभंगरचित काव्य आहे. सावित्रीकथा, सीतावनवासकथा व रुक्मिणीहरणकथा या तीन अत्यंत रमणीय व आर्यस्त्रियांस नित्य पूज्य अशा कथांवर स्त्रियांनाच म्हणण्यास योग्य अशा अभंग उर्फ ओवी वृत्तांत पंतांनीं तीन गीतें रचलीं आहेत. तीं स्त्रियांना म्हणण्यास फार योग्य वठलीं आहेत. सावित्रीगीतामध्यें पंतांनीं स्वतःच सावित्रीची कथा वर्णिली आहे पण सीतागीत व रुक्मिणीगीत या दोहोंमधील कथाभाग अनुक्रमें सीता व रुक्मिणी यांच्या तोंडूनच वदवला आहे. सावित्रीगीत सर्वांत उत्कृष्ट, गंभीर व करुणरसपूर्ण झालें आहे. त्याच्या खालोखाल सीतागीतही सुंदर साधलें आहे. रुक्मिणीगीत या दोन्हींपेक्षां जरी कांकणभर गुणांत उणें असलें तरी एकंदरीनें तेंही सौंदर्यांत कमी नाहीं. कृष्णविजयामधील प्रस्तुतच्या ८३व्या अध्यायांत सांगितलेल्या रुक्मिणीस्वयंवरकथेमध्यें व या रुक्मिणीगीतामध्यें पुष्कळ ठिकाणीं बरेंच साम्य दिसून येतें. दोहोंमध्येंही रुक्मिणीनें कृष्णास पाठविलेली पत्रिका गाळली असून तिचा निर्देश मात्र केला आहे. शिवाय

शब्दरचनेचें व कल्पनांचें साम्य असलेलीं पुढील ठळक स्थळें आढळतात.—

(१) पुसतां मी सांगें अश्रुहेतु तेल । उत्तरीं गुंतेल नव्हे कधीं ॥ रु. गी. ३१.
होय सर्वांत मदुक्तें अश्रुप्रति हेतु बापुडें तेल ॥ कृ. वि. ८३. ३०.

(२) माय दे लावूनी देहाला हळद । हे हालाहलद न तो पाप ॥ रु. गी. २९.
गरळ विलेपन वाटे. लाविति अंगास जी हरिद्रा तें ॥ कृ. वि. ८३. १९.

(३) न आले त्या दिशीं मध्यें रात्रि मात्र । चिंताज्वरें गात्र तापविलें ॥रु.गी.३४
त्या रात्रीं लागला नाहीं माझा डोळा । प्राण कंठीं गोळा झाले होते ॥३५.
चिंताज्वरांत रात्रौ माझा नाहींच लागला डोळा ।
जायासाठीं कंठीं शतवार प्राण जाहले गोळा ॥ कृ. वि. ८३. ३५.

(४) या कन्यारत्नाला केली सेनापेटी । अंबिकेच्या भेटी नेते झाले ॥रु. गी. ५९
स्वसखीधात्रीजननीविप्रस्त्रीमंडळी न ती, पेटी ।
तींत मणी मी नेलें शुभविधिनें श्रीशिवेचिये भेटी ॥ कृ. वि. ८३. ५८.

(५) वीर अभीमूखप्रहारें जे मेले । अप्सरांनीं नेले वरूनी ते ॥ रु. गी. ९७
स्वर्गाप्ति अप्सरांनीं नेले भटमणि विचित्र तें काय । कृ. वि. ८३. ९१.

(६) नाचले त्या रणरंगांत कबंध । कीं पातकबंधमुक्त झाले ॥ रु. गी. ९८.
तुटलीं असतांहि शिरें हासति नाचति रणांगणीं वीर ।
प्रभु सांगे मज कीं, 'जनिसाफल्यें मुदितचित्त हे धीर' ॥कृ.वि. ८३. ८९.

आणखी कांहीं ठिकाणीं रुक्मिणीगीतांतील साधें वर्णन घेऊन तें आपल्या कल्पनाविलासानें सजवून पंतांनीं कृष्णविजयांत समाविष्ट केलें असल्याचें दिसून येतें. उदा०—

(१) जों ऐसें मन्मन चिंतेंत रहाटे । स्फुरला पहाटे डावा बाहु ॥ रु. गी. ४६
याच डाव्या बाहूच्या स्फुरणावर कृष्णविजयांत पंतांनीं केलेली उत्प्रेक्षा—
तों प्रियकंठीं आपण पडोान हेही सुखांत पाडावी ।
या भावेंचि स्फुरली करि माझी भुजलता कृपा डावी ॥ कृ. वि. ८३. ४०.

वर दिलेल्या समानार्थक स्थलांवरून व विशेषत: रुक्मिणीगीतांतील वर्णनें कृष्णविजयांत कल्पनांनीं सजवून वाढविलेलीं दिसतात यावरून रुक्मिणीगीत पहिल्यांदा लिहिलेलें असून त्याचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति पंतांनीं कृष्णविजयांत काढली असावी हा पांगारकरांचा कयास बरोबर दिसतो. रुक्मिणीनें कृष्णाला माळ घातली त्या प्रसंगाचें सुंदर वर्णन—

प्रकटले स्वामी, लाजल्यें मी बाळा। सखी म्हणे 'माळा घालीं आधीं' ६६
ज्याच्या तेजें रवीशशी मालवले। ते घ्याया लवले माळा माझी ॥ ६७
धरूनियां करीं स्यंदनीं वाहीलें। हें प्रेम पाहीलें कोठें कोणीं ? ॥६८॥
बैसवूनीं अंकीं उराशीं धरिलें। मज उद्धरिलें चिंतेंतूनी ॥ ६९

पहिल्या ओवींत सखीच्या वाक्यांतील 'आधीं' या शब्दामध्यें फार खुबी आहे. 'लाजण्या बिजण्यांत वेळ घालवायला सध्यां मुळींच सवड नाहीं. सध्यांची वेळ घाईची व आणीबाणीची आहे अगोदर माळ घालून आपलें कार्य उरकून घे. मग लाजण्यामुरकण्याला पुष्कळ वेळ आहे.' असा अत्यंत समुचित अर्थ आधीं या शब्दानें व्यक्त होत आहे.

केवळ मुलीबाळी व स्त्रिया यांच्या उपयोगाकरितां रचलेल्या सीतागीत, सावित्रीगीत व रुक्मिणीगीत ह्या गाण्यांमध्यें एकच ल्हानसा दोष दिसून येतो. तो म्हणजे स्त्रियांच्या तोंडीं न शोभणाऱ्या व स्त्रियांस न समजण्यासारख्या अवघड संस्कृत शब्दांची कित्येक ठिकाणीं केलेली योजना हा होय. रुक्मिणी-गीतामध्येंच, साध्वस, घटज (अगस्त्य), और्व (समुद्रांतील अग्नि), मंदराग (मंदरपर्वत), तरणि, हे या दृष्टीनें आक्षेपार्ह शब्द आढळतात. मृषा, प्राज्य सभाजिला (सन्मानिला), कीनाश, कृष्णसार असे शब्द बाकीच्या दोन्ही गीतांतही आढळतात. हा क्षुल्लक दोष सोडून दिल्यास हीं गीतें केवळ अमृत-मयच आहेत.

पंतांच्या काव्यसमूहांत रुक्मिणीविवाहकथा एकंदर पांच ठिकाणीं आली आहे. कृष्णविजयाच्या ५२ व ५३ अध्यायांत मुळांतील कथाभागास अनुसरून प्रथम हा प्रसंग वर्णिला आहे त्याचप्रमाणें मंत्रभागवत दशम उत्तरार्धामध्येंही कथानकाच्या ओघांत रुक्मिणीविवाहकथा वर्णिली आहेच. मात्र तेथें ती मंत्र-भागवताच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें अगदीं त्रोटक रीतीनें वर्णिली आहे. कथेच्या ओघानें आलेल्या या वर्णनाशिवाय मुळांत जेथें सविस्तर कथा सांगितलेली नाहीं अशा कृष्णविजयाच्या ८३ व्या अध्यायामध्यें पंतांनीं ती कथा विस्तीर्ण रीतीनें वर्णिली असून तिचें आपण वर थोडेसें विवेचन केलेंच आहे. हाच अ० ८३ मध्यें अस-लेला, सूर्यग्रहणपर्वसमयीं परस्परांच्या भेटी झाल्या असतां द्रौपदीनें विवाह-कथा विचारल्याचा धागा घेऊन पंतांनीं 'रुक्मिणीगीत' रचलें आहे. याप्रमाणें भागवतांतील कथेवर चार काव्यें झालीं. पांचवी रचना हरिवंशांतील रुक्मिणी-

विवाहकथेवर झाली असून ती पंतांच्या हरिवंशांत यथास्थल आलेली आहेच. तिच्या व भागवताच्या कथेमध्यें फारसा फेर नाहीं. असो; या सर्व निरनिराळ्या पांच प्रकरणांमध्यें कृष्णविजयाच्या ८३ व्या अध्यायामधील कथावर्णन निःसंदेह श्रेष्ठ आहे. सात्विक प्रेमळपणानें व कल्पनासौष्ठवानें तें सर्व रसिकांस मोहून टाकील यांत संशय नाहीं.

७८. यापुढील कृष्णविजयाचे ८४ ते ८८ अध्याय अतिशयच मनोहर असून ते वाचकांनीं मुळांतच वाचून पहावे. त्यांतील उतारे घेऊन सौंदर्याचें प्रदर्शन करणें केवळ अशक्य आहे. चौऱ्याऐंशींव्या अध्यायात वसुदेवानें केलेल्या यज्ञाचें वर्णन आलें असून ८५ व्या अध्यायांत देवकीच्या इच्छेवरून कृष्णानें तिला पूर्वीचे मेलेले सात पुत्र परत जिवंत स्थितीमध्यें आणून भेटविले तो वृत्तान्त आहे. पुढें ८६ व्या अध्यायांत अर्जुनसुभद्राविवाहाचा वृत्तान्त आला असून तो अतिशय विनोदपर व सुंदर वठला आहे. पांगारकरांनीं आपल्या मोरोपंतचरित्रांत त्याचें योग्य गौरव केलेंच आहे. सत्याऐंशींव्या अध्यायांत श्रीकृष्णाचे दोन भक्त, एक मिथिलेचा राजा व दुसरा मिथिलेंतच राहाणारा श्रुतदेव नामक गरीब ब्राह्मण, या दोघांच्या घरीं दोन निराळीं रूपें घेऊन श्रीकृष्ण भेटावयास गेले होते त्याचें वर्णन आहे तें अतिशयच प्रेमळ व सद्भावपरिपूरित असून पंताच्या कवित्वाची येथें कमाल झाली असें म्हणावयास लावणारें आहे. आर्यारचनेचें कौशल्य येथें शिगेस पोंचलें असून एकंदर रचनाच अतिमनोहर व कोमल झाली आहे. विशेषतः श्रुतदेव ब्राह्मणाच्या भक्तीचें जें वर्णन पंतांनीं केलें आहे तें केवळ अलौकिक आहे. त्यांतील थोडे तरी उतारे दिल्यावांचून राहवतच नाहीं. गरीब श्रुतदेवानें केलेल्या श्रीकृष्णाच्या पूजेचें वर्णन —

> विमळ उशीरसुवासित हिममधुर प्राशनासि दे तोय ।
> तत्प्रेमरससतृष्णा कृष्णाला सत्य अमृत तें होय ॥ ५१ ॥
> होती जीर्ण काहीं कस्तूरी लाविला तिचा टिकला ।
> शोभे श्रीपतिभाळीं मधुकर इंदीवरीं जसा टिकला ॥ ५२ ॥
> घाली कुशपिंजूळग्रथितपवित्रें स्वबंधुच्या बोटीं ।
> मोटीं रत्नें ज्यांवरि त्या मुद्रा फार लाजल्या पोटीं ॥ ५३ ॥
> बहु कोमळ तुळसीची अर्पी कंठांत मंजरीमाला ।
> बाळा तद्भक्ति तदा वरि जाणों त्या जगत्प्रपाळा ॥ ५५ ॥

चरणीं कमळ समर्पी, तें जाणों आपुलेंचि हृत्कमळ ।
शमळघ्नप्रभुचें मग गद्गदगल साधु गाय यश अमळ ॥ ५६ ॥

शेवटच्या दोन आर्यांतील कल्पना किती हृद्य आहेत! पुढें श्रुतदेव श्रीकृष्णाची प्रार्थना करतो.—

आलें असेल काय प्रेमभरें या मुखा तुझें नाम? ।
कीं एकाद्या जन्मीं क्षण सादर पाहिलें तुझें धाम ? ॥ ६३ ॥
होय प्रसन्न जेणें मन भजनरहस्य तें पुन्हां बोला ।
कुक्षींत क्षेत्राच्या अर्पावें बीज जों असे वोला ॥ ६४ ॥

एकंदरींत कृष्णविजयाचे ८० ते ९० अध्याय हे मूळ श्रीमद्भागवतांतील याच अध्यायापेक्षां किती तरी पटींनीं सरस वठले आहेत असें म्हटल्यास मुळींच अतिशयोक्ति होण्याचा संभव नाहीं. मंत्रभागवताचा दशमपूर्वार्ध, कृष्णविजयाचे हे ८०–९० अध्याय व भीष्मभक्तिभाग्यासारखीं भागवती प्रकरणें पाहिल्यावर

घाणीं मयूरवदनीं जी न शुकातें द्विजोत्तमा यावी ।
पक्ष श्रीहरि धरि जरि काय न करि तरि अनंत मायावी ॥

असा जो रामजोशीबुवांनीं मोरोपंतांच्या भागवतकाव्यरचनेवर आपला अभिप्राय प्रकट करून ठेवला आहे तोच परम सत्य होय अशी कोणाचीही खात्री झाल्याखेरीज राहाणार नाहीं. शुकाचार्यांच्या वाणीपेक्षां मोरोपंतांच्या वाणीला त्यांनीं वरचढ म्हटलें आहे हा कांहीं केवळ अर्थवाद नव्हे. सर्वत्र नसलें तरी पंतकृत भागवतरचनेच्या बऱ्याच भागांत पुरेपूर प्रतीतीस येणारें तें दुर्दम सत्य आहे.

७९. येणेंप्रमाणें कृष्णविजयाच्या उत्तरार्धाची रचना आहे. मंत्रभागवताची रचना याच्या उलट तत्वावर झाली आहे कृष्णविजयांत कृष्णाच्या उत्तरचरित्राचा जेथें तेथें विस्तार केला आहे तर मंत्रभागवतांत त्याच उत्तरचरित्राचा संक्षेप केला आहे. मंत्रभागवताच्या दशमपूर्वार्धांत मुळाच्या एकातृतीयांशाइतका संक्षेप केला आहे तर उत्तरार्धांत मुळाच्या जवळ जवळ एक चतुर्थांशाइतका संक्षेप केला आहे. त्यांतल्या त्यांत ८९ व ९० हे शेवटचे दोन अध्याय पंतांनीं फार विस्तृत केले असल्यानें त्याच्या पूर्वीच्या सर्व अध्यायांच्या संक्षेपाचें प्रमाण जास्तच पडतें. ८९ व ९० या अध्यायांचा पंतांनीं उगीच विस्तार केला आहे. यांपैकीं पहिल्यामध्यें श्रीकृष्णानें अर्जुनासह शेषशायी परमेश्वराकडे जाऊन ब्राह्मणाचे मृतपुत्र परत आणल्याची कथा आहे व दुसऱ्यांत कृष्णस्त्रियांचे विलास, कृष्णप्रेमानें

उन्मत्त झालेल्या कित्येक स्त्रियांचे उद्धार, कृष्णाच्या पुत्रपौत्रांचें व वंशाचें वर्णन वगैरे संकीर्ण विषय आहेत. हे दोन्ही अध्याय विशेष मनोरम नसून देखील पंतांनीं त्यांचा अनुक्रमें ३३ व ५५ आर्याइतका विस्तार केला आहे; व तो विस्तारही फारसा मनोरम झाला आहे असें नाहीं. उत्तरार्धांतील पूर्वीच्या ५० ते ८८ या अध्यायांत पंतांचें प्रत्येक अध्यायास प्रमाण सरासरी ११ आर्याइतकें पडतें. आधीं इतका संक्षेप करून शेवटच्या दोन अध्यायांतच इतका विस्तार करण्याचें कारण पंतांच्या मंत्ररचनेकडे लक्ष दिलें म्हणजे उत्तम रीतीनें सांपडतें. पंतांना दशमस्कंधांत एकंदर १०८ मंत्र साधावयाचे होते. या ' भागवतमंत्रमुक्तामणिमाले ' त बरोबर १०८ मंत्रमणि जे ओवले गेले ते केवळ यदृच्छेनें नसून १०८ या संख्येंत कांहीं पुण्यप्रदत्व आहे अशा समजुतीस अनुसरून पंतांनीं ती संख्या साधावयाचा आधींपासूनच संकल्प करून ठेवला होता. त्यांनीं साधारण अंदाजानें ठरविलेल्या संक्षेपाच्या धोरणास अनुसरून जेव्हां ते ८८ पर्यंत अध्याय रचीत आले तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें कीं संक्षेपाचें हेंच प्रमाण कायम ठेवल्यास शेवटपर्यंत १०८ मंत्र साधून होणार नाहींत. कांहीं कमी पडतील. तेव्हां या उत्पन्न झालेल्या अडचणीकरितां आतांपर्यंत रचलेला सर्व उत्तरार्ध मोडून टाकण्यापेक्षां ८९ व ९० या उरलेल्या अध्यायांतच प्रमाणाबाहेर विस्तार करून १०८ ही मंत्रसंख्या साधावी असें त्यांनीं ठरविलें अशी वस्तुस्थिति असल्याशिवाय अनेक रमणीय कथांनीं भरलेल्या मागील सर्व अध्यायांची प्रत्येकीं केवळ दहा अकरा आर्या इतक्या अल्प अवकाशांत बोळवण करून याच शेवटच्या दोन अध्यायांत त्यांनीं इतका प्रमाणाबाहेर विस्तार करावा याची उपपत्ति लागत नाहीं. असो. एकंदरीनें मंत्रभागवताचा उत्तरार्ध पूर्वार्धाप्रमाणेंच सुंदर वठला आहे. पूर्वार्धाइतकें वात्सल्याचे व प्रेमाचे प्रसंग यांत नसल्यानें वर्णनाचा रंग किंचित् फिका पडल्यासारखा वाटतो. पण तो फिकेपणा पूर्वार्धाशीं तुलना करण्याचें मनांत आणल्यासच लक्षांत येईल. एरवीं तुलना न करतां म्हणावयाचें झालें तर हा उत्तरार्ध उत्तमच वठला आहे असेंच कोणीही म्हणेल. विशेषतः रुक्मिणीविवाहप्रसंग (आर्या ६९७–७२५), शाल्ववधप्रसंग (आ० ९४१–९७०), इत्यादि प्रसंग त्यांतल्या त्यांत अधिक सुंदर झाले आहेत. नारदाला कृष्णानें आपल्या सहस्रशः स्त्रियांशीं सह चाललेल्या गृहस्थधर्माचरणाचा दाखविलेला चमत्कार (अ० ६९), व रुक्मिणी वगैरे कृष्णस्त्रिया द्रौपदीला आपल्या विवाहकथा सांगतात तो कथाभाग (अ० ८३), असे दोन कथांश मात्र पंतांनीं गाळले आहेत. फक्त एकेका

आयेंत त्यांचा निर्देश केला आहे. हे प्रसंग कृष्णविजयांत अत्यंत विस्तारानें व उल्लासानें वर्णिले असल्यामुळेंच येथें गाळले आहेत हें उघड आहे.

[एकादश स्कंध]

८०. एकादश व द्वादश हे दोन स्कंध मिळून मंत्रभागवताच्या तीन माळांपैकीं तिसरी माळा होते. तिचें निरीक्षण करण्यास आतां प्रारंभ करूं.

एकादश स्कंध म्हणजे मुमुक्षूंस अत्यंत प्रिय अशी वेदान्तसुधारसाची वापीच होय. देवोत्तम श्रीकृष्णानें भक्तश्रेष्ठ उद्धवाला अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रेमानें सांगितलेलें ब्रह्मज्ञान; व तें सांगून झाल्यानंतर उद्धवाला मित्रत्वाचा मान देऊन

अप्युद्धव त्वया ब्रह्म सखे समवधारितम् ।
अपि ते विगतो मोहः शोकश्चासौ मनोभवः ॥ भा. ११. २९. २९.

अशी सौहार्दानें व कळकळीनें केलेली पृच्छा; आणि स्वतः निवेदन केलेल्या सारभूत ज्ञानाबद्दल

नैतद्विज्ञाय जिज्ञासोर्ज्ञातव्यमवशिष्यते ।
पीत्वा पीयूषममृतं पातव्यं नावशिष्यते ॥ भा. ११.२९.३२

अशा तऱ्हेचा दिलेला निर्वाळा या गोष्टी कोणाचें चित्त थोडेंसें तरी भक्तिप्रवण करणार नाहींत ? तें भक्तियोगाचें प्रतिपादन व तो उद्धवश्रीकृष्णांचा प्रेमप्रसंग पाहून पाखंडी असेल तोही किंचित्काल तरी मस्तक नम्र करील; निष्ठुर व्यवहाराच्या रुक्षतेनें कोरडा ठणठणीत बनलेला असेल तोही थोडा तरी द्रवेल. मग पंत तर काय मोठ्या योग्यतेचे भगवद्भक्त होते व प्रेमरसाचा अखंड साठा हृदयामध्यें असलेले सहृदय रसिक होते. त्यांना या उद्धवकृष्णसंवादाची अलौकिकता तत्काळ पटून त्यानीं त्याच्या मुळांतील सौंदर्यास शोभेल अशा तऱ्हेचा महाराष्ट्र वेष त्यास देण्याचें योजिलें असल्यास त्यांत नवल काय ? पंतांना वेदान्ताचें विशेष प्रतिपादन आपल्या काव्यांत करणें रुचत नसे. त्यांनीं आधारास घेतलेल्या मूळ ग्रंथांतील वेदान्ताचें प्रतिपादन सर्वत्र टाळलें आहे. महाभारतांतील शांतिपर्व, अनुशासनपर्व व भागवतांतील अनेक वेदान्तमय प्रकरणें वगैरे भागांचा त्यांनीं कसा अतिसंक्षेप केला आहे हें पंतभक्तांच्या आजपर्यंत अनेकवार नजरेस आलेंच आहे. तथापि, असें असतांना देखील वेदान्ताविषयींच्या आपल्या उदासीन वृत्तीला त्यांनीं आपण होऊन दोन अतिशय ठळक असे अप-

वाद करून ठेवले. ते म्हणजे भगवद्गीता व भागवतांतील एकादशस्कंध यांचे होत. या दोन्ही ग्रंथांवर पंतांनीं आपल्या टीका लिहिल्या असून त्या अत्यंत व्यवस्थेनें, काळजीनें व विस्तारानें तयार केल्या आहेत. या एका गोष्टीवरूनच पंतांच्या मनांत या दोन्ही ग्रंथांबद्दल किती आदर व पूज्यभाव वसत होता हें स्पष्ट दिसून येतें. गीतेस जो मान द्यावासा वाटला तोच मान त्यांनीं एकादशस्कंधासही दिला. आणि हें त्यांनीं योग्यच केलें असें कोणीही म्हणेल. हे दोन ग्रंथ म्हणजे श्रीकृष्णानें आपल्या अत्यंत जिव्हाळ्याच्या दोन भक्तसख्यांना अत्यंत प्रेमानें अर्पिलेले उपदेशामृताचे चषकच होत. त्या 'कार्तस्वरमणिचषकां'तील अमृत पंतांनीं आपल्या 'पलाशद्रुमदलपुटकां'मध्यें ओतून प्राकृत वाचकांस घ्यायला देण्याची सोय केली हें ठीकच झालें.*

८१. भगवद्गीतेप्रमाणें एकादशस्कंधांतील प्रतिपादन आंतील तत्वांच्या दृष्टीनें जरी अनुपम असलें तरी बाह्यांगाच्या दृष्टीनें गीतेपेक्षां जरा कमी प्रतीचें ठरेल. गीतेमधील प्रतिपादन सर्वत्र द्राक्षापाकसम किंवा स्फटिकवत् आहे. भागवतांतील एकादशामध्यें सर्वत्रच तसली अंतर्बाह्य प्रसादपूर्ण शैली आढळून यावयाची नाहीं. कांहीं ठिकाणीं भाषेस थोडेंबहुत काठिन्य व गहनता आली आहे. तथापि पंतांचें रूपांतर मात्र सर्वत्र एकसारखें गंभीर, सरळ व प्रसादपूर्ण वठलें आहे. मुळांत जेथें जेथें काठिन्य आलें आहे तेथील कल्पना पंतांनीं क्वचित् ठिकाणीं विस्ताराचा दोष पत्करूनदेखील अगदीं सुगम भाषेंत यथार्थ रीतीनें वर्णिल्या आहेत. मुळामधील १३६७ श्लोकांचा हा स्कंध पंतांनीं ६४९ आर्यांत आणला आहे, म्हणजे मुळाच्या फक्त एक द्वितीयांश इतका संक्षेप केला आहे. मुळाच्या मानानें संक्षेपाचें इतकें अल्प प्रमाण मंत्रभागवतांत इतरत्र कोठेंच दिसून येत नाहीं. या प्रमाणावरून एकादशस्कंधांतला वेदान्त अगदीं व्यवस्थित रीतीनें कोठेंही कसर न करितां वर्णन करण्याचा पंतांनीं बेत केला होता असें दिसून येतें. आणि तो बेत किती उत्कृष्ट रीतीनें पंतांनीं सिद्धीस नेला आहे हें पाहून पंतांच्या कर्तबगारीविषयीं

* पंत हे स्वतःच आपल्या रचनेला पलाशद्रुमदलपुटकाची म्हणजे पळसाच्या द्रोणाची उपमा देतात म्हणून वर तसा उल्लेख केला आहे. वस्तुतः पंतांनीं ही अत्यंत विनयानें घेतलेली द्रोणाची उपमा त्यांच्या वाचकांस पटेल असें नाहीं. मुळाप्रमाणेंच सुवर्णरत्नखचित पेल्याची किंवा निदान रजतपात्राची तरी उपमा त्यांच्या रचनेला द्यावी असेंच सर्वांस वाटेल हें उघड आहे.

कौतुक वाटल्याखेरीज रहात नाहीं. शक्य तोंवर मुळांतील आशय यथार्थ रीतीनें मराठींत आणावयाचा असा पंतांचा हेतु असल्यानें पंतांनीं पुष्कळ ठिकाणीं मुळाचें बरहुकूम भाषांतर केलें आहे. अशीं भाषांतराचीं उदाहरणें पांगारकरांनीं आपल्या विवेचनांत कांहीं दिलीं आहेत व आणखीही पुष्कळ देतां येतील. (पहा. मो.च.पृ ४३०–४३४). पण येथें इतका विस्तार करण्यास अवकाश नाहीं आणि संदर्भरहित मधल्या मधल्या श्लोकांचे उतारे दिल्यानें वाचकाला ते अगदींच रुक्ष वाटतात व त्याच्या लक्षांत त्यांपैकीं फारसें कांहीं रहात नाहीं. आणखी पंतांच्या भाषांतर-कौशल्याचें उदाहरण पहायचें असल्यास मुळामधील अध्याय २ श्लोक २१–३१ हे पंतांच्या आर्या ४३–६० यांच्याशीं ताडून पहावे म्हणजे पंतांच्या कारागिरीची कांहीं कल्पना येईल. गहन वेदान्त देखील मुळापेक्षां जास्त विशद व सुगम करून पंतांनीं कसा दाखविला आहे हें पहावयाचें असल्यास अध्याय ११ श्लोक १–१५ यांचें स्पष्टीकरण पंतांनीं आर्या २२३ ते २५३ पर्यंत किती सुंदर रीतीनें केलें आहे तें पहावें. मुळापेक्षां विशेष विस्तार न करतां मुळांतील अवघड भाषेंतलि वेदान्त प्रसादपूर्ण व सुंदर अशा रीतीनें मराठींत आणणें हें किती कौश-ल्याचें काम आहे याची अगोदर यथार्थ कल्पना आपणांस बहुधा नसते. पंतांनीं जें काम केलें आहे तसें थोडें तरी आपण स्वतः करण्याचा प्रयत्न करून बघावा; परिश्रमाची पराकाष्ठा करून जो काय अंश आपण मराठींत आणला असेल तो पंतांच्या कृतीशीं ताडून बघावा म्हणजे पंतांच्या कौशल्याचें माप केवढें आहे हें चटकन् आपल्या लक्षांत येईल.

८१. आतां अध्यायवार पंतांनीं कोणकोणत्या गोष्टी कसकशा वर्णन केल्या आहेत तें थोडेसें अवलोकन करूं. पहिल्या अध्यायांत, पिंडारकक्षेत्रीं उन्मत्त झालेल्या यादवांनीं ऋषींची थट्टा केल्यावरून त्या ऋषींनीं यादवकुलक्षयास कारणी-भूत होणारा भयंकर शाप दिला, ती सर्व हकीगत आली आहे. ती कथाप्रिय पंतांनीं नेहमींप्रमाणें यथास्थित वर्णिली आहे (आर्या १–१३). पुढें अध्याय २–५ यांत निमि व नवयोगीश्वर यांचा संवाद आहे तो पंतांनीं आर्या १३–१२१ पर्यंत अत्यंत सुंदर रीतीनें वर्णिला आहे. या संवादांत जेथें जेथें हरिभक्तीचें, कीर्त-नाचें वगैरे वर्णन आलें आहे तेथें पंतांची वाणी जरा विस्तार पावली असून सौंद-र्याचा पाराही जास्त वर चढला आहे चौथ्या अध्यायामध्यें मुळांत ईश्वराच्या बावीसएक अवतारांचें वर्णन आलें आहे; त्यांत नारायणावताराचें वर्णन विशेष

विस्तारानें आलें आहे. पंतांनींही नारायणावताराचेंच विस्तारानें वर्णन केलें आहे. पण बाकीच्या अवतारांपैकीं फक्त वालखिल्योद्धारक अवताराचा, दुसरीकडे कोठें त्याचा उल्लेख आलेला नाहीं म्हणून व रामचंद्राचा, स्वतःचें उपास्य दैवत म्हणून, पंतांनीं उल्लेख केलेला आहे. बाकी मुळांत जे सर्व अवतार सांगितले आहेत त्यांचा उल्लेख देखील पंतांनीं केला नाहीं. सहाव्या अध्यायांत, श्रीकृष्णाकडे सर्व देव येऊन त्याला अवतार संपवून निजधामीं परत येण्याबद्दल विनंती करतात असें वर्णन आहे; त्यांत देवांची स्तुति वगैरे असल्यामुळें पंतांनीं त्याचा संक्षेपच केला आहे. श्रीकृष्ण जाणार असें कळल्याबरोबर उद्धव धांवत येऊन आपल्याला बरोबर नेण्याची श्रीकृष्णाला एकांतांत विनवणी करतो. तो अत्यंत प्रेमळ व हृदयद्रावक प्रसंग मुळांत फारच बहारीनें वर्णन केला आहे. पण पंतांनीं त्याचा दोनच आर्यांत संक्षेप करून त्यांतील रस बहुतेक सांडून टाकला आहे. निदान असा काव्यमय प्रसंग तरी पंतांनीं वाया जाऊं द्यावयाचा नव्हता. असो. यापुढें श्रीकृष्णाचा वेदांतोपदेश सुरू होतो. अध्याय ७,८ व ९ यांमध्यें निरनिराळ्या चोविस गुरूंपासून काय काय उपदेशाचें ग्रहण केलें तें श्रीदत्त अवधूतानें यदुराजाला सांगितलेलें श्रीकृष्णानें कथन केलें आहे. हा सर्व कथाभाग अत्यंत बोधप्रद असून फारसा गहनवेदांतमयही नाहीं. तो पंतांनीं जराशा संक्षेपानें परंतु फार उत्कृष्टपणें वर्णिला आहे. या अवधूतोपदेशाचे मुळांत १३१ श्लोक आहेत; पंतांनीं तो ७९ आर्यांत आणला आहे (आर्या १४१–२१९). स्वतःचे दृष्टांत वगैरे घालून मुळाला पंतांनीं वारंवार शोभविलें आहे. सुंदर व्यावहारिक दृष्टांत देऊन मूळ विषय खुलवून दाखविण्याची पंतांची शैली प्रसिद्धच आहे. बाहेर अत्यंत प्रसन्न पण आंत अत्यंत गंभीर असावें असें सांगतांना पंत सुंदर दृष्टांत योजितात.:—

मोदितचित्त असावें, फार दिसावें प्रसन्न बाहेर ।
गंभीरतेसि अभ्यंतर तों, केवळ मुलीस माहेर ॥ १७८ ॥

असेच आणखी एकदोन व्यावहारिक दृष्टांत:—

द्वैतास्फूर्ति समाधिस हेतु, गृहा जेंवि राशि वित्ताची ॥ २१० ॥
मोठें रज विक्षेपा कारण, तमही लया; न यां उरवी ।
वाढुनि सत्व, जसें खलवैभव बहु पाठ बंधुची पुरवी ॥ २११ ॥

दहाव्या अध्यायांत श्रीकृष्णानें बराच वेदांत उद्धवास सांगितला आहे. तो किंचित् नीरस असल्यानें पंतांनीं अगदी त्रोटक रूपानेंच वर्णिलेला आहे. अक-

राव्या अध्यायांत मात्र पंतांनीं बहार केली आहे. मुळांत या अध्यायाचा पूर्वार्ध वेदांतमय व किंचित् क्लिष्ट असा आहे आणि उत्तरार्ध भक्तियोगवर्णनपर आहे. पंतांनीं मुळापेक्षा विस्तार करून मुळांतील हे दोन्ही भाग अत्यंत उत्कृष्ट रीतीनें उतरले आहेत. बाराव्या अध्यायामध्येंही मुळांतील वेदान्ताचें सुगम वर्णन पंतांनीं टीकेच्या आधारें केलें आहे. पंतांची भागवतावरील कृति वाचतांना पंतांनीं श्रीधरी टीकेचा आधार घेऊन प्रसंगविशेषीं तिच्यांतील मजकूर स्वीकारला असल्याचें अनेक ठिकाणीं ध्यानांत येतें. विशेष सूक्ष्म वाचन करणाऱ्यासच दिसणारीं उदाहरणें असल्या लेखांत देतां येत नाहींत तथापि हें बाराव्या अध्यायाचें उदाहरण ठळक व सहज वरवर दिसणारें म्हणून देण्यास हरकत नाहीं. यापुढें तेराव्या अध्यायांतही अकरा पदार्थ जे सांगितले आहेत त्यांपैकीं प्रत्येकाचा सात्विक, राजस व तामस विभाग स्पष्ट करून मुळांत सांगितलेला नाहीं. तो पंतांनीं टीकेंतूनच घेऊन वर्णिलेला आहे (आर्या ३०३–३०९ पहा). तेराव्या अध्यायांतील बाकीचे विषय म्हणजे सनत्कुमार व ब्रह्मदेव यांना परमेश्वरानें हंसस्वरूप घेऊन केलेला उपदेश होय. तो पंतांनीं सुंदर रीतीनें वर्णिला आहे चौदाव्या अध्यायांत, सर्व श्रेयांमध्यें व प्राप्तव्यांमध्यें ईश्वरभक्ति हीच श्रेष्ठ होय असें प्रतिपादन करून भक्तीला उपयुक्त असा ध्यानधारणेचा विधि सांगितला आहे. तो पंतांनीं उत्कृष्ट वर्णिला आहे पंधराव्यांत मुळामध्यें अणिमामहिमादि १५ सिद्धींचें वर्णन व त्यांच्या प्राप्तीचे उपाय वगैरे वर्णिले आहेत. परंतु या सिद्धि ईश्वरप्राप्तींत ज्या अर्थी अंतराय करितात त्याअर्थी त्यांचें वर्णन मुळींच न करितां ' प्रथमचि विदित असावें त्यांचें अहितत्व संतराया ! तें। ' ३५९. येवढेंच बजावून पंत पुढें चालते झाले आहेत.

सोळाव्या अध्यायांत, गीतेंतील दहाव्या अध्यायाप्रमाणें ईश्वरानें आपल्या विभूति सांगितल्या आहेत. मधल्या मधल्या दोन चार विभूति सांगून पंतांनीं या केवळ परिगणनात्मक अध्यायाची बोळवण केली आहे. सतरा व अठरा या दोन अध्यायांत सविस्तरपणें भागवतकारांनीं चाऱ्ही आश्रमांचे धर्म व कर्तव्यें स्मृतींप्रमाणें सांगितलीं आहेत. पंतांनीं तें सर्व गाळून हे अध्याय अगदींच रोड केले आहेत. पंतांना मंत्रभागवत म्हणजे एक सर्वसंग्राहक पुराण करावयाचें नसून भक्तिरसमय काव्य करायचें होतें. तेव्हां हे मुख्यतः धर्मशास्त्रांत अंतर्भूत होणारे विषय पंतांनीं गाळले हें योग्यच केलें. एकोणिसावा अध्याय हा टीकेच्या आधारानें पंतांनीं वाढविलेला आणखी एक अध्याय होय. बारा यम व बारा नियम

त्यांचें वर्णन (आर्या ३८६–४०८) पंतांनीं टीकेच्या आधारानें मुळापेक्षां दुप्पट वाढविलें आहे. विसावा अध्याय हा एक पंतांनीं जवळ जवळ मुळाप्रमाणें तंतोतंत उतरलेला अध्याय आहे, (आर्या ४०९ ते ४४४). यांत भगवंतांनीं कर्म, ज्ञान व भक्ति या योगांचें प्रतिपादन केलें आहे. मुळाबरहुकूम भाषांतर केलें असूनही यांतील आर्या अत्यंत गोड, सुंदर व सफाईदार उतरल्या आहेत. जिज्ञासूंनीं मुळाचा सर्व अध्यायच पंतकृतीशीं ताडून पहावा. एकविसाव्या अध्यायांत गुणदोष वगैरेंचें वर्णन आहे. पण तें पंतांनीं सर्व गाळलें आहे. ' वाढेल ग्रंथ बहु, प्रणति करुनि सोडिलाचि म्यां गातां '। ४४७ असें पंत म्हणतात. बाविसाव्या अध्यायांत प्रकृति, पुरुष व सांख्यांचीं तत्वें यांविषयीं विवरण आहे तें पंतांनीं सुंदर रीतीनें परंतु संक्षेपानें उतरलें आहे. तेविसाव्या अध्यायांत कृपण द्विजाची गोष्ट असून त्या द्विजाला उपरति झाल्यानंतर त्यानें गाइलेली वेदांतपूर्ण गाथा पंतांनीं तंतोतंत भाषांतर करून मराठींत उतरली आहे. अगदीं मुळांतील शब्द सुद्धां वापरून केलेलें सुंदर भाषांतर--

मूळ- मनोवशेऽन्ये ह्यभवं स्म देवा मनश्च नान्यस्य वशं समेति ।
भीष्मो हि देवः सहसः सहीयान् युंज्याद्वशे तं स हि देवदेवः ॥
भा. ११. २३. ४८.

पंतकृति–भजति सकलदेव मना, मन कोणाच्याहि हें नसे भजनीं; ।
भीष्म मनोदेव बळी, या वश करि तोचि देवदेव जनीं ॥४७६॥

आणखी एक नमुना—

मूळ–जनस्तु हेतुः सुखदुःखयोश्चेत् किमात्मनश्चात्र हि भौमयोस्तत् ।
जिव्हां क्वचित् संदशति स्वदद्भिस्तद्वेदनायां कतमाय कुप्येत् ॥
भा. ११. २३. ५९.

पंतकृति–ते षट् पदार्थ, त्यांत प्रथम जन सुखासुखासि हेतु जरी, ।
देहासि असो, आत्म्या काय ? न दंडुनि घे, न दंड करी ॥४७९॥
बा जीभ चाविली जरि, तरि हित जिव्हेचि सारिखे दांत; ।
कोणावरि कोपावें ? तत्सहनाचि तोषकारि खेदांत ॥ ४८० ॥

चोविसावा अध्याय हा भागवतांतील सांख्यतत्वज्ञानाचा केवळ गाभाच आहे असें म्हटलें तरी चालेल. पंतांना सांख्याविषयीं कांहीं विशेष प्रीति नसल्यानें त्यांनीं हा अध्याय जवळ जवळ गाळलाच आहे. पंचविसावा अध्याय संक्षेपानें उतरून

सव्विसाव्या अध्यायांतील पुरूरव्यानें पश्चात्तप्त होऊन गाइलेलें ऐलगीत पुन: पंतांनीं मुळाबरहुकूम सुंदर रीतीनें उतरलें आहे. २७, २८, २९, हे अध्यायही पंतांनीं संक्षेपानें परंतु नेहमींच्या सुंदर रीतीनें वर्णिलें आहेत. २९ व्यांतील उद्धवकृष्णवियोगाचा प्रसंग मात्र पंतांस मुळाइतका चांगला साधला नाहीं. त्या उदात्त प्रसंगास न शोभे असे क्षुल्लक दृष्टान्त घालून पंतांनीं मुळांतील उदात्त भक्तिप्रेमाचा विरस केला आहे असें म्हणावें लागतें. विशेषेंकरून या प्रसंगांतील ५८३ व ५८५ या आर्या पाहण्यासारख्या आहेत. श्रीकृष्णवियोगप्रसंगीं उद्धवास झालेलें दुःख वर्णन करतांना घातलेलें

कन्येसि तसें रोदन आलें तें पसरवीच आज्ञात्या। ५८३.

हें आर्यार्ध तर अगदींच वैरस्योत्पादक आहे. अगोदर कन्येची उपमा या प्रसंगास विशेष समर्पक नाहीं. त्यांतून ‘ रोदन आ पसरवी ’ असें जें म्हटलें आहे तें तर अगदींच अप्रयोजक आहे. येथील उपमान ज्या कन्या त्या कधीं असें ‘ आ पसरून ’ रडत नाहींत; व उपमेय जो उद्धव तोही असें भोकाड पसरून रडला हें म्हणणें अगदीं शोभत नाहीं. त्याचप्रमाणें

मोहें रडताचि गेला तो उद्धव बाळ जेंवि शाळेला। ५८५.

आजन्म श्रीकृष्ण परमात्म्याला आपला सखा, आपला स्वामी किंबहुना आपलें सर्वस्व मानून ज्यानें अनन्यमनस्क होऊन प्रेमनिर्भरतेनें त्याची सेवा केली तो ‘महाभागवत उद्धव’ श्रीकृष्णवियोगसमयीं शाळेला जाणाऱ्या मुलाप्रमाणें रडत गेला असें म्हणणें म्हणजे त्या उदात्त प्रसंगाची थट्टाच करणें होय. त्यापेक्षां मूळ भागवतांत हा प्रसंग किती तरी गंभीर व उदात्त वर्णनशैलीनें प्रथित केला आहे.

यापुढें अ. ३० व ३१ यांत यादवनाशाचें, श्रीकृष्णगमनाचें, द्वारकानाशाच वगैरे वर्णन आहे. तें नेहमींप्रमाणें सुंदर साधलें आहे. उच्छृंखल यादवांचें वर्णन एका आर्येंत अपन्हुति अलंकारानें सुंदर केलें आहे.

सुटले गुरुमर्यादेपासुनि यादव न सिंधु ते फुटले।
तुटले स्नेहमहागुण कलह करायासि सर्व हुटहुटले ॥ ५९ ॥

स्वत:च्या पायाला तीर मारणाऱ्या व्याधावर भगवंतांनीं दया करून त्याला स्वर्गीं पाठवलें त्याचें पंत प्रेमनिर्भरतेनें वर्णन करतात—

वात्सल्य तसें कोठें ? त्या प्रभुच्या आयका यशाला हो ।
आतुला क्षमा दया ती; कीं स्वर्गी प्रभु म्हणे तशाला 'हो' ॥ ६०४॥

भगवत्प्रयाणाची व यादवनाशाची शोकवार्ता घेऊन भगवंताचा सारथि दारुक द्वारकेला गेला त्याचें पंत दीपक अलंकारानें सुंदर वर्णन करतात;—

मोहाया तो दारुक सर्वां द्वारावतीस्थ लोकांतें,
पूर्वी श्रीकृष्णातें, तैसा घेऊनि जाय शोकातें ॥ ६२९ ॥

पूर्वी दारुक एकाद्या स्वारीवरून श्रीकृष्णासहित द्वारकेस परत आला म्हणजे द्वारकावासी जनांस आनंदानें मोह पडत असे व आतां तो द्वारकेंत गेला असतां तो अत्यंत वाईट बातमी घेऊन शोकानें मोह पाडण्यासाठीं गेला; अशा रीतीनें पूर्वीच्या आनंददायक प्रसंगाची आठवण काढून व सध्याच्या शोकमय प्रसंगाशीं त्याचा विरोध सूचित करून पंतांनीं आपली अनुपम सहृदयता व्यक्त केली आहे.

८२. याप्रमाणें हा सर्व स्कंधच काव्यसुमनांनीं नटलेला आहे. वेदान्तमय भागांतसुद्धां पंतांनीं ठिकठिकाणीं समर्पक दृष्टान्तादिकांची योजना करून त्यास सौंदर्य आणलें आहे. उगाच उतारे तरी किती देत बसणार ? खरोखर काव्याची गोडी ज्यास घ्यावयाची असेल, त्यानें मुळासच हात घालावा. केवळ उदाहरणादाखल ३६, ३७, ४७, ४८, ७५, ११२, ११४, १२७, १३४, १७१, १७८, १८२, २१०, २११, २३८ या स्कंधाच्या प्रथमार्धांतीलच आर्या पाहिल्यास कौटुंबिक व व्यावहारिक दृष्टान्त देण्याची खुबी, उत्कृष्ट व सहृदय अलंकार, प्रेमळ वर्णन वगैरे गुण थोडक्यांत परंतु स्पष्टपणें दिसून येतील.

[द्वादश स्कंध.]

८३. उतारे द्यायचे नाहींत म्हणतां म्हणतां वरील स्कंधांत बऱ्याच आर्यांचे उतारे दिले गेले. तरी हा मोह आवरून आतां बाराव्या स्कंधांत काय आहे तें पाहूं. बारावा स्कंध हा भागवतांतील अगदीं शेवटचा स्कंध; त्यांत विशेष महत्त्वाचे किंवा रमणीय असे फारसे विषय नाहींत. श्रीकृष्ण निजधामास गेल्याच्या हकीकतीनंतरचा भाग आपण वाचूं लागलों म्हणजे तो केवळ फिका असा आपल्यास वाटूं लागतो. तथापि परीक्षितास येवढा वेळ जो अतुलनीय उपदेश केला

त्याचा उपसंहार करतानाही शुकाचार्यांच्या वाणींतलें माधुर्य व भक्तियुक्त प्रेमळपणा नाहींसा झाला नाहीं असें दिसून येतें. पंतांनींही या स्कंधाची कांहीं उपेक्षा केलेली नाहीं. इतकेंच नव्हे तर पहिल्या आठ स्कंधांतील कोणत्याही स्कंधापेक्षां हा स्कंध पंतांनीं जास्त विस्तारानें वर्णिला आहे. या स्कंधांतील तेरा अध्यायांमध्यें मुळांत पुढीलप्रमाणें विषय आहेत. प्रथम कलियुगांतील राजांच्या वंशावळी; नंतर कलियुगांतील लोकांच्या भ्रष्टस्थितीचें वर्णन; कल्कि अवताराचें भविष्यकथन; कृत, द्वापर, त्रेता व कलि या युगांतील लोकांचें वर्णन;येणेंप्रमाणें विषय आले असून शेवटीं भगवद्भक्तीचें आणि भागवतमाहिम्याचें सुंदर वर्णन करून शुकाचार्यांनीं उपसंहार केला आहे. शुकाचार्यांनीं सांगितलेल्या भागवताच्या श्रवणानें तृप्त झालेला परीक्षित ब्रह्मस्वरूपीं ध्यान लावून बसण्यास त्यांची परवानगी घेतो व त्याप्रमाणें आसनस्थ होऊन ध्यान लावून बसल्यानंतर ठरल्याप्रमाणें तक्षकदंश होऊन त्यास मृत्यु येतो. पित्याच्या मृत्यूनें रागावलेल्या जनमेजयाच्या सर्पसत्राची हकीकत नंतर सूतानें सांगितली असून त्यानंतर सूतानेंही आपलें भागवतकथन पुरें केलें आहे. पण खंबीर शौनक ऋषींनीं त्यास येथेंच पुरें करूं न देतां वेदसंहिता, पुराणें वगैरे संबंधीं प्रश्न विचारून त्याचा पिच्छा पुरवला आहे. सहस्रवार्षिक सत्र करणाऱ्या तपःस्वाध्यायनिरत शौनक ऋषींस धड वेदांबद्दलची माहिती नसावी व त्यांनीं ती सूतासारख्या पुराणिकास विचारावी हें जरा चमत्कारिकच दिसतें ! असो. यानंतर शौनकऋषींनीं आणखी मार्कंडेयाची कथा विचारून घेतली आहे व ती आठ, नऊ व दहा या तीन अध्यायांत आली आहे. पुढें अकराव्या अध्यायांत विराट्पुरुषाचें वर्णन, सूर्यव्यूह वगैरे विषय आले आहेत. बाराव्या अध्यायांत श्रीमद्भागवतांतील १ ते १२ स्कंधांत काय काय विषय आले आहेत ते क्रमानें सांगितले असून परमेश्वरभक्ति, नामस्मरणाचें माहात्म्य वगैरे वर्णन केलें आहे. तेराव्या अध्यायांत लहानशी ईशस्तुति असून अठरा पुराणें व त्यांची श्लोकसंख्या यांचें परिगणन आलें आहे. व नंतर थोडक्यांत एका सुंदरशा परमेश्वरप्रार्थनेनें ग्रंथसमाप्ति झाली आहे.

८४. पंतांनीं या सर्व गोष्टींपैकीं फारसें कांहीं गाळलें नाहीं. प्रारंभींची निरनिराळ्या राजवंशांची यादी व अगदीं शेवटची पुराणांची श्लोकसंख्येसहित सांगितलेली यादी या तरी त्यांनीं गाळाव्या, पण त्यादेखील गाळलेल्या नाहींत. नवल जवळ मुळाइतक्याच सविस्तर वर्णिल्या आहेत. नाहीं म्हणावयास तिसऱ्या अध्या-

यांतील कृत, त्रेता, द्वापर, कलि या युगांचीं वर्णनें, सहाव्या अध्यायांतील वेद-शाखांचें वर्णन, अकराव्या अध्यायांतील सूर्यव्यूह, सूर्याचे गण, वगैरे गोष्टी मात्र त्यांनीं गाळल्या आहेत. एकंदर या स्कंधांतील पंतांचें धोरण संग्राहकत्वाचें दिसतें. तथापि नेहमींप्रमाणें संक्षेपाचें धोरण पंतांनीं सोडलेलें नाहीं. या स्कंधांत मुळापेक्षां अडीच पटीनें पंतांनीं संक्षेप केला आहे हें मागें आलेंच आहे.

८५. या स्कंधांतील कलिवर्णन (आर्या २७–३६), कलिदोषवर्जनाला श्रीकृष्णभक्तीचा उपाय (५२–६८), परीक्षितीचें शुकाचार्यांशीं भाषण (९०–९७), मार्कंडेयाचें आख्यान (१३१–१८६) व शेवटच्या सूताच्या तोंडीं घातलेल्या उपसंहारात्मक आर्या (२०१–२०९), वगैरे भाग चांगले वठले असून ते पंतांच्या वर्णनशैलीचें तेज शेवटीं शेवटींही मुळींच कमी झालें नसून तिच्यांतील भरदारपणा, जोम व माधुर्य अजूनही कायम आहे याची पूर्ण साक्ष देतात. आर्यांची रचनाही नेहमींप्रमाणें सुंदर झाली आहे. कलिवर्णनामधील कांहीं आर्या पांगारकरांनीं उद्धृत केल्या आहेतच. त्या येथें पुनः उतरण्याचें कारण दिसत नाहीं. सत्तेची व शाश्वतीची घमेंड मारणाऱ्या राजांच्या क्षुद्रतेचें व नश्वरतेचें पंत वर्णन करतात —

यश मात्र राहतें बा ! कांहीं काळापुढें मग न राहे, ।
क्षिति हांसे पति म्हणत्या काळनदतटोद्भवा नगनरा हे ॥ ४४ ॥
गणना गणनाथाला न घडे ऐसे महीश कवि झाले ।
कालह्रदांत तेजोनिधि दहन, करूनही शक, विझाले ॥ ४८ ॥

(दहन=अग्नि, म्ह० अग्नीप्रमाणें तेजस्वी राजे) कालावर पहिल्या आर्येंत नदीचें व दुसरींत डोहाचें केलेलें सुंदर रूपक मुळांतील नाहीं. कलीचे सर्व दोष धुवून टाकून सद्गतीला नेणारें श्रीकृष्णस्मरणच होय असें पंत जोरदार भाषेनें वर्णितात.

देवाच्या देवातें धरितां हृदयांत, न चळतां स्मरणीं ।
घे भाक बा! कशाला संशय? वरिसील सुगतिला मरणीं ॥ ६४ ॥

परीक्षित् राजा मरण पावला तेव्हां सर्वांनीं शोक केला. प्रत्यक्ष

यमधर्मांहि ' हा ' वदला, बहु विस्मित मानसांत तो झाला, ।
शोकभवें प्रथम, मग प्रेमभवें अश्रुच्या भरें न्हाला ॥ ११० ॥

जनमेजयसत्राचें वर्णन झाल्यानंतर सूत पुराणिक आपलें पुराणकथन संप-

जावयाच्या बेतांत येऊन श्रीकृष्णस्मरणपूर्वक कृष्णद्वैपायन व्यासांस नमन करतात.

यश गातां श्रीहरिचें, भजतां निष्काम पादराजीवां, ।
वरिती स्वयंवरवधू जेंवि तसी मुक्ति सादरां जीवां ॥ १२१ ॥
नमन असो श्रीकृष्णद्वैपायनगुरुवरासि, हा छात्र ।
ज्याच्या चरणध्यानें झालों या संहितेसि मीं पात्र ॥ १२२ ॥

वरील आर्यासुमनांच्या सुवासावरून विषयांच्या मानानें पंतांच्या आर्येनें याही स्कंधांत आपलें सौंदर्य कायम राखलें आहे हें दिसून येईल. विषयाच्या मानानें वर्णनशैलीही खुलते अगर फिकी पडते. बाराव्या स्कंधांत आर्यांची माधुरी जर कांहीं थोडीबहुत कमी पडली असेल तर ती विषय बहारीचा न मिळाल्या-कारणानें होय, पंतांचें आर्याग्रथनकौशल्य घटत चाललें होतें म्हणून नव्हे. पंतांनीं सूताच्या तोंडीं घातलेल्या पुढील उपसंहारात्मक तेजस्वी आर्याच वरील म्हण-ण्याच्या सत्यत्वाबद्दल आणखी साक्ष देतील.

वाचावे ऐकावे भागवतांतील उत्तम श्लोक, ।
कीं अर्ध, पाद, तारिल या इतुक्यानें चि उत्तमश्लोक ॥ २०५ ॥
सुकवि तुम्हीं धन्य, तुम्हांकरितां हा सूत मींहि कीं धन्य ।
तारक सार कविमतें हरियशाचि, न कलियुगीं असें अन्य ॥२०६॥
देउनि उत्साह मला श्रीभागवतार्थ वदविला साचा ।
आनंद यापुढें तो तुच्छ ब्रह्मादिपदविलासाचा ॥ २०७ ॥
वाचेनें, चित्तानें, देहानें, नित्य हरिपदा नमन ।
तज्जन सज्जनचरणा तैसेंचि असो, विटो कदा न मन ॥ २०८ ॥

या अर्थाचे श्लोक मुळांत सूताच्या तोंडीं कोठेंही नाहींत तथापि पंतांनीं शेवटीं सूताच्या तोंडीं फारच शोभतील व गर्भित अर्थानें आपल्यालाही लागू पडतील अशा या अतिशय मार्मिक व प्रेमळ आर्या स्वतः रचून घातल्या आहेत.

उत्तरार्ध

पंतकवितेचें सर्वसाधारण विवेचन.

विभाग ५.

पंतकाव्यांचा कालनिर्णय
व
पंतांच्या काव्यशक्तीचा विकास.

१. पंतांचीं एकंदर काव्यें विचारांत घेऊन त्यांचे रचनाकाल ठरविण्याचा व अशा रीतीनें पंतांच्या दीर्घकालीन वाङ्मयसेवेचा एक आराखडा काढण्याचा प्रयत्न या विभागांत करावयाचा आहे पंतांचीं सर्व काव्यें विचारांत घेतल्यानें त्यांच्या काव्यरचनेचा अथपासून इतिपर्यंत एक इतिहासच पाहिल्यासारखा होईल. पंतांची कवित्वशक्ति प्रथम कशी व कोणच्या स्वरूपांत प्रादुर्भूत झाली, नंतर तिची आरंभापासून अखेरपर्यंत कशी परिणति होत गेली याचा एक मनोरंजक चित्रपट वाचकांच्या डोळ्यांपुढें उभा करण्याचा आमचा मानस आहे. प्रस्तुत पुस्तकांत येथून पुढें पंतांच्या भागवती काव्यांपुरती दृष्टि न ठेवतां व्यापक दृष्टीनें विचार करण्याचें धोरण अंगीकारिलें आहे. तेव्हां या ठिकाणींही त्याच धोरणाचा स्वीकार करून पंतांच्या सर्व काव्यांविषयीं विचार करावयाचा आहे.

२. पंतकाव्यांचे रचनाकाल ठरविण्याचा आजपर्यंत कोणीच प्रयत्न केला नाहीं असें नाहीं काहीं काव्यांचे रचनाकाल ठरविणाऱ्या अशा एक दोन परंपरागत आख्यायिका सोडून दिल्यास, या बाबतींत प्रथमचा, विश्वसनीय आधारानिशीं केलेला प्रयत्न पांगारकरांचा होय. पंतांच्या काव्यांचे काल आपल्या मताप्रमाणें ठरवून त्या कालानुक्रमानेंच त्यांनीं पंतांच्या अखिल काव्यप्रणालीचें आलोडन केलें आहे. काव्यसंग्रहकारांनींही आपल्या प्रस्तावनांतून व टीपांतून प्रसंगोपात्त कालनिर्णायक चर्चा केली आहे. यानंतर पंतकाव्यांच्या पराडकरी आवृत्तींतील निरनिराळ्या खंडांस जे उपोद्घात जोडले आहेत त्यांतही पंतकाव्यांच्या रचनाकालाविषयीं चर्चा केलेली आढळून येते. विशेषतः आर्याभारतास श्री. शिवराम महादेव परांजपे यांनीं लिहिलेला उपोद्घात या दृष्टीनें विशेष उपयुक्त व महत्त्वाचा झाला आहे. याप्रमाणें आजपर्यंतचें या विषयावरचें लिखाण आहे. यांचाबाय कर्णपर्व प्रथम लिहिलें का भारतांतील पर्वांच्या अनुक्रमानेंच लिहिलें

या विषयावर व इतर किरकोळ विषयांवरही कांहीं लेख इतस्ततः प्रसिद्ध झाले आहेत. पंतकवितेवरील हंसांचा निबंध एका रसिक पंतभक्ताचे पंतकाव्याविषयींचे प्रेमपूर्ण उद्गार या दृष्टीनें वाचनीय असला तरी कालनिर्णयाच्या दृष्टीनें उपयुक्त मजकूर त्यांत कांहीं सांपडण्याजोगा नाहीं. एकंदरीनें पाहतां त्यांत विवेचक व शोधक बुद्धीचा कांहींसा अभावच दिसून येतो.

पंतकवितेच्या बाबतींत पांगारकरांनंतर आस्थेवाईक व चिकार्टीनें प्रयत्न करणाऱ्या गृहस्थांचा उल्लेख करावयाचा म्हणजे पंतवंशज रामकृष्णपंत पराडकर यांचा होय. पंतकविता अत्यंत शुद्ध स्वरूपांत पुढें यावी याविषयीं त्यांनीं जितके प्रयत्न केले त्या मानानें काव्यविवेचनाच्या किंवा कालनिर्णयाच्या बाबतींत त्यांनीं पद्धतशीर उद्योग केल्याचें दिसत नाहीं. त्यांनीं केसरींत १९१० व १९११ सालीं पंतकवितेवर ७ ८ लेख लिहिले त्यांचा रोख मुख्यतः पंतकवितेचे शुद्ध पाठ, पंतांची अप्रसिद्ध कविता व तिचें स्वरूप, यांवरच होता. तथापि पंतकवितेचें सर्व दप्तर व इतर कागदपत्र वगैरे भरपूर व पहिल्या प्रतींचीं साधनें त्यांना सदोदित उपलब्ध असल्यामुळें व शोधक बुद्धि त्यांच्यांत सदैव जागृत असल्यामुळें कालनिर्णयासंबंधींही कांहीं महत्वाच्या गोष्टी त्यांनीं उजेडांत आणल्या आहेत. मंत्रभागवताच्या रचनेविषयीं त्यांनीं लावलेला शोध महत्त्वाचा आहे. त्याचप्रमाणें नुकतीच २ वर्षांपूर्वीं, पंतांची अप्रसिद्ध असलेली आर्याकेकावलि त्यांनीं स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली असून, तिच्या प्रस्तावनेंत पंतचरित्राच्या अज्ञात परंतु महत्त्वाच्या अशा भागावर अगदीं नवीन प्रकाश पाडणारें असें विवेचन आर्याकेकावलीच्या आधारानें केलें आहे.

३. आतां इतक्या अधिकारी विद्वानांनीं ज्या विषयावर अनेक ठिकाणीं लिहिलें आहे त्यावरच पुनः येथें विवेचन करून पुनरुक्तिदोषास पात्र होण्याचें कारण काय असा प्रश्न कोणाच्याही मनांत उद्भवेल. त्यास उत्तर येवढेंच कीं आम्हांस येथें जें विवेचन करावयाचें आहे तें पुनरुक्तिदोषास पात्र होणारें नसून बहुतांशीं नवीन असेंच आहे. आजपर्यंत इतक्या विद्वानांची तर्कशक्ति व शोधक बुद्धि जरी पंतकाव्यांचे रचनाकाल ठरविण्यांत खर्च पडली असली तरी अजून पुष्कळच बाबी अनिर्णीत व संशयास्पद अशा राहिल्या आहेत. सर्व काव्यांचे रचनाकाल ठरविण्याचा एक धोरणी, पद्धतशीर व सर्वमान्य होण्या-

जोगा प्रयत्न अजून कोणींही केलेला नाहीं. पांगारकरांनीं आपल्या मताप्रमाणें पंतकाव्याचा रचनाक्रम ठरविला आहे खरा; परंतु महत्त्वाच्या सर्व काव्यांचे रचनाकाळ त्यांनीं नक्की ठरवलेले नाहींत. व त्यांच्या लिहिण्यांत कांहीं ठिकाणीं सांदिग्धपणा राहिला असून कोठें कोठें विसंगतीही झाली आहे. काव्यसंग्रहाच्या संपादकांपैकीं नारायण चिंतामण केळकर व रा. बाळकृष्ण अनंत भिडे यांच्या अमदानींत जीं पंतांचीं काव्यें छापून निघालीं त्यांच्या रचनाकालाविषयीं टीपांतून व प्रस्तावनांतून त्या दोघां संपादकांनीं विवेचन केलें आहे. परंतु हा प्रयत्न थोड्याशाच पंतकवितेविषयीं झाला आहे. शिवाय मुख्य गोष्ट म्हणजे त्यांनीं ठरविलेले पुष्कळसे कालनिर्णय चुकीचे ठरले आहेत. पराडकरांच्या आवृत्तीच्या उपोद्घातांत जें विवेचन आलें आहे तेंही असेंच त्रुटित व असंपूर्ण आहे. हें सर्व सांगण्याचा हेतु इतकाच कीं पंतकाव्यांच्या रचनाकालाविषयीं निर्णयात्मक असें विवेचन करण्यास अद्यापि पुष्कळ वाव आहे, ही गोष्ट स्पष्ट व्हावी. वर उल्लेखिलेल्या विद्वानांनीं केलेले सर्व प्रयत्न टाकाऊ आहेत असा आमच्या म्हणण्याचा भावार्थ नाहीं. त्यांचे प्रयत्न बहुमोल आहेत व त्यांच्या निर्णयाचा आधार घेण्याचा सुप्रसंग पुढील विवेचनांत पुष्कळच वेळां येणार आहे. विशेषतः पांगारकरांनीं आपल्या पुस्तकांत पंतांच्या काव्यरचनेचा अनुक्रम ठरवून जो एक सांगाडा तयार केला आहे तो त्यांच्यानंतर पंतकाव्यावर लिहिणाऱ्या लेखकांचा मूलाधार किंवा पायाच होऊन राहिला आहे. तेव्हां या पांगारकरप्रभृति पूर्वसूरींची कृतज्ञता शिरीं वागवूनच प्रस्तुत लेखक हें विवेचन करण्यास प्रवृत्त होत आहे, हें येथें विनम्रपणें निवेदन करणें अवश्य वाटतें.

४. कालानुक्रमानें पंतकाव्यांची संगति लावण्याच्या या प्रयत्नास साधनें कोणचीं व तीं कितपत प्रमाणांत उपलब्ध आहेत याचें थोडक्यांत दिग्दर्शन करणें अवश्य आहे सुदैवानें इतर कोणत्याही जुन्या मराठी कवीपेक्षां पंतांच्या संबंधींचे विश्वसनीय आधार जास्त उपलब्ध आहेत व त्यामुळेंच अशा तऱ्हेचा, कवीच्या आयुष्यांतील घटनांचा आराखडा आंखणें शक्य झालें आहे. नाहींतर कवि होऊन गेला कधीं याचाच पत्ता लागणें दुर्घट व्हावें इतकी कालाची अनिश्चितता असल्यास त्याचें चरित्र व त्याच्या ग्रंथकर्तृत्वाचा इतिहास सुतराम् दुष्प्राप्य म्हणून त्याविषयींचें कुतूहल दाबून टाकून स्वस्थ बसणेंच भाग येतें.

असो. तेव्हां पंतांच्या काव्यांचा अनुक्रम ठरविण्यास उपयोगी अशीं कोणकोणचीं साधनें उपलब्ध आहेत याचें थोडकेसें निदर्शन येथें करणें उचित होईल.

(१) प्रमाणांमध्यें अग्रगण्य व अप्रतिहत असें प्रमाण म्हणजे प्रत्यक्ष प्रमाण होय. रचनाकालाचें प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे तो रचनाकालच स्वतः ग्रंथकारानें नमूद केलेला अस्तित्वांत असणें हें होय. हें प्रमाण पंतकाव्याच्या संबंधांत उपलब्ध नाहीं हें उघडच आहे. तें असतें तर रचनाकाल ठरविण्यासाठीं एवढाले प्रबंध लिहिण्याची काडीमात्र जरूरी पडली नसती. पंतांनीं फक्त आपल्या प्रह्लादविजय नामक एका लहान काव्यावर लेखनकाल दिला आहे; बाकी कोठेंही तसा उल्लेख त्यांनीं केलेला नाहीं. पंतांनी स्वतःच्या वाचनाकरितां इतरांचे जे अजमासें पन्नास ग्रंथ लिहून घेतलेले आहेत त्यांपैकीं बऱ्याच ग्रंथांवर त्यांनीं लेखनकालाचा निर्देश केला आहे, परंतु स्वरचित ग्रंथांवर मात्र चुकूनसुद्धां काळाचा उल्लेख केलेला नाहीं; असें कां याचा विचार करणें जरा बोधप्रद आहे. दुसऱ्याचे ग्रंथ उतरून घेणें म्हणजे केवळ विचारशून्य हस्तश्रमाचें काम होय. एकदां ग्रंथ लिहावयास घेतला कीं थोड्याच दिवसांत सपाट्यासरशीं कोणीही तें काम उरकून टाकील अर्थात् त्याच्यावर लेखनकाल घालून ठेवणें अत्यंत सोपें व सहज असतें. कारण त्यांत लेखनाचीच गोष्ट काय ती मुख्य असते. परंतु ग्रंथ रचणें ही गोष्ट ग्रंथ नुसता लिहून काढण्याहून अत्यंत भिन्न आहे. लेखणींतून कागदावर शाई उतरविण्याचा तो प्रश्न नसून सर्व मानसिक शक्ति व अंतःकरणाच्या वृत्ति ओतून शब्दांचा चित्रपट निर्माण करण्याचें तें काम असतें. निरानराळ्या वेळीं निरनिराळ्या कल्पना सुचतात, भिन्न भिन्न वेळीं भिन्न विभाग रचले जातात, एकदां रचलेलें बाद होऊन नवाच रचनाप्रकार त्या जागीं येतो, वारंवार खोडाखोडी कराव्या लागतात व शोध घालावे लागतात; अशा रीतीनें अनेकवार घोळला जात जात त्या ग्रंथास किंवा काव्यास कांहीं स्थिर स्वरूप प्राप्त होतें. हें स्वरूप प्रथम एका कच्च्या प्रतीच्या रूपांत कवि आपल्या दृष्टीसमोर सामग्र्यानें आणतो व त्यांतील दोष दुरुस्त करून त्याला शेवटचा उजळा दिल्यानंतर पक्की प्रत होऊन त्या ग्रंथाला कायमचें स्वरूप प्राप्त होतें. अशा स्थितींत कोणच्या दिवसाचा व कोणच्या कालाचा रचनाकाल म्हणून कवि पोथींत उल्लेख करणार? केवळ शेवटच्या प्रतीच्या लेखनकालाचाच उल्लेख करावा तर लेखनकालालाच जास्त महत्व देऊन वाचकांचा गैरसमज केल्याप्रमाणें होणार नाहीं काय? तर अशा

अवस्थत, ग्रंथकर्ते स्वतः लेखनकाल लिहून ठेवीत नसत या गोष्टींचें सहज स्पष्टीकरण होण्याजोगें आहे. शिवाय आमच्या पूर्वकालीन कवींचा विनीत भाव लक्षांत घेतला असतांही कालाचा उल्लेख न करण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीचें आणखी एक गमक सांपडण्याजोगें आहे. तेव्हां इतरत्र कालनिर्देश करण्याचा पंतांचा प्रघात असतां स्वतःच्या ग्रंथांच्याच बाबतींत, विशेषतः मोठमोठ्या ग्रंथांच्या बाबतींत, त्यांनीं तो प्रघात कां अनुसरला नाहीं याचें कारण वरील विवेचनावरून लक्षांत येईल.

(२) पंतकाव्यांच्या कालनिर्णयाचें दुसरें अप्रत्यक्ष परंतु महत्त्वाचें साधन म्हणजे त्यांचीं काव्येंच होत. त्यांच्या काव्यांत प्रकट झालेले विचार व भावना, त्यांच्या काव्यांत होत गेलेली रचनाकौशल्याची परिणति, भाषेची परिणति, वगैरे गोष्टींवरून काव्यांचा कांहीं एक क्रम बसविणें शक्य होतें. काव्याच्या अंतरंगावरून कवीच्या अंतरंगाची, थोडीबहुत व अस्पष्ट कां होईना, पण पारख करतां येते व त्यावरून कवीच्या मनःस्थितीचा आणि केव्हां केव्हां वयोमानाचाही अंदाज करतां येतो. कालिदासाच्या प्रतिभेचें रघुवंश हें कुमारसंभवानंतरचें फल होय असा तर्क करणारा विवेचक तर्कटी ठरण्याचें भय नको; त्याप्रमाणेंच पंतांचें मंत्रभागवत कृष्णविजयाच्या नंतरचें आहे असें म्हणणारा चिकित्सक केवळ असंबद्धप्रलापी ठरण्याचा संभव नाहीं.

(३) पंतांच्या काव्यांतूनच त्यांच्या रचनाकालाविषयीं आणखी एक प्रकारचें प्रमाण आढळतें. तें म्हणजे त्यांनीं काव्यांतून जागजागीं स्वतःविषयीं व स्वसंबंधी गणगोताविषयीं काढलेले उद्गार होत. पंत ब्रह्मोत्तरखंडामध्यें स्वतःस ' नवीन कवि ' म्हणवून घेतात, कृष्णविजयामध्यें ' काचा शिशु ' म्हणून स्वतःस उल्लेखितात, त्याचप्रमाणें केकावलीमध्यें--

कृतांतकटकामलध्वजजरा दिसों लागला
पुरःसरगदासवें झगडतां तनू भागली ।

असा वयोवस्थानिदर्शक आर्तोद्गार काढतात. अशा उद्गारांवरून अर्थातच त्या त्या काव्यांच्या रचनाकालांविषयीं खात्रीलायक अनुमानें काढतां येतात; इतकेंच नव्हे. तर अशा उल्लेखांवरून त्यांच्या चरित्राविषयींही बरीच माहिती जमवितां येते.

(४) आणखी एक साधन फक्त पंतांच्याच बाबतींत सुदैवानें उपलब्ध आहे, तें म्हणजे त्यांच्या हस्ताक्षराच्या नमुन्याचें होय. वयोमानाप्रमाणें मनुष्याच्या

अक्षरामध्यें फरक पडत जातो, हा सामान्य नियम आहे; व चाळीस वर्षांच्या दीर्घ अवकाशामधलें पंतांचें वेळोवेळचें अक्षर आज उपलब्ध आहे. तथापि सकृद्दर्शनीं या अक्षरांच्या नमुन्यांचा कालनिर्णयाचे कामीं जितका उपयोग व्हावासें वाटतें तितका उपयोग अनेक कारणांस्तव होऊं शकत नाहीं. त्यांतील प्रमुख कारणें येणेंप्रमाणें सांगतां येतील.—

१. सर्वांत मुख्य गोष्ट ही कीं, काव्याच्या पोथीचा लेखनकाल तोच काव्याच्या रचनेचाही काल होय असें कोणत्याच कवीच्याबद्दल विश्वासानें सांगतां येत नाहीं; त्याचप्रमाणें तें पंतांच्या बाबतींतही सांगतां येणार नाहीं. एकाद्या काव्याची पक्की प्रत तें काव्य रचल्यानंतर कित्येक वर्षांनींही झाली असण्याचा संभव आहे. असें जरी असलें तथापि हस्ताक्षरावरून जर लेखनकाल अजमावतां आला तर तो एका बाबतींत मात्र हटकून उपयोगी पडण्याजोगा आहे. लेखनकाल जो ठरेल त्याच्या पूर्वीं किती वर्षें ग्रंथ रचला हें जरी त्यावरून ठरवितां आलें नाहीं तरी त्या कालानंतर मात्र तो ग्रंथ रचला गेला नाहीं येवढी गोष्ट ठाम निश्चित झाल्यासारखी होईल.

२. अक्षराच्या बाबतींतली दुसरी उणीव म्हणजे अक्षरावरून वयोमानाविषयीं किंवा अवस्थेविषयीं बिनचूक अनुमानें सदैव काढतां येत नाहींत ही होय. पुष्कळ वेळां घाईमुळें, शरीराच्या व मनाच्या अस्वस्थतेमुळें, अक्षरामध्यें फरक पडतो. इतकेंच काय परंतु आळसलेल्या स्थितींत लिहिल्यामुळें, वेडेंवाकडें बसल्यामुळें, शाई व टाक बदलल्यामुळें अशा अनेक आनुषंगिक कारणांनीं अक्षरामध्यें अतोनात फरक पडत असतो. तेव्हां अक्षरावरून कालनिदर्शक अनुमान निदान पंतांच्या बाबतींत तरी अगदीं जपूनच काढावें लागतें.

३. अनेक काव्यें पंतांच्या हस्ताक्षरांत उपलब्ध नाहींत. अशा काव्यांच्या परलिखित प्रती शुद्धतेच्या दृष्टीनें प्रमाण असल्या तरी हस्ताक्षरावरून निघणाऱ्या अनुमानाच्या दृष्टीनें त्या केवळ निरुपयोगी आहेत.

४. पंतालिखित काव्यांमध्यें देखील परलिखित भाग कमीअधिक प्रमाणांत बहुतेक सर्वत्र आढळून येतो.

५. खुद्द पंतांच्या हस्ताक्षराविषयींच वाद होण्याचा कित्येक ठिकाणीं प्रसंग येतो. नुकतेंच रा. रामकृष्णपंत पराडकरांनीं 'भक्तमयूर केकावलि' म्हणून

पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत सबंध आर्याकेकावलीच्या पोथीच्या छायाचित्राचा ठसा छापलेला आहे. त्या सबंध काव्याच्या हस्ताक्षरावर नजर टाकल्यास त्यांत अक्षराचीं दोन वळणें उघड दिसून येतात. त्यांतील एक पंतांचें असून दुसरें त्यांचें नसावें असें वाटतें. परंतु पराडकरांचें म्हणणें, दोन्ही वळणें निराळीं असलीं तरी तीं पंतांचींच आहेत, असें आहे. असा मतभेद बऱ्याच काव्यांच्या बाबतींत होण्याजोगा असल्यामुळें त्यांचें हस्ताक्षर कालनिर्णयाच्या बाबतींत निरुपयोगी ठरतें.

हस्ताक्षराच्या संबंधांत अशा तऱ्हेच्या व याच्याही पेक्षां किचकट भानगडी उपस्थित होत असल्यामुळें त्याचा कालनिर्णयास फारसा उपयोग होण्याजोगा नाहीं. तथापि जो कांहीं थोडासा उपयोग होण्याजोगा आहे तो करून घेतलेला आहे हें पुढील विवेचन वाचतांना लक्षांत येईलच.

(५) वर निर्दिष्ट केलेलीं एका तऱ्हेनें आभ्यंतर साधनें झालीं. बाह्य साधनांपैकीं पंतकाव्यांच्या बाबतींत एकच उपलब्ध आहे. तें म्हणजे पत्रव्यवहार होय. पंतांचें मित्रमंडळ बरेंच मोठें होतें व या मित्रांबरोबर त्यांचा पत्रव्यवहारही हमेश चालू असे. या पत्रव्यवहाराविषयीं माहिती मिळवून, तो संपादन करून, उजेडांत आणण्याचें सर्व श्रेय पांगारकर यांना आहे. विठोबादादा चातुर्मासे व त्यांचे चिरंजीव भैराळबोवा, पंढरपूरचे पाध्ये, कराडचे सदाशिव पाध्ये, महिपतीबावाचे पुत्र विठोबा ताहराबादकर या सर्व मंडळींचा पंतांशीं झालेला व पंतांचा त्यांच्याशीं झालेला बरा वसा पत्रव्यवहार त्यांनीं शोधून काढला व अलीकडच्या शिक्षित समाजास त्याची वर्दी दिली याबद्दल त्यांचे धन्यवाद गावे तितके थोडेच आहेत. तथापि एक गोष्ट मात्र त्यांनीं रास्त केली नाहीं. वरील पत्रव्यवहार जसा त्यांना उपलब्ध झाला तसाच तो प्रसिद्ध करून सर्व समाजाला उपलब्ध करून देण्याचें त्यांचें कर्तव्य होतें. तो सर्व जशाचा तसा प्रसिद्ध केला असता म्हणजे ज्याला त्याला त्याच्यावरून आपलीं अनुमानें काढण्यास मोकळीक झाली असती व त्यामुळें पंतचरित्रशोधनास पुष्कळच मदत झाली असती. परंतु पांगारकरांनीं थोडेसें दार किलकिलें केल्यासारखें करून कांहीं थोड्याशा पत्रांचे त्रोटक उतारे तेवढे आपल्या पंतचरित्रांत दाखल केले आहेत! असो. तूर्त तेवढ्या उताऱ्यांवरच तहान भागवून घेऊन प्रस्तुत लेखकास तेवढ्यावरच आपलीं अनुमानें बसविणें भाग पडलें आहे.

पंतांच्या काव्यांचा कालनिर्णय करण्यास हा पत्रव्यवहार फारच उपयोगी

पडला आहे. कालनिर्णयाच्या सर्व प्रयत्नांना केवळ आधारस्तंभ होऊन राहिलेला महाभारताचा काल केवळ या पत्रव्यवहाराच्या साधनामुळेंच नक्की करतां आला आहे. पत्रव्यवहाराशिवाय कालनिर्णयाचीं बाह्य साधनें पंतकाव्यांच्या बाबतींत फारशीं उपलब्ध नाहींतच. इतरांनीं लिहून घेतलेल्या पंतकाव्याच्या प्रतीवर असलेला लेखनशक किंवा असाच एकादा इतरांनीं केलेला उल्लेख याचा क्वचित् कालनिर्णयाचे कामीं उपयोग झालेला आहे. त्याचा सर्व खुलासा पुढील विवेचनांत यथास्थल येईलच.

[१]

५. पंतांनीं नक्की कोणत्या वर्षी, कोणत्या मितीला, कविता करण्यास प्रारंभ केला व त्यांनीं अगदीं प्रथम रचिलेली कविता कोणची याचा निर्णय करणें आतां दुरापास्तच आहे. पोप कवीनें आपणाविषयीं जसें म्हटलें आहे कीं,

I lisped in numbers and the numbers came

त्याप्रमाणें बाळपणींच पंतांच्या बोबड्या बोलांतून छंदोमय वाणी प्रकट झाली किंवा काय हें आतां आपणास कळण्याचा मार्ग राहिलेला नाहीं. अथवा, ते लंगोटी घालणारे बारा वर्षांचे बटु असतांना त्यांनीं केशव पाध्यांच्या घराच्या भिंतीवर वेडावाकडा श्लोक लिहून ठेवला होता व तो पाहूनच केशव पाध्यांच्या मनांत या धाकट्या मोरूविषयीं कुतूहल उत्पन्न होऊन त्यांनीं त्याला शिकविण्यास प्रारंभ केला, अशी जी त्यांच्या स्वत:विषयींच आख्यायिका आहे (मो. च. पृ. १३,१४) ती कितपत खरी आहे याचा निकाल लावणेंही केवळ अशक्य आहे. कवित्वस्फूर्ति त्यांच्या अंगीं उपजतच होती; ती काव्य, नाटक, अलंकार इत्यादि कवित्वानुकूल विषयांच्या अध्ययनानें प्रज्वलित झाली व त्यानंतर लगेच ते काव्य करूं लागले असें साधारण मानानें म्हणतां येईल. कारण स्वत:च्या २२-२३ या वयाच्या सुमारास त्यांनीं '**कुशलवाख्यान**' हें आपलें पहिलें काव्य लिहिलें असावें असें पुष्कळ प्रमाणांवरून वाटतें. या काव्याच्या रचनाकालाविषयीं काव्यसंग्रहकारांनीं बरींच प्रमाणें देऊन वरीलप्रमाणेंच निष्कर्ष काढला आहे. कुशलवोपाख्यान हेंच पंतांचें पहिलें काव्य व तें त्यांनीं शके १६७३-७४ च्या सुमारास म्हणजे पन्हाळगडावरून बारामतीस जाण्याच्या पूर्वी रचलें असावें असें वाटण्यास कारण होणारीं प्रमाणें पुढील होत. ' (१) या काव्याची रचना व वर्णनशैली

यांत संस्कृत महाकाव्यपंचकाचें अनुकरण जितकें स्पष्ट दृष्टोत्पत्तीस येतें तितकें इतरत्र येत नाहीं. (२) दुसरा आधार भाषेचा. पंतांच्या इतर काव्यांच्या मानानें यांतील भाषा कमी सफाईदार दिसते. विशेषेंकरून या काव्यांतील यमकें पहाण्यासारखीं आहेत. पंतांच्या इतर काव्यांतील यमकांमध्यें निदान अंत्य अक्षर व उपांत्य स्वर इतकीं तरी जुळतात. उपान्त्य स्वरांत भेद कोठेंही आढळत नाहीं. परंतु प्रस्तुत काव्यांत पुढील यमकें आढळतातः–पुसे–वसे–१.१६; खिंचो–बंधो ४.५५; नातें–तीतें ४.८६; काननीं–ऐकुनी ४.८८; पावनी–मुनी ४.८६; कसें–दिसे ९-११; शिरें–करें १०-१; निरता-विजिता १३.३० इ. इ. (३) तिसरा आधार मंगलाचरणाचा. यांत रामायणाचा कर्ता वाल्मीकि किंवा महाभारताचा व्यास यास वंदन मुळींच नाहीं. तेव्हां रामायण, भारत, भागवत व पुराणें लक्ष्यपूर्वक वाचण्याच्या पूर्वीं व आपल्या काव्यशक्तीचा ओघ तिकडे वळविण्याच्या पूर्वीं हें काव्य रचिलें असलें पाहिजे.'* (४) प्रथमच रचना करूं लागलेल्या नवशिक्या कवीला पांडित्याचें प्रदर्शन करण्याची सहजच हौस असते. त्याप्रमाणें या काव्यांत अनेक चित्रविचित्र वृत्तांची योजना करून कवीनें आपलें पांडित्य प्रकट केलें आहे. पंतांनीं श्लोकबद्ध काव्यें पुष्कळच रचलीं. पण इतकीं अनेकविध, प्रसिद्ध अप्रसिद्ध, वृत्तें त्यांनीं सारराामायण खेरीज करून कोणत्याही एका काव्यांत योजिलेलीं नाहींत. (५) ओबडधोबड भाषा. कोठें अति लांब सामासिक पदें तर कोठें अतिशय सोप्या एकेरी शब्दांची योजना अशा प्रकारांमुळें कवीचा नवशिकेपणा स्पष्ट प्रतीत होतो. भाषेमध्यें सफाई व स्वाभाविक रचनेचा ओघ दिसून येत नाहीं. (६) प्रस्तुत काव्यांत सीतात्यागाचा प्रसंग वर्णिला आहे. त्याच्यावर रघुवंशातील १४ व्या सर्गाची

---

* हीं पहिलीं तीन प्रमाणें काव्यसंग्रहकारांनीं दिलेलीं थोड्याशा संक्षेपानें येथें दाखल केलीं आहेत. पहा, काव्यसंग्रह ५३; मोरोपंतकृत स्फुट काव्यें भाग ३, पृ २४–२५. काव्यसंग्रहकारांनीं एकंदर चार प्रमाणें दिलीं आहेत. त्यांचें अवशिष्ट प्रमाण, ' पंतांनीं आपलीं बाकीचीं मोठीं काव्यें इतर ओळखीच्या माणसांनीं सांगितल्यावरून लिहिलेलीं आहेत. तसें हें काव्य लिहिलेलें नाहीं व यांत इतर कोणाचा उल्लेखही केलेला नाहीं. तेव्हां हें काव्य आपल्या कवित्वशक्तीचा प्रत्यय येण्यापूर्वीं पंतांनीं लिहिलेलें दिसतें. ' अशा स्वरूपाचें आहे. तें सयुक्तिक न वाटल्यामुळें येथें दाखल केलें नाहीं.

दाट छाया पडलेली दिसते. कित्येक श्लोक तर अगदीं उघड उघड रघुवंशांतील श्लोकांवरून उतरलेले का. सं. कारांनीं दाखविले आहेत. उदाहरणार्थ अ० २ श्लोक २, १८; अ. ४ श्लो. ५१–६३; अ. ५ श्लो. ६, ९, १०, १८ हे रघुवंशाच्या १४ व्या सर्गांतलि त्या त्या वर्णनाशीं ताडून पहावे. शिवाय रघूच्या इतर सर्गांतलि कल्पनांशींही या काव्यांतील वर्णनाचें साम्य आढळतें. आतां रघुवंश शके १६७२ च्या मार्गशीर्षांत पंतांनीं लिहून घेतला; व त्याच वेळेस त्याचें सूक्ष्म वाचनही केलें असलें पाहिजे. रघुवंशांतील कल्पना डोळ्यांपुढें ताज्या असतांनाच कुशलवोपाख्यान हें काव्य लिहिलेलें दिसतें. अर्थात् १६७३–७४ हें साल या काव्याच्या रचनेचें ठरतें.

६. पंतांनीं कुशलवचरित लिहिलें त्या सुमारासच साररामायण किंवा त्याचा कांहीं भाग तरी रचला असावा कीं काय असा संशय उत्पन्न होतो. असा संशय वाटण्याचें कारण येवढेंच कीं नाना तऱ्हेच्या अपरिचित व श्रुतिदुःखद अशा वृत्तांची या काव्यांतही योजना केलेली असून रघुवंशांतील तिसऱ्या व दहाव्या सर्गांतलि वर्णनाची छटा यांतही कित्येक ठिकाणीं दिसून येते. (पहा. साररामायण, बालकांड, ६. १३, १५; ७. ११, १४, १५ इ०) तथापि इतर अनेक दृष्टींनीं विचार करतां साररामायणाचें स्थान हें नसून, १६८२–१६८८ या पुढें वर्णिलेल्या श्लोकरचनाकाळांतीलच असावें असें वाटतें. यास्तव तेथेंच या रामायणासंबंधीं विशेष विवेचन केलें आहे.

७. पन्हाळगडीं गुरुगृहीं असतांनाच पंतांनीं आपला **'ब्रह्मोत्तरखंड'** हा ग्रंथ लिहून पुरा केला असावा. हा ग्रंथ लिहिण्याला त्यांचा गुरुपुत्र व गुरुबंधु सदाशिव पाध्ये यानें 'आज्ञा केली' होती. सदाशिव पाध्यांनीं इतर ग्रंथ रचण्यास प्रेरणा केली ती 'निरोप पाठवून' परोक्ष रीतीनें केली असा उल्लेख सांपडतो. तसें या काव्यांत म्हटलेलें नाहीं; उलट 'साधु सदाशिववदनें आज्ञा केली' असे पंतांचे शब्द आहेत. यावरून व 'गुरुपदरजःप्लुतें भाळें' याही शब्दांवरून ब्रह्मोत्तरखंड गुरु व गुरुपुत्र यांच्या समक्ष पन्हाळगडींचें रचलें गेलें असें दिसतें. शिवाय शके १६७८ च्या आश्विनामध्यें वाणीभूषण हा छन्दःशास्त्रग्रंथ पंतांनीं स्वगृहीं पन्हाळगडीं लिहून घेतल्याचा उल्लेख केला आहे. यावरून १६७८ पर्यंत पंत गडावरच होते हें सिद्ध आहे. व ब्रह्मोत्तरखंडाचा काल १६७८ पुढें मुळींच नेतां येण्याजोगा नसल्यानें तें गडावरच

१६७५—१६७६ च्या सुमारास रचलें गेलें असें मानणें भाग येतें. वडिलांना भेटून १२ वर्षें होत आल्यामुळें पुढें शास्त्रोक्त भेटीचा प्रसंग येईल या भीतीनें पंत १६७५ सालीं बारामतीस आले व तेथें आल्यावर शिवोपासक यजमानाची मर्जी आपल्या तरुण कविमित्रानें संपादन करावी म्हणून सदाशिव पाध्यानें पंतांना पत्रद्वारें ब्रह्मोत्तरखंड रचण्याविषयीं प्रेरणा केली, असें जें पांगारकरांनीं वर्णन केलें आहे तें सर्व कल्पनामय दिसतें. त्यास प्रत्यक्ष आधार तर कांहीं नाहींच परंतु तें संभवयनीयही दिसत नाहीं, हें वरील प्रमाणांवरून लक्षांत येईल. सदाशिव पाध्यानें 'पत्र पाठवून पंतांस ब्रह्मोत्तर खंड लिहिण्यास विनंती केली' असें ते लिहितात तर मग पत्राचा थोडासा तरी उतारा कां देत नाहींत? ब्रह्मोत्तरखंडाच्या रचनेचा प्रसंग कल्पनेनें त्यांनीं मोठा मनोरम वर्णन केला आहे.परंतु त्यांत फारसा सत्यांश दिसत नाहीं. (मो. च. पृ. ११६).

पंतांनीं ब्रह्मोत्तरखंड अगदीं प्रारंभीं रचलें असावें हें सिद्ध करणें फारसें कठीण नाहीं. ब्रह्मोत्तरखंडाच्या उपसंहारांत त्यांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत.

> श्रीशिवकथा यथामति लिहिली हे **रामनंदनें बाळें** । २२. ७५.
> शिवकीर्तिग्रंथ ललित रचिला भावेंकरूनि आर्यांहीं ।
> करुणा करुनि सकृत् तरि वाचावा हा समूळ आर्यांहीं ॥ ७८ ॥
> विनवितसें साधूंतें अणिकहि देवूनि हाक विनवीन ।
> कीं या आशी,' शुचि हो सयश सेवूनि हा **कवि नवीन** ' ॥ ८० ॥

पंत स्वतःचा 'रामनंदन बाळ' म्हणून उल्लेख करतात व 'कृपा करून एकदां तरी हा ग्रंथ आर्यांनीं वाचावा,' 'मी आज ही विनवणी करीत आहे व पुढेंही आणखी करीन; तरी या नवीन कवीला आशीर्वाद असावा' असे नम्र उद्गार काढतात. अल्पवयस्क विद्यार्थ्यास व होतकरू लेखकास साजेशा अशा या उद्गारांवरून पंतांचें हे पहिलेंच (अर्थात् कुशलवाख्यानानंतरचें) काव्य असावें असें स्पष्ट दिसतें. या काव्याची रचना सोपी व सरळ आहे. त्यांत खरें तेज, कल्पनाविलास व सहृदय अलंकारांची गर्दी वगैरे मोरोपंती आर्येचे विशेष फारसे दिसून येत नाहींत. यामुळें हें काव्य पंतांच्या प्राथमिक अवस्थेंतीलच होय याविषयीं संदेह रहात नाहीं.

८. ब्रह्मोत्तरखंड लिहून झाल्यानंतर किंबहुना तो लिहीत असतांनाच पंतांनीं **श्रीकृष्णविजयास** सुरवात केली असावी असें वाटतें. अर्थात् ही सर्व रचना

अजूनपर्यंत पन्हाळगडींच होत होती नंतर १६७८ पासून १६८०-८१ पर्यंतच्या दोनतीन वर्षांत केव्हां तरी ते पन्हाळगड उर्फ पराशर क्षेत्र येथून निघून बारामतीस कायमचें वास्तव्य करण्याकरितां आले असें दिसतें. शके १६७८ च्या भाद्रपद आश्विनामध्यें पंतांनीं छंदःशास्त्र व वाणीभूषण स्वगृहीं म्हणजे पन्हाळगडीं लिहून घेतल्याचा उल्लेख आहे. पुढें १६८० मध्यें बारामतींत एक ग्रंथ लिहून घेतला असून १६८२ मध्येंही बारामतींत पंचदशी लिहून समाप्त केल्याचा उल्लेख आहे. तथापि १६८२ मध्यें राघवपांडवीय काव्य 'पराशरक्षेत्रां' त लिहून घेतल्याचा उल्लेख मध्येंच सांपडतो यावरून बारामतीस आल्यावरही पंत पन्हाळ्यास मधून मधून ये जा करीत असत असें दिसतें. या काळांतल्या त्यांच्या ग्रंथरचनेकडे पाहतां कृष्णविजय पूर्वार्ध त्यांनीं शके १६७७ पासून १६८० पर्यंत लिहिला असावा, त्यानंतर प्रल्हादविजय तर त्यांनीं शके १६८० पौष शु॥ ८ रोजीं लिहून संपविल्याचा खुद्द स्वलिखित पोथींतच उल्लेख केला आहे. विनायकमाहात्म्य म्हणून पंतांचें एक गणेशजन्माच्या कथेवर लिहिलेलें सुंदर प्रकरण आहे. त्यांत

> कनककशिपुच्या भ्याले बहु पाहुनि घातका, परि समोर ।
> प्रल्हाद न भी, हर्षे, फार घनें चातकापरिस मोर ॥

अशी सरतेशेवटची आर्या आहे. कथेशीं कांहीं संबंध नसतांना केवळ अनाहूत रीतीनें यांत प्रल्हादाचा उल्लेख केला आहे यावरून हें प्रकरणही प्रल्हादविजयाच्या सुमारासच रचलें असावें असें वाटतें.

मदालसाचरित्र, हरिश्चंद्राख्यान व देवीमाहात्म्य उर्फ सप्तशती हीं मार्कंडेय पुराणांतील कथांच्या आधारानें लिहिलेलीं प्रकरणें पंतांनीं बारामतींत येऊन स्थिरस्थावर झाल्यावर कांहीं वर्षांनीं लिहिलीं असावींत. म्हणजे यांचा रचनाकाल सुमारें १६८२-८३ इतक्या बेतांतला असावा. यांपैकीं मदालसाचरित्र 'श्रीमद्‌गुरुपुत्रांहीं आज्ञा केली निरोप पाठवुनी' म्हणून रचिलें आहे. गुरुपुत्रांना निरोप पाठवावा लागला यावरून ते पंतांना समक्ष भेटण्याजोग्या स्थितींत नव्हते, अर्थात् पंत यावेळीं बारामतीचे कायमचे रहिवासी झाले होते असें स्पष्ट दिसतें. वरील तीन्ही कथानकें सोपीं व सुंदर असून मदालसाचरित्र व हरिश्चंद्राख्यान हीं तर काव्यदृष्टया फारच चांगलीं वठलीं आहेत. तथापि त्यांचा रचनाकाळ फारसा पुढें मात्र नेतां येत नाहीं. कारण यांतील काव्य उच्च

दर्जाचें असलें तरी तें मुळाला धरून रचलेलें आहे. कल्पनेच्या भराऱ्या, घडा-डीचीं वर्णनें व अर्थचा तेजस्वीपणा यांत एकंदरीनें फारसा दिसून येत नाहीं. शिवाय अजूनपर्यंत भारत-रामायण—भागवतांत पंतांचें चित्त पूर्णपणें गुंगून गेलें नसून इतर फुटकळ कथांचें वर्णन करण्याची प्रवृत्ति त्यांना होत असे असेंही या काव्यांवरून दिसतें. यावरूनही या काव्यांचा रचनाकाल पूर्ववयांतीलच असावा या अनुमानास बळकटी येते.

९. याप्रमाणें स्थूलमानानें १६७४ ते १६८३ पर्यंतच्या दहा वर्षांतील पंतांच्या काव्यरचनेचा आराखडा आहे. या अवकाशांत थोड्याशा श्लोकरचने-खेरीज करून बाकी मुख्यतः गीति व आर्यागीति या छंदःशास्त्रोक्त मात्रा-वृत्तांना त्यांनीं हाताशीं धरलें होतें. कृष्णविजय पूर्वार्ध व प्रह्लादविजय यांत आर्यागीतीला स्थान मिळालें होतें तर ब्रह्मोत्तरखंड, मदालसाचरित्र, सप्तशती, हरिश्चंद्राख्यान इ० काव्यांतून गीति प्रकट झालेली होती. पंतांच्या प्रवृत्तीचा विचार करतां दुसरी एक गोष्ट येथें अवश्य नमूद करण्याजोगी आहे. या नवशिकेपणाच्या काळांतलीं एक कृष्णविजय खेरीज करून बाकीचीं सर्व काव्यें स्कंद, मार्कंडेय, विष्णु वगैरे पुराणांतलीं आहेत; भारत, रामायण भागवतांतलें कथानक एकही नाहीं. याच्या उलट पंतांची पुढची काव्यरचना पाहिली तर ती, एक तर अगदीं स्वतंत्र, किंवा भारत, रामायण, भागवत यांवर आधारलेली अशी दिसते आर्याकेकावलि, नामरसायन वगैरे भक्तिपर खंडकाव्यें, त्याचप्रमाणें अनेक देवतांचीं, क्षेत्रांचीं, नद्यांचीं स्तोत्रें व काशियात्रा प्रकरणें हीं सर्व स्वतंत्र काव्यरचना पुढच्याच वयांत झाली आहे. परंतु स्कंद, मार्कंडेय इत्यादि अवांतर पुराणांवरची रचना पुढील वयांत नांवाला देखील सांपडत नाहीं. पंतांच्या प्रवृत्तीच्या दृष्टीनें हा प्रकार लक्षांत ठेवण्याजोगा आहे. भागवतवाचनाचा दृढ परिणाम पंतांच्या मनावर पूर्ववयांतच होऊन त्यांचें हृदय जरी भक्तिरसपूर्ण बनून गेलें होतें तथापि भारत, रामायण, भागवत यांनीं पूर्णपणें चित्त आकृष्ट होऊन दुसरीकडे पहाण्याची अगदीं सोय नाहीं अशी त्यांची स्थिति अजून झाली नव्हती. कृष्णविजयाची जरी रचना चालली होती तरी त्याबरोबरच इतर पुराणां-तील कथाभागांचाही ते आदर करीत होते. पुढें पुढें मात्र त्यांची दृष्टि केंद्रीभूत होऊन ती भारत, रामायण व भागवत या ग्रंथांवरच खिळून राहिली. श्रीकृष्ण-कथा व श्रीरामकथा यांच्या शिवाय त्यांना दुसरें कांहीं गोड लागेनासें झालें.

१०. आम्ही या कालांत गणलेल्या काव्यांपैकीं कृष्णविजयपूर्वार्धाविषयींच काय तो विशेष वाद होण्याजोगा आहे; तेव्हां त्याविषयीं जरा विस्तारानें विचार करूं. पंतांनीं कृष्णविजय लिहिण्याला आपल्या ग्रंथरचनेच्या अगदीं आरंभींच्या कालांत सुरवात केली असली पाहिजे असें म्हणण्याला बरींचशीं प्रमाणें आहेत.

(१) कृष्णविजयाच्या आरंभीं ते म्हणतात.—

निजसुखराशि शुकाचा । बोल वदे किति मयूर हा **शिशु काचा** ? । १. ८.
पंतांनीं आपल्यास येथें 'काचा शिशु' म्हणजे कच्चा, अननुभवी मुलगा असें म्हटलें आहे. हे उद्गार ब्रह्मोत्तरखंडांतील 'रामनंदनें बाळें,' 'कवि नवीन' या उद्गारांशीं अतिशय साम्य पावतात. पंतांनीं आपल्यास दुसऱ्या कोणत्याही काव्यांत बाळ किंवा शिशु म्हणवून घेतलें नाहीं, इतकेंच नव्हे तर पुढें पुढें लिहिलेल्या काव्यांत आत्मविश्वासाचे व सात्विक अभिमानाचे उद्गार काढलेले वारंवार दिसून येतात. अर्थात् ब्रह्मोत्तरखंड लिहिलें त्याच सुमारास कृष्णविजयासही सुरवात झाली असावी असें या उद्गारांवरून वाटतें.

(२) दुसरें प्रमाण पंतांच्या अंतःकरणप्रवृत्तीचें होय. प्रल्हादविजयाच्या अंतीं पुढील गोड श्लोक आहेत.

हरिपादयुगस्मरणप्रवणें भगवज्जनदिव्यकथाश्रवणें ।
चतुरें रसिकें समय क्रमणें सुख अन्य नसेचि भवभ्रमणें ॥ ४. ४९ ॥

श्रीमद्विष्णुपुराणसागरसुधा प्रल्हादजीची कथा
साधुश्रोत्रपथासि येउनि हरी संसाररोगव्यथा ।
केलें सेवन यास्तव क्षणभरी आम्हां न मानें प्रथा *
हा काळव्यय चांगला इतरथा आयुष्य जातें वृथा ॥ ४. ५० ॥
हरिध्यानासक्त प्रकृतिविषयप्राप्तविकृती
कृती लक्ष्मीरामाकृतिभव मयूरेश सुकृती ।
तया दे हे वाणी प्रभु कमळपाणी, बुधमनीं
असो पीयूषाची लहरि भवसंतापशमनीं ॥ ४. ५१ ॥

या श्लोकांमध्यें पंतांनीं आपला भगवद्गुणगानाचा संकल्प व आपल्या अंतःकरणाचा झालेला प्रेममय भाव वाचकांपुढें मोठ्या विश्वासानें प्रकट केला आहे. पंतांच्या या 'हरिध्यानासक्त' झालेल्या व 'इतरथा आयुष्य जातें वृथा' असें

---

* का. सं. प्रतींत 'पृथा' असा पाठ आहे तो अशुद्ध दिसतो.

मानणाऱ्या अंत:करणवृत्तींत श्रीमद्भागवताच्या दृढावलोकनाचें प्रतिबिंब अगदीं उघड दिसतें आहे. भागवत, विशेषत: दशमस्कंध, त्यांच्या वाचनांत येऊन त्यांतलीं तत्वें त्यांच्या मनांत भिनलीं नसतीं तर अशा तऱ्हेचे उद्गार त्यांच्या तोंडून निघणें अशक्य होतें. ज्या ग्रंथांतील तत्वांचें इतकें दृढ अवलोकन होऊन तीं तत्वें त्यांच्या मनांत व आचरणांतही भिनून गेलीं होतीं त्या ग्रंथावर प्राकृत काव्य करण्यासही त्यांनीं पूर्वीच आरंभ केलेला असला पाहिजे असें ओघानेंच अनुमान होतें आणि पंतांसारख्या सात्विक वृत्तीच्या रसिकास दशमस्कंधाची अलौकिक प्रेममयता तेव्हांच पटावी व त्यानें दशमस्कंधावर टीका लिहिण्यास प्रारंभींच सुरवात करावी हें अगदीं स्वाभाविक होय. असा कोणता कवि त्यांच्या वेळेपर्यंत मराठींत झाला होता कीं ज्यानें दशमावर व श्रीकृष्णलीलेवर यत्किंचित्ही कविता लिहिली नव्हती ? कविजनांनीं अखंड लुट करण्याचें तें प्रेमाचें, रसाचें व भक्तीचें भांडारच होतें. तेव्हां गुरुपुत्रांच्या सांगण्यावरून ब्रह्मोत्तरखंडासारखीं काव्यें रचीत असतांना त्यांचें खरें लक्ष दशमस्कंधांत गुंतून राहिलें असून त्यावर ते रचना करीत असावे हें अत्यंत संभवनीय दिसतें. पूर्वींच्या भगवद्भक्तांनीं व कवींनीं घालून दिलेलें उदाहरण त्यांच्यापुढें होतेंच. भगवद्गुणगानांत झालेला ' हा कालव्यय चांगला, इतरथा आयुष्य जातें वृथा ' असें स्पष्ट सांगत असतांना त्यांनीं स्वतः आयुष्याचीं तीन चार वर्षें वृथा घालविलीं असतील अशी क्षणभरही कल्पना करितां येत नाहीं. त्यांनीं याच कालांत लिहिलेलीं ब्रह्मोत्तरखंडादि काव्यें कांहींशीं त्यांच्या भगवत्कथासेवनाच्या संकल्पांत अंतर्भूत होऊं शकतील हें खरें. तथापि तीं सर्व शिवकथापर आहेत; व मुख्य गोष्ट म्हणजे पंतांच्या काव्यरचनेची गति लक्षांत घेतली असतां तीं सर्व एक दीड वर्षांत आटपून जाण्याजोगीं आहेत. वर दिलेले प्रल्हादविजयांतील श्लोक १६८० च्या अखेरचे आहेत. व पंतांनीं काव्यरचनेस सुरवात १६७४–७५ च्या सुमारास केली हें बहुधा सर्वमान्य आहे. तेव्हां या ५।६ वर्षांच्या अवकाशांतून वर्ष दीड वर्षाची वासलात लावली तरी तीन चार वर्षें पंतांनीं फुकट घालविल्याचा आरोप शिल्लकच राहतो. तेव्हां या काळांत पंतांनीं कृष्णविजय पूर्वार्ध लिहिला असला पाहिजे, या अनुमानासच उलट बळकटी येते. कृष्णविजय पूर्वार्धाचें काठिन्य, व त्यांतील दीर्घ यमकरचनेचे प्रयास हे लक्षांत घेतले असतां पंतांस तो रचण्यास दोन अडीच वर्षें सहज लागलीं

असतील व आणखीही किरकोळ काव्यें कदाचित् या अवधींत त्यांनीं रचलीं असतील.

(३) पंतांच्या सर्व काव्यग्रंथांत कृष्णविजय हा कांहीं दृष्टींनीं अगदीं अपूर्व व विलक्षण असा ग्रंथ आहे. पंतांचे इतर सर्व ग्रंथ, त्यांचें येवढें थोरलें महाभारत सुद्धां, अगदीं सुश्लिष्ट, बांधीव व एका धाटणीचें काव्य आहे असें स्पष्ट दिसतें. ब्रह्मोत्तरखंड, मंत्ररामायण, मंत्रभागवत, हरिवंश इत्यादि त्यांचे ग्रंथही असेच अखंड, एका धोरणांत रचलेले आहेत. कृष्णविजय हें काव्य मात्र अशा तऱ्हेचें नाहीं. एकमेकांशीं अत्यंत विसदृश असे रचनेचे चार थर कृष्णविजयामध्यें दिसून येतात व ते सर्व एकाच काळीं, एकाच सपाट्यांत रचले गेले असावे असें मानणें जवळ जवळ अशक्य होतें. पहिला थर म्हणजे कृष्णविजयाचा सर्व पूर्वार्ध होय. हा आर्यागीति वृत्तांत रचलेला असून तो फार क्लिष्ट, लांब लांब यमकांनीं खचलेला, दूरान्वय, अलंकारांची अप्रशस्त गर्दी वगैरे रसहानिकर दोषांनीं व्याप्त, असा आहे. त्यांतही प्रेमळपणा व सौंदर्य नाहीं असें नाहीं. पण तें वरील गोष्टींनीं बरेंचसें आच्छादित झालेलें आहे. दुसरा थर म्हणजे उत्तरार्धांचे आर्यागीति वृत्तांतच रचलेले ५० ते ५४ अध्याय होत. या अध्यायांत मागील एकुणपन्नास अध्यायांतील रचनासरणीचा मागमूस सुद्धां उरलेला नाहीं. येथें लांब लांब यमकांचा आग्रह अगदीं नाहींसा झालेला असून रचना सरळ, सोपी व साधी अशी उतरली आहे. यापुढील तिसरा थर म्हणजे अ० ५५ ते ७९ पर्यंतचा होय. हा सर्व अक्षरगणवृत्तांत म्हणजे श्लोकांत रचलेला असून यांतील मुख्य वृत्त शार्दूलविक्रीडित हें आहे. हा भाग काव्यदृष्टीनें फार उच्च दर्जाचा वठला असून यांतील वर्णनशैली सफाईदार व डौलदार अशी साधलेली आहे. यापुढील चौथा व शेवटचा भाग ८० ते ९० या अकरा अध्यायांचा होय. हा पंतांच्या नेहमींच्या आर्या उर्फ गीति वृत्तांत रचलेला असून अतिशयच बहारीचा वठला आहे. पंतांची काव्यशक्ति, सहृदयता व प्रेमळपणा परमोत्कर्षास गेलेला पहावयाचा असेल तर तो येथें उत्कृष्ट रीतीनें दृष्टीस पडेल. याच्यामध्यें गुण कोणकोणचे आहेत याचें सविस्तर वर्णन करतांच येणार नाहीं. रसिकांना डोलावयास लावणाऱ्या उत्तम काव्यांत जे गुण असावे लागतात ते सर्व यांत आहेत येवढेंच फक्त सांगणें शक्य आहे.

तेव्हां अशा विसदृश गुणांचे निरनिराळे भाग असलेलें कृष्णविजय काव्य एका कालीं, एका सपाट्यांत लिहिलें गेलें असेल असें मानणें अशक्य होतें. आतां पंतांच्या

प्रह्लादविजयाची रचना सरळ, सोपी व दीर्घयमकरहित अशी आहे. तेव्हां पंतांनीं प्रथम अतिसरळ व प्रसादयुक्त असा प्रह्लादविजय लिहिला व त्यानंतर अतिक्लिष्ट व दीर्घ यमकांनीं युक्त असा कृष्णविजयाचा पूर्वार्ध (१-४९) लिहिला आणि मग प्रह्लादविजयाशीं पुष्कळच साम्य पावणारे कृष्णविजयाचे ५० ते ५४ अध्याय लिहिले अशी कल्पना ग्रंथकाराच्या लेखनशैलीची परिणति कसकशी होत जाते याचें मार्मिक ज्ञान असणाऱ्या कोणाही विवेचकास करावीशी वाटणार नाहीं. कोणाही ग्रंथकाराची परिणति कठिनतेकडून सुगमतेकडे व कृत्रिमतेपासून सहजसाध्य सौंदर्याकडे होत असते असा साधारण अनुभव आहे. तेव्हां पंतांनीं प्रथम आर्यागीतीमध्यें कृष्णविजयास सुरवात केली व त्याचा पूर्वार्ध रचून संपविल्यानंतर प्रह्लादविजय लिहिला असें मानणें जास्त सयुक्तिक दिसतें. व वर दिलेल्या प्रमाणांवरूनही तेंच सिद्ध होत आहे. पंतांनीं प्रथम शके १६७७-७८ च्या सुमारास कृष्णविजय लिहिण्यास सुरवात केली असावी व १६८० च्या सुमारास त्याचा पूर्वार्ध लिहून पुरा केला असावा. हा पूर्वार्ध जरा जास्त क्लिष्ट झाला असें त्यांस त्या वेळस दिसून आलें असावें म्हणून ही क्लिष्टता, व क्लिष्टतेला कारण होणारे दीर्घ यमकें, अलंकारांची गर्दी, कृत्रिम रचना वगैरे विशेष सोडून देऊन आर्यागीतिमध्यें सरळ, बालबोध रचना आपल्यास साधते कीं नाहीं हें आजमावण्याकरितां त्यांनीं प्रह्लादविजय १६८० मध्यें लिहून पाहिला असावा. प्रह्लादविजय हें अगदीं लहान म्हणजे २४० आर्यागीतिंचें सुबोध व सामान्यतः चांगल्यापैकीं काव्य आहे. प्रह्लादविजय लिहून बराच काळ लोटल्यानंतर पंतांनीं कृष्णविजयाच्या उत्तरार्धास सुरवात केली असावी व ५०-५४ हे आर्यागीतिंतील अध्याय लिहिले असावेत असें पुढें दाखविलेंच आहे. (परिच्छेद १२पहा).

(४) पंतकाव्यांच्या वृत्तरचनेकडेही आपणास यावेळीं थोडेसें लक्ष पुरविलें पाहिजे. कृष्णविजयाच्या निरनिराळ्या विभागांचे रचनाकाल ठरविण्याला त्याचा बराच उपयोग होण्याजोगा आहे. व एकंदरीनें पंतांच्या सर्व काव्यांचे रचनाकाल आजमावण्यास देखील त्यांचीं वृत्तें हें एक गमक उपयोगीं पडणार आहे. पंतांनीं नानाविध वृत्तांत विपुल काव्यरचना केली आहे. ते आपल्या स्फूर्तीप्रमाणें, स्वतःच्या नैसर्गिक प्रवृत्तीस अनुसरून कविता करीत असत. अमक्या अमक्या वृत्तांत अमक्या नमुन्याप्रमाणेंच वाग्रचना केली पाहिजे असा निर्बंध त्यांच्या कालीं नव्हता. व त्यांनीं स्वतः अशा तऱ्हेचा कोणताही निर्बंध मानला असल्याचें दिसत

नाहीं. संस्कृत साहित्यशास्त्रकारांचे काव्यरचनेसंबंधाचे नियम व संस्कृत वाङ्मयांत सर्वमान्य असलेल्या रूढि यांना त्यांनीं धाब्यावर बसविलें आहे. त्यांनीं आपलीं कांहीं काव्यें आपले आप्त, मित्र, यजमान इत्यादिकांच्या सूचनेवरून लिहिलीं असल्याचें दिसतें हें खरें. तथापि या सूचनांचा आदर, त्यांनीं सांगितलेल्या कथानकावर काव्य करण्यापुरताच पंतांनीं केला. काव्याची अंतर्गत रचना, त्यांतील वृत्तें इत्यादिकांच्या बाबतींत ते स्वतःच्या मनःप्रवृत्तीस अनुसरूनच वागले हे त्यांच्या काव्यांवरूनच उघड दिसतें. अशी स्थिति असल्यामुळें त्यांच्या वृत्तरचनेवरून स्वभावतः जीं अनुमानें निघतील तीं इतर उपलब्ध प्रमाणांशीं विरुद्ध नसल्यास बरींच विश्वसनीय ठरण्याचा संभव आहे. अशा अनुमानांपैकीं एक व्यापक अनुमान म्हणजे सारख्या वृत्तांतील काव्यें त्यांनीं एकाच कालखंडांत लिहिलीं असावींत हें होय. एका प्रकारच्या वृत्तरचनेशीं कवीचें तादात्म्य झालें म्हणजे त्याच वृत्तांत सारखी रचना करीत जाणें त्याला सुलभ वाटेल व त्या कालांत त्याची काव्यरचना सर्वस्वीं त्याच वृत्तांत होईल. मानवी प्रकृतींत सवईचा जोर केवढा असतो याचा विचार केल्यास वरील अनुमानाची सत्यता तेव्हांच पटेल. कृष्णविजय अ. ५५-७९ यांतील श्लोकबद्ध रचना पंतांनीं ज्या कालांत केली त्याच कालांत त्यांनीं आपलीं इतर श्लोकबद्ध प्रकरणेंही रचलीं असावीं असें सामान्यतः म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाय कृष्णविजयाचा आर्यागीतिवृत्तात्मक भाग प्रल्हादविजयाच्या आगेंमागें केव्हां तरी रचला असला पाहिजे हा तर्कही अंशतः वृत्तसाम्यावरूनच बसविलेला होय. आणखीही कांहीं गोष्टी त्यांच्या वृत्तरचनेच्या इतिहासावरून कळून येतात हें पुढील विवेचनावरून दिसून येईलच.

पंतांच्या इतकी नानाविध वृत्तांत रचना केलेला कवि आजपर्यंत कोणीही झालेला नाहीं. खुद्द मराठीचीं ओवी व अभंग हीं परंपरागत वृत्तें, संस्कृत छंदःशास्त्रांत सांगितलेलीं बहुतेक सर्व अक्षरगणवृत्तें व मात्रावृत्तें, दोहा हें हिंदुस्थानी वृत्त व साकी, सवाई, घनाक्षरी वगैरे देशी छंद, गझल इ॰ फारशी चाली, या सर्वांत पंतांनीं रचना केली आहे. आपल्या विद्यार्थिदशेच्या शेवटीं लिहिलेलें कुशलवाख्यान हेंच त्यांचें पहिलें काव्य होय असें वर प्रतिपादन केलेंच आहे॰ लहान मुलाला ज्याप्रमाणें एकादी चमत्कारिक वस्तु सांपडली कीं तीं ज्याला

त्याला दाखविल्याशिवाय चैन पडत नाहीं त्याचप्रमाणें पंतांनीं आपल्या नवसंपादित छंदःशास्त्राच्या ज्ञानाचें प्रदर्शन या काव्यांत मांडलें आहे. इतर अनेक वृत्तांबरोबरच छंदःशास्त्रोक्त पांचही प्रकारच्या आर्यावृत्तांचीही या काव्यांत पंतांनीं योजना केली आहे; (पहा, पूर्वार्ध पृ. १४१). हें काव्य लिहिल्यावर पुढील काव्यें लिहिण्याचा प्रसंग आला तेव्हां त्यांच्या विचक्षण बुद्धीस दिसून आलें कीं मात्रावृत्तें उर्फ आर्या या विपुल व शीघ्र रचनेस जशा उपयुक्त होण्याजोग्या आहेत तसे श्लोक उपयोगीं पडण्याजोगे नाहींत. पांची आर्यावृत्तामध्यें देखील दोन्ही अर्धें सारखीं असलेलीं गीति व आर्यागीति हीं वृत्तें यमकरचनेस विशेष अनुकूल असल्यामुळें त्यांना जास्त पसंत पडलीं. एक अर्ध लांब व दुसरें त्याच्या मानानें आखूड असल्यास त्यांत यमकरचना चांगली साधणार नाहीं व शोभणारही नाहीं. तेव्हां गीति व आर्यागीति या दोहींत त्यांनीं यापुढें रचना करण्याचा संकल्प केला. कृष्णविजय अ० १-५४ व प्रह्लादविजय हीं काव्यें आर्यागीतींत रचलीं गेलीं आणि ब्रह्मोत्तर खंड, सतशती, हरिश्चंद्राख्यान, मदालसाख्यान इ० काव्यें गीतिवृत्तांत तयार झालीं. गीति व आर्यागीति या दोघींची ही स्पर्धा उपयुक्त सर्व काव्यें रचून होईपर्यंत म्हणजे १६८२-८३ पर्यंत चालली असावी. पुढें आर्यागीति या झटापटींत मागें पडली व गीतीनेंच पंतांच्या मनावर पूर्णपणें पगडा बसवला. यानंतर ' आर्यागीतिमुक्तामाला ' नामक एका लहानशा रामायणाशिवाय पंतांनीं त्या वृत्तांत कोणचीही रचना केली नाहीं. तेव्हां या वृत्तरचनेच्या इतिहासावरूनही कृष्णविजयपूर्वार्ध पंतांनीं अगदीं प्रारंभीं लिहिला असावा असेंच दिसून येतें.

१९. तेव्हां (१) कृष्णविजयाच्या आरंभीं ' काचा शिशु ' (कच्चा पोर) म्हणून स्वतःचा केलेला उल्लेख, (२) प्रल्हादविजयांतील उल्लेखावरून १६८० पूर्वींच हरिध्यानासक्त व भगवद्गुणगानाव्यतिरिक्त गेलेला काल व्यर्थ मानणारी अशी पंतांची दिसून येणारी मनोवृत्ति; (३) कृष्णविजयाच्या रचनेचे चार विभाग व त्यांपैकीं अ० १–४९ हा विभाग प्रल्हादविजयाच्या पूर्वींच लिहिला असला पाहिजे असें त्याच्या रचनाशैलीवरून निघणारें अनुमान; व (४) पंतांच्या वृत्तरचनेच्या इतिहासांत आर्यागीतीचें प्रारंभींच दिसून येणारें स्थान;— या चार प्रमाणांवरून कृष्णविजयाचा पूर्वार्ध प्रल्हादविजयाच्या अगोदर रचून झालेला असला पाहिजे असें जवळ जवळ निश्चयानें म्हणतां येतें.

[२]

१२. कृष्णविजयपूर्वार्धाच्या शेवटीं पुढें दिल्याप्रमाणें ग्रंथसमाप्तिदर्शक उल्लेख आहे.

रामकृष्णचरणीं समर्पित, ग्रंथ हो रसिकचित्त तर्पित ।
न प्रमादभवदोष राहवू, सत्प्रमोदनयनोद वाहवू ॥
समाप्तश्चायं श्रीमत्कृष्णविजयः । श्रीरामकृष्णार्पणमस्तु ।
श्रीराम जयराम जयजयराम ॥
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुध्यात्मनावानुसृतस्वभावात् ।
करोमि यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि ॥
शुभं भवतु । श्रीरामचंद्रः शरणं श्रीरस्तु ॥

(कृ. वि. पराडकरी आवृत्ति पृ. १८३)

कोणत्याही ग्रंथाच्या शेवटीं केला तरच शोभेल असा ग्रंथसमाप्तीचा व समर्पणाचा उल्लेख येथें पंतांनीं केला आहे. त्यांनीं आपल्या इतर कोणत्याही ग्रंथांत केवल ग्रंथाचा एकादा भाग समाप्त झाला म्हणून अशा तऱ्हेचा मजकूर कोठेंही लिहिलेला नाहीं. येथें मात्र ' समाप्तश्चायं श्रीमत्कृष्णविजयः । ' असें ते स्पष्टच म्हणतात. एकादा ग्रंथ काय किंवा इतर कोणतेंही कर्म काय, तें संपूर्ण झालें म्हणजेच कृष्णार्पण होऊन ' कायेन वाचा ' व्हावयाचें असतें, हा परिपाठ सर्व आर्यधर्मीयांना परिचित असाच आहे. यावरून अर्थात् हें उघड दिसतें कीं दशमस्कंधाचे १–४९ अध्याय मराठींत उतरल्यावर 'सज्जनप्रार्थना' रूप उपसंहार लिहून तेथेंच पंतांनीं प्रथम ग्रंथसमाप्ति केली होती. या सज्जनप्रार्थनेंत त्यांनीं—

अभय दिधलें आहे, वाहे शुचिप्रतिभाझरा

असें म्हटलें आहे. यावरून हाच ग्रंथ पुढें चालविण्याचा त्यांचा त्यावेळीं हेतु होता असेंच कांहीं अनुमान निघत नाहीं. कारण शुचिप्रतिभेचा झरा प्रस्तुत ग्रंथ संपूर्ण झाला तरी इतर ग्रंथ रचतांना त्यांना उपयोगीं पडणारा होताच. तेव्हां शके १६८० सालीं त्यांनीं दशमाचे ४९ अध्याय लिहून तेथेंच ग्रंथ पुरा केला होता ही गोष्ट निश्चित होय. हा पुरा केलेला ४९ अध्यायी ग्रंथ बराच काळपर्यंत तसाच राहिला असावा. हा ग्रंथ आपण पूर्ण केलेला आहे अशी पंतांची भावना बराच वेळ कायम राहिली असली पाहिजे. नाहींतर त्यांनीं उपसंहारादाखल

लिहिलेली सज्जनप्रार्थना व कृष्णार्पणाचा उल्लेख मोडून लगेच पुढील अध्यायांस प्रारंभ केला असता.

तेव्हां कृष्णविजयपूर्वार्ध लिहून झाल्यानंतर बऱ्याच अवकाशानें म्हणजे ३।४ वर्षांनीं उत्तरार्ध रचण्याचें काम पंतांनीं हातीं घेतलें असावें. साहजिकपणेंच, पूर्वींचे ४९ अध्याय ज्या वृत्तांत रचलेले होते त्याच वृत्तांत त्यांनीं पुढील रचनेस प्रारंभ केला. पण याप्रमाणें पूर्वींच्याच आर्यागीति वृत्तांत ५ अध्याय रचल्यानंतर त्यांना त्या बोजड वृत्ताचा कंटाळा आला. तें वृत्त म्हटलें असतां कानाला गोड लागत नाहीं, हीही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली असावी. तेव्हां तें वृत्त सोडून त्यावेळीं त्यांच्या मनांत विशेष भरलेल्या शार्दूलविक्रीडितादि श्लोकवृत्तांत त्यांनीं ५५ व्या अध्यायापासून पुढें रचना करण्यास सुरवात केली. अर्थात् ही ५५ व्या अध्यायापासूनची श्लोकबद्ध रचना ५४ व्या अध्यायानंतर लागोपाठ सुरू झाली. ५४ व ५५ या अध्यायांमध्यें कांहीं खंड पडला नाहीं, हें पोथींतील दिसून येणाऱ्या विशेषावरून मागें दर्शविलेंच आहे. (पहा पृ. १५७).

१३. कृष्णविजयाचे ५५ ते ७९ हे विविधश्लोकबद्ध अध्याय ज्या कालांत पंतांनीं रचून पुरे केले तोच पंतांच्या **श्लोकबद्ध रचनेचा कालखंड** होय. भक्तभूषण, सुदामचरित्र, भृगुचरित्र, कृष्णामाहात्म्य इत्यादि अनेक श्लोकबद्ध प्रकरणें, निंदकपंचक, बाल व अयोध्या येवढीं दोनच कांडें रचून अपूर्ण राहिलेलें साररामायण उर्फ वृत्तरत्नमयरामायण व पांगारकरांनीं अगदीं प्रारंभींच्या काव्यांत ढकललेलें भस्मासुराख्यान हीं सर्व काव्यें याच कालांतलीं होत. वृत्तरचनेच्या, भाषासरणीच्या वगैरे साम्यावरून हीं काव्यें एकाच कालखंडांतलीं होत असें ठरतें. हा काल **शके १६८३ ते १६८८** पर्यंतचा, म्हणजे काव्यरचनेच्या दृष्टीनें पूर्वावस्थेचा व उमेदवारीचाच; परंतु सांसारिक आयुष्यक्रमाच्या दृष्टीनें पंतांच्या प्रौढ वयाचा व संसारसुखाच्या मध्याह्नीचा काल होय. याच कालांतील त्यांच्या काव्यामध्यें पत्नीप्रेम, मित्रप्रेम, अतिथिसत्कार वगैरे गृहस्थाश्रमास शोभविणारे गुण उत्कर्षास गेलेले दृष्टीस पडतात; आणि याच कालांतील त्यांची श्लोकरचनाही प्रौढ, भरदार व पुष्ट अशी झाली आहे. या कालांतील सर्वच काव्यें काव्यगुणांत एका तोलाचीं आहेत असें नाहीं. कृष्णविजय, भक्तभूषण इ. कांहीं उत्कृष्ट आहेत, तर भृगुचरित्रादि कांहीं सामान्य आहेत. काव्यें एकाच कालांत रचलेलीं असलीं, त्यांचीं वृत्तें

सारखीं असलीं म्हणजे काव्यसौंदर्यांतही तीं सारखींच ठरतील असें नाहीं. याच्या उलट कवित्वगुणांत एकाच तोलाचीं काव्यें असलीं म्हणजे तीं एकाच कालीं रचलीं असलीं पाहिजेत असेंही म्हणतां येणार नाहीं. नाहीं तर ब्रह्मोत्तरखंड व हरिविजय हीं दोन्हीं सामान्य दर्जाचीं काव्यें एकाच वेळीं रचलीं असें म्हणण्याचा प्रसंग येईल. रचनेचें सौंदर्य व काव्यमाधुरी ही तात्कालिक स्फूर्तीवर बहुतांशीं अवलंबून असते. एकाच काव्यांत एक पद्य उत्कृष्ट असेल तर त्याच्याच पुढचें दुसरें पद्य अगदीं नीरस असल्याचें आढळून येईल. असो.

१४. येथें **साररामायण** उर्फ **वृत्तरत्नमयरामायण** व **त्रुटितरामायण** या दोन रामायणांविषयीं थोडासा खुलासा करणें उचित होईल. पंतरचित रामायणसमूहांत किंबहुना पंतांच्या अखिल काव्यसंग्रहांत हीं दोन काव्यें कांहीं दृष्टींनीं अपूर्व आहेत. एकतर हीं दोन्ही रामायणें अपूर्ण आहेत, नुसतीं अपूर्ण आहेत इतकेंच नव्हे तर कवीनें बुद्ध्याहून अपुरीं ठेवलेलीं अशीं आहेत. पंतांनीं असा प्रकार आपल्या दुसऱ्या कोणत्याही काव्याचा केलेला आढळत नाहीं. एका कृष्णविजयाखेरीज त्याचीं सर्व काव्यें एकधोरणी च एका धाटणीचीं आहेत; व कृष्णविजयाच्या रचनेंत कित्येक प्रसंगीं खंड पडला असला व भिन्न वृत्तादिकांचा अवलंब करावा लागला असला तरी तें काव्य तडीस नेऊन सोडल्याखेरीज ते राहिले नाहींत. परंतु उपर्युक्त दोन रामायणांच्या बाबतींत मात्र त्यांनीं कधीं न केलेला प्रकार केला आहे. साररामायण अयोध्याकांडाच्या अखेरीपर्यंत लिहून पत्राच्या मध्यावरच सर्ग पुरा करून तेथें स्वहस्तानें ग्रंथसंख्याही त्यांनीं लिहून ठेविली आहे. यावरून तें काव्य येथेंच अर्धवट स्थितींत मुद्दाम होऊन त्यांनीं पूर्ण केलें असें उघड दिसतें. त्रुटित रामायणाचीं फक्त पांचच पत्रें उपलब्ध आहेत. त्याच्या पांचव्या पत्रावर शेवटपर्यंत मजकूर लिहिलेला आहे; तथापि त्या रामायणास त्यांनीं स्वतः नांवही दिलेलें नाहीं व साररामायणांतील कित्येक श्लोक या रामायणांत तसेच्या तसेच पुनः उद्धृत केलेले आहेत, यावरून हें रामायणही त्यांनीं शेवटास लावलें असावें असें वाटत नाहीं. एका काव्यांतले कित्येक श्लोक दुसऱ्या काव्यांत उतरणें हा देखील प्रकार पंतांनीं मोठा अजबच केला आहे. असें त्यांनीं दुसऱ्या कोठेंही केलें असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं.

साररामायण सर्व श्लोकबद्ध असून संस्कृत महाकाव्यांची धाटणी त्यांत पुष्कळशी

उचललेली आहे. म्हणजे संस्कृत काव्यांतली सर्गरचना पंतांनीं अवलंबिलेली असून सर्गांतले सर्व श्लोक एकाच वृत्तांत रचून समाप्तीचा श्लोक तेवढा भिन्न वृत्तांत घालावयाचा या प्रकाराचेंही अनुकरण केले आहे. तथापि सर्ग अगदीं लहान लहान म्हणजे १५।२० श्लोकांचे केले असून असे सर्ग बालकांडांत २१ व अयोध्या कांडांत ११ इतके आहेत. हें रामायण साधें, प्रेमळ व प्रसाद-युक्त असलें व काव्याच्या दृष्टीनें चांगल्यापैकीं असलें तरी अगदीं उत्कृष्टांत गणना करण्याजोगें नाहीं. रामायणाची कथा सरळ, सुरेख रीतीनें यांत सांगितली आहे येवढेंच. या काव्याचा मोठा विशेष म्हणजे त्यांतील अद्भुत वृत्तवैचित्र्य होय. पिंगलमुनिप्रणीत छंदःशास्त्रांतील व वृत्तरत्नाकारांतील अप्रसिद्ध, कोना-कोपऱ्यांतलीं वृत्तें काढून त्यांत रचना करावयाची असा चंग बांधूनच हें काव्य पंतांनीं लिहिलें कीं काय असें वाटल्याखेरीज रहात नाहीं. बालकाण्डाच्या १९, २० व २१ या सर्गांत अनुक्रमें वैतालीय, मात्रासमक व सममात्रक असे मात्रा-वृत्तांचे तीन भेद ग्रथित केले असून या तिहींतले सर्व पोटभेद एकेका पद्यांत उदाहरणादाखल रचून दाखविले आहेत. १ वैतालीय, औपच्छंदसिक, आपा-तलिका, दक्षिणांतिका, उदीच्यवृत्ति, प्राच्यवृत्ति, प्रवृत्तक, अपरांतिका, चारु-हासिनी; २ अचलधृति, मात्रासमक, विश्लोक, वानवासिका, चित्रा, उपचित्रा, पादाकुलक; ३ शिखा, खजा, अनङ्गक्रीडा, अतिरुचिरा; याप्रमाणें या तीन सर्गांतील वृत्तांची यादी असून ती वृत्तरत्नाकारांतील ' वैतालीय ' ' मात्रा-समक ' वगैरे प्रकरणांत वर्णिलेल्या वृत्तभेदांस तंतोतंत अनुसरून आहे. वैतालीय, मात्रासमक हीं नांवें बहुश्रुत मराठी वाचकांच्या कानावरूनही कधीं गेलीं नसतील; व वर दाखल केलेले त्यांचे पोटभेद तर छंदःशास्त्राचें मुद्दाम अध्ययन न केलेल्या चांगल्या संस्कृतज्ञासही माहीत असणें संभवनीय दिसत नाहीं. अशींच अत्यंत अप्रसिद्ध व विचित्र छंदःशास्त्रोक्त वृत्तें या काव्यांत सर्वत्र उपयोजिलीं असून ४६५ पद्यसंख्या असलेल्या या काव्यांत वरील पोटभेदांसकट एकंदर ६७ वृत्तें उपयोगांत आणिलीं आहेत, असें गणना करतां दिसून येतें.

वृत्तरचनेच्या बाबतींत प्रस्तुत काव्यास किती कृत्रिमता आलेली आहे, याची थोडीशी तरी कल्पना यावी म्हणून हा वर विस्तार केला आहे. छंदःशास्त्र-ज्ञानाचें बेसुमार प्रदर्शन करण्याच्या या प्रवृत्तीवरून पंतांनीं हें आपल्या पूर्व वयांत श्लोकरचनेच्या काळांतच, म्हणजे १६८३-१६८८ या अवकाशांत लिहिलें

असावें असें वाटतें. पंतांची नेहमींची काव्यरचना अप्रतिहत वेगवान व धों धों वाहणारी अशी आहे अशा नैसर्गिक प्रवृत्तीस जागोजाग बंधन करणारे छोटे छोटे सर्ग व अप्रसिद्ध अशा वृत्तांतली कृत्रिम रचना यांचा पंतांस लवकरच कंटाळा आला असावा. म्हणून त्यांनीं हें काव्य मध्येंच अपुरें ठेवलें असावें. पुढें लवकरच आर्येकडे त्यांची प्रवृत्ति होऊन आर्यावृत्तांत मंत्ररामायण रचण्याची त्यांना स्फूर्ति झाली; तेव्हां हें 'वृत्तरत्नमय' रामायण आर्यारचनेच्या एक-सारख्या फोंफावत जाणाऱ्या प्रवाहापुढें कृत्रिम पल्वलाप्रमाणें तिरस्कृत होऊन कायमचें कोपऱ्यांत दडून बसलें असावें. पंतांनीं इतरांस त्याची प्रत करून घेऊं न देतां बुद्धिपुरःसर तें अप्रसिद्धच ठेवलें असावें व अष्टोत्तरशत रामायणांत त्याची गणनाही केली नसावी असें वाटतें. नाहीं तर हें पूर्ववयांतील असून व काव्यदृष्ट्या बरें वठलें असून त्याच्या प्रती इतरत्र उपलब्ध झाल्याखेरीज राहत्या ना. मंत्ररामायण उत्तम तऱ्हेनें रचून पंतांनीं पूर्ण केलें; त्याच्या गुणां-मुळें त्याचा प्रसारही होऊन सर्वत्र बोलबाला झाला; व त्यानंतर पंतांनीं महा-भारताचें प्रचंड कार्य अंगावर घेतलें. तेव्हां अपुरें राहिलेलें साररामायण बिचारें पंतांच्या दप्तरांत तसेंच पडून राहिलें असें दिसतें. पांगारकरांनीं याचा शोध लावला तोंपर्यंत हें अज्ञात होतें व पराडकरांची पंतकाव्यांची आवृत्ति प्रसिद्ध होईपर्यंत अप्रसिद्धच होतें. याच्या पोथींतील पंतांचें अक्षर पूर्वकालीन आहे; शिवाय वर वर्णिलेले वृत्तरचनेचे कृत्रिम प्रकार कवीनें केले आहेत यावरून हें पंतांनीं पूर्ववयांतच रचलेलें होतें याविषयीं शंका रहात नाहीं.

वरील विवेचनावरून पांगारकरांनीं आपल्या पुस्तकांत या रामायणाविषयीं जे उद्गार काढले आहेत (मो. च. पृ. ४७८–७९) ते किती अत्युक्तिपूर्ण आहेत याची साक्ष पटेल. ' हें संपूर्ण सांपडल्यास पंतांच्या १०८ रामायणांत यासच पहिलें स्थान द्यावें लागेल, इतकेंच काय पण पंतांची केकावलि जशी जगन्मान्य होऊन बसली आहे तसेंच हें ' छंदोरामायण ' ही जगन्मान्य होऊन बसल्याखेरीज राहणार नाहीं. पंतांच्या कवित्वाचा उत्कर्ष जसा केकावलींत झाला आहे तसा तो या छंदोरामायणांतही झाला आहे. १०८ रामायणांपैकीं हें शेवटचें रामा-यण असावें. व यानंतर पंतांनीं केकावलीकडेच आपलें चित्त वळविलें असावें. ' असें पांगारकरांचें एकंदरीनें म्हणणें आहे! केकावलींत योजिलेलें सुप्रसिद्ध पृथ्वीवृत्त याचा या साररामायणांत मागमूसही नाहीं. व त्यांतील कल्पनाचम-

स्फूर्ति, निरुत्तर कोटिक्रम, भव्यता, यांचाही या रामायणांत फारसा पत्ता लागत नाहीं हें येथें वाचकांनीं लक्षांत ठेवावें ! असो.

' त्रुटित ' रामायणाविषयीं निश्चित किंवा निदान संभवनीय असें कांहींच विधान करितां येत नाहीं.

[३]

१५. यापुढील तिसरा कालखंड १६८८ ते १६९४ पर्यंतचा सहा वर्षांचा होय. या कालांतील रचनेचा मुख्य विशेष म्हणजे आर्यावृत्ताचें पूर्णपणें प्रस्थापित झालेलें प्राबल्य हा होय. पंतांनीं आपल्या लाडक्या आर्यावृत्ताला पुनः हाताशीं घेतलें व यानंतर पुन: केव्हांही त्यांनीं आर्येचा यत्किंचितही अव्हेर केला नाहीं. या काळाच्या प्रारंभींच बहुधा पंतांनीं सीतागीत, सावित्रीगीत व रुक्मिणीगीत हीं रचलीं असावींत, असें त्यांच्या रचनाशैलीवरून वाटतें. तथापि या कालांतील मुख्य रचना म्हणजे कृष्णविजय अ. ८०–९०, मंत्ररामायण (मराठी), आर्यामुक्तामाला, आर्याकेकावलि, नाममाहात्म्य (नामार्या), संशयरत्नावलि, नामसुधाचषक, नामरसायन इत्यादि सुंदर परमेश्वरस्तोत्रें व भीष्मभक्तिभाग्य, नारदाभ्युदय, अवतारमाला इत्यादि अतिशय प्रेमळ व मोहक भागवती स्तोत्रें हीं होय. या सर्व रचनेंत प्रेमळपणाची, भक्तिरसाची कमाल झालेली दिसून येते व आर्याग्रथनकौशल्यही उत्कर्षास पोचलेलें आढळतें.

आतां वर उल्लेखिलेलीं सर्व काव्यें अजमासें १६८८–१६९४ याच कालांत झालीं असावीं असें जें वर म्हटलें आहे तें केवळ हम करेसो कायदा या न्यायानें म्हटलेलें नाहीं. बऱ्याचशा प्रमाणांवरून हाच रचनाकाल जास्त संभवनीय दिसतो म्हणून तसें वर प्रतिपादन केलें आहे. या कालांतील मुख्य काव्य म्हणजे **मंत्ररामायण** होय, व त्याच्याच रचनाकालाविषयीं विशेष वाद होण्याजोगा आहे. कृष्णविजय बहुतेक रचून झाल्यानंतर त्याचे शेवटचे आर्यारचित ८० ते ९० अध्याय रचिले जात असतांना मंत्ररामायण रचून तयार झालें असें उपलब्ध प्रमाणांचा साधकबाधक दृष्टींनीं विचार केला असतां दिसून येतें. कृष्णविजयाचे ८० ते ९० अध्याय, मंत्ररामायण आणि वर उल्लेखिलेलीं अनेक लहान लहान प्रकरणें एकाच कालखंडांत रचून तयार झालीं. मग यापैकीं मंत्ररामायण अगोदर रचून मग कृष्णविजय (८०–९०) लिहिलेला असो किंवा पूर्वीपासून रचीत आणलेला कृष्णविजय अगोदर संपवून मगच मंत्ररामायणास आरंभ केलेला असो

किंवा कृष्णविजय (८०-९०) व मंत्ररामायण हीं एकाच वेळीं जोडीनें लिहिलीं गेलीं असोत.

१६. मंत्ररामायण हें कृष्णविजयास प्रारंभ करण्याच्याही अगोदर, ' ग्रंथकर्तृत्वाचा पहिला भर ' संपल्याबरोबर पंतांनीं लिहिलेलें मोठें सुप्रसिद्ध काव्य होय असें पांगारकरांचें मत आहे, व त्यास अनुसरून त्यांनीं आपलें मंत्ररामायणावरील प्रकरण ' ग्रंथकर्तृत्वाचा पहिला भर ' या प्रकरणानंतर व कृष्णविजयावरील प्रकरणाच्या अगोदर लिहिलें आहे. परंतु हें आपलें मत त्यांनीं प्रमाणांसह प्रतिपादन केलेलें कोठेंही दिसत नाहीं. त्यांच्या ग्रंथांत पसरलेल्या उल्लेखांचा मागोवा घेतला असतां दोन प्रमाणांवर त्यांची भिस्त असल्याचें दिसतें. पहिलें प्रमाण : ' पुराणांतील लहान मोठया कथा मराठींत आणण्याचा प्रयत्न सफळ होतो असें पाहून पंतांनीं मोठी उडी घेण्याचा विचार केला, व त्यांची पहिली उडी त्यांच्या उपास्य देवतेच्या कथानकावर पडली. व त्यांचें मंत्ररामायण जन्मास आलें. ' (मो. च. पृ. २३३) असें त्यांनीं कथन केलें आहे. म्हणजे पंत हे श्रीरामाचे उपासक असल्याकारणानें त्यांनीं रामाचें चरितच प्रथम काव्यरूपानें मराठींत उतरलें असा पांगारकरांच्या म्हणण्याचा आशय आहे. पण हें प्रमाण अगदींच निर्बल आहे असें थोडा विचार केला असतां दिसून येईल.

पंत हे रामोपासक होते हें सुप्रसिद्धच आहे. परंतु ही रामोपासना त्यांस केव्हांपासून लागली ही गोष्ट अगदीं अनिश्चित आहे. त्यांची रामोपासना कुलपरंपरागत खास नव्हती. कारण त्यांचें कुलदैवत रामचंद्र हें नसून सोनारीचा भैरवदेव हें होय असें पांगारकरांच्या चरित्रावरूनच कळून येतें. (मो. च. पृ. १). त्यांनीं रामाची उपासना आपले गुरु केशव पाध्ये यांच्या उदाहरणावरून उचलली असावी असा एक पांगारकरांचा तर्क आहे. (मो.च.पृ १८) परंतु दोनशे वर्षांपूर्वीं होऊन गेलल्या एका अप्रसिद्ध गृहस्थाविषयीं कोणीतरी सांगितलेल्या दंतकथेवर विश्वसून हा तर्क केलेला असल्यामुळें तो जितपत खरा तितपत खोटाही ठरण्याचा संभव आहे. पंतांचे गुरु रामोपासक होते ' असें पन्हाळगडावर पांगारकरांनीं ऐकिलें ' होतें. या ऐकीव माहितीवरून व केशव पाध्यांनीं रामनवमीस एक ग्रंथ लिहून संपविल्याचा त्यांना दाखला मिळाल्यावरून केशव पाध्ये रामोपासक होते व पंतांनीं रामोपासना त्यांच्यापासून घेतली असे तर्कांचे मनोरे पांगारकरांनीं उभारले आहेत ! पुढें पृ. १०२ वर पंतांच्या रामोपासनेविषयीं आणखी निराळीच माहिती दिली

आहे ! नगरच्या एका निपुत्रिक रामभक्तास दृष्टान्त झाल्यावरून त्यानें आपल्या-जवळील रामपंचायतनाच्या मूर्ति पंतांस आणून दिल्या; तेव्हां 'भगवान् राम आपल्या घरीं चालून आले हा आपल्यावर थोर अनुग्रह झाला' असें त्यांना वाटून त्यांची रामभक्ति दृढ झाली अशी हकीकत तेथें दिली आहे. हीही दंत-कथाच आहे. हिच्यांत सत्याचा अंश असण्याचा संभव आहे; परंतु ही गोष्ट केव्हां घडून आली हें समजण्याचा कांहींच मार्ग नसल्यामुळें कालनिर्णयास ती सर्वथा निरुपयोगी आहे. तेव्हां पंत केव्हांपासून रामोपासक बनले याचा देखील नीट छडा लागलेला नसतांना त्या रामोपासनेमुळें पंतांनीं मंत्ररामायण पहिल्या-प्रथम लिहिण्यास घेतलें असा निराधार तर्क पांगारकरांनीं केला आहे.

बरें, राम हें पहिल्यापासूनच पंतांचें उपास्य होतें व त्यामुळें 'पहिली उडी' त्यांची उपास्यदेवतेच्याच कथानकावर पडली असावी असें क्षणभर मानून चालूं. आपल्या कवित्वशक्तीची चांचपणी पाहण्याकरितां पंतांनीं प्रथम थोडींशीं किरकोळ आख्यानें लिहिलीं व नंतर रामायण लिहिण्यास घेतलें असा पांगारकरांच्या लिहि-ण्याचा रोख आहे. पण कवित्वाचा अजमास पाहण्याकरितां व सराव होण्याक-रितां त्यांनीं प्रथम लिहिलेलीं प्रकरणें कितीशीं असावींत ? अशीं हीं ग्रंथकर्तृत्वाच्या पहिल्या भरांतलीं काव्यें ११ असल्याचें पांगारकरांनीं दर्शविलें असून त्यांची पद्य-संख्या ३६९० म्हणजे खुद्द मंत्ररामायणाच्या जवळ जवळ दुप्पट आहे ! म्हणजे आपल्या उपास्यदेवतेवर काव्य करण्यांस उत्सुक असलेले पंत पहिलीं पांच सहा वर्षें नुसतीं सराव करण्यांत घालवितात; व केवळ सराव होण्याकरितां ३७०० कविता लिहून ज्या मुख्य उद्देशाकरितां येवढा सराव केला तें रामचरितांचें गायन अवघ्या १९०० आर्यांत आटपून टाकतात असें पांगारकरांच्या म्हणण्याचें तात्पर्य आहे ! सारांश काव्य करण्याचा प्रयत्न सफल होतो कीं नाहीं हें पाहण्या-करितां पंतांनीं लहान मोठीं ११ काव्यें केलीं व नंतर आपल्या 'उपास्यदेवतेच्या कथानकावर पहिली उडी' घातली या दोन्ही पांगारकरांच्या कल्पना निराधार आहेत. पंतांचें उपास्यदैवत पहिल्यापासून रामचंद्र हेंच होतें असें निश्चयानें म्हणतां यणार नाहीं व रामचरित्रावर काव्य लिहिण्यास ते प्रारंभापासून उत्सुक होते असें तर मुळीच दिसत नाहीं. शिवाय उपास्यदैवत अमुक एक असलें म्हणजे त्याच्यावरच काव्य करण्यास कवीनें पहिल्याप्रथम सरसावलें पाहिजे असा नियम मुळींच घालून देतां येण्याजोगा नाहीं.

१७. पांगारकरांचा दुसरा आधार म्हणजे नामरसायनांतील उल्लेख होय. ' दशमस्कंधांतील दिव्य कृष्णकथा मी नूतन लिहिल्या आहेत ' असें या काव्यांत पंतांनीं रामभक्त जो मारुति त्याला निवेदन केलें आहे, याच काव्यांत मंत्र-रामायणाचा व इतर कांहीं काव्यांचाही उल्लेख आहे. त्या सर्वांमध्यें फक्त कृष्ण-कथांचाच ' नूतन लिहिल्या ' म्हणून उल्लेख केला आहे यावरून कृष्णविजय हें नामरसायनाच्या अगोदर नुकतेंच लिहिलेलें काव्य असून मंत्ररामायणादि इतर काव्यें त्याच्या पूर्वींच लिहिलेलीं असलीं पाहिजेत असा पांगारकरांचा व इतरांचाही ग्रह झालेला आहे. आतां नामरसायनांतील काव्यांचे उल्लेख काय आहेत तें आपण पाहूं. हे उल्लेख महत्त्वाचे असल्यामुळें येथें समग्र दाखल केले आहेत.

यावें, दर्शन द्यावें, बोलावें, डोलवूनि डोलावें ।
वाटे स्व **मंत्ररामायण** निज नाटक तुम्हींच तोलावें ॥ ६६ ॥
श्रीमद्भागवत श्रीदशमस्कंधांत दिव्य **कृष्णकथा** ।
त्या नूतन लिहिल्या मीं, वाचूं ऐका रुचेल कर्णपथा ॥ १०४ ॥
प्रल्हादविजय नाम ग्रंथ पहा नगचि मणिगणीं खचिला ॥ १०५ ॥
जैमिनिकृताश्वमेधस्थित **कुशलवचरित** वर्णिलें आहे ।
बा, हे रीति पहावी, मज तों वाटे सुधानदी वाहे ॥ १०६ ॥
वाचीन **मंत्ररामायण** आधीं मीच, मग तुम्ही वाचा ।
वाचा वाचाया बहु झड घाली, ग्रंथ सत्य नांवाचा ॥ १०७ ॥
संशयरत्नावलि, सत्सत्कृति, केकावली, चषक, आर्या ।
त्वां ऐकावे ग्रंथ, प्रेमें प्याव्याचि राम**नामार्या** ॥ १०८ ॥
आर्यामुक्तामाला दावीन परंतु जरि न मागाल ।
लागाल प्रभुकंठीं घालूं, फुगवील कीं रमा गाल ॥ १०९ ॥
तुमच्या पदप्रसादें सद्गुरुनें जें असेल पढवीलें ।
तें बा तुम्हांसि दाविन **नामरसायन** जपोनि कढवीलें ॥ ११० ॥

यांतील पहिला मंत्ररामायणाचा उल्लेख पंतांनीं प्रेमभरांत हनूमन्नाटकाशीं तुलना करण्याकरितां केलेला आहे तो सोडल्यास आर्या १०४ ते ११० पर्यंत त्यांनीं आपल्या पूर्वरचित काव्यांचे एकामागून एक उल्लेख केलेले आहेत असें दिसून येतें. ह्या वेळपर्यंत पंतांनीं रचलेल्या सर्वच काव्यांचे उल्लेख यांत आलेले नाहींत; शिवाय जे उल्लेख केले आहेत ते देखील रचनाकालांच्याच अनुक्रमानें केले आहेत

असेंही ठाम म्हणतां येत नाहीं. तरी कांहींसा तसा प्रकार असावा असें म्हणण्यास जागा आहे. कृष्णविजयाचा येथें पहिल्यानें उल्लेख केला आहे. कृष्णविजयाच्या रचनेस पंतांनीं अगदीं प्रारंभींच सुरवात केली होती हें वर दाखविलेंच आहे. व कृष्णविजयाचा पूर्वार्ध लिहून झाल्यानंतर प्रल्हादविजय लिहिला हेंही मागेंच दर्शविलें आहे. तेव्हां या काव्यांचे नामरसायनांतील उल्लेख आम्ही ठरविलेल्या काळास अनुरूप असेच आहेत एका कुशलवचरिताचाच कायतो अपवाद दिसून येतो.परंतु त्यानंतर उल्लेखिलेलीं मंत्ररामायण, संशयरत्नावलि, साधुसत्कृति इत्यादि काव्यें आम्ही ठरविलेल्या रचनाकालांच्या अनुक्रमानेंच वरील यादींत आलीं आहेत हें सहज लक्षांत येईल. तेव्हां नामरसायनांतील उल्लेख जर कोणास पोषक होत असेल तर तो मंत्ररामायण कृष्णविजयानंतर लिहिलें याच अनुमानास पोषक होत आहे हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

हें सर्व खरें, परंतु ‘ कृष्णकथा त्या नूतन लिहिल्या मी ’ असें पंत स्वतःच म्हणतात त्याची वाट काय ! असा प्रश्न अर्थातच कोणाच्याही मनांत उद्भवेल. या पंतांच्या उद्गाराचीही उत्पत्ति समाधानकारक रीतीनें लागत नाहीं असें नाहीं. पहिली गोष्ट म्हणजे या उद्गाराचा अर्थ ‘ कृष्णविजय मी नुकताच लिहून संपविला आहे ’ असा जो सर्वांनीं केला आहे तोच यथार्थ आहे असें म्हणवत नाहीं. पंत येथें आपल्या काव्यांची अघळपघळ स्तुति करीत असून लाडीगोडीनें हनुमंतापाशीं आपला वशिला लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. कुशलवचरिताची त्यांनीं ‘ सुधानदी वाहे ’ असें म्हणून प्रशंसा केली आहे, प्रल्हादविजयाचें तर ‘ रत्नसमूहांनीं खचलेला पर्वत ’ असें अतिशयोक्तिपूर्ण वर्णन केलें आहे. अशीच कांहीं तरी कृष्णविजयाची उत्कृष्टता किंवा अपूर्वता पंतांना दाखवावयाची आहे. नुसतें ‘ कृष्णविजय मी नुकताच रचला ’ असें म्हणण्यांत काय स्तुति किंवा स्वारस्य आहे ? ‘ शुकाचार्यांनीं पूर्वींच दशमस्कंधांत दिव्य कृष्णकथा वर्णिल्या होत्या खऱ्या. परंतु त्या काय आतां जुनाट झाल्या आहेत. त्याच मी अगदीं नव्यानें लिहिल्या आहेत; पहा तर खऱ्या ? ’ अशा तऱ्हेनें आपल्या ग्रंथांचें अपूर्वत्व मारुतीच्या नजरेस आणून देण्याचा पंतांचा हेतु आहे. ‘(जुन्या कवींच्या मानानें) मी हा अगदीं कोरा ग्रंथ रचला आहे’ असें सांगून हें एक आपलें ‘ सर्टिफिकिट ’ मारुतिरायापाशीं पंत मोठ्या लाघवीपणानें दाखल करीत आहेत. अर्थात् जुन्या कवींनीं ज्या कृष्णकथा लिहिल्या आहेत त्यांच्या अपेक्षेनें नवीन, असा अर्थ

'नूतन ' शब्दांत अभिप्रेत आहे. ' ग्रंथ नुकताच रचला आहे ' एवढेंच सांगण्याचा पंतांचा अभिप्राय नाहीं ' नूतन लिहिल्या ' असं म्हणण्यांत शब्दशः अर्थास प्राधान्य नसून त्यांत अर्थवादाचा, गौरवाचा व लाडीगोडीचाच प्रकार विशेष आहे हें काव्यांचें मर्म जाणणाऱ्यांच्या लक्षांत येऊं नये ही आश्चर्याची गोष्ट होय!

पांगारकरादिकांच्या म्हणण्याप्रमाणें ' कृष्णविजय मी नुकताच लिहून संपविला आहे ' असा काव्यशून्य अर्थ जरी मान्य केला तरी त्यांत कांहीं हानि आहे असें नाहीं. कारण खरोखर कृष्णविजय पंतांनीं नुकताच लिहून संपविला होता. कृष्णविजयाचे भिन्न विभाग भिन्न भिन्न कालीं रचले गेले असें मागें प्रतिपादन केलेंच आहे आणि त्याचे ८० ते ९० अध्याय नामरसायनाच्याच कालांत लिहिले गेले असावेत असेंही वर निर्दिष्ट केलेंच आहे. तेव्हां कृष्णविजयाचा शेष भाग पंतांनीं त्यावेळेस नुकताच लिहून संपविला असल्यामुळें ' कृष्णकथा नूतन लिहिल्या ' हें म्हणणें साध्या अर्थानें देखील युक्तच ठरतें. नूतन लिहिल्या याचा अर्थ अथपासून इतिपर्यंत सर्व ग्रंथ मीं नुकताच लिहिला असा करण्याची मुळींच जरूरी नाहीं.

१८. कृष्णविजयाचे भिन्न भिन्न विभाग एकमेकांशीं इतके विसदृश आहेत कीं ते एका सपाट्यानें रचले गेले असें मानणें केवळ अशक्य आहे. हें आम्हांस पुनः पुनः सांगावेसें वाटतें याचें कारण तें काव्य जसजसें जास्त वाचावें तसतसें त्यांतील विभागांचें परस्परवैलक्षण्य मनावर अधिकाधिक ठसत जातें हें होय. पंतांचीं बाकीचीं सर्व काव्यें एकसंधी, एका धाटणीचीं व एका भाषापद्धतीचीं आहेत असें असतां कृष्णविजयाच्या रचनेंत ठळकपणें दिसून येणाऱ्या विजोडपणाकडे व विस्कळीतपणाकडे कोणाही काव्यमर्मज्ञाचें अजून कसें लक्ष गेलें नाहीं याचें मोठें आश्चर्य वाटतें. असो.

१९. ' कृष्णविजय बाबा पाध्ये यांच्या सांगण्यावरून पंतांनीं रचिला. व त्यांच्यासारख्या पंडितानें सुद्धां हा फार कठीण झाला असा अभिप्राय दिल्यावरून पंतांनीं मंत्रभागवत लिहिलें. ' अशी आख्यायिका पांगारकरांनीं आपल्या पुस्तकांत नमूद केली आहे. (मो. च. पृ. २५५-२५६). ही आख्यायिका खरी असल्याचेंही त्यांचें मत झालें असून त्याविषयीं त्यांनीं कांहीं प्रमाणेंही दाखल केलीं आहेत. कृष्णविजय पूर्वार्धाच्या अखेरीस सज्जनप्रार्थनेंत

श्रीमद्भागवतामृतोदधि तुम्हीं, अर्थज्ञ ते मेघसे

असें सज्जनांस उद्देशून पंत म्हणतात. त्याचप्रमाणें समग्र कृष्णविजयाच्या शेवटीं

कीर्ति श्रीपतिचींच **सज्जन** सदा सप्रेम आकर्णिती
सर्वस्तुत्य कवींद्र शौरिचरितें अत्यादरें वर्णिती ।
' गावें नित्य मुकुंदसद्यश यथाबुद्धि त्यजूनि त्रपा '
ऐसें सांगति, पाजिती हितसुधा विद्वत्सभा सुप्रपा ॥
ते आज्ञा स्वशिरीं धरूनि भगवद्भक्तप्रिया सत्कथा
श्रीरामात्मज साधुशिष्य वदला सोडूनि सर्व व्यथा
हें मानेल निजप्रसादमुखरच्छात्रोक्त साधुव्रजा
जैसें शिक्षितकीरभाषण रुचे कीं जे वदे स्वप्रजा ॥

कृ. वि. १०. ४२, ४३.

असे त्यांनीं उद्गार काढले आहेत. " या उद्गारांवरूनही पंतांनीं प्रकृत ग्रंथ कोणा विद्वान् संताच्या प्रेरणेनें लिहिला हेंच सिद्ध होतें. आतां येथें बाबांचें नांव नाहीं हें खरें, पण एकंदर प्रकारावरून बाबांचीच 'आज्ञा स्वशिरीं धरून' पंतांनीं प्रकृत ग्रंथ लिहिला असें मला निभ्रांत वाटतें. " (मो. च. पृ. २५६) असें पांगारकरांचें म्हणणें आहे. येवढ्या शा तेवढ्याशा गोष्टीवरून मनास वाटतील तसे तर्क करण्याचा मोह कांहीं संशोधकांस पडत असतो. पांगारकरांचीही येथें अशीच स्थिति झाली आहे असें म्हणणें भाग पडतें.

भगवद्भक्तांना, सज्जनांना व रसिकांना उद्देशून पंतांनीं आपल्या बहुतेक काव्यांच्या शेवटीं अनेक आदराचे उद्गार काढले आहेत ' भगवद्भक्तांच्या आज्ञेनेंच मी हें लिहीत आहें, ' ' माझ्या लिहिण्यानें रसिक व भगवद्भक्त प्रसन्न होतील, ' 'साधूंनींच मला कविता करण्यास प्रेरणा केली आहे' अशा तऱ्हेचे सामान्य भगवद्भक्तास व रसिकांस उद्देशून त्यांनीं ठिकठिकाणीं कृतज्ञतेचे उद्गार काढले आहेत. अशापैकीं कांहीं उद्गार नमुन्यादाखल खालीं दिले आहेत.

ऐका **सज्जन** हो ! भवद्वच खरें, आश्चर्य म्यां पाहिलें
वाल्मीकिप्रभृतिस्वबंदिनिकरीं दीना मला बाहिलें । आदि.३८.१०४.

येथें ' सज्जन हो, तुमचें सांगणें खरें झालें ' असा सज्जनांच्या सांगण्याचा उल्लेख केला आहे. पुढील भक्तभूषणांतील उद्गार तर अगदीं कृष्णविजयांतील उद्गारांसारखेच आहेत.

नव्हे नवल तें जगीं, नवल हें मयूरद्विजा
दिली सुकविता पहा **सदय साधुंनीं** हे निजा ॥१०५

संतांचें संतांतें, गंगेचें तोय जेवि गंगेतें ।
म्यां अर्पिलें, वराया सुख, कल्पशतींहि जें न भंगे तें ॥ १०९
केलें मला अलंकृत शुद्ध स्वयशें करूनि **संतांनीं** ।
जैसें श्रीमत्पितर स्वविभूषण अर्पिती स्वसंतानीं ॥ ११०

त्याचप्रमाणें भीष्मभक्तिभाग्यांत—

भगवद्भक्तानुज्ञा कीं गाव्या सत्कथा यथामति तें । भी. भ. ७

असा भगवद्भक्तांच्या अनुज्ञेचा उल्लेख केला आहे. संतांनीं सांगितल्यावरूनच मी परमेश्वराचें यश गात आहें अशा तऱ्हेचे स्पष्ट उल्लेख पंतांनीं मंत्रभागवतांत व हरिवंशांतही केले आहेत.

भक्तास्यें राम आज्ञा करि मज पहिली त्या जशी नारदास्यें ।
मं. भा. उपसंहार ५.

श्रीहरिहरभक्त रसिक म्हणति ' यथाबुद्धि पुण्य यश गावें ' ।
यास्तव भक्त मयूरें गावुनि लिहिलें तयां नमुनि भावें ॥ हरिवंश ५.६५.
रसिक विष्णुभक्तांहीं हें शिशुभाषणपरि परिसावें ।
दोष निवारुनि गुण घेउनियां स्वसुखानें नाचावें ॥ पृथु. ८८.
श्रीहरिहरभक्त म्हणति ' हेंचि बरें कलियुगीं दुजें न शिकें ' ॥
ब्र. खं. १६.२०.

यांपैकीं मंत्रभागवतांतलि उल्लेखही बाबा पाध्यांना उद्देशून आहे असें कित्येकांचें मत आहे हें खरें. परंतु इतर ठिकाणचे उल्लेख कोणा विशिष्ट व्यक्तीस उद्देशून मुळींच केलेले नाहींत, त्यांच्याविषयीं तर तशी शंका देखील घेण्यास जागा नाहीं; तेव्हां अशा तऱ्हेचे उल्लेख कोणा विशिष्ट व्यक्तींस उद्देशून पंत करीत असत ही कल्पनाच मुळीं निराधार आहे. हरिकथा गाव्या, भगवद्यशोगान करावें, असें शुकसनकादिकांपासून सर्व भगवद्भक्त एकसारखे म्हणत आले आहेत व या प्राचीन अर्वाचीन सर्व संतांच्या उपदेशामुळेंच ' मुकुंदसद्यश गाण्या ' ची पंतांस स्फूर्ति झाली असल्यामुळें त्यांनीं तसे जागोजाग उद्गार काढले यांत कांहींच विशेष नाहीं. प्रत्यक्ष श्रीराम आपल्याजवळ येऊन आपल्या कानांत उपदेशामृत ओतीत आहेत असा जर त्यांस विश्वास वाटत असे तर संत सज्जन आपल्याला प्रत्यक्ष आज्ञा करीत आहेत असा त्यांस भास व्हावा व तसें त्यांनीं वर्णन करावें हें अगदीं स्वाभाविक आहे. यांत

विशिष्ट व्यक्तीला उद्देशून त्यांनीं हे उद्गार काढले असें वाटण्याजोगें कांहीच नाहीं. शिवाय वरच्या कृष्णविजयामधील उद्गारांत तर ' विद्वत्सभा ' व ' साधु-प्रजा ' या शब्दांवरून हा उल्लेख कोणा एकाच व्यक्तीस लागू नसून सर्व विद्वन्मंडलाविषयीं व साधुवृंदाविषयी केला आहे हें अगदीं उघड होतें. त्यांतून बाबा पाध्ये हे पंतांहून लहान होते व ते पंतांस वडील, पूज्य मानीत असत. तेव्हां त्यांच्यासंबंधानें पंत स्वतःस ' साधुशिष्य,' ' निजप्रसादमुखरच्छात्र (त्यांच्या प्रसादानें बोलका झालेला विद्यार्थी) ' म्हणवून घेतील हें सुतराम् अशक्य होय. तेव्हां येथील उल्लेख कोणा एका व्यक्तीस उद्देशून आहे असें क्षणभर मानलें तरी तो बाबा पाध्यांस मुळींच लागू होत नाहीं.

स्वतःस अत्यंत पूज्य अशा व्यक्तींचाही पंत काव्यांत एकवचनानेंच सररास उल्लेख करीत असत. अनेकवचनी उल्लेख त्यांनीं फारच क्वचित् केले आहेत. विठोबादादा चातुर्मासे, अनंत पाध्ये (बाबांचे वडील), बाबूजी नाईक या पूज्य व मान्य व्यक्तींविषयींचे पुढील उल्लेख पहा—

श्रीमान् बाबूराय प्रभु ज्याचें शोभलें यशें गात्र । स्वर्गारोहण.२.३५
केवळ भक्तिरसमय श्रीमदनंताख्य जो उपाध्याय । ३८
बहुशोभाप्रद झाला श्रीविठ्ठल भक्तराय कवनानें । ४०

तेव्हां बाबा पाध्यांविषयीं ते बहुवचनानें उल्लेख करतील हें शक्य दिसत नाहीं. शिवाय या कल्पनेच्या डोलाऱ्यावर मूले कुठाररूप आक्षेप हा कीं बाबांनीं जर कृष्णविजय रचण्यास सांगितलें होतें तर तसा स्पष्ट उल्लेख करण्यास पंतांना कोणी बंदी केली होती ? जेथें जेथें इतरांच्या सांगण्यावरून काव्य लिहिलें तेथें तेथें पंत तसा स्पष्ट उल्लेख करण्यास कधींही चुकत नाहींत. ब्रह्मोत्तरखंड, मदालसाख्यान व कृष्णामाहात्म्य हीं काव्यें सदाशिव पाध्यांचा सांगण्यावरून व हरिवंश पांडुरंगरायांच्या सांगण्यावरून लिहिला हें सर्व पंतांनीं जेथल्या तेथें स्पष्टपणें सांगून टाकलें आहे. आपल्याशीं संबंध असलेल्या जितक्या व्यक्तींचा नामनिर्देश पंतांनीं केला आहे तितका दुसऱ्या कोणत्याही कवीनें केला नसेल. आपल्या गावचे शिंपी, तेली, तांबोळी, खाटीक यांचा सुद्धां ज्यानें अत्यंत स्नेहार्द्रतेनें उल्लेख करून त्यांना तारण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना केली तो ' परगुणपरमाणून्पर्वतीकृत्य नित्यम् ' अशा कोटींतला साधुपुरुष, बाबा पाध्यांसारख्या

जिवलग स्नेह्याचा उल्लेख करणें आवश्यक असतां, तो करण्यास कचरेल असें असें मनातही आणितां येत नाहीं.

शिवाय कृष्णविजय ज्या वेळीं रचला गेला त्यावरून पहातांही बाबा पाध्ये यांनीं सुचविल्यावरून तो लिहिला असावा असें दिसत नाहीं. शके १६८० पर्यंत कृष्णविजयाचा पूर्वार्ध बहुधा रचून सुद्धां झाला होता. बाबा पाध्ये यांचे वडील अनंत पाध्ये हे १६८० नंतर, त्यांचें वतन बुडाल्यामुळें (मो. च. पृ. ११०), पंढरीस सहकुटुंब राहाण्यास आले. त्यापूर्वीं त्यांची व पंतांची ओळख देखील असावी असें दिसत नाहीं. व बाबा त्या वेळीं बरेच लहान असावे. त्यांनीं पंतांस त्या वेळीं काव्य करण्यास सांगणें शक्य दिसत नाहीं.

कृष्णविजयांतील सामान्य सज्जनांस उद्देशून काढलेल्या उद्गाराविषयीं वर जी चर्चा केली आहे तीच मंत्रभागवतांतील उद्गारांसही लागू पडते.

भक्तास्यें राम आज्ञा करि मज, पहिली त्या जशी नारदास्यें ।

हा मंत्रभागवताच्या उपसंहारांतील उल्लेखही बाबा पाध्यांस अनुलक्षून आहे असा श्री. पराडकर व पोतदार यांनीं गैरसमज करून घेतला आहे. (पराडकरी आवृत्ति मं. भा. उपोद्घात पृ. १२.) खरें पाहिलें तर येथेंही कोणा विशिष्ट व्यक्तीला उद्देशून पंतांनीं लिहिलें नसून ' मागें रामानें नारदाच्या मुखानें जशी व्यासास आज्ञा केली तशीच आतां तो मला भगवद्भक्तांच्या मुखांतून आज्ञा करीत आहे ' असें त्यांनीं नेहमींच्या पद्धतीस अनुसरून म्हटलें आहे. असें असूनही कोणा तरी व्यक्तीचा उल्लेख येथें गर्भित आहे असें आग्रहपूर्वक म्हणावयाचेंच असेल तरी ती व्यक्ति बाबा पाध्ये नव्हेत हें खास आहे. बाबा पाध्ये भगवद्भक्त म्हणून कधीं प्रसिद्ध होते असें दिसत नाहीं; ते पंडित होते. ' आज्ञा करि ' या शब्दप्रयोगावरून व नारदाची उपमा दिली आहे त्यावरून सदोदित हरिकीर्तन करणारे परम भगवद्भक्त विठोबादादा हेच ' मनापुढें येतात; ' बाबा पाध्ये येत नाहींत.

आतां लोकप्रवादाचा जो आधार वरील विद्वद्वर्यांनीं आपल्या कल्पनांच्या डोलाऱ्यास घेतला आहे तोही फारसा बळकट आहे असें दिसत नाहीं. पंत व पाध्ये हे मित्र होते, व्याही होते येवढी सामग्री मिळाल्यावर मग लोकप्रवादाला आपल्या कल्पनातंतूंचें जाळें विणण्यास काय उशीर ? बाबा पाध्ये संस्कृताचे अभिमानी होते व संस्कृत काव्यें रचण्यास त्यांनीं पंतांस विनंती केली

होती येवढी गोष्ट मात्र त्यांच्या पत्रव्यवहारावरून दिसून येते. पंतांस मराठींत काव्यें करण्याविषयीं त्यांनीं आग्रह केला असेल असें दिसत नाहीं. तेव्हां कृष्ण-विजय व मंत्रभागवत हीं दोन्ही काव्यें कोणाच्या सांगीवरून पंतांनीं लिहिलीं नसून स्वतःच्या प्रेरणेनेंच रचलीं ही गोष्ट निर्विवाद होय.

२०. कृष्णविजय मंत्ररामायणानंतर रचला व तो पाध्यांच्या आग्रहावरून रचला या पांगारकरांच्या दोन्ही कल्पनांचें निरसन केलें. आतां मंत्ररामायणच कृष्णविजया (अ. १–७९) नंतर रचलें असावें असें म्हणण्याला काय प्रमाणें मिळतात तें पाहूं.—

(१) महाभारत आदिपर्वाच्या अंतीं ' वाल्मीकिप्रभृति स्वबंदिनिकरीं दीना मला वाहिलें ' असें पंत म्हणतात. येथें वाल्मीकीचाच प्रामुख्यानें उल्लेख केला आहे यावरून महाभारतास आरंभ केला त्यावेळीं रामायण नुकतेंच ताजें रचून झालें होतें असें दिसतें. अर्थात् कृष्णविजय अगोदर लिहिला असून रामायणा-नंतर लगेच पंतांनीं भारत हातीं घेतलें हें उघड होतें. आतां येथें संस्कृत मंत्र-रामायणच कशावरून पंतांना अभिप्रेत नसेल अशी शंका कोणी घेतल्यास तिचेंही निराकरण त्याच श्लोकाच्या पुढील चरणावरून होण्याजोगें आहे.

केलें प्राकृत काव्य ईश्वरपदीं धत्तूरसें वाहिलें ।

यावरून ज्या काव्यामुळें वाल्मीकिप्रभृति स्तुतिपाठकांच्या सदरांत पंतांना जागा मिळाली तें काव्य प्राकृतच होतें, संस्कृत नव्हतें असें स्पष्ट दिसतें.

(२) दुसरें प्रमाण रचनाशैली व वृत्तें यांचें होय. या बाबतींत मंत्ररामाय-णाचें कृष्णविजय अ० ८०–९० यांशीं साम्य उघड उघड दिसून येतें.दोघांचेंही वृत्त आर्या असून मधून मधून लांब समास घालून प्रौढ रचना करण्याची प्रवृत्ति दोहोंतही दिसून येते. मंत्ररामायणांत ओजोगुण जरा जास्त दिसून येतो याचें कारण त्यांत वीररसाचें प्राचुर्य आहे हेंच होय. तेव्हां या रचनासाम्यावरून कृष्णविजय अ. ८०–९० व मंत्ररामायण हीं काव्यें एकाच कालखंडांत रचलीं गेलीं व अर्थात्च बाकीचा कृष्णविजय अगोदर रचला गेला हें सिद्ध होतें.

मंत्ररामायणानंतर कृष्णविजय रचला असें पांगारकर म्हणतात. मंत्ररामाय-णांत इतकी सुंदर साधलेली आर्येची भट्टी टाकून देऊन पंत पुनः आर्यागीतिसारखें बोजड वृत्त हातीं घेतील ही कल्पनाच दुःसह वाटते. नानातऱ्हेच्या छंदांचा अनुभव घेऊन पाहून मंत्ररामायणकालीं पंतांची प्रीति सर्वगुणसंपन्न आर्येवर स्थिर

झाली होती व तींत अत्यंत सुंदर व सफाईदार अशी रचना त्यांस साधत चालली होती. ही सफाईची आर्यारचना सोडून पुनः ते कृष्णविजयांतील आर्यागीतीकडे व विविध श्लोकांकडे वळले असें म्हणणें म्हणजे चांगलें चालायला येत असलेला मुलगा पुनः अडखळत, धडपडत चालूं लागला असें म्हणण्यासारखेंच आहे.

(३) तिसरें प्रमाण मंत्रांचें. पंतांच्या वृत्तरचनेविषयीं ज्याप्रमाणें आजपर्यंत बारकाईनें कोणी विचार केला नव्हता त्याप्रमाणेंच त्यांच्या मंत्रांवरून काय अनुमानें निघतात इकडेही पंतकाव्यमर्मज्ञांचें अद्याप लक्ष गेलेलें दिसत नाहीं. पंतांनीं मंत्रांची रचना प्रथम मंत्ररामायणांत केली, हें मंत्रांविषयीं गौरवपूर्ण व अभिमानाचे असे जे त्यांनीं त्या ग्रंथांत सर्वत्र उद्गार काढले आहेत त्यावरून अगदीं स्पष्ट दिसतें. मंत्ररामायणाच्या उपोद्घाताच्या २० आर्यांपैकीं १३ आर्या मंत्रांची समजूत देण्यांत व त्यांचें महत्त्व वर्णन करण्यांत गेल्या आहेत. शिवाय प्रत्येक कांडाच्या अंतीं

मंत्राः षडत्र विज्ञेया बालकांडेऽमृतप्रदाः ।
विलोकनीयाः सततं दोषज्ञैर्दोषवर्जितैः ॥
दिङ्मता संत्यत्र । साधूनां स्वर्वृक्षाः ।

अशा तऱ्हेचे प्रौढीचे व संतुष्टतेचे उद्गार काढले आहेत. लहान मुलाला एखादी नवी चीज गवसली म्हणजे प्रथम प्रथम त्याला जशी त्याची अपूर्वाई वाटते तशी पंतांची येथें स्थिति झाली आहे. मंत्रांच्या हौसेचा अगदीं पहिला भर मंत्ररामायणांत दिसून येतो तो पुढें कमी झाला आहे. तथापि मंत्रांविषयींची त्यांची प्रीति कधींच समूळ नाहींशी झाली नाहीं. मंत्ररामायणानंतर त्यांनीं जीं मोठीं काव्यें लिहिलीं त्यांपैकीं एका हरिवंशाखेरीज इतर सर्वांत त्यांनीं मंत्रांची योजना केली आहे. संस्कृत मंत्ररामायण, महाभारत, मंत्रभागवत हे सर्व ग्रंथ मंत्ररूपी सूत्रानें अनुस्यूत झालेले आहेत. शिवाय बालमंत्ररामायण, रम्यमंत्ररामायण, मंत्रमयभागवत इत्यादि अनेक लहान मंत्रमय काव्यें त्यांनीं लिहिलीं आहेत. तेव्हां मंत्ररामायणापासून हरिवंशाच्या रचनाकालापर्यंत तरी निदान मंत्रांविषयींची प्रीति पंतांच्या हृदयांत जागृत होती. कृष्णविजय जर मंत्ररामायणाच्या नंतर लिहिला असता तर त्यांत कोणत्या तरी मंत्राची योजना पंतांनीं केली असती असें पंतांच्या मनःप्रवृत्तीवरून निश्चयानें म्हणतां येतें. तसें ज्याअर्थीं झालेलें दिसत नाहीं, त्याअर्थीं कृष्णविजय मंत्ररामायणाच्या पूर्वीं म्हणजे मंत्र-

रचनेस सुरवात होण्याच्या पूर्वींच्या काळीं लिहिला असला पाहिजे हें उघड आहे.

(४) मंत्ररामायणांतील आत्मविश्वासाचे व धिटाईचे उद्गारही मंत्ररामायणाचें पश्चात्कालिकत्वच सिद्ध करतात.

१. निजसुखराशि शुकाचा बोल वदे किती मयूर हा शिशु काचा ।कृ.वि १.८.

२. नसे तादृक् चेतोहर गुण जरी साधु तरि या
वरू चूडारत्नीकृतविधुहि जैसा धुतरिया ।

कृ. वि. सज्जनप्रार्थना २.

हे कृष्णविजयामधील नम्रपणाचे उद्गार कोणीकडे व

जसे होती देव प्रमुदित शचीनायकवनीं
तसे सारज्ञाते बुधजन मयूरेशकवनीं । मं. रा. उपसंहार. १२.

हे मंत्ररामायणांतील धिटाईचे व आत्मप्रत्ययाचे उद्गार कोणीकडे !

२१. या १६८८ ते १६९४ च्या कालविभागांत आम्ही आर्याकेकावलि, संशयरत्नावलि, चपक इ० काव्यांचा समावेश केला आहे. या काव्यांविषयीं, विशेषत: आर्याकेकावली विषयीं, रा रामकृष्णपंत पराडकर यांनीं आपल्या 'भक्तमयूरकेकावलि' नामक नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत कांहीं महत्वाचे विचार प्रदर्शित केले आहेत. त्यांचा येथें थोडक्यांत परामर्श घेण्याचें योजिलें आहे. प्रथम **आर्याकेकावलि** या काव्याचें अंत:स्वरूप वाचकांपुढें मांडून त्यावरून पराडकरांनीं काय अनुमानें काढलीं आहेत तीं थोडक्यांत देऊं; व त्यानंतर पराडकरांच्या अनुमानांविषयीं थोडासा साधकबाधक विचार करूं.

आर्याकेकावलि हा शरणागत, अनन्यगतिक भक्तानें अत्यंत करुणस्वरानें केलेला श्रीरामचंद्राचा धांवा आहे. प्रथम भवसागरांत बुडत असलेल्यांचा उद्धार करण्याचा रामचंद्राच्या नेहमींचा परिपाठ वर्णन केला असून 'धांव, समर्था सदया, भवपंकामाजि बुडतसे गाय' अशी त्याची करुणा भाकली आहे. (आर्या १-२३)." रावणानें पीडिलेले देव, त्याचप्रमाणें सुग्रीव, बिभीषण, इत्यादिकांस तूं तारिलेंस (२४-३५) म्हणून तुला मी तापोपशमार्थ शरण आलों आहें; तेव्हां खळांनीं गांजिलेल्या माझें संकट निवारण कर व मला जीवदान दे (३६-५७); क्षुद्र लोकांस नमनें करून मी श्रमी झालों आहें, तर मला तूं कुरवाळून आपल्या जवळ घे; मी अत्यंत दीन हीन आहें, अपराधी आहें, तर माझा उद्धार कर; 'बहु गोड गुण तुझे ते ऐकावे आदरें स्वयें गावे' या वेगळे माझें कांहीं

मनोरथ नाहींत(५७–११३);—याप्रमाणें कवीनें रामाची प्रार्थना केली असून प्रस्तुत काव्याचा हाच भाग करुणरसपूर्ण व हृदयद्रावक आहे. याच भागांत कवीनें स्वतःच्या संकटग्रस्त स्थितीस अनुलक्षून ठिकठिकाणीं उद्गार काढले असून त्यांतील कांहीं महत्त्वाचे उद्गार पुढीलप्रमाणें आहेत.

रक्षोभीतीपासुनि गाधिजमख रक्षिला जसा राया ।
हो सिद्ध तसा संकट मज दीनाचें हि आज साराया ॥ ३४ ॥
अन्याय लेश नसतां गांजिति उद्वृत्त हें तुलाचि कळो ।
किकळोनि सांगतों तुज या दु.खें न मन आमचें विकळो ॥ ४८ ॥
कळिमाजि क्षुद्र नृप प्रजेसि देती धनार्थ बहुताप ।
पापप्रसक्त लोभी न पाहती धर्म माय कीं बाप ॥ ४९ ॥
खळ जे हे सत्पीडक त्यांची तुज काय राघवा ! भीड ? ।
त्वद्दास तव समक्षचि गांजिति येणें कसी न ये चीड ? ॥ ५१ ॥
श्रीरामचंद्र ! राघव ! रघुवीर ! असेंचि आळवीन तुला ।
संकट वारुनि घडवीं माज्या हातूनि या महाक्रतुला ॥ ५४ ॥
प्रमदांत पावुनीयां श्रम दांत क्षुद्र विचकती कीं जे ।
त्यांची तशाच लोकीं सेवा तुजला न जाणतां कींजे ॥ ६५ ॥
दुर्व्यसनी धर्मरहित निरक्षर क्षुद्र त्यांसि मी नमनें ।
करुनि श्रमीच जालों, आलों तुज शरण आज दीनमनें ॥ ६६ ॥

याशिवाय 'परंतु मन आटोपेना रामा ' ५; 'अपराध फार केले,' १०;'गतभय हा शीघ्र करीं ' ३५; 'तुजविण कवणा तापोपशमार्थ रतूं ? ' ३६; ' दास परानें हा अपराधावीण दंडिला राज्या !' ४२; ' बा जीवदान दे, गा ' ४५; ' या संकटाबरोबर वारीं लोकेषणादि अनिवार्य ' ५६; ' आळ निवारुनि मातें कुरवाळीं. ७१;' या परमसंकटीं मज आपद्ग्रस्तासि नको विसरूं ' ८६;' बाधा हरणार एक तूं दक्ष ' ८७; ' मी विकळ जाहलों बहु ' ८८; तनुनिर्वाहापुरता संग धरुनिही' अनर्थ मज घडला ' ९५; हे कवीचे स्वस्थितिसूचक उद्गारही लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. नुसती ' संकट निवारण कर ' अशी विनवणी तर अनेकवार केली आहे.

यानंतर लक्ष्मण, भरत, सीता व मारुति यांना रामापाशीं स्वतःविषयीं रदबदली करण्याची कवीनें विनंती केली असून (आर्या ११४–१२८) त्यापुढें संतांच्या प्रभावाचें छोटेंसें वर्णन केलें आहे (१२८–१३५). अखेरीस पंढरी

पूरच्या पांडुरंगाच्या ध्यानाचें सुंदर, कोटिक्रमयुक्त वर्णन असून काव्यसमाप्ति झाली आहे. (१३६–१७४). हा शेवटला भाग अतिशय प्रसन्न मनानें लिहिलेला दिसत असून तो संकट निवारण झाल्यावर पंढरीस गेल्यावेळीं पांडुरंगासमक्ष लिहिलेला दिसतो.

वादविषयक काव्याचें स्वरूप याप्रमाणें दिग्दर्शित केलें. पंतांनीं अंतःकरणाच्या तळमळीसरशीं स्वतःविषयीं जे उद्गार काढले आहेत ते मुद्दाम विस्तारानें नमूद केले आहेत. आतां पराडकरांनीं यावर तर्क चालवून पंतचरित्रावर काय नवा प्रकाश पाडला आहे तें आपण पाहूं. पराडकरांनीं आपलें म्हणणें विस्कळीतपणानें व संशयात्मक भाषेंत मांडलें आहे. तथापि त्यांच्या म्हणण्यांतील तथ्यांश निश्चित स्वरूपांत खालीलप्रमाणें सांगतां येईल.

१. आर्या केकावलींतील पंतांच्या स्वविषयक उद्गारांवरून पंतांवर त्या वेळीं कांहीं तरी मोठें प्राणहारक संकट आलें होतें; शिवाय तें लौकिकाची हानि करणारें असें असून कोणा तरी क्षुद्र परंतु उच्चपदस्थ व्यक्तीकडून आलेलें होतें.

२. पंतकालीन राजकीय उलाढालींकडे लक्ष दिलें असतां कोल्हापुरच्या राज्यांत पन्हाळगडावरच पंतांवर असला कांहीं तरी कहर गुदरला असणें शक्य आहे.

३. कोल्हापूरचा राजा संभाजी शके १६८२ मध्यें वारला. तेव्हांपासून १६९४ पर्यंत त्याची क्रूर स्त्री जिजाबाई व दासीपुत्र येसाजी यांची अत्यंत अंदाधुंदीची, बालिशपणाची व जुलमाची कारकीर्द चालू होती असें इतिहासांत नमूद आहे या अवकाशांतच केव्हां तरी पंतांवर हें संकट गुदरलें असावें. विशेषतः पंतांनीं लिहून घेतलेल्या ग्रंथांत १६८३ ते १६८७ पर्यंतचा एकही ग्रंथ नाहीं यावरून या सालांच्या दरम्यान तो प्रसंग आला असावा. अर्थात् या कालापर्यंत पंतांचें मुख्य वास्तव्य पन्हाळगडींच असलें पाहिजे.

४. बाबूजी नाइकाचें व कोल्हापूरदरबारचें सख्य नसावें. व 'ज्याचे वडील बाबूजीकडे आहेत तोच हा आपलेकडे नोकरीस असलेला बाबूजीचा गुप्त हेर मोरोबा असा खोटा आळ पंतांवर येऊन त्यांना उपसर्ग पोंचला असावा.' पन्हाळगडावरच्या स्त्रीराज्यांत पंतांना विषप्रयोगही झाला असावा असें अनंत व सदाशिव पाध्ये यांच्या पत्रांतील शरीरास्वास्थ्यसूचक कांहीं शब्दांवरून वाटतें.

५. सदाशिव पाध्ये यांच्या पंतांना आलेल्या एका पत्रावरून त्यांची तीन वर्षें एकमेकांना वार्ता नसावी असें दिसून येतें. या सन्मित्रांना परस्परांची दादसुद्धा

नसल्याचा हा तीन वर्षांचा काल पंतांच्या संकटाचाच असावा. (याशिवाय सदाशिव पाध्यांचीं इतर पत्रें, अनंत पाध्ये व विठोबादादा यांच्या पत्रांतील कांहीं उल्लेख याचाही पंतांच्या संकटाशीं दूरान्वित व संशयित संबंध पराडकरांनीं कल्पनेनें लाविला आहे. पंतांची व सिद्धेश्वरमहाराजांची भेट, पन्हाळगडावरची पराशरऋषीची गुहा वगैरे गोष्टींचाही पंतांच्या संकटाशीं संबंध पोचत असावा अशीही एक शंका प्रदर्शित केली आहे. असा निवळ कल्पनेचा खेळ त्यांनीं बराच मांडला आहे.)

६. या संकटाच्या आंचीनें आर्याकेकावलीच तेवढी निर्माण झाली असें नसून संशयरत्नावलि, साधुसत्कार, चषक, रामनामार्या, वाङ्मनःप्रार्थना, महद्विज्ञापना, गुरुस्तुतिमुक्तांजलि, विठ्ठलस्तुति, पंचवटीरामस्तोत्र वगैरे बरींच प्रकरणें त्याच संकटामुळें निघालेले कवीचे हुंदके असावेत असें वाटतें.

याप्रमाणें पराडकरांच्या विस्कळीत प्रतिपादनाचा कलमवार सारांश आहे. याच्याविषयीं थोडासा साधकबाधक विचार करून हें प्रकरण येथें संपवून टाकूं.

२२. प्रथमतःच हें कबूल केलें पाहिजे, कीं सर्व भगवद्भक्तांस सामान्य अशी जी आर्तता व शरणागति तिच्यामुळेंच केवळ आर्याकेकावलींतील सर्व तळमळीचे उद्गार निघालेले दिसत नाहींत. 'पतित मी पापी शरण आलों तुज । राखीं माझी लाज पांडुरंगा ॥' हा तुकारामबोवांचा उद्गार सर्वसामान्य आर्ततेचा होय. परंतु केकावलींतील वर दाखल केलेले अनेक उद्गार पाहिल्यास ते अशा साधारण आर्ततेचे नसून कांहीं विशिष्ट अशा संकटाचे द्योतक आहेत, हें स्पष्ट दिसतें. कोणीही हें काव्य वाचल्यास ही गोष्ट त्याच्या सहज लक्षांत येण्याजोगी आहे. त्याप्रमाणें पांगारकरांच्या ही गोष्ट लक्षांत आलीही होती. तथापि 'बा, जीवदान दे ! गा ' इ० उद्गारावरून त्यावेळीं पंतांच्या जीवावरचें एकादें दुखणें गेलें होतें कीं काय येवढाच संशय प्रकट करून ते थांबले आहेत. परंतु पराडकरांनीं इतर वारंवार येणाऱ्या उद्गारांना योग्य महत्व देऊन पंतांवर 'क्षुद्र नृप,' 'सत्पीडक खल ' अशांचा रोष होऊन त्यांजवर कांहीं तरी भयंकर आळ आलेला होता अशी मुख्य कल्पना केली आहे. व 'जीवदान देगा ' इ. शरीरबाधादर्शक उद्गारांची संगति लावण्यासाठीं विषप्रयोगाची कल्पना लढवून तिची मुख्य कल्पनेला पुस्ती जोडली आहे.

पराडकरांनीं एकादा आधार किंवा पुरावा नवीन शोधून काढून त्याच्या जोरावर आपलें म्हणणें सिद्ध केलें आहे असें नसून केवळ तर्कांच्या जोरावर आर्या-

केकावलींतील संकटाचा करवीर दरबारच्या राजकीय स्थितीशीं संबंध जोडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न करण्याच्या भरांत कित्येक अगदीं असंभाव्य तर्क त्यांनीं केले आहेत.

आर्याकेकावलींतील संकट करवीरदरबारची त्यावेळची राजधानी पन्हाळा येथें येसाजीच्या जुलमी कारकीर्दींतच पंतांवर आलेलें असणें शक्य आहे, येवढ्या-पुरतें पराडकरांचें म्हणणें कांहींसें सयुक्तिक दिसतें. कारण दुसऱ्या कोणत्याही दिशेनें त्यांजवर तशा तऱ्हेचें संकट येण्याची शक्यता दिसत नाहीं. शिवाय हें संकट पूर्ववयांत आलेलें असल्यामुळें तें पन्हाळगडीं आलें असल्याची शक्यता कबूल करणें भाग आहे. हेंच संकट उत्तर वयांत म्ह० भारतरचनाप्रारंभानंतर आलेलें असतें तर तें पन्हाळगडीं गुदरलें असण्याची मुळींच शक्यता नाहीं असें म्हणतां आलें असतें. अस्तु; तेव्हां त्यांच्या म्हणण्यांत येवढाच काय तो मान्य करण्याजोगा भाग आहे. तें संकट कां आलें, कोणाकडून आलें व त्याचें स्वरूप काय होतें याविषयीं त्यांनीं केलेल्या कल्पना निराधार आहेत.

मोरोपंत बाबूजीचा हेर असावा अशा संशयानें पंतांवर कांहींतरी तोहमत गुदरली असावी ही पराडकरांची कल्पना अगदीं पोकळ आहे. अगोदर बाबूजी नाइकाचें व कोल्हापूरदरबारचें वांकडें होतें ही गोष्ट त्यांस मुळींच सिद्ध करतां आलेली नाहीं. व पंतांसारख्या बाळपणापासून पन्हाळ्यासच असलेल्या, सच्चरित्र, भगवद्भक्तींत व विद्याभ्यासांत पूर्णपणें रंगलेल्या, मनुष्यावर असा राजकारणी गुन्ह्याचा आळ येईल ही गोष्ट कोणासच पटण्याजोगी नाहीं. येसाजीच्या कुण-बिणींकडून त्यांस विषप्रयोग झाला असावा हा तर्क तर अगदींच विलक्षण आहे. पंतांची प्रकृति बिघडली असल्याचे उल्लेख कांहीं पत्रांतून आहेत हें खरें आहे. परंतु तीं पत्रें पंत बारामतीस असल्यावेळचीं आहेत व त्यांस विषप्रयोगाचा नुसता वासही येण्याजोगा नाहीं.

आतां पराडकरांच्या मुख्य कल्पनेस देखील विरुद्ध जाणाऱ्या कांहीं गोष्टींचा उल्लेख करूं.—१. पंतांवर आलेलें संकट पन्हाळगडीं ते कारकुनी करीत असतां १६८३ ते १६८७ च्या दरम्यान आलें असावें अशी त्यांची कल्पना आहे. पंत कारकुनी करीत होते हीही एक बिन बुडाची दंतकथाच आहे व ती पराड-करांनीं पांगारकरांपासून स्वीकारली आहे. असो. १६८०, ८२ व ८३ सालीं बारामतीस पंतांनीं ग्रंथ लिहून घेतल्याचा उल्लेख आहे यावरून या वर्षांमध्यें बरेच

दिवस ते बारामतीस राहण्यास येत असत असें दिसतें. अशा रीतीनें दरसाल कित्येक महिने परगांवीं जाऊन राहणारा हा कारकून मोठा तालेवारच म्हटला पाहिजे ! पन्हाळगडावर पंतांना वतन नव्हतें, राजदरबारीं वशिला नव्हता, कांहीं नव्हतें. अशा स्थितींत सामान्य कारकुनाचा असला तालेवारपणा चालणें अशक्य होय. बरें कारकुनी न करतां ते नुसते पन्हाळ्यास होते असें म्हटलें तर त्यांस तेथें दुसरा आधार कसला होता व त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था काय होती याचा उलगडा मुळींच होत नाहीं.

२. निदान १६८० पासून तरी पंतांचा बारामतीशीं संबंध येऊं लागला होता ही गोष्ट सिद्ध आहे. बारामतीशीं जितका संबंध अधिक तितका पन्हाळगडाशीं संबंध कमी होत गेला असला पाहिजे. अशा स्थितींत कांहीं भयंकर संकट पन्हाळगडीं त्यांच्यावर १६८३ नंतर येणें असंभवनीय वाटतें.

३. पराडकरांच्या म्हणण्याप्रमाणें सुमारें १६८५ पर्यंत पंतांचें पन्हाळगडीं वास्तव्य होतें. याप्रमाणें निम्यापेक्षां अधिक आयुष्य, व जाणतेपणींचीं १२–१५ वर्षें ज्या ठिकाणीं घालवलीं व कित्येक काव्येंही जेथें रचलीं तेथलि त्यांच्या परिचित मंडळींपैकीं एकायाचाही उल्लेख त्यांच्या काव्यांत कोठें आढळूं नये हा चमत्कार नव्हे काय ? पन्हाळगडावरील व्यक्तींपैकीं फक्त केशव, गणेश व सदाशिव पाध्ये यांचा उल्लेख सांपडतो. परंतु या तिघांशींही त्यांचा परिचय विद्यार्थिदशेंतच झालेला होता. विद्यार्थिदशेंत ते पन्हाळगडीं होते व पाध्यांपाशीं विद्या शिकले हें सर्वसंमतच आहे. पण विद्यार्थिदशेनंतरचीं १२ वर्षें देखील जर त्यांनीं पन्हाळ्यास काढलीं होतीं तर त्या कालांतील कांहीं परिचित मंडळींचा, इतर शेंकडों व्यक्तींचा आपल्या काव्यांत उल्लेख करणाऱ्या पंतांच्या काव्यसमूहांत कोठें तरी उल्लेख सांपडावयास पाहिजे होता. त्याचप्रमाणें अर्थाअर्थी कांहीं संबंध नसलेल्या अनेक व्यक्तींचा उल्लेख करणाऱ्या पंतांनीं येवढें प्राणहारक संकट ज्यांनीं आणलें त्या येसाजीप्रभृति करवीर दरबारच्या मंडळींचा आपल्या काव्यसमूहांत किंवा पत्रव्यवहारांत कोठेंही चुकूनसुद्धां उल्लेख केलेला आढळूं नये ही गोष्ट अगदीं चमत्कारिक दिसते व पराडकरांच्या तर्कांची इमारत बरीच डळमळीत करते.

पंतांवर आलेलें संकट कोठेंही, केव्हांही आलेलें असो तें अल्पकालिक होतें; त्याच्यामुळें त्यांच्या निरंतर चाललेल्या काव्यरचनेंत एकाद दुसऱ्या वर्षापेक्षां जास्त खंड पडला असण्याची शक्यता दिसत नाहीं. आम्ही निर्दिष्ट केलेले काव्यांचे

रचनाकाल बहुधा अंतःप्रमाणावरून स्वतंत्र रीतीनें ठरविले असल्यामुळें खुद्द आर्याकेकावलीखेरीज इतर महत्त्वाच्या काव्यांच्या रचनाकालावर या सर्व भानगडींचा कांहींच परिणाम होण्यासारखा नाहीं. खुद्द आर्याकेकावलीच्या रचनाकालासंबंधानें देखील पराडकर नक्की असें कांहींच म्हणत नाहींत. तथापि पंतांवरचें संकट १६८३ ते १६८७ च्या दरम्यान आलें असावें, अर्थात् आर्याकेकावलीची रचनाही याच अवधीच्या दरम्यान झाली असावी, असें त्यांचें म्हणणें दिसतें. परंतु जिजाबाई व येसाजी यांची कारकीर्द १६८२ पासून १६९४ पर्यंत चालू होती असें पराडकरांनीं दाखविलें आहे. व १६९४ नंतरही जिजाबाई मरण पावली तरी येसाजीचा कारभार चालू होताच. तेव्हां पंतांवर संकट करवीर दरबारकडून आलें असें मानावयाचेंच झालें तर तें १६९४ पर्यंत केव्हांही आलें असें मानलें तरी चालण्याजोगें आहे. १६८७ पूर्वीच तें आलें असलें पाहिजे, नंतर येणें शक्य नाहीं अशी मर्यादा घालण्याजोगा पुरावा कांहींच उपलब्ध नाहीं. पंतांचे बारामतीचे आश्रयदाते बाबूजी नाईक यांचा उल्लेख १६९४ नंतर आरंभिलेल्या महाभारतांतच सांपडतो, अगोदरच्या काव्यांत सांपडत नाहीं. पंतांना बाबूजी नाइकानें बारामतीस दिलेल्या घराचें दानपत्र देखील १६९९ चें आहे. तेव्हां १६८८ ते १६९४ या अवधीमध्यें पंतांची पन्हाळ्यास येजा होती व या अवधींतच पंतांवर उपर्युक्त संकट आलें असें कोणी मानू लागल्यास त्यास प्रतिबंधक असा बिनतोड पुरावा कांहींच नाहीं. तेव्हां पराडकरांची संकटाची कल्पना मान्य करूनही तें संकट १६८८ ते १६९४ च्या दरम्यान आलें असावें, अर्थात् आर्याकेकावलि याच काळांत रचली गेली असावी असें मानल्यास आम्ही जो आर्याकेकावलीचा रचनाकाल ठरविला आहे त्यास मुळींच बाध येत नाहीं. तात्पर्य, इतर प्रमाणांवरून ठरविलेल्या रचनाकालास पराडकरांचे तर्क मुळींच बंधनकारक होऊं शकत नाहींत. पंतांवर संकट आलें होतें व तें करवीर दरबारकडून आलें होतें येवढे त्यांचे दोन मुद्यांचे तर्क आहेत. मग तें संकट तुम्ही १६९४ पर्यंतच्या पंतांच्या आयुष्यांत कोठेंही बसवा. आर्याकेकावलींतील आर्तता ही केवळ तरुण व एकाद्या संकटानें बावरून गेलेल्या मनुष्याची आर्तता दिसत नाहीं. संसारांतले बरेचसे वाईटसाईट अनुभव घेऊन त्रस्त झालेल्या पोक्त मनुष्याचा अंतःकरणाच्या तळापासून निघालेला तो आर्तोद्गार आहे व या दृष्टीनेंच १६८८ ते १६९४ हा जो त्याच्या रचनेचा काल आम्हीं ठरविला आहे तोच सयुक्तिक दिसतो.

पराडकरांचा खरा विरोध, वडिलांना भेटून १२ वर्षें होत आलीं म्हणून १६७५ सालीं पंत पन्हाळ्याहून बारामतीस निघून आले व नंतर कायमचे बारामतींतच राहिले,–या पांगारकरांच्या कल्पनेस आहे. १६७५ नंतर कित्येक वर्षें पंतांचें मुख्य वास्तव्य पन्हाळ्यासच होतें व तेथेंच त्यांच्यावर प्राणघातक संकट गुदरलें असें पराडकरांचें प्रतिपादन आहे. अर्थात् दोघांमधील विरोध कालासंबंधीं नसून मुख्यतः वास्तव्यस्थलासंबंधीं आहे. तेव्हां आम्ही स्वतंत्रपणें ठरविलेल्या काव्यांच्या रचनाकालावर या वादाचा कांहीं परिणाम होण्याचें कारण दिसत नाहीं. पराडकरांचें म्हणणें खरें ठरल्यास, १६८० पासून १६८५ पर्यंत पंतांनीं लिहिलेले ग्रंथ सामान्यतः बारामतीस लिहिले गेले असें सध्या मानलें जातें, ते पन्हाळगडावर लिहिले गेले असें मानावें लागेल येवढेंच काय तें. पंतांवर आलेलें संकट त्यांच्या ग्रंथकर्तृत्वाच्या दृष्टीनें तितकेंसें महत्त्वाचें नसून खासगी आयुष्यक्रमाच्या दृष्टीनेंच महत्त्वाचें आहे. त्या संकटामुळें त्यांच्या खासगी आयुष्यांत क्रांति झाली असेल परंतु त्यांच्या ग्रंथकर्तृत्वाचा जो स्वाभाविक विकास होत होता त्याच्यावर या संकटाचा फार मोठा परिणाम झाला असेल असें मुळींच मानतां येत नाहीं. या संकटामुळें पंतांच्या वृत्तींत एकदम पालट झाला, त्यांची प्रापंचिक वृत्ति बदलून ती एकदम वैराग्ययुक्त व परमार्थप्रवण बनली असा जो पराडकरांच्या लिहिण्याचा रोख आहे तोही बरोबर दिसत नाहीं. त्यांची वृत्ति अगदीं लहानपणापासूनच 'हरिपादयुगस्मरणप्रवण' बनलेली होती हें त्यांच्या ब्रह्मोत्तरखंड, प्रह्लादविजय, कृष्णविजय इ० प्रारंभींच्या काव्यांतील उद्गारांवरून स्पष्ट दिसतें. एकनाथांप्रमाणेंच ते जन्मतःच शुद्ध बुद्धीचे. पुण्यसंस्कारवान् भाविक होते. संकटांचे ठक्केटोणपे खाऊन मग अंगीं बाणलेलें त्यांचें वैराग्य नव्हतें. असो. ही गोष्ट उघड असून वाटेल तितक्या प्रमाणांनीं सिद्ध करतां येण्याजोगी आहे.

प्रह्लादविजय इ. सन १७५९ सालीं पंतांनीं लिहिला; पुढे त्याच वृत्तांतला कृष्णविजय लिहिण्यास घेऊन तो इ० स. १७६३ सालीं संपविला; कृष्णकथा नुकत्याच लिहिल्या असा उल्लेख असलेलें नामरसायनही इ० स० १७६३ (शके १६८५) सालीं लिहिलें;–अशी अनुमानपरंपरा बसवून काव्यसंग्रहकारांनीं नामरसायनाचा काळ १६८५ हा ठरविला आहे. ही अनुमानपरंपरा व हा काळ कसा चुकीचा आहे हें आमच्या आतांपर्यंतच्या प्रतिपादनावरून लक्षांत येईलच.

२३. याप्रमाणे १६८८ ते १६९४ पर्यंतच्या पंतांच्या रचनेचा विचार झाला–

या कालांत त्यांची सर्व रचना आर्यावृत्तांत झाली असून कृष्णविजय अ० ८०–९०, मंत्ररामायण, संशयरत्नावलि, साधुसत्कार, आर्याकेकावलि, नामसुधाचषक, नामार्या, आर्यामुक्तामाला, नामरसायन, मारुतिस्तुति, प्रश्नोत्तरमाला, सन्मनोरथराजि ही त्यांची या कालांतली मुख्य रचना होय. आणखी नारदाभ्युदय, भीष्मभक्तिभाग्य, अवतारमाला, गीतार्या हीं प्रकरणेंही याच सुमारास पंतांनीं लिहिलीं असावीं असें त्यांच्या रचनासरणीवरून वाटतें. रुक्मिणीगीत, सीतागीत व सावित्रीगीत हीं तीन अभंगांत रचलेलीं गोड गीतें या काळाच्या प्रारंभींच रचलेलीं असावीं. हीं तीन्ही गीतें साधारणपणें एकाच कालीं रचलेलीं आहेत व तीं मुलींबाळींकरितां, त्यांनीं म्हणावयाच्या ओव्यांच्या चालीवरच रचलीं आहेत. तथापि तीं ग्रंथकर्तृत्वाच्या पहिल्या भरांत रचलीं असावीं असें पांगारकरांनीं म्हटलें आहे तें बरोबर दिसत नाहीं. या गीतांची रचना अत्यंत गोड, सुललित व प्रेमळ झाली असून पंतांचें कौशल्य येथें बरेंच परिपक्क झालेलें दृष्टीस पडतें. यांच्यापैकीं रुक्मिणीगीतांतीलच वर्णन वाढवून पंतांनीं कृष्णविजयाचा ८३ वा अध्याय लिहिला आहे. तेव्हां प्रस्तुतच्या कालांतच पण कृष्णविजयाचे अ० ८०–९० लिहिण्याच्या पूर्वीं हीं गीतें लिहिलीं गेलीं असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

२४ नामरसायनांत ज्यांचा उल्लेख नाहीं अशीं भीष्मभक्तिभाग्य इत्यादि अनेक आर्यावृत्तांतील प्रकरणें सामान्यतः रचनेच्या धाटणीवरून आम्ही या काळांत समाविष्ट केलीं आहेत हें वरील नामावळी पाहिली असतां सहज दिसून येईल. तथापि या यादींतील एक दोन काव्यांचा इतर ठिकाणींही थोडाबहुत सुगावा लागतो व त्यावरून आम्ही ठरविलेल्या या रचनाकालासच बळकटी येते. यापैकीं पहिलें काव्य म्हणजे पंतांच्या नियमक **गीतार्या** होत. या गीतार्यांचा उल्लेख इतर कांहीं काव्यांबरोबर पंतांनीं विठोबादादांना पाठविलेल्या एका पत्रांत आला आहे. तो येणेंप्रमाणें:--‘ आपणास दशमपूर्वार्ध व गीतार्या पाठविल्या आहेत. भक्तिचंद्रिका पुस्तक श्रीमत्सकलवेदशास्त्रसंपन्न रा. बाबापाध्याय यांस पावतें करावें. श्रीद्रोणपर्व जयद्रथवधांत झालें. रात्रियुद्धाचा आरंभ आहे. आपल्या पुण्याशीर्वादें सिद्धीस गेल्यावर आधीं आपणाकडेच पाठवीन. मुक्तामाला तेथें बाबाजवळ असेल, केवळ गीर्वाणभाषाच आहे. ’ या पत्रावर कालनिर्णायक अशी कांहीं मिति नाहीं, तथापि द्रोणपर्व जयद्रथवधांत झालें असल्याचा यांत उल्लेख आहे. श्री. शिवरामपंत परांजपे

यांनीं निर्विवादपणें ठरविलेल्या महाभारताच्या रचनाकालास अनुसरून गणना केली असतां द्रोणपर्वाची रचना शके १७००-०१ च्या सुमारास झाली असावी असें निष्पन्न होतें. अर्थात् गतिार्या याच्या पूर्वीच रचून झाल्या होत्या हें उघड आहे. पंतांनीं भीष्मपर्व लिहितांना भगवद्गीता अजीबात गाळली आहे. त्यांनीं गीतेवर अगोदरच आर्या लिहिल्या असल्यामुळें भारतांत पुन: गीतेचा अनुवाद करून पुनरुक्ति केली नाहीं. असा यावरून तर्क बांधल्यास भीष्मपर्वाच्याही पूर्वी गीतार्यांचा काळ जाईल. एकंदरीनें महाभारताच्या नगारघाईच्या अगोदर म्हणजे १६९४ च्या पूर्वींच गीतार्या रचल्या असव्या असें मानणें सर्वांत सयुक्तिक दिसतें. पांगारकरांनीं मात्र गीतार्यांच्या बाबतींत फार विलक्षण प्रकार केला आहे. पंतांनीं त्या शेवटीं शेवटीं रचल्या असें ठरवून अगदीं शेवटच्या प्रकरणांत केकावलीबरोबर त्यांची चर्चा केली आहे. (मो. च. पृ. ४९९); भारतरचनाकालीं विठोबादादास लिहिलेल्या पंतांच्या स्वदस्तूरच्या पत्रांत गीतार्यांचा उल्लेख असून व तें पत्र खुद्द पांगारकरांनीं आपल्या मोरोपंतचरित्रांत (पृ. १२९) उद्धृत केलेलें असून, त्यांनींच कांहीं एक कारण न दाखवतां गीतार्यांस वीस बावीस वर्षें पुढें लोटावें ही अत्यंत आश्चर्याची गोष्ट होय ! ‘ गीतेच्या भाषांतराचे पहिले सहा अध्याय मात्र पंतानें लिहिले; बाकीचे बारा अध्याय त्याचा पुतण्या आपा पराडकर म्हणून ब्रह्मावर्ती रहात होता त्यानें केले. ’ अशी एक आख्यायिका या गीतार्याविषयीं हंसांनीं नमूद केली आहे. (हंसकृत मोरोपंतांवरील निबंध. पृ. १०.) ती खरी असावी असें दिसत नाहीं. विठोबादादास लिहिलेल्या पत्रांत गीतार्यांचा उल्लेख केला आहे त्यावरून त्या वेळीं तो ग्रंथ संपूर्ण अस्तित्वांत असावा असें दिसतें. शिवाय १६९४ च्या अगोदर लिहिलेलें काव्य पुढें २० वर्षें हयात असतां पंत विनाकारण अपुरें ठेवतील असें मानतां येत नाहीं.

२९ ज्याच्या कालाविषयीं कांहीं सुगावा लागतो असें दुसरें काव्य म्हणजे भीष्मभक्तिभाग्य हें होय. याच्यासंबंधानें पुढील आख्यायिका हंसकृत निबंधांत (पृ. ७) नमूद केली आहे. ‘ एके समयीं भीष्माष्टमीचे सुमारास मोरोपंत नाशकास गेला होता तेथें श्री. नानासाहेब पेशवे यांची पत्नी व माधवराव बल्लाळ यांची मातोश्री गोपिकाबाई ही रहात होती. तिनें भीष्मभक्तीवर काव्य लिहिण्यास सांगितल्यावरून पंतानें भीष्मभक्तिभाग्य म्हणून एक प्रकरण भागवतांतील प्रथम

स्कंधाचे आठवे (?) अध्यायाचे आधारें रचून त्याचे शेवटीं असा लेख लिहिला आहे:—

> या प्रासूत स्वयं गौरी कीर्तिं मेनेव सन्नुताम् ।
> या सद्व्रतनसंतश्रीः कल्पवल्लीव यार्थिनाम् ॥
> यस्याः स्नुषा रत्नगर्भा सपत्नी चामरावती ।
> तस्याः श्रीगोपिकादेव्याः किमपीदं कृते कृतम् ॥ '

हे दोन श्लोक भीष्मभक्तिभाग्याच्या आजपर्यंत छापलेल्या सर्व प्रतींत आढळतात. अर्थात् हा प्रत्यक्ष पंतांच्या हातच्याच श्लोकांचा आधार असल्यामुळें वर दिलेली हंसांच्या निबंधांतील आख्यायिकाही मुख्य मुद्याच्या गोष्टीपुरती खरी असावी असें वाटतें. म्हणजे गोपिकाबाईच्या सूचनेवरून हें काव्य पंतांनीं लिहिलें असावें ही गोष्ट खरी दिसते. या श्लोकांत नानासाहेब स्वर्गवासी झाले असल्याचें सूचित केलें आहे. त्यावरून नानासाहेबांच्या मृत्यूनंतर रावसाहेबांच्या कारकीर्दीत हें काव्य रचिलें असावें असें दिसतें. गोपिकाबाई शके १६९० सालीं नाशिकास जाऊन राहिल्या व रावसाहेब कार्तिक शु॥ ११ शके १६९४ रोजीं वारले. तेव्हां गोपिकाबाई नाशकास असतां पंतांनीं त्यांच्याकरितां हें काव्य लिहिलें ही आख्यायिका लक्षांत घेतली म्हणजे १६९० ते १६९४ पर्यंत केव्हांतरी हें काव्य लिहिलें असलें पाहिजे असें निष्पन्न होतें. आम्ही वर भीष्मभक्तिभाग्य ज्या कालखंडांत घातलें आहे त्याच्याशीं हा काल तंतोतंत जुळतो हें तेव्हांच दिसून येईल.

परंतु पांगारकरांनीं या आख्यायिकेच्या सत्यतेविषयीं व वरील संस्कृत श्लोकांच्या प्रामाण्याविषयीं हरकत उपस्थित केली आहे. ' प्रस्तुत काव्यांची मूळ पंतलिखित प्रत मला सापडली आहे त्या प्रतींत हे दोन श्लोक नाहींत. तेव्हां ते प्रमाण मानतां येत नाहींत' असें त्यांचें म्हणणें आहे. ' छापील प्रतींतील पहिला श्लोक – यस्याः स्नुषा इ०—या श्लोकावरून प्रस्तुत काव्य पंतांनीं गोपिकाबाईच्या सांगण्यावरून शके १६८२–१६९४ च्या दरम्यान केव्हां तरी रचिलें होतें असें काव्येतिहाससंग्रह व काव्यसंग्रह या उभय मासिकांच्या संपादकांनीं लिहिलें आहे, पण पंतलिखित प्रतींत हे दोन्ही श्लोक नाहींत. ' (मो. च. ३८६). आतां येवढ्याशा मजकुरांत पांगारकरांचें शैथिल्य कसें प्रकट झालें आहे तें पहा. 'यस्याः स्नुषा रत्नगर्भा' हा श्लोक पहिला नसून दुसरा आहे. खुद्द पांगारकरांनीं

तो श्लोक आपल्या पुस्तकांत उतरतांना त्याच्यापुढें २ चा आकडा लिहिला आहे; तरी त्याला ते पहिला श्लोक समजत आहेत! पुढें, १६८२-१६९४ च्या दरम्यान हें काव्य लिहिलें असें काव्यसंग्रहकारांनीं म्हटलें नसतांना त्यांच्या माथ्यावर तें विधान बळेंच लादलें आहे! काव्यसंग्रहकारांनीं वस्तुत: आमच्याप्रमाणेंच, म्हणजे, 'हें काव्य इ स. १७६८-१७७० (शके १६९०-१६९२) या सालांच्या दरम्यान रचिलें असावें' असें मत प्रकट केलें आहे. असो. यानंतर मुख्य गोष्ट ह्मणजे उपर्युक्त दोन संस्कृत श्लोकांसंबंधाची. हे श्लोक पांगारकरांस मिळालल्या पंतलिखित प्रतींत नाहींत हें खरें तथापि पंतांनीं आपल्या काव्याची तेवढी एकच प्रत तयार केली होती असें जोंपर्यंत नक्की कोणास सांगता येत नाहीं तोंपर्यंत ते श्लोक प्रक्षिप्त किंवा अप्रमाण म्हणून टाकून देणें धाष्ट्याचें होणार आहे. वाचकांच्या सोयीकरितां पंत केव्हां केव्हां आपल्या काव्यांच्या एकाहून अधिक प्रती तयार करीत असत असें म्हणण्यास पुष्कळ जागा आहे. विशेषतः भीष्मभक्तिभाग्य काव्य गोपिकाबाईकडे पाठवून देतांना त्यांत हे दोन श्लोक रचून घातले असतील व इतर इष्टमित्रांकडे तेंच काव्य पाठवितांना त्यांतून हे श्लोक गाळले गेले असतील असें होणें अगदीं संभवनीय आहे. पंतांनीं हे श्लोक लिहिले नाहींत तर ते येथें आले तरी कसे याची उपपत्ति कांहींच लागत नाहीं. जे श्लोक खरोखर प्रक्षिप्त असतात ते कोणी कसे घुसडून दिले याची उपपत्ति चटकन लावतां येते. पतिपुत्रहीन व राजैश्वर्यहीन झालेल्या गोपिकाबाईसाठीं मागाहून हे श्लोक कोणी तरी करून घातले असतील असें क्षणभरही मानतां येत नाहीं. तेव्हां सर्व बाजूंनीं विचार करतां आजपर्यंत सर्वत्र छापले गेलेले हे श्लोक पंतांचेच असावे व त्यांनीं हें काव्य गोपिकाबाईकरितां १६९० ते १६९३ च्या दरम्यान लिहिलें असावें असें मानणें सयुक्तिक दिसतें. अर्थात् गोपिकाबाई निमित्तमात्र झाली असली तरी मूळ स्फूर्ति पंतांचीच होती व तिच्याच हृद्य विलासामुळें हें काव्य इतकें अप्रतिम झालें आहे हें उघड आहे.

गोपिकाबाईचा प्रत्यक्ष केलेला नामनिर्देश पांगारकरांना अप्रमाण वाटत आहे; पण जेथें सर्वसामान्य भगवद्भक्तांस उद्देशून उल्लेख आहे तेथें कोणा तरी विशिष्ट व्यक्तीची सावली पडलेली असावी असा त्यांस भास होत आहे! "शिवाय सदर काव्य रचायलाही कोणी संतानें पंतांना सुचविलें होतें असें 'भगवद्भक्तानुज्ञा कीं गाव्या सत्कथा यथामति तें, स्वीकारिलें स्वहित म्यां' या पंतोक्तीवरूनच

स्पष्ट दिसतें" (मो. च. पृ. ३८६) असें ते म्हणतात. परंतु सामान्य भगवद्भक्तांना उद्देशून पंतांनीं वारंवार काढलेले उद्गार कोणा तरी विशिष्ट व्यक्तीस अनुलक्षून केलेले आहेत असें मानण्यांत पांगारकरप्रभृतींची कशी चूक होत आहे याचें विवेचन मागेंच केलें असल्यामुळें त्याविषयीं आतां येथें कांहीं लिहिण्याची जरूरी नाहीं.

[४]

२६. शके १६९४ पर्यंतच्या पंतांच्या काव्यरचनेचा विचार झाला. यानंतरचा १६९४ ते १७०३ हा दहा वर्षांचा काल म्हणजे महाभारत रचनेचा काल होय. यापूर्वींच्या १६८८-१६९४ या सहा सात वर्षांच्या कालांत आर्यावृत्तांत पुष्कळ रचना करून तें वृत्त पंतांनीं चांगलें घटवून तयार केलें होतें. प्रतिभेचा उल्लासही कृष्णविजय अ. ८०-९० व मंत्ररामायण यांत उत्कृष्ट रीतीनें दिसून आला होता. तेव्हां आपली पूर्वतयारी चांगली झाली आहे असें वाटून त्यांनीं पुढें महाभारताचें अवाढव्य काम हातीं घेतलें. महाभारतरचनेचा काल १६९३ ते १७०३ हा पांगारकरांनीं सांगितला आहे तो बहुतांशीं योग्य दिसतो (मो. च. प्रस्तावना. ३४). तथापि याही बाबतींत त्यांनीं थोडीशी धरसोड केली आहेच. उपरिनिर्दिष्ट स्थळीं १६९३-१७०३ हा रचनाकाल सांगून पुढें एके ठिकाणीं 'मोरोपंतांचें भारत इ. स. १७७०-१७८० (शके १६९२-१७०२) पर्यंत झालें असावें असें मी अन्य प्रसंगीं दाखविलेंच आहे' असें ते म्हणतात. यांत फारशी विसंगति दिसून येत नाहीं, परंतु पुढें पृ. १८९ वर 'पंतांनीं......महाभारत ग्रंथ ७।८ वर्षांत रचला' असेंही तेच म्हणतात! असो. सर्व बाबींचा सांगोपांग विचार करून १६९४ च्या चातुर्मास्यांत महाभारतास आरंभ करून १७०४ च्या चातुर्मास्यांत पंतांनीं तें संपविलें असावें असें श्री. शिवराम महादेव परांजपे यांनीं ठरविलें असल्याकारणानें या बाबतींत आतां लिहिण्यासारखें कांहीं राहिलें नाहीं.

त्याचप्रमाणें महाभारतांतील कर्णपर्व हेंच तेवढें पंतांनीं स्वतंत्र काव्यरूपानें अगोदर लिहिलें होतें व तें लोकांस आवडल्यामुळें मग प्रारंभापासून भारत लिहिण्यास पंतांनीं सुरवात केली असें जें विचित्र मत काव्येतिहाससंग्रहकारांनीं प्रचलित केलें होतें व काव्यसंग्रहकारांनीं पुष्कळसे आधार वगैरे दाखवून पुष्ट केलें होतें त्याचेंही समर्पक खंडन परांजपे यांनीं कायमचें करून टाकलें असल्यामुळें त्या

वादावर आतां कांहीं लिहिण्याची जरूरी राहिली नाहीं.पराडकरांच्या आवृत्तींतील आर्याभारताला परांजप्यांनीं लिहिलेला उपोद्घात फार सुंदर व मार्मिक असून उपर्युक्त दोन तीन बाबींचा त्यांत कायमचा निकाल लावला असल्याकारणानें तो महत्त्वाचा झाला आहे.

२७. महाभारतरचनाकालांत पंतांनीं इतर कविता फारशी लिहिली असावी असें वाटत नाहीं. महाभारतकालीन पत्रव्यवहारामध्यें गीतार्या, अमृतपान या काव्यांचा उल्लेख सांपडतो. यावरून भागवती प्रकरणांपैकीं कांहीं प्रकरणें व इतर कांहीं स्फुट प्रकरणें महाभारत रचीत असतांनाही लिहिलीं गेलीं असतील. अमृतमथन व वामनचरित हीं दोन उत्कृष्ट काव्यें जुळीं भावंडें आहेत. तीं एकाच काळीं लिहिलीं गेलीं असलीं पाहिजेत. या दोन्ही काव्यांच्या पोथ्या अगदीं एकसारख्या आहेत व त्यांतील पंतांचें अक्षर देखील अगदीं सारखें आहे यावरूनही त्यांचें एककालीनत्वच सिद्ध होतें. अमृतमथनाचा प्रसंग भारतांतही आदिपर्वांत वर्णन केला आहे. तेव्हां भारतांतील हे प्रसंग वर्णन करीत असतांना भागवतांतील याच प्रसंगांवरही आपण आख्यानें लिहावीं अशी बुद्धि पंतांना झाली असणें अगदींच असंभवनीय नाहीं. कसेंही असलें तरी मंत्रभागवत लिहिण्याच्या पूर्वीं हीं सर्व भागवती आख्यानें लिहून झालीं होतीं याविषयीं संशय रहात नाहीं. कारण बहुतेक ठिकाणीं या आख्यानांचेच तेवढे नेमके विषय मंत्रभागवतांत अजीबात गाळलेले किंवा अगदीं त्रोटक पणें वर्णिलेले आहेत. भक्तभूषणादि श्लोकबद्ध आख्यानें १६८२–१६८८ या काळांत लिहिलीं असावींत असें मागें निर्दिष्ट केलेंच आहे. ध्रुवचरितादि साकीबद्ध आख्यानें मात्र मंत्रभागवत लिहीत असतांना किंवा त्याच्याही नंतर लिहिलीं असावींत असें त्यांच्या रचनाशैलीवरून व मंत्रभागवतांतील संक्षेपविस्तारावर त्यांचा परिणाम झालेला दिसत नाहीं यावरून वाटतें. महाभारत अगदीं संपत आल्यावर म्हणजे १७०३–०४ सालीं भागवताकडे लक्ष वळवून पंतांनीं मंत्रभागवताच्या दशमस्कंधास आरंभ केला असण्याचा थोडासा संभव आहे. या विषयीं विशेष विवेचन पुढें येईलच.

[५]

२८. आतां पंतांच्या महाभारतोत्तरकालीन रचनेविषयीं विचार करावयाचा. शके १७०४ पासून पंतांच्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत, म्ह. १७१६ पर्यंतचा हा

काल होय. या कालांतील मुख्य रचना म्हणजे मंत्रभागवत, हरिवंश, संकीर्ण रामायणें हे मोठे ग्रंथ व मंत्रमय भागवत, मंत्रमय रामायण, कांहीं संतस्तवनपर प्रकरणें, देवांचीं स्तोत्रें, साकीबद्ध आख्यानें, काशीयात्रा प्रकरणें, श्लोककेकावलि, वगैरे स्फुट काव्यें, हीं होय. संकीर्ण रामायणें हें नांव, पंतांनीं अष्टोत्तरशत रामायणें रचण्याचा संकल्प केल्यानंतर जीं रामायणें रचलीं आणि जीं एकाच पोथींत एका पाठोपाठ एक अशा रीतीनें लिहून ठेवलेलीं आहेत त्या सर्व रामायणांना उद्देशून येथें योजिलें आहे. पराडकरी प्रतींतील सात व आठ या खंडांत जीं रामायणें छापलेलीं आहेत त्यांपैकीं १४ व्या मत्तमयूररामायणापासून ८३ व्या मंजुरामायणापर्यंतच्या सर्व रामायणांचा यांत समावेश होतो. हीं संकीर्ण रामायणें अनेकविध वृत्तांत रचलेलीं आहेत हें सुप्रसिद्धच आहे.शिवाय श्लोककेकावलि, गंगास्तव, वगैरे आर्येतर वृत्तांत रचलेलीं त्रोटक काव्येंही या कालांत क्वचित् आढळून येतात. येवढे अपवाद वगळले असतां या कालांतील बाकीचें सर्व काव्य आर्याग्रथित आहे.

या उत्तरकालीन काव्यांच्या रचनाक्रमाविषयीं विचार करूं लागतांच मंत्रभागवत, हरिवंश, काशीयात्रा प्रकरणें, संकीर्ण रामायणें व केकावलि असा क्रम उघड उघड दिसून येतो. मोरोपंतांच्या चरित्राचा व काव्यरचनेच्या विकासाचा विचार करतां हा क्रम जितका नैसर्गिक असल्याचें दिसून येतें तितकाच तो प्रमाणसिद्धही असल्यानें त्याच्याविषयीं वाद होण्यास जागाच नाहीं. पांगारकरांनीं हरिवंशाचा समाचार अगदीं अखेरच्या प्रकरणांत घेतला आहे. तथापि त्यांसही मंत्रभागवतानंतर परंतु रामायणांच्यापूर्वीं हरिवंश रचला गेला हें मान्य आहे. असें ' ठळक गोष्टींची शकावलि ' या सदराखालीं त्यांनीं काव्यांचे रचनाकाल दिलेले आहेत त्यांवरून दिसतें. (मो. च. प्रस्तावना पृ. ३५).

२९. हरिवंशाच्या रचनाकालाविषयीं आजपर्यंत तिघांनीं तीन मतें प्रतिपादन केलीं आहेत.पहिलें पांगारकरांचें मत पुढीलप्रमाणें आहे.'शके १७०७-१०,पांडुरंगराव नाईक यांच्या सांगण्यावरून व नाइकांच्या मुलांत विभक्तपणाचे तंटे चालले असतांना पंतांनीं घाईघाईनें हरिवंश लिहिला.'(मो.च.प्रस्तावना ३५).दुसरें मत काव्यसंग्रहकारांचें. ' पंतांनीं चातुर्मासे यांना शांतिपर्व चालू असतांना लिहिलेल्या एका पत्रांत ' श्रीमंतांजवळ हरिवंश होतो ऐसें आहे ' असा मजकूर आहे. यांतील ' हरिवंश होतो ' याचा अर्थ प्राकृत हरिवंशाची रचना होत आहे असा

असावा. हा अर्थ खरा असल्यास आर्याभारताच्या शांतिपर्वाच्या वेळीं (शके १७०३) हरिवंशाची रचना चालू होती असें फलित होतें. पंत अनेक काव्यांचें काम एकदम चालवीत असत. आर्याभारत सुरू केल्यावर त्यांनीं प्रथम मंत्रभागवत त्याबरोबरच रचलें व मंत्रभागवतानंतर आर्याभारताबरोबरच हरिवंश रचिला. ' याप्रमाणें त्यांचें थोडक्यांत म्हणणें आहे. तिसरें मत पराडकरी आर्याभारताच्या उपोद्घातांत नमूद झालेलें श्री. परांजपे यांचें होय. ' आर्याभारत १७०४ च्या चातुर्मास्यांत समाप्त झालें. चातुर्मास्ये यांच्या मठांत त्यांनीं लिहून घेतलेली जी पोथी आहे ती १७०९ मध्यें लिहून घेतल्याचा उल्लेख आहे तेव्हां १७०४ व १७०९ या दोन सालांच्या दरम्यानच्या सुमारें पुऱ्या चार वर्षांच्या अवधीमध्यें हरिवंश रचिला गेला असावा असें दिसतें. ' असा हा तृतीय पंथ आहे. यांपैकीं आर्याभारत रचीत असतांना पंतांनीं हरिवंश रचला हें काव्यसंग्रहकारांचें मत त्याज्य होय. हें त्यांचें मत, पंत आर्याभारत वीस वर्षें (शके १६८६ ते १७०६) रचीत होते हा त्यांचाच सिद्धांत गृहीत धरून त्यावर आधारलेलें दिसतें. कारण वीस वर्षांच्या अफाट कालामध्यें भारताखेरीज इतर काव्यें त्याच्याबरोबर रचण्यास सवड सांपडणें अगदीं शक्य आहे. परंतु आर्याभारताचा हा वीस वर्षांचा रचनाकाल अगदीं चुकीचा ठरला असल्यामुळें आर्याभारताबरोबरच इतर अनेक मोठ्या काव्यांचीही रचना होत होती या अभिप्रायाची सयुक्तिकता सर्व नाहींशी झाली आहे. शिवाय ' श्रीमंतांजवळ हरिवंश होतो ऐसें आहे ' या उल्लेखाचा जो भलताच अर्थ का. सं. कारांनीं केला आहे तो केवळ हसूं येण्याजोगा आहे. पंत हे पुराणिक होते. तेव्हां श्रीमंतांजवळ सध्यां हरिवंश पुराणाचें वाचन चाललें आहे असें पंत सांगत आहेत. ' हरिवंश रचीत आहें ' असा अर्थ घ्यावयाचा तर पंत श्रीमंतांच्या पुढयांत बसून हरिवंश लिहीत असत असें मानावयाचें कीं काय ? पांडुरंगरायानें अनेकवार प्रेमानें विनंती केल्यावरून हरिवंश रचण्यास घेतला असें पंतांनीं स्वतः सांगितलें आहे. आर्याभारत लिहिलें जात असतांनाच पांडुरंगरायानें हरिवंश लिहिण्याविषयीं विनंती करणें व पंतांनीं ती मान्य करणें मुळींच संभवनीय दिसत नाहीं. हरिवंश हें महाभारताचें खिल अथवा पुरवणीपर्व होय. मुख्य ग्रंथ संपल्यावरच कोणीही झालें तरी पुरवणीचा भाग लिहिण्याविषयीं आग्रह करील व लेखकही मुख्य ग्रंथ संपल्यावरच पुरवणी लिहिण्यास हात घालील. तेव्हां सर्व बाजूंनीं विचार करतां आर्या-

भारत सुरू असतांच पंतांनीं हरिवंश लिहिला या काव्यसंग्रहकारांच्या कल्पनेंत कांहीं अर्थ दिसत नाहीं.

बाकी राहिलेल्या पांगारकरांच्या व परांजप्यांच्या मतांत प्रत्येकीं थोडथोडें सत्य दिसून येतें. हरिवंश १७०९ मध्यें पूर्ण झाला ही एक गोष्ट निश्चित आहे. त्याचप्रमाणें हरिवंशास प्रारंभ महाभारतसमाप्तीनंतर म्हणजे १७०४ च्या चातुर्मास्यानंतर झाला असावा असेंही जवळ जवळ निश्चयानें म्हणतां येतें. महाभारतासारखा प्रचंड उद्योग हातांत असतांनाच हरिवंशाचें ओझें पंतांनीं अंगावर घेतलें असेल हें शक्य दिसत नाहीं. भारतरचनाकालांत पंतांनीं दुसरी कांहींही रचना केली नाहीं असें अर्थात्च आमचें म्हणणें नाहीं. तथापि आर्याभारत रचून झाल्यावर, प्रथम स्वतःचा बेत नसतां, पांडुरंगरायांनीं बरेच वेळां आग्रह केल्यावरून पंतांनीं हरिविंश रचण्यास घेतला असावा असें प्रारंभींच्याच,

श्रीपांडुरंगरायें प्रेम असकृत् करूनि सांगावें ।

भगवन्निदेश जाणुनि, सुयश यथाबुद्धि मग न कां गावें ? ॥ हरिवंश १. २.

या आर्येवरून दिसतें. अर्थात् १७०४ च्या चातुर्मास्यानंतर केव्हां तरी आरंभ करून १७०९ त हरिवंश संपूर्ण केला असावा असें दिसतें.

३०. तथापि हरिवंशाच्या रचनाकालाचा विचार त्याच्या एकट्यापुरताच करतां येत नाहीं. रचनाकालाच्या बाबतींत हरिवंश व मंत्रभागवत हीं जुळीं भावंडें आहेत. त्यांत मंत्रभागवत हें अगोदर जन्मलेलें व हरिवंश नंतर जन्मलेलें दिसतें. मंत्रभागवत हें हरिवंशाबरोबरच परंतु त्याच्या किंचित् अगोदर रचलें जात होतें असें म्हणण्यास खात्रीलायक प्रमाण म्हणजे,

श्रीमंत्रभागवत या नामानें ग्रंथ जो तयांत करी ।

निजचरितांचा संग्रह, कांहीं येथेंहि करिल तोचि हरी ॥ हरिवंश १. ९

ही हरिवंशांतीलच आर्या होय. यांतील ' करी ' हा वर्तमानकालवाचक प्रयोग लक्षांत ठेवण्याजोगा आहे. यावरून यावेळीं मंत्रभागवत, विशेषतः त्यांतील कृष्णचरितांचा संग्रह असलेला दशमस्कंध, नुकताच लिहिलेला होता, किंबहुना लिहिला जात होता असें स्पष्ट दिसतें.

मंत्रभागवताचा रचनाकाल आजमावण्यास दुसरें एक गमक आहे. पंतांनीं विठोबादादा चातुर्मासे यांचे पुत्र भैराळबावा यांना लिहिलेल्या दोन पत्रांत नवम, एकादश व द्वादश या स्कंधांचा उल्लेख केला आहे व तो पंतरचित मंत्रभागवता-

च्या स्कंधांस अनुलक्षून आहे यांत शंका नाहीं. पैकीं दुसऱ्या पत्रांत हे स्कंध भैराळग्रोवांकडे पाठवीत असल्याचा उल्लेख असून त्यावर कार्तिक व॥ ७ बुधवार अशी मिति आहे. हा मिति व वाराचा योग शके १७०७ मध्यें येतो. यावरून १७०७ च्या कार्तिकाच्या पूर्वीं द्वादशस्कंधापर्यंत सर्व मंत्रभागवत रचून झालें होतें हें सिद्ध होतें.

तेव्हां वरील विवेचनापासून पुढील गोष्टी निष्पन्न होतात.—(१) १७०४ च्या चातुर्मास्या (सुमारें आश्विन) पासून १७०७ च्या कार्तिकापर्यंतचीं ३ वर्षें म्हणजे मंत्रभागवताच्या रचनेचा काल होय. (२) या कालांतच हरिवंशासही प्रारंभ झालेला असून त्याची थोडीबहुत रचना होत होती. (३) यानंतर सुमारें दोन वर्षांनीं म्हणजे १७०९ सालांत हरिवंश पूर्ण झाला असावा.

हरिवंश व मंत्रभागवत दोहोंमिळून एकंदर ९००० आर्या आहे. १७०४ ते १७०९ या पांच वर्षांत ९००० आर्या म्हणजे सरासरीनें दिवसास ५ आर्या पडतात. शिवरामपंत परांजपे यांनीं आर्याभारताच्या उपोद्घातांत दिवसास ४।५ असेंच पंतांच्या रचनेचें प्रमाण बसवलें आहे. तेव्हां वर ठरविलेला रचनाकाल त्या दृष्टीनें योग्यच ठरतो. परंतु ते १७०४ ते १७०९ हा अवधि एकट्या हरिवंशालाच देतात व मंत्रभागवताला अजीबात विचारांतच घेत नाहींत हें मात्र मुळींच मान्य होण्यासारखें नाहीं.

३१. आतां मंत्रभागवताच्या दशमस्कंधाच्या रचनाकालाविषयीं रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर यांनीं जो पक्षोपन्यास केला आहे त्याचा विचार करूं.

पंतांच्या कृष्णविजयाला 'बृहद्दशम' असें दुसरें नांव आहे.त्याला बृहत् म्हणजे मोठा दशम असें नांव पडण्याला त्याच्यापूर्वीं कोणतातरी'लघु'दशम अस्तित्वांत असला पाहिजे; तो लघुदशम म्हणजे अर्थात्च मंत्रभागवतांतील दशम होय; तेव्हां मंत्रभागवतांतील दशम हा अगोदर रचला गेला व त्याच्या अपेक्षेनें बृहत् ठरलेला कृष्णविजय नंतर रचला गेला;—असा समज अथवा भ्रम पूर्वीं प्रचलित असे. परंतु पांगारकरांनीं या समजाचा निरास करून सबंध मंत्रभागवत कृष्णविजयानंतरच रचलें असें ठाम लिहिलें आहे. (मो. च. पृ. २५४). तथापि याच्या नंतर देखील रामकृष्णपंत पराडकरांनीं ' कृष्णविजयाला बृहद्दशम हें नांव पडण्याला त्यापूर्वीं रचलेला हा (मंत्रभागवतांतील) दशम त्याहून लघु होता, हें कारण झालें आहे, ' (केसरी १६ मे १९११) असें प्रतिपादन करून पांगार-

करांनीं निर्मूल ठरविलेला भ्रम पुनः उत्थापित करण्याचा प्रयत्न केलेला होता. परंतु यानंतर २६ मे १९१४ च्या केसरींत मंत्रभागवताच्या रचनाकालासंबंधीं जो लेख त्यांनीं लिहिला त्यांत मात्र मंत्रभागवत दशम कृष्णविजयाच्याही अगोदर लिहिला असें आत्यंतिक प्रतिपादन केलेलें आढळत नाहीं. व खरोखर असलें प्रतिपादन क्षणभरही टिकण्याजोगें नाहीं. भाषा, कल्पना, विचार, रचनाशैली इत्यादिकांवरून ग्रंथकाराची परिणति थोडीशी तरी अजमावतां येते या म्हणण्यांत जर कांहीं अर्थ असेल तर मंत्रभागवताचा कोणताही भाग कृष्णविजयाच्या अगोदर लिहिलेला नाहीं असें अगदीं निर्धास्त म्हणतां येईल.

३२. मंत्रभागवतांतील दशम कृष्णविजयाच्याही अगोदर लिहिला हें आत्यंतिक मत जरी रा. पराडकरांनीं सोडून दिलें असलें तरी सबंध मंत्रभागवतास आरंभ करण्याच्यापूर्वीं दशम स्कंध तेवढा लिहून पंतांनीं पूर्ण केला होता असें मात्र त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. पंतांनीं पहिल्या प्रथम मंत्रांत गोवलेला आर्याबद्ध दशमस्कंधच एक स्वतंत्र काव्य या नात्यानें रचून तयार केला व आपल्या हातचें संबंध भागवत असावें अशी इष्टमित्रांनीं सूचना केल्यावरून नंतर त्यांनीं १–९ व ११–१२ स्कंधांचे रूपुस्त पूर्वींच्या दशमास जोडून मंत्रभागवत तयार केलें असा पराडकरांच्या म्हणण्याचा एकंदर इत्यर्थ आहे. त्यांच्या प्रतिपादनांतील मुद्दे दोन आहेत:—१. दशमस्कंध इतर सर्व स्कंध रचण्याच्या पूर्वीं रचला; २. दशमस्कंध रचला तेव्हां सबंध भागवत मराठींत रचण्याचा पंतांचा बेत नव्हता; अर्थात् दशमस्कंध हाच 'भागवतमंत्रमुक्तामणिमाला' या नांवानें स्वतंत्र ग्रंथ म्हणून कांहीं दिवस अस्तित्वांत होता.

रा. पराडकर व त्यांची बाजू सजवून मांडणारे रा. दत्तो वामन पोतदार यांचीं प्रमाणें थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहेत. [पहा, पराडकरी प्रत मं. भा. उपोद्धात पृ. ६–१२]. (१) दशमस्कंधाच्या पोथीचें भिन्नत्व. दशमाच्या कागदाचा आकार इतर स्कंधांच्या पोथ्यांहून भिन्न आहे. शिवाय दशमाची पोथी जास्त जुनी आहे. (२) दशमाच्या पोथीचें अक्षर, लिहिण्याची पद्धत, समासाची रुंदी वगैरे सर्व बाकीच्या पोथींपेक्षां भिन्न आहे. (३) स्वतंत्र ग्रंथाला जोडावा त्याप्रमाणें दशमस्कंधाला उपोद्धात व उपसंहार जोडला आहे. (४) दशमस्कंधांतच फक्त १०८ ही मंत्रसंख्या साधण्यावर कटाक्ष ठेवला आहे. इतर स्कंधांतील मंत्रांना संख्येचें विशिष्ट बंधन नाहीं. (५) '**भागवतमंत्रमुक्तामणिमाला**' हें स्वतंत्र

नांव दशमस्कंधाला दिलें आहे. यावरून दशमस्कंध स्वतंत्र ग्रंथ म्हणूनच लिहिला होता असें प्रतीत होतें. (६) चातुर्मास्ये बोवांच्या येथें जीं पंतांचीं पत्रें आहेत त्यांपैकीं दोन पत्रांत नवम, एकादश व द्वादश येवढयाच स्कंधांचा क्रमानें उल्लेख आहे. दशमाचा नाहीं. (७) पंतांनीं मंत्रभागवताच्या तीन माळा कल्पिल्या आहेत. अशा अडनिडया तीन माळा कल्पिण्याचें वस्तुतः कांहीं कारण दिसत नाहीं. तीन माळा कल्पिल्या आहेत यावरून दशमस्कंध प्रथम रचून त्याची एक माळ केली होती व मागून सबंध भागवत रचण्याची कल्पना आल्यावर १ ते ९ व ११ ते १२ अशा स्कंधांच्या दोन माळा आणखी बन-विल्या असें दिसतें.

३३. पराडकर व पोतदार यांनीं हीं जीं प्रमाणें दिलीं आहेत तीं वस्तुस्थितीचें वर्णन या दृष्टीनें बहुधा यथार्थ आहेत. बहुधा असें म्हणण्याचें कारण त्यांनीं दिलेलें पहिलें प्रमाण त्यांनीं नीट विचार करून दाखल केलेलें दिसत नाहीं. दशमाची पोथी आकार, कागदाचा दर्जा इत्यादि बाबतींत भिन्न असून ती जास्त **जुनी** आहे हें त्यांचें म्हणणें खरें नसून दशमाची पोथी इतर स्कंधांच्या पोथीपेक्षां जास्त मळलेली व वापरलेली आहे इतकीच काय ती या संबंधांतील खरी गोष्ट आहे. **जुनेपणा** व फार वापर-ल्यामुळें आलेली **मलिनता** यांतील भेद या शोधकद्वयाच्या लक्षांत आलेला दिसत नाहीं. दशमस्कंध फार फार तर दहा वर्षें अगोदर लिहिला होता असें जरी मानलें तरी ज्या पोथ्या आज १४० वर्षें उत्तम शाबूत आहेत त्यांपैकीं कांहीं केवळ ८-१० वर्षांनीं जास्त जुन्या म्हणून अगदीं जीर्ण दिसूं लागाव्या ही गोष्ट अशक्य आहे. तात्पर्य, दशमाची पोथी **फार वापरल्यामुळें** जीर्ण व मलिन झालेली दिसत आहे, **अधिक जुनेपणामुळें** नव्हे. आणि दशमस्कंधाचीच पोथी जास्त कां वापरली जावी याचें कारणही अगदीं उघड आहे. तें कारण म्हणजे दशमाची अतोनात लोकप्रियता हेंच होय. जास्त लोकप्रिय विभाग जास्त मलिन व जीर्ण होण्याचा प्रकार पंतकाव्याच्या इतर पोथ्यांच्या बाबतींतही दिसून येतो. कृष्णविजयाचा ७९ ते ८८ अध्यायांचा भाग (सुदामकथा, सुभद्राहरण, रुक्मिणीविवाह वगैरे) इतर भागापेक्षां जास्त लोकप्रिय आहे; यामुळें कृष्ण-विजयामधलीं तेवढींच पत्रें अति मलिन झालेलीं दिसून येतात व त्यांपैकीं कांहीं तर गहाळही झालीं आहेत. असो. त्याच-

प्रमाणें पोथीचा आकार भिन्न असल्याचें विधान जें पोतदारांनीं केलें आहे तेंही यथार्थ दिसत नाहीं. पोथीच्या कडा अत्यंत जीर्ण झाल्या असल्या-कारणानें लांबी थोडी कमी असल्याचें दिसतें येवढेंच. अक्षरासंबंधीं व समास मंत्रांक वगैरे संबंधीं पोतदारांनीं जें लिहिलें आहे तें मात्र अगदीं खरें आहे. किंबहुना या मुद्याला जितकें महत्त्व द्यावयास पाहिजे होतें तितकें त्यांनीं दिलेलें नाहीं असेंच उलट म्हणावेंसें वाटतें. दशमाचें अक्षर व पोथीचा एकंदर देखावा उघड उघड महाभारतकालीन आहे. परंतु बाकीच्या मंत्रभागवताचें अक्षर अगदीं उत्तरकालीन म्हणजे रामायणकालीन आहे असें म्हणावें लागतें.

पंतलिखित पोथ्यांचा व पंतांच्या हस्ताक्षराचा हा प्रश्न इतका घोटाळ्याचा व मति गुंग करून सोडणारा आहे कीं केवळ त्याचाच अभ्यास वर्ष सहा महिने करून त्यावर एक स्वतंत्र निबंध लिहितां येण्याजोगा आहे. तथापि सध्यां उप-स्थित झालेल्या प्रश्नाचें थोडक्यांत उद्घाटन करून त्याच्यापासून काय निष्पन्न होतें हें सांगितल्यास गैर होणार नाहीं. पंतलिखित पोथ्यांचा कागद दोन प्रकारचा आहे. एक देशी व दुसरा परदेशी पोर्तुगीज. मंत्रभागवताची सर्व पोथी (दशमासह) परदेशी कागदावरच लिहिलेली आहे. साधारणपणें पाहतां आर्याभारत, मंत्रभागवत व संकीर्ण रामायणें इतके ग्रंथ पंतांनीं एकाच आकाराच्या पोथ्यांवर स्वतःच लिहिले आहेत. या सर्वांचा कागद पोर्तुगीज असून पोथ्यांची लांबी १२ इंच व रुंदी ४ इंचापेक्षां थोडी जास्त अशी आहे. यांचा कागद सर्व अगदीं एकसारखाच आहे असें नाहीं. ठिकठिकाणीं कमी जास्त जाडीचा व भिन्न गर्भचिन्हांचा असा आहे. तथापि कागदाची लांबी-रुंदी सर्व पोथ्यांची सारखी असल्यामुळें या पोथ्या साधारणपणें एकाच तऱ्हेच्या आहेत, येवढें धरून चालण्यास हरकत नाहीं. परंतु या पोथ्यांच्या अक्षराकडे पाहिलें तर लिहिण्याच्या पद्धतीचे दोन निरनिराळे गट उघड दिसून येतात. आर्याभारत व मंत्रभागवताचा दशमस्कंध यांचें अक्षराच्या बाबतींत साम्य फारच आहे. दोघांची लिहिण्याची धाटणी अगदीं एकच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु अक्षराच्या बाबतींत दशमस्कंध जितका आर्याभारताकडे ओढ घेत आहे तितकेंच बाकीचें सर्व मंत्रभागवत संकीर्ण रामायणाच्या पोथीकडे झुकत आहे संकीर्ण रामायणाच्या पोथीचें अक्षर बारीक, अव्यवस्थित, गिजमिड व अस्थिर हातानें काढलेलें असून ती पोथी पंतांनीं अगदीं अखेरीस लिहिलेली दिसते.

मंत्रभागवताचें अक्षर त्याच्या कांहींसें अगोदरचें परंतु एकंदरीनें त्याच गोटांत जमा होण्याजोगें आहे. केवळ अक्षराच्याच दृष्टीनें पाहिलें तर हरिवंशाच्या पोथीचें अक्षर हें आर्याभारत व संकीर्ण रामायणें यांच्या बरोबर मध्यावस्थेतील अक्षर दिसतें, अर्थात् तें मंत्रभागवताच्या पूर्वीचें असावें असा पाहाणाऱ्याचा ठाम ग्रह होतो. हरिवंशाची पोथी अगदीं घाईनें लिहिलेली आहे. तरी त्यांत भारती अक्षराची सफाई, ठसठशीतपणा, व बुरकें वळण हें सुटलेलें नाहीं. किंबहुना १७१०–११ सालांत लिहिलेलीं काशीयात्रा प्रकरणें देखील भारती वळणांत सुरेख लिहिलेलीं आहेत. परंतु मंत्रभागवतांत हें वळण सुटलेलें दृष्टोत्पत्तीस येतें व लेखणीचा अस्थिरपणा अक्षरांत उमटलेला दिसून येतो. अक्षर पंतांचेंच खास परंतु वृद्धापकाळचें, हात कांपूं लागल्या वेळचें, असावें असा ग्रह होऊं लागतो.

या वर वर्णिलेल्या पोथ्यांच्या व अक्षरांच्या स्थितीवरून पराडकरांनीं काढलेलें तेंच कांहीं अगदीं अबाधित अनुमान नव्हे हें सहज लक्षांत येईल. व सध्यां दिसत असलेल्या पोथ्यांचा लेखनकाल ह्याच काव्याचा रचनाकाल असें निर्धास्तपणें मानण्याची सोय नाहीं हेंही स्पष्ट दिसून येईल. मंत्रभागवत हें सर्व आर्याभारत झाल्यानंतर लगेचच (पूर्वीं ठरविल्याप्रमाणें) पंतांनीं रचलें. परंतु त्याच्या दशमस्कंधाची तेवढी त्याला मागणी विशेष असल्याकारणानें त्या वेळच्या भारतकालीन अक्षरांत पक्की प्रत करून ठेवली असावी; बाकीच्या मंत्रभागवताची (स्कं १–९ व ११–१२) पक्की प्रत करण्याचें तसेंच राहून गेलें असावें व काशीयात्रेहून आल्यावर ती पक्की प्रत पंतांनीं तयार केली असावी;–अशी एक अनुमानपरंपरा वर वर्णिलेल्या पोथ्यांच्या स्थितीवरून सुचते. हिला अर्थात् इतर आधार कांहीं नाहीं. तथापि तिच्यांत असंभवनीय असेंही कांहीं नाहीं म्हणून ती येथें नमूद करून ठेविली आहे. पंतांच्या काव्याची कच्ची प्रत म्हणजे जवळजवळ पक्क्या पोथीप्रमाणेंच शुद्ध व व्यवस्थित असे असें कृष्णविजयाच्या बऱ्याच भागाची उभ्या कागदावर लिहिलेली कच्ची प्रत अजून अस्तित्वांत आहे तिजवरून दिसून येतें. तेव्हां मंत्रभागवताची अशी कच्ची प्रतच कांहीं दिवस अस्तित्वांत असणें व तीच भैराळबाबा वगैरेंकडे पाठविली गेली असणें अशक्य नाहीं.

पराडकरांनीं स्वमतसिद्धीकरितां पोथीचा व अक्षराचा जो हवाला दिला आहे त्याविषयीं खरा सखोल विचार केला असतां विचाराची मजल कोठपर्यंत जाते हें वर दर्शविलें. आतां बाकीचीं जीं त्यांचीं प्रमाणें आहेत त्यांविषयीं विचार करूं.

दशमस्कंधांतच १०८ मंत्रसंख्या साधली आहे हें प्रमाण या दृष्टीनें अगदींच निर्बल आहे. पंतांना १०८ ही संख्या अत्यंत प्रिय होती. शक्य असेल तेथें ही संख्या साधावी असा त्यांचा मनोदय असणें साहजिक आहे. मंत्रभागवताच्या संक्षेपाचें जें प्रमाण त्यांनीं योजिलें होतें त्या मानानें पाहतां दशमस्कंधांतच येवढी मोठी मंत्रसंख्या साधतां येईल असें त्यांना वाटलें म्हणून त्यांत ती त्यांनीं साधली. त्यावरून तो अगोदरच रचला किंवा मागाहून रचला असें कांहींही अनुमान निघत नाहीं. ' भागवतमंत्रमुक्तामणिमाला ' असें स्वतंत्र निराळें नांव पंतांनीं दशमस्कंधाला दिलें होतें या म्हणण्यांतही कांहीं जीव नाहीं. असें बोजड, बेडौल व लांबलचक नांव पंत आपल्या काव्याला कधीं देत नाहींत. त्यांच्या काव्यांचीं नांवें सर्व सुटसुटीत व बहुधा काव्यांतील मुख्य विषयाचें दिग्दर्शन करणारीं असतात. फक्त रामायणांचीं नांवें मात्र कांहीं तरी बाह्य लक्षणांवरून (मंत्र वृत्त वगैरेवरून) योजिलेलीं आढळतात. व त्यांतच एखादें बोजड नांव दिसून येतें. इतरत्र तसें आढळत नाहीं. तेव्हां ' भागवतमंत्रमुक्तामणिमाला ' हें त्यांनीं दशमस्कंधात्मक स्वतंत्र ग्रंथाला दिलेलें नांव होतें असें मुळींच मानतां येत नाहीं. कर्णपर्वाच्या शेवटीं ' नरनारायणविजयग्रंथ ' हे शब्द पाहून कर्णपर्वाला निराळा स्वतंत्र ग्रंथ मानण्यांत काव्यसंग्रहकार जसे चुकले तसाच कांहींसा प्रकार येथें होत आहे. का. सं. कारांनीं जसा नरनारायणविजय याचा अर्थ लक्षांत घेतला नाहीं त्याचप्रमाणें पराडकरांनींही वरील लांबलचक पदाचा अर्थ काय आहे याची छाननी केलेली दिसत नाहीं. ' भागवतांतील मंत्ररूप मोत्यांपैकीं उत्कृष्ट मोत्यांची माला' असाच या पदाचा अर्थ करावा लागतो. म्हणजे दशमस्कंध हा **भागवतांतील मंत्रांपैकीं** उत्कृष्ट मंत्रांची माला आहे असें पंत येथें म्हणत आहेत. तेव्हां भागवतमंत्रमुक्तामणिमाला या संज्ञेवरून दशमस्कंध हा स्वतंत्र ग्रंथ आहे असें मुळींच सिद्ध न होतां उलट मंत्रभागवतांतील मंत्रांच्या माळांपैकीं ती उत्कृष्ट माळ आहे असेंच खुद्द पंतांच्या शब्दांनीं सिद्ध होत आहे. या संज्ञेवरूनच दशम हा मंत्रभागवताचा भाग म्हणूनच रचलेला होता असें स्पष्ट दिसतें.

भागवताच्या पंतांनीं तीन माळा केल्या आहेत या गोष्टीलाही नसतें महत्त्व पराडकर देत आहेत. खुद्द मूळ भागवताकडे नजर दिली म्हणजे दशमस्कंध तेवढा चटकन् निराळा असा लक्षांत येतो. विस्तार, रचनाशैली, रसोत्कर्ष व श्रीकृष्णचरितानुवर्णन या सर्व गोष्टींमुळें तो भागवतांतील अत्यंत महत्त्वाचा

असा स्वतंत्रच भाग बनून राहिला आहे. अर्थात् त्याच्यामुळें बाकीच्या भागवताचेही १–९ व ११–१२ असे दोन विभाग पडल्यासारखे झाले आहेत. हे मूळ भागवताचे स्वाभाविक रीतीनेंच पडलेले तीन विभाग पाहून एकाद्या कवीला त्याचा अनुवाद करतांना आपल्याही ग्रंथाचे असे तीन विभाग कल्पावे असें वाटलें तर त्यांत आश्चर्य करण्याजोगें कांहीं नाहीं व त्याच्यावरून दुसरीं अनुमानें काढलींच पाहिजेत असें नाहीं. त्याचप्रमाणे दशमाला उपक्रमोपसंहार जोडलेले दिसून येतात या गोष्टीचें महत्त्वही सकृद्दर्शनीं वाटतें तितकें विचारांतीं दिसून येत नाहीं. उपसंहारात्मक श्लोक तर कोणत्याही महाकाव्याचे मोठे विभाग संपले असतां त्यांच्या अंतीं असे अनेक रचून घालण्याची पंतांना संवयच आहे. आदिपर्वाच्या अंतीं ‘ रामाचें रचिलें चरित्र ’ इत्यादि सुंदर उपसंहाराचा श्लोक पंतांनीं घातला आहे. त्याचप्रमाणें विराट, भीष्म, कर्ण इत्यादि पर्वांच्या शेवटीं कमी अधिक उपसंहारात्मक उद्गार त्यांनीं काढले आहेत हें सुप्रसिद्धच आहे. उपोद्घात मात्र असे ठिकठिकाणीं घातलेले दिसून येत नाहींत हें खरें, तथापि दशमाचा बारा आर्यांचा उपोद्घात ज्या तऱ्हेनें पोथींवर लिहिलेला आहे त्यावरून तो दशमाच्या अगोदरच रचला आहे कीं नाहीं याविषयीं संशय वाटतो. या उपोद्घातावरून फार तर दशमस्कंध इतर स्कंधांच्या अगोदर रचावयास घेतला होता येवढें निष्पन्न होईल, तो स्वतंत्र ग्रंथ म्हणूनच रचला असें सिद्ध होत नाहीं.

पराडकरांनीं दिलेलीं प्रमाणें याप्रमाणें वस्तुस्थितीचें दिग्दर्शन करण्याच्या दृष्टीनें खरीं असलीं तरी त्यांचें प्रमेय सिद्ध करण्याला तीं असमर्थ आहेत. फार तर दशमस्कंध अगोदर रचावयास घेतला असावा येवढें त्यांवरून दिसून येतें; परंतु तो स्वतंत्र ग्रंथ या नात्यानें सबंध भागवत लिहिण्याचा बेत नसतां रचला असें मानणें दूरापास्त होतें. उलट स्वतंत्र ग्रंथ म्हणून दशम रचला नसावा असेंच मानण्याला कांहीं कारणें दिसून येतात:— (१) सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे दशमस्कंधावर एक ग्रंथ अगोदरच रचला असतांना दुसरा ग्रंथ स्वतंत्रपणें रचण्याला पंतांना काय कारणें झालीं होतीं याचा खुलासा कोठेंही मिळत नाहीं. पंतांनीं दशमस्कंधावरचा आपला ग्रंथ कृष्णविजय हा पुष्कळ वर्षांपूर्वीच लिहून संपविला होता ही गोष्ट निर्विवाद आहे. मग त्याच दशमस्कंधावर आपण पुनः आणखी एक काव्य रचावें अशी बुद्धि पंतांस कशानें झाली? एकशें आठ रामायणांची एक गोष्ट सोडून दिल्यास दुसऱ्या कोणत्याही समग्र मूळ ग्रंथावर

दोनदोनदां टीका लिहिण्याची बुद्धि पंतांस झाल्याचें कोठेंही दिसून येत नाहीं. प्रथम स्वतंत्र काव्य म्हणून दशमस्कंध लिहिला असें न मानतां सबंध भागवत रचण्याचाच पंतांचा पहिल्यापासून बेत होता असें मानलें म्हणजे मग ही अडचण रहात नाहीं. कारण मग स्वतंत्र रीतीनें दशमस्कंध लिहिण्याचा प्रश्नच उरत नाहीं. सबंध भागवत लिहितांना ओघानें तो येईल आणि तसा तो ओघानें लिहिला गेल्यास तेथें त्याची पुनरुक्ति कां केली असा प्रश्न उपस्थित होऊं शकत नाहीं. परंतु प्रथम सबंध मंत्रभागवत लिहिण्याचा बेत नसतांना 'भागवतमंत्रमुक्तामणिमाला' म्हणजे दशमस्कंध हाच तेवढा पंतांनीं प्रथम लिहिला असें जेव्हां म्हणण्यांत येतें तेव्हां मात्र कृष्णविजय अगोदर रचलेला असतांना हा नवीन दशमावर ग्रंथ लिहिण्याची बुद्धि पंतांना कां झाली असा प्रश्न उद्भवतो व त्याचें समाधानकारक उत्तर मिळत नाहीं. पंतांच्या कृष्णविजयांत मंत्र साधलेले नाहींत व तो सबंध आर्यामयही नाहीं. मंत्रभागवतांतील दशमस्कंधांत या दोन्ही गोष्टी आहेत हें खरें. तथापि केवळ मंत्रांकरितां व आर्यावृत्ताकरितां पंत एक निराळा दशमस्कंध पुनः लिहिण्यास घेतील हें संभवनीय दिसत नाहीं. मंत्राकरितां पंत 'मंत्रयमय भागवता' सारखी एकादी क्षुल्लक कसरत करून दाखवितील पण केवळ त्याच्याकरितां मंत्रभागवतांतील दशमस्कंधासारखा मोठा ग्रंथ लिहिण्यास ते कधींही घेणार नाहींत. व असल्या क्षुल्लक हेतूनें हातीं घेतलेला ग्रंथ इतका सरस व उत्कृष्ट उतरणेंही शक्य नाहीं.

(२) श्री मंत्रभागवत या नांवानें ग्रंथ जो तयांत करी
निजचरितांचा संग्रह, कांहीं येथेंहि करिल तोचि हरी ॥ हरिवंश १-९.

या आर्येंत 'मंत्रभागवत' नांवाच्या ग्रंथांतच श्रीकृष्णचरितांचा संग्रह आहे असें म्हटलें आहे. यावरून हरिवंशप्रारंभकालीं श्रीकृष्णचरितांचा संग्रह असलेला दशमस्कंध नुकताच रचला होता व हा 'निजचरितांचा संग्रह' **मंत्रभागवतांतीलच भाग** होता हें अगदीं उघड दिसतें. 'करी' या क्रियापदावरून वर्तमानकालाचा, फार तर 'वर्तमानसामीप्ये वर्तमानवद्वा' या न्यायानें समीपस्थ भूतकालाचा बोध होतो. अर्थात् दशमस्कंध त्यावेळीं अगदीं नुकताच रचलेला असला पाहिजे. (३) तिसरें प्रमाण भाषा व रचनाशैली यांचें. मंत्रभागवताची शैली सर्वत्र सारखी दिसून येते. दशमांत श्रीकृष्णकथांमुळें आलेला मधुरिमा व प्रेमळपणा सोडून दिल्यास मंत्रभागवतांत पंतांची आर्या सर्वत्र सुगम, घटलेली, प्रसादपूर्ण

व ललित अशीच दिसून येते. तेव्हां यावरून मंत्रभागवताच्या निरनिराळ्या विभागांच्या रचनाकालामध्यें फारसें अंतर असावें असें दिसत नाहीं. हें प्रमाण सर्वस्वीं अंतःकरणग्राह्यच खरें, तथापि मार्मिक वाचकांस तेव्हांच पटण्याजोगें असल्यामुळें त्याचा उल्लेख केला आहे.

एवंच काय, कीं दशमस्कंध हा **स्वतंत्र रीतीनें** सबंध भागवत लिहिण्याचा बेत नसतांना अगोदर लिहिला गेला, हें पराडकरांचें म्हणणें मान्य होण्याजोगें नाहीं. बाकीच्या स्कंधांपेक्षां दशमस्कंध कदाचित् अगोदर लिहिला गेला असेल हें संभवनीय आहे. तो देखील अगोदर म्हणजे कांहीं थोडा काळ अगोदर, इतकेंच. तो अगोदर रचून झाल्यामुळें त्याची स्वतंत्र माळा कल्पावी ही सहज सुचणारी कल्पनाही त्यांच्या मनांत दृढ होऊन त्यांनीं ती अमलांत आणली असेल. परंतु प्रथम रचला गेला असला तरी तो हेतुपुरस्सर, मंत्रभागवताचा एक भाग म्हणूनच रचला गेला व तो १७०४ किंवा फार तर १७०३ च्या सुमारासच रचला गेला याविषयीं संदेह वाटत नाहीं.

३४. यास्तवच रा. रामचंद्र महादेव आठवले यांनीं ' मांधांता स महीपतिः ' या दशमस्कंधाच्या अंतीं लिहिलेल्या श्लोकावरून जी कल्पना बसविली आहे ती असंभवनीय वाटते. हा श्लोक भोजप्रबंधांतील असून मुंज राजा आपला पुतण्या जो भोज, त्यास मारेकऱ्याकडून मारविणार होता त्या प्रसंगीं भोजानें आपल्या चुलत्यास रचून पाठविला होता. ' हा श्लोक नारायणराव पेशव्याच्या वधप्रसंगानें पंतांना आठवला असावा व तो त्यांनीं दशमाच्या पोथीवर लिहून ठेवला असावा; अर्थात् दशमाचा रचनाकाल नारायणरावांच्या वधापूर्वीचा असावा;' अशी आठवल्यांची तर्कपरंपरा आहे. परंतु नारायणरावांचा वधकाळ १६९५ हा आहे. त्याच्या अगोदर म्हणजे भारतरचनेच्या देखील अगोदर मंत्रभागवत दशमाला ओढणें हें अगदीं अशक्य होणार आहे. मंत्रभागवत दशमांतील वात्सल्यरसाचा परमोत्कर्ष हा कवीची परिणतावस्था व उतारवय स्पष्टपणें सुचवीत आहे. शिवाय कृष्णविजय नुकताच पूर्ण झालेला असतांना लगेच पंत पुनः दशमावर ग्रंथ लिहिण्यास घेतील हें कसेंसेंच वाटतें. ' मांधाता ' इ. श्लोक नारायणरावांच्या वधावरून त्याचवेळीं सुचला ही केवळ कल्पनाच आहे. तिला आधार कांहीं एक नाहीं. अशा तऱ्हेचे सुभाषितरूप अनेक श्लोक पंतांनीं आपल्या पोथ्यांवर कोठें कोठें लिहून ठेवले आहेत.

शिवाय मंत्रभागवताचा दशमस्कंध इतका अगोदर लिहिला नसला पाहिजे व आम्हीं म्हटलें आहे त्याप्रमाणें १७०३ नंतरच तो रचला असावा असें म्हणण्यास आणखी बलवत्तर प्रमाण उपलब्ध आहे. विठोबादादास पंतांनीं पाठविलेल्या एका पत्रांत पुढील मजकूर आहे."आपणांस **दशम पूर्वार्ध** व गीतार्थ पाठविल्या आहेत. श्रीद्रोणपर्व जयद्रथवधान्त झालें. रात्रियुद्धाचा आरंभ आहे." इ. (मो.च.पृ १२९) या पत्रांत दशमपूर्वार्ध पाठविल्याचा उल्लेख आहे परंतु त्याला 'थोर' दशम किंवा 'लघु' दशम असें कांहीं म्हटलेलें नाहीं. यावरून त्यावेळीं कोणता तरी एकच दशम अस्तित्वांत होता हें उघड दिसतें व तो एक म्हणजे कृष्णविजयच असला पाहिजे. कृष्णविजय पूर्वार्धाची पोथीही निराळी, उत्तरार्धाहून भिन्न अशी आहे. मंत्रभागवतांतील दशम पूर्वार्धाची निराळी पोथी नसून सर्व दशम सरसकटच लिहिला आहे. यावरूनही येथे कृष्णविजयच अभिप्रेत आहे हें सिद्ध होतें. आतां हें पत्र द्रोणपर्व निमें लिहून झाल्यावरचें आहे. याचा काल शके १७०१ किंवा १७०२ असावा. यावरून १७०१–०२ पर्यंत मंत्रभागवत दशम अस्तित्वांत नव्हता असें निःसंशय म्हणतां येतें.

३९. याप्रमाणें महाभारतानंतरच्या पांच सहा वर्षांत मंत्रभागवत व हरिवंश यांची रचना झाली असें आपण पाहिलें. यापुढें १७१०–११ हीं वर्षं पंतांचीं काशीयात्रेंत गेलीं. पंत कार्तिक शु॥ १ शके १७१० रोजीं यात्रेस निघाले. त्याच्या पूर्वीचे दोन तीन महिने तयारींत सहज गेले असतील. पुढे काशीयात्रा करून सुमारें १ वर्ष ८ महिन्यांनीं म्हणजे १७१२ च्या वैशाख ज्येष्ठांत ते परत आले. हा एक वर्ष आठ महिन्यांचा काल म्हणजे त्यांच्या **काशीयात्रा प्रकरणांच्या** रचनेचा काल होय. या प्रकरणांची पद्यसंख्या सुमारें १००० इतकी असून हीं सर्व अत्यंत प्रेमळ व मधुर आहेत. संसारी पुरुष या नात्याचा पंतांचा स्वकीयांविषयींचा अनुपम प्रेमळ भाव यांत प्रकट झाला आहे. पंतांच्या संबंधाचीं, शेजारपाजारचीं, गांवकऱ्यांचीं वगैरे अनेक नांवें त्यांत आलीं असल्यानें चरित्राच्या दृष्टीनेंही तीं मोठीं मनोरंजक झालीं आहेत.

३६. शक १७१२ नंतरची पंतांची कृति म्हणजे बहुधा **संकीर्ण रामायणें** हीच होय. संकीर्ण रामायणाची पोथी अगदीं अव्यवस्थित, गिचमिड, अस्थिर हातानें कशी तरी लिहिलेली आहे हें वर सांगितलेंच आहे. तिच्यांतील कांहीं भाग परलिखित असावा असेंही वाटतें. या सर्व लक्षणांवरून संकीर्ण रामा-

यणांची पोथी हें पंतांचें अगदीं वृद्धापकाळचें लिखाण असावें असें उघड दिसतें. व हीं सर्व रामायणें पंतांनीं उतारवयांतच रचलेलीं होत याविषयीं पांगारकरांसकट सर्व पंतकाव्यमर्मज्ञांचें ऐकमत्य आहे.

परंतु वाद आहे तो निराळ्याच गोष्टीविषयीं आहे. ' अष्टोत्तरशत ' या संज्ञेनें प्रसिद्ध असलेलीं पंतांचीं रामायणें बरोबर १०८ भरत नाहींत ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. पराडकरांच्या ७, ८ व ९ या खंडांत एकंदर ९० रामायणें प्रसिद्ध झालीं आहेत. याशिवाय भारत, भागवत, हरिवंश व अवतारमाला यांत असलेलीं पंतांच्या सांगीप्रमाणें धरलीं म्हणजे एकंदर उपलब्ध रामायणांची संख्या (९०+४) ९४ होते.* अर्थात् निदान १४ रामायणें कमी पडतात. या विलक्षण परिस्थितीमुळें पुढीलप्रमाणें विवेचनार्ह प्रश्न उपस्थित होतात.—१. पंतांनीं स्वतः संकल्प केल्याप्रमाणें १०८ रामायणें शेवटपर्यंत त्यांच्या हातून रचून झालीं होतीं कीं नाहीं ? २. रचून झालीं असल्यास त्यांपैकीं खरोखर उपलब्ध किती आहेत व त्यांचीं खरीं नावें कोणतीं ? ३. बाकीचीं अनुपलब्ध जीं रामायणें राहतात त्यांच्या नावांचा तरी पत्ता लागतो कीं नाहीं ? व प्रत्यक्ष १०८ रामायणें नाहींत परंतु १०८ रामायणांचीं नावें तरी निःसंदेह उपलब्ध होतात किंवा नाहीं ?

पहिल्या प्रश्नाचें उत्तर आजपर्यंत सर्वांनीं अस्तिपक्षींच दिलें आहे. हीं रामायणें १०८ असल्याबद्दलचा पंतकालापासून चालत आलेला समज, ' अष्टोत्तरशत केलीं जेणें रामायणें पृथग्रस तीं ' अशी समकालीन राम बडव्याची स्पष्ट साक्ष व एकदां संकल्प केल्यावर तो पुरा करण्यासाठीं अवश्य असलेला पंतांचा उरक व धडाडी यांचा विचार करतां त्यांच्या हातून अष्टोत्तरशत रामायणें लिहून झालीं असावींत असेंच वाटतें. दुसऱ्या प्रश्नासंबंधानें देखील फारसा वाद होण्याचें कारण आतां राहिलेलें नाहीं. पंतकाव्यांच्या मूळ प्रतीबरहुकूम छापलेल्या आवृत्तींत ९४ (किंवा खरीं ९२) रामायणें त्यांच्या खऱ्या नांवासकट छापलेलीं असल्यानें एकंदर ८८ रामायणेंच उपलब्ध आहेत, (मो. च. पृ. ४४४) वगैरे पांगारकरादिकांचीं विधानें बादच समजावयास पाहिजेत. तिसऱ्या प्रश्नासंबंधीं मात्र मतभेदास जागा असून त्याविषयींच काय तो खरा वाद माजलेला आहे.

---

* यांपैकीं साररामायण व त्रुटित रामायण हीं अष्टोत्तरशत रामायणांत गणगें पंतांना संमत नसण्याचाही संभव आहे. (पहा मागें पृ. २११.)

पांगारकरांनीं आपल्या मोरोपंत चरित्रांत १०८ रामायणांची जुळणी करून त्यांची नांवनिशीवार यादी दिली आहे. परंतु रा. पराडकर व श्री. न. चिं. केळकर यांनीं पांगारकरांच्या यादींतील कित्येक नांवांवर आक्षेप घेतले असून १०४ किंवा १०५ च नांवांचा पत्ता लागतो, बाकीचीं नांवें अजून अज्ञातच आहेत असें त्यांचें म्हणणें आहे. पांगारकरांची याद सदोष आहे याबद्दल वाद नाहीं. तथापि त्यांनीं दिलेल्या पद्धतीनें नसला तरी इतर कोणत्याही रीतीनें १०८ नांवांचा पत्ता लागतच नाहीं हें म्हणणेंही थोडेसें चिंत्यच आहे.

संकीर्ण रामायणांच्या सुमारासच श्लोककेकावलि, कांहीं संतस्तवनपर प्रकरणें व देवतांचीं स्तोत्रें, अहल्योद्धार, ध्रुवाख्यान, अंबरीषाख्यान इत्यादि साकीबद्ध आख्यानें वगैरे रचना पंतांनीं केली असावी. त्यांचें शेवटचें काव्य **केकावलि** हें मानण्यांत येतें हें रास्तच आहे. परंतु याचा अर्थ, केकावलि रचल्यानंतर कवितेची एक ओळही त्यांनीं लिहिली नाहीं व लगेच ते मृत्युवश झाले असा नव्हे; व असें म्हणण्यास कांहीं आधारही नाहीं. याशिवाय दुर्वासभिक्षा, गीतार्या हीं प्रकरणें शेवटचीं म्हणून पांगारकरांनीं वर्णिलीं आहेत. परंतु तीं तशीं दिसत नाहींत. प्रांतप्रार्थना हें लहानसें स्तोत्र अगदीं अखेरचें असें पांगारकर मानतात. परंतु तसें मानण्यासही कांहीं प्रमाण दिसत नाहीं. प्रांतप्रार्थनेची पंतलिखित पोथी उपलब्ध आहे, त्यावरून तें अगदीं अंतकाळचें स्तोत्र असावें या म्हणण्यास बाधच येतो. पंतांचें अगदीं शेवटचें काव्य कोणचें याविषयीं आपणास जरी कितीही कुतूहल वाटलें तरी उपलब्ध साधनांच्या सध्यांच्या स्थितींत तो प्रश्न अनिर्णीतच राहणार ही गोष्ट कबूल केली पाहिजे.

पंतकाव्यांच्या कालनिर्णयाचें विवरण येथें संपलें. या आतांपर्यंत केलेल्या विवेचनाचा सारांश काढून पंतांच्या काव्यरचनेचा आराखडा थोडक्यांत मांडावयाचा झाल्यास तो पुढीलप्रमाणें मांडतां येईल.

[१] **शके १६७४-१६८३; तारुण्यावस्थेंतला नवशिकेपणाचा काल, (Juvenile period).**—कुशलवचरित, ब्रह्मोत्तरखंड, कृष्णविजय अ. १–४९, प्रह्लादविजय, मदालसाख्यान, हरिश्चंद्राख्यान, सप्तशती, विनायकमाहात्म्य व कदाचित् साररामायण हीं काव्यें या कालांतलीं होत.

[२] यापुढें **१६८३ ते १६९४** या दहा अकरा वर्षांचा अवधि म्हणजे पंतांच्या **प्रौढावस्थेचा काल** होय. यांतही दोन पोटविभाग पडतात. (१)

१६८३ ते १६८८. या कालाचें विशिष्ट लक्षण **श्लोकबद्ध रचना** हें होय.— कृष्णविजय अ० ५० ते ७९, सुदामचरित, भक्तभूषण, भस्मासुराख्यान (गिरित्रमोक्ष), भृगुचरित्र, कृष्णामाहात्म्य, व बरींचशीं नद्यांचीं व देवांचीं स्तोत्रें, वगैरे रचना या कालांतली होय. (२) १६८८ ते १६९४. या कालांत **आर्यावृत्ताचें प्राबल्य** कायमचें प्रस्थापित झालें. कृष्णविजय अ० ८०–९०, मंत्ररामायण, आर्यामुक्तामाला, संशयरत्नावलि, साधुसत्कार, आर्याकेकावलि, चषक, नामार्या, नामरसायन, मारुतिस्तुति, सन्मनोरथराजि, प्रश्नोत्तरमाला हीं काव्यें या कालांतील असावींत. या शिवाय भीष्मभक्तिभाग्य, नारदाभ्युदय अवतारमाला, गीतार्या, वगैरे प्रकरणेंहीं बहुधा याच काळांतलीं होत. सीतागीत, सावित्रीगित, व रुक्मिणीगीत हीं या कालाच्या अगदीं प्रारंभींचीं असावींत. हा काल म्हणजे पंतांच्या कवित्वशक्तीच्या बहराचा काळ होय.

[३] १६९५ ते १७०४–५. हा अकरा वर्षांचा काल पंतांच्या **परिनिष्ठितेचा व परिपक्वतेचा** होय. समग्र महाभारत ही यांतील मुख्य रचना होय. शिवाय, अमृतमथन, वामनचरित हीं काव्यें या काळांत रचलीं गेलीं असण्याचा संभव वाटतो. मंत्रभागवत दशमस्कंध याच कालाच्या शेवटीं रचला गेला असावा.

[४] १७०५ ते १७१६ **हा उतारवायाचा काल होय**.–मंत्रभागवत, हरिवंश, काशीयात्रा प्रकरणें, कांहीं संतस्तवनप्रकरणें व देवांचीं स्तोत्रें, साकीबद्ध आख्यानें, संकीर्ण रामायणें व श्लोककेकावलि ही या अवधींतील रचना होय.

याप्रमाणें पंतांच्या काव्यरचनेचा रचनाक्रमास धरून काढलेला आढावा वाचकांस सादर केला आहे. यांतील कांहीं ठिकाणें वादग्रस्त असलीं तरी निर्विवाद रीतीनें कायम होण्याजोगा असा भागही बराच आहे. कांहीं गोष्टी अशाही आहेत कीं, निर्णायक साधनाचे अभावीं त्यांत मतभेद हे थोडे बहुत रहावयाचेच. एकंदरीनें वरील वर्णनावरून पंतांच्या चाळीस वर्षांच्या वाङ्मयात्मक कामगिरीचा चित्रपट स्थूल मानानें जरी वाचकांच्या डोळ्यापुढें उभा राहिला तरी लेखकास कृतार्थता वाटेल.

विभाग ६.

पंतांची भाषाशुद्धि व पंतभाषेचें व्याकरण.

[१]

पंतांची भाषाशुद्धि.

१. भाषाशुद्धीविषयीं पंतांची प्रख्याति आहे. त्यांच्या कवितेची भाषा अत्यंत व्याकरणशुद्ध असते असें सर्वत्र म्हटलें जातें. परंतु ही व्याकरणशुद्धि म्हणजे काय याचें मात्र स्पष्टीकरण कोठें केलेलें आढळत नाहीं. ही पंतकवितेंत आढळणारी व्याकरणशुद्धता म्हणजे संस्कृत वाङ्मयांत दिसून येणाऱ्या नियमबद्धतेसारखी नव्हे हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. संस्कृत भाषा पाणिन्यादि मुनींच्या नियमांनीं जी एकदां जखडून टाकली आहे तिच्यांत रेंसभरही फरक करण्याविषयीं कोणाची मात्रा चालण्याजोगी नाहीं. सर्व रूपें, सर्व प्रयोग त्यांनीं घालून दिलेल्या नियमांप्रमाणें तंतोतंत झाले पाहिजेत. त्यांत येवढीशी कोठें ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, संधि, यांसंबंधींची चूक झाली कीं 'अपाणिनीय' प्रयोग केला म्हणून सर्व जग त्याच्यावर उठलेंच! कालिदासानें

तं पातयां प्रथममास पपात पश्चात् ।

असा एक प्रयोग केला कीं, अशुद्ध म्हणून लगेच त्याच्यावर शिक्का बसलाच! तेव्हां अशा तऱ्हेची कानामात्रेंत देखील फरक न करूं देणारी व्याकरणबद्धता पंतांच्या ग्रंथांत आढळून येत नाहीं हें ध्यानांत बाळगणें जरूर आहे. आम्ही गद्यांत जीं रूपें वापरतों व शुद्ध मानतों तशींच व तेवढींच रूपें काव्यांत योजिलीं जातात असें नाहीं. उदाहरणार्थ—'कवीच्या रीतीला नियम घालून उपयोग नाहीं' असें वाक्य आपण गद्यांत लिहितों; परंतु कवि छंदासाठीं, यमकासाठीं, किंबहुना स्वतःच्या मर्जीखातरही याच्यांत नानातऱ्हेचे बदल करूं शकतील. 'कवीच्या' या शब्दाचें रूप 'कवीचिया' असें तर काव्यांत करतीलच; परंतु 'कविच्या', 'कविचिया' अशीं गद्यांत अगदीं अशुद्ध ठरणारीं रूपेंही पद्यांत कवि योजूं शकतात. त्याचप्रमाणें 'रीतिला' असें अशुद्ध रूपही कवितेंत शुद्ध ठरतें. 'घालून' या शब्दाचीं रूपें तर अनंत परींनीं करण्यांत येतातः—

' घालुनि, ' ' घालुन, ' ' घालूनी, ' ' घालुनियां, ' ' घालूनीया, ' इ० इ०. त्याचप्रमाणें कवि, गुरु, परंतु, या ऱ्हस्वान्त शब्दांचीं रूपें कवी, गुरू, परंतू अशीं दीर्घान्त, व पाणी, नदी यांचीं पाणि, नदि अशीं ऱ्हस्वान्त रूपेंही कवि जरूरी असल्यास क्वचित् ठिकाणीं करितात. कवींना देण्यांत आलेल्या या सवलतींचा स्थूलमानानें निष्कर्ष काढला तर पुढील नियम बसवितां येतील असें वाटतें.--

१. (ऱ्हस्व अथवा दीर्घ) इकारान्त व उकारान्त प्रातिपदिकांचे अंत्य स्वर काव्यांत वाटेल तसे, ऱ्हस्व अथवा दीर्घ लिहावे. जसें—गुरू, कवी, परंतू ; पाणि नदि, भाजि, इ०

२. प्रत्ययगत किंवा सामान्यरूपगत इकार व उकार हे असेच विकल्पानें ऱ्हस्व अगर दीर्घ लिहावे. जसें—रामाहुन, घरिं, कविचा, त्यांहिं, इ०

३. क्रियापदें व धातुसाधितें यांतील मूळ धातु कायम ठेवून प्रत्ययांशांतील इकार उकार विकल्पानें ऱ्हस्व वा दीर्घ लिहावे. जसें—करीतों, मारिल, मारिलि, करुन इ०. परंतु नीजला, भीजला, चूकला अशीं रूपें करणें मात्र या नियमाप्रमाणें बरोबर नव्हे. तीं अशुद्धच मानलीं पाहिजेत.

४. भूतकालीन क्रियापदांच्या प्रत्ययापूर्वींच्या 'अ'चा क्वचित् एकार करण्यांत येतो. जसें—निजला, निजेला; कोमला, कोमेला.

५. नामें, विशेषणें, क्रियापदें व धातुसाधितें यांच्या प्रत्ययांशांतलि आच्या ठिकाणीं अय, यच्या ठिकाणीं अय किंवा इय, आणि ईच्या ठिकाणीं इय असे आदेश कांहीं ठिकाणीं करण्यांत येतात. जसें—राजाच्या, राजयाच्या; त्याच्या, तयाचया अगर तयाचिया; कवींच्या, कवींचिया; मारिला, मारियला; करुनी, करुनिया इ०. (प्रत्ययांश=शब्दाचें मूळरूप वगळलें असतां बाकी राहणारा अंश.)

वर सांगितलेले सर्व विकार मूळशब्दांच्या अंतरंगास कधींही होत नसून अंत्य स्वरास व प्रत्ययांशासच होतात हें लक्षांत घेण्याजोगें आहे.

वरील नियमांत दाखल केलेल्या सवलती भाषाशास्त्रज्ञांनीं उघडपणानें कवींना दिल्या आहेत व सर्व कवींही त्यांचा सररास उपयोग करीत आहेत. त्यांत कांहीं अशुद्धता आहे असें कोणी मानीत नाहीं. अर्थांतच पंतांनींही या सवलतींचा फायदा आपल्या काव्यांत यथास्थित घेतला आहे. अशीं उदाहरणें शेंकडों, हजारों देतां येतील; परंतु गद्यांत अशुद्ध वाटणारीं रूपें पद्यांत कशीं योग्य

वाटतात हें दर्शविण्याकरितांच दोन चारच उदाहरणें येथें दिलीं आहेत—' हे दोघे **भाउ** दया **करितिल** ' कृ. वि. ३९. २१. ' **मनिं आणिल** रतिपा ' कृ. वि. २९. २१. ' जेंवि शुद्ध **रवी** ' मं. भा. १०, ८४६. ' वाहे व्रजपथ-**धूळी**...**स्वामिचीं** पदें अमळें ' मं. भा. १०. ४८३. ' ऐसें ऐकोनि **तीचें** कृ. वि. ५८. ११. ' आणितों **विष्णुला** ' कृ. वि. ५८. ११. ' **तूझा** ' कृ. वि. ८०. ७५. ' **भाजि** वज्रपशुपांचीहि सेविली ' कृ. वि. ८१. १९. ' **सुरगुरू** सखा पणसाचा ' कृ. वि. ४८. ४१. ' **प्रीतिचि** तो **बेडि** सोडवि ' कृ. वि. ४२. ९. ' **सुस्वामिनें** ' रामप्रार्थना ४. इ० इ०.

३. इतर कवींनीं घेतलेल्या सवलतीचा अशा रीतीनें पंतही जर फायदा घेतात तर मग त्यांचा व्याकरणशुद्धीबद्दलचा कटाक्ष तो कोठें उरला ? याचें उत्तर हेंच कीं पंत येवढ्याच सर्वसंमत सवलती घेऊन थांबतात तर इतर वामनपंडितादि कवि कोणतीच मर्यादा न मानितां केवळ मनास येतील तसे प्रयोग करतात. वर ज्या सवलती म्हणून सांगितल्या आहेत त्यांपैकीं कांहींचा फायदा पंत अगदींच क्वचित् घेतात. उदाहरणार्थ; ' पाणी, भाजी, रामाची ' अशा दीर्घ ईकारांत शब्दांना ऱ्हस्वांत केलेलें पंतकवितेंत फारच क्वचित् दिसून येतें; ' नदी, वाणी ' सारख्या अगदीं संस्कृत शब्दांना तर नाहींच. तथापि फार फार पुढें गेले तर पंत याही सवलतीचा फायदा घेतील इतकें कबूल करितां येईल. परंतु इतर कवींना या सर्व सवलती म्हणजे कांहींच नव्हेत ! त्यांच्या स्वैर विहारास येथपासून नुकता प्रारंभ होतो. गुरु हा शब्द घेतला तर वर दिलेल्या नियमां-प्रमाणें त्याचें ' गुरुला ' असें रूप होऊं शकेल; परंतु 'गूरुला' असें करणें केवळ अशुद्ध होय. परंतु वामनपंडितादि कवि तसे बेलाशक करतील. उदाहरणार्थ—

असा मी त्या मातें **पुनित** करिशी तूं जननिये । वामन.
सदा सर्वदा देव **सन्नीध** आहे । रामदास.
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी । रामदास.
प्रियाची कथा **प्रीय** दामोदरासी । वामन, विराटपर्व ७. ५
उभा आड जेंवी **शशीमूख** राहो । वामन, विराटपर्व ७. ९.

याशिवाय प्रतीमा, संचीत, शीकवीलें, सूचवीलें वगैरे कित्येक अपप्रयोग वामनांच्या काव्यांत आढळतात.

कोणताही तत्सम संस्कृत शब्द वापरतांना तो संस्कृतांतल्या त्याच्या शुद्ध

स्वरूपांतच नेहमीं वापरला पाहिजे. पंतांचा याविषयीं नेहमीं कटाक्ष असलेला आढळतो व तें अगदीं योग्य आहे यांत शंका नाहीं. परंतु वामनपंडित व इतर कवि याविषयीं अगदीं बेफिकीर असलेले दिसून येतात. उदाहरणार्थ—

कैकेयीच्या ये गृहा **सानुरागें** । वामन.

बस तुं **मौन्यपणें** अथवा उगा । वामन.

घाली नेणुनि **शास्त्रषिद्ध** पुरुषा उच्छिष्ट देतां बळें । आनंदतनय.

यांतील अधोरेखित पदें व्याकरणदृष्ट्या चुकीचीं आहेत. विशेषतः समासांत तर या कवींचा निष्काळजीपणा फारच प्रत्ययास येतो. समासांतलीं अंतर्गत पदें ऱ्हस्वदीर्घांच्या दृष्टीनें बिनचूक असून सर्व समास संस्कृत व्याकरणाच्या दृष्टीनें शुद्ध असाच बनविला पाहिजे. परंतु या कवींनीं ऱ्हस्वदीर्घांची व अनुस्वार विसर्गांची बिलकुल तमा बाळगिलेली नसून निरंकुशपणें वाटेल तसे समास बनविले आहेत. ' धनुविद्या ', ' विधीअंड ', ' हरिगुणअनुवादी ', रवीचंद्र ', ' तमारी ' (तमः + अरि), ' माद्रिनंदन, ' ' योगीवरा, ' ' चमुउदधिमथोनि, ' ' रिपूकुळहुताशन, ' ' शशीमूख, ' हीं वामनपंडितांचें विराटपर्व थोडेंसें वरवर चाळून त्यांत आढळलेलीं उदाहरण दिलीं आहेत. यावरून त्यांच्या काव्यांत असलया अपप्रयोगांची किती गर्दी उडाली असेल याची कांहींशी कल्पना वाचकांस येईल. वामनपंडितांचे अनुयायी साम्राज्य वामन, अनंत, आनंदतनय वगैरे कवि यांचाही खाक्या अशाच तऱ्हेचा दिसून येतो. रामदासांच्या विषयीं तर बोलावयासच नको.

४. मोरोपंतांची कविता या सर्व प्रकारच्या अशुद्धतादोषांपासून अलिप्त आहे. ' शास्त्रपूतां वदेद्वाचम् ' या वचनास अनुसरून त्यांनीं आपली वाचा सर्वतोपरी शुद्ध ठेविली आहे याबद्दल त्यांस धन्यवाद देणें उचित आहे. कवींच्या सवलतीचे जे चार पांच नियम सांगितले आहेत त्यांच्या बाहेर जाऊन मर्जीस येतील तशीं रूपें त्यांनीं कधीं केलीं नाहींत. इतकेंच नव्हे तर त्या नियमांचाही आश्रय शक्य तितक्या थोड्या ठिकाणीं त्यांनीं केला आहे. संस्कृतांतून शब्द घेतांना व समास बनवतांना व्याकरणनियमांवरून रेंसभरही आपलें लक्ष त्यांनीं दूर केलें नसून जणूं काय आपण संस्कृतांतच काव्य रचतों आहोंत अशा जाणिवेनें प्रत्येक शब्द त्यांनीं जोखून वापरला आहे. या त्यांच्या भाषाशुद्धीविषयींच्या दक्षतेबद्दल आपण महाराष्ट्रीयांनीं त्यांचे सदैव ऋणी असलें पाहिजे.

कारण सध्यां निर्माण होणाऱ्या उच्च दर्जाच्या वाङ्मयांत भाषेची जी प्रशंसनीय शुद्धता आढळून येते तिचा उगम मोरोपंतांपासूनच झाला आहे. पंतांनंतरचे कवि रामजोशी यांच्या कवनांतही भाषाशुद्धि चांगली आढळते. त्यानंतर अर्वाचीन वाङ्मयाचा पाया घालणारे अव्वल इंग्रजींतले ग्रंथकार दादोबा पांडुरंग व परशुरामपंत गोडबोले हे पंतांच्या ग्रंथांचे मोठेच चहाते व अभ्यासक असून त्यांच्या ठायीं दिसून येणारी भाषाशुद्धीची चाड पंतकाव्यांच्या अवलोकनानेंच उत्पन्न झालेली होती. कृष्णशास्त्री चिपळूणकरांचाही पंतकवितेवर चांगला व्यासंग होता व विष्णुशास्त्री हे तर पंतांचे मोठेच अभिमानी होते. भाषाशुद्धीच्या बाबतींत या दोघांवरही पंतकवितेचा परिणाम झालेला आहे.

५. पंतकाव्यांतही फारच क्वचित्, कोठें तरी एकादा अपप्रयोग आढळून येतो, नाहीं असें नाहीं. असे अपाणिनीय शब्दप्रयोग इतके विरळ आढळतात कीं ते जमेस धरण्याच्या मुळींच लायकीचे नाहींत. तथापि ते आढळतात ही गोष्ट मात्र नमूद करून ठेवणें अवश्य आहे.

(१) देहप्राण **मनमर्ता**स्वजनस्त्रीसुतधनादिही प्रिय गमती । कृ. वि.२७. २६. (२) बहुराती **अपगेला** । कृ. वि. २८. १. (३) ' न सुतसुखरुचिद **धिग मीं** ' कृष्ण म्हणे । कृ. वि. ४५. २. (४) मी दासी तुझी **शीक्षिता** । कृ. वि. ६५. ३६. (५) मरती घडींत **शतशा** । मं. भा. ९. १५५. (६) तव वक्त्र**निशीन** कोमला । कुशलवचरित ८-१६. (७) चूकले । निं. पं ४ एवढींच उदाहरणें आमच्या आढळांत आलीं. आणखीही दहापंधरा ठिकाणें अशीं आढळतील असें मानलें तरी पंतांच्या काव्यविस्ताराच्या मानानें तीं कांहींच नव्हेत हें उघड आहे.

पंतांच्या भाषेतील आणखी कांहीं आक्षेपार्ह वाटणाऱ्या गोष्टी म्हणजे संकरसमास, नामधातु, संस्कृताच्या धर्तीवरचे वाक्यप्रयोग, यांची चर्चा येथें करीत नाहीं. कारण हे अपप्रयोग नसून त्यांनीं जाणून बुजून भाषेमध्यें प्रचलित करण्यासाठीं आणलेले नवीन प्रकार आहेत. पुढें यथास्थल त्यांचा विचार होईलच.

६. भाषाशुद्धीचें पहिलें व मुख्य अंग जी शब्दशुद्धि तिच्याविषयीं आतांपर्यंत विचार झाला. दुसरें अंग वाक्यशुद्धि हें होय. प्रत्येक वाक्य व्याकरणाच्या दृष्टीनें बरोबर असलें व त्याचा सुसंगत अर्थ होत असला म्हणजे तें वाक्य शुद्ध होय.

याच्या उलट स्थिति ज्या वाक्यांत असेल तें वाक्य अशुद्ध होय. ज्या लेखकाच्या भाषेंत अशीं अशुद्ध वाक्यें आढळतात त्याची भाषा वाक्यरचनेच्या बाबतींत अशुद्ध गणली पाहिजे. ही वाक्यशुद्धि आमच्या जन्या कवींच्या काव्यांत चांगली आढळते. शब्दांच्या शुद्धीच्या बाबतींत अत्यंत निष्काळजी असणारे वामनपंडित व त्यांच्या सांप्रदायांतील कवि यांच्या कवितेंत वाक्यरचनेच्या बाबतींत तितकें शैथिल्य आढळत नाहीं, ही लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. वाक्यरचनेच्या बाबतींत ज्यांना दोष दिला पाहिजे असे कवि म्हणजे ओंवीबद्ध रचना करणारे तिसऱ्या चौथ्या प्रतींचे कवि होत. शुभानंद वगैरे महाभारताच्या कांहीं पर्वांवर रचना करणारे कवि, त्याचप्रमाणें गुरुचरित्रकार सरस्वती गंगाधर यांच्या कवितेंत ही रचनेची अशुद्धता बरीच दिसून येते. पंतांची कविता याही बाबतींत अर्थात् निष्कलंक आहे हें सांगावयास नको. फार क्वचित् ठिकाणीं एखाद्या वाक्याची रचना मराठी व्याकरणनियमांस थोडीशी सोडून केलेली आढळते. पुढें वाक्यप्रयोगांचा विचार करतांना अशा स्थलांचा उल्लेख केला आहे.

[२]

पंतभाषेचें व्याकरणः स्वरूपदिग्दर्शन.

७. आतां पंतभाषेच्या व्याकरणाचें थोडेसें दिग्दर्शन करावयाचें. येथें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हें व्याकरणविषयक विवेचन पंतकाव्याच्या भाषेसच फक्त लागू पडणारें आहे. कोणत्याही काळीं सामान्य जनसमाजाच्या भाषेपेक्षां वाङ्मयाची भाषा जराशी निराळी व कृत्रिम असते, व वाङ्मयांतही गद्यापेक्षां पद्याची भाषा अधिक कृत्रिम असते. तेव्हां पुढील विवेचन पंतकाव्याच्या भाषेस व तिजमध्यें त्यावेळच्या सामान्य भाषेचें जितपत प्रतिबिंब पडलें असेल तेवढयासच लागू पडणारें आहे असें समजावें. पंतांचा काळ म्हणजे सुमारें दीडशें वर्षांपूर्वीचा, मराठी भाषेच्या उत्कर्षाचा काळ होय. या काळच्या मराठी भाषेचें सामग्र्यानें विवेचन करावयाचें झाल्यास त्यास भरपूर सामग्री उपलब्ध आहे, व तसा ग्रंथ अवश्य व्हावयासही पाहिजे. येथें फक्त पंतकाव्याच्या भाषेचें ऐतिहासिक दृष्टीनें शास्त्रीय विवरण करावयाचें आहे.

८. कोणत्याही भाषेच्या व्याकरणाचे मुख्य दोन विभाग पडतातः—१ शब्दसिद्धि, २ वाक्यसिद्धि. शब्दसिद्धि म्हणजे नाम, विशेषण, आख्यात, अव्यय

इत्यादि जातींच्या शब्दांचीं निरनिराळीं रूपें कशीं तयार करावयाचीं यासंबंधींचा विचार होय. वाक्यसिद्धि म्हणजे या तयार झालेल्या शब्दांचा वाक्यांत प्रयोग कसा करावयाचा याविषयींचा विचार होय. (अर्थात्, विभक्तींचे अर्थ, कारक व क्रियापदांचे प्रयोग या सर्वांचा या दुसऱ्या विभागांत समावेश होतो.) शब्दांच्या मुख्य जाती दोन–१ प्रातिपदिक व २ आख्यात. तेव्हां प्रथम या दोन्ही जातींच्या **शब्दांच्या रूपसिद्धी**विषयीं विचार करून मग **वाक्यसिद्धी**-संबंधानें उद्भूत होणाऱ्या कांहीं प्रश्नांचा विचार करून हें विवेचन संपवून टाकूं.

(१) प्रातिपदिक.

९. **नाम.** नाम, विशेषण, अव्यय या सर्वांचा '**प्रातिपदिक**' या संज्ञेमध्यें अंतर्भाव होतो. पैकीं नामांचा* प्रथम विचार करूं. नामांच्या रूपांविषयीं विचार करावयाचा म्हणजे अर्थात् विभक्तींचेंच विवेचन करावयाचें. तर तें आतां शक्य तितकें थोडक्यांत येथें करण्याचा यत्न करूं. मराठी भाषेंत विभक्ति किती व कोणत्या मानाव्या याविषयीं भाषाशास्त्रज्ञांमध्यें बराच मतभेद आहे. विशेषतः प्रथमा व द्वितीया आणि द्वितीया व चतुर्थी यांच्या परस्पर संबंधामध्यें तर फारच घोंटाळा व मतभेदही आहे.येथें वादग्रस्त प्रश्नांच्या भानगडींत न पडतां साधारणपणें सर्वांस समजेल व सर्व मतांच्या लोकांस मान्य होईल असें विवेचन करावयाचें असल्यामुळें जेवढ्या विभक्तींचीं भिन्न रूपें मराठींत होत असलेलीं स्पष्ट दिसतात तेवढ्यांचाच पुढें निर्देश केला आहे. व सर्व व्याकरणकारांनीं नमूद केलेले प्रत्ययही प्रत्येक विभक्तीच्या पुढें दिले आहेत.

विभक्ति.	**प्रत्यय.**
प्रथमा	
तृतीया ...	नें, ऐं, शीं (एकवचन); नीं, हीं, ई, शीं (अ. व.).
चतुर्थी (अगर द्वितीया)	स, ला, तें (ए. व.); स, ला, ना, तें (अ. व.).
पंचमी	ऊन, हून (ए. व.); ऊन, हून, (अ. व.).
षष्ठी	च [चा, ची, चें]; च [चा, ची, चें].
सप्तमी	त, ई, आं, (ए. व.); त, ई, आं (अ. व.).

शब्दांच्या रूपास कवितेमध्यें होणारी विकृति (उदा०, रामाहूनि रामासी येथील इकार) सोडून दिल्यास नामांचीं विभक्तिरूपें पंतभाषेंत सध्यांच्याप्रमाणेंच होत

* नामांमध्येंच सर्वनामांचाही अर्थात् अंतर्भाव केला आहे.

असत असें दिसून येतें. ज्ञानेश्वरकालीं अकारांत प्रातिपदिकांच्या प्रथमेच्या एकवचनाच्या अंतीं दिसून येणारा उकार (व ओकार) पंतकालीं अजीबात नाहींसा झालेला दिसून येतो. हा उकार ज्ञानेश्वरकालीं सर्वत्र प्रचारांत होता. एकनाथकालापर्यंत त्याचा प्रचार चांगला होता. पुढें मुक्तेश्वरांच्या काळीं तो बराच कमी होऊन रामदासवामनांच्या वेळेस बहुधा नाहींसाच झाला होता. ओकार मात्र क्वचित् दृष्टीस पडत असे. अर्थात् पंतांच्या भाषेंत हा उकार व ओकार आढळत नाहीं. द्वितीयेचे किंवा चतुर्थीचे प्रत्यय दादोप्रोक्त स, ला, तें व स, ला, ना, तें हेच होते. त्याचप्रमाणें दादोबांनीं सांगितलेले, तृतीयेचे प्रत्यय नें, एं, शीं; नीं, हीं, ईं, शीं; पंचमीचे ऊन, हून; षष्ठीचा प्रत्यय च (चा, ची चें) व सप्तमीचे त, ईं, आं हे सर्व प्रत्यय पंतांच्या काव्यांत सररास आढळून येतात. किंबहुना दादोप्रभृति व्याकरणकारांनीं सांगितलेले हे प्रत्यय चालू भाषेवरून सांगण्याचे ऐवजीं पंत व तत्कालीन कवींच्या भाषेवरूनच सांगितलेले दिसतात. चतुर्थीचा तें हा प्रत्यय त्याचप्रमाणें तृतीयेचे एं, हीं हे प्रत्यय, सप्तमीचे ईं, आं हे प्रत्यय चालू भाषेंत प्रचलित नसून पंतभाषेंत मात्र सररास उपयोजिलेले दिसून येतात. उदाहरणार्थ ' रामास-रामाला बोलाव ' असें आपण म्हणूं पण 'रामातें बोलाव' असें म्हणणार अगर लिहिणार नाहीं. सध्यांच्या कवितेच्या भाषेमधून सुद्धां ' तें ' हा प्रत्यय जात चालला आहे. परंतु पंतकालीं गद्यांत सुद्धां तो सररास वापरला जात असे. त्याचप्रमाणें तृतीयेचे एं व हीं हे अनुक्रमें एकवचन व अनेकवचन यांचे प्रत्यय व सप्तमीचे ईं व आं हे प्रत्यय सध्यां प्रचारांत नाहींत. ' रामें-रामांहीं काम केलें ' असें सध्यां आपण म्हणत नाहीं.' घरीं गेला ' 'गावीं गेला ' अशा कांहीं ठिकाणीं आपण ईं हा प्रत्यय योजितों तथापि तो सररास सर्व शब्दांस लाविला जात नाहीं. उदा० ' तो दुकानीं गेला, ' ' रस्तीं गर्दी आहे ' असें आपण म्हणत नाहीं. पंतांच्या काव्यांत हे सर्व प्रत्यय अनिर्बंधपणें वापरलेले दिसून येतात.

> **गळां** पडति ज्यांचिया तवगुणैकदेश**भ्रमें** ।
> **तिहीं** तुजचि दावितां भजति बा तुला **संभ्रमें** ॥

यांत तृतीयेचे एं व हीं, आणि सप्तमीचा आं, या प्रत्ययांचीं उदाहरणें आहेत. दादोबांनीं तृतीयेच्या अनेकवचनाचा **ईं** हा एक प्रत्यय सांगितला आहे. तो पंतकाव्यांतही फारच क्वचित् उपयोजिलेला आढळतो. त्याच एक उदाहरण—

जनीं न ज्ञात श्रीशुकगुरुचिया काय **कवनीं**। कृ. वि.७८.८.
जनीं–जनांनीं. कवनीं ही ईकारांत सप्तमी आहे.

तेव्हां चतुर्थी–तें; तृतीया–एं, हीं, शीं; सप्तमी–ई, आं; हे सध्यां प्रचारांतून बहुतांशीं जात चाललेले प्रत्यय पंतकालीं, विशेषतः पंतकाव्यांत, सररास वापरलेले दिसून येतात; व तृतीया अनेकवचनाचा ई हा प्रत्यय अगदीं विरळ आढळतो–असा एकंदरीनें निष्कर्ष विभक्तिप्रत्ययांविषयीं सांगतां येईल.

वरील प्रत्ययांपैकीं ' स ' यास शेवटीं इकार (ऱ्हस्व अथवा दीर्घ) जोडण्याची पंतांची व सर्वच कवींची पद्धत आहे. ' ऊन, हून ' हे प्रत्यय लागून होणाऱ्या शब्दांसही हा इकार जोडण्यांत येतो. उदा०—' गळती **नेत्रांतूनि** प्रेमाश्रुजळें फुलें **शिराहूनि**।' मं. भा. १०,१६९. या ' ऊन, हून ' प्रत्ययांची व्याप्ति मराठींत फारच मोठी आहे. ते नामांस, विशेषणांस, व धातुसाधितांसही लागतात. ते नामास लाविले म्हणजे त्यांचा पंचमीसारखा अर्थ होतो म्हणून दादोबांनीं त्यांना पंचमीचे प्रत्यय मानिलें आहे. असो. त्यांची विशेष चर्चा येथें करितां येत नाहीं.

वर सांगितलेला इकार ' स ' प्रत्यायास क्वचित् तत्कालीन गद्यांतही लाविलेला दिसून येतो. 'स्वामीचे **सेवेसी**' हें त्या प्रचाराचें, सध्यांपर्यंत टिकून राहिलेलें, पत्रांच्या मायन्यांतलें एक प्रसिद्ध उदाहरण होय.

खालीं पंतांच्या व विठोबा ताहराबादकरांच्या पत्रांतले दोन उतारे दिले आहेत, त्यावरून वर सांगितलेले सध्यांच्या गद्यांत प्रचारांत नसलेले प्रत्यय त्यावेळीं कसे प्रचारांत होते हें दिसून येईल—' भवानीमनुष्या**हातीं** पुस्तक पाठविलें (तें) पावोन समाधान झालें...ती (आज्ञा) **मस्तकीं** धरून यावयाच्या **उद्योगातें** करितों....श्रीमंत जों **गृहीं** असतात पर्जन्यकाळीं तों आपलाही समाज **श्रीक्षेत्रीं**...यांस सोडून यावें तरी यांच्या चित्तानुकूलतेंकरून **अशास** तुमच्या कृपेनें घडेल तें पहावें. '–पंतांचें पत्र. (मो. च पृ. १३०). ' स्वामीच्या **शेवेशीं**...स्वामींच्या **आशीर्वादें** सर्व मंडळी सुखरूप असे. यानंतर **श्रीगुरूंहीं** निरंतर कृपा करून **पत्रद्वारें** सेवकांस संतोषवीत असावें... म्यां ते **पायांसी** विनंती केली होती कीं...इ० इ० '—ताहराबादकरांचें पत्र. (मो. च. पृ. १४१).

१०. सध्यांच्या प्रचाराहून निराळीं अशीं स्त्रीलिंगी नामांचीं प्रथमेच्या

अनेकवचनाचीं रूपें कधीं कधीं पंतकाव्यांत दृष्टोत्पत्तीस येतात. ' स्त्री ' या शब्दाचें अनेक वचन ' स्त्रिया ' असें न करितां ' स्त्री ' असेंच पंतांनीं कित्येक ठिकाणीं केलें आहे. उदा०—' **स्त्री** म्हणती अक्रुरा तुझें तळपट हो । ' कृ. वि. ३९. १९. ' **स्त्रीही** हांसति । ' कृ. वि. ७५. २०. त्याचप्रमाणें शिंप याचें ' शिंपा ' असें अनेकवचन न करितां ' शिंप्या ' असेंही केलेलें आढळतें.—' त्या **शिंप्या** न तो सावडी । ' कृ. वि. ७४. २६. ' स्त्री, सासू ' वगैरे नामांचीं इतर विभक्तींचीं रूपेंही सामान्यरूप न करितां ' स्त्रींत ' ' सासूनें ' अशीं केलेलीं पंतकाव्यांत कोठें कोठें दिसून येतात. उ०—' सकळा स्त्रींत बरी ' कृ. वि. ३०. ४८. सप्तमीचा ई हा प्रत्यय स्त्रीलिंगी आकारान्त नामांना कधीं लागत नाहीं. परंतु तो ' रसा ' (पृथ्वी) या शब्दास पंतांनीं एकदां लावला आहे.—' सेवाया योग्य सुरस तो **रसिं** कानीं ' कृ. वि. १२. २. हें ' रसिं ' असें रूप वृत्ताकरितां व यमकाकरितां पंतांनीं मुद्दाम केलें आहे हें उघड आहे. याचप्रमाणें वृत्तयमकांच्या जरूरीकरितां आणखीही कोठें कोठें नियमबाह्य रूपें पंतांनीं केलेलीं दिसून येतात. उदा०— वैरिला (वैऱ्याला) कृ. वि. ७८. ९. त्याहीं, ज्याहीं यांच्याबद्दल ' तिहीं ' ' जिहीं, ' तसेंच वासरा याच्याबद्दल ' वासरुवा ' (मं. भा. ४. ११७) अशीं रूपें कोठें कोठें आढळतात. अशा रूपांत बहुधा सामान्यरूप प्रचलित पद्धतीहून कांहीं भिन्न तऱ्हेनें केलेलें आढळतें. वरील उदाहरणांत ' वैऱ्या ' ' त्या ' असें सामान्यरूप व्हायचें त्या ऐवजीं ' वैरि ' ' ति ' असें केलें आहे. सामान्य भाषेच्या दृष्टीनें अशीं रूपें चूकच होत. कवितेंत देखील अशीं रूपें सहसा योजूं नयेत. पंतांनींही असे प्रकार अगदीं विरळ, नडल्या ठिकाणींच केले आहेत.

११. त्याला, त्याचा याबद्दल तयाला, तयाचा; राजानें, भरंवशानें यांबद्दल राजयानें, भरवसियानें (मं. भा. ९. १६८); प्याला, भ्याला यांबद्दल पियाला, भियाला–अशीं रूपें करण्याचें कवींना सर्वांच्या संमतीनेंच अनुज्ञापत्र मिळालेलें आहे. अर्थात् पंतांनीं अशीं रूपें मर्जीनुरूप सर्वत्र केलीं आहेत हें सांगावयास नको. याशिवाय रूपें सध्यांच्या प्रचारांतलीं तींच, परंतु लिहिण्याची अगर उच्चाराची पद्धत थोडीशी निराळी असेंही पुष्कळ शब्दांच्या बाबतींत दृष्टीस पडतें. स्त्रीलिंगी 'ती, ही'च्या ऐवजीं 'ते, हे' अशीं रूपें करण्याचा प्रघात फार जुना आहे. अजूनही त्याचा अवशेष ' कळावें हे विनंती ' ह्या, पत्रांच्या समाप्तिदर्शक माय-

ण्यांत दिसून येतो. पंतांच्या काव्यांतही हा प्रकार मधून मधून दिसून येतोच. उदा०—'उक्ति मनिं धरी गा हे।' मं. भा. १०. ८९. '**होहि** युक्ति बरी।' मं. भा. १०. ९५. 'मूर्ति गळा **ते** जाची, **जे** खनि अनलादिकाखिला तेजाची' कृ. वि. ११. २५. याचप्रमाणें ज्या, च्या या वर्णांच्या जागीं शब्दाच्या रूपांत जा, चा असें लिहिण्याची प्रवृत्ति पंतांच्या काव्यांत, सर्वत्र नाहीं, परंतु कांहीं ठिकाणीं दिसून येते. उदा०—'भव्य विषय **जांत**' मं. भा. ३. १०२. '**सुधर्मेचा** ठायीं'। कृ. वि. ७५. १७. परंतु कित्येक स्थळीं याच्या उलट, 'जा, चा' यांच्या ऐवजीं ज्या, च्या लिहिण्याची पद्धतही पंतांनीं अवलंबिलेली दिसते.—'घोकवितां **च्यार** मास' मं. भा. ५. ४२. 'तो चित्रकेतु गा **राज्या!**' मं. भा. ६. १८४. हीं रूपें म्हणजे लेखनाच्या निराळ्या पद्धतीमुळें थोडींशीं भिन्न वाटणारीं अशीं होत. अशी लेखनाच्या पद्धतीची भिन्नता आणखीही कित्येक बाबतींत दिसून येते. श बद्दल स, (**सिकविलें, मासी, सेत** इ०), ल बद्दल ळ (**वळ, खळ, मळ** इ०), असे कित्येक वर्ग बदलून लिहिण्याची पंतांची चाल आहे. असो. पंतांच्या लेखनपद्धतीविषयीं येथें विशेष विस्तार करण्याचा उद्देश नाहीं.

१२. चतुर्थीचे प्रत्यय न लावतां नुसतें नामाचें सामान्यरूप योजून चतुर्थी विभक्तीचें काम भागविण्याची आणखी एक सवलत कवींस देण्यांत आलेली आहे. इतर सर्व कवींप्रमाणें पंतांनींही या सवलतीचा आपल्या काव्यांत उपयोग करून घेतला आहेच उदाहरणार्थ —'**वासरुवाहि** न पाजी' मं. भा. ४. ११७. 'भगवंत **शंखचूडा** मारुनि तन्मूर्धरत्न रामातें। अर्पी' मं. भा. १०. ४२१. 'विद्वत्संन्यासिवेषा नट धरि' कृ. वि. ७८ १८. 'प्रभु दयमान सहाय **स्वजना**' कृ वि. ४९. २३. अशीं उदाहरणें पंतकाव्यांतून शेंकडों काढून देतां येतील हें उघड आहे. सामान्यरूपाच्या या प्रचारासंबंधानें एक महत्त्वाची गोष्ट मात्र लक्षांत ठेवण्याजोगी आहे. पूर्वींच्या एकनाथ, मुक्तेश्वर वगैरेंच्या ग्रंथांत प्रातिपदिकांचें सामान्यरूप (व पुष्कळ वेळां मूळरूपसुद्धां) **कोणच्या वाटेल त्या** विभक्तीच्या अर्थीं वाक्यांत योजलेलें आढळतें. पुढें संस्कृतशब्दप्राचुर्याची चर्चा करितांना मुक्तेश्वराच्या कवितेचें जें अवतरण घेतलें आहे (पहा, विभाग ७ परिच्छेद ८) त्यांत '**उदधी** डोलतां मंदरागिरी।' असें वाक्यखंड आहे. तेथें 'उदधी' हें पद सप्तम्यंत असून त्याचा अर्थ 'उदधींत' असा आहे. त्याचप्रमाणें मागें पृ. ३७ वर एकनाथी भागवतांतला

उतारा घेतला आहे त्यांत 'निज **आवडी** वाडेंकोडें । वानितां भक्तीचे पवाडे ।' याच्यामध्यें 'आवडी' हें पद तृतीयान्त असून त्याचा अर्थ 'आवडीनें' असा आहे. 'मदें मत्सरें सांडिला **स्वार्थबुधी** ।' (मनाचे श्लोक ५१) येथील ' स्वार्थबुधी ' याचा अर्थ ' स्वार्थबुद्धीनें ' असा आहे. अशा रीतीनें जुन्या कवितेंत प्रातिपदिकाचें मूळरूप अगर सामान्यरूप, कोणत्याही विभक्तीचें कार्य करूं शकतें. पंतांच्या काळीं हा महत्त्वाचा प्रचार नाहींसाच झाला होता. प्रातिपदिकाचें मूळ रूप तर पंतकाळीं असें योजिलें जातच नव्हतें, व सामान्यरूपाचाही फक्त चतुर्थीच्या अर्थीच उपयोग केला जात होता.

१३. सामान्यरूप करण्याची पंतांची रीत सध्यांच्या भाषेप्रमाणेंच आहे, ' आ, ' ' या ' व ' ए ' अशा तीन प्रकारांनीं होणारीं, ' रामास, ' ' घोड्यास,' व ' मातेस ' या शब्दांत अनुक्रमें दिसून येणारीं, जीं तीन सामान्यरूपें कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं सांगितलीं आहेत तींच पंतकाव्यांत दिसून येतात. जयाला, तयाला, राजयानें, गडियांस, वासरुवास, भरवसियानें अशीं जीं सामान्यरूपें कोठें कोठें आढळतात तीं सवलतीदाखल, वृत्तादिकांच्या जरूरीसाठीं केलेलीं होत हें वर सांगितलेंच आहे. सामान्यरूपांच्या बाबतींत मराठी भाषेंत ज्ञानेश्वरकालापासून आजपर्यंत पुष्कळच महत्त्वाचे फेरफार होत आलेले आहेत. त्यांचें शोधपूर्वक विवेचन करून त्यांवर स्वतंत्रच निबंध लिहिण्याजोगा आहे. येथें पूर्वीच्या ग्रंथांतील सामान्यरूपाचे कांहीं मासले देतों—**ज्ञानेश्वरी;** (१) का जे **लळेयाचे** लळे सरती । ९.३. (२) **तुमचेया दिठिवेयाचिये** बोलें । ९.४. (३) **जेयां जिया** अक्षौहिणी । १.१२२. हीं रूपें सध्यांच्या भाषेंत लळ्याचे, तुमच्या, दिठिवेच्या, ज्यां(ना), ज्या,-अशीं होतील. **एकनाथ;** –तेथ **गुणेशीं** उपमा उपडे । **भेदेशीं** वाद बुडे ॥ हे सर्व प्रकार पंतकालीं अस्तंगत झाले होते.

१४. विशेषणें. आतांपर्यंत नामांविषयीं निरनिराळ्या बाजूंनीं विचार केला विशेषणांविषयीं पंतभाषेंत विशेष कांहीं लिहिण्याजोगें आढळत नाहीं. एकच विशिष्ट प्रचार पंतांच्या भाषेंत आढळतो त्याचा उल्लेख करून पुढें जाऊं. आपल्या चालू मराठींत विशेषणांविषयीं सामान्य नियम असा आहे कीं, विशेष्याच्या लिंगवचनविभक्तीप्रमाणें विशेषणाचें रूप बदलत नाहीं; तर तें अविकृत असेंच राहतें. फक्त आकारान्त विशेषणें तेवढीं विशेष्याच्या लिंगवचनांस अनुसरून बदलतात व विशेष्याची प्रथमेतर विभक्ति असल्यास त्यांचें सामान्यरूप होतें. जसें— चांगल्या घोड्यास, काळीं वांगीं इ०. पंतांच्या भाषेंतही सर्वत्र बहुतेक याच

नियमास अनुसरून रूपें केलेलीं दिसतात; परंतु कित्येक ठिकाणीं मात्र, विशेष्याच्या लिंगवचनविभक्तीचे सर्व विकार विशेषणांस होण्याचा जो संस्कृत भाषेचा प्रचार त्याचा पंतांनीं अवलंब केलेला आढळतो. म्हणजे विशेषणाला तसेंच अविकृत न ठेवतां विशेष्याप्रमाणें त्याचीं विभक्तीचीं रूपें करून तीं पंत योजितात. उदाहरणार्थ--

१. नृप अंबरीष होता तो बहुमत फार हरिस **अरिदास** । मं. भा. ९.५८.
२. त्याची सुता सुकन्या तेजें **वल्मीकबिलगतें** पाहे । मं. भा. ९.२७.
३. वचनें **करूणें** न गणी । मं. भा. ४.१३७.
४. ते नंदयशोदोद्भव रात्रीला नेणतीच **सरलीला** । मं. भा. १०.५८९.
५. देहिहित नित्यकर्मेचि; कर्में **काम्याभिचारिकें दुष्टें** ।
सेवूं नयेत, जैसीं कीं भस्में **पुष्टिनाशकें** पुष्टें ॥ मं. भा. ११.३०६.
६. **विलासवतीनें** सवतीनें । कृ. वि. ३०. २५.

खालील उदाहरणांत विशेषणांचें सामान्यरूपच केलें आहे परंतु तें भाषेच्या नियमाप्रमाणें करूं नये अशा ठिकाणीं केलें आहे.—

१. भेटे हरि, परि टाचें पुण्य **खळा कंसकिंकरा** परिटाचें। कृ.वि.४१.१५.
२. भी **जडाहि** परिटा कीं । मं. भा. ९.१६२.

खळ, कंसकिंकर व जड हीं आकारान्त विशेषणें नसल्यामुळें त्यांना विकृति करण्याची जरूरी नव्हती. खालील उदाहरणांत दोन्ही नामेंच असून समानाधिकरण आहेत. अशा ठिकाणीं संस्कृतांत अर्थात् दोघांचीं विभक्तिरूपें करितात. मराठींत तसें करण्याची पद्धत नाहीं; परंतु पंतांनीं तसें केलें आहे.--

१. वारिद सुज्ञानाचा श्रीगाधिज **चातकीं नृपीं** वळला । मं.भा.९.१०६.
२. माथि कामशर जया **त्या** राम म्हणे **साधुमोक्षसत्पथिका***कृ.वि.८६.१३.

१९. संस्कृतांतून जीं विशेषणें मराठींत घेतलीं जातात तीं स्त्रीलिंगी नामांना लाविलीं असतां त्यांचीं संस्कृत व्याकरणांतले स्त्रीप्रत्यय लावून स्त्रीलिंगी रूपें करण्याची मुळींच पद्धत नाहीं. 'अलंकारयुक्त भाषा सुशोभित दिसते' असें आपण म्हणतों. 'अलंकारयुक्ता भाषा सुशोभिता दिसते' असें म्हणत नाहीं. परंतु संस्कृत विशेषणांचीं स्त्रीलिंगी रूपें पंत नेहमीं संस्कृताच्या धर्तीवरच करतात. जसें--

---

*पराडकरी प्रतींत हा शब्द चुकीचा छापून त्याचा अर्थही चुकीचा दिला आहे.

१. अळंकारें **युक्ता** रघुपतिकथा शोभत असे
अळंकारें **हीना** जरि म्हणति कोणी न विलसे । मं. रा. उपसंहार.

२. प्रभुच्या प्रादुर्भावीं झाल्या **विमला** दिशा, प्रजा **मुदिता** । वा. च. १७.

३. माळा **पुष्पमयी**...ती **शीता** परि...**तापदा** । कृ. वि. ६२. ३१.

हा सर्व प्रकार, संस्कृताचें अनुकरण करून संस्कृतांतील भाषाप्रचार शक्य तितके मराठींत आणण्याच्या प्रवृत्तीचा परिणाम होय. संस्कृत भाषेच्या अशा अनेक तऱ्हा मराठींत आणण्याचा पंतांनीं प्रयत्न केला आहे. त्याचें हें केवळ पहिलें दिग्दर्शन होय. यापुढें आणखी असे कित्येक प्रकार आपल्या दृष्टीस पडतीलच.

१६. विभक्तींचा अर्थ. ' स ' हा जो चतुर्थीचा प्रत्यय आहे त्याचा उपयोग जुन्या वाङ्मयांत फार व्यापकपणानें केलेला आढळतो व त्याचे अर्थही जरूरीप्रमाणें निरनिराळे होत असलेले दिसतात. नेहमींच्या द्वितीया चतुर्थीच्या अर्थांशिवाय ' साठीं ' या अव्ययाच्या अर्थासारखा त्याचा अर्थ पुष्कळदां होत असतो. पंतकाव्यांतही हा ' स ' अशा निरनिराळ्या अर्थी योजिलेला आढळतो. —' **त्यास** आलों असों गा ! ' कृ. वि. ६६. १४. येथें, 'त्यास – त्या कामासाठीं' असा अर्थ आहे.'ब्रह्मांडांचीं शतें **ज्यासि** लघु असें सुख शौरी दे' कृ. वि. ६३. ३५. येथें, ज्यासि—ज्याच्यापेक्षां, ज्याच्या तुलनेनें. मागें पृ. २६४ वर पंतांच्या पत्रांतला उतारा दिला आहे त्यांत–' **अशास** तुमच्या कृपेनें घडेल तें पहावें ' असें वाक्य आहे. त्यांत ' अशास—अशा स्थितीमध्यें ' असा अर्थ आहे.

१७. अव्ययें. कित्येक अव्ययांचे अर्थही पंतकाव्यामध्यें सध्यांच्या पेक्षां भिन्न असलेले दिसून येतात. **वरी** (ज्ञानेश्वरकालीन वेऱ्हीं)-पुरतें, पर्यंत; जसें– ' पाजी जनासि अमृत **धणिवरी** ' कृ. २५. ४०. **परि, परिस** या अव्ययाचा अर्थ पंतकाव्यांत नेहमीं 'पेक्षां' असा होतो, ' सारखा, सदृश ' असा कधीं होत नाहीं. उदाहरणार्थ–' कीं, **बहुतांपरि** सकळा स्त्रींत बरी, जाणत्यें **तयापरिस** कळा.' कृ. वि. ३०.४८. ' केला विस्तीर्ण **रसातळापरिस** गळा ' मं. भा. ६. १२० ' मोटें भाग्य तुझें त्या प्रह्लादाच्या **परीसही** धर्मा ! ' मं.भा. ७.१५६. **स्तव**–याचा अर्थ ' साठीं ' ' कारणें ' असा सर्वत्र होतो. परंतु पंतकाव्यांत त्याचा ' मुळें ' असाही क्वचित् केलेला दिसतो –' त्या सर्वांचा पति **जस्तिव** शक्ति तूं मला दे ही. ' मं. भा. ७.१९. जिच्यामुळें मी सर्वांचा पति

होईन अशी शक्ति तूं मला दे, असा येथें अर्थ आहे. कीं हें नेहमींचें कारणबोधक अव्यय आहे. परंतु केव्हां केव्हां तें ' आणि ' या अर्थी योजिलेलें आढळतें.--' जाणें मीं दास योगमायेतें कीं भगवान् भव ' मं. भा. २.९६. ' अंगें स्वसख्याचीं कीं निववाया आपुलीं परिष्वंगें ' मं. भा. १.५१. या दोन्ही ठिकाणीं कीं याचा 'आणि' असा अर्थ आहे.

(२) आख्यात व धातुसाधित.

१८. आख्यातें (क्रियापदें). प्रातिपदिकांविषयीं विचार झाला. आतां क्रियापदें व धातुसाधितें यांविषयीं विचार करूं. पैकीं क्रियापदांविषयीं विचार करूं जातां पंतभाषेंत व चालू भाषेंत कांहीं फारसा फेर आढळून येत नाहीं. भाषाशुद्धिप्रकरणांत कवींच्या सवलतींचे जे नियम दिले आहेत त्यांप्रमाणें होणारे फेरफार सोडले असतां क्रियापदांचीं सर्व रूपें चालू भाषेंतल्या प्रमाणेंच होतात असें दिसून येतें. तेव्हां सर्व काळांच्या निरनिराळ्या रूपांविषयीं चर्चा करीत न बसतां ज्या कांहीं लक्षांत ठेवण्याजोग्या गोष्टी पंतभाषेंत आढळतात त्यांचा उल्लेख करून पुढें जाऊं.

चालू भाषेंतील रूपांहून फारशीं निराळीं नसलेलीं परंतु लिहिण्याच्या भिन्न पद्धतीमुळें निराळीं दिसणारीं अशीं रूपें पंतकाव्यांत बरींच आढळतात. त्यांचा प्रथम उल्लेख करूं. सध्यांच्या भाषेंत ऊकारान्त लिहिलीं जाणारीं कित्येक रूपें पंत ओकारान्त लिहितात आणि याच्या उलट सध्यां ओकारान्त असणारीं ऊकारान्त लिहितात. आज्ञार्थाचीं प्रथमपुरुषी रूपें आपण सांगूं, जाऊं, करूं, अशीं करतों तर पंत तीं सांगों, जावों, करों अशीं करतात. जसें—' सुज्ञांची मर्यादा किति सांगों ' मं. भा. ९. १६२ ' नको हालों ' मं. भा. १०. २२४ ' शर्मी लोक पडों द्या ' कृ. वि. ८९. ९६. परंतु आज्ञार्थाचीं तृतीयपुरुषी रूपें मात्र ' तो करो ' ' ते करोत ' अशीं ओकारान्त न करतां ' तो करू ' ' ते करूत ' अशीं करतात. उ०—' तो मित भावू ससा ' कृ. वि. ७७. २२. ' टाकू कर्णमुखें पिवू जन सुखें शुद्धामृता मद्यशा । ' कृ. वि ७२. ४. त्याचप्रमाणें तर्पू, होऊ, करू, लावू इ०. वृत्ताकरितां हा ऊकार कधीं कधीं ऱ्हस्वही केला जातो. उ०—' करुत कृपा बहु सुकवी ' कृ. वि. १. ४. अगदीं क्वचित्, सध्यांच्या प्रमाणें ओकारान्त अशींही रूपें सांपडतात. उ०—' तो मेघ वर्षो पळ ' कृ. वि. ६७. १९. ऊकाराबद्दल ओकार करण्याची प्रवृत्ति ' ऊन '

प्रत्ययान्त धातुसाधितांमध्येंही दिसून येते. उ०— म्हणोन, बोळोन, फुंकोन इ०. कित्येक शब्दांमध्यें उ बद्दल वु व इ बद्दल वि लिहिण्याचीही प्रवृत्ति दिसून येते. उ०—भावू, होवू, पिवून, खावून. विंगळाला (इंगळाला) इ० या सर्व जुन्या काळांत प्रचलित असलेल्या लेखनपद्धतीच्या तऱ्हा आहेत.

वर्तमानकाळीं स्त्रीलिंगी एकवचनाचीं रूपें आपण सध्यां 'मी खातें' 'ती खाते, दिसते' अशीं करतों व पंतही बहुधा तशींच करतात. पण क्वचित्, 'तींच अधरामृत पीती', 'वक्षःस्थळींच वसती', 'आपण आकंठ रस सेविती', (मं. भा. १०. ११५९, ६०); 'जी स्थिति दिसती' (मं. भा. ११. ३८); 'पावती' (भी. भा. ५५)--अशीं देशस्थी वळणाचीं रूपें पंत योजितात. कोठें कोठें 'अधराचा परमरस पितये' (कृ. वि. ३०. ३६) 'जाणतये बळा' (कृ. वि. ३०. ४८) 'चिंता वितयें, चिंतामणींस आठावितयें' (कृ. वि. ४९. १७), अशीं कोंकणस्थी रूपेंही त्यांच्या काव्यांत दिसून येतात. हीं दुसऱ्या तऱ्हेचीं रूपें कृष्णविजयामध्यें दिसून येतात व पहिल्या प्रकारचीं देशस्थी रूपें मंत्रभागवतांत विशेष आढळून येतात हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. यावरून पूर्ववयांत पंतांच्या भाषेवर कोंकणी उच्चारांचा पगडा होता व उत्तरवयांत, बारामतीस बरींच वर्षें काढल्यानंतर त्यांचे उच्चार देशस्थी बनले असें अनुमान निघण्याजोगें आहे. परंतु त्या दृष्टीनें त्यांच्या काव्यांचें बारकाईनें निरीक्षण केल्याशिवाय त्या अनुमानाच्या खरेपणाविषयीं खात्री देतां येण्याजोगी नाहीं.

१९. केवळ उच्चारांत फरक नसून भिन्न प्रत्ययांनीं व भिन्न प्रक्रियेनें साधलीं गेलेलीं अशीं रूपें पंतकाव्यांत फारच थोडीं दृष्टीस पडतात. त्यांपैकीं 'हो' या धातूचीं रूपें विशेष लक्षांत ठेवण्याजोगीं होत. 'होवीस' 'होयास' 'होया' हीं रूपें, विशेषतः त्यांतील शेवटचें रूप, पुष्कळच ठिकाणीं आढळतें. होवीस= व्हावीस, ह्वीस (पाहिजेस); उ०--' तूं मनींच होवीस ' मं. भा. ५, ४२. ' आम्हांसि तूंचि होवीस ' मं. भा. १. ३. ' होया ' याचा अर्थ होण्यास, व्हावयास, असा केला जातो. उ०--' साधूंसि गावया होया ' भीष्म ३. ४४. ' मोद माझ्याहि हृदया होया ' कृ. वि. २३. २४. ' स्वास्थ्य शीघ्र होया ' कृ. वि. २५. २६. याशिवाय ' ले ' धातूचें ' लेया ' असेंही एक रूप आढळतें. ' हरिपदधूळिचे लव लेया ' कृ. वि. ३०. १८. लेणें म्हणजे घेणें, अर्थात् लेया म्हणजे घेण्यासाठीं, असा अर्थ होय.

आज्ञार्थी द्वितीय पुरुषाचें एकवचन करण्यास मराठींत प्रत्यय लावावा लागत नाहीं. धातूचें मूळरूप तेंच द्वि. पु. चें एकवचन होतें. जसें—कर, जा, ये इ०. परंतु पंतभाषेंत क्वचित् 'एं' प्रत्यय लागून हें रूप तयार होतें. उ०—'अमृता ! तूं यापुढें जडा ! **लाजें** ' मं. भा. ७. १.

'न' चा व धातूचा संधि करून नकारात्मक रूपें करण्याची प्रवृत्ति मराठी कवितेंत सर्वत्र आढळते. अर्थात् पंतकाव्यांतही ती दिसून येतेच. हा न बहुतेक स्वरांनीं प्रारंभ होणाऱ्या धातूंसच लागतो. उदा०--मं. भा.- नुचली. ६. ११६, नुरावया. ७. १४०. नैकति, ९. २५०. नुतरित्यें, १०. १४०. नुघडितां, १०. ४५१. कांहीं थोड्या व्यंजनादि धातूंसही हा 'न' लागतो, तेव्हां धातूच्या पूर्वी 'ए' अगर 'ओ' असा आगम होतो व धातूचीं रूपें अनियमित होतात.--नेदून, मं. भा. २. ९; नोहे, मं. भा. २. ५.

२०. आतां भाषेच्या इतिहासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाच्या अशा व्याकरणविषयक गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. आपल्या चालू मराठी भाषेंत क्रियापदांची रूपसिद्धि अगदीं अपुरी व अडचणीची आहे. वर्तमानकाळीं धातूंचीं कर्मणि रूपें होऊं शकत नाहींत व भूतकाळीं धातूंचीं कर्तरि रूपें करतां येत नाहींत. वर्तमानकाळीं कर्मणि रचना करावयाची झाल्यास सहाय क्रियापदें घेऊन कसा तरी वेडावांकडा प्रयोग करावा लागतो. 'तो काम करतो' याचें कर्मणि 'त्याच्याकडून काम केलें जातें' असें करावें लागतें. आणि या वाक्याचाही अर्थ कर्मणीसारखा असला तरी व्याकरणदृष्ट्या प्रयोग कर्तरीच रहातो. हा मराठी भाषेचा लंगडेपणा पूर्वींच्या काळीं नव्हता. जुन्या मराठी भाषेंत, निदान कवितेच्या भाषेपुरती तरी, 'ज' प्रत्यय लावून धातूंचीं कर्मणिरूपें करण्याची प्रक्रिया सररास चालू होती व या कर्मणि रूपांबरोबरच 'ज' प्रत्यय लावून धातूंचीं विध्यर्थी रूपेंही होत होतीं. सकर्मक धातूंच्या कर्मणिबरोबर अकर्मक धातूंचीं 'भावे' रूपेंही अर्थात् होत होतींच. 'राम काम करतो' या कर्तरि वाक्याचें 'रामानें काम करिजेतें' असें सरळ कर्मणि रूपांतर होत असे व 'रामें काम कीजे' म्हणजे 'रामानें काम करावें' अशा प्रकारचीं विध्यर्थी रूपेंही होत होतीं. हा प्रकार सरसकट भाषेंत कितपत चालू होता हें सांगतां येत नाहीं; परंतु तो कवितेंत अगदीं अनिर्बंध रीतीनें चालू होता यांत मात्र संशय नाहीं. पंतांच्या कवितेंतही या कर्मणि व विध्यर्थी रूपांचा प्रचार चांगला दृष्टीस पडतो; तो त्यांच्या

चेळेस बंद पडत चालला होता असें मुळींच दिसत नाहीं. मग त्यांच्यानंतर थोड-क्याच अवकाशांत तो बंद पडण्यास काय कारण झालें हें समजत नाहीं. इंग्रजी झाल्यानंतर जी ग्रंथरचनेस व काव्यरचनेस सुरवात झाली त्यांत हा प्रचार दिसून येत नाहीं. असो. पंतकाव्यांतील या प्रकाराचीं काहीं उदाहरणें देऊं म्हणजे हीं 'ज' प्रत्ययघटित रूपें कशीं केलीं जात असत व त्यांचा वाक्यांत कसा प्रयोग होत असे हें नीट लक्षांत येईल. **कर्मणिः**—'पूर्णाचि अमा त्याहीं **करिजेत्ये** अंधभूपति-अमात्याहीं' कृ. वि. ४. २०. अंध राजाच्या अमात्यांकडून जिकडे तिकडे अमावास्येसारखा घोर अंधार, अंदाधुंदी करण्यांत येते, असा भावार्थ. '**करिजेल** काय तांशिला पुत्रें ?' कृ. वि. ९.९. '**भजिजेतें** कंज बांधि तरि कां गा तां' कृ.वि. ४७.३५. कंज (कमल) बांधि तरी तां (तुझ्याकडून) कां भजिजेतें (भजलें जातें) ? '**गणिजेल** यमोग्ररोष कां पतितें ?' मं. भा. ६. ४. 'जो सुखभोग दुर्लभ सुरां तो **सेविजेतो** जनें' कृ. वि. ६९. २. या उदाहरणांवरून अगदीं संस्कृताप्रमाणें हीं रूपें कशीं नियमित व व्यवस्थित होतात हें दिसून येतें. संस्कृतांतल्या 'य' प्रमाणें व त्या 'य' पासूनच निघालेला 'ज' मूळ धातूला लागून त्याचे कर्मणि रूप तयार होतें व इतर धातूंप्रमाणेंच या कर्मणि धातूंचीं सर्व कालीं, सर्व पुरुषीं रूपें होतात. कर्त्याची तृतीया विभक्ति होते व कर्माची प्रथमा होते. हीं कर्मणि प्रयोगाचीं विशिष्ट अंगें वरील सर्व उदाहरणांत एकजात दिसून येत आहेत. पुढील उदाहरण **भावे** प्रयोगाचें आहे.—'**गळिजेलें** कुलपानीं' कृ. वि. ३.१९. येथील गळणें हें क्रियापद अकर्मक आहे 'कुलपें गळालीं' याचें 'गळिजेलें कुलपानीं' हें सुरेख भावे रूपांतर आहे. **विध्यर्थः**—'घनपवनांसि-हि न **भिजे**' कृ. वि. २५. २६. न भिजे=न भ्यावें 'या सिंधुमग्न पुत्रा **म्हणिजे**,' कृ. वि. ४१. ४८. म्हणिजे=म्हणावें. '**आठविजे** काय दुजें या घोषीं ?' कृ. वि, ४७.७. आठविजे=आठवावें '**त्यजिजे** आंगणें...हृतधना गणिकांनीं' कृ. वि. ४७.८. हृतधना=हृतधन पुरुषास. त्यजिजे=त्यजावें. 'यांसि **पूजिजे** सुज्ञांनीं,' कृ. वि. ४७.१०७. 'निजलंघन जगिं नीचें असमर्थे **साहिजे**' कृ. वि. ५४.२० 'जें पीयूषें न **दिजे**, **दिजे** सहज त्या पद्मालयातोयजें' कृ. वि. ६४.४. 'अशन **किजे**' मं भा. ९ ६०. या उदाहरणांवरून या जुन्या विध्यर्थाचें स्वरूप चांगलें लक्षांत येईल. धातूला 'जे' प्रत्यय लावला कीं विध्यर्थाचें रूप तयार होतें. त्या रूपास पुढें काळ, पुरुष व वचन यांचे दर्शक प्रत्यय

लागत नाहींत. पुढचे आख्यात प्रत्यय लागले कीं तें रूप विध्यर्थाच न राहतां कर्मणि होतें. या विध्यर्थांत कर्त्याची तृतीया होते व कर्माची प्रथमा अगर चतुर्थी होते. सारांश, करावें, खावें, द्यावें, मरावें या चालू भाषेंतील नपुंसकलिंगी विध्यर्थी रूपांप्रमाणेंच सर्व बाबतींत या जुन्या विध्यर्थाची स्थिति होती. शिवाय हा 'वा, वी, वें' प्रत्ययान्त विध्यर्थही त्यावेळेस चालू होताच हें सांगण्याची जरूरी नाहीं.

२१. साध्या धातूंच्या रूपसिद्धीविषयीं विचार करून त्यांतील महत्त्वाच्या गोष्टी वर निवेदन केल्या; आतां **साधित धातूं**विषयीं विचार करूं. साधित धातूंपैकीं मुख्य जो **प्रयोजक धातूचा** प्रकार त्याविषयीं विशेष सांगण्याजोगें असें कांहीं नाहीं. थोड्याशा धातूंचीं प्रयोजक रूपें सध्यां आपण करितों त्यांपेक्षां पंतांनीं निराळीं केलेलीं दृष्टीस पडतात धावणें याचें प्रयोजक सध्यां दवडणें असें होतें; पंतभाषेंत तें धांवडणें असें होत असे. ' कंसें जो धांवडिला, ' कृ. वि. ३९.१. शिवाय दवडिलें असें रूप होत असेच. पहा मं. भा. ९. १०७. न्हा धातूचें प्रयोजक 'न्हाण' असें होत असे. ' तिस कन्यासहस्र तें न्हाणी, ' मं. भा. ३. १०७. ' यादवांच्या रक्तें क्षोणीला न्हाणीतों ' रु. गी. १०४. सध्यां न्हा याचें प्रयोजक करावयाचें असल्यास ' न्हायला घालणें ' असें करतात. न्हाणितों इ० रूपें प्रचारांत आहेत असें वाटत नाहीं. जिंकणें या ऐवजीं जिणणे हें क्रियापद कोठें कोठें दृष्टीस पडतें. —' तैसेंचि जिणुनियां हरितें ' मं. भा. ४.१४५. खणणें याचें प्रयोजक खाणविणें असें होतें.—' वसु खाणविले, ' मं. भा. १.४९. ' सरणें ' (संपणें) याचें प्रयोजक ' सारणें ' (संपविणें) असें होत असे. सध्यां सारणें याचा अर्थ सरकविणें असा होतो.

२२. **नामधातु**. परंतु चालू भाषेच्या तुलनेच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचा साधित धातूंचा प्रकार म्हणजे नामधातूंचा होय. नामधातु म्हणजे नामावरून तयार केलेले धातु. या नामधातूंचा प्रचार जुन्या काव्यवाङ्मयांत फारच दृष्टीस पडतो. ज्ञानेश्वरांच्या पुढील ओंव्या पहा.—तैसा तुम्हीं मी **अंगिकारिला** । सज्जनीं आपुला म्हणितला । तरी उणावो साहाजें **उपसाहला** । प्रार्थु काइ ॥ १. ६५. येऱ्हवीं संकल्पाचिये सांजवेळे । नावेक **तिमिरेजती** बुद्धीचे डोळे । म्हणोनि अखंडीतचि परि झांबळे । भूत भिन्न ऐसें देखे ॥ ९.७२. सांगे पडिसादाचीं प्रत्युत्तरें । कां आरिसा जें **आविष्करे** । ९.७८. या उदाहरणांवरून या आद्य महाराष्ट्र ग्रंथांत कसे नानापरींनीं धातु बनविलेले आहेत हें कांहींसें लक्षांत

येईल. या धातूंस आम्ही ' नामधातु ' असें नांव दिलें आहे. परंतु अशा तऱ्हेचे सर्व धातु मराठींत प्रचारांत असलेल्या नामांवरूनच बनविण्यांत येतात असें नाहीं. संस्कृतांत प्रचारांत असलेलीं क्रियापदें जशींच्या तशीं मराठींत उतरूनही असे कित्येक धातु बनविण्यांत येतात. वर जीं ज्ञानेश्वरींतील चार क्रियापदें उदाहरणादाखल दिलीं आहेत त्यापैकीं ' अंगिकारिला ' व ' तिमिरेजती ' हीं अंगीकार व तिमिर या नामांवरून बनविण्यांत आलीं आहेत असें म्हणतां येईल. परंतु ' उपसाहला ' व ' आविष्करे ' हीं कोणत्याही नामांवरून बनविण्यांत आलीं नसून ' उपसहते ' व ' आविष्करोति ' या संस्कृत क्रियापदांची ती मराठी प्रतिकृति आहे. तथापि या नामांवरून बनविलेल्या व संस्कृतांतून घेतलेल्या क्रियापदांमध्यें परस्पर सर्वस्वीं सादृश्य असल्यामुळें येथें त्याचा एकाच कोटींत समावेश केला आहे. तसेंच पाहूं गेलें तर जे नामापासून निघाले असें मानण्यांत येतें असे धातूही संस्कृतांतूनच आणले असण्याचा संभव वाटूं लागतो. ' अंगीकारणें ' हा धातु ' अंगीकार ' या शब्दावरून बनविला असें मानण्याऐवजीं ' अंगीकरोति ' या संस्कृत क्रियापदावरून मराठींत उतरला असें कां मानूं नये ? ' चोजला ' ' चमत्कारला ' यांसारख्या कांहीं धातूंस हा युक्तिवाद लागू पडणार नाहीं व ते नामांवरूनच तयार केले असें मानावें लागेल हें खरें. तथापि एकंदरीनें या दोन्ही प्रकारांतील भेदाचा पडदा झिरझिरीतच आहे यांत संशय नाहीं. असो.

पंतांनीं असल्या साधित धातूंचा आपल्या काव्यांत इतर कवींप्रमाणेंच मनमुराद उपयोग केला आहे. नामापासूनच बनविलेल्या धातूंचीं कांहीं उदाहरणें—' विश्वात्मा **अटकळला** ' कृ. वि. ८. ३७. अटकळला—अटकळ करिता झाला. ' न देह धुतला **उटिला** ' कृ. वि. २९. १२. उटिला—उटणें लाविलेला उटणें या नामापासून हें चमत्कारिक धातुसाधित बनविलें आहे. ' तया दुर्बुद्धि ते कौरव **अनादरिति** ' कृ. वि. ६८. २५. ' जया **मानवे** श्रीनिवास ' कृ. वि. ७१. १. मानवे—मान देई. 'मान ' या नामापासून हें क्रियापद केलें आहे. ' पसंत पडतें ' या अर्थी ' मानवे ' असें क्रियापद आहे तें हें नव्हे. ' देवब्राह्मणसाधुवृंदहि मखामध्यें **चमत्कारलें** ' कृ. वि. ७५. १४. ' व्हाया स तान **नवासिला** वरुण ' मं. भा. ९. ९४. ' करूनि **कवाचितें** अंगें ' मं. भा. १०.६६६. कवचित—कवचें घातलेलीं. ' तदस्य संजातामिति तारकादिभ्य

इतच् ' यानें इतच् प्रत्यय होऊन निष्पन्न होणाऱ्या ' तारकित, ' इ० शब्दांप्रमाणेंच हा प्रकार आहे असेंही मानतां येईल. ' झाला सिद्ध स्वकाय **होमाया** ' मं. भा. १०-१११९. '**वाळीं** या, हा दोषचि' मं. भा. ३.१०. वाळीं–वाळींत टाक-' जो सकंप **कातरतो** ' मं. भा. ११.४१९. ' मीं **कर्मत** नसें ' मं. भा. ११-४३४. जीं क्रियापदें नामांपासून बनविलेलीं किंवा संस्कृतांतून घेतलेलीं अशींही मानतां येतील अशांचीं कांहीं उदाहरणें – ' **तपोनि** ' तप करून. मं. भा. ७. ८. 'भक्त **नमस्कारिले** विमळशोभ' मं. भा. उपोद्घात ३. '**शंके**' मं. भा. ७.६३. ' दाहिले ' मं. भा. १०-२९२. जीं उघड उघड संस्कृत क्रियापदांपासून मराठींत वापरण्यासाठीं घेतलेलीं दिसतात अशा क्रियापदांचीं उदाहरणें–'समधिष्ठुनि' कृ. कि. २२. ५. मं. भा. ८. ११२. ' उपरमला ' मं. भा. ५. ५. ' व्यापारुनि ' मं. भा. ६. ११५. 'परिहरिती' मं. भा. ८. ४४. 'अनुमोदिती' मं. भा. ११. ५३९. ' विचारुनि ' मं. भा. १.११६; २.१३. विचारुनि हें संस्कृतानीत क्रियापद पंतकाव्यांत पुष्कळ वेळां येतें. त्याचा अर्थ ' प्रश्न करणें ' असा नसून ' विचार करणें ' असा असतो. हें ' विचारयति ' ह्या संस्कृत क्रियापदावरून मराठींत घेतलेलें आहे हें उघड आहे.

हे नामधातु किंवा संस्कृतानीत धातु सध्यांच्या गद्य भाषेंत प्रचारांत नाहींत. ते प्रचारांत आणण्याचा हरिभाऊ आपटे प्रभृति कित्येक लेखकांनीं प्रयत्न केला आहे; परंतु तो प्रयत्न फारसा सफल झाला आहे किंवा होईल असें दिसत नाहीं. जुन्या काळीं तरी काव्यवाङ्मयांतच असे धातु बनवून वापरण्याचा प्रघात होता. गद्यामध्यें किंवा सामान्य बोलीमध्यें ते वापरीत असत असें दिसत नाहीं. आणि तसा गद्यामध्यें व साधारण व्यवहारामध्यें त्यांचा मुद्दाम उपयोग करूं लागल्यास ते बोजड व अपरिचित वाटतील यांत संशय नाहीं. मराठी भाषेची प्रवृत्ति क्रियापदें किंवा आख्यातरूपें वाढविण्याकडे नसून प्रातिपदिकांचा साठा वृद्धिंगत करण्याकडे विशेष आहे; व या प्रवृत्तीस अनुसरून मराठीनें आजपर्यंत जो शब्दसंभार परभाषांतून घेतला आहे तो प्रातिपदिकांच्या स्वरूपांतच घेतला आहे. तेव्हां उद्धारला, उत्तरला, प्रश्नला, चमत्कारला, चिकित्सला, भविष्यला असल्या चित्रविचित्र क्रियापदांची भरती करूं पाहाणाऱ्यांचा प्रयत्न मराठी भाषेच्या अभिवृद्धीस कारण होत आहे असेंच केवळ म्हणवत नाहीं.

२३. संस्कृतांतील क्रियापदें मराठींत आणण्याचा वर सांगितलेला प्रयत्न

म्हणजे मराठी भाषेला संस्कृतमिश्रित करून सोडण्याच्या पंतांच्या धोरणांतलाच एक भाग होय. तसलाच आणखी एक प्रयत्न म्हणजे संस्कृताच्या धर्तीवर मराठींत वर्तमानकालवाचक धातुसाधितें बनविण्याचा होय. मराठींत ' तो **करता** झाला,' 'त्यानें त्याला **बसतें** केलें' अशा तऱ्हेच्या वाक्यांत संयुक्त क्रियापदांच्या अंगभूत म्हणून वर्तमानकालवाचक धातुसाधितांचा प्रयोग होतो. स्वतंत्र रीतीनें त्यांचा प्रयोग फारच क्वचित् होतो. उदा०—करता सवरता पुरुष, रांगतें मूल, उडता पक्षी, धांवती गाडी, इ०. परंतु पंत अशा धातुसाधितांचा प्रयोग संस्कृत पद्धतीप्रमाणें सररास पाहिजे त्या विभक्तीनें युक्त असा करतात. उदा०—' संगें हर्ष देऊनि सर्वोत्कृष्टत्वाप्रति **नेतीच्या** ' मं. भा. ९. १९२. ' सर्वोत्कृष्टत्वं नयत्याः ' या संस्कृत प्रयोगाचें हें तंतोतंत भाषांतर आहे. त्याचप्रमाणें, ' प्रेमें समर्पिलें मग **जग पाळितया** तया दयानिधितें ' मं. भा. पृ. १.५०. ' तूं साधु **परिसता** राया ' मं. भा. २. १०. हेही प्रयोग होत.

(३) प्रयोग व वाक्यरचना.

२४. आख्यातें व धातुसाधितें यांच्याविषयींचा विचार पुरे करून व्याकरणाचें तिसरें अंग जी वाक्यरचना तिजविषयीं आतां विचार करूं. वाक्यरचनेविषयीं व क्रियापदांच्या प्रयोगाविषयीं विचार करूं लागलें म्हणजे पंतांच्या संस्कृतीकरणाच्या धोरणाचा आणखी एकदां प्रत्यय येतो. कित्येक वेळां पंतांचे प्रयोग मराठीच्या दृष्टीनें अगदीं कृत्रिम होतात. उदा०—' सह्य होति हे हठ कवणें.' ' केन सह्या भवन्ति ' या संस्कृत-वाक्याचें ' कवणें सह्य होति ' हें तंतोतंत भाषांतर आहे. खरें मराठी म्हणजे ' कवणास सह्य होति ' असें पाहिजे. ' याचीं शोभा पांडवांच्या **वधूंनीं** निरखित असतां, **तों** आला धार्तराष्ट्र ' कृ. वि. ७५. १८. ही वाक्यरचना सर्वस्वी संस्कृताच्या धर्तीवर गेली असें म्हणतां येत नसलें तरी मराठीच्या दृष्टीनें ती अगदीं चमत्कारिक व अशुद्ध आहे. अगोदर 'निरखित असतां' याचा कर्ता जो ' वधू ' त्याची तृतीया विभक्ति येथें नको आहे; प्रथमाच पाहिजे. 'तों' हा शब्द तर येथें अगदींच अनर्थक आहे. ' असतां ' या धातुसाधितापुढें 'तों' या ' उभयान्वयी अव्ययाची कांहीं जरूरी नव्हती. ' निरखिली ' असें पूर्ण क्रियापद असतें तर ' तों ' याची योजना योग्य झाली असती. ' युधिष्ठिरें चिंता करितां अर्जुन आला ' मं. भा. १. ७५. हा प्रयोगही चूक आहे. ' युधिष्ठिर चिंता करीत

असतां ' असें पाहिजे. कोठें कोठें कर्माची सप्रत्यय चतुर्थी घालण्याची भाषेची रूढि असतां पंतांनीं प्रथमेचीच योजना केलेली आढळते. ' क्षोणी शोभवि ' मं. भा. ८. ४. ' गंगोदक दग्ध पितर तारिल ' मं. भा. ९. १२३. या दोन्ही स्थळीं अनुक्रमें ' क्षोणीला शोभवि ', ' पितरां तारिल ' असे प्रयोग करणें हें भाषेच्या रूढीला अधिक धरून आहे. उलट 'तयांप्रति फळा कर्मानुरूपा दिजे' येथें चतुर्थी नको असून प्रथमाच पाहिजे असतांना चतुर्थीचा प्रयोग केला आहे. कृ. वि. ६१. २०. ' प्रभुसि महि सांडवावी ' मं. भा. ३. ४८. येथें प्रभुसि ही चतुर्थी बरोबर नाहीं 'प्रभूकडून ' असा अव्ययान्त प्रयोग पाहिजे.

२५. हे व्याकरणाच्या दृष्टीनें केवळ अशुद्ध प्रयोग झाले. असले प्रयोग पंतकाव्यांत अगदींच विरळ आढळतात. ते केवळ नमूद करून ठेवण्यापलीकडे त्यांच्यांत फारसें तात्पर्य नाहीं. परंतु सध्यां मराठींत भूतकाळीं जेथें कर्मणि प्रयोग करण्याचा प्रचार नाहीं अशा ठिकाणीं कर्मणि प्रयोगच करण्याचा जो पंतांनीं पद्धतशीर प्रयत्न केला आहे तो लक्षांत ठेवण्याजोगा आहे. सध्या सकर्मक धातूचा भूतकाळ कर्तव्य असतां कर्म जर प्रथमपुरुषी (मी) अगर द्वितीयपुरुषी (तूं) सर्वनाम असेल किंवा तृतीय पुरुषी असून मनुष्यवाचक असेल तर त्या कर्माची चतुर्थी विभक्ति होते व क्रियापद नेहमीं नपुंसकलिंगी एकवचनी रहातें. अर्थात् त्या वाक्याचा भावे प्रयोग होतो, कर्मणि होत नाहीं. उदाहरणार्थ--' रामानें रावणास मारिलें,' ' या दासानें तुला नेलें ' असे प्रयोग होतात. भावे प्रयोग नको असून कर्मणीच पाहिजे असेल तर ' या दासाकडून तूं नेला गेलास ' असें सहाय क्रियापद घालून वाक्य करावें लागतें. परंतु अशी रचना केली म्हणजे व्याकरणदृष्ट्या त्या वाक्याचें स्वरूप बदलून निराळीच स्थिति उत्पन्न होते. ' तूं ' हा कर्ता व 'गेलास' हें क्रियापद होऊन हा अकर्मक **कर्तरि** प्रयोग होतो. कर्म जर सामान्य-प्राणिवाचक व पदार्थवाचक असेल तर मात्र ही भानगड न राहतां **कर्मणि** प्रयोग होतो. जसें—' रामानें घोडा नेला, गाय नेली, वासरूं आणिलें,' इ०. ही झाली व्याकरणाची सद्यःस्थिति. यांत पंतांनीं सुधारणा केली आहे; ती अशी कीं अमुक ठिकाणीं भावे, अमुक ठिकाणीं कर्मणि हा पंक्तिप्रपंच काढून टाकून सर-सकट सर्वांस कर्मणि प्रयोगाचा कायदा लावून दिला आहे. ' दासानें तुला नेलें ' असा प्रयोग न करितां सरळ ' नेलासि जेथवां या दासानें तूं ' कृ. वि. ८५. ९.

असा प्रयोग पंत करतात. हा प्रयोग म्हणजे 'दासेन त्वं नीतः,' याचें शुद्ध रूपांतर होय. अर्थात् संस्कृतीकरणाच्या धोरणाच्या वजावणीचें हें आणखी एक कलम होय. जेथें प्रसंग पडेल तेथें बहुधा पंतांनीं असेच प्रयोग केले असल्यानें याचीं उदाहरणें पुष्कळच देतां येतील. कांहीं थोडीं येथें दाखल करूं.— 'जिणें वनीं पळविलास' कृ. वि. ३०. १८. 'मीं गोपांहीं पथीं भग्न केला' मं. भा. १. ८०. येथें 'केलों' पाहिजे. 'तुज म्या मीं दिधलों,' मं. भा. २. ४३. 'म्या तूं मोहितहृदय केलासि' मं. भा. ८. १०२. 'पार्थ म्हणे, तूं मुनिनीं चित्तीं धरिलास' उद्योग. १. 'वरिलासी मत्सखीनें' आदि. १०. 'हारविलीस तूं धर्मे' सभा. ४. शेवटलीं तीन उदाहरणें निबंधमालेंतून घेतलीं आहेत.

२६. संकरसमास. या प्रश्नाचा परामर्श घेतला म्हणजे आमचें व्याकरणविषयक विवेचन संपलें. एक अवयव संस्कृत तर दुसरा अवयव देशी अशा तऱ्हेचे घेडगुजरी समास पूर्वीच्या काव्यांतून बरेच दिसून येतात. भाषाशुद्धीच्या कामांत निष्काळजी असलेले जे वामनपंडितादिक कवि त्यांच्या काव्यांत अशा समासांचा विशेष भरणा दिसून येतो. पंतांच्या काव्यांतही असे समास कोठें कोठें आढळतात.—हरिसी 'काम-सगास' कृ. वि ३९–१९. कुंकुम 'माथानींचें' कृ. वि. ३८. १६. 'कुठार-गडी' ('परशूचा सोबती' म्हणजे परशुराम) मं. भा. ११. ३३० 'शुचिप्रतिभा-झरा,' कृ. वि. सज्जन प्रार्थना ३. 'काट–मांदुस–रीति,' कृ. वि. ३९. १७. 'उद्धत–पसारा' मं. भा. २१. १२९. 'मुनि–चहाडा,' इ० इ०.

अशा तऱ्हेचे समास कितपत भाषापोषक होतात हा प्रश्न आहे. पंतकाव्यांत असे समास केलेले आढळतात ते बहुधा यमक प्रास वगैरेंच्या अपरिहार्य नडीकरितांच केलेले आढळतात. अर्थात् असे समास स्पृहणीय म्हणून त्यांनीं योजिलेले नसून अगदीं नाइलाजानेंच क्वचित् स्थलीं त्यांस त्यांनीं अवकाश दिला आहे. आणि एकंदरींत हीच पंतांची वृत्ति या बाबतींत सध्यांच्या लेखकांनींही ठेवणें प्रशस्त होय असें आम्हांस वाटतें. म्हणजे, असे समास भाषेच्या शुद्धीला व भारदस्तपणाला अपायकारक होत ही गोष्ट सतत मनांत ठेवून त्यांना टाळण्याचा शक्य तितका प्रयत्न करावा, परंतु जेथें त्यांवाचून विचारप्रदर्शनाचें काम अडतच असेल तेथें मात्र अपरिहार्य म्हणून त्यांचा स्वीकार केल्याखेरीज राहूं नये. असा मध्यम मार्ग स्वीकारल्यानें भाषेच्या सौष्ठवाचा भंग न होतां

विचारप्रदर्शनाचें काम अस्खलितपणें करतां येईल; व अत्यंत उपयोगी असेच शब्द भाषेंत येऊन भाषेची अभिवृद्धीही होईल. सध्या वर्तमानपत्रांचा प्रसार झाल्यामुळे लेखनांतला निष्काळजीपणा फार वाढला आहे. पार्लमेंटसभा, कायदे-कौन्सिल, शेतकीकमिशन, सुधारणाकमिटी असले सहज टाळतां येण्याजोगे विचित्र शब्द वर्ज्य करण्याची बुद्धि भारदस्त लेखकांसही होऊं नये ही शोचनीय गोष्ट होय.

२७. व्याकरणाच्या दृष्टीनें पंतकाव्यांच्या भाषेचें अगदीं थोडक्या अवकाशांत जेवढें करतां आलें तेवढें निरीक्षण येथवर केलें. आतांपर्यंत मराठी व्याकरणांतील ज्या ज्या प्रश्नांचें विवेचन केलें ते सर्व प्रश्न अतिशय किचकट व अडचणीचे आहेत. सूक्ष्म विचारांत शिरल्यास प्रत्येक विषयाला शेंकडों फाटे फुटलेले दिसूं लागतात व व्याकरणनियमांच्या अस्थिरतेमुळें प्रयोगांत स्वैरपणा किंबहुना बंडाळीही कोठें कोठें दृष्टोत्पत्तीस येते. खरोखर म्हटलें तर, आख्यातप्रत्यय, विभक्तिप्रत्यय, शब्दयोगी अव्ययें, नामधातु, क्रियापदांचे प्रयोग, वगैरे महत्त्वाच्या विषयांपैकीं एकेक निराळा घेऊन आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयांतून त्याचा अभ्यास करून त्या विषयाचें सांगोपांग विवेचन स्वतंत्र प्रबंधाच्या रूपानें केलें पाहिजे. असें विवेचन करणारे अधिकारी भाषाशास्त्रज्ञ निर्माण व्हावे याखेरीज असलें तात्पुरतें विवेचन करणाऱ्यांचा दुसरा काय हेतु असणार ?

विभाग ७.

पंतकवितेंतील दोषांचें विवेचन;

पंतांच्या वर्णनशैलीचे आणखी कांहीं विशेष.

वंशे घुण इव न विशति दोषो रसभाविते सतां मनसि ।
रसमपि तु न प्रतीच्छति बहुदोषः संनिपातीव ॥ आर्यासप्तशती ४१.

वंशीं कीट तसा, नच रसविकसितसन्मनीं शिरे दोष ।
परि मधुररसहि नेदी दोषपारा, ज्वरयुता जसा, तोष ॥

१. पंतकाव्याच्या भाषासरणीचें व रचनाशैलीचें आतां आपणास निरीक्षण करावयाचें आहे. या निरीक्षणाचा क्रम पुढीलप्रमाणें राहील:—प्रथम दोषनिरीक्षण, पुढें गुणपरीक्षण व कांहीं महत्त्वाच्या विशेषांचें अवलोकन. दोषांचाच परामर्श अगोदर घेण्याचें कारण, त्याच्याविषयीं पंतकाव्यदूषकांनीं विशेषच गवगवा करून ठेवला आहे हें होय. या दूषकांनीं कांहीं कारण नसतां जीभ उचलून टाळ्याला लावून स्वाभिमानशून्यतेचे प्रलाप काढल्यामुळें सत्यदर्शनाचे कामीं अनास्था होऊन खरोखर फार मोठें नुकसान झालें आहे. कारण, क्रियेस प्रतिक्रिया या न्यायानें, दूषक एका टोकाला गेले तर पंतकाव्याचे अभिमानी अगदीं दुसऱ्या टोकाला गेले. त्यांना सर्वत्र एकजात गुणच दिसूं लागले. दोषांचें विवेचन स्पष्टपणें व निर्भीडपणें करण्यास त्यांची लेखणी वाहीना! एका दृष्टीनें त्यांचें करणें बरोबरही होतें. कारण पंत हे कवीच नव्हेत येथपासून जी दूषकांच्या प्रलापांस सुरवात झाली होती तिचें यथास्थित निरसन करून वाङ्मयाच्या राज्यांतलें पंतांच्या हक्काचें उच्च स्थान त्यांना निरामय रीतीनें प्राप्त करून द्यावयाचें होतें. परंतु ‘ अळीमिळी गुपचिळी ’ चा हा प्रकार, पंतांना वाङ्मयांतील त्यांचें योग्य स्थान प्राप्त झाल्यावर यापुढेंही चालू ठेवणें इष्ट आहे असें मात्र मुळींच म्हणतां येत नाहीं. सध्यां चाललेल्या केवळ स्तुतिपठणाच्या कार्यक्रमामुळें फायद्यापेक्षां तोटाच जास्त होत आहे. हंसांनीं आपला निबंध लिहिला, पांगारकरांनीं येवढें ६०० पृष्ठांचें चरित्र लिहिलें, काव्यसंग्रहाच्या आवृत्तीला व पराडकरांच्या

आवृत्तीला मोठमोठ्या विद्वानांनीं उपोद्धात लिहिले तरी पंतकाव्यांतील उणीवां-विषयीं जो तो आपला मूग गिळून स्वस्थ बसला आहे! असल्या तारतम्यरहित स्तुतीमुळें आणि दोषांबद्दलच्या मूकभावामुळेंच पंतांचें फार नुकसान झालें आहे. येवढ्या मोठमोठ्या विद्वानांचे केवळ स्तुतीनें भरलले लेख विश्वसनभावानें वाचून एकाद्यानें पंतकाव्याच्या अवलोकनास सुरवात केली व सुरवात केल्यानंतर त्याला त्या काव्यांत कित्येक दोष आढळून आले म्हणजे एकदम सर्वच पारडें उलटून जातें. या विवेचकांनीं दोष प्रकट न करितां मागें ठेवले व गुणांचें अतिशयोक्ति-पूर्ण वर्णन केलें आहे असें त्यास वाटावयास लागून त्यांच्यावरचा त्याचा विश्वास उडून जातो व एकदां मन फिरलें म्हणजे लेखकाप्रमाणें उलट टोकाला जाऊन पंतांचें काव्यही त्यास दोषपूर्ण असेंच वाटावयास लागतें. तेव्हां प्रथम-पासूनच समतोल दृष्टि ठेवून गुणांप्रमाणेंच दोषांचेंही स्पष्टपणें विवरण करणें हेंच रास्त व परिणामाच्या दृष्टीनें अधिक फायद्याचें होय. आमच्या कवींचा गुणसमुच्चय मोठा आहे अशी जर आमची खात्री आहे तर यथार्थदर्शनास आम्ही कां भ्यावें? त्यांचे गुण केव्हांही दोषांपेक्षां प्रभावी ठरतीलच; मग दोषांची बाजू लपवून खोटा आभास उत्पन्न करण्यांत फायदा कोणता?

असो. मम्मटादिक साहित्यशास्त्रकारांनीं काव्याचे जे दोष म्हणून सांगितले आहेत त्यांच्या अनुरोधानें आम्हांला येथें दोषविवेचन करावयाचें नाहीं. अनेक कारणांस्तव तसें करणें इष्ट होणार नाहीं. सामान्य सहृदय वाचकाला काव्य या दृष्टीनें पंतांचे ग्रंथ वाचीत असतांना कोणकोणचे दोष आढळून येतात व ते काव्याच्या रसास्वादाला कसा अडथळा करतात हेंच पुढील विवेचनांत मुख्यत्वें-करून दाखवावयाचें आहे.

२. पंतकाव्यांमध्ये दोष नाहींत असें नाहीं; ते आहेतच. परंतु त्यांच्यासंबंधानें ही एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे कीं, ते दोष पंतांच्या असमर्थतेमुळें उत्पन्न झालेले नाहींत. इतर कवींच्या काव्यांत दोष राहतात याचें कारण प्रयत्न करूनही सर्वस्वीं निर्दोष असें काव्य त्यांना रचतां येत नाहीं हें होय. परंतु जे अगदीं ढोबळ असे दोष पंतांच्या काव्यांत आढळतात ते पंतांना टाळतां आले नाहींत म्हणून त्यांच्या काव्यांत राहिले आहेत असें मुळींच नाहीं. त्या दोषांची छटाही ज्यांत सांपडणार नाहीं असें निष्कलंक काव्य त्यांनीं पुष्कळच केलें आहे. अर्थात् त्या दोषांपासून अलिप्त असें काव्य त्यांना करतांच येत नव्हतें असें कोणी

म्हणूं शकणार नाहीं. मग हे दोष उत्पन्न झाले आहेत कशानें ? दोष टाळ-ण्याची शक्ति असतांना मुद्दाम हाऊन कोण त्यांचा लेप लावून घेईल ? वाटेंतले खांचखळगे टाळणें शक्य असतां स्वतः होऊन कोण त्यांत उडी घेईल ? परंतु पंत हे मुद्दाम आंधळे बनूनच असे खड्ड्यांत पडले आहेत असें म्हणणें भाग पडतें. कांहीं गोष्टींचा त्यांना इतका अपरिमित नाद लागला होता कीं, त्यामुळें ते अगदीं आंधळे बनले आहेत. या. पंतांना नाद लावणाऱ्या गोष्टी म्हणजे **यमकादि शब्दचमत्कार** व **भाषेचें संस्कृतीकरण** या दोन होत. त्यांच्या काव्यांत दिसून येणारे सर्व दोष यमकाचा हव्यास व संस्कृतीकरणाची हौस या दोहों-मुळेंच सर्वस्वीं उत्पन्न झाले आहेत असें पुढील विवेचनांत आपल्याला दिसून येईल. एकादा छांदिष्ट पुरुष आपल्या छंदाच्या पायीं आपणावर अनेक संकटें ओढवून घेतो तशी पंतांची स्थिति झाली आहे. इतर मराठी कवींना पंतांच्या या दोन नादांनीं पछाडलें नसल्यामुळें पंतकवितेंत दिसून येणाऱ्या दोषांपासून त्यांची कविता बहुतांशीं अलिप्त आहे असें दिसून येतें. असो. आतां दोषांच्या परिगणनास आरंभ करूं.

[१]

(१) क्लिष्टता व दुर्बोधता

३. पंतकाव्याच्या क्लिष्टतेविषयीं निंदकांनीं आजपर्यंत फारच गवगवा केला आहे. पंतकवितेवर वाक्प्रहार करण्याचें हें एक मोठें सुलभ व कधीं न लुलें पडणारें हत्यार होय, असें पंतदूषकांना आजपर्यंत वाटत आलें आहे. पंत-दूषकांच्या या गवगव्यामध्यें जरी कांहीं अर्थ नसला तरी क्लिष्टतेचा आरोप अजीबात झुगारून देण्याइतकी पंतकविता सर्वत्र सुलभ नाहीं हें कोणासही कबूल केलें पाहिजे. पंतांची कविता साधारणतः क्लिष्ट नसून सुगम व प्रसादपूर्ण असते. प्रसन्नता हेंच तिचें सहज स्वरूप होय; क्लिष्टता हें नव्हे. कांहीं विशिष्ट प्रसंगीं मात्र पंतांची कविता क्लिष्ट होते व ते विशिष्ट प्रसंग म्हणजे पंत जेव्हां दीर्घयम-कांच्या किंवा चित्रकाव्यरचनेच्या नादीं लागतात तेव्हांचे होत. ही क्लिष्टता पंतकाव्यांमध्यें बहुधा पुढील तीन कारणांनीं उत्पन्न होते.—१. मराठी वाचकांस अत्यंत अपरिचित अशा संस्कृत शब्दांची योजना; २. दीर्घसमास; ३. दूरा-न्वय, घोटाळ्याची वाक्यरचना इ०. कित्येक कवींचा प्रतिपाद्य अर्थ व कल्पनाच

दुर्बोध, गुंतागुंतीच्या असल्यामुळें त्यांच्या काव्यास क्लिष्टता येते. अशा अर्थगत क्लिष्टतेचें उदाहरण संस्कृतांतील भारवि कवीच्या काव्याचें होय. ही अर्थगत क्लिष्टता पंतांच्या काव्यांत आढळत नाहीं. त्यांच्या काव्यांतील कल्पना कधींही गूढ, दुर्बोध किंवा आभासमय नसतात. असो. उपर्युक्त क्लिष्टतेच्या तीन्ही प्रकारांचें क्रमानें सोदाहरण विवेचन करूं.

४. (१) **अवघड व अपरिचित संस्कृत शब्द.** अशा शब्दांची योजना बहुधा सर्वत्र यमकांमुळेंच करण्याची पंतांवर पाळी आली आहे. जेथें जेथें हव्यासानें लांब यमकें साधण्याचा पंतांनीं प्रयत्न केला आहे तेथें तेथें अवघड शब्दांची अधिक प्रमाणांत योजना करणें पंतांना भाग पडलें आहे. कृष्णविजय पूर्वार्धांत आर्येच्या चाऱ्ही चरणांत लांब लांब यमकें साधण्याचें बंधन त्यांनीं लावून घेतलें आहे. अर्थात् तेथें अपरिचित संस्कृत शब्दांचें प्रमाण सर्वांत जास्त झालें आहे.

ते पूतनिका **स्वधिती** । राष्ट्रांत फिरे, छळें मुळांला वधिती । कृ. वि. ६.२

येथील स्वधिती (कुठार) हा शब्द केवळ यमकाकरितां घातला आहे. त्याचा अर्थ सामान्य मराठी वाचकांपैकीं कितीजणांना चटकन् समजेल याचा संशय वाटतो.

करि बहु परिदेवन, ' हा ! ' । म्हणत रडे, स्तन्यतृप्त परि देव न हा ।
वर्णें अभ्र, मुरडतां । प्रकृतिकडे, भासलीहि **अभ्रमु** रडतां ॥कृ.वि. ६-१२.

हेंही पूतनेचेंच वर्णन आहे. स्पष्टीकरणार्थ कांहीं टीपा न देतां ही आर्या लावण्यास दिली तर चांगल्या बहुश्रुत वाचकांतही कितीजणांना ही बिनचूक लावतां येईल ? ' परिदेवन ' (रडणें) हा मराठी वाचकास अपरिचित वाटणारा शब्द पहिल्याच चरणांत यमक साधण्याकरितां घातला आहे. परंतु ' अभ्रमु ' याच्या मानानें तो अगदींच सोपा ठरेल. अभ्रमु शब्दाचा अर्थ फारच थोड्यांस एकदम सांगतां येईल. पंतांना स्वतःला सुद्धां त्या शब्दावर टीप द्यावी असें वाटलें. अगोदर असले शब्द वापरून मग काठिन्यास्तव त्यांच्यावर टीप देत बसणें हा विकृत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करण्याचा प्रकार थोड्यांसच पसंत पडेल ! ' [कृष्णानें शरीरांतील रस शोषून घेतल्यामुळें] वर्णें (कांतीनें) अभ्र (अभ्रासारखी पांढरीफटक अशी) [ती पूतना] प्रकृतिकडे (आपल्या मूळ राक्षसी वृत्तीकडे) मुरडतां (वळली असतां) [शुभ्र वर्णानें व प्रचंडतेनें अभ्रमु (ऐरावतपत्नीच अशी) रडतां भासली ' असा संबंध आर्येचा अर्थ पराङ-

करी आवृत्तीच्या संपादकांना टीपेंत द्यावा लागला आहे ! 'अभ्र' याचा 'अभ्रा-सारखी पांढरी फटफटीत' असा लाक्षणिक अर्थ करावा लागतो, त्याचप्रमाणें 'मुडतां प्रकृतिकडे' याचाही अर्थ लक्षणेनें जुळवून घ्यावा लागतो. असे क्लिष्टतेस कारणीभूत होणारे अनेक दोष या आर्येंत झाले आहेत. 'स्वधिति' किंवा 'अभ्रमु' या शब्दांप्रमाणेंच, वाल (केस) १. ३२; क्षणन (हनन, वध) १. ३९; शय (हात) २. २५, ८. २०, ९. १६, २२. १४, ३०; कीनाश (यम) २. २५; लकुच (कडूलिंब) ८. ३८; प्रह्व (नम्र) १२. २७; ब्रध्न (सूर्य) १६. ५; शरारु (घातुक-पंतांची टीप) १८. १५, ४४. १६; वन (पाणी) २२. २; लपन (मुख) २२. १६, ४१.१८; अंध (अन्न) २३ ७; अशनाया (भूक) २३. १२; सिक्थ (ओदन) २३. २९; वपानें (मस्तीनें) २३. ४३; अहार्य (पर्वत) २४. ७; करका (गारा) २५. ११; रसित (मेघगर्जना) २५. १३; शात (सुख) २८. ६; शरद (जलद, शरपाणी) २९. १; अलिक (कपाळ) २९. २; संव्यान (उत्तरीय) ३२. १४; श्रील (शोभादायक) ३३. १८; गृष्टि (एकदां व्यालेली गाय) ३४. २१; हरिता (दिशा) ३४. २१; अमत्र (पात्र) ३४. २५; अवकेशी (निष्फल वृक्ष) ३६. २१; कशा (चाबूक) ३७. ३; चंचरीक (भ्रमर) ३८. ३३; भुवन (पाणी) ३९. ६२; पाटीर (चंदन) ४१. २, ४२. २, ४८. १; महामात्र, आधोरण (महात) ४३. ३, ४; वलक्ष (शुभ्र) ४३. ५; लंबा (कडू भोंपळ्याची वेल-पंत) ४७. ५५; रोलंब (भ्रमर) ४७. ५५; रंकु (मृग) ४७ ८१; पाथ (पाणी) ४७. १२४; असे अनेक अवघड शब्द कृष्णविजय पूर्वार्धांत आढळून येतात. कृष्णविजय पूर्वार्धाखेरीज इतरत्रही असले शब्द ठिकठिकाणीं आढळतात. उदाहरणार्थ - **कृ. वि. उत्तरार्ध**—क्ष्वेड (विष) ८३. १९; दाश (कोळी) ५५. ७; सौनिक (हिंसक, कसाई) ५७. ९; महोतू (मोठें मांजर) ६१. १२; ग्लह (फांसा) ६१ १२; हर्यक्ष (सिंह) ६३. ९; कीश (वानर) ६७. १८; मनु (मंत्र) ६८. १५; फेरु (कोल्हा) ७४. २०; लेलिह (सर्प) ७४. २२; सुपर्व (देव. 'सुपर्वाणः सुमनसः') ७९. १; उदन्या (तहान) ८३. १७४; वल्गा (लगाम) ८६. २५; शंपा (वीज) ५०. १२; दसुना (अग्नि) ८५. ९; भिदुर (वज्र) मं. भा. १०. ६४८. एकंदरीनें पाहतां शब्दचमत्कारांचा नाद ज्यांत विशेष

दिसून येतो अशा महाभारत, कृष्णविजय इ० काव्यांत अशा कठीण संस्कृत शब्दांचा प्रयोग विशेष आढळतो. असे बहुतेक शब्द यमकप्रास जुळविण्याकरितांच पंतांना आणावे लागले आहेत हें तीं तीं स्थळें पाहिल्यास दिसून येईल. ज्यांनीं अमरकोश म्हटला आहे व संस्कृत काव्यनाटकांचें चांगलें परिशीलन केलें आहे अशा व्युत्पन्न वाचकांस यांतील बरेचसे शब्द अपरिचित वाटणार नाहींत हें खरें. तथापि सामान्य मराठी वाचकांकडून इतक्या व्युत्पत्तिज्ञानाची अपेक्षा करणें अप्रयोजकपणाचें होईल. अशा शब्दांनीं भाषेस काठिन्य येतें. शिवाय त्यांनीं भाषेची स्वभावसुंदरता व तिचा मराठीपणा नष्ट होऊन तिला बोजडपणा येतो व त्यामुळें काव्यसौंदर्याची हानि होते ही गोष्ट निराळीच.

५. (२) **दीर्घ समास**—पंतांच्या काव्यांत दीर्घ समास वारंवार येतात व ते भाषेच्या दुर्बोधतेस कारणीभूत होतात या दोन्ही गोष्टींची सिद्धता करण्याची मुळींच जरूर नाहीं. अशा दीर्घ समासांतील अर्थही मोठा सुंदर असतो असें नाहीं. कल्पनाचमत्कृतीच्या व रसपरिपोषाच्या दृष्टीनें असे समास बहुधा निरर्थक; किंबहुना अनर्थकच असतात. दीर्घ समासरचना ही बहुधा पंतांच्या संस्कृतीकरणाच्या हव्यासाचें फल होय. क्वचित् यमकानुप्रासांसाठींही अशी बोजड समासांची रचना पंत करतात.

गति-जित-बाल-करेणु-।-श्रीश-पदांभोज-भक्त-पालक-रेणु ।
हे धन्य; विधि भवानी-।-पति लक्ष्मी वाहती शिरोंबुभवानीं ॥

कृ. वि. ३०. ३३.

यांतील पहिलें अर्ध हा सर्व एक समास आहे. त्याचा अर्थ थोडक्यांत ' कृष्णाचे चरणरज ' असा आहे. समासांतील बाकीच्या पदांचा आशय कथानकाच्या दृष्टीनें व्यर्थ व अपुष्ट आहे.

गोपजनवधू लीला-।-नर-तनु-हरि-रथ-समुत्थ-नव-धूलीला ।
पीति; मन रमे; घाली । त्या चातकतति सुखांत ते भेघाली ॥

कृ. वि. ३९. ५८.

हा समास कांहींसा यमकाकरितां व कांहींसा प्रासाकरितां घातलेला दिसत आहे. यांतील ' लीलानरतनु ' हें पद अपुष्ट आहे, त्याचें येथें कांहींच प्रयोजन नाहीं.

परंतु समासदैर्घ्य हें पुष्कळ वेळां अदोषरूप किंवा गुणरूप देखील होत असतें. क्वचित्, विकट समासामुळें काव्यांत ओजोगुण निष्पन्न होतो. ' ओजः समास-

सभूयस्त्वम् ' अशीच ओजोगुणाची दण्डीनें व्याख्या केली आहे. अशा समासघटित विकट रचनेमुळें निष्पन्न होणारा ओजोगुण हा वीर, रौद्र, भयानक या रसांना फार पोषक होतो. तेव्हां वीर, रौद्र, भयानक या रसांचा उत्कर्ष कर्तव्य असतां दीर्घ समासरचना उपकारकच होते.

गदा ही दे, मायाशतनिपुणशत्रुप्रमथन–
क्रियासिध्युत्साहा उपजवि, करी युक्तिकथन ।
उठे काम क्रोधेंकरुनि कलितोद्दामगद या
रिपूतें माराया, कलह करि, कैंचीं मग दया ॥ कृ.वि.५५.१८,१९.

हें वीररसाचें चांगलें उदाहरण असून येथें समास रसोत्कर्षास कारणीभूत झाला आहे. परंतु याहीपेक्षां सुंदर उदाहरण पुढील आर्येचें आहे.

भट–मुकुट–रत्न–कैटभरिपु–पटुशर–पटल–पट रणीं फांके ।
कां केवळ कटकचि ? सखि, घटजठरीं दीपस रवी झांके ॥

कृ वि. ८३. १४४.

कृष्णाच्या युद्धपाटवाचें हें वर्णन आहे. ' वीरशिरोमणि कृष्णाचा कुशल बाणसमुदाय हेंच कोणी वस्त्र,' असा समासाचा अर्थ आहे. बाणसमुदायरूपी वस्त्र सर्व सैन्यावर पसरलें व त्यास आच्छादितें झालें, हें रूपक तर सुंदर आहेच; परंतु घड्यांत ठेवलेल्या दिव्याप्रमाणें सूर्यही झांकून गेला ही उपमा तर बहारीचीच आहे. येथें दीर्घ समासामुळें व ' ट ' च्या कठोर अनुप्रासामुळें वीररसाचा उत्कर्ष होऊन तो फारच खुलला आहे.

६. (३) दूरान्वय. घोटाळ्याची वाक्यरचना, संदिग्धता इ०. हे वाक्यदोषही पंतांच्या काव्यांत पुष्कळ अंशीं यमकानुप्रासांच्या हव्यासामुळेंच आले आहेत. एकाद्या कवीचें भाषेवर कितीही जरी प्रभुत्व असलें तरी पदोपदीं जर तो वर्णनियमांनीं आपल्यास बांधून घेऊं लागला तर इकडचीं पदें तिकडे करणें, आवश्यक पदांचा अध्याहार करणें, अनवश्यक पदें घुसडून देणें वगैरे अनेक लटपटी त्यास कराव्या लागतात व त्यांमुळें बिचाऱ्या अर्थाचे शोचनीय हाल होतात. ज्यांमध्यें शब्दचमत्कारांवर विशेष भर आहे अशा महाभारत, कृष्णविजयपूर्वार्ध या काव्यांमध्यें क्लिष्ट व किचकट आर्या पुष्कळच आढळतात. त्यांपैकीं नमुन्यासाठीं चार पांच आर्या खालीं दिल्या आहेत. त्यांचा अर्थ

पूर्ण समाधानकारक रीतीनें लावतां आल्यास पाहिजे आहे. वाचकांनीं त्यासाठीं प्रयत्न करावा.

होय, सकृप योज जनीं । या तव नाभ्यमृतसद्हृदययोजजनि ।
मीं जरि, तरि यवसाचें । या वनिंच्या भाग्य हें सदवयव साचें ॥
कृ. वि. १४. ५.

ही ब्रह्मदेवानें केलेल्या कृष्णाच्या स्तुतींतली आर्या आहे.

हे पीयूषघन; तगे । ताप न; होती विनष्टविपदघ नत गे ।
स्त्रविधि कसा गरल वसे । तीचें पद गमति अमृतसागर लवसे ॥
कृ. वि. ३०. ३५.

कृष्णानें एकाच गोपीवर विशेष प्रेम दाखविलें व तिच्यासह तो गुप्त झाला तेव्हां इतर गोपींना वैषम्य वाटून त्यांनीं काढलेल्या उद्गारांतील ही आर्या आहे. हे=श्रीकृष्णपदरजःकण.

रासीं हरिच्या तूर्यें । स्त्रीरत्नें ज्यांत कोटिभरि चातूर्यें ।
हा महिमा जीवाचा । तदुक्तिरससिंधुमग्न माजी वाचा ॥ कृ. वि. ४७. ४.

हा=उद्धवहि-पंत. उद्धवाची गोपींनीं एकांतात भेट घेतली त्या समयींची ही आर्या आहे. हिचा सुसंगत असा कांहींच अर्थ लागत नाहीं.

पाहे प्रणता तोका, नव्यासम हाक विप्र सादास ।
त्रिप्राच्या दे, न करी न व्यास महाकवि प्रसादास ॥
स्वर्गारोहण २. ४१.

महाभारताच्या अंतीं आपल्या आप्तेष्टांचें व व्यासादिकांचें स्मरण करून पंतांनीं ज्या आर्या लिहिल्या आहेत त्यांतील ही एक आहे. हिचा अर्थ काव्यसंग्रहकार एक देतात, पांगारकर त्याहून भिन्न देतात तर पराडकर तिसराच देतात ! कोणी म्हणतात, ही व्यासांस उद्देशून आहे तर कोणी म्हणतात, विठोबादादांस उद्देशून आहे ! इतरांनींही आपआपल्या अकलेप्रमाणें यांत आणखी शकला लढवाव्या. हा सर्व ब्रह्मघोटाळा अकरा अक्षरी यमक जुळविण्यासाठीं पंतांनीं माजविलेला आहे.

हरि जन अरिजे न परिजन करि जननि ! प्राज्ञजनसभे ! काय ? ।
हा दास यास हास त्रास नसो; शिशुसि निंदिना माय ॥ स्वर्गारोहण २. ४८.

हीही महाभारताच्या उपसंहारांतीलच आर्या असून हिच्या अर्थाविषयींही असेच मतभेद आहेत. पूर्वार्धाचा पदच्छेद कसा करावयाचा याच्या विष-

त्यांहीं एकमत नाहीं. येथें प्रासांच्या नादीं लागून पंतांनीं प्रसादाचें गूळखोबरें केलें आहे !

(२) कृत्रिमता, बोजडपणा व बेडौलपणा.

७. हा दोष पंतांच्या काव्यांत कित्येक ठिकाणीं दिसून येतो. हा मुख्यत्वेंकरून पुढील दोन तीन गोष्टींमुळें पंतांच्या भाषेंत उत्पन्न झाला आहे.--१. संस्कृत शब्दांची प्रचुरता किंबहुना अतिरेक; २. मराठींत सररास उपयोगांत आणण्यास नालायक अशा अपरिचित संस्कृत शब्दांचा अगदीं घसटींतल्या देशी शब्दांप्रमाणें उपयोग ३. दीर्घ समास.

८. (१) **संस्कृतशब्दप्राचुर्य.**—पंतांची भाषा संस्कृतशब्दप्रचुर असते हें सुप्रसिद्ध आहे. आणि मराठी भाषा जास्त संस्कृतप्रचुर होऊं लागली म्हणजे तिचा मराठीपणा नष्ट होऊं लागून एक प्रकारचा कृत्रिम बोजडपणा तिच्या अंगीं येत असतो. संस्कृत शब्दांची अतिशय योजना झाल्यामुळें भाषा संस्कृतमयच झाली आहे असा रा. पावगी याचा ' विलायतचा प्रवास ' (विशेषत: पूर्वार्ध) हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. अलीकडचे कवि रा. विद्याधर वामन भिडे यांची कविता संस्कृतशब्दप्रचुर असते असें म्हणतात. पंतांचीही कविता पुष्कळ ठिकाणीं असावी त्यापेक्षां जास्त संस्कृतशब्दप्रचुर असते ही गोष्ट नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. पंत स्वत: उत्कृष्ट विद्वान् पुराणिक होते आणि उत्तम विद्वान् पुराणिकाचें जसें कवित्व असावें तशीच त्यांची कविता उतरली आहे. आणि संस्कृतांतल्या सर्व गोष्टी मराठींत आणून भरण्याचा मोठा नाद त्यांस असल्यामुळें जेथें तेथें संस्कृत शब्द योजण्याची त्यांना भारीच हौस वाटत असे.

पंतांची भाषा इतर कवींच्या भाषेपेक्षां, पौराणिक कथानकांवर लिहिणाऱ्या कवींच्या भाषेपेक्षांही, जास्त संस्कृतप्रचुर असते ही गोष्ट प्रत्यक्ष पुराव्यानें सिद्ध करून देतां येण्याजोगी आहे. खालीं मुक्तेश्वर व मोरोपंत या दोघांच्या काव्यांतील सारख्याच कथानकांवरचे दोन लहानसे उतारे दिले आहेत. यांतील शब्दसंख्या मोजून त्यांमध्यें शुद्ध संस्कृत म्हणजे तत्सम शब्दांचें प्रमाण किती आहे हें काढलें असतां पंतांची भाषा मुक्तेश्वरांच्या भाषेहून जास्त संस्कृतप्रचुर आहे हें तात्काळ दिसून येतें. शिवाय मुक्तेश्वर व पंत या दोघांच्या रचनाशैलीमध्यें कसा व केवढा फरक आहे हेंही ठळकपणें नजरेंत भरण्यास हीं समकक्ष अवतरणें चांगलीं उपयोगीं पडतील. वर्ण्यविषयावरील मुक्तेश्वराची झेप कशी वाचासारखी आहे व पंतांची द्रुतगति

आर्या कशी घोडदौडीसारखी भासते तेंही अवश्य निरीक्षण करण्याजोगें आहे. उतारे समुद्रमंथनाच्या कथेंतील आहेत. देवदानव मंदरपर्वत घुसळूं लागले व भगवंतानें कूर्मावतार घेतला त्या प्रसंगींचें वर्णन आहे.

सागरीं निक्षेपितां अचळ । भेदूनि चालिला पाताळ । ते वेळे धांवोनि लक्ष्मीलीळ । कमठ झाला तळवटीं ॥ ८१ ॥ उदधि डोलतां मंदरगिरी । पुढती कंबुचक्रधारी । हस्त ठेवूनि पर्वतशिखरीं । लोट आंगें सांवरिला ॥ ८३ ॥ वेष्टिला असतां विषयव्याळें । विवर्ती भोंवतां जडजीव अचळें । त्यातें कृपेनें वैकुंठपाळें । हस्त माथां ठेविजे ॥ ८४ ॥...पोट रगडतां व्याळवदनीं । अग्निज्वाळा लागली गगनीं । गरळ वमितां सिंधूचें पाणी । कढों लागलें खळखळां ॥ ९२ ॥ स्फुलिंग लागतां अळुमाळ । यंत्रमुखीं उठती ज्वाळ । तेंवि ओढितां सांडी व्याळ । विषानळ भडभडां ॥ ९३ ॥ तप्तकांचनरसाचा लोट । तेंवी फूत्कारी काळकूट । वर्षतां दैत्यांचे संघाट । जळों लागले त्यावेळीं ॥ ९४ ॥ मुक्तेश्वर; आदिपर्व अ० ४.

वरील उताऱ्यांत एकंदर ९८ शब्द असून त्यांपैकीं ५१ तत्सम (शुद्ध संस्कृत) आहेत व ४७ तद्भव, देशी वगैरे बाकीचे आहेत. म्हणजे यांत शेंकडा ५२ शुद्ध संस्कृत व शेंकडा ४८ तद्भव, देशी वगैरे, असें शब्दांचें प्रमाण निघतें. आतां पंतांच्या " अमृतमथन " नामक खंडकाव्यांतील त्याच प्रसंगींचें वर्णन:—

गरमग्नगिरिस पृष्ठीं धरि, होय क्षीरधींत कासवसा ।
उपदेशी कीं माझी स्वस्थ सुजन हो ! धरूनि कास वसा ॥ ४० ॥
गगनगदुग्धाब्धिमथनकुतुकप्रेक्षक सुरांत राहूनी, ।
कवळी अजित नगाच्या डळमळतां मस्तकासि बहूनीं ॥ ४३ ॥
वासुकिच्या बहुनासामुखनयनांतूनि बहु गळे गरळ ।
तद्धूमानलहतरुचि असुर गमति दावहत जसे सरळ ॥ ४५ ॥
वासुकिच्या श्वासविषज्वलनें तो देवगणहि होरपळे ।
एका प्रभुला पाहुनि विषवाहि, जसाचि विधुसि, चोर पळे ॥ ४६ ॥

यां उताऱ्यांत एकंदर शब्द ६७ असून त्यांपैकीं ४५ तत्सम संस्कृत व २२ तद्भव, देशी वगैरे आहेत. म्हणजे तत्सम संस्कृत शब्द देशी शब्दांच्या दुपटीनें असून त्यांचें शेंकडा प्रमाण ६७ इतकें निघतें. मुक्तेश्वरांत हेंच संस्कृत शब्दांचें प्रमाण शेंकडा ५२ आहे हें आपण पाहिलेंच. अशा रीतीनें पंतांची संस्कृतप्रचुरता प्रत्यक्ष आंकड्यांनीं सिद्ध होऊं शकते. वरील आर्या मुद्दाम जास्त

संस्कृतशब्दमय म्हणून निवडलेल्या नसून त्या पंतांच्या नेहमींच्या धाटणीच्याच आहेत हें येथें सांगून ठेविलें पाहिजे. अगदीं समान कथाभागाचा प्रसंग काढून त्यांतील सारख्या अर्थाचींच दोन्ही कवींचीं वर्णनें दिलीं आहेत. विसदृश अशा वर्णनाचा भाग सर्व गाळून टाकला आहे. त्यामुळें या दोघां कवींच्या वर्णनशैलीची भिन्नता उताऱ्यावरून पूर्णपणें लक्षांत येणार नाहीं. मुळांतील सर्व प्रसंग वाचून पाहिल्यासच त्याचें ज्ञान होईल. तथापि अगदीं सारख्या अर्थाचें वर्णन देखील दोघां कवींनीं त्यांतल्यात्यांत किती निराळ्या रीतीनें केलें आहे हें वरील उताऱ्यांत दिसून येईलच आणि दोघांही कवींच्या स्वतंत्र रचनाकौशल्याविषयीं कौतुकही अवश्य वाटेल.

नुसते वरील उतारेच पाहिले तरी मुक्तेश्वराच्या भाषेंत जो ठसठशीतपणा व जें मराठपण आढळतें तें पंतांच्या वाणींत दिसून येत नाहीं. उलट त्यांची भाषा कांहींशी कृत्रिम व बोजड वाटते. यावरून संस्कृत शब्दांची अतिरिक्त योजना केल्यानें काय हानि होते तें स्पष्ट नजरेस येईल. तरी मुक्तेश्वर हा विद्वान् ब्राह्मणांच्या कुळांत निपजलेला संस्कृतज्ञ कवि होता. अर्थात् त्याच्या कवितेंत संस्कृताचें वळण बरेंच दृष्टीस पडतें. आमच्या साध्या, खेडवळ मराठी भाषेच्या लडिवाळपणाचा व मनमोकळेपणाचा खेळ डोळे भरून कोणास पहावयाचा असेल तर त्याला तुकाराम–नामदेवांच्या अभंगांकडे वळलें पाहिजे.

> आणीक म्यां कोणा यावें काकुळती । कोण कामा येती अंतकाळीं ॥
> तूं वो माझी सखी होसी पांडुरंगे । लवकरी ये गे वाट पाहें ॥
> काया वाचा मनें हेचि आस करीं । पाउलें गोजिरीं चिंतीतसें ॥
> तुका म्हणे माझी पुरवीं हे आस । घालीं ब्रह्मरस भोजन हें ॥

या अभंगांतले ३२।३३ शब्द तद्भव व देशी असून केवळ ८।९ शब्द संस्कृत आहेत. म्हणजे संस्कृत शब्दांचें प्रमाण केवळ शेंकडा २० झालें. आणि संस्कृत शब्द आहेत ते तरी कोणते ? तर काया, वाचा, भोजन, अंत, हे अगदीं खेडवळांच्या भाषेंत देखील मिसळून जाऊन भाषेशीं समरस झालेले असेच आहेत असल्या साध्या शब्दांनीं भाषेला तरी कांहीं कमीपणा आला आहे काय ? उलट ती अधिकच गोड, सुंदर व गोंडस बनली आहे.

९. संस्कृतशब्दप्राचुर्याचा हा जो आम्ही दोष म्हणून उल्लेख केला आहे तो केवळ त्याच्या अतिरेकास अनुलक्षून होय, हें मुद्दाम येथें सांगितलें पाहिजे.

आणि असा अतिरेक पंतकाव्यांत सर्वत्र दिसून येत नसून कित्येक ठिकाणींच मात्र आढळतो हेंही अवश्य ध्यानांत ठेवलें पाहिजे. देशी भाषांमध्यें संस्कृत शब्द घेऊं नयेत असें कोणीच म्हणत नाहीं व म्हणणेंही शक्य नाहीं. आपल्याला जसे पाहिजेत तसे व जितके पाहिजेत तितके शब्द संस्कृतांतून घेणें हेंच रास्त होय. कारण आपल्या हक्काचें तें अक्षय्य भांडारच आहे. विशेषतः शास्त्रीय व विवेचन-प्रधान ग्रंथांत अवश्य ते पारिभाषिक शब्द संस्कृतांतूनच घेतले पाहिजेत. परंतु काव्याच्या संबंधानें दृष्टि थोडीशी निराळी ठेवली पाहिजे. भाषेच्या रमणीयतेस व सौंदर्यास बाधक होईल असा कोणताही अतिरेक काव्यामध्यें दूषणीयच ठरेल. संस्कृत शब्दांविषयीं, मराठींत रुळलेले न रुळलेले, परिचित अपरिचित, साजणारे न साजणारे, असें कांहीं एक तारतम्य न बाळगतां सर्व संस्कृत शब्दांचा अमर्याद उपयोग करणें हें केव्हांही इष्ट होणार नाहीं. ही भाषा मराठी आहे, संस्कृत नव्हे हें केवळ क्रियापदावरून व एकादद्दुसऱ्या विभक्तिप्रत्ययावरून ओळखण्याची पाळी यावी ही स्थिति कोणीही चांगली म्हणेल असें वाटत नाहीं. म्हणूनच

सच्चेतःकैरवातें विकच करि जगत्ताप संपूर्ण टाळी
अज्ञानध्वांत सारें हरि, रसिकचकोरांसि अत्यंत पाळी ।
नाना वस्तु प्रकाशी, कविहृदयपयोराशिसंतोषहेतु
काव्येंदु स्वप्रभेनें खळविरहिजनीं होतसे धूमकेतु ॥ मं. रा. उपसंहार ८

या, किंवा वदान्यजनसद्गुरो ! प्रशमितामितासन्मदा ! ।
गदारिदरनंदकांबुजधरा ! नमस्ते सदा ॥ केका. १.

अशा गीर्वाणशब्दखचित उद्गारांपेक्षां

श्रीरामा तूं स्वामी असती माझ्या शिरावरी जागा ।
आम्हांसि तुझ्या पायांवांचुनि निर्भय नसे दुजा जागा ॥ आर्याकेका. १

हे पंतांचेच, अंतःकरणाच्या उमाळ्यासरशीं निघालेले, साधे, अकृत्रिम उद्गार जास्त हृद्य होत असें कोणास वाटल्यास तें गैर म्हणतां येणार नाहीं.

१०. (२) अरूढ शब्दांचा अगदीं रुळलेल्या शब्दांप्रमाणें प्रयोग. मराठीमध्यें संस्कृतांतील जे शब्द रूढ झालेले नाहींत व कांहीं केलें तरी रूढ होण्याचा संभव नाहीं असे शब्द सामान्य मराठी शब्दांप्रमाणें सर्व विभक्तींचे प्रत्यय लावून वापरण्याची पंतांची प्रवृत्ति दिसून येते. ही पुष्कळ अंशीं संस्कृती-करणाच्या हव्यासामुळें व कांहीं अंशीं यमकांच्या जरूरीमुळें उत्पन्न झालेली

होय. ' ओकस् ' (घर) हा एक अशा तऱ्हेचा शब्द होय. गृह व गेह हे याच अर्थाचे संस्कृत शब्द आहेत. ते मराठींत रूढ झाले असल्यामुळें सर्वजण त्यांचा वाटेल तितका प्रयोग करतात परंतु ' ओक ' या शब्दाचा तसा करीत नाहींत. उ०--' खचित नग सकळ देहीं, गेहीं तद्दीप्ति मायिना कांहीं ' मं. भा. १०.१६७. येथें ' गेहीं ' याच्याऐवजीं ' ओकीं ', असें घालून ' ओकीं तद्दीप्तिमायिना कांहीं ' असें लिहिल्यास किती वाईट दिसेल याची सहज कल्पना होईल. संस्कृतांत देखील हा शब्द अगदीं अरूढ असून त्याचा सुटा प्रयोग फार करून करीत नाहींत. बहुतेक दिवौकस् सारख्या समासांमध्यें हा योजलेला आढळतो. पण पंत मराठींत देखील याचा बिनदिक्कत वाटेल तेथें प्रयोग करतात. अर्थातच तो अतिशय वैरस्यावह होतो. उदा०—' जा हृदओकामधुनीं,' कृ. वि. १६. ५२. ' न पाहती ओकासी ' कृ. वि. १६. २०, ' केला नाहींच उद्धवा ! ओक ' मं. भा. ११.२५९ ' ऐसें गावूनि सेविलें ओक ' मं. भा. २१. ५३४ इ० इ०. त्याचप्रमाणें दुसरा शब्द ' इन, (स्वामी, श्रेष्ठ) हा होय. स्वामी, श्रेष्ठ या अर्थी संस्कृतांत देखील हा शब्द फारसा वापरलेला दिसत नाहीं. पण पंतांनीं याचा प्रयोग फार, कंटाळवाणा होईल इतका, केला आहे. ' वीना,' ! कृ. वि. १६. ७, १७. ५, ' बुडवी शोकनदीन ' कृ. वि. १६. २५; ' खळदमना सकळेना ! ' कृ. वि. १६.४५; ' जाणोनि हरादीना ' कृ. वि. १६.४८; ' हे एकाच अध्यायांतील प्रयोग. याशिवाय, कृ. वि.--' मोदनदीना,' ३९. ४७; ' त्रिजगदिन ' ४१. ६; ' सेना सेना शरार्ता धरि भय ' ७६.१०; ' घोटकरीन,' १८. १३; ' करीना ' ४३. ३; ' सुकवीन ', मं. भा. १०. ८७२;-अशीं या एकाच शब्दाचीं शेंकडों उदाहरणें काढून दाखवितां येतील. ' रामावांचुनि दावा (अरण्याला) गेला ' कृ. वि. १६–१९; येथें ' दाव ' शब्दाचा किती अनुचित प्रयोग केला आहे ! असेच याद (जलजन्तु), मन्तु (अपराध), आग (अपराध), दर (शंख), अरि (चक्र), वाडव (ब्राह्मण), अग (वृक्ष) वगैरे अनेक शब्द अशा रीतीनें योजिले आहेत. संस्कृतांतील कित्येक अरूढ क्रियापदेंही अशा रीतीनें मराठींत आणण्याची पंतांची प्रवृत्ति क्वचित् दिसून येते. ' ते यदु जाले द्रवते (पळते),' कृ. वि. २. ८; ' प्राणी जो जो धाला (प्याला),' ' धरणीला अव ' कृ. वि. ३. ९. ' त्या परमोदारासी नटतां (नाचतां),' कृ. वि. ३३. १४. द्रु पळणें, धे (धा)--पिणें, अव-रक्षणें, नट्–नाचणें हे सर्व अस्सल संस्कृत धातु आहेत.

अरूढ शब्द अगदीं रुळलेल्या शब्दांप्रमाणें सररास वापरण्याच्या या प्रकारामुळेंही पंतांची भाषा बरीच कृत्रिम व बेडौल झाली आहे. संस्कृत शब्दांचा अतिरेक करण्याच्या प्रवृत्तीचाच हा एक भाग होय.

(३) **दीर्घ समास.**—यांविषयीं पूर्वी विवेचन केलेंच आहे; तेव्हां येथें पुनरुक्ति नको. लांबलचक समासांमुळें भाषेस कशी कृत्रिमता आली आहे हें तेथें दिलेल्या उदाहरणावरून दिसून येतच आहे.

(३) संस्कृतीकरणाच्या सोसामुळें आलेले आणखी कांहीं प्रकार.

११. (१) **संस्कृत विभक्तिरूपें.**– पुष्कळ ठिकाणीं संबोधनाचीं रूपें संस्कृत व्याकरणाप्रमाणें साधलेलीं पंत योजितात. उ०—' साधो ! ' कृ. वि. ३०. १३; ' जंबूदो ! ' ३०. १२; त्याचप्रमाणें देवि, शुभांगि, महि, इ० दुर्वास् या संस्कृत शब्दाचें मराठींत सामान्यत: दुर्वास असें रूप वापरलें जातें. पंत दुर्वासा: या संस्कृत रूपास अनुसरून दुर्वासा असें रूप योजितात. तथापि संस्कृतांतील द्वितीया चतुर्थी इत्यादि विभक्तींचीं रूपेंही मराठींत आणण्यापर्यंत पंतांची मजल फारशी जात नसल्यामुळें हा प्रकार फारसा दोषास्पद मानितां येत नाहीं.

(२) **संस्कृत लिंगें.** – संस्कृतांतील शब्द मराठींत घेतांना पुष्कळांच्या लिंगामध्यें फरक होतो. परंतु या फरकास न जुमानतां पंत पुष्कळदां मूळ संस्कृतांतलींच लिंगें उपयोगांत आणतात हें सुप्रसिद्ध आहे. **कृ. वि.**—' कृष्णाचीं प्रिय मित्रें, ' १७. १०; ' चित्तें मित्रें जालीं तटस्थ, ' १९. १०; ' कंसाचें आग, ' ३८. ५; ' प्रेमा त्याचा, ' ३९. २६; ' विघ्न जाला, ' ३९. ३४; ' पितृभगिनीचे अश्रु, ' ४९. १७; 'नवीं नानावस्तु विलोकिलीं न तसीं मानवीं,' ७५. १४; **मं. भा.**—' नृपरत्नाचें जन्म, ' १. १४; ' शपथ वाहिले शतदा, ' ९. ४१; ' ते प्रभुदार उन्मत्त तसे वदले ' १०. ११३९; इ० इ०. परंतु कित्येक वेळां संस्कृत लिंगाचा त्याग करून मराठींत रूढ झालेलें लिंगही पंतांनीं योजिलेलें दृष्टीस पडतें. उदा०—' आमुची दारा, ' मं. भा. ९. १७३. तेव्हां या बाबतींत कोणत्याही एका तत्वास पंतांनीं सर्वथा अनुसरलें नसून मनसोक्त वागण्याचा क्रम ठेविला आहे असें दिसतें. तथापि एकंदरीनें संस्कृत लिंगाकडे त्यांचा कल अधिक दृष्टीस पडतो.

(३) **संस्कृत वाक्यें अथवा वाक्यखंड यांचा प्रयोग.**—मराठींत काव्य रचीत असतांना मध्येंच संस्कृतांत उद्गार काढण्याची पंतांना लहर येते. संस्कृताकडे त्यांचें मन सदैव कसें ओढ घेत होतें हें यावरून चांगलें दिसून येतें. असे संस्कृत वाक्यखंड पंतांच्या काव्यांतून शेंकडों काढून दाखवितां येतील. त्यांपैकीं ' ब्रूयात्क्षमी गर्भारोऽसीति यत युधिष्ठिरं प्रभुं कोन ? ' सभा. असे कांहीं प्रसिद्धच आहेत. त्याचप्रमाणें—

ऐसें म्हणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी म्हणे, ' अयि ते ।
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते ' ॥ आदिपर्व ११.

ही अर्धी अधिक संस्कृतांतच रचलेली आर्याही निबंधमालाकारांनीं उघडकीस आणलेल्या ' अनुष्ठितुं ' या अपाणिनीय प्रयोगामुळें विशेष प्रख्यातीस आली आहे. कित्येक ठिकाणीं मूळ ग्रंथांतलें संस्कृत अवतरण पंत आपल्या काव्यांत गोंवतात.

गडबडुनि जों मुनि म्हणति ' कं धास्यति ' तोंचि इंद्र ' मां धाता ' ।
मं. भा. ९. ८१.

येथील 'कं धास्यति' 'मां धाता' हीं प्रश्नोत्तरें मूळ भागवतांतील आहेत. तसेंच—

' उर्वशि जाये घोरे ! तिष्ठ ' म्हणे; ती इभी विलाप करी ॥ मं. भा. ११. ५११.

येथें पुरूरव्याच्या तोंडीं घातलेले, ' जाये घोरे ! तिष्ठ ' हे उद्गार मूळ भागवतांतील आहेत.

'वत्सान्मुंचन्कचिदस-।-मय' इत्यादिकहि कथिति वोभाट ।
त्या निर्दोषगुणाचे ज्याचा जो दशशतास्य तो भाट ॥ मं. भा. १०.१५९.

या आर्येतील ' वत्सान्मुंचन्कचिदसमये ' हे गोपबालकांचे उद्गारही मुळांतलेच आहेत. परंतु ते आर्येत बसवितांना पंतांनीं अगदीं अक्षम्य असा यतिभंग किंबहुना चरणभंग केला आहे. शिवाय ' इत्यादिक ' हा शब्द मराठी वाक्याचा अंश असल्यामुळें, त्याच्यामुळें ' असमये ' यांतील एकाराचा संस्कृत संधिनियमाप्रमाणें अकार केला आहे हीही चूकच झाली आहे.

एकंदरीनें मराठी कवितेंत मधून मधून संस्कृत वाक्यें घालण्याची ही पंतांची लकब फारशी चांगली आहे असें म्हणवत नाहीं. निवळ मराठी वाचक तर या प्रकाराला बिचकून जातीलच. परंतु काव्यसौंदर्याच्या दृष्टीनेंही एका भाषेत दुसऱ्या भाषेचें असें मिश्रीकरण करणें शोभावह होत नाहीं. क्वचित् प्रसंगीं मात्र

पंताचे संस्कृत उद्गार अत्यंत उचित, जोरदार व रसोत्कर्षकारक असे असल्यास काव्यांत शोभून दिसतात. उदाहरणार्थ—

' अयि ! कान्त, कासि, प्रियतम !' असें गद्गद वदे
रडे लाजे ताप प्रबळ पतिविश्लेषदव दे ।
प्रभूतस्वेदाश्रुस्नपिततनु ती सेज भिजली
उठे भ्रांतस्वांतें गडबडुनी आलींत निजली ॥ कृ. वि. ६२. १५.

येथील बाणासुराची मुलगी उषा इच्या तोंडीं घातलेले संस्कृत उद्गार खुलून दिसतात.

पंतभाषेंतील संस्कृतीकरणाचे आणखी प्रकार, म्हणजे १. विशेष्याप्रमाणें विशेषणांस विकृति करणें; २. नामधातु; ३. कर्मणिप्रयोग; इत्यादिकांची चर्चा मागें व्याकरणाविषयीं विवेचन करतांना केलीच आहे. ते काव्याच्या रसहानीस कारणीभूत होत नसल्यामुळें कोणीही विवेचक त्यांची दोषांमध्यें गणना करणार नाहीं. अर्थात् येथें त्यांची पुनरुक्ति करण्याची जरूरी नाहीं.

(४) श्रुतिकटुता.

१२. अनुप्रास, यमक वगैरे शब्दचमत्कार वाङ्माधुर्यास अनुकूल आहेत ही समजूत चुकीची आहे. विशेषतः त्यांचा अतिरेक तर पदलालित्यास प्रतिकूलच होतो. त्यांतून अनुप्रास हा रसानुकूल वर्णांनीं युक्त असून त्यांत वर्णसाम्याचा कंटाळवाणा अतिरेक झालेला नसेल तर तो भाषामाधुर्यास पुष्कळ वेळां पोषक होतो. परंतु यमक व चित्रकाव्याचे अनेकविध प्रकार हे भाषामाधुर्यास अपकारकच होत. संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांपैकीं कित्येकांनीं तर यमकाविषयीं स्पष्टच अरुचि दर्शविलेली आहे. दण्डीनें यमकाविषयींची आपली नापसंती पुढीलप्रमाणें व्यक्त केली आहे.—

आवृत्तिं वर्णसंघातगोचरां यमकं विदुः ।
तत्तु नैकान्तमधुरमतः पश्चाद्विधास्यते ॥ काव्यादर्श. १. ६१.

' यमक हें नियमानें मधुर असतेंच असें कांहीं नाहीं, ' असा या प्राचीन आलंकारिकानें यमकाविषयीं जरा सौम्य परंतु प्रतिकूल अभिप्राय दिला आहे. मम्मटाचार्यांचें मत तर याहीपेक्षां स्पष्ट आहे. ' तदेतत्काव्यान्तर्गडुभूतम्–इति नास्य भेदलक्षणं कृतम् ' ' हें (यमक) काव्यांतल्या गांठीसारखें आहे म्हणून याच्या

भेदप्रभेदांच्या व्याख्या येथें आम्ही करीत नाहीं,' (का. प्र. उल्लास ९)--असें त्यांनीं म्हटलें आहे. हा अलंकार वाईट, तो चांगला, अशीं मतें देत न बसतां अलंकारादिकांचें स्वरूपलक्षण करणें येवढेंच ज्यांचें काम ते साहित्यशास्त्रकार सुद्धां, कधीं नव्हे ते आपल्या मर्यादेबाहेर जाऊन यमकाविषयीं नापसंती व्यक्त करतात यावरून यमक हें रसास्वादास किती विघातक होत असलें पाहिजे हें लक्षांत येईल. संस्कृतांत यमकाचें बंड मुळींच नाहीं. कालिदासभवभूत्यादि महाकवींनीं त्याचा विशेष आदर केलेला दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. इतर कांहीं कवींनीं कृत्रिम शब्दचमत्कार केले आहेत. परंतु त्यांना काव्याच्या एकाद्या सर्गा-तच बहिष्कृतांप्रमाणें डांबून ठेवलें आहे; त्यांना सर्वत्र काव्यांत मोकळेपणानें वावरूं दिलें नाहीं. यमकांचें बंड कायतें आमच्या मराठींतच आणि तेंही संस्कृत श्लोकवृत्तांचा प्रचार महाराष्ट्र वाङ्मयांत झाल्यानंतर माजलेलें आहे. मराठींतल्या वाङ्माधुर्याची जणूं ओतीव मूर्तिच अशी जी ज्ञानेश्वरी तिच्यांत शब्दचमत्का-रांचा थाट यत्किंचित्‌ही दिसून येत नाहीं हें सांगावयास नको.

माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें । परी अमृतातेंही पैजा जिंके ।
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ १४
जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे । (पाडें—तुलनेनें)
वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥ १५ (बीक—महत्व, तेज)
ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा । (कळंभा—कलह)
बोलें इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां ॥ १६. ज्ञानेश्वरी अ० ६.

आपल्या वाणीच्या मंजुळ नादानें गुंगून जाऊन ज्ञानेश्वरांनीं स्वतःच आपल्या भाषेच्या अलौकिक मोहकपणाविषयीं जे हे उद्गार काढले आहेत तेच त्यांच्या भाषेच्या मोहकपणाची व सौंदर्याची उत्कृष्ट साक्ष देत आहेत. आणि त्यांत यमकादिकांचा थाटमाट तर कोठेंच दिसत नाहीं !

वर्ण्यविषय सुंदर व काव्यमय असला आणि त्या विषयाशीं कवीच्या हृदयाची तन्मयता झालेली असली म्हणजे भाषेंत माधुर्य, रसाळपणा व अवश्य तेवढें पद-लालित्य आपोआपच उतरतें. यमकादि शब्दचमत्कारांमुळें हें माधुर्य येत तर नाहींच पण नाहींसें मात्र होऊन भाषा निस्तेज, श्रुतिकटु व कर्कश बनते. हीं दोन तत्वें लक्षांत घेतलीं म्हणजे पंतकाव्य हें श्रुतिकटुत्वदोषास कां पात्र झालें आहे हें सहज लक्षांत येईल. पंतभाषेंतील श्रुतिकटुत्वासंबंधीं, वरील विवेचनावरून पुढील

सिद्धान्त सहज बांधता येतील.--१. जेथें जेथें यमकादि शब्दचमत्कृतीविषयींचा पंतांचा हव्यास वाढलेला दिसून येतो. तेथें तेथें पंतांची भाषा नीरस व कटु झालेली दिसून येते; उदाहरणार्थ: कृष्णविजय पूर्वार्ध, कुशलवचरित, महाभारतांतील कित्येक आर्या इ०. २. ज्या ज्या काव्यांत वर्ण्य विषय सुंदर असून पंतांची त्याच्याशीं तन्मयता झाली आहे तेथें यमकांचा हव्यास कमी होऊन पंतांची भाषा कोमल, रसाळ व मधुर अशी उतरली आहे. उदा०--महाभारतांतील बरेच भाग, मंत्ररामायण युद्धकांड, मंत्रभागवत स्कंध १०, ११, श्लोक व आर्या केकावलि, भीष्मभक्तिभाग्य, कृष्णविजय अ० ८०-९०, इ० इ०. ३. जेथें यमकादिकांचा हव्यास फारसा नाहीं, परंतु वर्ण्यविषयांतली तन्मयताही विशेष प्रतीतीस येत नाहीं तेथें भाषा फार सुंदर नाहीं व अगदीं नीरसही नाहीं अशी सामान्य वठली आहे. उदा०--हरिवंश, मं. भा. १-९, इ०. असो. श्रुतिकटुत्वानें युक्त अशीं पंतांच्या सर्व काव्यांतलीं पद्यें येथें एकत्र करणें अर्थात्‌च शक्य नाहीं. यास्तव त्याचे कांहीं थोडेसे मासले देऊन याविषयींचें विवेचन आटपतें घेणें इष्ट होईल.

(१) ' विधु ! तुझि हे तुच्छ, विरे । न जड, निषाल्पद्रवैकहेतुच्छवि रे ! ।
जितुनि तिसहि पळवि रवी; । हरिमुखविधु अजित कठिनहृदुपळ विरवी '॥
कृ. वि. ७. ३९.

(२) श्रुतिविश्रमदा ल्याली । पद्मरागागराग समदाल्याली । कृ. वि. १५.१४.

(३) देवकि कुक्षिककुब्जा, । मित्रा नलिनी नमी सकौतुक कुब्जा ।
देहीं वक्रा सरली । सनिं, तीसीं रुचलि गोपशक्रास रली ॥ कृ.वि. ४२.१.

(४) शाल्वासीं गांठि घाली हरि तंव, अहितप्रेरिता शक्ति आली
व्यालीची काय आली विभुविशिखतती तीस पीतां न धाली ।
श्रीमत्कृष्णाशुगालिक्षतरिपुरुधिरें ती रणक्षोणि न्हाली ।
सौभाची शौर्यशालिप्रभुशरनिकरें चालनी व्यक्त झाली ॥ कृ. वि. ७७. ७.

हा शेवटला श्लोक शाल्व व कृष्ण यांच्या युद्धाच्या वर्णनांतला आहे. येथें वीररस मुळींच पुष्ट झाला नसून भाषा कटु व कर्कश झाली आहे व श्लोक लांबलचक असल्यामुळें अधिकच कंटाळवाणा वाटत आहे. सबंध पद्यांखेरीज भाषेस कटुत्व आणणारे, जंभ्रूद्रो, कृ. वि. ३०. १२; धृतवारिरुडर्यर्कीं, ३९. ८; भवदधृदोकच्छेदे, ४५. ७७; हरओकामग्रुनी, ११. ५२; मूर्च्छेद्रपांशुच्छटीं, ६५. २४; असे शब्दप्रयोगही किती तरी काढून दाखविता येतील. परंतु केवळ दिग्दर्शन करण्यापलीकडे त्याचा जास्त विस्तार करण्याची जरूरी नाहीं.

१३. पंतांच्या काव्यांमध्यें कटु व श्रुतिदुःखद अनुप्रास पुष्कळच दिसून येतात.

१. खळबळ खळबळ करि सखि ! सकळ विकळ धरिति न पळ बळ मळधी ।
म्हणति सुर, ' पळति जळचर, विभुशरशुचि कढवि रिपुकटकजळधी ॥
क्र. वि. ८३. १४५.

२. सति अति नति रतिपतिमति भजनीं नैवेद्य मूर्तिचा खावा ।
क्र. वि. ८३.१६७.

३. होय जतुर्भुज मजवरि करि हरि अरिकरिहरी सदनुकंपा ।
क्र. वि. ८३. १६७.

४. पतिप्रतिनिधिप्रति प्रभुवरस्त्रिया पाहती । क्र. वि. ५५. २७.

५. गळीं चुंबिति, भेटति, नाचविति सुशब्द पढविति ब्रह्मा ।
गोपी सिकविति नति यतिपतिमतिरतिदा यदात्मज ब्रह्मा ॥ मं.भा.१०.१५८

या सर्व अनुप्रासांमध्यें वर्णांच्या आवृत्तीचा अतिरेक झाल्यामुळें ते दुःसह झाले आहेत. यमकाविषयीं तर विचारावयासच नको ! त्यांच्यामुळें भाषेस कटुता नेहमींच येते. वर कृष्णविजय पूर्वार्धातलीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांत बहुतांशीं यमकच कटुतेस कारण झालें आहे. आणखी महाभारतांतील थोडींशीं उदाहरणें.—

१. नुरवि करुनि परकवचा अंगप तितउ पळसमय मानि भानें ।
भीमानें शर गणिलें अंगपतित उपळसम यमनिभानें ॥* द्रोणपर्व १२.१०४.

येथें १५ अक्षरीं यमक आहे. भाषेच्या कुरूपतेची सीमा झाली आहे. बारा अक्षरीं यमक —

२. समुपेक्षिलें ठकविलें पूतनामहिमानका पित्या सहसा ।
म्यां मारावें खळ ते कृतनामहि मानकापित्यासह सा ॥* द्रोणपर्व २६. ६.

खालील उदाहरण वरच्यापेक्षां पुष्कळ बरें आहे. यमक १२ अक्षरांचें असूनही भाषेचा स्वाभाविकपणा पुष्कळ अंशानें कायम आहे.

३. मातेची सरि येना उपमातेला, अगाधबळ बा ! हा ।
काय तुपाची साजे उपमा तेला अगा धबळबाहा ॥ द्रोणपर्व. २४. २८.

(५) यमकामुळें व मंत्ररचनेमुळें उत्पन्न झालेले व इतर कांहीं दोष.

१४. यमकें जुळविण्यासाठीं पंतांना नाना तऱ्हेच्या लटपटी लढवाव्या लाग-

---

* हीं उदाहरणें पांगारकरांच्या पुस्तकांतून घेतलीं आहेत. मो. च. पृ. ५४०-४१.

तात. पुढें दिलेला हा एक प्रकार होय.—' काळ ' पदोत्तर ' कूट ' । कूर तसा उसळला बळावर कूट ॥ कृ. वि. ४४. ११. येथें पुढच्या कूट शब्दाशीं जमण्याकरितां काळकूट शब्दाचा भंग करून त्यांतील ' कूट ' हा अवयव चरणाच्या शेवटीं आणला आहे. तसेंच—' दीर्घपूर्व प्रसाद ' (ज्याचें पूर्वाक्षर दीर्घ आहे असा प्रसाद, म्हणजे ' प्रासाद ') कृ. वि. ५५. १३; ' परापूर्वभूर्ता ' कृ. वि. ५६. २८; ' गोपूर्वविंदा ' कृ. वि. ५७. ५०; ' जरापूर्वसंघ ' कृ. वि. ७१. ३, ' दंपतीच अपकार; ' इ० इ०.

पण यमकांपेक्षां मंत्रांचीं अक्षरें जुळविण्याकरितां पंतांना असल्या कोट्या फारच अधिक प्रमाणांत करणें भाग पडलें आहे. अशा कोट्यांचीं उदाहरणें अर्थात् मंत्ररामायण, मंत्रभागवत अशा मंत्रखचित काव्यांतच आढळतात. पैकीं नमुन्याखल कांहीं दिलीं आहेत.—' सु ' दुजा ' व ' वर्ण आधीं, मग ' देव ' जयाचिया नामीं । (वासुदेव) मं. भा. २. ७४; ' वासु ' असा जो ' देव, ' मं भा. २. १०६; ' य ' विरामांसि म्हणे प्रभु, (जय, विजय), मं. भा ३. ७७; ' गर्त ' पुढें प्रथम ' अजी, ' (अजीगर्त), मं. भा. ९. १०३; ' यम ' उलटा जो, (मय), मं. भा. १०. ४७३; ' य ' प्रथम बंधु जीचा देह, असी, । (य अक्षरांतील प्रथम भाग ऽ ज्याचा बंधु असा, म्हणजे वांकलेला जिचा देह, अशी) मं. भा. १०. ५१७. ' यगण ' जसा एक मुखीं मात्र सरळ (।SS हें यगणाचें चिन्ह त्याप्रमाणें मुखीं मात्र सरळ), मं. भा. १०. ६३८. ' ण ' पुढें मागें 'रा' ज्या, (रावण), मं. रा. ६.

शब्दांच्या अक्षरविन्यासाचा भंग करून त्यावर कोट्या करण्याची ही पद्धत कोणच्याही दृष्टीनें समर्थनीय ठरणें शक्य नाहीं. पंतांच्या शिवाय इतर कोणाही मराठी कवीनें असा प्रकार केला असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं खुद्द हंस व पांगारकर यांनाही पंतांच्या या प्रवृत्तीचें समर्थन करणें अशक्य वाटून त्यांनीं तिला दोषांमध्यें गणलें आहे. अर्थात् तिचें दोषरूपत्व केवळ निर्विवाद आहे.

६'५. यमकाकरितां व वृत्तास जुळण्याकरितां शब्दांचीं स्वाभाविक रूपेंही पंतांनीं पुष्कळ ठिकाणीं बदलून टाकिलीं आहेत; व मनास लागतील तशीं अपभ्रष्ट रूपें योजिलीं आहेत. 'दुर्गे' (दुर गे), भीष्म १. ४४; 'दोघ' (दोघे); ' होनि ' (होउनि) 'उंचलिता'(ऊचलिता), हे शब्द पांगारकरांनीं दिले आहेत. यांशिवाय पुढील अपभ्रष्ट रूपें नजरेस आलीं.—कृ. वि.—' लजति ' (लाजति) ५. ४;

महेला (महिला) ८. १०, २९. १६; सगडी (शेगडी) १२. १०; लव्हा (लव्हाळ्या) ११. २७; पवे (पावे) १३. ४७; लवी (लावी) १६. ४,५२; नया (नद्या) १७. १७; मना (माना) २५. ४४; साजि (सजवि) २१. ३; रीती (रिती) २३. ८; दिसा (दिवसा) ३१. १५; तां (त्वां) ३२. ८ ३७. ३०; अंसीं (अवसीं-सायंकाळीं) ३४. १८; बाहे (बाहु) ३६. ७; डाया (डाव) ३६. २०, ३७. १०; दोघ (दोघे) ३८. ३०; कषाप (कसाब) ३८. ४८; लाहे (लाही) ३९. १५; सप्नीं (स्वप्नीं) ४१. १३; तजी (त्यजी) ४९. ३८; तां (त्वां) ४७. ३५, बहुदीन (दिन) ४७. ३९; तीं (तीन) ५४.३०; घतो (मारो, हा शब्द चमत्कारिकच आहे) ५४.३२; मं.भा.- बाविस (बावडीस-विहिरीस) ४.१४१; वार्धक (वार्धक्य) ६.७;नवाजा (नावाजा-वाखाणा) ६.७९; लिपूनि (लिंपूनि) ७ ८८; कंची (कैची) ९.१० हे असले प्रकार उघडपणें यमकाकरितां व वृत्ताकरितां मुद्दाम केले असल्यामुळें भाषेच्या अशुद्धतेमध्यें गणतां येणार नाहींत. ते काव्यदोषांमध्येंच गणले पाहिजेत. पंतां-प्रमाणें इतर श्लोकबद्धरचना करणाऱ्या कवींच्या काव्यांतही असले प्रकार आढळून येतात हेंही लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

१६. आणखी डोळ्यांत तेल घालूनच बसावयाचें म्हटलें तर,

१. सखि ! सुकृतगणकृत शुष्को-।-पचरण निवविल कसें दरिद्रातें ।

क्र. वि. ८३. ३९.

२. तेथें शोभति कुटिला-।-लककुंडलमुकुटमणि रुचिस्तोम ।

मं. भा. १०. ११२८.

३. तेथें पार्षद नंद सु-। नंद, सुदर्शन वरायुधें मूर्तें । मं भा.१०. ११२७.

यांसारखे यतिभंग, अथवा चरणभंग, कृ. वि. ३१. १५ प्रमाणें अगदींच क्वचित् आढळणारे वृत्तभंग, वाचकांस मधून मधून आढळतील. परंतु या अगदीं क्षुल्लक दोषांमुळें रसास्वादास फारसा व्यत्यय येत नसल्यामुळें त्यांच्याकडे कोणीही सहृदय वाचक करडी नजर करून पाहणार नाहीं हें उघड आहे.

---

[२]

१७. आतांपर्यंत केवळ भाषादोषांविषयीं विचार केला. आतां 'औचित्यहानि' व ' ग्राम्यता ' हे दोन वर्ण्यविषयगत दोष पंतांच्या काव्यांत विशेष दिसून येतात

त्यांचा विचार करून हें दोषाचें प्रकरण संपवून टाकूं. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं अपुष्टता, कष्टता, व्याहतता इ० अर्थदोष पुष्कळच सांगितले आहेत. परंतु एकतर ते सर्व दोष पंतकाव्यांत पुष्कळ प्रमाणांत दिसून येत नाहींत; दुसरें, ते सर्व अतिशय सूक्ष्म अवलोकनानेंच लक्षांत येण्यासारखे असे असून सामान्य रसिक वाचकाच्या ठळकपणें नजरेस येण्यासारखे नाहींत; व तिसरें म्हणजे, ते सर्व औचित्यहानि या व्यापक दोषांत अंतर्भूत होण्याजोगे आहेत. यास्तव त्यांचें पृथक् विवेचन येथें करण्याचा उद्देश नाहीं.

(६) औचित्यहानि.

१८. ' औचित्यहानि ' हा दोष अत्यंत व्यापक आहे. याच्या पोटांत इतर सर्व दोष येतात असें म्हटलें तरी चालेल. कारण कोणताही दोष झाला तरी तो तेवढ्यापुरती काव्यांतील औचित्याची हानि करतोच. क्लिष्टतेमुळें, कृत्रिमतेमुळें व इतर भाषागत दोषांनीं तरी काय, भाषेच्या औचित्याचीच हानि होते. अर्थ दोषांनीं तरी अर्थाच्या औचित्याचीच हानि होते दुसरें कांहीं होत नाहीं. यासाठींच काव्यमर्मज्ञांनीं म्हटलें आहे--' अनौचित्यादृते नान्यद्रसभङ्गस्य कारणम्,' 'औचित्यहानीखेरीज रसभंग होण्यास दुसरें कांहींच कारण असत नाहीं.' अनौचित्य दोष याप्रमाणें अत्यंत व्यापक असल्यामुळेंच त्याचें लक्षण करणें फार कठीण आहे. काव्यांतील रस हा जसा सर्वस्वीं सहृदयहृदयसंवेद्य असतो त्याप्रमाणें त्या रसाचा भंग करणारें अनौचित्य हेंही सहृदयसंवेद्यच होय. त्याची रेखीव व्याख्या कधीं करतां यावयाची नाहीं. भातांत लागणाऱ्या खड्याप्रमाणें काव्याचा रसास्वाद घेतांना जी गोष्ट डाचते ती गोष्ट औचित्यहानि करणारी होय असें सामान्यतः म्हणतां येईल. अमुक एका ठिकाणीं औचित्यहानि झाली आहे कीं नाहीं हें ठरविण्यास काव्यशास्त्रज्ञ सहृदयाचेंच मत प्रमाण होय. एकच गोष्ट एका ठिकाणीं उचित ठरेल तर दुसऱ्या ठिकाणीं अनुचित व काव्यसौंदर्यास विघातकही ठरेल. त्याला देखील कांहीं कारणें सांगतां येतील हें खरें; पण तीं कारणेंही बहुधा सहृदयहृदयसंवेद्यच असतात. अर्थात् सहृदयाच्या अंतःकरणवृत्तींवरच शेवटीं सर्व येऊन ठेपतें. एकच गोष्ट एका ठिकाणीं अत्यंत समर्पक तर दुसऱ्या ठिकाणीं अगदीं अनुचित व वैरस्यकारक कशी ठरते हें पुढील उदाहरणावरून लक्षांत येईल.–पाळक तूं विश्वाचा बाळकसा तोंड पसरितों बा ! मी। आर्या-केका ७२. येथें परमेश्वराची प्रार्थना करीत असतां तोंड पसरणाऱ्या बालकाची

कवीनें स्वत:ला घेतलेली उपमा फारच प्रेमळ व सहृदयतेची आहे. परंतु— कन्येंधि तसें रोदन आलें तें पसरवीच आ ज्ञात्या ॥ मं. भा. ११. ५८३. येथें उद्धवकृष्णांच्या वियोगप्रसंगाला रडणाऱ्या कन्येचा दिलेला दृष्टान्त किती अप्रयोजक व विरस करणारा आहे हें आपण मागें पाहिलेंच आहे. असो.

१९. पंतकाव्यामध्यें औचित्याची हानि झालेली जी आढळते ती पुष्कळ वेळां ग्राम्यतेमुळें झालेली आढळते. ग्राम्यतेचा विचार पुढील सदरांत केलाच आहे. येथें फक्त ज्यांच्यामध्यें ग्राम्यतेचा व अश्लीलतेचा कांहीं अंश नाहीं अशा वर्णनगत औचित्यहानीच्या प्रकारांचा विचार करावयाचा आहे. अशीं ग्राम्यताविरहित अनौचित्याचीं उदाहरणेंही पंतकाव्यांत कांहीं सांपडतात. कोठें कोठें शब्दप्रयोग अनुचित असतो, कोठें कोठें वर्ण्यविषयाला दिलेले दृष्टान्त विरस करणारे असतात, कोठें कथानकाचें वर्णनच औचित्यहानि करणारें असतें. मागें चवथ्या विभागांत भागवती काव्यांचें अंतर्निरीक्षण करतांना औचित्यहानीचीं अनेक उदाहरणें प्रसंगोपात्त आलीं आहेतच. पुढील विभागांत अलंकारांचें विवेचन करतांनाही अशीं दोषयुक्त स्थळें कांहीं दाखल केलीं आहेतच. येथें आणखी थोडींशीं उदाहरणें देणें बस होईल.

जो झडपि समग्राशी, कृष्णा अहिला खगेश्वरसम ग्रासी । कृ.वि.११.२४. येथें बकनामक असुराला गरुडाची उपमा देऊन कृष्णाला सर्पाची दिली आहे ती अत्यंत दुष्ट आहे. गरुड जसा सर्पांचा तात्काळ नाश करतो त्याप्रमाणें बकानें कृष्णाचा नाश केल्याचा ध्वनि येथें उत्पन्न होतो तो अत्यंत अनुचित होय. त्या असुरानें बक पक्ष्याचें जरी रूप घेतलें होतें तरी त्यामुळें त्याला खगेश्वराची उपमा शोभेल असें नाहीं.

' ऐश्वर्यच्युत हो ' हा दे त्या शिष्यास शाप शुक्र मुनी ।
पावेचि पालकाज्ञेप्रति दंडोचित दशा पशु क्रमुनी ॥ वामनचरित १०९.

हेंही एक अशाच दुष्ट उपमेचें उदाहरण आहे. बळीनें शुक्राचार्यांची आज्ञा मानिली नाहीं व वामनास दान दिलें; तेव्हां शुक्राचार्यांनीं त्याला शाप दिला. या गोष्टीस ' पालकाची आज्ञा मोडणाऱ्या गुराला मार बसतोच,' असा अनुचित दृष्टांत पंतांनीं दिला आहे ! शुक्राचार्यांना गुराख्याची व बळीला गुराची उपमा कितपत शोभते याचा वाचकांनींच विचार करावा. सात अक्षरीं यमक जुळविण्यासाठीं केवळ पंतांनीं हा प्रकार केला आहे.

हंसांनीं आपल्या पंतांवरील निबंधांत अनौचित्याचीं कांहीं चांगलीं उदाहरणें पंतकाव्यांतून काढून दाखविलीं आहेत. त्यांपैकीं तीन चार उदाहरणें येथें उतरून घेणें इष्ट वाटतें.

चिंतेनें नीज नसे स्वप्न नव्हे, हा नखाक्ष मायावी। (नखाक्ष—विंशतिनेत्र रावण.)
कपिरूपें आलासे पीडाया, ' यास कां क्षमा यावी? ' ॥ मं. रा. सुंदरकांड ५६.

अशोकवनांत मारुती आला त्यास पाहून सीतेस, प्रथम, हा रावणच कपिरूपानें छळण्याकरितां आला आहे कीं काय असें वाटलें;—असें या आर्येंत वर्णन आहे. ' क्षमा ' हा शब्द येथें अगदीं अनुचित व अप्रयोजक आहे. " मायावी राक्षसानें क्षमा करावी असा तिचा हेतु नसून, केवळ दया करावी इतकाच हेतु होता. पण क्षमेच्या ठिकाणीं दया शब्द घातला असतां यमकचमत्कृति नाहींशी होते येवढ्या-करितांच पंतानें अर्थहानि होऊं दिली असें वाटतें"—हंस.

मुनि त्यासि म्हणे होती सावित्री नाम अश्वपतितनया।
तच्चरित श्रवण करीं ऐकाया योग्य साधु पतित न या ॥ ॥ वनपर्व १३. २.

येथें द्वितीयार्धांतील वर्णन अनुचित आहे, व तेंही यमकांधतेमुळेंच केलें आहे. याविषयीं हंस म्हणतात—" यांत सावित्रीचें चरित्र ऐकावयास साधूच योग्य, पतित योग्य नाहींत असें म्हटलें आहे. तें पंतासही संमत असेल असें आम्हांस वाटत नाहीं. कारण साध्वीचें चरित्र पतितांनीं ऐकूं नये असा नियम असेल तर पतितांचा उद्धार होण्याचा मार्गच बंद करून टाकला असें होऊन, पुण्यफळरूप इमारतीस पायापासून खणल्यासारखें होईल. " शिवाय पंतांनीं पुढल्याच आर्येंत अगदीं याविरुद्ध वर्णन केलें आहे.

होय प्राप्त विधिस्त्री सावित्रीच्या वरेंचि ती राया।
यत्कीर्ति जना म्हणती, ' कर देत्यें रे अघाब्धितीरा या ' ॥ वनपर्व १३. ३.

यांत कीर्ति पातकसमुद्रांत बुडणाऱ्यांस हात देते असें वर्णन आहे. परंतु तेंही यमकाकरितांच केलें असल्यासारखें दिसतें. यावरून लागोपाठच्या दोन आर्यांत परस्परविरुद्ध वर्णन करावयास लावून पंतांच्या यमकांधतेनें औचित्याचा कसा खेळखंडोबा केला आहे तें लक्षांत येईल.

अस्थिरता जे श्रीची ती तूझ्या शत्रुजीवनीं राहो।
संतत कल्याण असो विपक्षलोकप्रतापरविराहो! ॥ मं. रा. युद्ध. ७५५.

ही दशरथानें रामास दिलेल्या आशीर्वादांतील आर्या आहे. येथें रामशत्रूच्या प्रतापास नित्यतेजस्वी सूर्याची उपमा देऊन विजयशाली व सूर्यवंशज रामाला राहूची उपमा देण्यांत पंतांच्या हातून मोठाच औचित्यभंग झाला आहे. या आर्येचा पांगारकरांनींही उल्लेख केला आहे. (मो. च. २४९).

आणखीही औचित्यहानीचीं कित्येक उदाहरणें हंसांनीं आपल्या निबंधांत व पांगारकरांनीं आपल्या चरित्रांत दिलीं आहेत. प्रस्तुत पुस्तकांतही पंतांच्या भागवतीकाव्यांत दिसून येणाऱ्या औचित्यहानीच्या प्रकारांचा प्रसंगानुसार कोठें ना कोठें तरी परामर्श घेण्यांत आला आहेच; (पहा. पृ. ७०, ना म्यु. २१; ३०) तेव्हां येथें आणखी विस्तार करण्यांत तात्पर्य नाहीं. बहुधा प्रत्येक स्थळीं औचित्यहानि करण्याचा प्रसंग यमकांच्या हव्यासामुळेंच पंतांवर ओढवलेला आहे हेंही वरील विवेचनावरून ध्यानांत येईलच.

(७) ग्राम्यता व अश्लीलता.

२०. पंतकाव्यामध्यें पुष्कळ वेळा औचित्यहानि ग्राम्यतेमुळेंच झालेली आढळते तेव्हां ग्राम्यतेचा येथें थोडा विचार करूं. ग्राम म्हणजे खेडें व ग्राम्य म्हणजे खेड्यांतलें, खेडवळ. अर्थात् सभ्य, शिष्ट व विदग्ध अशा लोकांना पसंत न पडण्याजोगें व खेडवळ समाजांत मान्य होण्याजोगें असें जें असेल तें ग्राम्य होय. सामान्य वागणुकीला ही व्याख्या ज्याप्रमाणें लागू पडेल त्याप्रमाणें भाषेला व वाङ्मयालाही लागू पडेल. सभ्यजनसमाजांत जी जी वागणूक, किंवा ज्या अवयवांचें व हावभावांचें प्रदर्शन ग्राम्य समजलें जातें त्याच वागणुकीचा, अवयवांचा व हावभावांचा उच्चार करणारी भाषा ही ग्राम्य समजली जाते. वाङ्मयांतील ग्राम्यतेचें क्षेत्र तर याहूनही व्यापक बनविण्यांत आलें आहे. भाषेचें सारसर्वस्व वाङ्मय व वाङ्मयाचें सारसर्वस्व काव्य होय; अर्थात् यांमध्यें ग्राम्यतेची व्याख्या उत्तरोत्तर अधिकाधिक कडक बनत जाऊन शुद्धतेविषयींचा व सुसंस्कृततेविषयींचा कटाक्ष अधिकाधिक वाढत गेला असल्यास त्यांत नवल नाहीं. पहिल्या प्रतीचे दरबारी व राजविलासी असे जे आमचे संस्कृत कवि त्यांनीं तर अशिष्टपणाचा दुरून सुद्धां आपल्या कवितेस वास येऊं नये यासाठीं अतिशय काळजी घेतलेली दिसून येते. त्यांच्या इतकी जरी नाहीं तरी साधारणपणें आपल्या कवितेचें स्वरूप शिष्टपणाचें राहील येवढी तरी काळजी आमच्या मराठी कवींनीं घ्यावी अशी अपेक्षा कोणीही करणें साहजिक आहे.

२१. या ग्राम्यतादोषाचा औचित्याच्या प्रश्नाशीं फारच निकट संबंध आहे. वाङ्मयांत अथवा काव्यांत कोणत्याही अशिष्ट समजला गेलेल्या उद्गारापासून औचित्याची हानि होत आहे कीं नाहीं हेंच मुख्यतः बघावयाचें असतें. औचित्याची हानि होत असल्यास तो दोष, अन्यथा अदोष होय. व्यक्ति, स्थळ, काळ, प्रसंग या सर्वांचा विचार करितां जर कांहीं आपाततः ग्राम्य वाटणारे उद्गार काव्यांत उचित व सौंदर्यपोषक ठरले तर ते दोषरूप न मानितां गुणरूपच मानिले पाहिजेत. आपण उदाहरण घेऊन पाहूं. श्री. वा. म. जोशी यांच्या ' नांव बदलीन ' नामक एका गोष्टींत पुढील वर्णन आहे;—" यमुनेनें लागलीच डोळे पुसले व गालावरचे अश्रु पुसून आणि **नाकांतला शेंबूड आंत ओढून** ती जोराजोरानें पावले टाकीत... घरांत गेली " ! पंधरा सोळा वर्षांच्या इंग्रजी शाळेंत जाणाऱ्या मुलीचें, स्वभावोक्ति करण्याच्या भरांत, हें जें लेखकांनीं वर्णन केलें आहे तें सर्वस्वीं अनुचित व घृणाकारक आहे असेंच कोणीही म्हणेल. परंतु पंतांनीं पुढील आर्येंत वर्णिलेला एकनाथस्वामींचा महिमा पहा—

अंत्यजतोक कडे घे, उष्णीं ज्या फार लाळ शेंबुड, तें ।
अद्‌भुत सुकृत न गातां साधूंची रीति, आळसें बुडते ॥ साधुरीति ३९.

मागच्या उताऱ्यातीलच घृणाकारक शब्द व वर्णन येथें योजिलें आहे. परंतु अंत्यजाच्या मुलाचें अगदीं गलिच्छ व अनुकंपनीय असें वर्णन करणें हें एकनाथस्वामींचा महिमा उज्ज्वल करण्यास उपकारकच होणारें असल्यामुळें तें येथें दोषरूप न ठरतां गुणरूपच ठरतें. असो; तेव्हां सर्व ठिकाणीं गुणदोषविवेक करतांना औचित्याची कसोटी हीच मुख्य मानून तिला सर्वत्र अनुसरलें पाहिजे. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनींही ' शमकथास्वश्लीलत्वं गुणः ' ' वैराग्याचें प्रतिपादन करणें असल्यास अश्लीलत्व हा गुणच ठरतो ' असे कित्येक अपवाद सांगितले आहेत ते औचित्याच्या तत्वावर लक्ष ठेवूनच सांगितले आहेत.

२२. ही औचित्याची कसोटी लक्षांत ठेवली म्हणजे निबंधमालाकारांनीं ' अश्लीलता ' हा जो पंतकवितेतील मोठा दोष म्हणून निरूपण केला आहे त्यांतील ग्राह्यांश निवडणेंही फार सुलभ होईल. या दोषाचें विवरण मालाकारांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे.—' अश्लीलता म्हणजे प्रौढ काव्यांत न खपण्यासारख्या ग्राम्य शब्दांचा प्रयोग व केवळ व्यावहारिक दाखले हे होत. सत्कवींची शब्द-

पद्धति व अर्थपद्धति लक्षपूर्वक पाहिली असतां ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे. दोहोंमध्यें ग्राम्यतेचा लेशहि त्यांस खपत नसतो; नुसती वाक्यरचनाही कवितेंत व्यावहारिक भाषेहून निराळी असावी लागते. आणि त्यांतून शब्द व दृष्टान्त हे तर प्राकृत व्यवहारांतले व ग्राम्य भाषेंतले मुळींच उपयोगी नाहींत.' मालाकारांचें हे विवेचन विशेष शास्त्रशुद्ध व सहृदयांस ग्राह्य होण्यासारखें आहे असें म्हणवत नाहीं. काव्यामध्यें अगदीं प्राकृत व्यवहारांतले दृष्टान्त येतां कामा नयेत, आल्यास ते दोषावह होतात हें म्हणणें कोणाही काव्यमर्मज्ञास पटणें शक्य नाहीं. अशा अगदीं क्षुल्लक व व्यावहारिक दृष्टांतांचीं कित्येक उदाहरणें विख्यात महाकवींच्या उत्तमोत्तम मानलेल्या काव्यांतून काढून दाखवितां येतील. पंतांची तर असे दृष्टान्त योजण्याकडे विशेषच प्रवृत्ति आहे. पंतकाव्यांत दिसून येणाऱ्या अशा व्यावहारिक व क्षुल्लक दृष्टान्तांविषयीं पुढील विभागांत विस्तृत विवरण केलें असून, तें पाहिल्यास असे दृष्टान्त समर्पक रीतीनें योजण्याचें पंतांचें चातुर्य किती अनुपम होतें याची सहज खात्री पटेल. काव्याच्या इतर अंगांस जी औचित्याची कसोटी लावावयाची तीच कसोटी असल्या दृष्टांतांसही अर्थात् लावावयाचीच. एखाद्या उदात्त, गंभीर किंवा करुणरसपूर्ण प्रसंगाच्या वर्णनांत क्षुल्लक व हास्यकारक दृष्टांताची योजना केल्यास ती केव्हांही दोषास्पदच ठरेल. परंतु तसा विशेष गंभीर प्रसंग नसतां सामान्य वर्णनांत एखादी क्षुल्लक परंतु चटकदार व समर्पक अशी कोणीं उपमा घातली तर ती सौंदर्यपोषकच ठरेल यांत संशय नाहीं. तेव्हां या विचारसरणीस अनुसरून मालाकारांनीं दिलेल्या उदाहरणांपैकीं

तूं जेंवि देवकीला भेटसि तैसेंचि भेट आतेला ।
आम्हांहुनि तूंचि अधिक, घृत सोडुनि कोण करिल आ तेला ॥ उद्योगपर्व ५.
आम्हां व्यसनार्तांची धर्मस्थिति होवि बाज पावें गा । (व्यसन—संकट)
त्वां मोडावें न इला स्वस्त्रास्थ्यसुखार्थ बा जपावें गा ॥ सभापर्व ५.

हीं दोन उदाहरणें औचित्यास्तव काव्यसौंदर्यास पोषक अशींच गणलीं पाहिजेत. त्यांच्यामुळें काव्याचा कोणत्याही बाजूनें विरस होत नसून चमत्कृति मात्र उत्पन्न होते. आणि याच कसोटीस अनुसरून

त्यांच्या प्रभुमूर्तिरतदृगुपमेसि सितारता गमो मासी । मं. भा. १०
होय सुदुःसह शक्रा जैसें ग्राळासि रायतें नाकीं । आदिपर्व १०.

हीं दोन उदाहरणें दोषयुक्त होत असेंही ठरतें. पहिला माशीचा दृष्टान्त घृणाकारक म्हणून दूषणीय होय व दुसरा, इंद्राची दुःसह स्थिति उत्कट रीतीनें प्रकट करण्यास असमर्थ म्हणून त्याज्य होय.

जो न्याय क्षुल्लक, व्यावहारिक दृष्टांतांस लागू तोच ग्राम्यतेसही लागू आहे. तो कसा, हें लौकिकांत किळसवाणा गणला गेलेल्या एका शब्दाच उदाहरण घेऊन वरतीं स्पष्ट करून दाखविलेंच आहे. सामान्यतः ग्राम्य शब्द किंवा अश्लील वर्णनें हीं रसहानिकर होत, कवीनें त्यांच्यापासून सर्वथा अलिप्त रहावें,हा सिद्धान्त कोणासही कबूलच आहे. परंतु या सामान्य सिद्धान्तास अपवाद असून त्या अपवादात्मक प्रसंगीं ग्राम्यता ही गुणावहच होते हेंही त्याबरोबर लक्षांत ठेवलें पाहिजे. असो. ग्राम्यतेचे मुख्य दोन विभाग पडतात — १. शब्दगत ग्राम्यता व २ अर्थगत ग्राम्यता. अर्थगत ग्राम्यतेचे दोन भाग पडतात;—१ दृष्टान्त गत ग्राम्यता; २. सामान्यवर्णनगत ग्राम्यता. या विभागांचीं क्रमानें कांहीं उदाहरणें सादर करूं.

२३. शब्दगत ग्राम्यताः—' थान' हा ग्राम्य शब्द पंतांचा विशेष आवडता आहे. भागवती काव्यांत तरी याचा प्रयोग वारंवार येतो. ' थान ' हा शब्द ' स्तन ' या शिष्टसंमत शब्दापासूनच निघाला असला तरी त्याला एक प्रकारची ग्राम्यता आली आहे हें मर्मज्ञांस सांगावयास नको.' दीनजना थानातें लाविल कीं' कृ. वि. ४९.१;'कुंकुम माथानींचें' कृ वि. ३८.१६; ' थानें श्रीचीं जेणें त्यजावीं' कृ. वि. ७७.८; ' श्री (लक्ष्मी) चीं थानें ' हा शब्दप्रयोग किती सुरस आहे याचा वाचकांनींच विचार करावा दुसरा शब्द 'विणें' होय. 'तो तया (पुत्राला) देशिक (गुरु) वी ' कृ. वि. ४५. ६९, ' मी प्रहर आठ वित्यें चिंता ' कृ. वि. ४९.१७. हे दुसऱ्या वाक्यांतील शब्द कुंतीच्या तोंडीं घातले आहेत. अगोदर स्त्रीच्या, त्यांतून कुंतीसारख्या गतधवा राजस्त्रीच्या तोंडीं ' मी वित्यें ' असे शब्द घालणें म्हणजे औचित्यहानीची परमावधि होय. पण वाटेल तें करून यमक जुळविल्याशिवाय पंतांच्यानें कसें राहवेल ? पुढील चरणाच्या अंतीं ' आठवित्यें ' असें क्रियापद येत आहे त्याच्याशीं हजारों दोष पत्करूनही यमक जुळविलेंच पाहिजे ! त्याचप्रमाणें—'दावि वनश्री नटोनि वरदा **गमजे** ' कृ. वि. २१.१. ' वारुनि लोकांसांची **महागायी** ' कृ. वि. २२. २३ ' निजकरेंचि भरि **आवास** ' कृ. वि. ४२. ५; या उदाहरणांत अनुक्रमें गमजा, महागायी, आवा

(स्त्री) या ग्राम्य शब्दाचा प्रयोग आला आहे तो दुष्ट होय. हेही शब्द व असेच इतरत्र आढळणारे ग्राम्य शब्द यमकाकरितांच आले आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

परंतु औचित्याच्या तत्वास अनुसरून जेथें ग्राम्य शब्द दोषावह होत नाहींत अशीं स्थळेंही आढळतात. थान आणि वी हेच शब्द पुढील उदाहरणांत अगदीं उचित व समर्पक आहेत.

सुटतां थान मुखींचें शिशुसा ध्रुव गडबडोनि जों पाहे । मं. भा. ४. ८५.
लावीन मस्तक तुज्या, पदीं तुझी भक्ति आत्मविद्या वी । आर्याकेका. ६०.

२४ कित्येक ठिकाणीं **वर्णनच ग्राम्य** किंवा अश्लील असतें.—

चेष्टा स्वल्प विभू हि देखत करी सर्वांकडे गांड ही । कृ. वि. ६७. ५.
वत्स क्षुद्विकळ रडे झोंबे जरि माय कंचुकी सोडी ।
गोडी आपुलें पानीं नुमजे. दानीं तिची म्हणे थोडी ॥ कृ. वि. ८३-३८.

वत्साकरितांच कां होईना पण ' माय कंचुकी सोडी ' हें वर्णन शिष्टसंमत मर्यादेस सोडून दिसतें.

हीच अश्लीलता वैराग्यविषयांत गुणावह ठरते. तुकाराम, एकनाथ, रामदास इत्यादिकांच्या काव्यांत वारंवार जी अश्लीलता व निर्भीड स्पष्टोक्ति दिसून येते ती अशाच प्रकारची होय. तिला दोषास्पद ठरविण्याचें धाडस कोणीं करूं नये. स्वभावोक्तीसाठीं केलेलें ग्राम्य वर्णन हेंही क्वचित् प्रशस्त ठरतें.

शब्दें भय दे; **हगत**, स्वल्प खणित भूसि दावि बळ देहगत ।
ककुदाश्रितजीमूत स्तब्धाक्ष, पदोपदीं **विसर्जी मूत** ॥ कृ. वि. ३६. ४.

बैलाचें रूप घेतलेल्या 'अरिष्ट' नामक असुराच्या खवळलेल्या स्थितीचें हें वर्णन आहे. माजलेल्या बैलाचें हुबेहूब चित्र डोळ्यांपुढें उभें करीत असल्यामुळें हें वर्णन मोठें सुंदर वठलें आहे.

२५. आतां **दृष्टान्तगत ग्राम्यतेचीं** कांहीं उदाहरणें सादर करून हें विवेचन संपवूं.—' जे बाळकतिलघाणी, तीची जळतांहि कोण घेतिल घाणी ? ' कृ. वि. ६. २९. बालकांना तिळांची व पूतनेला घाणीची उपमा दिली आहे. ' प्रीतीचि तो बेडि कसी सोडवि हरि, जी करासि झोंबे डिकसी' कृ. वि. ४२.९. येथें ' डिंकासारखी हाताला चिकटून बसली ' असें कुब्जेचें वर्णन केलें आहे तें अगदीं वैरस्यावह आहे. पुढील आर्यांतील दृष्टांतही असेच ग्राम्यतेमुळें व

अश्लीलतेमुळें अनुचित व रसहानिकर झाले आहेत. (हंसांचा निबंध.)

हा पल भोजन गूथीं जसा कृमि, अघों तसा रमे यातें।
मी पळमात्रें वधितों, जैसा मृगकांत सारमेयातें ॥ मं. रा. सुंदरकांड. ७३॥
झाले सुयोधनाला भीष्म द्रोण प्रसन्न सुरतरुसे।
व्यर्थ असुभगा पतिशीं सुभगेचें आठवूनि सुरत रुसे ॥ भीष्मपर्व. २. २४.

पहिल्या आर्येतील रावणासारख्या पराक्रमी शत्रूला दिलेली विष्ठाकृमीची उपमा किती अश्लील, दुष्ट व अनुचित आहे हें वर्णन करून सांगण्याची जरूरी नाहीं. दुसऱ्या आर्येत भीष्म, द्रोण दुर्योधनाच्या बाजूला मिळाले व आपल्या बाजूला मिळाले नाहींत या आपल्या दुर्भाग्याबद्दल युधिष्ठिरानें स्वतःला जी उपमा घेतली आहे तीही असभ्य व अश्लील आहे. हा अत्याचार यमकरूपी सैतानानें पंतांकडून करविला आहे हें ' सुरतरुसे ' या अक्षरांवरून स्पष्ट दिसतें.

पंतांच्या एकंदर काव्यविस्ताराच्या मानानें ग्राम्यता व अश्लीलता फारच थोड्या ठिकाणीं आढळून येते. मुक्तेश्वर व वामनपंडितानंतरचे श्लोकबद्ध रचना करणारे कांहीं कवि यांच्या मानानें पंतांचें काव्य पुष्कळ सोज्वळ व भारदस्त आहे असें म्हटलें पाहिजे. आतां, ग्राम्यतेचीं जीं थोडीशीं उदाहरणें त्यांच्या काव्यांत आढळतात तीं देखील आढळलीं नसतीं तर बरें झालें असतें असें कोणासही वाटेल हें खरें. तथापि यमकांचें झट त्यांच्या मागें सदोदित लागलें होतें. शिवाय सभ्यता व शिष्टपणा याविषयींच्या त्या काळच्या कल्पनाही सध्यांच्या इतक्या नाजूक व दुसऱ्या नव्हत्या असें वाटल्याखेरीज रहात नाहीं.

[३]

२६. आतांपर्यंत पंतकाव्यांतील दोषांचें दर्शन बऱ्याच कसोशीनें व शक्य तितक्या निर्भीडपणानें केलें. तसेंच पाहूं गेल्यास याच्यापेक्षांही अधिक किल्बिषें एखाद्या काकदृष्टि मनुष्यास पंतकाव्यांतून काढून दाखवितां येतील, नाहीं असें नाहीं. परंतु, सहृदय व रसिक विवेचकांच्या दृष्टीनें, झालें आहे येवढें दोषदर्शन बहुधा परिपूर्ण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रत्येक दोषाचीं उदाहरणें पंतांच्या निरनिराळ्या काव्यांतून काढून वाटेल तितकीं वाढवितां येतील. परंतु दोषांचीं सदरें फारशीं जास्त करतां येतीलसें वाटत नाहीं. तरी सुद्धां,येथें केलेलें दोषांचें विवेचनच फक्त जो वाचील त्याला पंतकाव्य हें नाना दोषांचें भांडारच आहे असें वाटेल व

पंतांच्या काव्यांत चांगुलपणाचा फारच थोडा अंश आहे असा त्याचा ग्रह होईल. पंतांच्या भाषासरणींत किती तरी व केवढे मोठे ढोबळ दोष आहेत व अर्थास तर औचित्यहानिरूप सर्वव्यापी दोषानें ग्रासलेंच आहे! तेव्हां पंतकवितेंत वाखाणण्याजोगा अंश राहिला तरी कोठें ? अशी कित्येकांस पृच्छा करावीशी वाटेल यांत कांहीं शंका नाहीं.

२७. परंतु यास एक उत्तर आहे व तें मागील विवेचनांत कित्येक वेळां सूचितही केलें आहे. तें हेंच कीं आतापर्यंत वर्णिलेले दोष पंतांच्या सर्व कवितेस सरसकट लागू नसून तिच्या कांहीं अंशांत मात्र ते दिसून येतात. आम्ही अगदीं आरंभींच सांगितलें आहे कीं, हीं व्यंगें पंतांच्या असमर्थतेमुळें त्यांच्या काव्यांत राहून गेलीं आहेत असें नसून यमकरचनेच्या व संस्कृतीकरणाच्या हव्यासामुळें तीं त्यांच्या कवितेंत आलीं आहेत. मुलाचे क्षुल्लक लाड पुरविल्यानें बापाला मोठें सुख होत असतें परंतु लाडामुळें मुलाच्या अंगीं वाईट खोडी व दुर्गुण येत आहेत याचें त्याला जसें भान असत नाहीं त्याचप्रमाणें पंतांची स्थिति झाली आहे. पंतांनीं आपल्या कविताकन्येचे, यमकाचे व संस्कृतमय बनण्याचे लाड पुरविले खरे; परंतु यमकादि शब्दालंकार तिला काचूं लागले व संस्कृताचें जडान्न तर फारच बाधून तिला अजीर्ण झालें. तथापि हा यमकांचा व संस्कृतीकरणाचा हव्यास पंतकाव्याच्या थोडयाशाच अंशाला भोंवला आहे हें पुनः पुनः लक्षांत ठेवणें जरूर आहे. अर्थात् तो जेवढ्याला भोवला आहे तेवढा भाग काव्यदृष्ट्या कमी दर्जाचा ठरला आहे हें कबूल केलें तरी त्यामुळें बाकीच्या सर्व काव्यविस्ताराचें जें सौंदर्य सर्वांस प्रतीत होण्याजोगें आहे त्यास कांहींच कमीपणा येत नाहीं. पुष्कळशा काव्यांपैकीं कांहीं थोडीं कमी दर्जाचीं ठरलीं किंवा एकाच काव्यांतील कांहीं भाग टाकाऊ ठरला म्हणजे त्याकरितां सगळेंच काव्य केराच्या टोपलींत फेंकून देणें कधींही इष्ट होणार नाहीं. एकादा सडलेला भाग सर्व फळ नासून टाकतो तशी काव्याची गोष्ट नव्हे. कांहीं अंश जरी कुचकामाचा असला तरी त्याच्यामुळें बाकीच्या सर्व काव्याचा रसास्वाद घेण्यास व्यत्यय येऊं शकत नाहीं.

' स्याद्वपुः सुंदरमपि श्वित्रेणैकेन दुर्भगम् । '

' सुंदर शरीर देखील कोडाच्या एका ठिपक्यामुळें भाग्यहीन ठरतें, ' हा दृष्टान्त काव्याच्या बाबतींत मुळींच समर्पक नसून

' एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवांकः । '

' चंद्रावरील डागाप्रमाणें एकादा दोष गुणसमूहामध्यें लुप्त होऊन जातो ' हाच न्याय काव्यास उत्कृष्टपणें लागू पडतो. भवभूतीचें ' महावीरचरित ' हें अगदीं कमी प्रतीचें नाटक आहे; परंतु त्याच्या संसर्गामुळें ' उत्तररामचरिता'स कोणी कमी लेखलें आहे असें कधीं घडलेलें नाहीं. भवभूतीचेंच ' मालतीमाधव ' म्हणून आणखी एक नाटक आहे त्यांत १, २, ३, इ० अंक फारच सुंदर आहेत व ५, ७, ९, हे अंक कृत्रिम, लांबलचक व कंटाळवाणे आहेत. परंतु वाईट अंकांच्या संगतीनें चांगल्या अंकांस कोणी लघुत्व आणीत नाहीं इतकेंच नव्हे तर त्या नाटकासही सर्वजण एकंदरीनें उत्तमांतच लेखतात. फार काय, एकाद्या काव्यांत कांहीं चांगले व कांहीं वाईट असेही श्लोक असतात. पण वाइटांमुळें चांगल्यांच्या आस्वादास कांहीं व्यत्यय येत नाहीं; येवढेंच नव्हे तर केवळ त्यांच्याचमुळें सबंध काव्यही चांगलें ठरतें.

तेव्हां हाच न्याय पंतकवितेस लागू केला पाहिजे. कांहीं काव्यें व काव्यांश जरी दोषयुक्त ठरले किंवा दहावीस आर्यांमध्यें एकाददुसरी आर्या जरी वाईट लागली तरी त्यामुळें इतर काव्यांना व इतर आर्यांना तुच्छ लेखतां कामा नये. पंतकाव्याचा कांहीं अंशच तेवढा दोषयुक्त आहे व बाकीचा पुष्कळ भाग चांगला आहे हें मागें दोषविवेचनांत दिलेल्या उदाहरणांवरूनच लक्षांत येण्याजोगें आहे. निरनिराळ्या दोषांचीं आम्हीं दिलेलीं उदाहरणें जर पाहिलीं तर त्यांत भागवती काव्यांपैकीं कृष्णविजय पूर्वार्धांतील उदाहरणेंच अतिशय आहेत हें सहज दिसून येईल. यावरून कृष्णविजय पूर्वार्धांत दोषांचें प्रमाण जास्त आहे, व कृष्णविजय उत्तरार्ध आणि मंत्रभागवत यांत तें फारच थोडें आहे हे सहज लक्षांत येण्याजोगें आहे, अर्थात् दोषांच्या उदाहरणांवरून कृष्णविजय पूर्वार्ध हें क्लिष्ट व कमी दर्जाचें काव्य आहे असें जर अनुमान काढावयाचें तर कृष्णविजय उत्तरार्ध व मंत्रभागवत हीं सोज्वळ व उच्च दर्जाचीं काव्यें आहेत असेंही अनुमान निघालें पाहिजे. निरनिराळ्या दोषांनीं व्याप्त असलेली अशी पंतकविता अमदीं ढगळ मापानें जरी मोजली तरी दहा पंधरा हजारांपेक्षां जास्त भरेल असें खास वाटत नाहीं. म्हणजे पंतांच्या साठ हजार कवितेपैकीं चाळीस पंचेचाळीस हजार कविता चांगली उच्च दर्जाची व साधारणपणें निर्दोष अशी सहज शिल्लक राहील हें निर्विवाद होय.

२८. यावरूनच प्रसन्नता व माधुर्य हेंच पंतकवितेचें नेहमींचें स्वरूप होय, क्लिष्टता व कृत्रिमता हें नव्हे असें जें मागें म्हटलें आहे तें कसें खरें आहे हें दिसून येईल. पंतांचें अंतःकरण तन्मय होऊन त्यांच्या वाणीचा ओघ सहज रीतीनें वाहूं लागला म्हणजे तो प्रेमळ, उदात्त, गंभीर व प्रसन्न असाच असतो. अशा वेळीं त्यांच्या वाणींत कृत्रिमतेचा लेशही उरत नाहीं; प्रसाद व माधुर्य हे गुण हात जोडून पुढें उभे असतात. त्यांची वाणी ज्ञानेश्वरांच्या प्रमाणें अलौकिक नादवती नसली तरी पुष्कळ वेळां त्यांच्या खालोखाल बसण्याजोगी रसाळ होते यांत शंका नाहीं. तेव्हां प्रसाद, माधुर्य (व ओज) हे जे संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं मानलेले भाषाशैलीचे गुण, त्यांचीं पंतकाव्यांतून नमुन्यादाखल कांहीं उदाहरणें देऊन मग पुढें जाऊं.

खरोखर पाहिलें तर माधुर्यादि गुण हे भाषाशैलीचे गुण नव्हेत. ' आत्मन एव हि यथा शौर्यादयो नाकारस्य तथा रसस्यैव माधुर्यादयो गुणा, न वर्णानाम् ।' (का. प्र. ९). ' शौर्य, धैर्य हे गुण जसे मनुष्याच्या शरीराचे नसून त्याच्या आत्म्याचे होत त्याप्रमाणें माधुर्य, प्रसाद, ओज हे काव्यात्मा जो रस त्याचे गुण होत, वर्णांचे नव्हेत,'–असा काव्यशास्त्रज्ञांचा सिद्धान्त आहे व तो तत्त्वतः खरा आहे यांत शंका नाहीं. तथापि शौर्यादिक गुण ज्याप्रमाणें शारीरिक क्रियांच्या द्वारानेंच अभिव्यक्त होतात त्याप्रमाणें काव्यांतील माधुर्यादि गुण नेहमीं भाषासरणीमध्येंच व्यक्त होत असल्यामुळें ते भाषेचे गुण होत असें मानण्याचा प्रघात पडला आहे. व या प्रघातास अनुसरूनच त्या गुणांचा उल्लेख या प्रकरणांत केला आहे.

२९. **माधुर्य व पदलालित्य**—यमक, अनुप्रास, मंत्ररचना इ० शब्दचमत्कारांच्या मागें लागल्यामुळें पंतांच्या भाषेमधील माधुर्य पुष्कळ ठिकाणीं कमी झालें आहे. (मागें, 'कृत्रिमता,' 'बोजडपणा' व ' श्रुतिकटुता ' या दोषांवरील विवेचन पहा.) तेव्हां ज्ञानराज, एकनाथ, तुकाराम हीं अकृत्रिम उद्गार काढणारी संतमंडळी भाषामाधुर्याच्या बाबतींत पंतांपेक्षां वरचढ ठरतील हें उघड आहे. मुक्तेश्वरांच्या वाणींत माधुर्यापेक्षां भव्यपणा, खळखळाट व गडगडाट विशेष. वामनांच्या श्लोकरचनेंत पुष्कळ वेळां माधुर्य व पदलालित्य अप्रतिम आढळतें परंतु त्यांच्या काव्यांत नीरस रचनाही तितकीच विपुल सांपडते. त्यांतून शब्दचमत्कारांचीं बंधनें वागवूनही पंतांच्या भाषाशैलीनें कित्येक ठिकाणीं जें अप्र-

तिम माधुर्य प्रकट केलें आहे तें पाहतां वामनमयूरांच्या जोडीमध्यें मयूरासच पदलालित्याच्या बाबतींत वरची जागा द्यावी लागते. खालील, श्रुतदेव ब्राह्मणानें केलेल्या कृष्णाच्या पूजेचें व प्रार्थनेचें वर्णन प्रेमरसार्द्र, त्याचप्रमाणें भाषेच्या दृष्टीनेंही निरुपम मधुर नाहीं असें कोण म्हणेल ?

बहु कोमल तुळसीची अर्पी कंठांत मंजरीमाळा ।
बाळा तद्भक्ति तदा वरि जाणों त्या जगत्त्रयीपाळा ॥ ५५
चरणीं कमळ समर्पी, तें जाणों आपुलेंचि हृत्कमळ ।
शमळघ्न प्रभुचें मग गद्गदगल साधु गाय यश अमळ ।। ५६
तो सकुटुंब प्रभुचे पाय चुरी तथवां म्हणे, ' देवा ! ।
जे श्रवणादिपर जन प्रकटसि त्यांच्या मनींच तूं ठेवा ॥ ६१
तें मज कांहींच नसे घडलें प्रत्यक्ष दर्शन स्वामी ! ।
येतिल काय दयाळा ! नवनिधि सालसदारिद्रजनधामीं ? ॥ ६२
आलें असेल काय प्रेमभरें या मुखा तुझें नाम ? ।
कीं एखाद्या जन्मीं क्षण सादर पाहिलें तुझें धाम ?' ॥ ६३ कृ. वि. ८७.

त्याचप्रमाणें बलरामानें स्वस्त्रियांसह यमुनेंत केलेल्या क्रीडेचें वर्णन करणारा पुढील श्लोकही मोठा रमणीय आहे.—

कालिंदीसलिलीं शिरे स्वरमणी घेवूनि जैसा करी
क्रीडा तो मदमंथरप्रियतमांसंगें महात्मा करी ।
जाणों माधव हंस, त्या कुमुदिनी, साजे न हें, तारका
त्या, राकापति राम हेहि उपमा अल्पा जगत्तारका ॥ कृ. वि. ६५.३९.

३० प्रसाद.—श्रवण केल्याबरोबर चित्तास व्यापून टाकून तात्काळ रसाची निष्पत्ति करणारा जो काव्यगुण तो प्रसाद होय. भाषेची सुलभता; नेयार्थता, अपुष्टता, क्लिष्टता इ० अर्थदोषांचा अभाव; रसाभिव्यक्तीस अत्यंत अनुकूल अशा शब्दांची योजना; या सामग्रीच्या योगानें काव्यांत प्रसाद निष्पन्न होतो. वर माधुर्यगुणाविषयीं जो अभिप्राय व्यक्त केला आहे तोच प्रसादासही लागू पडतो. प्रस्तुत गुणाच्या बाबतींतही पंतांची पायरी उपर्युक्त तिघाचौघां संतकवींच्या खालीं लागत असली तरी अत्यंत सुगम, सोज्ज्वल व प्रसन्न अशी हजारों गणती कविता त्यांनींही निर्माण केली आहे याविषयीं कोणींही

पंतकवितेचा अभ्यासक साक्ष देईल. पुढील गंगेची प्रार्थना कोणत्याही भाषेतील उत्तमोत्तम प्रसादपूर्ण काव्याला हार जाणार नाहीं.

तुवां मत्पत्राला जननि ! दिधला मान, कळलें
तुझें कारुण्यार्द्रें ! मन मजकडे स्पष्ट वळलें ।
सुखें येणें झालें सकळहि पथीं विघ्न टळलें
प्रसू प्रक्षाळील त्वरित न कशी बाळ मळलें ? ॥ गंगास्तव १६.

त्यांच्या भागवती काव्यांतील व बाकीच्या काव्यसमूहांतील उत्कृष्ट व प्रसादपूर्ण स्थळांचा मागच्या प्रकरणांतून अनेकवार उल्लेख केलाच आहे व जेथें तेथें शक्य तेवढें उतारेही दाखल केले आहेत, तेव्हां येथें आणखी पुनरुक्ति नको.

३१. ओज. या गुणाविषयीं मागें चर्चा केलीच आहे. (पहा.पृ.२८६–८७)

३२. संवाद व भाषणें.—हा एक पंतकाव्यांचा अवश्य लक्षांत ठेवण्याजोगा विशेष होय. पंतकाव्यांतील पात्रांचीं संभाषणें नेहमींच अत्यंत उचित, जोरदार व समर्पक असतात. संभाषणाच्या बाबतींतलें पंतांचें चातुर्य केवळ अप्रतिम आहे. प्रत्येक पात्राच्या स्वभावास उचित असे उद्गार त्याच्या तोंडीं घातलेले असून जणूं काय त्या व्यक्ति आपल्या समोर प्रत्यक्ष भाषण करीत आहेत असा त्यांचें काव्य वाचतांना प्रत्येक ठिकाणीं वाचकाला भास होतो. उत्कृष्ट कादंबरीकाराच्या कादंबरींतील पात्रांचीं भाषणें वाचीत असतांना सहृदय वाचकाचें चित्त जितकें तल्लीन होऊन जातें तितकेंच पंतांच्या काव्यांतील संभाषणें वाचतांनाही वाचकाचें मन गढून जातें. प्रौढ भाषेची व कठीण शब्दांची काय क्वचित् अडचण भासेल तेवढीच, बाकी पंतांचीं भाषणें वाचून त्या पौराणिक वीरांनीं आज पुनः पृथ्वीवर उतरून आपले हर्षामर्षांचे व हटातटाचे वादविवाद पुनः आमच्या डोळ्यांसमोर सुरू केले आहेत कीं काय असा भास होतो. विशेषतः वीररसाचीं संभाषणें गुंफतांना तर पंतांच्या वाणीला फारच स्फुरण चढतें. परंतु इतर हरएक प्रकारच्या मनोभावना व मानवी व्यवहारांतील हरतऱ्हेचे प्रसंग व्यक्त करणारीं संभाषणें खुलविण्याचें त्यांचें कौशल्यही तसेंच निरुपम असलेलें दृष्टीस पडतें. कृष्णविजयाच्या उत्तरार्धामध्यें असे नानातऱ्हेच्या संभाषणांचे सुंदर नमुने वाचकांस सांपडणारे आहेत. अ० ५५ मध्यें रुक्मिणी व नारद यांचीं वत्सल व अद्भुत या रसांनीं भरलेलीं भाषणें आहेत. अ० ६० मध्यें ‘ विनोदरससागरीं मनिसे रमणाऱ्या ’ कृष्ण-

रुक्मिणींचीं परिहासपर भाषणें आहेत. अ० ६१ मध्यें रुक्मिणीचा नातू जो अनिरुद्ध त्याच्या रुक्मीच्या नातीशीं होणाऱ्या विवाहाकरितां सर्व यादव भोजकट शहरीं गेले असतां तेथें रुक्मीनें बळरामाशीं द्यूत आरंभलें त्या द्यूताच्या प्रसंगांत एकमेकांचीं झालेलीं हर्षामर्षाचीं संभाषणें वर्णिलीं आहेत. अ० ६३ मध्यें शिवभक्त जो बाणासुर त्यास क्षमा करण्यासाठीं श्रीशंकरानीं कृष्णाची याचना केली तो प्रसंग आहे. त्यासमर्थींचीं या दोघा देवश्रेष्ठांचीं परस्परांस मान देऊन केलेलीं दरबारी भाषणें फारच सुंदर आहेत. त्याचप्रमाणें अ० ६५ मधील नृगराजाचा वृत्तांत, अ० ६८ मधील कौरवांचीं व बळरामदादांचीं भाषणें हीं सर्व पंतांच्या संवादग्रथनचातुरीचीं उत्कृष्ट उदाहरणें आहेत. मोठ्या लांबलचक संभाषणांचा आशय अत्यंत चटकदारपणानें व समर्पक रीतीनें पंत कसा अगदीं थोडक्यांत आणतात याचें एक उदाहरण (देवयानी व शर्मिष्ठा यांच्या संवादाचें) पृ. १३५ वर दिलेंच आहे.

परंतु पंतकाव्यांतील संभाषणांची खरी बहार ज्यांस चाखावयाची असेल त्यांनीं पंतांच्या महाभारतांतच बुडी मारली पाहिजे. पंतांच्या कौशल्याचा खरा उत्कर्ष तेथेंच पहावयास मिळण्याजोगा आहे. श्रीकृष्ण, अर्जुन, भीम, धर्म, त्याचप्रमाणें दुर्योधन, भीष्म, द्रोण, कर्ण वगैरे कौरवपक्षीय वीर, यांच्या शतशः प्रसंगोचित, स्वभावोचित व मार्मिक अशा संभाषणांनीं त्यांचें महाभारत ठसून भरलें आहे. हें संभाषणें योजण्याचें चातुर्य सर्वस्वीं पंतांचें स्वतःचेंच आहे. मुळांतून या बाबतींत त्यांस फारच थोडी मदत मिळाली आहे. मूळ महाभारतांत काय किंवा रामायण–भागवतांत तरी काय, व्यक्तींचीं संभाषणें नेहमीं लांबलचक, कंटाळवाणीं, उपदेशांनीं, नीतिवचनांनीं अगर तत्वज्ञानानें भरलेलीं अशीं असतात. याच्या उलट पंतांचीं भाषणें नेहमीं लहान, चटकदार, मुद्देसूद, व्यक्तिस्वभावानुरूप अशीं असतात. तीं सर्वस्वीं त्यांच्या प्रतिभेचींच द्योतक आहेत याविषयीं शंका नको.

३३. कथाकथन.—सुंदर रीतीनें गोष्टी सांगण्याचें कौशल्य हें कित्येकांच्या अंगीं उपजतच वास करीत असतें. साधी गोष्ट सांगावयाची झाली तरी ती खुलवून व मनोरंजक करून ऐकणाऱ्याचें मन वेधेल अशा तऱ्हेनें सांगण्याचें कौशल्य कांहीं थोड्या जणांच्याच अंगामध्यें वसत असतें हें नेहमींच्या संभाषणांत देखील आपण पहातोंच. पंत हे असेच उपजत बुद्धीचे कथाकार होते. याविषयीं

विवेचन मागें ३ ऱ्या प्रकरणांत पृ. ४३ वर केलेंच आहे. भारत–रामायण–भागवतांसारखे प्रचंड ग्रंथ आधारास घेऊन त्यांतील मुख्य कथानकें व वेचक गोष्टी तेवढया सुसंगत व मनोरंजक रीतीनें सांगण्यामध्यें त्यांचें हें कथाकथनाचें अभिजात चातुर्य उत्कृष्ट रीतीनें व्यक्त झालें आहे.

नैसर्गिक प्रतिभा व अभिजात कौशल्य हें तर होतेंच परंतु पौराणिक कथानकांमध्यें पंतांची झालेली तन्मयता हेंही एक त्यांच्या संभाषणांमध्यें व कथानकांमध्यें रंग भरण्यास विशेष कारण झालें आहे. पंतांचें काव्य वाचतांना, तें भारती युद्धाच्या वेळचें जग आपल्या सभोंर अवतरलें आहे किंवा आपण तरी त्या वेळच्या जगांत प्रत्यक्ष जाऊन पडलों आहों असा जो वाचकास भास होतो तो कवीच्या वर्ण्यविषयाशीं झालेल्या तादात्म्यामुळेंच होय. असो. याविषयींचा विशेष उल्लेख पुढील भागांत केला आहेच.

३४. यमकादि शब्दचमत्कार. – ज्या शब्दचमत्कारांवर पंतांचा इतका जीव असे व जे साधण्यासाठीं त्यांनीं अनेक ठिकाणीं इतका अट्टाहास केलेला दिसून येतो त्यांच्याविषयीं प्रस्तुत पुस्तकांत जेथें प्रसंग आला तेथें विरुद्धच अभिप्राय व्यक्त केलेला आहे, आणि जो विवेचक काव्यसौंदर्याच्या दृष्टीनें पंतांच्या ग्रंथांचें अवलोकन करील तो सदैव विरुद्धच अभिप्राय व्यक्त करील यांत संशय नाहीं. परंतु काव्याची दृष्टि सोडून या त्यांच्या गडगंच भरलेल्या शब्दालंकारांकडे बघितलें म्हणजे केवळ अचंबा वाटावयास लागतो. केवढीं यमकें, केवढाले प्रास व किती अवघड जागीं केलेली मंत्ररचना ! तथापि या सर्वांचीं बंधनें बाळगून हा ब्राह्मण आपला सरासर ग्रंथरचना करीत चालला आहे ! मोठमोठीं अवजड ओझीं सपाट्यासरशीं वाहून नेणाऱ्या वाफेच्या इंजिनाच्या शक्तीचें जसें आम्हांला आकलन करतां येत नाहीं त्याप्रमाणें यमकादि शब्दालंकार, मंत्ररचना, नानापरीचीं विचित्र वृत्तें यांचीं ओझीं बाळगून झरझर ग्रंथरचना करणाऱ्या पंतांच्या भाषापाटवाचें यथार्थ आकलन होणें आम्हांस शक्य नाहीं.

शब्दालंकारांमध्यें प्रमुख म्हणजे यमक व अनुप्रास हे होत. त्यांतील पादांतींचें यमक हेंच पंतांचें विशेष आवडतें होतें व त्यानेंच त्यांच्या काव्यांत विशेष प्रताप गाजविला आहे हें पंतकाव्यवाचकांस सांगावयास नको. यमकांच्या नादाचा परमावधीचा काल म्हणजे महाभारतरचनाकाल होय. पंतांचें अगदीं

प्रथमचें काव्य कुशलवचरित यांतील यमकें कशीं गचाळ आहेत याचा उल्लेख पूर्वींच केला आहे. (पृ. १९८) परंतु यानंतर लवकरच यमकांचा नाद त्यांस लागला असावा असें कृष्णविजयपूर्वार्ध, मदालसाचरित्र इ० काव्यांतील त्यांनीं साधलेल्या दीर्घ यमकांवरून दिसून येतें. हा यमकांचा नाद महाभारतकालीं पराकोटीस गेला व त्यानंतर त्यास ओहोटी लागली. महाभारतानंतर रचलेल्या मंत्रभागवत हरिवंश, काशीयात्रा प्रकरणें इत्यादि काव्यांत पंतांचा यमकांचा व इतरही शब्दचमत्कारांविषयींचा नाद उत्तरोत्तर कमी होत गेलेलाच दृष्टीस पडतो.

यमकानुप्रासांचें सविस्तर व सोदाहरण विवेचन पांगारकरांनीं आपल्या पुस्तकांत चांगल्या रीतीनें केलें आहे. (मो. च. पृ.५२७–५४९). तेव्हां त्यावर येथें पुनः लिहून पुनरुक्तिदोषास पात्र होण्याचें कारण नाहीं.

३५. पुनरुक्ति व अर्थसादृश्य. विपुल रचना करणाऱ्या ग्रंथकाराच्या ग्रंथांत कांहीं गोष्टींची पुनरुक्ति झालेली आढळून येणें यांत विशेष कांहीं नाहीं, व ती पुनरुक्ति लागोपाठ किंवा वारंवार झालेली नसेल तर दोषास्पदही होऊं शकत नाहीं. पंतांच्या काव्यांत कांहीं उपमा व कल्पना वारंवार येऊन कंटाळवाण्या होतात; त्यांचा उल्लेख पुढील विभागांत दोषरूपत्वानें केलाच आहे. येथें त्यांच्या अदोषरूप अशा पुनरुक्तीचे कांहीं मासले दाखविण्याचा विचार आहे. पंतांचीं कांहीं कांहीं यमकें आवडतीं असून तीं त्यांच्या काव्यांत पुनः पुनः येतात. हरि (ईश्वर), हरी (सिंह किंवा हरण करी); आली (सखी) व आली (येती झाली किंवा भ्रमर) अशा तऱ्हेच्या कांहीं शब्दांचीं यमकें तर नेहमीं आढळतातच; पण 'न नव राजीवा' आणि 'न नवरा जीवा;' 'पादराजीव' आणि 'आदरा जीव;' 'उदास कळकळतें' व 'मला सकळ कळतें;' 'अगारा या' व 'अगा राया;' 'जी प्रतिज्ञा ते' व 'जीप्रति ज्ञाते' वगैरे लांब यमकेंही पुनः पुनः येऊन वाचकांचें मन आकर्षण करतात. केव्हां केव्हां एकाच यमकाची थोडक्याशा अवकाशांत पुनरुक्ति होते. तेथें मात्र ती पुनरुक्ति चटकन् दिसून येऊन यमकाचा रस नाहींसा होतो. उदाहरण; कृ. वि. अ. ३० मध्यें ' ये कांता ' व ' एकांता ' हें यमक ३० व्या पद्यांत येऊन लगेच पुनः ३२ व्या पद्यांतही आलेलें आहे. तेथें रसनिष्पत्ति होत नाहीं. कोठें कोठें अशी पुनरुक्ति जवळपास न होतां अगदीं दूरच्या काव्यांत कोठें तरी झालेली असते. अशा ठिकाणीं रसहानि होत नाहीं. उदाहरण—-

कंठीं हार विलासी अहा, प्रमादें करूनि हारविलासी । कृ. वि. ३०. ५४.
हार विलासिजनेंसा येणें कैसा प्रभाव हारविला ? । भीष्मपर्व ९. ९२.

विचारांची, अर्थांची व कल्पनांची पुनरुक्तीही पंतकाव्यांत आढळून येते. वामनचरित्रामध्यें व अमृतमथनामध्यें एक आर्यार्ध सारखें आलेलें आढळतें.

धवल सुकीर्तिदुशाला टाकवुनि अकीर्तिकांबळीला जे । अमृतमथन. १.२९.
शुद्धा कीर्तिदुशाला पावे, न कुकीर्ति कांबळीला जो, । वामनचरित्र १९२.

मंत्रभागवताच्या व कृष्णविजयाच्या त्याच कथाभागामध्यें कांहीं कल्पना सारख्या आलेल्या आढळतात. पुष्कळ ठिकाणीं त्या मुळांतून घेतलेल्या असतात. उद्धवागमनप्रसंगींची गोपींची पुढील कल्पना मुळावर आधारलेली आहे.

त्या कंसा अधमांस व्रजयुवतींचा करूनियां वध मास ।
श्राद्धीं पिंड कराया, नेणार असेल तृप्तिदायक राया । कृ. वि. ४६-४४.
वाड्यापुढें सकाळीं रथ पाहुनि म्हणति गोपिका गेला ।
घेऊनि जीव, कंसश्राद्धा नेणार मांसही मेला ! ॥ मं. भा. १०.५९०.

मंत्रभागवतामध्यें जास्तच बहारीची खुबी केलेली आहे ती मार्मिक वाचकांच्या लक्षांत येईलच. कोठें कोठें मुळांतील कल्पना नसूनही दोन्ही ग्रंथांत त्याच कथाभागांत वर्णनाचें सादृश्य आढळतें.

१. पहिलीं अप्रिय भार स्वांगें चिंतेंत विटविलें मन फार ।
स्फुरतां करि सत्कार प्रेमें तीं भूषणें फुलें हलुवार ॥ कृ. वि. ५३.२५.
वाटे चिंता करितां जी बाहुलता तिला महाभार ।
स्फुरतां, प्रिया गमे ती, फार कुसुमहार जेंवि हलुवार ॥ मं.भा. १०.७१४.

२. हा व्यासा. हा ! किमर्थ श्रम करुनि तुम्हीं कांडिला व्यर्थ कोंडा ।
वाणि ! त्वद्दोष नाहीं, सुरसरिदुदरीं अंतरीं शुष्क धोंडा ॥ कृ वि. ७८.१८.
पाषाण आंत शुष्कचि, वाहो वरि देवसिंधुचा ओघ ॥ मं. भा. १०. ९७९.

हीं केवळ सारख्याच कथाभागामध्यें वर्णनसाम्यामुळें आलेलीं पुनरुक्तीचीं उदाहरणें दाखविलीं. आणखीही अशीं साम्यें मंत्रभागवत व कृष्णविजय यांमध्यें आढळतात. आतां कथासाम्य नसतांना निरनिराळ्या पंतांच्या काव्यांमध्यें दिसून येणाऱ्या साम्याचीं कांहीं उदाहरणें देतों.

१. येणें केलें मूर्तें नादें त्वां, चित्त म्यां दिलें एणें ॥ वामनचरित्र ४६.
मूर्तिमती ती मंजुलगीतिच जाणों मृगव्रजीं आली । अमृतमथन ४. १७.

२. कीजे ? धर्म म्हणे ‘ श्रमे मन महाचिंताबळें चाकसें ’ । कृ. वि. ७२. १४.
धरील, मन आधिनें बहु परिश्रमे चाकसें । केकावलि ४५.

३. सर्वस्व तुह्मीं माझें मी तुमचें, हे नकोचि बोलाया । कृ. वि. ८१. ३१.
सर्वस्व मी सज्जनाचें माझें सर्वस्व सज्जन । भक्तभूषण ६४.

विभाग ८.

काव्यतत्वविचार व पंतकविता.

यत्सेवनीयमसतामनृतप्रायं सुवर्णविन्यासम् ।
सुरसार्थमयं काव्यं त्रिविष्टपं वा समं विद्मः ॥

(गोवर्धन) आर्यासप्तशती ४५.

१. नवनीतकार परशुरामपंत गोडबोले, निबंधमालाकार विष्णुशास्त्री, काव्य-संग्रहकार वामनराव ओक, पंतचरित्रकार पांगारकर यांसारख्या अनेक विद्वानांनीं, रसिकांनीं व नव्या, जुन्या, भाविक, अभाविक, वाङ्मयभक्तांनीं पंतकवितेचें गौरव केलें व तिला सर्वतोपरी उचलून धरलें यामुळें मोरोपंतांविरुद्ध उघड आक्षेप काढण्यास अलीकडे कोणी धजत नाहीं हें खरें. तथापि अलीकडील सुशिक्षित समाज म्हणून आपण ज्याला म्हणतों त्या समाजाच्या मनांतला किंतु कांहीं पूर्णपणें नाहींसा झालेला नाहीं. पंतकवितेविषयींची अर्वाचीन सुशिक्षितांच्या मनांतील अढी समूळ नाहींशी झालेली नाहीं याचा प्रत्यय आम्हांस अनेकांच्या बाबतींत आला. पंतकवितेविषयींच नव्हे तर आमच्या एकंदर जुन्या कवींच्या कवितेविषयीं आमच्या आधुनिक समाजाचें मन पूर्णपणें साफ नाहीं. अव्वल इंग्रजींतल्या सुशिक्षितांस ज्याप्रमाणें आमचें जुनें वाङ्मय वेडगळ, पोरकट व टाकाऊ वाटून त्याची त्यांना लाज वाटत असे तसा प्रकार आतां उरलेला नाहीं. तथापि अजूनही ' आमची जुनी कविता केवळ परपुष्ट व भाषांतररूप आहे; आमचें जुनें वाङ्मय सर्व एकांगी आहे; तें केवळ पुनरुक्तिमय असून वेदांताच्या काथ्याकूटानें भरलेलें, निर्जीव व ऐहिक व्यवहारास सर्वथा निरुपयोगी असें आहे; '--अशा तऱ्हेचे समज पुष्कळांच्या मनामध्यें दृढ होऊन बसलेले आहेत.* पंतांच्या कवितेविषयीं तर विचारावयासच नको. ' पंतांची कविता म्हणजे महा बिकट, तिचा सरळ अर्थ कधीं लागावयाचा नाहीं; पंत निवळ भाषांतरें आहेत, त्यांच्या कवितेंत स्वतंत्र स्फूर्ति बिलकुल नाहीं; आणि पंत हे कवि तरी कसले ? शिळ्या

---

* असल्या सर्व समजुतींचें आविष्करण वा. ब. पटवर्धन यांच्या ' काव्य व काव्योदय ' नामक निबंधामध्यें चांगल्या रीतीनें झालें आहे.

झालेल्या पौराणिक गोष्टी पुनः पुनः यमकानुप्रासांच्या अवडंबरानें सजवून सांगणारे 'हठादाकृष्टानां कतिपयपदानां रचयिता ।' अशापैकीं लेखक होत. उपमारूपकादि अर्थालंकारही त्यांनीं पुष्कळ चांगले साधले असतील; परंतु असले अलंकार साधले म्हणजे कांहीं उत्तम काव्य केलें असें होत नाहीं.'— असे आक्षेप अनेकांच्या मनांत आजपर्यंत दृढ धरून बसलेले आहेत.

या व असल्याच इतर आक्षेपांचें आजपर्यंत अनेकवार खंडन झालें आहे. तेव्हां त्या खंडनमंडनाच्या भानगडींत पुनः नव्यानें पडण्याचा आमचा मुळींच हेतु नाहीं. परंतु हे व अशा तऱ्हेचे आक्षेप निर्मूल होण्याला निखालस रामबाण असा एक उपाय आम्हांस सुचवावासा वाटतो. तो उपाय म्हणजे या जुन्या कवितेचें प्रत्यक्ष अध्ययनच करण्यास सुरवात करणें हा होय. या शंकित मंडळींनीं जुन्या कवींच्या कवितामृतजलधीमध्यें एकदम बुडी मारून त्यांत अवगाहन करण्यास सुरवात करावी. जुन्या वाङ्मयाचें अध्ययन करा व मग त्यांत कांहीं व्यंगें आढळून आल्यास तीं खुशाल आधारांसह प्रकट करा. आमच्या जुन्या कवींच्या बाबतींत आजपर्यंत ही मोठीच गंमत होत आली आहे कीं, त्यांच्या कवितेवर आक्षेप काढणारे बहुतेक त्या कवितेशीं अनभ्यस्त असावयाचे व जे जे त्या कवितेचें अध्ययन करतील ते सर्व तिच्या अंतरंगांत रंगून जाऊन तिचे भक्त बनावयाचे ! इतर कोणत्याही विषयांतले दोष दाखवावयाचे झाल्यास त्याची सांगोपांग माहिती करून घेतल्यानंतरच कोणाही व्यक्तीस दोषदर्शनाचा अधिकार प्राप्त होतो. परंतु आमच्या जुन्या कवींना नांवें ठेवणाऱ्यांस 'आपण जुन्या कवींचें कितीसें अध्ययन करून आपलीं हीं मतें बनविलीं आहेत ?' असें विचारूं गेल्यास पुष्कळसा अंधारच दृष्टीस पडतो. तेव्हां क्षुल्लक गोष्टीवरून कांहीं तरी गैरसमज मनांत घेऊन न बसतां सर्वांनीं जुन्या कवींचें अवलोकन, वाचन व अध्ययन सतत करीत असावें. प्रपन्नवृत्तीनें व भक्तिभावानेंच आमच्या जुन्या संतकवींजवळ जा असें आम्ही म्हणत नाहीं. भक्तिभाव नसेल, किंबहुना सामान्य आदरभावही उत्पन्न होत नसेल तर खुशाल विरोधी भावनेनें त्यांना हाणून पाडण्यासाठीं त्यांची गांठ घ्या. शत्रूंस मित्र बनविण्याचें व निंदकांस स्तुतिपाठक बनविण्याचें सामर्थ्य त्या शब्दसृष्टीच्या ईश्वरांमध्यें खास वसत आहे.

२. याप्रमाणें स्वतः अध्ययन करून दुर्ग्रहांचा निरास करून घेणें हाच मार्ग जरी उत्कृष्ट व निर्विवाद असला तरी विवेचन करण्याजोगे मुद्दे या काव्यविच

यांत अगदींच नसतात असें नाहीं. तेव्हां आजपर्यंत अनेकांनीं अनेकवार केलेल्या खंडनमंडनाचें चर्वितचर्वण करीत न बसतां जरा निराळ्या दृष्टीनें या विषयाचें विवेचन करण्याचा आमचा मानस आहे. काव्याचें स्वरूप काय, काव्याच्या भिन्न भिन्न अंगांचें स्वरूप काय, त्यांचा परस्पर संबंध कोणत्या प्रकारचा असतो, काव्य-संभारांत त्यांचें महत्व कोणतें, वगैरे गोष्टींचें दिग्दर्शन करून त्याच्या अनुरोधानें आमच्या जुन्या कवितेचें व विशेषत: पंतकवितेचें स्थान निश्चित करावयाचें आहे. काव्याच्या सहृदयाह्लादक स्वरूपाचा विचार करून त्याच्या अपेक्षेनें पंतकवितेचें व एकंदर जुन्या कवितेचें स्वरूपही वाचकांपुढें ठेवलें म्हणजे त्या कवितेच्या योग्यतेचा वाचकांस आपआपल्या पुरता स्वतः निवाडा करतां येईल. म्हणजे मताग्रहाचा प्रकार नको व भांडणांचें मूळही नको. असो. हें सर्व विवेचन करण्यांत आपल्या संस्कृत काव्यशास्त्रज्ञांचें त्याचप्रमाणें पाश्चात्य काव्यमर्मज्ञांचेंही यथेच्छ साहाय्य घेतलें आहे. तथापि त्यांच्या कडून घेतलेला भाग निराळा असा काढून दाखवितां येण्यासारखा नसल्याकारणानें व येथें केलेलें विवेचन हें लेखकाच्या अवलोकनाचें स्वतंत्र फल असल्यामुळें साहाय्यभूत झालेल्या ग्रंथकारांचा नामनिर्देश केला नाहीं.

३. आपल्या गीर्वाणवाङ्मयांत शास्त्रीयदृष्ट्या काव्यविवेचनास प्रारंभ फारच प्राचीनकाळीं झाला. इतक्या प्राचीन काळीं, कीं इतर अनेक शास्त्रांप्रमाणें काव्यविवेचनाचाही मूळ उगम सध्यां सांपडेनासा झाला आहे. यास्काचार्यांच्या निरुक्तग्रंथांत, म्हणजे पाणिनीय व्याकरणाच्याही पूर्वीं, उपमेसारख्या अलंकारांच्या व्याख्या केलेल्या आढळतात; व पाणिनिकालीं तर अलंकारशास्त्राचा बराच उत्कर्ष झाला होता असें अष्टाध्यायींतील उल्लेखांवरून म्हणतां येतें. परंतु प्राचीन वाङ्मयांत घडून येणारा नेहमींचा प्रकार, म्हणजे उत्तरोत्तर निर्माण होणाऱ्या ग्रंथांमुळें पूर्वपूर्व ग्रंथांचा प्रचार नाहींसा होऊन ते ग्रंथ नष्ट होणें, हा काव्यविवेचनाच्या शास्त्रास फारच भोवलेला दिसतो. त्यामुळें प्राचीन काळचे सर्व ग्रंथ नामशेष झालेले, किंबहुना 'नामापि न ज्ञायते' अशा स्थितीप्रत पोचलेले, आढळून येतात व उत्तरकालीन अस्तित्वांत असलेल्या ग्रंथांवरूनच शास्त्राची पूर्वीची परंपरा आजमावावी लागते. अशा रीतीनें प्रयत्न केला असतां येवढी गोष्ट निर्विवादपणें दिसून येते कीं पूर्वावस्थेमध्यें या शास्त्रांत अलंकारांचें फार प्राधान्य होतें. अलंकारामुळेंच हें काव्यविवेचनाचें शास्त्र प्रथम उदयास आलें व

त्याचें नांव देखील ' अलंकारशास्त्र ' हेंच रूढ होऊन आजपर्यंत याच नांवाचा प्रचार विशेष चालत आलेला आहे. कवींनीं आपल्या कल्पनाविलासांनीं निर्माण केलेले नानातऱ्हेचे सुंदर अलंकार हेच काव्यविवेचकांच्या प्रथम नजरेस आले व त्यांचेंच त्यांनीं विवरण करून साहित्यशास्त्राचा पाया घातला. शृंगार, वीर इत्यादिक आठ अथवा नऊ रस हे त्या वेळच्या आलंकारिकांना माहीत नव्हते असें नाहीं. उपमादिक अलंकारांप्रमाणें शृंगारादिक रसांची कल्पनाही फार प्राचीन काळीं उगम पावली आहे. परंतु रसाचा अंतर्भाव नाट्यशास्त्राच्या विषयांत त्या वेळीं केला जात असे. नाटक ही रंगवस्तु म्हणजे प्रयोग करून प्रेक्षकांचें रंजन करण्याची गोष्ट असल्यामुळें सामान्य काव्यग्रंथापेक्षां त्यांत शृंगारादिक रसांस फारच महत्त्वाचें स्थान आहे. अर्थात् नाट्यप्रयोगाचा सर्व दृष्टींनीं विचार करणारें जें ' नाटयशास्त्र ' त्यांत रसाचा अंतर्भाव करून त्याचें विवेचन करण्यांत आलें. भाव, विभाव, अनुभाव, व्यभिचारिभाव या सर्वांचें विवरण करण्यांत येऊन, या सर्वांचा अभिनय कशा रीतीनें करावा व प्रेक्षकांच्या अंतःकरणांत रसोत्पत्ति कशी करावी याकडे मुख्य लक्ष दिलें गेलें. नाटयशास्त्रावरील भरतमुनींचा आद्य ग्रंथ पाहिल्यास त्यांत या सर्व गोष्टींचें विवेचन केलेलें दिसून येतें.* परंतु काव्य-नाटकांचा केवळ वाङ्मयग्रंथ या नात्यानें विचार करणारे जे खरेखुरे वाङ्मयविवेचक त्यांच्या ग्रंथांत अलंकारांचेंच प्रामुख्यानें विवरण केलेलें आढळतें. उपलब्ध ग्रंथकारांत प्राचीन, असा अलंकारशास्त्राचा आद्याचार्य जो भामह त्याच्या ग्रंथांत अलंकारांचेंच प्रामुख्यानें विवरण आहे. त्याच्याच इतका प्राचीन काव्य-शास्त्रमर्मज्ञ जो दंडी त्यानें आपल्या ' काव्यादर्श ' नामक ग्रंथांत काव्याचे गुण व अलंकार यांचेंच सोदाहरण विवेचन केलेलें आहे. या पूर्वकालीन आलंकारि-कांना, सहृदयहृदयाह्लादक अशा काव्यांतील रसरूपी तत्वाची जाणीव नव्हती असें नाहीं. रसाचें अस्तित्व त्यांस ज्ञात होतें व मान्यही होतें; परंतु उपमादिक अलंकारांप्रमाणें रसाला ते अलंकारांपैकींच गणीत असत. शृंगारादि रस अथवा भाव ज्या काव्यांत आविर्भूत झालेला असेल तेथें रसवत् अथवा प्रेयस् असे अलंकार होतात असें त्यांनीं मानिलें होतें. सारांश, विशेष शास्त्रीय विचार न करितां काव्यांत जें जें कांहीं रमणीय असें आढळेल त्याची त्याची अलंकारांत गणना करून अलंकारांच्या संख्येंत भर टाकावयाची असेंच या प्राचीन आलं-

* भरतनाटयशास्त्र अ० ६, ७.

कारिकांचें सामान्यतः धोरण होतें. परंतु सहृदय व मर्मज्ञ काव्यविवेचकांच्या विचारांची जसजशी परिणति होऊं लागली तसतसें काव्यविवेचनाचा सर्वच प्रांत व्यापून बसणाऱ्या या अलंकारांचें डोईजड झालेलें प्रस्थ त्यांस मान्य होईनासें झालें. उपमादि अर्थालंकारांच्या व अनुप्रासादि शब्दालंकारांच्या व्याख्या, त्यांचे प्रकार व त्यांचीं उदाहरणें हाच काय तो मुख्य साहित्यशास्त्राचा सांगाडा बनून राहिला होता तो या नवीन सहृदय विवेचकांनीं ढांसळून टाकला. काव्याच्या स्वरूपाविषयीं मर्मग्राही दृष्टीनें विचार सुरू झाला. काव्याचें सहृदयाह्लादक असें मख्य अंग कोणतें, बाकीचीं गौण अंगें कोणतीं, त्या सर्वांचें परस्पर महत्त्व काय, वगैरे गोष्टींची चर्चा सुरू झाली व निरनिराळ्या रसिकांचे निरनिराळे सिद्धांत बाहेर पडूं लागले. कित्येकांनीं वक्रोक्ति हें काव्यसौंदर्याचें मूलतत्व म्हणून प्रतिपादन केलें तर कित्येकांनीं ' रीतिरात्मा काव्यस्य ' असें म्हणून ' रीति ' (घाटणी, रचनाशैली) हिलाच सर्वस्वीं प्राधान्य दिलें. या सर्व विचारमंथनांत काश्मीरस्थ ' **सहृदयां** ' नीं* केलेलें काव्याच्या मूलतत्त्वांचें विवेचन विशेष मान्यतेस पावलें, व मम्मटांसारख्या वाग्देवतावतारानें त्याला उचलून धरून आपल्या ग्रंथांत कायमचे स्थान दिल्यापासून या काश्मीरक ' सहृदयां ' चीं तत्वें साहित्यशास्त्रांत बहुमान्य झालीं आहेत. हीं तत्वें अगदीं थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगतां येतील.

४. नेहमींच्या व्यवहारांतील भाषाप्रयोगामध्यें शब्दांचा जो सरळ अर्थ आपण करतों त्याला वाच्य अर्थ म्हणतात. परंतु ज्याप्रमाणें स्त्रियांच्या भिन्न भिन्न अवयवांच्या ठेवणीखेरीज त्यांचें लावण्य म्हणून कांहीं निराळेंच असतें त्याप्रमाणें महाकवींच्या वाणींमध्यें वाच्य अर्थाहून भिन्न असा ' प्रतीयमान ' किंवा ' व्यंग्य '

*ध्वनीचें तत्त्व प्रतिपादणारे हे काश्मीरक विवेचक स्वतःस ' सहृदय ' म्हणवीत असत असें त्यांच्या ध्वन्यालोक नामक प्रसिद्ध ग्रंथावरून दिसतें. या 'सहृदयां'च्या पैकींच एकानें, अगर अनेक मंडळींनीं एकत्र विचार करून, ध्वनीचें प्राधान्य प्रस्थापित करण्याकरितां ध्वनिकारिका लिहिल्या. व यांच्यापैकींच आनंदवर्धन नामक सुप्रसिद्ध ग्रंथकारानें त्या कारिकांवर वृत्ति लिहून तो समग्र ग्रंथ ' ध्वन्यालोक ' या नांवानें प्रसिद्ध केला. काव्यविवेचनाच्या शास्त्रांत या ग्रंथानें मोठीच क्रांति घडवून आणली. मम्मटांनीं आपल्या काव्यप्रकाशांत याच ग्रंथांतील तत्वें बहुतेक ग्रहण केलीं आहेत.

अर्थ दिसून येत असतो.* हा व्यंग्यार्थ हेंच काव्यांतील सहृदयहृदयसंवेद्य व अनिर्वचनीय असें सौंदर्यशालि तत्त्व होय. ज्या काव्यांत हा व्यंग्यार्थ प्रधान असेल तें काव्य उत्तम होय; अशा काव्यास ' ध्वनि ' असेंही म्हणतात. ज्या काव्यांत व्यंग्यार्थाच्या अपेक्षेनें वाच्यार्थच विशेष आल्हादकारी असेल किंवा दोघेही सारखेच आल्हादक असतील तें मध्यम काव्य होय. ज्या काव्यांत व्यंग्यास कांहीं महत्त्व नसून वाच्यार्थच चमत्कृतिपूर्ण असेल किंवा जेथें केवळ शब्दरचना वैचित्र्ययुक्त असेल तें अधमकाव्य होय. त्यास चित्रकाव्य असेंही म्हणतात.

वर सांगितलेल्या व्यंग्यप्रधान काव्यरचनेचे, म्हणजे ' ध्वनी'चे, निरनिराळ्या तत्त्वांनुसार अनेक भेद केलेले आहेत. ध्वनिकाव्यांतील वाच्यार्थाच्या अवस्थेस अनुलक्षून विवक्षितान्यपरवाच्य व अविवक्षितवाच्य असे प्रथम दोन विभाग करून नंतर त्याचे अनेक प्रभेद केले आहेत. काव्यांतील व्यंग्यार्थ कोणच्या प्रकारचा आहे इकडे लक्ष देऊन व्यंग्यार्थाच्या प्रकारास अनुलक्षून भेद केले म्हणजे वस्तुरूपध्वनि, अलंकाररूपध्वनि व रसरूपध्वनि असेही भेद मानितां येतात. या सर्व ध्वनीच्या प्रकारांमध्यें रसध्वनि हाच निःसंशय महत्त्वाचा होय. शास्त्राच्या पूर्णते-करितां ग्रंथकारांनीं इतर प्रकारांचेंहि वर्णन केलेलें असलें तरी रसध्वनीचेंच अत्यंत प्रामुख्यानें व विस्तारानें वर्णन त्यांना करावें लागलें आहे. रसिक वाचकांच्या दृष्टीनें तर इतर प्रभेदांस कांहींच महत्व नसून रसध्वनि हाच काव्याचें सारसर्वस्व होय. काव्यवाचकांच्या अनुभवाला येणारे जे शृंगार, वीर, करुण इत्यादि नऊ रस ते काव्यामध्यें व्यंग्यार्थाच्या रूपानेंच प्रतीत होतात. शब्दांचा वाच्यार्थ कधींही रस असूं शकत नाहीं. मेघदूताच्या उत्तर भागांत यक्षानें आपल्या प्रियेच्या विरहाव-स्थेचें वर्णन केलें आहे. व तिला निवेदन करण्याचा निरोप मेघास सांगितला आहे. त्या अप्रतिम वर्णनापासून विप्रलंभशृंगाराची व करुणाची निष्पत्ति होते व तो वाच-कांस अगदीं चटका लावून सोडतो. परंतु हें सामर्थ्य त्या काव्याच्या शब्दार्थांत नाहीं. स्त्रीच्या विरहगलित अवयवांचें वर्णन, तिच्या विरहावस्थेंतील व्यापारांचें वर्णन वगैरे निरनिराळ्या वाच्यार्थांची सामग्री एकत्र होऊन त्याच्यामुळें वाच-कांच्या मनांतील सुप्त भावना उचंबळून येऊन जो एक अनिर्वचनीय व केवल अनुभवजन्य असा आनंद रसिकांस होतो तो अप्रत्यक्षपणें म्हणजे व्यंजनेनेंच होतो.

---

* प्रतीयमानं पुनरन्यदेव वस्त्वस्ति वाणीषु महाकवीनाम् ।
यत्तत्प्रसिद्धावयवातिरिक्तं विभाति लावण्यमिवाङ्गनासु ॥ ध्वन्यालोककारिका ४.

तो रस म्हणजे अमक्याच शब्दांचा अर्थ होय असें कधींही सांगतां येत नाहीं.

सहृदय वाचकांचें चित्त तल्लीन करून दिव्य आनंदाचा अनुभव देणारा, 'पुर इव परिस्फुरन्, हृदयमिव प्रविशन्, सर्वाङ्गीणमिव आलिङ्गन् अन्यत्सर्वमिव तिरोदधत्, ब्रह्मास्वादमिवानुभावयन्, अलौकिकचमत्कारकारी ' असा जो **रस** तो काव्याचा **आत्मा** होय. (काव्यप्रकाश, उल्लास ४.) मनुष्याच्या आत्म्याचे ज्याप्रमाणें शौर्य, धैर्य, इत्यादि गुण आहेत त्याप्रमाणें माधुर्य, ओज व प्रसाद हे काव्याचा आत्मा जो रस त्याला शोभविणारे गुण मानिले आहेत.* शब्दार्थात्मक जें बाह्यस्वरूप तें काव्याचें शरीर होय. आणि अनुप्रासादि शब्दालंकार व उपमादिक अर्थालंकार हे हार. केयूर इ० भूषणांप्रमाणें शब्दार्थात्मक जें बाह्यशरीर त्याचीं भूषणें होत.‡ शरीराच्या द्वारानें हे अलंकार आत्मा जो रस त्याचेही उपकारक होतात. याप्रमाणें काव्यावर मनुष्याचें रूपक करून त्याच्या निरनिराळ्या अंगांचा परस्परसंबंध व योग्यता हीं या ध्वनिसंप्रदायी आलंकारिकांनीं निश्चित केलीं आहेत.

५. अलंकारांची क्षुद्रता व काव्यसृष्टीच्या संभारांत त्यांची कांहीं योग्यता नाहीं असें दाखविण्याची प्रवृत्ति जास्तींत जास्त कोठपर्यंत जाऊं शकते हें दाखविण्याकरितांच ध्वनिसांप्रदायिकांच्या तत्वांचें वर विवरण केलें आहे. अलंकारांच्या रूपानें प्रकट होणारा कवींचा कल्पनाविलास म्हणजे केवळ बाह्यभूषणांप्रमाणें होय; तो असला तरी वाहवा, नसला तरी त्याच्यामुळें काव्याच्या उत्कर्षांत कांहीं कमीपणा येत नाहीं असेंच यांचें सरासरी मत आहे. साहित्याला शास्त्रीय व सुसंघटित असें स्वरूप ज्यांनीं दिलें त्या आनंदवर्धन, मम्मट इत्यादि काव्यमर्मज्ञांच्या ग्रंथांमध्येंच अलंकारांची योग्यता अशा रीतीनें कमी ठरविण्याच्या प्रवृत्तीचा कळस झाला आहे. भामह, उद्भट, दंडी वगैरे प्राचीन काव्यविवेचकांच्या ग्रंथांत अलंकारांसच सर्वस्वीं प्राधान्य होतें हें आपण पाहिलेंच आहे. परंतु मूलतत्वांचा शास्त्रीय दृष्टीनें विचार न करितां वरवर दिसणारे भाराभर गुण व अलं-

* आत्मन एव हि यथा शौर्यादयः, नाकारस्य, तथा रसस्यैव माधुर्यादयो गुणा, न वर्णानाम् । काव्यप्रकाश, उल्लास ८.

‡ उपकुर्वन्ति तं सन्तं येऽङ्गद्वारेण जातुचित् ।
हारादिवलंकारास्तेऽनुप्रासोपमादयः॥ काव्यप्रकाश; उल्लास ८.
अङ्गद्वारेण='वाचक-(शब्द)-वाच्य-(अर्थ)-लक्षणाङ्गातिशयमुखेन । '

कार तेवढे सांगणें ह्मणजे खरें काव्यविवेचन नव्हे असें मार्मिक सहृदयांना हळू हळू दिसून येऊं लागलें. यानंतर बरेंचसें विचारमंथन होऊन ध्वनीचें तत्व बाहेर पडलें व पुष्कळशा टीका प्रतिटीका होऊन तें कायम झालें. या ध्वनितत्वाच्या आधारावर काश्मीरांतील आलंकारिकांनीं साहित्यशास्त्राचा सर्व सांगाडा उभा केला. जुन्या मतांत क्रांति करूं पहाणाऱ्या सुधारणावाद्यांच्या नेहमींच्या पद्धती- प्रमाणें या ध्वनिसंप्रदायांतील विवेचकांनीं अर्थातच लंबक दुसऱ्या टोकास नेला. गुण व अलंकार यांना कमी महत्त्वाचे लेखून अगदीं कोपऱ्यांत ढकलून दिलें व काव्याची सर्व सृष्टि एका ध्वनीच्या आसाभोंवतीं त्यांनीं फिरावयास लाविली.

६. वस्तुतः पाहिलें तर, वर ज्याचा सारांश दिला आहे ते मम्मटादिक काश्मीरस्थ सहृदयांचे सिद्धान्त अगदींच अयुक्तिक आहेत असें म्हणवत नाहीं. उत्कृष्ट काव्यापासून जो आल्हाद होऊन चित्तवृत्ति तल्लीन होते तो केवळ शब्दांच्या वाच्यार्थापासून खास होत नाहीं. वाच्यार्थापासून निघालेला परंतु त्याच्यापेक्षां महत्वाचा व रमणीय असा 'ध्वनि' आपल्या चित्तावर उमटतो त्याचाच तो परिणाम होय. आपण पंतांच्याच कवितेंतलें एक उदाहरण घेऊन पाहूं.--

> जगत्त्रयमनोहरा ! बलगुणैकरत्नाकरा !
> म्हणे 'कनकरंकु द्या मज, महा प्रयत्ना करा'। (कनकरंकु-सुवर्णमृग
> प्रियाहि अशि जाहली तुज कुकार्य आज्ञापिती
> सुधा त्यजुनि कामुक प्रकट अंगनाज्ञा पिती ॥ केका ८३.

साभिप्राय पदांनीं युक्त असें हें सुंदर ध्वनिकाव्य आहे. 'प्रियेनें कुकार्य कर- ण्याची आज्ञा केली असतांही ती रामानें पार पाडली, तेव्हां कामुक लोक अमृतालाही टाकून स्त्रियांची आज्ञा पाळण्यांत कृतार्थता मानतात,' असा येथें वाच्यार्थ आहे; परंतु कामुक लोकांच्या वर्तनाचें सोदाहरण वर्णन करण्याचा येथें कवीचा मुळींच उद्देश नाहीं. 'हे देवा, कामुकत्वाचा दोष पत्करून प्रियेनें सांगितलेलें अनुचित कार्यही करण्यास तुम्ही तयार झालां ! तर मला उद्धर- ण्याचें अत्यंत उचित कार्य करण्यास कां तयार होत नाहीं ?' अशी भक्ताची आर्तोक्ति येथें प्रमुखत्वानें ध्वनित झाली आहे. व श्लोकाचें रमणीयत्व या ध्वन्यर्थांतच आहे. असो. काव्यास चारुता आणणारा हा जो व्यंग्यार्थ, तो मुख्यत्वेंकरून रसाच्या स्वरूपाचा असतो; व या अनुकूलसंवेदनात्मक रसा-

च्याच योगानें सहृदयाचें चित्त आनंदनिर्भर होत असल्यानें, रसास काव्याचा आत्मा म्हणण्यापर्यंत या विवेचकांची पाळी आली आहे तीही युक्तच आहे. मात्र रस या शब्दाचा जो संकुचित अर्थ जुन्या ग्रंथांत केला जातो तो योग्य नाहीं. केवळ शृंगार, वीर, करुण इत्यादि नऊ विभागांच्या साच्यांत बसला म्हणजेच तो रस नाहींतर नाहीं, असें न मानतां, ज्या भावना उत्कट स्थितीस पोंचल्या असतां मनुष्याचें चित्त वेधून त्यास तल्लीन करून सोडतात त्या सर्वांचा रस या संज्ञेंत समावेश केला पाहिजे. अशा रीतीनें रस या शब्दाचा अर्थ विस्तृत केला म्हणजे रस काव्याचा आत्मा होय, निदानपक्षीं तो काव्याचा एक प्रमुख घटक आहे ही गोष्ट पटण्यास हरकत नाहीं.

७. याप्रमाणें ह्या ध्वनिसांप्रदायिकांच्या विचारसरणींत पुष्कळसें तथ्य असलें तरी काव्याच्या स्वरूपाविषयीं व्यापक रीतीनें विचार केला ह्मणजे हिच्यांत बराचसा एकांगीपणा आहे असें वाटल्याखेरीज रहात नाहीं. सौंदर्यनिदर्शन करून रसिकाच्या चित्ताला अत्युच्च, उदात्त व सात्विक अशा आनंदाची प्राप्ति करून देणें हें काव्याचें कार्य होय. हें कार्य रसनिष्पत्तीच्या योगानें कवि पुष्कळ वेळां घडवून आणतात यांत शंकाच नाहीं. परंतु कवींच्या करामतीकडे पाहूं गेल्यास ' रसिकचित्त तर्पित ' करण्याचें कार्य ते सदा सर्वदा भावनांच्या उत्कर्षानेंच घडवून आणतात असें म्हणतां येत नाहीं. भावनेच्या बरोबरच दुसरें एक साधन कवींना उपलब्ध असलेलें आढळतें व या दुसऱ्या साधनाचा सर्व देशांतील कवींनीं मनमुराद उपयोग करून घेतल्याचेंही दिसून येतें.

हें दुसरें साधन म्हणजे कवींचा कल्पनाविलास होय. कोणत्याही विषयाचें सरळ रीतीनें वर्णन न करितां रम्य कल्पनांनीं त्याला नटवून वाचकांपुढें ठेवलें म्हणजे त्याच्यापासून विशिष्ट आनंदाची प्रतीति होते. मनुष्य हा कल्पनाशाली प्राणी आहे. साध्या अर्थाचें सेवन करतांना कल्पनेचें लोणचें त्याला अवश्य लागतें. वर्तमान स्थिति कितीही उत्कृष्ट असली तरी नानातऱ्हेचीं काल्पनिक मनोराज्यें करून त्यांचें सुख अनुभविण्यांत दंग होत नाहीं असा मनुष्य कोण आहे ? प्रत्यक्षानें किंवा वस्तुस्थितीनें मनुष्याचें कधींच समाधान होत नाहीं. कल्पनेचा डोलारा उभा करून त्याचें अवलोकन करण्यांतच त्यास अप्रतिम आनंद होतो. काल्पनिक सौंदर्याची सृष्टि निर्माण करण्याची ही प्रवृत्ति

वाङ्मयाच्या प्रांतामध्येंही दिसून येतेच. सहज बोलतांना आपण कल्पनेनें सजवलेली भाषा वापरतों. अगदीं साध्या व्यवहाराच्या बोलीमध्यें हा प्रकार कसा चालतो याचें अवलोकन केल्यास मोठी मौज वाटते. ' आंधळयांची माळ चालली आहे, ' ' तो वामनमूर्ति आहे. '- येथें पहिल्या वाक्यांत आंधळयांच्या रांगेवर माळेची कल्पना केली आहे व दुसऱ्यांत एका मनुष्याचा वामन नांवाच्या सुप्रासिद्ध ठेंगू व्यक्तीशीं सारखेपणा स्थापित केला आहे. येथें पहिल्या वाक्यांत निदर्शना व दुसऱ्यांत उपमा असे अलंकार झाले आहेत. मोठमोठे अलंकार करून आपण कवींच्या पदवीस बसत आहों असें हीं वाक्यें शेकडों वेळां तोंडांतून काढणाऱ्या माणसांच्या लक्षांत तरी येत असेल काय ? त्याचप्रमाणें ' माझ्या अंगाची लाही झाली, ' ' तो फुटाण्यासारखा उडाला, ' 'त्यानें अधिकाऱ्यापुढें पदर पसरला, ' ' त्याला बायको मोठी फटाकडी मिळाली, ' ' कौन्सिलांतील कामकाज म्हणजे भातकुलीचा खेळ आहे, ' ' म्युनिसिपालिट्या म्हणजे खराट्याचें स्वराज्य आहे '—अशीं शेकडों अलंकारिक वाक्यें सांगतां येतील. असलीं वाक्यें मोठीं मोहक व चटकदार असतात. त्यांत थोडक्यामध्यें पुष्कळ खुबीदार अर्थ भरलेला असतो. यामुळें तीं अतिशय परिणामकारक होतात. शेवटल्याच वाक्यांतल्या 'खराट्याचें स्वराज्य' या शब्दप्रयोगाकडे लक्ष दिल्यास, विरोधाभास, कुचेष्टा, विनोद, उपहास वगैरे गोष्टींचें त्यांत किती बेमालूम मिश्रण झालेलें आढळतें ! हा शब्दप्रयोग ज्यानें प्रथम उपयोगांत आणला तो गृहस्थ मोठा चतुर व प्रतिभावान् असला पाहिजे यांत शंका नाहीं. आपल्या भाषेंतल्या शेकडों म्हणी असल्या अलंकारिक भाषासरणीचें सुंदर मासलेच आहेत. उदाहरणार्थ—' थेंबे थेंबे तळें साचे, ' ' रडतराव घोड्यावर बसविणें, ' ' दुरून डोंगर साजरे, ' इ० इ०. माजी बिनसुधारलेल्या सुप्रीम कौंसिलांत रौलट बिलाचा वादविवाद चालू असतांना नामदार दादासाहेब खापर्डे यांनीं आपल्या भाषणांत ' रौलट बिलें हीं दोन फारच सुंदर गुलाबाचीं फुलें आहेत; मात्र त्यांचा सुवास इंग्रज सरकारला मिळावयाचा असून कांटे तेवढे नेटिव प्रजेला बोंचणार आहेत. ' असा काव्यमय युक्तिवाद केला तेव्हां त्या गंभीर व त्वेषाच्या प्रसंगींहीं सर्वांस मोठीच मौज वाटली व सगळीकडे हंशा पिकला. तेव्हां सुंदर व समर्पक कल्पनाविलासाचे ठायीं मन प्रफुल्लित करण्ययाचें असें अद्भुत सामर्थ्य आहे. वर्ण्यविषयाला अशा तऱ्हेनें कल्पनेची जोड देऊन त्यांत जास्त माधुरी आणण्याची प्रवृत्ति

वाङ्मयाच्या सर्वच प्रांतांत थोडी बहुत दिसून येते परंतु वाङ्मयाच्या इतर विभागांपेक्षां काव्यामध्यें कल्पनेचें प्राचुर्य फारच अधिक प्रमाणांत दृष्टीस पडतें. रमणीयार्थनिष्पत्ति हें काव्याचें साध्यच असल्यामुळें कल्पनांचा विलास काव्यांत इतका दिसून येतो हें सहजच आहे. या कल्पनाशालितेवर कवींनीं आपला छाप इतका दृढ बसविला आहे कीं कोठेंही कल्पनामय व अलंकारिक असें वर्णन आढळलें कीं त्याला ' काव्यमय ' असें म्हणण्याचा प्रघातच पडून गेला आहे. कवींची कल्पनाशालिता ही सर्व भाषांच्या वाङ्मयांत इतकी प्रसिद्ध आहे कीं, बिचाऱ्या कवींना केवळ वेड्यांच्या कोटींत ढकलून देण्याची सर्वत्र रीतच होऊन बसली आहे.

हा कवींचा कल्पनाविलास काव्यामध्यें ज्या निरनिराळ्या प्रकारांनीं प्रकट होतो त्यांस संस्कृत साहित्यशास्त्रांत 'अलंकार' हें नांव फार प्राचीन काळापासून दिलें गेले आहे. असदृश वस्तूंमध्यें साम्य दाखविणें, भिन्न वस्तूंमध्यें अभेद वर्णन करणें, अविरोधी गोष्टींमध्यें विरोध भासविणें, कार्याचें कल्पित कारण दर्शित करणें किंवा कारणापासून असंभाव्य असें कार्य झालेलें दाखविणें, कार्यकारणांचा विपर्यास करणें, हे सर्व कवींच्या कल्पनेचेच खेळ होत. आणि हेच सर्व प्रकार आमच्या साहित्यशास्त्रकारांनीं अलंकार म्हणून गणिले आहेत. अर्थात् अलंकार म्हणजे दुसरेंतिसरें कांहीं नसून कल्पनाचमत्कृतीचेच निरनिराळे प्रकार होत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. रमणीय अर्थाची निष्पत्ति करणें हें काव्याचें प्रधान उद्दिष्ट होय. अशा, वाचकांस तन्मय करणाऱ्या रम्य अर्थाची निष्पत्ति कवि दोन मार्गांनीं करीत असतात. पहिला मार्ग रसनिष्पत्तीचा, म्हणजे भावनांचा उत्कर्ष करून वाचकांना आनंदसंप्लवामध्यें लीन करून सोडण्याचा होय. दुसरा मार्ग म्हणजे कल्पनाविलासाच्या योगानें अर्थामध्यें चमत्कृति उत्पन्न करून वाचकांना रमविण्याचा होय. अर्थात् भावना (Feeling, sentiment) व कल्पना (Imagination) या दोहोंचा उत्कर्ष करून तद्द्वारा केलेली रमणीय अर्थाची निष्पत्ति म्हणजे काव्य असें सामान्यतः समजण्यास हरकत नाहीं.

८. आमचे ध्वनिवादी जे मम्मटप्रमुख साहित्यशास्त्रज्ञ त्यांनीं हें अलंकारांचें महत्व मान्य केलेलें नाहीं हें मागें जो त्यांच्या मतांचा सारांश दिला आहे त्यावरून लक्षांत येईलच; परंतु आमचे सर्वच काव्यविवेचक कांहीं ध्वनिसंप्रदायाचे अनुयायी बनलेले नव्हते. ध्वनिसंप्रदायाचा प्रचार होण्याचा पूर्वी झालेल्या भामह, उद्भट, दण्डी इत्यादि ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांत अलंकारांनाच सर्वस्वीं प्राधान्य दिलें

आहे. शिवाय अलंकार म्हणजे चंद्रकळेवर बसविलेल्या आरसपानी टिकल्यांप्रमाणें किंवा खडीच्या फुलांप्रमाणें परस्पर संबंध नसलेल्या अशा कळाकुसरीच्या वस्तु नव्हेत, तर त्यांच्यामध्यें कांहीं तरी सामान्य तत्व वसत आहे व तें सामान्य तत्व काव्याचें अगदीं प्रमुख असें अंग आहे या गोष्टीची अस्पष्ट जाणीव भामह, दण्डी इत्यादिक प्राचीन आलंकारिकांना होत चालली होती. सर्व अलंकारांचें मूळ कवींचा कल्पनाविलास होय असें स्पष्ट कोणी म्हटलेलें नाहीं. त्याला चमत्कृति, वक्रोक्ति, अतिशयोक्ति अशीं निरनिराळीं नांवें निरनिराळ्या ग्रंथकारांनीं दिलीं आहेत. दण्डी ह्मणतो—

अलंकारान्तराणामप्येकमाहुः परायणम् ॥
वागीशमहितामुक्तिमिमामतिशयाह्वयाम् ॥ काव्यादर्श, २.२२०.

' वागीश्वरांनीं गौरविलेली ही अतिशयोक्ति इतर सर्व अलंकारांचेंही श्रेष्ठ आश्रयस्थान म्हणून मानिली आहे.' भामहानें या सर्व अलंकारांच्या मूलतत्वास वक्रोक्ति असें म्हटलें आहे.--

सैषा सर्वैव वक्रोक्तिरनयार्थो विभाव्यते ।
यत्नोऽस्यां कविना कार्यः कोऽलंकारोऽनया विना ॥ भामह, २.८५.

'सर्व अलंकारांत दिसून येणारी ही सर्व वक्रोक्तीच होय. हिच्या योगानें अर्थास शोभा येते. कवीनें हिच्याविषयीं यत्न करावा. हिच्याशिवाय असूं शकेल असा कोणता अलंकार आहे ?' कालांतरानें इतर सर्व नांवें मागें पडून वक्रोक्ति हेंच नांव विशेष रूढ झालें. नाना तऱ्हेच्या अलंकारांना प्रसविणारी कल्पनाचमत्कृति म्हणजेच ही भामहादिक आलंकारिकांची वक्रोक्ति असें स्थूलमानानें समजण्यास हरकत नाहीं. तेव्हां रसास प्रधान मानणाऱ्या विवेचकांप्रमाणें अलंकारांस म्हणजे कल्पनाविलासास प्रधान मानणारा विवेचकांचा संप्रदायही आपल्याकडे निर्माण झाला होता हें वरील वृत्तांतावरून ध्यानांत येईल. अलंकारांस प्रधान मानणाऱ्या पक्षाची जसजशी परिणति होत गेली तसतसें वक्रोक्तीचें महत्वही वाढत गेलें व शेवटीं या वक्रोक्तीसच काव्याचा आत्मा मानण्यापर्यंत मजल गेली. म्हणजे ध्वनिवादी जसे एका टोकास गेले तसे हे वक्रोक्तिवादी अगदीं दुसऱ्या टोकाला गेले. परंतु सहृदयग्राह्य असें खरें तत्त्व दोघांच्या मधोमध असून, रस व अलंकार, व्यंग्योक्ति व वक्रोक्ति, किंवा भावना व कल्पना यांना काव्याच्या प्रांतांत एकमेकांच्या बरोबरीनें महत्त्व आहे हें वर स्पष्ट केलेंच आहे.

९. संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांच्या कल्पनांस अनुसरून येथपर्यंत विवेचन केलें. पाश्चात्य रसिकांकडे व काव्यविवेचकांकडे पाहिलें असता तेथेंही कांहींसा असाच प्रकार दिसून येतो. म्हणजे कांहीं विवेचक काव्याचें स्वरूप वर्णन करतांना, भावना किंवा हृदयविकार यांनाच सर्वस्वीं महत्त्व देतात तर इतर कांहीं वाङ्मय-चिकित्सक कल्पनाचमत्कृतीसच विशेष प्राधान्य देतात. परंतु पाश्चात्य विवेचकांमध्यें मतभिन्नतेचा हा जो प्रकार येतो तो पक्षाभिनिवेशानें किंवा संप्रदायानुसरणामुळें आलेला नसून प्रत्येकाच्या प्रकृतिभिन्नतेमुळेंच आलेला दिसतो. उदाहरणार्थ, वर्ड्स्वर्थ कवीनें काव्याची व्याख्या 'Spontaneou sover-flow of powerful feelings' 'प्रबल भावनांचा सहजोद्रेक' अशी केली आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं त्याच कवीनें 'Poetry is the breath and finer spirit of all knowldge,' 'जिवंतपणानें स्फुरणारें सर्व ज्ञानाचें सारभूत तत्त्व म्हणजे काव्य' असेंही काव्याचें स्वरूप वर्णिलें आहे हीं दोन्ही वर्णनें वर्ड्स्वर्थच्या स्वतःच्या प्रकृतीस अनुरूप अशींच आहेत. प्रस्तुत कवीच्या ठायीं कल्पनाशालिता फारशी नव्हती, अर्थात् त्याच्या व्याख्येंत कल्पनेचा चुकूनही संबंध आलेला नाहीं याची संगति तेव्हांच लागते. त्याचें अंतःकरण भावनाप्रधान होतें; तो तत्वज्ञानी असून तत्वविचारप्रियही होता. या त्याच्या दोन्ही व्यक्तिगत विशेषांचें प्रतिबिंब त्याच्या दोन्ही व्याख्यांत पडलेलें उघडच दिसतें आहे. याच्या उलट अत्यंत तरल कल्पनेच्या शेली नामक कवीनें केलेली व्याख्या पहा—'Poetry in a general sense may be defined as the expression of the imagination.' 'साधारणतः काव्य म्हणजे कल्पनेचा आविष्कार अशी काव्याची व्याख्या करितां येईल.' यांत कल्पनेशिवाय इतर अंगांचा उल्लेख देखील केलेला नाहीं. याप्रमाणें बहुतेक पाश्चात्य कवींनीं व रसिकांनीं आपआपल्या स्वाभाविक प्रवृत्तीस अनुसरून काव्याचें वर्णन निरनिराळ्या प्रकारें केलें आहे. तथापि या सर्व वर्णनांचा व व्याख्यांचा निष्कर्ष काढला तर तो 'कल्पना व भावना यांच्या द्वारा केलेली रमणीयार्थनिष्पत्ति' असाच निघेल यांत संशय नाहीं.

जगतांतलि वस्तुजाताचें सौंदर्य व त्याची अपूर्वता चित्तवेधक रीतीनें प्रकट करण्याचें कवींचें सामर्थ्य केवळ अद्भुत व अनुभवगम्य असतें हें तर खरेंच. तथापि केवळ वरवर पाहूं गेलें तरी आपल्या कल्पनाविलासाचें साहाय्य कवि किती

येतात तें सहज दिसून आल्याखेरीज रहात नाहीं. या दृष्टीनें Leigh Hunt नामक आंग्ल टीकाकाराचा पुढील उतारा मोठा समर्पक आहे. शास्त्रज्ञाहून किंवा सामान्य मनुष्याहून कवीचा व्यापार कसा निराळा असतो व कल्पनेच्या साहाय्यानें कोणत्याही वस्तूचें सौंदर्य,अपूर्वत्व मनुष्याच्या अंतःकरणवृत्तींशीं तेव्हांच समरस होईल अशा रीतीनें कवि कसें वर्णन करतात हें या उताऱ्यांत फारच सुरेख रीतीनें सांगितलें आहे.—

'Poetry begins wh re matter of fact or of Science ceases to be merely such......Inquiring of a gardener, for instance, what flower it is we see yonder, he answers 'a lily.' This is a matter of fact. The botanist pronounces it to be of the order of Hexandria monogynia. This is matter of science. It is the 'lady' of the garden says Spenser; and here we begin to have a poetical sense of its fairness and grace. It is 'the plant and flower of light,' says BenJonson and poetry than shows the beauty of the flower in all its mystery and splendour.'*

'बागेंतल्या एकाद्या पुष्पाविषयीं माळ्याला विचारलें तर तो 'मालती' अगर 'शेवंती' असें त्याचें कांहीं तरी नांव सांगेल. वनस्पतिशास्त्रज्ञास विचारलें तर तो Hexandria monogynia वगैरे वर्गांतलें तें आहे म्हणून सांगेल. परंतु ती 'उद्यानसुंदरी' आहे असें स्पेन्सर कवि वर्णन करील. 'ती प्रकाशाची पुष्पलता आहे,' असें त्याचें बेन् जान्सन कवि वर्णन करील. तेव्हां, या कवींच्या उक्तींमध्यें त्या पुष्पाचें खरें सौंदर्य, त्यांतील अपूर्वता व शोभा यांसह आपल्याला प्रतीत होतें.'—असा वरील उताऱ्याचा भावार्थ आहे.

वरील विवेचनावरून रस किंवा भावना (feeling) यांबरोबर अलंकार-द्वारा स्फुरणारा कवींचा कल्पनाविलास याचेही काव्यांत केवढें महत्वाचें स्थान आहे तें लक्षांत येईल. 'कांहीं सुंदर अलंकार मोरोपंतांनीं केले असले म्हणून काय झालें? तेवढ्यावरून कांहीं तो कवि होता असें ठरत नाहीं,' असा आक्षेप अलीकडे ऐकूं येऊं लागला आहे. तेव्हां काव्यांत अलंकाराचें महत्व केवढें आहे

* वरील उतारा Hudson नामक ग्रंथकाराच्या Introduction to the Study of Literature या पुस्तकांतून घेतला आहे.

हें दाखविण्याकरितां येथें येवढा विस्तार करावा लागला. आतां पंतांचें अलंकारां-च्या द्वारा प्रकट होणारें कल्पनावैभव केवढें आहे हें पाहूं. म्हणजे कवित्वाच्या या महत्वाच्या अंगाच्या दृष्टीनें पंतकवितेची योग्यता काय आहे हे नजरेस येईल.

कवीच्या प्रतिभेच्या सारख्याच महत्वाच्या दोन शाखा ज्या कल्पना व भावना त्यां-पैकीं पहिली कल्पना ही पंतांच्या काव्यांत सर्वत्र विलसतांना दिसून येते. पंतांचें कल्पनावैभव खरोखरी फारच मोठें होतें. वरवर पाहिलें असतां कोणासही असें वाटतें कीं, पुराणांतल्या गोष्टींची चऱ्हाटें वळीत बसणारे हे साधे पुराणिक; यांच्या काव्यांत बहारीच्या कल्पना, सहृदयाह्लादक अलंकार, चमत्कृतिजनक अर्थवैचित्र्य वगैरे गोष्टी कोठून सांपडणार? परंतु पंतांचें काव्य काळजीपूर्वक कोणी वाचूं लागल्यास या बाबतींत त्याची हटकून फसगत होईल. महाराष्ट्र वाङ्मयांत कल्पनावैभवाच्या बाबतींत पंतांची पायरी ज्ञानराजांच्या खालोखालच लागेल. संस्कृत वाङ्मयांत देखील व्यासवाल्मीकि सोडून दिल्यास इतर कवींमध्यें कालिदास व बाण हेच कायते या बाबतींत निर्विवादपणें पंतांच्या पेक्षां वरचढ ठरतील वामन दाजी ओक, राजारामशास्त्री भागवत, हंस, पांगारकर वगैरे अनेक रसिकांनीं पंतकवि-तेची अलंकाराच्या बाबतींतली ही समृद्धता कंठरवानें निवेदन केली आहे. हंसांनीं आपल्या निबंधांत एके ठिकाणीं म्हटले आहे: — 'कवितेचा आत्मा जो रस तो ज्या मायेच्या आश्रयानें राहतो ती चमत्कारिक कल्पनाही मोरोपंताच्या काव्यांत सर्वत्र भरलेली आहे. कोणत्याही विषयाचें वर्णन करतांना प्रत्येक गोष्टीचें स्वरूप दृष्टांतादि अलंकारांनीं उत्कर्षे करून दाखविण्याचा प्रत्येक पद्यांत मोरोपंतानें यत्न केलेला आढळतो. त्याच्या बहुतकरून सर्व आर्यांचीं उत्तरार्धें अलंकारमय किंवा चमत्कारिक कल्पनामय असतात. कितीएक ठिकाणीं त्याच्या कल्पना इतक्या उज्वल व उदात्त आढळतात कीं, त्या कामांत तो नामांकित संस्कृत कवींची स्पर्धा करीत आहे कीं काय असा भास होतो.' आणखी एका ठिकाणीं पंतकवितेच्या कल्पनासौष्ठवासच मुख्यत: अनुलक्षून हे रसिक म्हणतात:-'लहान लहान प्रकरणा-पासून तो मोठमोठाल्या पर्वांपर्यंत पहा, अनेक मनोरंजक कल्पनांनीं व निर्दोष शब्दार्थांनीं त्याचें पद्य मोठें हृद्य झालेलें आहे. त्यानें केलेलीं कित्येक वर्णनें इतकीं मनोहर, निर्दोष व रसभरित झालीं आहेत कीं, तीं वाचीत असतांना लवकर संपल्याचा खेद झाल्यावांचून रहात नाहीं. व एकदां वाचलेलीं वर्णनें पुन: पुन: वाचण्यांत आलीं तरी त्यांस कंटाळा न येतां उलट त्याविषयीं

प्रेमा अधिकाधिक वाढत जातो. एखाद्या सुंदर आणि चतुर कामिनीच्या लीलाविलोकनांत रसिक तरुण जसा तल्लीन व गर्क होऊन देहभान विसरून जातो, तसें मोरोपंताच्या कवितावलोकनापासून सहृदय जनांस झाल्यावांचून रहात नाहीं.'

११. पंतांच्या कल्पनाशालितेची इतकी स्तुति केल्यावर, पंतकवितेंतील उदाहरणें देऊन त्या स्तुतीची यथार्थता सिद्ध करणें हें ओघानेंच येतें, व तसें करणेंही वस्तुतः अवघड नाहीं. तेव्हां पंतांच्या आल्हादक कल्पनाविलासाचीं थोडीशीं उदाहरणें येथें दाखल करूं. मागें चवथ्या विभागांत भागवती काव्यांचें विस्तृत विवेचन करतांना जागोजाग अनेक सुंदर पद्यें उध्दृत केलीं आहेतच. तेव्हां पंतांच्या मनोहर कल्पनाविलासाचीं स्थळें पहावयाचीं असल्यास तीं चवथ्या विभागांतच वैपुल्यानें वाचकांच्या दृष्टीस पडतील. शक्य तोंवर मागें उध्दृत केलेल्या पद्यांची पुनरुक्ति न करितां, कल्पनेच्या अगर अलंकाराच्या दृष्टीनें रम्य अशा थोड्याशा स्थलांशीं येथें वाचकांचा परिचय करून देण्याचा आमचा हेतु आहे. संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनीं सांगितलेल्या प्रत्येक अलंकाराची उदाहरणें शोधून काढून दाखल करण्याचा खटाटोप येथें केलेला नाहीं व तसा करण्याची कांहीं अवश्यकताही नाहीं.

अलंकारांच्या समुदायामध्यें सादृश्यमूलक अलंकारांचा वर्ग सर्वांत मोठा व महत्त्वाचा होय. वस्तुजातांचें परस्परांमधील केवळ कविकल्पनेस गम्य असलेलें साम्य निदर्शित करून मनोहर अर्थाची निष्पत्ति करणें हा कवींचा अत्यंत हृद्य असा व्यापार होय. यामुळें साम्यनिदर्शक अलंकारांचें विवेचन म्हणजे प्राचीन काळापासून आमच्या अलंकारशास्त्राचा केवळ गाभाच होऊन बसलें आहे. उपमा, रूपक, दीपक, अतिशयोक्ति, उत्प्रेक्षा, व्यतिरेक, अपह्नुति, समासोक्ति, अप्रस्तुतप्रशंसा, निदर्शना, दृष्टान्त, इत्यादि मनोहर अलंकार हे साम्यदर्शनाचे किंवा साम्यसूचनाचेच निरनिराळे प्रकार होत. इतर अनेक महाकवींप्रमाणें पंतांचाही या साम्यदर्शनांत केवळ हातखंडा आहे.

१२. कोठें अफाट तर कोठें सुंदर व मोहक अशा, वाचकास सानंदचकित करून सोडणाऱ्या उपमा पंतकाव्यांत अनेक आढळतात; कृष्णशत्रु शाल्व यानें द्वारकानगरींत धुमाकूळ मांडल्याचें ऐकून त्या मायावी प्रभूनें क्षणभर चिंतामग्न झाल्याचें दाखविलें तेव्हांचें वर्णन--

चिंता दाखवि तातवत्सल निर्जी चिंतातमाचा रवी
मध्याहीं मिरवी अलीकतटिनी जैसी धरा मारवी ॥ कृ. वि. ६६.१७.

मारवाडांतील रखरखीत भूमि भर दोन प्रहरीं नदी वहात असल्याचा (मृग-जळाचा) खोटाच देखावा धारण करते त्याप्रमाणें कृष्णानें खोटीच काळजी करीत असल्याचा बाहाणा केला ! अगदीं अनपेक्षित परंतु समर्पक, सुंदर व अर्थोत्कर्षकारक अशी ही कल्पना आहे. शिवाय पहिल्या चरणांत 'चिंतातमाचा रवी' 'चिंता दाखवी' असें म्हटल्यानें विरोध अलंकार झाला आहे.

आधार त्रिजगन्मनोरथरुळा स्वामी ! अशा देंठसे । कृ. वि. ७०.१४.

या कल्पनेच्या अद्भुततेला तर तोडच नाहीं ! श्रीकृष्णानें नारदास उद्देशून हें म्हटलें आहे. सर्व त्रैलोक्याचे मनोरथ पुरविण्यास तुम्ही समर्थ आहांत; इतकेंच नव्हे तर केवळ तुमच्यामुळेंच ते मनोरथ सिद्धीस जातात. फळ हें सर्वस्वीं देंठावरच आधारलेलें असतें, त्यास पोषक रसही देंठांतूनच मिळतो हें लक्षांत घेतलें असतां या उपमेचें निरुपम सौंदर्य लक्षांत येणार आहे.

पर्वी अर्णव तेवी भगवान् बळभद्र पुष्कळ क्षोभे ।
संध्यारागसुरंजित शरदभ्राहूनि फार तो शोभे ॥ कृ. वि. ८६. ३३.

सुभद्राहरणप्रसंगीं अर्जुनाचें कपट पाहून खवळलेल्या बळरामदादांचें हें वर्णन आहे. याच्यासंबंधीं पांगारकर म्हणतात.—' मूळांत अर्णवक्षोभाची उपमा आहे खरी, पण उत्तरार्धांतील बहारीची उपमा पंतांना केवळ स्वप्रतिभेनें सुचली आहे. बळराम गौरवर्ण होते म्हणून त्यांना शरदभ्राची दिलेली उपमा फारच योग्य आहे. संध्याकाळच्या तांबूस छटांनीं रंजित झालेल्या शरदतूंतल्या मेघाप्रमाणें बलराम शोभले ! पंतांची निसर्गप्रीति या अत्यंत मनोहर अशा उपमेवरून स्पष्ट होते.' मो. च. पृ. २६६. बलरामदादांचें वर्णन पंतांनीं कृष्णविजयांत ठिकठिकाणीं फारच सुंदर केलें आहे. त्यांची शीघ्रकोपिता, अंतःकरणाचा कोवळेपणा, मद्यासक्तता इत्यादि गुणांचें योग्य मिश्रण करून त्यांचें स्वभाववर्णन पंतांनीं फारच मनोहर केलें आहे. बळराम क्रुद्ध होऊन यमुनेचें

वस्त्राचें करिती करें, करि हळें तैसेंचि आकर्षण । कृ वि ६५.३३.

वाळत घातलेलें वस्त्र हातानें ओढल्याबरोबर जसें आपल्यापाशीं गोळा होतें तशी, तितक्याच अल्पायासानें नांगरानें आकर्षिलेली यमुना रामाच्या पायाशीं गोळा झाली ! त्या पादनत यमुनेसह रामाचें वर्णन—

रामाच्या पदपुंडरीकयुगळीं सेवी रसा षट्पदी
किंवा भक्तसमर्पिता सुतुलसीमाळाचि, कीं तो रदी ।
लोळे तत्पदशृंखळाचि, अथवा ते देवहंसच्छदि-
च्छाया किंबहुना दिसे प्रभुपदीं रम्याचि कृष्णानदी ॥ कृ. वि. ६५.३७.

या श्लोकास अनुलक्षून काव्यसंग्रहकारांनीं हर्षनिर्भर मनानें पुढील उद्गार काढले आहेत. —' या श्लोकास मूळांत कांहींएक आधार नाहीं. पंतांची प्रतिभा जेव्हां भरांत असते तेव्हां ती अशाच समयोचित, अलंकारमय आणि हृदयंगम कल्पनांनीं भरलेल्या श्लोकांस प्रसवते. पंतांला भाषांतरकार म्हणून नादान ठरविण्याची खटपट करणारे पंडितंमन्य आक्षेपक हा श्लोक श्रीमद्भागवतांतील कोणत्या पद्यांचें भाषांतर आहे हें दाखविण्याची कृपा करतील तर किती चांगलें होणार आहे! पंतांच्या सरस्वतीचा हा प्रवाह सुरस आणि प्रसन्न नाहीं असें कोण म्हणेल? कालिंदी बळरामास शरण आली—एवढ्याच गोष्टीला अनुलक्षून...जे कल्पना-तरंग पंतांच्या सरस्वतीप्रवाहांत उठले आहेत, ते चित्ताकर्षक नाहींत असें कोण म्हणेल? या पद्यांत उत्प्रेक्षामूलक विकल्प अलंकार झाला आहे.' कृ. वि. उत्तरार्ध का. सं. प्रत पृ. ११६.

ऐसें ऐकुनि नारदादि म्हणती 'प्राज्ञा भला हो भला!
बापा, हा नयराजहंस तुझिया सन्मानसीं शोभला ।
साधो उद्धव! तूं यथार्थचि, जगीं विद्वत्सभा मंडिता
झाली या तव शुद्धवृत्तगुणवाङ्मुक्ताफळीं, पंडिता! ॥' कृ. वि. ७१. ७.

या श्लोकांत, उद्धवानें जो उत्कृष्ट नीति सांगितली त्याच्यावर राजहंसाचें रूपक करून मानसीं या श्लिष्ट पदानें त्याला पुष्ट केलें आहे. शेवटच्या ओळींत उद्धवाच्या वाणीवर मुक्ताफळांचें असेंच श्लेषानुप्राणित रूपक केलें आहे.

१३. सर्व साम्यदर्शक अलंकारांमध्यें रूपक हें पंतांच्या विशेष आवडीचें दिसतें. वर्ण्यविषयाच्या सर्व अंगांशीं उपमानाचें साम्य जुळवून सांगरूपक करण्याकडे त्यांचें विशेष लक्ष होतें असें दिसतें. याचीं पुष्कळतीं उदाहरणें मोठमोठे श्लोक व्यापणारीं लांबलचक असल्यामुळें येथें देण्यास अवकाश नाहीं. एकदोनच मासले देण्यासारखे आहेत.

(१) जाणों बाण वनस्पती, भुजहि त्या शाखाचि यज्वा हरी,
छेदी चक्रकुठारपाणे समिधा त्या युद्धयज्ञीं करी ॥ २३

पाळी बाणवनस्पतिप्रति सदा जो, शंभुमाळी म्हणे
त्या युद्धक्रतुदीक्षिता हरिस, 'हे धर्मज्ञचूडामणे ।
आंगें वाढविला दयामृतरसें सिंपोनिया तोकसा
शाखा सर्वहि तोडितां सकरुणा वाचेल तो हो कसा ?॥२४कृ.वि.६३.

येथें बाणासुरावर झाडाचें रूपक आहे. शंकर बाणाच्या बाजूनें लढत असून बाणाशीं युद्ध करणाऱ्या कृष्णापाशीं त्याची रदबदली करीत आहेत असा विषयसंदर्भ आहे.

(२) ' घेऊनि निरोप वनें आज्ञारूपेंहि शीघ्रगति हो पवनें ।
रथगगनीं वेघ न ते व्रजाटवी विरहदव गिळो घे घनते '॥
(वनें–जलें) कृ. वि. ४६. १३.

कृष्णानें उद्धवास निरोप देऊन व्रजाकडे पाठविलें त्या समयींचें हें भाषण आहे.

(३) वेणु मधुरतर वाजे वनिं; मोहे युवति पी तदमृतरवा जे ।
हृदयसरीं मदनकरी धृतिनलिनोद्धृतिस उशिर उन्मद न करी ॥
कृ. वि. २१. १०.

ही आर्यागीति फारच मनोहर आहे. हींत वेणुवादनानें झालेल्या गोपींच्या मदनविवश स्थितीचें वर्णन केलें आहे. उत्तरार्धात मदनावर उन्मत्त हत्तीचें रूपक करून उपमेयाच्या इतर अंगांवरही तें सुंदर रीतीनें बसविलें असल्यानें हें सांग परंपरित रूपक झालें आहे.

(४) स्वनाम कमळें मुनि भ्रमर ज्यांत, नाशी, तळें
तुझें यशचि, ताप, जें हरि रसें मना शीतळें ॥ कृ. वि. ६४. २१.

मुनि हेच भ्रमर ज्यांस चिकटले आहेत असें परमेशाचें नाम हींच कमळें; तुझें यश हेंच तळें, तें आपल्या शीतल रसानें मनाचें हरण करतें व ताप नष्ट करतें.— असा या सांगरूपकाचा अर्थ आहे.

(५) अक्षय अमृतकलश विभु, सकरुण मुनि वैद्य, कविमना वाटे ।
भवरोगियांसि वाटुनि जोडिति पुष्कळ यशोधना वाटे ॥
कृ. वि. ८७. ८.

ईश्वर हा अमृताचा कलश व परमभक्त जे शुकनारदादि मुनि ते हा अमृतकलश लोकांमध्यें (संसाररोगानें पीडलेल्यांमध्यें) वाटून यशोरूपी धनाचा मोबदला घेणारे जणूं वैद्य अशी येथें सुंदर कल्पना केली आहे.

या भक्तिरसानें ओथंबलेल्या ८७ व्या अध्यायांतीलच आणखी एक उतारा

घेऊं. मिथिला नगरींतील बहुलाश्व राजा व श्रुतदेव ब्राह्मण या दोघां परमभक्तांनीं बोलाविलें असतां श्रीकृष्ण तेथें गेले त्यासमयींचें मिथिलेचें वर्णन:—

(६) बहु दिवशीं पति येतां करि बहु मिथिला पतिव्रता साज ।
आज द्वारवती तज्ज्येष्ठसपत्नी मनीं धरी लाज ॥ १५ ॥
धाडी पुढें स्वजनसुत शृंगारुनि ती पतिव्रता मिथिला ।
[स्वतः] जावूं पाहे परि गति लज्जाभूषाभरोत्सवें शिथिला ॥ १६ ॥
मिथिलापुरवासिजनें निजनेत्रसरोरुहें उदश्रुजळें ।
प्रक्षाळिलीं प्रथम, मग भगवच्चरणीं समर्पिलीं उजळें ॥ १७ ॥
बहुलाश्व श्रुतदेव प्रेमें धांवोनि वंदिती पाय ।
काय उपायन दुसरें ? अर्पिति चरणीं स्ववाङ्मन:काय ॥ १८ ॥

सद्भावपूर्णतेनें, वर्णमाधुर्यानें, कल्पनासौष्ठवामुळें व अलंकाराच्या सौंदर्यामुळें या आर्या नितांत मनोहर वठल्या आहेत. मिथिला नगरीवर पतिव्रता स्त्रीचें रूपक केलें आहे; अर्थात् त्यामुळें द्वारकेवर ज्येष्ठ सपत्नीचें, मिथिलेच्या नागरिकांवर पुत्रांचें व नागरिकांच्या नेत्रांवर पूजाकमलांचें आरोपण केलें असल्यामुळें हें समस्तवस्तुविषय सांग रूपक झालें आहे.

(७) उडवी ती भयवात्या जिकडे त्या शंभुपुंडरीकास ।
तिकडे वृकभृंग फिरे; सद्भक्त खरा, बरी धरी कास ! ॥कृ.वि.८८.३५.

शंकरानें वर दिल्यावर खुद्द शंकरावरच त्याचा प्रयोग करून पाहण्यासाठीं वृकासुर पाठीस लागला त्या वेळचें हें वर्णन आहे. भयरूप वावटळीनें उडणारें शंकर हें कमळ व वृकासुर हा भ्रमर अशी कल्पना केली आहे.

१४. साधर्म्यमूलक अलंकारांमध्यें उत्प्रेक्षेची चारुता कांहीं अलौकिक असते. मेघांत जशी वीज चमकावी किंवा सुग्रास जेवणांत खमंग फोडणीचा वास यावा त्याप्रमाणें काव्यामध्यें कवीच्या मनोहर कल्पनेची लकेर सहज प्रकाशून गेली असतां तीं फार शोभादायक होते. रूपकादि अलंकार असले म्हणजे आरोप्यमाण, आरोपविषय, साधारण धर्म वगैरेंची जुळवाजुळव होऊन ते ठरीव पद्धतीनें प्रकट व्हावे लागतात. त्यामुळें काव्यौघाला संथपणा येऊन तेथें जरा मुक्काम झाल्यासारखा वाटतो. परंतु उत्प्रेक्षा म्हणजे सहज जातां जातां फेकलेला कल्पनेचा कटाक्ष होय. पंतांचें कल्पनाचापल्य अशा बाबतींतही पूर्णपणें प्रभावी असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. भागवती काव्यांतील चमत्कृतिजनक उत्प्रेक्षांचीं उदाहरणें मागें चवथ्या

विभागांत पुष्कळच येऊन गेलीं आहेत. उदाहरणार्थ, भी. भा. १८० (मागें पृ. ७७), अमृतमथन ३. १७ (पृ. ११७), मं. भा. १०. ५१४ (पृ. १५३), पृथुकोपाख्यान १४ (पृ. १६८) हीं अत्यंत बहारीच्या कल्पनांनीं युक्त असलेलीं पद्यें पहावीं. श्रीकृष्णानें कालिय सर्पाचा समाचार घेण्याकरितां यमुनेंत उडी घातली तेव्हां पाणी जोरानें उसळून त्याचा शब्द झाला, त्यावर पंत कल्पना लढवितात.--

(१) ' गोगोप पिपासू न व्यसु केले म्यां; न दोष मजपासून ' ।
प्रभुभुजदंडाहत तें जळ ऐसें विनवि काय शब्दें विततें ? ॥
कृ. वि. १६. ११.

कृष्णाचा निरोप घेऊन उद्धव गोपींकडे आला त्या वेळेस सूर्यास्ताचा समय झाला होता. सूर्याच्या अस्तास जाण्यावर पंत उत्प्रेक्षा करतात.--

(२) रवि बहुधा मावळला, लाजे कीं साधु नंदधामा वळला ।
आपण तापद, वारिप्रदसा तो सर्व-लोक-ताप दवारि ॥
कृ. वि. ४६.१५.

श्रीकृष्ण व बाणासुर यांचें युद्ध चालू असतां बाण पराभूत होऊं लागला. तेव्हां बाणाची आई कोटरा पुत्राला वांचविण्याकरितां धांवत येऊन दोघांच्या मध्यें उभी राहिली. वाटेंत तिचें वस्त्र गळून पडलें तरी तशीच नग्न स्थितींत ती कृष्णापुढें येऊन उभी राहिली.

(३) आली सोडुनि अर्ध स्नपनाविधि, गळे धांवतां वस्त्र वाटे
कीं वाराया प्रभूही विधि करि उघडें तें सतीशस्त्र वाटे ॥

ही कल्पना फारच चमत्कृतिजनक आहे. वस्त्र गळून पडण्यावर जणूं काय म्यानांतूनच ती तरवार बाहेर काढली अशी कल्पना केली आहे. दैवानेंच तें शस्त्र काढलें असें म्हणण्यांत त्याची अप्रतिहतता व्यक्त होत आहे.

महाभारतांत भीष्मार्जुनांचें युद्ध चाललें असतां पंत त्याचा सपाटा वर्णन करितात.

(४) भीष्मश्वेताश्वांचा निरुपम मज वाटला तडाखा तो ।
कीं ब्रह्मगोल वाटे विशिखाहीं दाटला तडा खातो ॥ भीष्म ५.४६.

ही कल्पना फारच भव्य व विस्मयकारक आहे.बाणांच्या मारानें ब्रह्मगोळाला तडा जाण्याची, तो फुटण्याची पाळी आली असा याचा अर्थ करावा किंवा बाणांच्या

असंख्य समूहांनीं आंतून कोंदून गेल्यामुळें ब्रह्मगोळाला तडा जाऊन तो उकलतो कीं काय असें वाटूं लागलें, असाही जास्त चांगला अर्थ करतां येईल. 'दाटला' या शब्दावरून हाच अर्थ प्रतीत होतो. कवठ, डाळिंब, सीताफळ या फळांच्या आंतून गीर दाटला म्हणजे त्यांना तडा जातो हें आपण पाहतोंच. रामरावणांच्या युद्धांत इंद्रजिताची शक्ति लागून लक्ष्मण मूर्च्छित पडला, त्यामुळें रामासही शोकानें मूर्च्छा आली. त्यावर पंत उत्प्रेक्षा करतात.—

(५) बंधुहृदालयवासी रामहि शक्तीस काय सांपडला।
लक्ष्मणहृदयच्छेदें नातरि मोहाननांत कां पडला ?॥

मं. रा. युद्ध. ६५१.

लक्ष्मणाच्या हृदयांतच जणूं रामाची वसति होती या सुंदर कल्पनेचा आश्रय करून पंतांनीं येथें तिचा शोकरसाचा उत्कर्ष करण्याकडे उपयोग करून घेतला आहे. परंतु याच कल्पनेचा आमच्या विलासी संस्कृत कवींनीं शृंगाराकडे उपयोग करून घेतला आहे, अशा श्लोकाची येथें आठवण होते.

सख्यैवं प्रतिबोधिता प्रतिवचस्तामाह भीतानना
नीचैः शंस ! हृदि स्थितो हि ननु मे प्राणेश्वरः श्रोष्यति ॥

'हे खुळे ! अगदीं मऊपणानें काय आपलें वागणें टेवलें आहेस ? नवऱ्यासमोर जरा धिटाईनें वागत जा, रागाचा अविर्भाव आणीत जा ! ' असा उपदेश करणाऱ्या सखीला ती मुग्धा स्त्री घाबरलेल्या मुद्रेनें म्हणते, 'सगळं खरं. पण बाई, तुला काय सांगायचें असेल तें हळू सांग; नाहींतर हृदयांत असलेल्या माझ्या प्राणेश्वराला तें ऐकूं जाईल ! '

मंत्ररामायणाच्या युद्धकांडामधील निजलेल्या कुंभकर्णाचें वर्णन.—

(६) विंध्य तसा निजला तो; वदनदरीमाजि निबिड आंधार।
फार भयंकर भासे पाताळाचेंचि काय तें दार ॥ मं. रा.युद्ध. ४३३.

पंतांच्या भव्य कल्पनाविलासाचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. पूर्वार्धांत उपमा व उत्तरार्धांत उत्प्रेक्षा आहे. कुंभकर्णाच्या वासलेल्या जबड्यावर पाताळाच्या द्वाराची केलेली कल्पना फार भव्य, अफाट व चमत्कृतिजनक आहे.

वाटे तुमचा उरविल कृष्णाचे जीव न स्थविर तात।
दिसले शरांत ते नग कल्पांबुधिजीवनस्थ विरतात ॥ भीष्म. ३. २८.

१५. येथील कल्पनाही अशीच भव्य आहे. प्रलयकालच्या समुद्राच्या पाण्यांत

तरंगणाऱ्या वृक्षांप्रमाणें (अगर डोंगरांप्रमाणें) श्रीकृष्ण व अर्जुन हे भीष्मांच्या बाणांच्या लोंढ्यांत विरून गेल्यासारखे दिसले ! भीष्म आटोपेना तेव्हां कृष्ण रथांतून उतरून भीष्मावर चालून गेला.--

जो मातृस्नेहाचा चित्तीं स्नेहें निजें विसर घाली ।
तो भीष्मावरि कोपे स्वमधुहराउपरि जेंवि सरघाली ॥ भीष्म.३. ३७.

मातृस्नेहाचाही विसर पाडणारें कृष्णाचें वात्सल्य वर्णन केल्यामुळें येथें व्यतिरेक झाला आहे. अशा वात्सल्ययुक्त कृष्णाचा कोप वर्णन केल्यामुळें विरोध अलंकार झाला आहे व शेवटीं मधमाशांच्या थव्याची मोठी समर्पक उपमा योजिली आहे.

यम जेंवि काळपाशें मार्कंडेयासि, नाग भोगानें ।
बांधी, बांधावें ज्या प्रभुवर्या प्रेमभक्तियोगानें ॥ सं. भा. १०. २७५.

कालिय सर्पानें कृष्णाच्या शरीरास विळखा घातला त्या प्रसंगाचें हें वर्णन आहे. मार्कंडेयाची उपमा देण्यांत पंतांनीं फारच चातुर्य दाखविलें आहे. मार्कंडेय चिरंजीव होते, अर्थात् कालपाशानें त्यांस बांधणें जसें केवळ व्यर्थ, तसें कालियसर्पाचें विळखा घालणेंही व्यर्थ होणार असें ध्वनित केलें आहे. शिवाय 'भोगानें' याच्यांत ' विषयोपभोगानें ' अशा अर्थाच्या श्लेषाची थोडी छटा असून ' प्रेमभक्तियोगानें ' याच्या अर्थाशीं विरोध सूचित होत असल्यानें या आर्येस फारच मनोहरता आली आहे.

शेवटीं एकच जरा मजेदार अशी उपमा दाखल करून पुरे करूं.

त्या मयसभेंत रचना पाहुनि राजा सुयोधन भ्रमला ।
प्रौढकविकृतींत जसा बाळ म्हणे जो ' कळे अदभ्र मला ' ॥ सभा. ३. १.

मला सर्व कांहीं समजतें अशी घमेंड बाळगून प्रौढ कवींच्या काव्यांत लुडबूड करणाऱ्या बाळ (अज्ञान) लोकांना पंतांनीं जातां जातां सहज टोमणा मारला आहे. खऱ्या भारदस्त कवींच्या कृतींचा आस्वाद घ्यावयास वाचकांनीं आपलें मन सुसंस्कृतच केलें पाहिजे, उगाच अजाणपणानें गडबड करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असेंही येथें ध्वन्यर्थानें सांगितलें आहे.

१९. साम्यदर्शक अलंकारांचे कांहीं मासले देण्यांतच येवढा विस्तार झाला. साम्यबोधक अलंकार हेच कवीच्या कल्पनावैभवाचे खरे निदर्शक होत व पंतांची कल्पना अशा अलंकारांच्या रूपानें किती नाना तऱ्हेचे आश्चर्यकारक खेळ करून दाखविते याचें वर किंचितसें दिग्दर्शन केलेंच आहे या साम्यबोधक अलंकारांमध्यें

रूपक हें त्यांतल्या त्यांत पंतांच्या विशेष आवडीचें दिसतें. विशेषतः पूर्ववयांत तर कशींवशीं ओढूनताणूनही रूपकें करून तीं सर्वांगांनीं जुळवीत बसण्याची त्यांना बरीच हौस वाटत असे असें कृष्णविजयांत पदोपदीं दिसून येणाऱ्या रूपकांच्या उदाहरणांवरून म्हणतां येतें. याशिवाय अप्रस्तुत अर्थाचें प्रत्यक्ष कथन करून त्यावरून प्रस्तुत अर्थाचा बोध करण्याची (म्ह० अप्रस्तुतप्रशंसा अलंकार साधण्याची) लकबही त्यांस चांगली साधली होती. सामान्यविशेषभावदर्शक अर्थांतरन्यास हा साधा अलंकार पुष्कळ ठिकाणीं आढळून येतो, यांत विशेष नवल नाहीं. विरोधमूलक विरोध व असंगति हे अलंकार पंतांचे आवडते होत. पर्यायोक्त (चेतनोक्त) हा अलंकारही पंतांच्या फार प्रीतींतला होय. (याविषयीं पुढें थोडेसें विवेचन केलें आहे.)

सादृश्यबोधक अलंकारांचीं जशीं कांहीं उदाहरणें दिलीं तशीं बाकीच्या उपर्युक्त अलंकारांचींही थोडींबहुत उदाहरणें देणें वस्तुतः अवश्य होय. खुद्द पंतकाव्यगहनांतच ज्यानें प्रवेश केला आहे. त्याच्या नजरेस हे पंतांच्या कल्पनाविलासाचे निरनिराळे प्रकार येऊन त्यास अप्रतिम आनंद होतो यांत शंका नाहीं. परंतु आम्हांपुढें

ते जरि पदार्थ इतरें वर्णावे ग्रंथ बहु न कां वाढे ? ।

अशी अडचण येऊन उभी राहते ! तेव्हां अलंकारासंबंधींच्याच पंतकाव्यांत दिसून येणाऱ्या कांहीं विशेषांची चर्चा करून व त्यानंतर पंतांच्या अलंकारयोजनेंतलि दोषांचें विवेचन करून हें अलंकारांचें प्रकरण संपवून टाकूं.

१७.(१) भौतिक सृष्टींतल्या व्यापारांना आध्यात्मिक अथवा तात्विक दृष्टान्त देऊन पुष्कळ वेळां कवि चमत्कृति उत्पन्न करतात. एरवीं सामान्यतः कवींची पद्धत म्हणजे मानवी व्यापारांना अगर वस्तूंना भौतिक सृष्टींतलीं उपमानें देण्याची असते. उदाहरणार्थ, 'स्त्रीचें मुख कमलासारखें आहे' अगर 'साधूचें हृदय लोण्याप्रमाणें मृदु असतें' असें म्हणण्याची कवींची पद्धत आहे; 'कमळ ललनामुखाप्रमाणें आहे' किंवा 'नवनीत साधुहृदयमृदु असतें' असें कोणी फार करून नाहीं व जी गोष्ट कोणी करीत नाहीं ती एकाद्यानें केली म्हणजे तिला विशेष महत्व येतें या सामान्य नियमाप्रमाणें असे उलटापालट केलेले दृष्टान्त (अर्थात् ते उचित व समर्पक असतील तर) नेहमींच्या दृष्टान्तापेक्षां अधिक चमत्कृतिजनक होतात. काव्य वाचीत असतांना असलीं उदाहरणें ठळक रीतीनें नजरेंत

भरतात व त्यांपासून विशिष्ट आनंद होतो. मूळ भागवतांतच असल्या प्रकारचीं मनोवेधक उदाहरणें एके ठिकाणीं आहेत. दशमस्कंधाच्या विसाव्या अध्यायांत प्रावृट्कालाचें व शरत्कालाचें अत्यंत सुंदर वर्णन आहे तें सर्व वर सांगितलेल्या प्रकारच्या उपमांनींच भरलेलें आहे. निसर्गव्यापारांना किंवा सृष्टिशोभेला मानवी व्यापारांचे खुबीदार दृष्टान्त दिलेले आहेत. व ते सर्व वैराग्यभक्तिपर असल्यानें वर्णनास उदात्तता व पवित्रता आली आहे. खालील श्लोकांवरून वाचकांस या प्रकाराची कल्पना येईल.—

(प्रावृट्) गिरयो वर्षधाराभिर्हन्यमाना न विव्यथुः ।
अभिभूयमाना व्यसनैर्यथाधोक्षजचेतसः ॥ १५ ॥
(शरत्) शरदा नीरजोत्पत्त्या नीराणि प्रकृतिं ययुः ।
भ्रष्टानामिव चेतांसि पुनर्योगनिषेवया ॥ ३३ ॥
सर्वस्वं जलदा हित्वा विरेजुः शुभ्रवर्चसः ।
यथा त्यक्तैषणाः शान्ता मुनयो मुक्तकिल्बिषाः ॥ ३५ ॥
भा. १०. २०.

पंतांनीं आपल्या काव्यांत केवळ निसर्गाचें वर्णन असें कोठेंच केलेलें नाहीं. काव्यांतील कथानकाचें वर्णन करतांना मात्र त्यांनीं अशा तात्विक व आध्यात्मिक दृष्टांतांची कोठें कोठें योजना केलेली दिसून येते. भागवती काव्यांतील अशीं कांहीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

(१) येतील स्वसुतार्थ धांवुनि तरी वृष्णि स्वयें सर्वही
वार्ता ऐकुनियां, करीं धरुनियां शस्त्रें मनीं गर्वही ।
प्राणायामनिरुद्ध इंद्रियगण क्षीणत्व पावे तसें
त्यां होईल, न साधिली अविनतें स्रोतःक्रिया वेतसें ॥ कृ.वि ६८.५.

प्रद्युम्नपुत्र सांबास पकडून ठेवणारे दुर्योधनादि कौरव यांची ही उद्दाम उक्ति आहे. सांबास पकडल्यामुळें श्वासाचा निरोध केल्यानें इंद्रियांची विकल स्थिति होते तशी वृष्णींची होईल अशी उपमा आहे. शिवाय चौथ्या चरणांत आणखी एक उपमा असून दुसऱ्या चरणांत तुल्ययोगिता अलंकार आहे.

(२) तो कामें अवलोकिला निजबळीं जैसा मृगीं लांडगा
किंवा भाग्यमदें करी बडबड ज्ञानिव्रजीं दांडगा । कृ. वि. ७७. २.

शाल्व सेनापतीला स्वसैन्यांत शिरलेला प्रद्युम्नानें पाहिलें त्या समयींचें हें वर्णन आहे. सुदामाच्या प्रासादानें वर्णन.—(मणिललना- रत्नखचित पुतळ्या)

(३) मणिललनाकरपद्मीं मणिदीप तसे विराजती गेहीं ।
जनबुद्धिवृत्तिमध्यें शुचिचित्प्रतिबिंबकें जसीं देहीं ॥ कृ वि. ८१.९३
(४) दुग्धाब्धिफेनपांडुरशय्यामंडित करींद्रदंतांचे ।
पर्यंकशत विराजति, जैसे मृदु शुद्ध भाव संतांचे ॥ कृ. वि ८१ ९७.

पहिल्या आर्येत रत्नदीपाचें व दुसऱ्या आर्येत हस्तिदंती पलंगांचें वर्णन आहे.

(५) गर्भ, दुराग्रह अकुलज जनतेचे, तेंवि वाढती दितिचे ।मं.भा.३.८१.
(६) नेवूं पाहे अनलस तीस, अविद्येसि जेंवि सुकवि लया ॥
मं. भा. ४.११५.
(७) मोह तसा वृत्राचा कुक्षि, दृढ ज्ञान तेंवि वज्र, नृपा ! ।
झाला युक्त शतक्रतु जीव, गुरु दधीचिमूर्ति, विष्णु कृपा ॥
मं. भा. ६. १२३.

इंद्रवृत्रांच्या युद्धावर ब्रह्मज्ञानप्राप्तीचें हें रूपक केलें आहे. इंद्र हाच कोणी जीव, दधीचि हा गुरु, ज्ञान होण्यास कृपा पाहिजे तेव्हां विष्णु हीच कोणी कृपा, वज्र हें ज्ञान व वृत्रकुक्षि हें अज्ञान,-याप्रमाणें रूपकाची मांडणी आहे.

(८) वरुणाच्या उद्यानीं होतें शुभ साधुहृदयसें सुसर ॥ मं.भा. ८.५.

पंतांचे सर्व ग्रंथ धुंडाळले तर अशीं उदाहरणें पुष्कळच सांपडतील हें उघड आहे.

१८. (२) पण याहीपेक्षां चमत्कृतिजनक अशी लकब पंतांच्या काव्यांत ठिकठिकाणीं दिसून येते. ती म्हणजे गंभीर अगर महत्त्वाच्या गोष्टीस क्षुल्लक दृष्टांत देण्याची होय. एकाद्या गंभीर विषयाचें वर्णन चालू असतां त्याला मुळींच न शोभणाऱ्या अशा हलक्या गोष्टीचा दाखला दिला म्हणजे चमत्कृति उत्पन्न होऊन वाचकास मोठी मौज वाटते. असंबद्धता (Incongruity) हें विनोदाचें मूळ होय. ज्या गोष्टींच्या महत्त्वामध्यें जमीनअस्मानाचें अंतर अशा गोष्टी एकत्र आणल्यानें केवळ त्यांच्या विसदृशतेमुळेंच मनुष्याच्या मनाला आनंद होतो व एकप्रकारची करमणूक होते. परवां कानपुरास इतर सर्व परिषदांबरोबरच अखिलभारतीय नापितपरिषद् भरणार असल्याचें प्रसिद्ध झालें होतें तें वाचून ज्यास गालांतल्यागालांत देखील हसूं आलें नसेल असा वाचक क्वचितच असेल. नापित समाजानें एकत्र जमून आपल्या हिताहिताच्या गोष्टींची चर्चा करणें यांत कांहीं हास्यास्पद आहे असें म्हणणें नाहीं. विनोदाची

उत्पत्ति कशी होते हें दर्शविण्यासाठीं हें एक साधें उदाहरण घेतलें आहे. परिषदा अगर सभा करावयाच्या त्या गंभीर, महत्त्वाच्या व बड्या बड्या विद्वानांनाच पेलतील अशा विषयांच्या ऊहापोहासाठीं करावयाच्या ही सर्वांच्या मनांत दृढबद्ध झालेली गोष्ट व न्हाव्याचें काम म्हणजे रोजच्या व्यवहारांतलें, ज्याच्यासाठीं क्षणभरही विचार करण्याची जरूरी नाहीं असें क्षुल्लक काम, अशी सर्व लोकांच्या मनांत खिळलेली भावना; यामुळें 'न्हाव्याचें काम' व 'परिषद' या दोन अत्यंत विसदृश गोष्टी एकत्र आणल्याबरोबर त्यापासून विनोदाची निष्पत्ति झाली. कोल्हटकरांच्या 'चोरांचें संमेलन' या लेखापासून विनोद उत्पन्न होतो तोही अशाच तऱ्हेचा होय. अशा तऱ्हेनें क्षुल्लक व पोरकट गोष्टी गंभीर विषयाच्या शेजारीं आणून विनोद निष्पन्न करण्याची लकब पंतांस फार चांगली साधली आहे. या क्षुल्लक गोष्टी ते नेहमीं दृष्टांतादाखल आणतात त्यामुळें तर अधिकच चमत्कृति उत्पन्न होते. उदाहरणार्थ—

म्यां कीर्तना टपावें मार्जारें जेंवि सर्वदा दुग्धा ।

कांहीं ठिकाणीं चमत्कृति उत्पन्न होते ती दृष्टांताच्या अत्यंत क्षुल्लकतेमुळेंच होते असें नाहीं. कोठें कोठें वर्ण्यविषय व दृष्टांताचा विषय यांच्या अत्यंत विषयभिन्नतेमुळें चमत्कार अनुभवास येतो. वर्ण्यविषय वैराग्याचा, परमेश्वरभक्तीचा असा असून दृष्टान्त चोरी, चहाडी, शिंदळकी असल्या दुर्गुणांचा असला म्हणजे ही आत्यंतिक विषयभिन्नताच चमत्कार उत्पन्न करते. उदाहरणार्थ —

हरिकीर्तनीं शिरावें, धनिकगृहीं जेंवि जपुनि चोरानें ।
न उठावें बहुकार्यें, बहुमारें जेंवि कुचर ढोरानें ॥
उलटा आंत, स्पष्ट व्यवहार दहांत दाखवी सुलटा ।
मन्मति हो तैसी परपुरुषासक्ता सदा जशी कुलटा ॥

कोठें कोठें दृष्टान्तानें उद्भूत केलेले मनोविकार अगर मनापुढें उभें केलेलें चित्र मोठें रमणीय असल्यामुळेंच वाचकाच्या मनाला आल्हाद होतो. उदाहरणार्थ—

(१) मतिची पडो हरिगुणीं, पतिकंठीं मिठि जशी सुदारांची ।
(२) सत्संगींच शिरावें, बाळ जनन्यंचळीं जसें शिरतें ।
(३) वरि संकोच असावा, आंत बहुत कृष्णकीर्तनीं काम ।
गुरुजनसमक्ष पतिचें घेतां आर्याग्रहें जसें नाम ॥

पहिल्या उदाहरणांत दृष्टांतामुळें शृंगाराचा किंचितसा उद्भव होत असल्यामुळें

तें आल्हादास कारण होतें; दुसऱ्या व तिसऱ्या उदाहरणांत, संसारांत सर्वांच्या अनुभवास येणारीं दोन रमणीय प्रसंगांचीं चित्रें उचित शब्दांनीं वाचकांच्या डोळ्यांपुढें उभीं केल्यामुळें त्यापासून चित्तास आल्हाद होतो.

वरील सर्व उदाहरणें 'सन्मनोरथराजि' नांवाच्या पंतांच्या अत्यंत हृद्य काव्यांतून घेतलीं आहेत. प्रस्तुत काव्यांत पंतांनीं आपल्या सर्व क्षुल्लक, व्यावहारिक व संसारांत येणाऱ्या रम्य अनुभवांच्या दृष्टांतांचें भांडारच उघडलें आहे. पंतांच्या या अप्रतिम कौशल्याचा, निरुपम सहृदयतेचा व अलौकिक मार्मिकतेचा ज्यांस पूर्ण अनुभव घ्यावयाचा असेल त्यानें सन्मोरथराजि व त्याबरोबरच संशयरत्नमाला, नामरसायन वगैरे एक दोन काव्यें हीं समग्रच वाचलीं पाहिजेत. तथापि असले मार्मिक दृष्टांत देण्याची त्यांची प्रवृत्ति इतरत्रहीं कोठें कोठें आढळते. असलीं उदाहरणें जेवढीं लक्षांत आलीं त्यांपैकीं कांहींचा खालीं संग्रह केला आहे.*

मोदक लाडू द्या वा बाळा मज दे स्वतत्वबोधा त्या । मं. भा. ३. २४

मोहरि इतुकेंहि जसें रज दुःसह होय लोचना पृथुला ।
श्रितदुःख तसें ज्याच्या हृदया सोसेल गुरु कसें पृथुला ॥ मं. भा. ४.११२.

वाक्या या दस्रांच्या होय, जसा क्षुधित पायसा, मान्य । मं. भा. ६.९८.

झाला अति दुःखप्रद लोकत्रयलोचनांत तो केश । मं. भा. ७. २२.

वर मिळाल्यामुळें उन्मत्त झालेल्या हिरण्यकशिपूचें हें वर्णन आहे.

भय देउनि त्रिवर्गप्रतिपादक शास्त्र पढवितीं विप्र ।
प्रह्लाद सिके, सारीं नियमीं कटु वाढिलें जसें क्षिप्र ॥ मं. भा. ७. ४७.

देवासि जलाशयतटानिष्ठ बकाकार असुर, सुग्रास ।
क्षुधित ब्राह्मणसा गिळि; भीति न शिशु सुर हि वळ हि उग्रास ॥
मं. भा. १०. १९६.

चंचुपुटें धरुनि चिरी जेंवि लव्हाळ्यास देवराणा या । मं. भा. १०.१९९.

मोट पिपीलिकपुंजीं प्रलयघनघटा तसी व्रजीं ओते । मं. भा. १०. ३५४.

---

*यांशिवाय अशा क्षुल्लक दृष्टांतांचीं उदाहरणें चवथ्या विभागांतील विवेचनांतहीं प्रसंगोपात्त कित्येक येऊन गेलीं आहेत. पहा—**मं. भा**—४.४७ (पृ. ९४); ४.८५ (पृ. ९६); ८.१०६ (पृ. ११९); ९.३१ (पृ. १२७); ११-१७८,२१०, २११ (पृ. १८०).

ठावें पुण्य उदंड, अल्प अघ हें, तार्टी जसा पापड । कृ. वि. ६४. १९.
कीरापरि पढवोलें, बाळा जसि माय पाजिती क्षीरा ।
धीरा ! गुरुपदनौकाश्रित तो पावे भवाब्धिपरतीरा ॥ कृ. वि. ८०. ५३.
दिधलें बहुहि अभक्तीं, तन्हि तें माझ्या न होय परितोषा ।
दोषाभिज्ञा न रुचे अत्यनुकूलाहि जारिणी योषा ॥ कृ. वि. ८१. ४.
तेव्हां तत्वहि कथिलें परि नेणें धारणास मीं मुग्ध ।
बाळा न दिलेंचि, दिले त्याच्या अंजुळिपुटांत जें दुग्ध ॥ कृ. वि. ८९.५.

मायापटल दूर होऊन तत्त्वज्ञान व्हावें म्हणून श्रीकृष्णाची प्रार्थना करणाऱ्या वसुदेवाचे हे उद्गार आहेत. आर्या मोठी मनोहर असून दृष्टांत समर्पक व वसुदेवासारख्या वृद्ध पुत्रवत्सल गृहस्थास शोभणारा आहे.

तीहो, जैसी दासी स्वामिपथांतील केरसा, पूर ।
दूर क्षिप्र करी बा ! काजे या त्वद्यशासि कापूर ॥ कृ. वि. ८५. १०.

दासीनें केर काढून मार्ग साफ करावा त्याप्रमाणें यमुनेनें पूर नाहींसा केला ही कल्पनाही मोठी मनोहर आहे.

तेव्हां धांवुनि बैसे पार्थ सुभद्रारथीं, जसा पार्टी ।
सुचिरक्षुधित ब्राह्मण हां हां म्हणतांहि वाडिल्या तार्टी ॥ कृ. वि. ८६.२२.

ही सुभद्राहरणप्रसंगींची विनोदपूर्ण आर्या सुप्रसिद्धच आहे.

अन्नप्रदसदनातें दूरुनि धावोनि येति दुष्काळीं ।
तैसे चतुर्विधहि जन मज्जति अमृतहदीं जगत्पाळीं ॥ कृ. वि. ८७. १०.
बहु लाडका भजकशिशु पाठी लागोनि ओवळा शिवतो ।
स्पर्शभरें काय पळे ब्रह्मांडगृहांत सोवळा शिव तो ? ॥ कृ. वि. ८८. ३४.

अशा प्रकारचे कांहीं विनोदपर, कांहीं जगाच्या व्यवहारांतले, कांहीं कौटुंबिक संसारांतले, असे अनेक दृष्टांत योजून पंतांनीं आपल्या काव्यास शोभा आणली आहे. परंतु कांहीं ठिकाणीं मात्र असे दृष्टांत योजतांना मोठाच औचित्यभंग होऊन विरस झाल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. जेथें कोणत्याही गंभीर रसाचा अगर भावनेचा विशेष उत्कर्ष करावयाचा नसून सामान्य वर्णन असेल तेथें असले मनोरंजक व क्षुल्लक दृष्टांत शोभा देतात. परंतु जेथें गंभीर व उदात्त भावनेचा परिपोष करावयास पाहिजे अशा ठिकाणीं क्षुल्लक अगर पोरकट दृष्टांत अत्यंत वैरस्यावह होतात.

देववधूप्रतिमाशा वेष्टिति त्याला, जशा मधूप्रति माशा । कृ. वि. ४७. २.
ही गोपींना दिलेली माशांची वैरस्यावह उपमा, त्याचप्रमाणें

मोहें रडतचि गेला तो उद्धव बाळ जेंवि शाळेला । मं. भा. ११. ५८५.

कन्येसि तसें रोदन अलें तें पसरवीच आ ज्ञात्या । मं. भा. ११. ५८३.

या उदात्त प्रसंगाचा अगदीं विरस करणाऱ्या उपमा, यांचा मागें चवथ्या विभागांत उल्लेख करून त्या विषयीं विवेचन केलें आहेच. (पहा. पृ. १८३. शिवाय विभाग ७ मधील ' औचित्यहानी 'चें विवेचन पहा.)

१९. (३) पंतांच्या काव्यांतला आणखी एक ठळक रीतीनें नजरेस भरणारा प्रकार म्हणजे पर्यायोक्त अलंकारानें वर्णन सजविण्याची तऱ्हा होय. कोणताही अर्थ सरळ रीतीनें वर्णन न करितां कांहीं तरी कोटि करून पर्यायानें तो अर्थ व्यक्त केला म्हणजे पर्यायोक्त अलंकार होतो. पंतांनीं आपल्या काव्यांत असंख्य ठिकाणीं असला कोटिबाजपणा करून क्षणिक चमत्कृति उत्पन्न केली आहे. दोन चार सुंदर उदाहरणें या ठिकाणीं देणें बस होईल.

'त्वां सूर्यवंश सुयशें सति ! धन्य केला । वैदेह धन्य तुज पावुनि कन्यकेला'।
प्रेमें असा मज दिला बहुमान, लज्जा । सांगे मदीय नयनांसि 'पदींच मज्जा' ॥

रावणवध केल्यानंतर सीता अग्निदिव्य करून शुद्ध झाली व तिचा रामचंद्रानें स्वीकार केला. त्यावेळेस दशरथमामाजींनीं स्वर्गांतून खालीं येऊन सीतेचें गौरव करून तिला जो आशीर्वाद दिला त्याचें सीतेनेंच केलेलें हें मनोहर वर्णन आहे. ' लाजेनें सीतेची दृष्टि खालीं झाली ' या अर्थावर शेवटच्या चरणांत सुंदर पर्यायोक्त रचलें आहे.

नेत्रभुजोरुस्मरणें चिंतेची सोडिली मनें बाज ।
माज प्राणानींही, गेल्या धैर्येंहि यावया लाज ॥ कृ. वि. ८३. ४१.

नेत्र व बाहु यांच्या शुभसूचक स्फुरणामुळें, मन चिंतेच्या बाजेवर रुग्ण होऊन पडलें होतें तें उठलें, प्राणांनीं बाहेर जाण्यासाठीं कंबर बांधली होती ती सोडली व धैर्य लाज सोडून परत यावयास लागलें असा आर्येचा अर्थ आहे. ' मनाची चिंता नाहींशी झाली, मरण टळलें व धैर्य गेलेलें पुनः आलें ' येवढा साधा अर्थ व्यक्त करण्यासाठीं किती चातुर्याच्या कोटया केल्या आहेत !

नयनयुग दानपातिचें व्याया करुणामृतार्णवांत बुडी ।
आधीं टाकी, मग भवदवहतवपु त्या रथावरुनि उडी ॥ मं. भा. १७.४८५.

दानपति म्हणजे अक्रूर. 'प्रथम अक्रूराचे नेत्र उडी टाकते झाले व नंतर त्याच्या शरीरानें रथाखालीं उडी टाकली' असें येथें वर्णन आहे. दयामय ईश्वराच्या मूर्तीकडे अक्रूराची दृष्टि गेली या साध्या गोष्टीचें अक्रूराचे नेत्र करुणामृतार्णवांत बुडी मारण्याकरितां उडी टाकिते झाले असें वर्णन करून पंतांनीं फारच सुंदर पर्यायोक्त साधलें आहे. शिवाय 'उडी टाकी' एकाच क्रियेमुळें तुल्ययोगिताही झाली आहे.

कोप मुनींस म्हणे, 'या गुरुकार्यार्थींच शुद्ध तप सारा'। मं. भा. ११.१२९. "गुरुकार्यार्थ, म्हणजे कृष्णानें इच्छिलेल्या कार्याकरितां, आपलें तप खर्च करा" असें कोप मुनींस म्हणाला. क्रोधामुळें शाप देऊन मुनींनीं कृष्णाचें कार्य साधिलें असा भावार्थ. खालील आर्येचें उदाहरण ही असेंच सुंदर उदाहरण आहे.

वाट मम ध्यानाची, हळुहळु अनळस, मनास जो लावी ।
विषयविरक्ति त्याच्या त्या रवांताला सुखेंचि बोलावी ॥ मं.भा.११. ३१५.

२०.(४)पंतांच्या अलंकारांविषयीं दुसरी लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे यमकरचनेशीं त्यांचें दिसून येणारें साहचर्य ही होय. आर्येच्या पूर्वार्धांत कथानकाचें वर्णन केल्यावर उत्तरार्धामध्यें एकादा समर्पक दृष्टान्त, एकादी उपमा अगर दुसरा कांहीं चमत्कृतिजनक अलंकार गोवलेला आढळावयाचा ही गोष्ट पंतवाचकांच्या परिचयाची आहेच. ही उत्तरार्धांत प्रकट होणारी कल्पनाचमत्कृति पुष्कळ वेळां यमकांच्याकरितां आलेली स्पष्ट दिसते. म्हणजे यमक साधण्यासाठीं वर्ण्यविषयाला जुळेल अशी कल्पना शोधून काढून ती आर्यार्धांत बसविण्यांत येते. पंतांच्या या प्रवृत्तीचीही कुचेष्टा केलेली कोठें आढळण्यांत येते. परंतु यमक रचण्याचा मूळ हेतु मनांत धरून त्याच्यासाठीं एकादी कल्पना ग्रथित केली तर त्यांत दोषास्पद असें वस्तुतः कांहींच नाहीं. पंतांच्या कल्पनांचें भांडार फार मोठें असल्यामुळें ते म्हणतील त्या यमकाला जुळणाऱ्या अत्यंत समर्पक व वर्ण्यविषयाला शोभविणाऱ्या वाटेल तितक्या कल्पना त्यांच्यापुढें येऊन उभ्या राहात असत. उलटपक्षीं त्यांचा यमकांचा खजिना असाच अपरंपार असल्यामुळें व भाषाप्रभुत्वही दांडगें असल्यामुळें एकादी उत्कृष्ट कल्पना त्यांना प्रथम सुचली तर ती यमकबंधांत सुंदर रीतीतें ग्रथित करणेंही त्यांना मुळींच अवघड जात नसे. तात्पर्य, यमकांच्या साहचर्याचा पंतांच्या कल्पनाविलासावर कांहीं अपायकारक परिणाम झालेला नसून त्यांच्या प्रतिभेच्या स्वच्छंदपणास त्यामुळें मुळींच अटकाव

झालेला दिसत नाहीं. ध्रुवचरित्रांतली खालील साकी पहा.—

कथितां वृत्त सविस्तर त्याच्या होय भर विलापाला ।
पुत्रविरहविषतरुचा विधिनें विपुल भरविला पाला ॥ ध्रु. च. ३७.

येथें उत्तरार्धांतील ' भरविला पाला ' हे शब्द ' भर विलापाला. ' याच्याशीं जुळण्याकरितां उघड आलेले दिसतात. अर्थात् पाल्याचा दृष्टान्त यमकाकरितांच आणलेला आहे हें उघड आहे. असें असूनही त्याच्या ताजेपणांत व सौंदर्यांत कांहीं कमीपणा आलेला दिसत नाहीं.

दे प्रभुसि, कवींच्या सुख व्हाया बहु मानसां, बळी काय ।
सांगा देवावांचुनि पावे बहुमान सांबळी काय ? ॥ वा. च. १९१ ॥

येथें नऊ अक्षरांचें यमक साधलें आहे. संबळीचा दृष्टांत अर्थात यमकाकरितांच आला आहे. परंतु तो फार समर्पक व सुंदर असून रसोत्कर्षास कारण झाला आहे.

तथापि कित्येक ठिकाणीं यमकाकरितां आणिलेल्या कल्पना नीरस, कटु व अप्रयोजक असतात हें नमूद करणें अवश्य आहे.अशी स्थळें एकंदरीनें थोडीं आढळतात खरीं तथापि तीं आहेत यांत कांहीं शंका नाहीं.पंतांच्या महाभारतांत व महाभारतकालीन रचनेंत यमकांचा हव्यास विशेष दिसून येतो. अर्थात् अशीं दुष्ट उदाहरणें महाभारतकालीन रचनेंतच जास्त आढळतात. मंत्रभागवतकालीन अगर त्यानंतरच्या रचनेंत अशीं उदाहरणें बहुधा सांपडत नाहींत. अमृतमथन व वामनचरित हीं काव्यें महाभारतकालीन होत, असें आम्हीं मागें प्रतिपादन केलेंच आहे. त्यांत अशीं कित्येक उदाहरणें सांपडतात. मासल्याकरितां एकच आर्या खालीं दिली आहे.

हरि हो ! अरि हो ! यासि क्षिति देतों, म्हणु नकोचि ' हाय ' मुने ।
मत्कीर्तिनें धवळतां विश्व, म्हणो अर्क मात्र ' हा यमुने ! ' ॥ वा. च. १०५.

या आर्येचें उत्तरार्ध केवळ यमकाकरितां दूरान्वित व विरस करणारी कल्पना खेंचून आणून लिहिलें आहे. कांहीं झालें तरी मी वामनास त्रिपाद भूमि देणारच असें म्हणत असलेल्या बळीची ही उक्ति आहे. अगोदर द्वितीयार्धांतील गर्विष्ठ उद्गार बळीच्या तोंडीं कसेसेच वाटतात. केवळ आपली कीर्ति विश्वांत व्हावी या हेतूनेंच बळी कांहीं त्रिपाद भूमि दान देत नव्हता. पण तें एक असो. बळीची कीर्ति सूर्यापेक्षांही अधिक देदीप्यमान अशी विश्वावर प्रकाशल्यामुळें सूर्य हताश होईल एवढेंही वर्णन सुसंगतच आहे असें क्षणभर मानूं. पण त्यानें यमुनेचेंच नांव घेऊन

' हा, यमुने ' असे उद्गार काढण्याला केवळ पंतांच्या यमकाच्या जरूरीखेरीज दुसरें कांहीं कारण दिसत नाहीं ! उलट बळीच्या शुभ्र यशानें सर्व जगाबरोबर यमुना काळ्याची गोरी झाली तर तिला तो प्रसंग आनंददायकच होईल !

असो. यमकांच्या हव्यासामुळें पंतांच्या भाषासरणींत व एकंदरीनें काव्यरचनेंत जीं व्यंगें उत्पन्न झालेलीं आहेत त्यांचा विचार पूर्वी केलाच आहे. येथें फक्त यमकांचा त्यांच्या कल्पनाविलासाशीं कसा व कितपत संबंध आलेला दृष्टीस पडतो येवढ्याचाच विचार कर्तव्य असल्यानें तेवढ्यापुरता उल्लेख केला आहे.

२१. पंतांच्या कल्पनाविलासाचें व त्यांच्या काव्यांतील अलंकारांचें बहुतांशीं स्वरूपदर्शन मात्र आतांपर्यंत केलें.आतां या अलंकारांच्या सजावटींत दिसून येणारे, ज्यांच्यामुळें काव्याची आल्हादकता कांहीं अंशीं कमी होते, असे दोष दाखवून हें अलंकारांचें विवेचन आटपतें घेऊं.

(१) नेहमीं येणाऱ्या कंटाळवाण्या उपमा. पंतांच्या काव्यांत कांहीं ठराविक दृष्टान्त व उपमा इतक्या वारंवार येत असतात कीं त्यांचा पुढें अगदीं वीट येऊन जातो. सिंह व हत्ती; सूर्य व कमळें; मेघ व मोर; मेघ व चातक; चंद्र व चकोर; माता व स्तनास लाविलेलें बालक; गाय व वत्स वगैरे जोड्यांचे दृष्टान्त इतके पुनः पुनः येतात कीं,कांहीं सांगतां सोय नाहीं. पराक्रमी पुरुषाचें व लढाईचें वर्णन असलें कीं, तेथें सिंह व हत्ती यांची उपमा ठेवलेलीच म्हणून समजावें. जखमी झालेल्या लढाऊ पुरुषाचें वर्णन आलें कीं, फुललेल्या पळसाच्या झाडाची उपमा आलीच. कोणाच्याही भक्तीचें अगर उत्कंठित मनःस्थितीचें वर्णन आलें कीं, मेघ व मयूर किंवा मेघ व चातक या ठरीव जोड्यांचा दृष्टान्त यावयाचाच. पंतांनीं आपल्या ' मयूर ' या नांवाचा उपयोग करून व परमेश्वरास मेघाची उपमा देऊन पुष्कळ ठिकाणीं

रामघन सत्प्रसादामृत जों जों बहु वळूनि वर्षतसे ।
तों तों भक्त मयूर स्वार्या केका करूनि हर्षतसे ॥ विराट. ७. ३७.
दयामृतघना अहो हरि ! वळा मयूराकडे । केका.

अशा तऱ्हेचे अत्यंत प्रेमळ व हृदयंगम उद्गार काढले आहेत हें खरें. परंतु चांगल्या कल्पनेची देखील पुनरुक्ति फार वेळां झाली म्हणजे काव्य या नात्यानें तिच्यांतील स्वारस्य नाहींसें होतें. शिवाय सर्व ठिकाणीं एकाच कल्पनेचा पुनरुच्चार करतांना कवीच्या शब्दांतही तीच मनःपूर्वकता राहूं शकत नाहीं. तेव्हां पंतांनीं आपण

स्वतःसंबंधानें व इतरांच्या संबंधानें मयूराची उपमा योजून आपल्या काव्यांत हजारों ठिकाणीं जें वर्णन केलें आहे तें निष्फळ, इतकेंच नव्हे तर दोषावह आहे असेंच सामान्यतः विधान करणें भाग आहे. स्वतःच्या संबंधानें प्रेमळपणा व मनःप्रवेकता ज्यांत विशेष आढळण्याचा संभव त्या मयूराच्या दृष्टान्ताची जर ही कथा तर सिंह व हत्ती, माता व बालक वगैरे जोड्यांचे दृष्टान्त एकसारखे येऊं लागले म्हणजे किती कंटाळवाणे होत असतील हें सांगावयासच नको. पंतकाव्य ज्यांना बरेंच वाचण्याचा प्रसंग आला आहे त्यांच्या लक्षांत हा कंटाळवाणा प्रकार आल्याखेरीज रहात नाहीं. प्रत्येक उपमेचीं शेंपन्नास उदाहरणें येथें देणें अर्थात्च स्थलाभावामुळें शक्य नाहीं. एकाच तऱ्हेचीं थोडीशीं उदाहरणें दिग्दर्शनार्थ देतों. सिंह व हत्ती किंवा कोल्हे.—

(१) सिंह क्रोधें न गर्जे जवाळिहि करितो यद्यपि ध्यान फेरू । कृ. वि. ७४.२०
(२) दानार्द्रद्विपयूथनायकशिरोमुक्ताफळीं आवडी [सिंहाची] । कृ. वि. ७४.२६.
(३) कीं हस्तीवरि सिंह, कीं खवळला दुष्टांतकृत् काळ हा । कृ. वि. ७६.८.
(४) शरनखी हरि तो परवारणीं । कृ. वि. ७६.९.
(५) स्वामी ज्याचा न ठाके मृगरिपुसमरीं यूथ वांचेल काय ? । कृ.वि.७६.१०.
(६) मारायास जसा मृगेंद्र गहनीं दानांधदंतावला । कृ. वि. ७७.३.
(७) ते शत्रु द्विप सांप्रसाद्यकिणद्प्रद्युम्नपंचाननीं । कृ. वि. ७७. ४.
(८) कोल्यानें हरि रोधिला विधिवशें भ्याला शिवी गांधिला । कृ. वि.७७.१६.
(९) वृष्णिव्याघ्रवधेच्छु चेदिपतिवा तो मित्र भात्रू सवा । कृ. वि. ७७. २२.
(१०) नगाग्रगमृगाधिपें जसि विलोकितां वारणा । कृ. वि. ७८.४.

कृष्णविजयाच्या पांचच अध्यायांच्या अवकाशांत एकाच उपमेची कितीदां पुनरावृत्ति झालेली आहे हें वर दिलेल्या उदाहरणांवरून लक्षांत येईल. अशीच किंबहुना याहीपेक्षां जास्त वेळां, मेघ व मयूर, कल्पवृक्ष व याचक, फुललेला पळस, वगैरे उपमांची पुनरुक्ति होत असल्यामुळें हा प्रकार किती कंटाळवाणा होत असेल याचें सहज अनुमान होईल.

२२. (२) परमेश्वराच्या विभूतिमत्त्वाचा उल्लेख हाही असाच पुनरुक्तीमुळें कंटाळवाणा होतो. विभूतिमत्त्वाचा उल्लेख म्हणजे काय हें खालील उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

यच्चरणरेणु दुर्लभ योगिवरांतें प्रमोदराशे, शुकी ।
क्षितिसि कराया करिते क्रीडा प्रभु रीते धरुनियां शिशुकी ॥ मं.भा.१०.१५४

रामकृष्ण लहानपणीं क्रीडा करूं लागले येवढें सांगण्यासाठीं कवीनें येथें केवढें अवडंबर केलें आहे पहा. ज्यांचा चरणरज योगिवरांनाही दुर्लभ असे प्रभु लहान बालक होऊन पृथ्वीला पवित्र करण्यासाठीं क्रीडा करूं लागले असें वर्णन करून कवीनें रामकृष्णांच्या ईश्वरी सामर्थ्याचा येथें उल्लेख केला आहे. अशा वर्णनामध्यें बहुधा विरोधालंकाराची छटा असते. वरच्या आर्येंतही विरोध आहेच. परंतु याहीपेक्षां स्पष्ट उदाहरण—

यतिदुष्प्रेक्ष्यब्रह्मा पाहति वसुदेवदेवकी सुचिर । मं. भा. १०. ५५.

यतींनाही पहावयास मिळण्यास कठिण अशा ब्रह्माला वसुदेवदेवकी यांनीं डोळे भरून पाहिलें ! आणखी एक दोन उदाहरणें—

वत्सांचीं अवलंबुनि ते जगदवलंब चालती पुच्छें । मं. भा. १०.१५५.

सर्व जगाचे आधारभूत असे ते रामकृष्ण वासरांच्या शेपट्या धरून त्यांच्या आधारानें चालूं लागले.

वाङ्मनसागोचर जें ब्रह्म तया ती म्हणे धरीन अहा ! । मं. भा. १०. १७५.
नगर अनंत अनंतब्रह्मांडांचें तयासि बांधाया ।
लागे, दाम न पुरतां दुसरें तिसरें तरीहि सांधाया ॥ मं. भा. १०.१७७.

या उदाहरणांतील विरोधाभास स्पष्टच आहे. अशा रीतीनें परमेश्वराच्या विभूतिमत्त्वाचा व अलौकिक सामर्थ्याचा उल्लेख करून त्याचा त्याच्या प्राकृत लीलांशीं विरोध दर्शविण्यानें प्रसंगविशेषीं थोडीशी चमत्कृति उत्पन्न होते. कित्येक वेळां अशा उल्लेखांमुळें वर्णनास उदात्तता येऊन रसाचाही परिपोष होतो. उदाहरणार्थ—

ब्रह्मांड भस्म व्हावें ज्याच्या दररक्तचक्षुच्या पातें ।
तो तूं आंगें मारूं पाहसि मज दावुनि प्रतापातें ! ॥ भीष्मपर्व ९. १०२.

आपल्याला मारावायस श्रीकृष्ण स्वतः धांवून येत आहे हें पाहून धन्यताभरानें गहिंवरून आलेल्या भीष्मांचे हे उद्गार प्रेमळ नाहींत असें कोण म्हणेल ? तसेंच

शंभुशिरीं ज्याचें चरणोदक, वेद जयाचे बंदी ।
तो तीर्थरूप तीर्थांचाही मुनिपादोदक वंदी ॥ पृथु. २८.

मुनि=सुदामदेव. या सुंदर साकीलाही, सुदामदेवाचें पादोदक वंदन करण्याच्या कृत्याशीं परमेश्वराच्या विभूतिमत्त्वाचा विरोध दर्शविल्यामुळेंच चारुता आलेली आहे हें उघड दिसत आहे.

परंतु प्रसंगविशेषींच शोभणाऱ्या या वर्णनपद्धतीचा पंतांनीं फार अतिरेक केला असल्यामुळेंच त्याचा येथें दोषरूपानें उल्लेख करण्याचा प्रसंग आला आहे. वर सांगितलेल्या कंटाळवाण्या उपमांप्रमाणेंच या विभूतिमत्त्वाचा उल्लेख पंतांनीं अगदीं तारतम्यशून्य बुद्धीनें वीट येईल इतका केला आहे. कृष्णविजयाच्या एका लहानशा अध्यायांतील (अ० ९) अशा तऱ्हेचे सर्व उल्लेख खालीं दिले आहेत. यावरून पंतांच्या सर्व काव्यगहनांत हा प्रकार कसा माजलेला आहे तें लक्षांत येईल.

(१) तों येवूनि रवीला । धरि, सुज्ञीं सर्व अर्थ ज्या निरवीला ।
(२) तृप्त उदार कथांनीं । ज्याच्या जन, तो सतृष्ण दारक थानीं ॥ ६
(३) घे उत्संगावरि ती । हरविधि यच्चरणधूलिसंगा वरिती ।
(४) पी स्नेहस्तन्यासी । नमिति जया जोडुनी स्वहस्त न्यासी ॥ ७
(५) स्वसुता खोडिकराला । पाहे, सद्द्वंद ज्यासि जोडि कराला ॥ १३
(६) धरिन म्हणे सहसा धीं । ज्या न, बळें करुनि तपहि दुःसह,साधी॥ १५
(७) प्रेमें मति विनटावी । ज्याच्या चरणीं, तयासि माय दटावी ।
(८) ज्यासि यमादिक भीती । मातेपासूनि तो धरि प्रभु भीती ॥ १८
(९) जीव म्हणति 'या धांवें' । त्यासि म्हणे ते 'उळूखलिं बांधावें ॥ २०
(१०) मुनि नमिति सदा मानें । उखळीं बांधी जगत्पतिस दामानें ॥ २१
(११) चरिता दावुनि दामीं । गुंते कीं, भक्तवशीन मात्र सदा मीं ॥ २५
(१२) दामें त्या बांधावें । यमपाशेंही न यत्नता बाधावें ॥ २६ ॥

अठ्ठावीस पद्यांच्या एका अध्यायांतलीं अगदीं ठळक उदाहरणें काढलीं तीं इतकीं भरलीं ! यावरून सर्व पंतकाव्य वाचणारांस असले उद्गार वारंवार येऊन किती त्रास उत्पन्न करीत असतील याची कल्पना होईल.

२३. (३) याशिवाय पंतकाव्यांतील अलंकारांमध्यें औचित्यहानि, रसभंग, ग्राम्यता इत्यादि दोषही कुठें कुठें आढळून येतात. या सर्व दोषांमध्यें औचित्यहानि हाच दोष प्रमुख असून इतर सर्व दोष याच व्यापक दोषाचीं निरनिराळीं स्वरूपें होत असें म्हणण्यास हरकत नाहीं. औचित्यहानीचें विवेचन मागें सातव्या विभागांत केलेंच आहे. (पहा; पृ. ३०२–३१०.)

एकंदरीनें पंतकाव्यांतील इतर दोषांप्रमाणेंच त्यांतील अलंकारांचे दोषही तारतम्याचा व सफाईचा अभाव जो त्यांच्या काव्यांत सर्वत्र दिसून येतो त्यामुळेंच उत्पन्न झाले आहेत असें नजरेस येतें. आणि हा तारतम्याचा व सफाईचा जो

थोडाबहुत अभाव त्यांच्या काव्यांत दिसून येतो तो सुश्लिष्ट काव्य निर्माण करण्याकडे त्यांनीं सर्वस्वीं लक्ष पुरविलें नाहीं, यामुळेंच होय; स्वभावतःच त्यांच्या अंगीं तारतम्य कमी होतें म्हणून नव्हे. त्यांच्या अंगीं तारतम्य पुष्कळ होतें व रसिकमान्य काव्य रचण्याचा त्यांचा केवळ एकच हेतु असता तर त्यांनीं काव्याच्या सर्वांगाविषयीं जास्त काळजी घेऊन सध्यां जे दोष त्यांत आपणाला प्रतीत होतात ते मुळींच उरूं दिले नसते. परंतु त्यांचा हेतु कालिदासादिकांप्रमाणें सर्वस्वीं सुंदर काव्यनिर्मितीचाच नसल्यामुळें त्यांनीं या रसिकांस डाचणाऱ्या गोष्टींकडे आस्थापूर्वक लक्ष पुरविलें नाहीं.

[२]

२४. काव्याचें एक महत्त्वाचें अंग जें **कल्पनाविलास** त्याचा आतांपर्यंत विचार केला. आतां दुसरें तितकेंच किंबहुना त्याहीपेक्षां अधिक महत्वाचें अंग जें **रसाविर्भाव** त्याचें विवेचन करावयाचें आहे. कवींचा कल्पनाविलास काव्यामध्यें अलंकारांच्या द्वारा प्रकट होत असतो; अर्थात् अलंकारांचें विवेचन केलें म्हणजे कवीच्या कल्पनाशक्तीचा परामर्श घेतल्यासारखेंच होतें. यासाठींच आतांपर्यंत वर जें विवेचन केलें आहे तें अलंकारांसच अनुलक्षून केलें आहे. त्यावरूनच वाचकांस कवीच्या कल्पनाशक्तीचें स्वरूप चांगल्या रीतीनें ध्यानांत येण्याजोगें आहे.

२५. काव्याचें स्वतंत्र व महत्त्वाचें अंग या नात्यानें कल्पनाविलास व तद्द्योतक अलंकार यांचें महत्त्व आहेच. परंतु त्यांचा दुसरा आनुषंगिक उपयोगही काव्यामध्यें होत असतो. अलंकारांचा रसपरिपोषासाठींही आनुषंगिक रीतीनें कुशल कवि उपयोग करून घेतात. एखाद्या कारखान्यांत मुख्य मालाची निपज होत असतांना अनायासें कांहीं उपपदार्थही (bye-products) निघत असतात त्याप्रमाणें अलंकारांचा हा आनुषंगिक रीतीनें करून घेतलेला उपयोग होय. अलंकाराच्या द्वारानें कवीची मनोहर कल्पना तर प्रकट होतेच परंतु सहृदयतेनें व मार्मिकपणानें जर अलंकाराची योजना झाली तर त्याच्यापासून रसनिष्पत्तीचें मोठेंच कार्य घडवून आणतां येतें. एखाद्या साध्याच परंतु वाचकांच्या मनास चटका लावून सोडणाऱ्या उपमेनें (अगर उत्प्रेक्षेनें) रसाचा अतिशय उत्कर्ष झाल्याचीं उदाहरणें कालिदासादि कवींच्या काव्यांतून शेंकडों काढून दाखवितां येतील. शास्त्रीय विवेचन करतांना रसाला काव्याचा आत्मा म्हणा व अलंकारांना बाह्यभूषणांच्या जागीं कल्पून अगदीं गौण ठरवा; प्रत्यक्ष पाहूं गेलें म्हणजे खुद्द रसनिष्पत्तीचें

काम देखील पुष्कळ ठिकाणीं अलंकारांच्याच द्वारा होत असलेलें आढळतें. आमच्या संस्कृत साहित्यशास्त्रकारांना देखील अलंकारांचा रसनिष्पत्तीसाठीं होणारा उपयोग अमान्य आहे असें नाहीं. ' अलंकार हे वाच्यार्थात्मक जें काव्याचें शरीर त्याला शोभिवंत करतात व त्याच्या द्वारानें मुख्य रसाचाही उत्कर्ष करतात ' *—असा खुद्द काव्यप्रकाशकारांचाच अभिप्राय आहे. ध्वनीविषयींच्या अभिमानाच्या भरांत या काश्मीरक आलंकारिकांनीं कल्पनाचमत्कृतीला गौण लेखून अलंकारांची योग्यता अगदीं कमी ठरविली, तथापि त्यांनाही अलंकार पुष्कळ वेळां रसोत्कर्षाला उपकारक होतात ही गोष्ट अमान्य करतां आली नाहीं. सत्कवींनीं अलंकार टाकून दिले असते तर त्यांच्या काव्यांतील अर्धा अधिक रस नाहींसा झाला असता असें म्हटल्यास अतिशयोक्ति होण्याचा मुळींच संभव नाहीं. परिचितत्वामुळें वाचकांच्या अंतःकरणाला तात्काळ स्पर्श करील व भावना उचंबळून सोडील अशी कल्पना योजून उत्कृष्ट कवि आपलें रसनिष्पत्तीचें काम फारच कौशल्यानें साधून घेतात. आपण एक उदाहरण घेऊन पाहूं—

मनोरागस्तीव्रं विषमिव विसर्पत्यविरतं
प्रमाथी निर्धूमं ज्वलति विधुतः पावक इव ।
हिनस्ति प्रत्यङ्गं ज्वर इव गरीयानित इतो
न मां त्रातुं तातः प्रभवति न चाम्बा न भवती ।।मालतीमाधव,अंक २.

हें पद्य काव्यप्रकाशकारांनींच अलंकार हे रसोत्कर्षास कसे कारणीभूत होतात हें दर्शविण्यासाठीं उदाहृत केलें आहे. तथापि आपण आणखी एक स्वतंत्र उदाहरण घेऊं—(कुमारसंभव ४. ४६.)—

अथ मदनवधूरुपप्लवान्तं व्यसनकृशा परिपालयांबभूव ।
शशिन इव दिवातनस्य लेखा किरणपरिक्षयधूसरा प्रदोषम् ।।

मदनाच्या वियोगानें रतीची झालेली करुणास्पद स्थिति येथें वर्णिली आहे. दिवसां, सूर्याच्या रुक्ष प्रकाशांत, निस्तेज दिसणाऱ्या चंद्रकलेचा दृष्टान्त दिल्यामुळें रतीची निस्तेजता, विरहकृशता, पांडुरता या वाचकाच्या मनांत कशा उत्कटत्वानें जाऊन बिंबतात व त्यामुळें करुणरसाच्या उठावास केवढें साहाय्य होतें हें रसिकांच्या सहज लक्षांत येणारें आहे. पण येवढें दूरचेंही उदाहरण न घेतां आपण आपल्या तुकोबारायांचा एक गोड अभंग घेऊन पाहूं.—

* उपकुर्वन्ति तं (रसं) सन्तं येऽङ्गद्वारेण जातुचित् । काव्यप्रकाश, उल्लास ८.

कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे ॥
तैसें जालें माझ्या जीवा । केव्हां भेटसी केशवा ॥
चुकलिया माये । बाळ हुरुहुरु पाहे ॥
जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥

आपल्या आर्त अवस्थेचें वर्णन करण्याकरितां तुकोबांनीं येथें जे दोन साधेच परंतु वाचकांच्या मनाला तात्काळ द्रव आणणारे दृष्टान्त घेतले आहेत त्याच्या मुळें रसनिष्पत्ति होत नाहीं असें कोण म्हणेल ? आईबापांसून ताटातूट झालेली पूर्वीच्या काळची ती सात आठ वर्षांची नवरी प्रथम सासरीं जाऊं लागली म्हणजे तिची होत असलेली करुणास्पद व कातर अवस्था कोणाही सहृदय संसारिक-जनाच्या मनाला चटका लावून सोडते.आणि या अगदीं घरगुती गोष्टीचा तुकोबांनीं अत्यंत मार्मिकपणानें दृष्टान्तादाखल उपयोग करून वाचकांच्या मनाला पाझर आणील अशी रसनिष्पत्ति येथें करून दाखविली आहे. मातेचा दृष्टान्तही असाच रसपोषक आहे.

२६. अलंकारांचा रसनिष्पत्तीसाठीं उपयोग करून घेण्याचें हें कौशल्य इतर महाकवींप्रमाणें पंतांच्या अंगींहीं उत्कृष्ट वसत होतें. रसनिष्पत्तीस कारणीभूत होऊन तद्द्वारा सहृदयांस आल्हाद देणारे असे शेंकडों अलंकार त्यांच्या काव्यांतून काढून दाखवितां येतील. परंतु अशा सर्व स्थळांच्या संग्रहाचें बाड कांहीं आपल्याला तयार करावयाचें नसल्यामुळें पंतांची पद्धत लक्षांत येण्यासाठीं थोडींशीं उदाहरणें घेणें बस होईल. खालील उतारा पंतांच्या सावित्रीगीतींतील आहे.–

पतीच्या सुखार्थ बळें आणी हास्य । मयूरांचें लास्य विलोकूनी ॥ १३० ॥
विनोदवचनें पतीतें डोलवी । दाटूनी बोलवी पुण्यकथा ॥ १३१ ॥
एकें नेत्रें प्रिया एकें नेत्रें काळा । पाहे राजबाळा हृष्टा भीता ॥ १३२ ॥

सत्यवानासह सावित्री वनांत जात असतां तिची स्थिति कशी झाली होती त्याचें वर्णन करणारें हें सुंदर शब्दचित्र आहे. हे तीन्ही अभंग हृदयभेदक आहेतच पण त्यांतही शेवटच्या अभंगांतील मार्मिक वर्णनानें करुणरसाची हद्द दाखविली आहे. येथें सावित्रीच्या मनाच्या दोन परस्परविरुद्ध अवस्था एकत्र दाखविल्या असल्यामुळें असंगति अलंकार झाला आहे. परंतु या चमत्कृतिजनक अलंकारिक वर्णनानें सावित्रीच्या त्यावेळच्या भयचकित स्थितीचें जें चित्र वाचकाच्या मना-समोर उभें राहतें त्याच्यापुढें नामांकित चित्रकारांचे कुंचले केवळ रद्द होत असें

वाटल्याखेरीज रहात नाहीं! अगदीं निकट येऊन ठेपलेल्या अनर्थामुळें झालेली भयविह्वल स्थिति व त्यांतल्या त्यांत आपण पतीच्या समागमें आहोंत यामुळें वाटणारें सुख या दोहोंचें वर्णन याच्यापेक्षां चांगलें कोणासही करतां येणें शक्य नाहीं.

रसाच्या अंगभूत असलेल्या अलंकारांचीं उदाहरणें पंतांच्या केकावलींत पुष्कळच सांपडतात. केकावलि हें एक सर्वच अत्यंत उत्कृष्ट ध्वनिकाव्य आहे. त्यांत भक्ति व वत्सल हे रस परिपुष्ट झालेले असून नानातऱ्हेच्या कल्पनांनीं, कोटिक्रमांनीं, लाघवीपणाच्या व सलगीच्या मनोहर उद्गारांनीं तें काव्य अलंकृत झालेलें आहे. अशा सर्व उद्गारांमधून कवीची आर्तता व भक्तिभाव ध्वनित होत असून हें काव्य सर्व भक्तिप्रेमरसमय होऊन बसलें आहे.

धना परिजना गृहीं तुमचिया उणें कायसें
न लाभ मणिहेमभूपतिस जोडिल्या आयसें ।
परि प्रभुहि संग्रहीं सकल वस्तुला ठेविती
गुणा न म्हणतां उणा, अधिक आदरें सेविती ॥ केका. २३.

येथें परमेश्वराची रत्नभांडारवान् पृथ्वीपतीशीं तुलना केल्यामुळें प्रथमार्धांत प्रतिवस्तूपमा हा अलंकार झाला आहे. उत्तरार्धांत श्रीमंत लोकांची सर्व वस्तु संग्रहीं ठेवण्याची रीत वर्णिली असून परमेश्वरानेंही तसेंच करावें असें सुचविलें असल्यामुळें अप्रस्तुतप्रशंसा झाली आहे. किंवा 'प्रभु' शब्द श्लेषार्थी मानल्यास समासोक्तीही होईल. या अलंकारांमुळें श्लोकास अत्यंत मनोरमता तर आली आहेच. परंतु 'मी अगदीं दीन, गुणहीन, निरुपद्रवी असा पामर आहें; तथापि कसें तरी करून आपण माझा अंगीकार करा' असा जो अर्थ यांतून ध्वनित होत आहे व त्यावरून कवीच्या ज्या शरणागतीचा प्रत्यय येत आहे ती येथें मुख्य आहे. तिच्यामुळेंच प्रस्तुत श्लोक वाचकांचें मन वेधून घेतो यांत शंका नाहीं.

न जें प्रिय सदोष तें, प्रिय सदोषही चांगलें
स्वतोक पितरां रुचे जरिहि कर्दमीं रांगलें ।
तुलाचि धरि पोटिशीं कशि तदा यशोदा बरें ?
जरी मळविशी रजोमलिनकाय तूं अंबरें ॥ केका. ८७

हाही श्लोक वात्सल्यानें व भक्तिभावानें केवळ ओथंबलेला आहे. येथें प्रथम 'नावडती वस्तु कितीही चांगली असली तरी सदोष भासते व आवडती वस्तु सदोष असली तरी चांगली वाटते' हा सामान्य सिद्धान्त पहिल्या चरणांत कथन केला

असून ' आपलें धुळीनें भरलेलें मूलही आईबापांस गोजिरवाणें वाटतें ' या विशेष विधानानें त्याचें समर्थन केलें आहे. अशा रीतीनें हा अर्थान्तरन्यास अलंकार झाला आहे. पुनः दुसऱ्या चरणांतील विधानाचें समर्थन करणारें परमेश्वराच्या बालपणींचें विशिष्ट उदाहरण शेवटच्या दोन चरणांत दिल्याकारणानें तेथें दुसरा अर्थांतरन्यास झाला आहे. व या सुंदर कोटिक्रमाचें पर्यवसान शेवटीं ' हे देवा, अशा रीतीनें ' आवड गोड ' हा न्याय सर्वत्र लागू असून, आपलें मूल कितीही घाणीनें भरलेलें व मलिन असलें तरी तें मातापितरांना आवडतें असें जर तुजविषयींच्या यशोदामाईच्या आवडीवरून दिसून येतें, तर मग हा मी तुझें लेंकरूं अगदीं अपंग व अनाथ असें असून, माझा कां तूं अंगीकार करीत नाहींस ? ' असा ध्वन्यर्थांत होत असल्यामुळें श्लोकास अनुपम चित्तवेधकता आली आहे.

२७. सहृदय अलंकारांच्या योजनेमुळें रसपरिपोष झाल्याचीं उदाहरणें येथें आणखी देत बसण्याचें कारण नाहीं. प्रत्येक वाचकास तीं सहजासहजीं वाटेल तितकीं आढळून येणारीं आहेत. या बाबतींत मुख्य लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, कल्पना व भावना हीं दोन काव्याचीं भिन्न अंगें असलीं म्हणून तीं एकमेकांस विरोधी आहेत असें मात्र नाहीं. भावनांचा उल्लास व कल्पनांचा विलास हीं दोन्ही उत्कृष्ट काव्यांत एकत्र झालेलीं आढळतात, व काव्याचीं हीं दोन्ही अंगें पुष्कळ अंशीं एकमेकांस पूरक असलेलीं आढळून येतात. जगांतील बहुतेक पहिल्या दर्जाचे कवि या दोन्ही अंगांनीं परिपूर्ण व दोन्ही बाबतींत सारखेच सामर्थ्यवान् असलेले आढळतात. कल्पना व भावना हीं दोनही अंगें ज्याचे ठायीं अत्यंत उत्कर्षाप्रत गेलेलीं दृष्टीस पडतात, अशा कवींमध्यें प्रथमच निर्देश करण्यास योग्य असा आमचा कविकुलगुरु कालिदास होय. अत्यंत हृद्य अशा कल्पनाविलासाबरोबरच मानवी हृदयांतील नाजूक भावनांच्या तारा छेडून त्यांतून मधुरकोमल सूर काढणारें रसाभिव्यक्तिचातुर्यही त्याच्या काव्यांत दिसून येतें. महाराष्ट्र कवि ज्ञानेश्वर हेही कल्पना व भावना या दोन्ही तारांवरतीं अप्रतिम करामत करून दाखविणारे अभिजात कारागीर होत. मनोहर कल्पना आणि उदात्त भावना यांचें असें कांहीं अपूर्व मीलन ज्ञानेश्वरींत झालें आहे कीं त्याचें वर्णन करण्यास सर्वसामान्य उपमादृष्टान्त पुरे पडण्याजोगे नाहींत. ज्ञानेश्वरांनींच म्हटल्याप्रमाणें

जैसा पंचमालाप सुगंध । कीं परिमळ आणि सुस्वाद ।

अशा रीतीनें लौकिक सृष्टींत एकत्र आढळत नसलेल्या गुणांचा एकत्र समवाय

कल्पून मगच त्याची उपमा ज्ञानेश्वरांच्या वाणीस द्यावी लागेल. अशा कालिदास अगर ज्ञानेश्वर यांच्यासारख्या सव्यसाची वाग्वीरांच्या जोडीस न बसवितां येण्याजोगे एकांगी प्रतिभेचेही कवी प्रत्येक वाङ्मयांत दिसून येतात. परंतु त्यामुळे कल्पना व भावना यांचें विरोधित्व दिसून न येतां त्या एकमेकांपासून भिन्न आहेत येवढेंच सिद्ध होतें. गीर्वाणसाहित्यांत भवभूति हा कवि केवळ भावनाप्रधान असा आढळतो तर बाणासारखे कल्पनातरल परंतु भावनेच्या बाबतींत दरिद्री असेही कवि दिसून येतात. आंग्लवाङ्मयांतही बायरनसारख्या कल्पना व भावना या दोन्ही अंगांनीं समृद्ध असलेल्या कवींप्रमाणें शेली इत्यादि कल्पनाप्रधान कवि व वर्डस्वर्थ, कोलरिज इत्यादि भावनाप्रधान कवि आढळतातच. महाराष्ट्रवाङ्मयांत पाहूं गेलें तर काव्याच्या दोन्ही अंगांत सारखेच निपुण असे कवि ज्ञानेश्वरांखेरीज तुकोबाराय, मुक्तेश्वर व मोरोपंत हेच आढळतील असें वाटतें. एकनाथांच्या काव्यांत कल्पनाचापल्यापेक्षां भावनेचें प्राधान्यच विशेष दृष्टीस पडतें. वामनपंडित तर कल्पनेच्या बाबतींत दरिद्रीच आहेत; व अनंत, आनंदतनय साम्राज्यवामन वगैरे श्लोकरचनेच्या बाबतींत वामनपंडितांचे अनुयायी कविमंडळही साधारणतः तसेंच आहे असें म्हटल्यास चालेल. नामदेवादिक प्रासादिक अभंगकारही भावनाप्रधान कवींच्या वर्गांत प्रामुख्यानें मोडणारे होत.

२८. महाराष्ट्रकवींच्या वरील वर्गीकरणांत मोरोपंतांचें नांव दोन्ही अंगांनीं परिपूर्ण असणाऱ्या कवींच्या वर्गांत दाखल केलें आहे तें थोड्याशा अवलोकनाअंतीं कोणासही पटण्यासारखें आहे. कल्पनेच्या बाबतींतलें पंतकवितेचें अभिजात वैभव केवढें अपार आहे याचें सूचक दिग्दर्शन आतांपर्यंत केलेंच आहे. त्यावरून पंत हे, पोथी खाकोटीस मारून लगबग करणाऱ्या व देवळांतल्या आजीबाईपुढें तोंडाचा पट्टा सोडणाऱ्या सामान्य पुराणिकांपैकींच एक जड व मतिमंद पुराणिक नसून, अभिजात कवि होते व निसर्गदत्त कल्पनाशालिता फार मोठ्या प्रमाणांत त्यांच्या ठायीं वसत होती हें दिसून येईल. कल्पनेप्रमाणेंच भावनेचा उठाव करून रसपरिपोष करण्यांतही ते तितकेच कुशल होते. आतांपर्यंतच्या विवेचनांत कल्पनेच्या बरोबरीचें महत्त्वाचें अंग म्हणून रसाचा अनेकवार उल्लेख आला असला तरी पंतकवितेंतील व जुन्या महाराष्ट्रकवितेंतील रसाविर्भावाचें स्वतंत्र विवेचन केलेलेंच नाहीं. तें याच्या पुढें करून या बाबतींतील वस्तुस्थितीचें ज्ञान वाचकांस करून देण्याचा उद्देश आहे.

२९. ध्वनिप्राधान्यवादी शास्त्रकार काव्यामध्यें रसालाच आत्मा मानून अलंकारादिकांस गौण ठरवतात हें आपण मागें पाहिलेंच आहे. याच संप्रदायाचे अनुयायी व रसाला, त्यांतल्या त्यांत शृंगाराला, काव्यांचें सर्वस्व मानणारे आचार्य गोवर्धन हे आपल्या आर्यासप्तशतींत म्हणतात—

रतरीतिवीतवसना प्रियेव शुद्धापि वाङ् मुदे सरसा ।
अरसा सालंकृतिरपि न रोचते शालभंजीव ॥

'अलंकाररहित परंतु सरस अशीच वाणी आनंदास कारण होते, तीच नीरस असून अलंकारांनीं खचलेली जरी असली तरी ती सजवलेल्या बाहुलीप्रमाणें आल्हाददायक होत नाहीं.' अलंकारांचें व्यर्थत्व प्रतिपादन करण्यासाठींच लिहिलेल्या या आर्येंत आपल्या वाहावलेल्या कल्पनेचें साहाय्य घेऊन कवीनें स्वतःच समर्पक अशा दोन अलंकारांची योजना केली आहे ही मोठी पाहण्यासारखी मौज आहे. परंतु ही विसंगति, व ही विसंगति ज्यामुळें उत्पन्न झाली तें एकांतिक मताचें प्रतिपादन जर सोडून दिलें तर या गोवर्धनाचार्यांच्या म्हणण्यांत बराच तथ्यांश आढळतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. काव्यामध्यें कल्पनाविलास व अलंकार यांना जरी कितीही महत्त्व असलें तरी रसाचा पूर्णपणें अभाव असल्यास तें काव्य टाकाऊच ठरेल यांत संशय नाहीं. मानवी अंतःकरणाच्या भावनांशीं तादात्म्य पावून सुंदर शब्दांत, इतर सर्व जनांना त्यांच्याशीं समरस होतां येईल अशा रीतीनें त्यांचें वर्णन करणें हें काव्याचें एकमेव नसलें तरी एक मुख्य कार्य आहे यांत संशय नाहीं. अर्थात् ज्यांत रसोल्लास मुळींच आढळत नाहीं, तें काव्य अगदीं निकृष्ट प्रतीचें होय असा कोणीहि रसिक अभिप्राय देईल. तेव्हां पंतकवितेची व जुन्या महाराष्ट्र कवितेची योग्यता ठरवावयाची असल्यास या जुन्या कवींनीं आपल्या काव्यांत कांहीं रसनिष्पत्ति केली आहे कीं नाहीं, केली असल्यास तिचें स्वरूप एकंदरीनें कशा प्रकारचें आहे या मुद्यांचा विचार करणें अवश्य आहे.

३०. आमच्या बहुतेक सर्व जुन्या मराठी कवींची रचना भक्तिरसपरिपूरित असते हें सुप्रसिद्ध आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादिक प्रासादिक संतमंडळींच्या काव्यांत तर ईश्वरविषयक रतिजन्य भक्तिरस व निर्वेदजन्य शांतरस यांखेरीज दुसरा रस प्रायः आढळतच नाहीं. वामन, मोरोपंत, श्रीधर वगैरे जे भाविक परंतु प्रत्यक्ष संतमंडळींत सामील न होणारे कवि आहेत त्यांच्या काव्यामध्यें शृंगारादिक रसांचा प्रसंग विशेषीं प्रादुर्भाव झालेला आढळतो. परंतु त्या सर्व रसोल्लासाभोंवतीं

भक्तीचें नेहमीं प्रतीत होणारें वेष्टन असतें. त्यांनीं वर्णन केलेल्या सर्व कथा ईश्वरविषयक असल्यामुळें व ईश्वराविषयीं पूर्ण भक्ति त्यांच्या हृदयांत नेहमीं वागत असल्यामुळें त्यांच्या सर्व ग्रंथांवर परमेश्वरभक्तीची छाया एकसारखी पडलेली असते; व प्रसंग असो वा नसो भक्तिपरच उद्गार त्यांच्या तोंडांतून बाहेर पडतात. भागवत दशमांत एके ठिकाणीं यशोदामाता ताक घुसळीत बसली असतां तान्हा कृष्ण तिच्याजवळ स्तनपानाच्या उद्देशानें येऊन तिचें घुसळणें थांबवितो असें वात्सल्यपूर्ण वर्णन आहे. मूळ भागवतांत--

तां स्तन्यकाम आसाद्य मथ्नंतीं जननीं हरिः ।
गृहीत्वा दधिमंथानं न्यषेधत्प्रीतिमावहन् ॥

येवढेच बालकाच्या चरित्रास शोभणारे उद्गार आहेत. परंतु पंतांना या गोष्टीचें वर्णन करितांना देखील भक्तीचा उमाळा आला आहे.

वसवी बळेंचि तीस स्तन्यार्थी देव तो धरूनि रवी ।

असें सरळ मूळाचें रूपांतर करून पुढें--

शिशुपण तिच्या न केवळ उद्धारा आमुच्याहि तें मिरवी ॥ मं. भा. १०.१७०

असे भक्तिरसाचा उद्भाव करणारे स्वतःचे उद्गार त्या वर्णनास जोडून दिले आहेत. आतां वात्सल्य व भक्ति या दोन रसांचा परस्पर विरोध नसल्यामुळें हे उद्गार येथें उत्कृष्ट शोभतात हें सांगावयास नकोच. परंतु पंतांसारख्या भगवद्भक्तांचे भक्तिप्रेममय उद्गार कोठेंहि आले तरी ते काव्यास मार्दव व शोभाच आणितात; त्याचा विरस करीत नाहींत, ही सर्व रसिकांच्या अनुभवाची गोष्ट आहे.

३१. अगोदर मूळ भागवत हा ग्रंथच भक्तीनें ओतप्रोत भरलेला आहे. त्यामध्यें व त्याच्याबरोबरच पंतकृत मंत्रभागवत व कृष्णविजय यांमध्यें शृंगारादि नवरसांचा आविर्भाव दृष्टीस पडत नाहीं असें नाहीं. परंतु शृंगारादि रसांचा कितीही विलास भागवतांत दिसून येत असला तरी तो नेहमीं भक्तीच्या पायावर उभारलेला असतो किंवा सरतेशेवटीं भक्तीमध्यें परिणत होतो, हें उदाहरणें घेऊन दाखवितां येईल. पहिलें उदाहरण कालियमर्दनाचें (मूळ भागवत अ. १६ मंत्रभागवत १०.२७०ते २९१). कालियमर्दनाच्या कथेमध्यें भागवतकारांनीं अद्भुतरसाची वाचकांना उत्कृष्ट मेजवानी केली आहे. परंतु तें अद्भुतरसपूर्ण वर्णन संपल्यानंतर लगेच कालियपत्न्यांनीं केलेली कृष्णाची भक्तिभावपूर्ण स्तुति सुरू होऊन एकंदर कथानकाचें भक्तिरसामध्यें पर्यवसान होतें. दुसरें उदाहरण रासक्रीडेमधील शृंगाराचें

(भा. स्कं. १० अ० २९-३३. मं. भा. १०. ३७६ ते ४०७). रासक्रीडेमध्यें श्रीकृष्णरूपी परमेश्वराचा व गोपींचा अप्रशस्त शृंगार भागवतकारांनीं वर्णन केला आहे असें कित्येक प्राकृतांचें म्हणणें आहे. परंतु असल्या वाचाळ लोकांस उत्कृष्ट उत्तर म्हणजे त्यांना दृष्टि जरा शुद्ध करून रासक्रीडेचा भाग वरील दोन्ही ग्रंथांतून वाचावयास सांगणें हेंच होय; रासक्रीडेचें वर्णन वाचतांना शृंगारापेक्षां गोपींच्या मधुर भक्तिभावाचीच जास्त उत्कटतेनें प्रतीति होते इतकी परमेश्वरभक्तीची दाट छाया त्या कथानकावर सर्वत्र पडली आहे. रुक्मिणीविवाहकथेचें उदाहरण तर याहूनही समर्पक आहे. (मूळ भागवत व कृ. वि. अ. ५२, ५३. शिवाय कृ. वि. अ. ८३ पहा.) त्या विवाहकथेचें वर्णन वाचून रुक्मिणीला, स्वभर्ताविषयीं अस्फुट शृंगाराचा उद्गम जिच्यामध्यें झाला आहे अशी विवाहोत्सुक प्रेममय वधू समजावी कां परमात्म्याच्या कैवल्यप्रद दर्शनाविषयीं सोत्कंठ असलेली व तन्मय वृत्ति होऊन स्वत्व विसरलेली भक्तश्रेष्ठा समजावी याचाच विचार पडतो !

अभयप्रदपदपद्मीं म्यां तेव्हां घातली मिठी घट्ट ।
धट्ट क्षगभरि झाल्यें केली स्वाभाविक त्रपा गट्ट ॥ कृ. वि. ८३. ९७

हे रुक्मिणीचे उद्गार, किंवा

चामर ढाळित पार्श्वीं विनयें प्रेमें सदा उभी राहें ।
पाहें श्रीपद, नेगें बसल्यें मीं काय कीं उभी आहें ॥ कृ.वि. ८३.१६८.
तुमच्या आशीर्वादें जन्मोजन्मीं घडो अशी सेवा ।
हे वाङ्मनःशरीरें करितों विज्ञापना सदा देवा ॥ कृ. वि. ८३.२११.

हे इतर कृष्णस्त्रियांचे उद्गार केवळ शारीरिक विषयोपभोगामध्यें पर्यवसान पावणारें पतिपत्नीविषयक प्रेम व शृंगार यांपेक्षां निष्काम भक्तिभावाचीच अधिक प्रतीति उत्पन्न करीत नाहींत काय ? वीररसाचीही तीच गोष्ट. दशमाच्या छप्पन्नाव्या अध्यायामध्यें स्यमन्तक मण्याकरितां श्रीकृष्णाचें व जांबवानाचें झालेलें युद्ध वीररसाचा प्रादुर्भाव करणारें आहे. परंतु तें युद्ध संपतें न संपतें तोंच जांबवानाला कृष्णाची ओळख पटून तो भक्तीनें नम्र होऊन कृष्णाची स्तुति करूं लागतो. अशा रीतीनें वीररसाचीही शेवटीं भक्तिरसांत परिणति होते. पंतांनीं तर कृष्णजांबवानांच्या युद्धाचें चांगलेंसें वर्णन केलेंही नाहीं. जांबवंतकृत स्तुति मात्र पृथ्वीवृत्तांत सहा श्लोकांमध्यें सुंदर वर्णिली आहे. (कृ. वि. अ. ५६. श्लोक २९–३४.)

३२. अशा तऱ्हेनें पंतकाव्यांत जेथें तेथें भक्तिरसाचा उत्कर्ष दिसून येतो असें

च्वर प्रतिपादन केलें खरें. पण सगळेंच मुसळ केरांत! भक्तीला मुळीं आमच्या साहित्यशास्त्रकारांनीं रसच मानलेलें नाहीं; मग भक्तिरसाचा उत्कर्ष झाला असें म्हणण्याची गोष्ट तर दूरच. आमचे संस्कृत साहित्यशास्त्रकार शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र व शान्त असे नऊ रस मानतात हें प्रसिद्धच आहे. हे रस कसे उत्पन्न होतात याचें स्पष्टीकरण येणेंप्रमाणें आहे. रति (प्रेमाख्यश्चित्तवृत्तिविशेषः), उत्साह, शोक, विस्मय, हास, भय, जुगुप्सा, क्रोध, निर्वेद या ज्या मनुष्यामध्यें कायमच्या स्थित असणाऱ्या नऊ अंतःकरणवृत्ति त्या अनुकूल परिस्थितींच्या योगानें उद्दीपित होऊन बाहेर व्यक्त झाल्या म्हणजे त्यांस रस म्हणतात.* मनुष्याच्या अंतःकरणामध्यें वासनारूपानें स्थिर असणाऱ्या या रति, उत्साह इत्यादि ज्या नऊ भावना आहेत त्यांस प्रत्येकीं **स्थायिभाव** अशी संज्ञा आहे. वाचकांच्या मनांत बीजरूपानें नेहमीं स्थिर असणारे स्थायिभाव काव्यांतील आलंबन–उद्दीपन–विभाव, अनुभाव, व्यभिचारिभाव यांनीं परिपुष्ट होऊन व्यक्त झाले म्हणजे रसत्वाप्रत प्राप्त होतात. अनुकूल कारणांच्या योगानें कोणताही स्थायिभाव परिपुष्ट होऊन उचंबळून आला म्हणजे अंतःकरणास जो अनिर्वचनीय असा अनुकूलसंवेदनात्मक अनुभव घडतो तो **रस** होय. ¶ अर्थात् स्थायिभाव हेच रसरूपानें परिणत होत असल्यामुळें, स्थायिभावाशिवाय कोणताही रस असूं शकत नाहीं व जितके स्थायिभाव तितकेच रस असूं शकतील हें उघड आहे.

३३. आतां रति आदिकरून जे स्थायिभाव मानले आहेत त्यांत भगवद्भक्ति किंवा ईश्वरविषयक प्रेम असा स्थायिभाव जुन्या आलंकारिकांनीं मानलेला नाहीं; व जगन्नाथरायांपर्यंत जे अलीकडील अलंकारमर्मज्ञ होऊन गेले त्यांनीं जुन्यांच्या पावलावर पाऊल ठेवून भगवद्भक्तीला साहित्यशास्त्रांत शिरण्याचा जो मज्जाव होता तो कायमच केला आहे. हे सर्व विवेचक रति, म्हणजे स्त्रीपुरुषविषयक प्रेम, यालाच स्थायिभावामध्यें गणतात. इतर गुरुदेवतादिविषयक प्रेमाला स्थायिभाव न मानतां रसत्वाप्रत कधीं पोचूं न शकणारा असा कमी महत्त्वाचा भाव मानतात.§

* व्यक्तः स तैर्विभावाद्यैः स्थायी भावो रसः स्मृतः ॥–काव्यप्रकाश, उल्लास ४.

¶ विभाव, अनुभाव इत्यादि कारणें हीं काव्यांत प्रत्यक्ष शब्दांनींच वर्णन केलेलीं असतात. त्यांपासून जो रसानुभव घडतो तो मात्र अप्रत्यक्षपणें म्हणजे व्यंजनेनें घडतो. अशा रीतीनें रसप्रधान काव्यांत व्यंग्य प्रधान असल्यामुळें त्यास ध्वनिकाव्य म्हणतात इ० इ० विवेचन मागें आलेंच आहे.

§ रतिर्देवादिविषया व्यभिचारी तथाञ्जितः । **भावः** प्रोक्तः.—का. प्र. ४.

जगन्नाथरायांनीं तर त्याला 'व्यभिचारी,' म्हणजे मुख्य रसाच्या अंगभूत असणारा व क्षणकाल टिकणारा भाव म्हटलें आहे.—स्त्रीपुंसयोरन्योन्यालम्बनः प्रेमाख्याश्चित्तवृत्तिविशेषो रतिः स्थायिभावः। गुरुदेवतापुत्राद्यालम्बनस्तु **व्यभिचारी**॥-रसगंगाधर. पृ. ३१-३२.

अर्थात् देवताविषयक रति, म्हणजे भक्ति, हिला स्थायिभावत्वच प्राप्त होत नसल्यामुळें ती रसाच्या पदवीपर्यंत मुळींच पोंचू शकत नाहीं हें ओघानेंच आलें. आतां भगवद्भक्तांना जिचा अनुभव घडतो अशी ईश्वररूपी आलम्बन (आधार) असलेली व रोमांच, अश्रुपात वगैरे अनुभावांनीं प्रतीत होणारी भक्ति रसाप्रत कां पोंचू नये व भगवंताविषयींचा जो अनुराग त्याला स्थायिभाव तरी कां मानू नये अशी शंका येथें उत्पन्न होण्याजोगी आहे.व रसगंगाधरकारांनीं ही शंका उत्पन्न करून तिचा विचारही केला आहे. हें विवेचन संस्कृत शास्त्रकारांच्या विवेचन-पद्धतीचें एक लहानसें परंतु सुरेख उदाहरण असून इतर दृष्टींनींही मोठें उद्बोधक असल्यामुळें येथें उतरून घेतलें आहे.—

" अथ कथमेत एव रसाः। भगवदालम्बनस्य रोमाञ्चाश्रुपातादिभिरनुभावितस्य हर्षादिभिः परिपोषितस्य **भागवतादिपुराणश्रवणसमये** भगवद्भक्तैरनुभूयमानस्य भक्तिरसस्य दुरपह्नवत्वात्। भगवदनुरागरूपा भक्तिश्चात्र स्थायिभावः। न चासौ शान्तरसेऽन्तर्भावमर्हति। अनुरागस्य वैराग्यविरुद्धत्वात्।

उच्यते—भक्तेर्देवादिविषयरतित्वेन भावान्तर्गततया रसत्वानुपपत्तेः।

रतिर्देवादिविषया व्यभिचारी तथाञ्जितः।

भावः प्रोक्तस्तदाभासा ह्यनौचित्यप्रवर्तिताः॥ इति हि प्राचां सिद्धान्तात्। नच, तर्हि कामिनीविषयाया अपि रतेर्भावत्वमस्तु, रतित्वाविशेषात्, अस्तु वा भगवद्भक्तेरेव स्थायित्वं, कामिन्यादिरतीनांच भावत्वम्, विनिगमकाभावात्;—इति वाच्यम्। भरतादिमुनिवचनानामेवात्र रसभावत्वादिव्यवस्थापकत्वेन स्वातंत्र्यायोगात्। अन्यथा पुत्रादिविषयाया अपि रतेः स्थायिभावत्वं कुतो न स्यात्, न स्याद्वा कुतः शुद्धभावत्वं जुगुप्साशोकादीनाम्, इत्यखिलदर्शनव्याकुली स्यात्; रसानां नवत्वगणना च मुनिवचननियन्त्रिता भज्येत; इति यथाशास्त्रमेव ज्यायः।" रसगंगाधर. पृ. ४५, ४६.

याचा भावार्थ थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगतां येईल.—

' शंका—(वर सांगितलेले नऊ) हेच तेवढे रस असें कसें मानून चालेल ?

कारण भागवतादिपुराणांच्या श्रवणसमयीं भगवद्भक्तांच्या अनुभवास येणाऱ्या भक्तिरसाचें अस्तित्व नाकबूल करतां येणार नाहीं. भगवदनुरागरूपी भक्ति हा यांतील स्थायिभाव (मानतां येईल). अनुराग हा स्वभावतः वैराग्याच्या विरुद्ध असल्यामुळें या रसाचा शांतरसामध्येंही अन्तर्भाव करणें शक्य नाहीं.

' उत्तर—भक्ति, म्हणजे देवादिविषयक रति, हिचा केवळ भावांमध्यें अंतर्भाव केला असल्यामुळें ती रस होऊं शकत नाहीं. ' देवादि विषयक रति (केवल) भावरूप आहे ' असाच प्राचीनांचा सिद्धांत आहे.

' शंका—तर मग दोहोंमध्यें रति ही सारखीच असल्यामुळें कामिनीविषयक रतीला देखील देवविषयक रतीप्रमाणें ' भाव ' च म्हणा, किंवा भगवद्भक्तीला स्थायिभाव मानून कामिन्यादि रतींना केवळ ' भाव ' माना; कारण निर्णायक कारण तुमच्याजवळ कांहींच नाहीं.

' उत्तर—असें म्हणणें बरोबर नाहीं. भरतादि मुनींचेंच वचन रसभावादिकांच्या बाबतींत प्रमाण असल्यामुळें स्वतंत्र विचारास येथें अवकाश नाहीं. नाहीं तर, पुत्रादिविषयक रतीला स्थायिभावत्व कां असूं नये किंवा जुगुप्साशोकादींना तरी केवल ' भाव ' कां मानूं नये (असे सर्वत्र फाटे फुटून) सर्व शास्त्रामध्यें गोंधळ माजेल; (व) मुनिवचनानें नियंत्रित केलेली रसांची नऊ ही संख्या बाधित होईल तेव्हां शास्त्रास अनुसरून असलेलें मत (स्वीकारणें) अधिक चांगलें होय.'

उपर्युक्त विवेचन अनेक दृष्टींनीं बोधप्रद आहे. पूज्य मानलेल्या प्राचीन शास्त्रकारांचीं वचनें म्हणजे ब्रह्मलिखित समजून त्यांच्या बाहेर होतां होईतों जावयाचें नाहीं ही जी अलीकडील संस्कृत ग्रंथकारांची प्रवृत्ति ती वरील उताऱ्यांत उत्कृष्ट रीतीनें प्रतिबिंबित झालेली दृष्टीस पडते. स्वतंत्र रीतीनें विचार करणारे धीट गडी या काळांत आमच्यामध्यें निपजत नसत असें नाहीं. परंतु अशा अनियंत्रित भराऱ्या मारणाऱ्या लोकांच्या अमर्याद विचारांना जड बुडाच्या प्रतिष्ठित ग्रंथकारांचा चांगलाच पायबंद असे. शक्य तोंपर्यंत परंपरागत विचारसरणीच्या बाहेर जावयाचें नाहीं व जेथें फेरबदल करणें अगदींच अवश्य असेल तेथें पूर्वपरंपरेस अनुसरून अवश्य तेवढाच बदल करावयाचा अशी आमच्या ग्रंथकारांची वृत्ति दिसून येते, व हीच प्रवृत्ति जगन्नाथांच्या वरच्या उताऱ्यांत प्रकट झाली आहे. त्यांचा शंकाकार हा मूलोच्छेदी (Radical) व तर्कानुसारी विचारसरणीचा मनुष्य आहे. भरतादि मुनींचीं वचनें वगैरे तो कांहीं जाणत नाहीं.

त्याच्या तर्काच्या मुसंडीच्या तडाक्यांत जें येईल त्याचा तो धुव्वा उडवणार. याच्या उलट, प्राचीन कालापासून शास्त्राची जी घडी बसली आहे तिचा उच्छेद केल्यानें सर्वत्र अनवस्था माजेल यास्तव प्राचीन मुनिवचनांना धरून चालणेंच इष्ट आहे असें पंडितराज प्रतिपादीत आहेत. पंडितरायांच्या बाजूला तर्काचें पाठबळ नाहीं. स्त्रीपुरुषांच्या प्रेमाला रस मानावयाचें व भगवद्भक्तीला ती योग्यता द्यावयाची नाहीं असा पंक्तिप्रपंच कां म्हणून ? स्त्रीपुरुषांच्या प्रेमलीलांच्या वर्णनानेंच हृदय तन्मय होऊन अलौकिक आनंद होतो व भगवंताच्या प्रेमळ लीलांच्या गानानें तो होत नाहीं असें कोण म्हणूं शकेल ? व म्हटलें तरी तें कोण ऐकून घेईल ? परंतु जगन्नाथपंडितांना या युक्तिवादाचें काय होय ? त्यांनीं स्वत: गंगालहरीसारखीं भक्तिरसपूर्ण काव्यें लिहिलीं असलीं तरी साहित्याचा शास्त्रीय वाद निघाला असतां भरतादि मुनींच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांना भक्तीला रसाच्या प्रांतांत येण्यास प्रतिबंध केलाच पाहिजे !

परंतु हे भरतादि मुनि तरी असे कसे चकले ? ज्यांनीं शास्त्र निर्माण केलें व अनंतकालपर्यंत अबाधित टिकावें यासाठीं शाश्वत तत्त्वावर आधारलेले नियम ज्यांनीं घालून दिले त्यांच्या हातून ही ढोबळ नजरचूक कशी झाली ?—असा विचार कोणाच्याही मनांत येणें साहजिक आहे. तेव्हां रसविचारांत प्रथमपासून भक्तीला स्थान कां दिलें गेलें नाहीं याचा जरा खोल विचार करून काय निष्पन्न होतें तें पाहूं.

३४. मागें सांगितलेंच आहे कीं, रसाच्या कल्पनेचा उगम प्रथम नाट्यशास्त्रांत झाला. नाट्यशास्त्राचा प्रणेता जो भरतमुनि त्यानेंच रसांचा विचार करून प्रथम नियम घालून दिले असें नंतरचे ग्रंथकार मानतात. उपलब्ध ग्रंथांमध्यें रसाचें अगदीं प्रथम विवेचन केलेलें आढळतें तें ' भरतनाट्यशास्त्र ' नामक भरताच्या नांवावर मोडणाऱ्या नाट्यशास्त्रावरील ग्रंथामध्येंच. आणि या व नाट्यशास्त्रावरील इतर ग्रंथांमध्येंच रस, त्याचीं अंगें व उपांगें यांचें विशेष विस्तारानें विवेचन केलेलें आढळतें. तेव्हां रसाचा विचार हा प्रथम नाट्यशास्त्रामध्यें उगम पावला व तेथून पुष्कळ अवकाशानंतर त्याचें कलम अलंकारशास्त्राच्या प्रांतांत केलें गेलें. रसकल्पनेचा उगम नाटकांच्या संबंधानें झाला ही गोष्ट लक्षांत ठेवली म्हणजे पुष्कळच गोष्टींवर प्रकाश पडतो. मूळचे रस आठच होते. विक्रमोर्वशीय नाटकामध्यें (अंक २) कालिदासानें आठच रसांचा उल्लेख केला आहे. अमरकोशामध्यें आठच रसांचें

परिगणन केलें आहे. भरतनाट्यशास्त्रामध्येंही शृंगार, वीर, करुण, अद्‌भुत, हास्य, भयानक, बीभत्स व रौद्र या आठच रसांचें विवेचन आहे. तेव्हां प्राचीन काळीं रस आठच मानलेले होते हें निर्विवाद आहे. हीं आठही नांवें पाहिलीं म्हणजे हे सर्व रस नाटकांमध्यें अभिनय, देखावे वगैरेंच्या साधनानें उद्दीपित करण्याजोगेच आहेत हें सहज लक्षांत येईल. शृंगार, वीर व करुण या रसांची खुलावट अत्यंत काव्यपूर्ण अशा वाचिक संभाषणापेक्षांही आंगिक अभिनयानें कित्येक तरी पट जास्त होऊं शकते हें कोणासही सहज पटण्यासारखें आहे. बाकीच्या अद्‌भुतादि रसांचीही तीच गोष्ट आहे. आपल्या समाजांत नाटकांचा व नाटकी लोकांचा पूर्वीपासून जो दर्जा मानलेला आहे त्यास अनुसरून केवळ सांसारिक जगांत अनुभवास येणारे असेच रस नाट्यशास्त्रकारांनीं कल्पिले होते हें उघड दिसतें. नाटकाचें वातावरणच आदिपासून अंतापर्यंत वैराग्य, भक्ति वगैरे परमार्थप्रवण वृत्तींस प्रतिकूल असतें. नाटकाचें स्वरूप अगदीं हीन झालें तर तें अचकट विचकट तमाशाच्या पायरीपर्यंतही जाऊन ठेपेल परंतु तें अगदीं उच्च झालें तरी सात्विक मनोरंजन करणारें व सामाजिक नीतीचा मनोवेधक रीतीनें बोध करणारें येथपर्यंतच त्याची मर्यादा जाऊं शकेल. ऐहिक व्यवहाराच्याही पलीकडे जाऊन केवळ परमार्थमय व शांतरसपूर्ण असें नाटकाचें स्वरूप बनूं शकत नाहीं असाच आजपर्यंतचा अनुभव आहे. अर्थात् नाट्याच्या जगांत उगम पावलेल्या रसांच्या कल्पनेंत वैराग्यभक्त्यादि भावनांस वाव नव्हता ही गोष्ट अगदीं साहजिक व समुचित कशी होती हें लक्षांत येईल. पुढें रसभावादिकांचें विवेचन साहित्यशास्त्रानें आपलेसें करून घेतल्याबरोबर व्यापक विचारास सुरवात होऊन रसांच्या संख्येंत भर पडत चालली यावरूनही रसकल्पनेच्या संकुचिततेस नाट्यशास्त्रच कारण होतें हें दिसून येतें.

३५. रसविचाराला साहित्यशास्त्रानें मांडीवर घेतल्यावर त्याची वाढ व जोपासना सुरू झाली. नाटकाचें स्वरूप मनोविकारांस चेतविणारें, उत्तेजक असल्यामुळेंच त्याच्या विषयाला जी एक स्वाभाविक मर्यादा पडली होती तशी मर्यादा काव्याच्या साम्राज्यांत कधीं पडणेंच शक्य नव्हतें. अमुकच भावनांचा उत्कर्ष करावा व अमुक भावनांचा करूं नये असा काव्याच्या प्रांतांत कोण कोणाला निर्बंध करणार ? अर्थात् सांसारिक जगांतल्या शृंगार, वीर इत्यादि भावनांबरोबरच पारमार्थिक जगांतल्या सर्वभूतात्मभाव, क्षांति, तितिक्षा, वैराग्य, भक्ति इत्यादि भावनांनीं विलक्षणरें

काव्यही विवेचकांच्या नजरेस येऊं लागलें; व रसाच्या अष्टविभागात्मक व्यवस्थेंत अशा काव्याची कांहीं सोय लागत नाहीं असें दिसून येतांच रसतत्वाचा शास्त्रीय व व्यापक दृष्टीनें विचार सुरू झाला. ‘ निर्वेदस्थायिभावोऽस्ति शांतोऽपि नवमो रस: ’ असें म्हणून काव्यशास्त्रज्ञांनीं शांत या नवव्या रसाची प्रतिष्ठापना केली. भक्ति, दया, वत्सल, प्रेयान् वगैरे रस मानणारेही आणखी कांहीं आलंकारिक निघाले. परंतु हे रस कांहीं शेवटपर्यंत सर्वमान्य होऊं शकले नाहींत. रसांच्या उगमस्थानाचा जो छाप एकंदर रसविचारावर पडला तो कधींही पुसून जाऊं शकला नाहीं. हास्य, अद्भुत, बीभत्स हे एकंदर काव्यविस्ताराच्या मानानें अगदीं क्षुल्लक असलेले रस केवळ मुनिवचनाच्या आधारावर साहित्यशास्त्रांत कायमचें स्थान बळकावून बसले. तर भक्ति, वैराग्य, वत्सल, या महत्त्वाच्या रसांना जगन्नाथपंडितांसारखे स्वतंत्र विचाराचे व स्वत: उत्कृष्ट भक्तिपर काव्यें लिहिणारे रसिकही त्याच मुनिवचनाच्या मुरवतीस्तव मज्जाव करूं लागले.

३६. काव्यशास्त्राच्या इतिहासाच्या दृष्टीनें हा विचार झाला. परंतु मानवी अंत:करणाच्या प्रवृत्ति लक्षांत घेऊन अंतर्मुख दृष्टीनें विचार केल्यास या विषयाची दुसरीही एक उपपत्ति सुचवितां येते. शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य, भयानक, बीभत्स व रौद्र या आठ रसांच्या मुळाशीं असलेल्या भावना घेतल्या तर त्या सर्वजनसामान्य व स्वभावसिद्ध आहेत असें दिसून येईल. परस्पर सहवासापासून स्त्रीपुरुषांच्या मनामध्यें शृंगाराचा उद्भव होणें, आवडतें परंतु अवघड कार्य करणें असल्यास वीरवृत्तीचें स्फुरण होणें, भयानक वस्तूचें दर्शन झाल्याबरोबर भीति उत्पन्न होणें हे मनुष्यमात्राचे ठायीं अगदीं साहजिक रीतीनें दिसून येणारे विकार आहेत. हे सर्व विकार निसर्गानेंच मनुष्याच्या मनांत बीजरूपानें उत्पन्न केलेले असतात, व प्रत्येकाचे ठायीं या विकारांविषयीं एक प्रकारचें अशिक्षितपटुत्व वसत असतें. परंतु भक्ति व वैराग्य या भावना अशा नाहींत. या भावना मनुष्याच्या मनांत उत्पन्न होण्यास कांहीं एक संस्कार, पूर्वपरंपरा व परिस्थिति यांची आवश्यकता असते. या भावना कितीही उदात्त व कल्याणकारी असल्या तरी, त्या सहज किंवा निसर्गसिद्ध नव्हेत हें कोणासही पटेल. भक्तिप्रवण मनानें जन्मांत एकदांही ईश्वरापुढें नम्र न झालेले असे लक्षावधि लोक जगांत सांपडतील.* परंतु आजन्म

* नुसतें प्रेम म्हणजे भक्ति नव्हे. त्याचप्रमाणें भक्ति म्हणजे देवाबद्दल वाटणारी भीति नव्हे किंवा सामान्य आदरही नव्हे, हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. अगदीं

एकदांही ज्याला भीति वाटली नाहीं अगर स्त्रीप्रेमानें एकदांही ज्याचें मन विकृत झालें नाहीं असा मनुष्य जगतीतलावर अत्यंत दुष्प्राप्य होय. तेव्हां यावरून मनुष्यमात्रास सामान्य व नैसर्गिक असे जे मनोविकार तेच रसाच्या कल्पनेंत प्रथम गोवले गेले व विशिष्ट परिस्थिति किंवा संस्कार यांवर अवलंबून असलेल्या ज्या भक्ति, वैराग्य इत्यादि पारमार्थिक भावना त्या बाजूस सारल्या गेल्या अशीही उपपत्ति या बाबतींत सुचण्याजोगी आहे. भरतादि मुनींनां बुद्ध्याहून नैसर्गिक व अनैसर्गिक असें पृथक्करण करून भक्त्यादि रसांस बाजूस सारलें असें म्हणण्याचा अर्थातच भाव नाहीं; कारण अशा तऱ्हेचा युक्तिवाद कोणांही केलेला दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. परंतु रसाची कल्पना शास्त्रीय रीत्या निश्चित करतांना साहजिकपणेंच निसर्गसिद्ध व सर्वजनसामान्य अशा विकारांकडेच त्यांचें मन वळलें असावें असें मानणें शक्य आहे. ही उपपत्ति खरोखर कारणीभूत झालेली असो अथवा नसो, रसिकांच्या व मानसशास्त्रवेत्त्यांच्या परीक्षणार्थ ती येथें निवेदन केली आहे. तज्ज्ञांच्याकडून तिचें परिशीलन होऊन तिजविषयीं चर्चा झाल्यास फायदाच होणार आहे.

३७. संस्कृत साहित्यशास्त्रकार भक्तीला रस कां मानीत नाहींत याविषयीं हा विचार झाला. महाराष्ट्र साहित्याच्या दृष्टीनें पाहतां असा विचार करण्याची कांहीं जरूरी नाहीं. सामान्यतः मराठीमध्यें आपण भक्तीचा रस म्हणून उल्लेख करतों. मराठी साहित्यशास्त्र आपण जरी संस्कृतांतून सर्व घेतलें तरी संस्कृताच्या उसनवारीस अपवाद करून त्या शास्त्रांत भक्तिरसाचा समावेश आपणास करावा लागेल याविषयीं शंका नको. संस्कृतप्रमाणें नाट्यशास्त्राच्या परंपरेचें बंधन आपणास मुळींच असण्याचें कारण नाहीं, व भक्तीची भावना निसर्गसिद्ध आहे कीं नाहीं वगैरे वादांत तात्त्विक दृष्ट्या जरी कांहीं तथ्य असलें तरी महाराष्ट्रसाहित्याच्या प्रांतांत त्यास काडीइतकीही मातब्बरी नाहीं. कारण संतकवींच्या अपूर्व प्रभावामुळें महाराष्ट्रवाङ्मयांत भक्ति हाच सर्वांत नैसर्गिक व पट्टाभिषिक्त रस होऊन राहिला आहे. आमच्या जुन्या कवींनीं भक्तिप्रेमाचा इतका सुकाळ करून सोडला आहे कीं,

---

रानटी किंवा संस्कारहीन माणसाच्या मनांत भक्तीची भावना नसते. संस्कारवान् समाजांतही नास्तिक किंवा अज्ञेयवादी असे अनेक लोक असतात. याशिवाय आजन्म कर्कश व्यवहाराच्या उलाढालींत पूर्णपणें बुडून गेल्यामुळें ईश्वरविषयक विचार क्षणभरही ज्यांच्या मनास शिवला नाहीं अशा लोकांचीही संख्या या जगांत कमी भरेल असें नाहीं.

इतर रसच त्याच्यापुढें दीन व निस्तेज होऊन गेल्यासारखे भासतात. मराठी कवितेमध्यें भगवद्भक्तीचें स्थान इतकें मोठें व महत्त्वाचें आहे कीं भक्तीला रस न मानलें तर मराठींतील उत्तमोत्तम कविता बहुतेक सर्व नीरसत्वाच्या कोटींत ढकलावी लागेल. एकादे वेळेस शृंगार, हास्य, इत्यादिकांना बाजूस सारलें तर चालेल; परंतु भक्तीला ढकलून देऊन मराठी साहित्यकारांचें तरी निदान चालेल असें वाटत नाहीं.

> द्यावें हेंचि विभो ! अभीष्टवरदा ! देवा तुझीं पावलें
> चित्तीं नित्य असोत, सर्व म्हणजे या याचका पावलें ।
> प्रेमें गायिन युष्मदद्भुत यशें, नाचेन युष्मज्जनीं,
> पावो निर्वृति याद यादवपते ! पाथोधिच्या मज्जनीं ॥ कृ. वि. ६९.१५.

कृष्णाच्या अपार लीलांचें अवलोकन केल्यावर भक्तिप्रवण चित्तानें नारदांनीं काढलेले हे उद्गार, किंवा

> तो उत्तरीय वस्त्र प्रेमभरें उडउनी करी नृत्य ।
> भृत्य प्रभुचा झाला अमित भवांत भ्रमोनि कृतकृत्य ॥ ४३
> नाचे श्रुतदेव पुन्हां पूजेचा राहिला विधी अर्धा ।
> गंगाधर करि तांडव, त्यासीं यासींच लागली स्पर्धा ॥ ४८ कृ. वि. ८७.

हें श्रुतदेव ब्राह्मणाच्या पूजाविधींचें भक्तीनें पाझरणारें वर्णन, किंवा

> मन हेंचि फार इच्छी कीं आतां सेवणें तुझे पाय ।
> तुजवांचुनि इतरांच्या भजनीं मजलागिं होय फळ काय॥ आर्याकेकावलि ६३.
> श्रीकृष्णा ! दीनबंधो ! स्वजनसुरतरो ! पावना ! देवदेवा !
> जन्मीं जन्मीं स्वलीलाग्रथनकथन हे दे मयूरासि सेवा ॥ कृ. वि. ९०. ४६.

या भक्तीच्या उमाळ्यासरशीं पंतांच्या निर्व्याज अंतःकरणांतून निघालेल्या प्रार्थना; यांच्यामध्यें व अशाच सर्व महाराष्ट्र कवींच्या शेंकडों, हजारों सद्भावपूर्ण उद्गारांमध्यें जर रसोद्गम झालेला नाहीं असें मानावयाचें, तर जगाच्या कोणत्याही उत्तमोत्तम कवींच्या उक्तीमध्यें रसाचें अस्तित्व दाखवून देणें फार कठीण जाईल असें आम्हांस वाटतें.

३८. असो. भक्तिरसाची ज्यांत छटा नाहीं असे निर्मिश्र शृंगारादि रस देखील पंतकाव्यांत कोठेंच सांपडणार नाहींत असें नाहीं. कृष्णविजयाच्या ५५ व्या अध्यायांतील मायावती व प्रद्युम्न यांची हकीकत हें एकामागून एक येणाऱ्या निर-

निराळ्या रसच्छटांचें एक सुंदर उदाहरण आहे. जन्मल्याबरोबर शंबरानें हरण करून समुद्रांत टाकलेल्या व कोळ्याच्या हातीं लागून पुनः शंबरासुराकडेच आणला गेलेल्या बालप्रद्युम्नाची हकीकत प्रथम अद्भुतरस उत्पन्न करिते. नंतर प्रद्युम्न तारुण्यांत आल्यावर मायावतीची त्यास ओळख पटून दोघांच्या प्रणयास सुरवात होते न होते तोंच मायावतीच्या तोंडून प्रद्युम्नास त्याची बालवयींची हकीकत कळल्यामुळें तो तात्काल क्रोधाविष्ट होतो व शंबराचें त्याचें युद्ध जुंपतें. येथें वाचकांस वीररसाचा अनुभव घडतो. नंतर शंबरास मारून गगनमार्गें मायावती व प्रद्युम्न द्वारकेस येतात. तेथें 'हा यदुपतिशम नरमणी' कोण हें कळल्यानंतर रुक्मिण्यादि मातांस वात्सल्याचें भरतें येतें व पुढें अध्यायसमाप्तीपर्यंत वात्सल्याचेंच पोषण होत असतें. उषाअनिरुद्धसंगमाचा ६२वा अध्यायही असाच शृंगाराच्या दृष्टीनें रमणीय वठला आहे. परंतु साठाव्या आध्यायांत पंतांनीं याहीपेक्षां बहार केली आहे. कृष्णाच्या कृतककोपयुक्त भाषणानें शोकविव्हल होऊन मूर्च्छित झालेल्या रुक्मिणीचें वर्णन व त्यानंतर सावध होऊन कृष्णाच्या अनुनयानें प्रसन्नचित्त झालेल्या रुक्मिणीचें वर्णन, हीं दोन्ही वर्णनें फार मनोरम वठलीं आहेत. ईर्ष्याजनित विप्रलंभानंतर प्रियकराच्या अनुनयानें उत्पन्न झालेल्या प्रणयाचें वर्णन फारच खुलतें आहे. मूळ भागवतांत या अध्यायांत लांबलचक व कंटाळवाणीं भाषणें आहेत. परंतु पंतांनीं परमात्मा व जगन्माता यांच्या प्रणयाचा हा प्रसंग थोडक्यांत परंतु बहारीनें व नाजूकपणानें वर्णन केला आहे.

पंतकाव्यांतल्या वीररसात्मक स्थलांचा येथें निर्देश करण्याचें किंवा त्यांतील उतारे येथें देण्याचें कारणच नाहीं. पंतांचें महाभारत किंवा मंत्ररामायणाचें युद्धकांड वाचणाऱ्यांच्या तो सहज कोठेंही लक्षांत भरण्याजोगा आहे. युद्धोत्साहाचें व रण-धुमाळीचें वर्णन करितांना पंत इतके आवेशांत येतात कीं, जणूं काय ते स्वतः नुकतेच रामरावणांचें अगर भीष्मार्जुनांचें युद्ध स्वतः पाहून आले आहेत ! पंत हे पूर्व जन्मीं स्वतः कोणी तरी अद्वितीय पराक्रमशाली वीर असावेत व त्या जन्मीं त्यांची पराक्रमाची लालसा अपूर्ण राहिलेली असून ती ते या जन्मीं वीरोत्साहाच्या सळसळणाऱ्या वर्णनानें तृप्त करून घेत असावे ! एरवीं जन्मभर पुराणिकाचा धंदा करणाऱ्या या सात्विक ब्राह्मणाच्या काव्यांत असा अप्रतिम वीररस कशा उतरता ना !

शृंगार व वीर यांखेरीज इतर कांहीं रसांचीं सहज आढळलेलीं थोडींशीं उदाहरणें येथें दाखल करूं. प्रसंगीं शृंगार व वीर यांपेक्षांही प्रभावी होणारा व रसि-

कांचें हृदय विरघळून टाकणारा करुण रस पंतांच्या काव्यांत क्वचित् प्रसंगींच परंतु चांगल्या रीतीनें पुष्ट झालेला आढळतो. पुढील चार आर्यांचें अवतरण हें या रसाचें ल्हानसें व परंतु हृदयस्पर्शी उदाहरण आहे. युद्धभूमीवर मूर्छित झालेले रामलक्ष्मण सीतेला दाखविण्यांत आले तेव्हां त्यांना मेलेले समजून सीता विलाप करते.—

हा देवर ! तुजला मीं पंचवटीमाजि गांजिलें, बापा !
न वदावें तें वदल्यें, म्हणउनि रुसलासि काय निष्पापा ? ॥ ३५५
त्रिभुवनभयहि न हरिलें, स्वरत्नहरदस्यु मारिला नाहीं ।
मज टाकुनियां गेला स्वर्गाला कार्य न करुनी कांहीं ॥ ३५६
त्यजिलें जरि मज, तरि हें राहो, तुज विषयरुचि नसे, शांता ! ।
त्यजिली कशि धर्मज्ञा ! वृद्धा विधवेकनंदना माता ? ॥ ३५८
यापरि बाष्पजलाविलनेत्रा धात्रीसुता विलाप करी ।
त्रिजटा तेव्हां तीतें समजावी, लोचनें पुसूनि करीं ॥ ३५९ मं.रा.युद्ध.

कुंभकर्ण निजला होता. त्यास जागा करण्यासाठीं राक्षसांनीं जे दीर्घ प्रयत्न केले त्यांचें पुढील वर्णन मोठें मजेदार व हास्यरसाचें सुंदर उदाहरण आहे.

एक सहस्र महारव दुंदुभि संताडिले कितेकांहीं ।
मुद्गरमुसलें करिती ताडन परि लागती न ते कांहीं ॥ ४३६
शतसंख्याक जळाचे कुंभहि आणूनि रिचविले कानीं ।
केशोन्मूलन जालें, केले निजकंठ शुष्क हाकांनीं ॥ ४३७
चाउनियां काय बळें धांवति आंगावरूनियां, हसती ।
मृतवन्यगजास जसे वायसगण वेष्टिती तसे दिसती ॥ ४३८
दशशत गज देहावर चालविले, ताडिला शिलाशिखरें ।
निद्रापराजयास्तव केलें त्यांहीं प्रसिद्ध युद्ध खरें ! ॥ ४३९ मं. रा. युद्ध.

अद्भुतरसाचा मासला कृष्णविजयाच्या ५५ व्या अध्यायांत दिसून येतो. त्याचा मागें उल्लेख केलाच आहे. वत्सलरस तर काय पंतांच्या काव्यांत शेंकडों ठिकाणीं अत्यंत रमणीय तऱ्हेचा आढळून येतो. श्लोककेकावलि हें काव्य सर्वच मुग्धसुंदर वत्सलरसाचें उदाहरण आहे. पंत हे स्वतः वात्सल्याची मूर्तीच असे प्रेमळ पितें होते असें त्यांच्या काव्यांवरून दिसून येतें. मातापितरें व बालक यांच्यामधील दिव्य प्रेमाचें वर्णन त्यांनीं फारच स्नेहार्द्रतेनें केलें आहे.

[३]

३९. आतांपर्यंत निरनिराळ्या दृष्टींनीं विवेचन करून पंतकाव्याचें स्वरूप वाचकांच्या डोळ्यांपुढें ठेवलें. काव्याचीं दोन प्रमुख अंगें जीं कल्पनाविलास व भावनांचा उल्लास तीं दोन्ही पंतांच्या काव्यांत कितपत दृष्टीस पडतात हें मुख्यतः आतांपर्यंत दर्शविलें. या दोन्ही बाबतींत पंतांची कविता किती संपन्न आहे व या संपन्नतेमुळें तिला किती मनोहारित्व प्राप्त झालें आहे हें या विवेचनावरून कोणाच्याही लक्षांत येईल. तथापि हें सर्व विवेचन बाह्य लक्षणांवरून अंतर्गत वस्तूचा अंदाज बांधावा तसें झालें. उच्च दर्जाच्या काव्याचीं सर्व लक्षणें पंतकृतींत आढळून येतात असें वर दाखविलें. अर्थातच यावरून पंतकृतीला उच्च काव्यांत गणलें पाहिजे असा सिद्धान्त वाचकांच्या गळीं बांधल्याप्रमाणें झालें. परंतु ज्या एका गोष्टीमुळें, भारतरामायणांचीं कथानकें जशींच्या तशीं उतरण्याचें भारवाहकासारखें वाटणारें काम करून सुद्धां, पंतांच्या ग्रंथांत उत्कृष्ट कवित्व प्रकट होऊं शकलें त्या गोष्टीची आतां परिस्फुटता करावयाची आहे. दूषकांच्या व आक्षेपकांच्या लक्षांत जी गोष्ट कधींच आली नाहीं व समर्थकांच्या विवेचनांतही जी गोष्ट आजपर्यंत स्पष्टपणें मांडली गेली नाहीं अशा काव्यजीवनाधारभूत गोष्टीचा किंवा तत्त्वाचा आम्हांस येथें उल्लेख करावयाचा आहे.

४०. महाभारताचें भाषांतर मुक्तेश्वरानें केलें आहे, पंतांनीं केलें आहे व अलीकडे चिपळूणकर मंडळीनेंही केलें आहे. आतां इतर दृष्टींनीं चिपळूणकरांच्या भाषांतराची जी उपयुक्तता आहे ती बाजूस ठेविली तर तें भाषांतर म्हणजे मोठा उत्कृष्ट वाङ्मयग्रंथ आहे किंवा तें फार मनोरम काव्य आहे असें म्हणणारा हरीचा लाल आजपर्यंत कोणी निघाला आहे असें दिसत नाहीं. पण हें भाषांतर अलीकडचें आहे म्हणून लोकांच्या पुराणप्रियतेस अनुसरून त्यास मान मिळत नाहीं अशी यावर कोणी क्लृप्ति काढील. यासाठीं त्या जुन्या काळांतली पंचोपाख्यानाची बखर (पंचतंत्राचें भाषांतर) आहे तीच घेऊं. तिला शिरीं धरून वामनमयूरांच्या जोडीस बसविणारे किती वाङ्मयविवेचक आजपर्यंत निघाले आहेत ? भाषांतरें कांहीं मराठींत आजवर थोडीं थोडकीं झालीं नाहींत. विशेषतः या इंग्रजी अमदानींत तर भाषांतरांचा एकसारखा तडाखा सुरू आहे. यांपैकीं कित्येक भाषांतरें परभाषेंत उत्तमोत्तम मानलेल्या ग्रंथांचींही होतात. शेक्सपीयरच्या नाटकांपैकीं आजवर कांहीं नाहीं तरी १५।२० नाटकांचीं भाषांतरें झालीं असतील. यांतील कांहीं नाटकें चांगल्यांपैकीं उतरलीं असून कांहींमध्यें स्वतंत्र कल्प-

नाशक्तीही थोडी बहुत प्रकट झालेली दिसून येते. मध्यें ग्रंथमाला मासिक पुस्तकांत व दाभोळकरांच्या ग्रंथमालेंत तर भाषांतरांची गर्दीच उडाली होती. गिबनचें भाषांतर करण्याचा प्रयत्न झाला. फ्रीमनचा इतिहास मराठींत आला. बर्कचा अधुनिक असंतोष मराठींत अवतरला. मिल्टन्स्पेन्सरादिकांना त्यांच्या भक्तांनीं मराठी पेहेराव दिला. कार्लाइलसारख्या क्रांतिकारक, ओजस्वी लेखकाच्या ग्रंथांचेंही भाषांतर करण्याचे अलीकडे प्रयत्न झाले आहेत. मग या सर्व भाषांतरबहाद्दरांना मयूरमुक्तेश्वरांच्या पंक्तीस आणून बसविण्यास काय हरकत? परंतु मयूरमुक्तेश्वरांना एकाहून एक जाडे भक्त लाभतात व बिचाऱ्या भाषांतरांना प्रसिद्धीनंतर कांहीं थोडक्या वर्षांनीं वास्तपुस्त करणाराही कोणी भेटत नाहीं असा प्रकार कां व्हावा?

असा प्रकार होण्याचें कारण केवळ मयूरमुक्तेश्वरांचें नशीब जोरावर आहे व इतर भाषांतरकारांचें अदृष्ट खडतर आहे, हें नव्हे. तर मयूरमुक्तेश्वरांची कृति हें खरें जिवंत वाङ्मय आहे व बाकीचीं निवळ भाषांतरें आहेत हें होय. वर्ण्यविषयाशीं तादात्म्य होऊन स्वयंस्फूर्तीनें अंतःकरणापासून निघालेले उद्गार हें वाङ्मय होय. दुसऱ्याचे विचार, दुसऱ्याच्या भावना व दुसऱ्याचा अर्थ घेऊन तो आपल्या भाषेंत उतरणें हें भाषांतर होय. असलें निर्जीव भाषांतर आमच्या मयूरमुक्तेश्वरांनीं केलेलें नाहीं.

४१. सर्व उच्च दर्जाच्या अभिजात कलेचा **तन्मयता** (Sincerety) हा केवळ प्राण होय असें पाश्चात्य विवेचकांचें देखील म्हणणें आहे. मनुष्यानें आपल्या श्रेष्ठ मानसिक शक्तींच्या योगानें स्वतःच्या सौंदर्यपिपासु मनाचें समाधान करण्याकरितां ज्या कला निर्माण केल्या आहेत त्यांमध्यें वाङ्मय हा सर्वांत श्रेष्ठ अशी कला होय. या वाङ्मयी कलेच्या निर्मितीस तन्मयतेची अर्थातच आवश्यकता असते. तन्मयता किंवा मनःपूर्वकता हा वाङ्मयाचा प्राण होय. विचारांनीं अगर भावनांनीं अंतःकरण भरून जाऊन अंतःप्रेरणेसरशीं ते विचार अगर त्या भावना बाहेर पाडल्या म्हणजे तें वाङ्मय होतें.

ही वाङ्मयाची उपपत्ति काव्यास तर विशेषच समर्पकतेनें लागू पडते. अंतःकरणांत उत्कट रीतीनें बिंबलेली व अंतःकरणाचा बांध फोडून बाहेर येऊं पाहणारी भावना ज्या वाङ्मयस्वरूपांत प्रकट होते तेंच काव्य होय. क्रौंच पक्ष्यांच्या जोडप्यापैकीं एकास मारलेलें पाहून वाल्मीकि मुनींस झालेला शोकच श्लोकाच्या

रूपानें बाहेर पडला अशी जी आदिकवीच्या विषयीं कथा आहे तिच्यांतील मर्म हेंच आहे. कोणताही विषय अंतःकरणांत भिनला, त्याच्याशीं मनाचें पूर्णपणें तादात्म्य झालें म्हणजे तो विषय शब्दांच्या रूपानें बाहेर प्रकट करण्याची स्फूर्ति होते. अशा स्फुरण पावणाऱ्या अंतःकरणाचे जे उद्गार तेंच वाङ्मय होय व तेंच काव्य होय. स्वतः वर्णन करणाऱ्याच्या मनाला ज्यांनीं तन्मय करून सोडलेलें असतें तेच विचार वाचणाऱ्यालाही तन्मय करून सोडतात. ज्या शब्दांमध्यें आपल्या मनाचें सामर्थ्य लेखकानें ओतलेलें असतें तेच शब्द वाचकाच्या मनाला भारूं शकतात, त्याच्या मनावर ताबा चालवूं शकतात.

४२. तेव्हां तुकारामएकनाथांना टाळकुटे किंवा मयूरमुक्तेश्वरांना भाषांतरें म्हणून त्यांची कुचेष्टा न करितां या सारग्राही दृष्टीनें त्यांच्या कृतींकडे बघितलें पाहिजे. तुकारामादि संतमंडळी एकसारखी जन्मभर टाळ कुटीत बसली असतील. पण त्या टाळकुटीमध्यें त्यांनीं आपलें अंतःकरण, आपलें सर्वस्व ओतलें होतें ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. वर्ण्यविषयाशीं त्यांचें इतकें तादात्म्य, इतकी तन्मयता झाली होती कीं, त्यासरशीं अत्यंत करुण व भक्तिरसार्द्र असें कवन त्यांच्या कंठांतून बाहेर पडलेलें आहे. त्यांनीं हृदयांशीं धरलेल्या अखंडप्रेममय परमेश्वराच्या ठायीं

आणीक कोणाचा न करीं मी संग । जेणें होय भंग माझ्या चित्ता ॥
विठ्ठलावांचूनी आणीक जे वाणी । नायकें मीं कानीं आपुलिया ॥
समाधानासाठीं बोलिलों हे मात । परी माझें चित्त नाहीं कोठें ॥
जिवाहूनी मज तेची आवडती । आवडे ज्यां चित्तीं पांडुरंग ॥

इतकी तदाकार वृत्ति त्यांची झाली होती. आणि या तन्मयतेचें सामर्थ्य येवढें मोठें आहे कीं, आज शेंकडों वर्षांनंतर त्यांचे उद्गार आमच्या चित्तवृत्ति हालवून टाकीत आहेत. हे त्यांचे जिवाभावाचे बोल आहेत म्हणूनच ते आमच्या जिवाशीं जाऊन भिडतात, व या कृत्रिम धडपडीच्या काळांतही अंतःकरणास समाधान व शांति प्राप्त करून देतात.

४३. जें विवेचन तुकाराम एकनाथादि संतमंडळींच्या उद्गारांस लागू पडतें तेंच भाषांतरें मानलें गेलेल्या मयूरमुक्तेश्वरांच्या उक्तींसही लागू पडणारें आहे. त्यांच्या काव्यांचा विशेष परिचय करून न घेतां वरवर विचार करणारांस, त्यांनीं केवळ भारतरामायणादिकांचा तरजुमा केला आहे असें वाटण्याचा संभव आहे; परंतु खरोखर स्थिति तशी नाहीं. भारतरामायणांतल्या कथा व अनेक पुराणां-

तल्या भगवद्भक्तांच्या कथा यांत त्यांचें मन पूर्णपणें रंगून समरस होऊन गेलें होतें. भारतरामायणांत ग्रथित केलेला इतिहास व त्यांतील अनेक अद्भुत कथा ह्या आज हजारों वर्षें आमच्या सर्व कवींच्या स्फूर्तींचा मूलाधार होऊन बसल्या आहेत.

इतिहासोत्तमादस्माज्जायन्ते कविबुद्धयः ।
इदं कविवरैः सर्वैराख्यानमुपजीव्यते ।

असे प्रौढीचे उद्गार महाभारतकारांनीं स्वतःविषयीं काढले आहेत, ते सर्वस्वीं यथार्थच आहेत. शतशः धीरोदात्त पुरुषांच्या चरित्रांच्या व राष्ट्रीय विचारांच्या खाणीच असलेल्या या ग्रंथामध्यें आमचे कवि सर्वस्वीं बुडून गेले होते. त्यांचें अंतःकरण केवळ तदाकार झालें होतें. त्या भारतीय कथानकांतील, किंवा श्रीकृष्णाच्या चरित्रांतील व्यक्ति त्यांच्या डोळ्यांसमोर नाचत होत्या. तन्मय होऊन स्वतःच्या अंतःकरणवृत्तीनें श्रीकृष्णाचें चरित्र जर ते प्रत्यक्ष अनुभवीत होते तर प्रसंगविशेषीं गोपगोपींचें व यशोदामातेचें प्रेम त्यांच्या अंगीं संचरत असल्यास त्यांत काय नवल ? भीष्मार्जुनांचा तुमुल युद्धप्रसंग पंतांच्या डोळ्यांसमोर घडून येत होता व त्याचे संजयापेक्षांही उत्साही वार्ताहर ते बनले होते. भीष्मनिर्याणाचा पवित्र प्रसंग मनश्चक्षूंनीं अनुभवून त्यांचें मन आनंदोर्मींनीं भरून गेलें होतें. इतकें कीं, तो आनंद त्यांच्या मनांत मावेना ! त्या आनंदाला काव्याच्या रूपानें वाट फोडणें सरतेशेवटीं त्यांना भाग पडलें.

४४. अशा रीतीनें मयूरमुक्तेश्वरादि कवि वर्ण्यविषयांत पूर्णपणें गढून जाऊन एकतान बनले होते म्हणूनच त्यांच्या वर्णनांत एक प्रकारचा ताजेपणा, आवेश व मनःपूर्वकता आली आहे. जुन्या कथांत वर्णिलेलीं कथानकेंच जरी त्यांनीं पुनः वर्णिलीं असलीं तरी तीं अशा रीतीनें आत्मसात् करून घेऊन व स्वतःच्या अंतःकरणवृत्तींचा छाप त्यांच्यावर मारून वर्णिलीं असल्यानें त्यांस भाडोत्री तरजुम्याचें स्वरूप मुळींच आलेलें नाहीं.

काव्य कराया जित्या जिवाचें जातिवंत करणेंच हवें ।

असें एका आधुनिक कवीनें म्हटलें आहे त्याप्रमाणें आमच्या जुन्या महाराष्ट्र कवींचें काव्य ही जातिवंत करणीच आहे. त्यांचे स्वतंत्र भक्तिपर उद्गार पहा किंवा भारतरामायणांतील कथांचे अनुवाद पहा. त्यांच्या अंतःकरणांत ज्या भावना उचंबळत होत्या किंवा त्यांच्या हृत्पटलावर जीं चित्रें उमटत होतीं त्यांचेंच त्यांनीं भाषेच्या दर्पणांत प्रतिबिंब वठविलें आहे. वर्ण्यविषयाशीं झालेलें तादात्म्य

त्यांच्या वाणींत पूर्णपणें उतरलेलें दिसतें. म्हणूनच जुन्या कवींचे अभिमानी ' त्यांच्या वाणीशीं प्रत्यक्ष परिचय करून घ्या म्हणजे परपुष्टतेविषयींचे तुमचे आक्षेप आपोआप निघून जातील ' असें आव्हान आक्षेपकांना मोठ्या विश्वासानें सहज देऊं शकतात. हें तादात्म्य व ही मनःपूर्वकताच खऱ्या वाङ्मयाची खूण होय. सध्यांच्या चिकित्सेच्या काळांत जुन्या कवींच्या त्या तन्मयतेची आपणास कदाचित् कल्पनाही येणार नाहीं. सध्यांच्या सुशिक्षित समाजाची जुन्या कथांशीं व परंपरागत विचारांशीं तादात्म्य पावण्याची शक्ति नाहींशी होत चालली आहे व बाहेरून आलेल्या नवीन विचारांशीं एकरस होण्याची प्रवृत्ति वाढत चालली आहे. परंतु आमच्या जुन्या कवींची अशी अर्धवट स्थिति होण्याचें कारणच नव्हतें. ते अगदीं निर्धास्त, विश्वस्तचित्त व स्थिरमति होते. त्यांचीं भाविक अंतःकरणें परमेश्वराच्या लीलांनीं व प्राक्कालीन वीरांच्या विक्रमकथांनीं गुंगून गेलीं होतीं व त्याच कथा जिवंत वाणीनें व तदाकार झालेल्या वृत्तीनें ते त्या वेळच्या श्रद्धायुक्त समाजास निवेदन करीत होते. त्यांनीं वर्णिलेलीं कथानकें जुनींच आहेत म्हणून त्यांच्या वर्णनाला कांहीं जुनेपणा किंवा शिळेपणा आलेला नाहीं. तसें पाहिलें तर दुसऱ्याचीं कथानकें उसनीं न घेतां आपलीं स्वतंत्र कथानकें निर्माण करणारे कवि कितीसे झाले आहेत ? आजपर्यंतच्या सर्व मोठमोठ्या कवींनीं जुनीं, इतरांनीं वर्णिलेलीं कथानकें घेऊन त्यांवरच आपली करामत खर्चिली असल्याचें दिसून येतें. कालिदासाच्या काव्यनाटकांपैकीं एकाही काव्याचें (मेघदूत खेरीज करून) अगर नाटकाचें कथानक स्वतंत्र कल्पिलेलें नाहीं. जी स्थिति कालिदासाची तीच शेक्सपीयर बोवांची. यांनीं आपल्या नाटकांचीं कथानकें सर्व उसनीं घेतलीं आहेत. कांहीं कथानकें होलिनशेडच्या बखरींतून, कांहीं प्लुटार्कच्या चरित्रांमधून व कांहीं फ्रेंच, इटालियन, इ० भाषांतील निरनिराळ्या गोष्टींच्या पुस्तकावरून घेतलेलीं आहेत. नुसतीं कथानकें घेऊनच हे राजश्री राहिलेले आहेत असें नव्हे तर प्लुटार्कच्या चरित्रांमधून कांहीं प्रसंग व कांहीं भाषणें देखील बहुतेक शब्दशः यांनीं आपल्या नाटकामध्यें उतरलीं आहेत. मिल्टननें तर बायबलच्या जुन्या व नव्या करारांतील कथानकच आपल्या Paradise Lost व Paradise Regained या काव्यामध्यें अनुक्रमें वर्णिलें आहे, हें सुप्रसिद्धच आहे. परंतु या सर्व कवींना कोणी भाषांतरे म्हणत नाहीं. कारण वर्ण्यविषयाच्या अंतरंगांत शिरून त्याच्याशीं तादात्म्य पावून त्याचें रसिकग्राह्य असें सुंदर स्वरूप त्यांनीं वाचकांपुढें

ठेवलें आहे. मग हीच गोष्ट आमच्या मुक्तेश्वरवामनमयूरादि कवींनीं केली असतां ती परपुष्ट व कुचकामाची कशी ठरते हें समजणें कठीण आहे. स्वतंत्र कल्पित कथानकें रचणें हें कवित्वाचें अंग होय ही कल्पनाच मुळांत चुकीची आहे. कल्पित कथानकें रचणें ही अगदीं निराळी कला आहे. ती कादंबरीकाराच्या ठिकाणीं अवश्य आहे परंतु कवीच्या ठायीं आवश्यकच आहे असें नाहीं.

४९. आमच्या महाराष्ट्र कवींनीं भारतरामायणांच्याच कथा आधारास घेतल्या ही गोष्ट खंती बाळगण्या जोगी झाली नसून अत्यंत योग्य अशीच झाली आहे. उलट आपल्या काव्यासाठीं स्वतंत्र कथानकें रचणें त्यांना भाग पडलें असतें तर त्यांची काव्यरचना इतकी उठावदार व इतकी सुंदर झाली नसती असेंच आम्ही म्हणतों. 'विठ्ठलावांचूनी आणीक जे वाणी । नायकें मी कानीं आपुलीया ॥' असें म्हणून तिन्ही त्रिकाळ हरिनामाचा गजर करणारे तुकोबा तर राहोतच परंतु काव्य-निर्मितीचा उद्देश पुष्कळ अंशीं पुढें ठेवून चालणारे जे मयूरमुक्तेश्वरादि त्यांना विधवांच्या दुःखावर एकादें करुणरस पूर्ण काव्य लिहावयास सांगितलें असतें तर काय थाट उडाला असता याची कल्पना करणें अवघड नाहीं. भारत-भागवतांतील त्याच त्या कथा वर्णन करीत बसण्याच्या ऐवजीं त्या वेळच्या महाराष्ट्राच्या इतिहासाकडे लक्ष पुरवून महाराष्ट्रीय वीरांच्या अद्भुत पराक्रमांवर या कवींनीं काव्यें लिहिलीं नाहींत याबद्दल हळहळ वाटणाऱ्या रसिकांची गैरसमजूत देखील अशा तऱ्हेचीच होय. इतरांच्या प्रेरणेवरून कवि कधीं काव्यें रचीत नसतो; त्याच्या हृदयांत जें स्फुरतें तेंच काव्यरूपानें बाहेर प्रकट होतें. एकाद्यानें स्वेच्छेनें सुलक्षणी गाईचें दान दिलें असतां त्यानें घोडा कां दिला नाहीं असें म्हणून उलट त्याच्यावरच ठपका ठेवण्यासारखेंच हें राष्ट्रेतिहासप्रेमी लोकांचें रुसणें होय. शिवाजी महाराजांसारख्या राष्ट्रोद्धारक वीरपुरुषांच्या कथा त्यावेळच्या कवींच्या हृदयास उत्कटतेनें भासमान झाल्या नाहींत, त्यांत त्यांचें हृदय तन्मय होऊन गेलें नाहीं; अर्थात् व त्या कथा त्यांच्याकडून काव्यरूपानें ग्रथित होऊं शकल्या नाहींत. आतां या कथा उत्कट रीतीनें त्यांच्या मनावर न बिंबण्यास तरी काय कारणें होतीं हें पाहिलें असतां त्यांचीं प्रामुख्यानें परमार्थ-प्रवण बनलेलीं अंतःकरणें हें एक कारण तर उघड दिसून येतेंच. त्यांचीं अंतः-करणें परमेश्वरभक्तींतच मुख्यतः तन्मय होऊन गेलीं असल्या कारणानें व्यावहारिक जगांतल्या घडामोडी कितीही उदात्त वा रमणीय असल्या तरी त्या त्यांच्या मना-

वर विशेष उत्कट परिणाम करीत नसत. परंतु या एका कारणाशिवाय दुसरें कारण ही महत्वाचें व अवश्य लक्षांत घेण्याजोगें आहे. मोरोपंतादि कवींच्या वेळेस मराठे वीरांचे पराक्रम अगदीं नवे ताजे होते. त्यांपैकीं कांहीं त्यांच्या काळाच्या पूर्वी नुकतेच घडून आले होते व कांहीं तर प्रत्यक्ष त्यांच्या डोळ्यासमोरच घडून येत होते. आणि वर्तमानकालीन, किंवा समीपवर्तिभूतकालीन वृत्तांत मनुष्याच्या मनास उत्कटत्वानें भासत नाहींत, त्यांचें सौंदर्यसर्वस्व त्याच्या डोळ्यांत भरत नाहीं, असा सामान्य नियम आहे. कोणत्याही वस्तूचें जवळून निरीक्षण केल्यास तिच्यांतील दोषच विशेष लक्षांत येतात; तिच्या सौंदर्याचा अनुभव घ्यावयाचा असल्यास दुरूनच तिचें निरीक्षण करावें लागतें. नाटक हें दिव्यांच्या झगझगाटांत दूर बसूनच अवलोकावें; अगदीं जवळ जाऊन नटांचें निरीक्षण केल्यास तोच रस उत्पन्न होईल अशी अपेक्षा कोणीं धरूं नये. चित्रकारांचीं चित्रेंही विशिष्ट अंतरावरूनच पहावींत, त्यापेक्षां जवळ जाऊन पाहूं नयेत असा नियम असतो. तेव्हां या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या असतां ज्या घडामोडी पंतांच्या कालीं अगदीं निकटवर्ती होत्या किंबहुना ज्या घडामोडींमध्यें ते स्वतः वावरत होते त्यांची अद्भुतरम्यता त्यांस उत्कटत्वानें भासमान झाली नाहीं यांत त्यांचा कांहींच दोष नाहीं हें दिसून येईल. अत्यंत प्राचीन किंवा काल्पनिक कथा याच मनुष्याच्या अद्भुतरम्य भावनांचें पोषण करूं शकतात. निकटवर्ती वृत्तांतामध्यें ती अद्भुतरम्यता येऊं शकत नाहीं. आजपर्यंतच्या सर्व महाकवींचीं उत्कृष्ट काव्यें अत्यंत प्राचीन इतिहासावर व काल्पनिक कथानकांवरच रचलेलीं आहेत. तेव्हां पानपतचा वृत्तांत तर राहोच परंतु शिवाजीच्या चरित्रावरही महाकाव्य होण्याचा समय पंतकालीं आलेला नव्हता. पंत हे एक भाविक अंतःकरणाचे भोळसट पुराणिक होते (वस्तुतः ते तसे नव्हतेच) असें मानलें तरी त्यांना निरनिराळ्या विषयांवर काव्यें लिहिण्यास सांगणाऱ्या अनेक सद्गृहस्थांपैकीं एकायानें तरी, सध्यां आपणास स्फूर्तिदायक व अद्भुत वाटणाऱ्या मराठ्यांच्या इतिहासावर काव्य लिहिण्यास त्यांना कां सांगूं नये? बाबा पाध्ये भर्तृहरीच्या कथानकांचें भाषांतर करण्यास सांगतात, पांडुरंगराय हरिवंश लिहिण्यास सांगतो, तर सदाशिव पाध्ये 'कृष्णामाहात्म्य' च मराठींत उतरण्याची आज्ञा करतो! तात्पर्य, त्यावेळीं घडत असलेला मराठ्यांचा इतिहास तत्कालीन समाजाच्या मनांत अद्भुतरम्य कथांच्या रूपानें बिंबलेला नव्हता असेंच दिसून येतें. शिवाय पारतंत्र्यामध्यें गढलेल्या सध्यांच्या लोकांना विरोधामुळें पूर्वीचा

इत्तराज्याचा काल अत्यंत उज्ज्वल व आदरणीय वाटतो तसा त्या कालांतच वावरणाऱ्या पंतादिकांना वाटण्याचें कारण नव्हतें. तात्पर्य पंतांचें मन ज्या प्राचीन कथांमध्यें व विचारांमध्यें रमलें त्या कथांचा व त्या विचारांचाच त्यांनीं मनापासून एकाग्र वृत्तीनें उच्चार केला. आणि हीच गोष्ट एकंदरीनें योग्य झाली. असें ते न करते तर त्यांच्या कृति नीरस व फिक्या उतरून महाराष्ट्राच्या जिवंत वाङ्मयांत आज जें त्यांना उच्च स्थान आहे तें कधींही प्राप्त झालें नसतें. ते कांहीं धंदेवाईक ग्रंथकार नव्हते; परमेश्वरभक्तीचा किंवा वाङ्मयसेवेचा त्यांनीं व्यावहारिक दृष्टीनें धंदा चालविला नव्हता. जे विचार, ज्या भावना व जीं राष्ट्रिय कथानकें त्यांच्या मनांत दाटून बाहेर वाट शोधूं लागलीं त्यांना त्यांनीं भाषेच्या द्वारा बाहेर पडण्यास वाट दिली येवढेंच. हाच त्यांचा निरपेक्ष व्यवसाय होता व त्यांतच त्यांना समाधान वाटत होतें. स्वतः पंत आपल्या मनाची ही तृप्त वृत्ति पुढील सुंदर शब्दांनीं प्रकट करतात.—

सजलजलदश्यामा ! रामा ! मनीं सुख वाटतें,
चरितचि तुझें भावें गावें असें मज वाटतें ।
जनकतनयाकांता ! शांताकृते ! रघुनायका !
पुरिव सदया ! कामा या माधवा ! वरदायका ! ॥

४८. या दृष्टीनें विचार केला म्हणजे आधुनिक सुशिक्षितांमध्यें जुन्या कवितेविषयीं अनादर किंवा निदान उपेक्षाबुद्धि जी आढळते तिचें कारणही डोळ्यांना स्पष्ट दिसूं लागतें. इंग्रजी झाल्यापासून आमच्या समाजाचें अंतर्बाह्य स्वरूप एकदम विलक्षण रीतीनें पालटून गेलें आहे. समाजाचे आचार, विचार व भावना यांच्यामध्यें आमूलाग्र क्रांति होऊन गेली आहे हें विशेष फोड करून कोणाला सांगण्याची जरूरी नाहीं. ज्ञानदेवांच्या पूर्वींच्या यादवराजांपासून इंग्रजी होईपर्यंतची ६०० वर्षांची महाराष्ट्राची परंपरा एकीकडे व इंग्रजी झाल्यापासूनची गेल्या शंभर वर्षांतील विचारपरंपरा एकीकडे अशी स्थिति झाली आहे. पूर्वींचें तें भाविक वातावरण व श्रद्धाळू विचारसरणी अलीकडच्या निदान सुशिक्षित समाजांतून तरी अजीबात नाहींशी झाली आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. जुना अनुभव, जुने विचार, जुन्या भावना या सर्व गेल्या व त्यांच्या जागीं नवीन विचार, नवीन कल्पना, नवीन आकांक्षा येऊन उभ्या राहिल्या. जुने ज्ञानाचे कांहीं मार्ग व कांहीं दिशा लुप्त झाल्या; परंतु त्याबरोबरच हजार दिशांनीं फुटणाऱ्या ज्ञानाच्या अनंत

शाखांच्या वृक्षाखालीं आपण उभे आहोंत, असें दृश्य आमच्या प्रत्ययास आलें. अर्थात् जुने विचार, जुन्या भावना व जुन्या आकांक्षा टाकून देऊन आम्ही सर्वस्वीं नवीन बनलों. अशा स्थितींत जुन्या विचारांशीं संवादी असणारें व जुन्या आकाक्षांची परिपूर्ति करणारें वाङ्मय आम्हांस कसें रुचावें ? मुलास लहानपणापासून ' स्तन पाजितां निजवितां हालवितां बालकासि खेळवितां ! ' जें शिक्षण मिळावयाचें व ज्या वातावरणांत त्यानें वाढावयाचें तेंच जर सर्वस्वीं पूर्वींच्याहून भिन्न झालें तर पूर्वींच्या ज्या ज्या गोष्टी त्याच्या नजरेस येतील त्यांच्याविषयीं तिरस्कार, निदान पक्षीं दूरी भाव तरी त्याच्या मनांत कां उत्पन्न होऊं नये ? संध्याकाळीं दिवे लागतांच हात पाय धुवून व देवास नमस्कार करून आजाआजींच्या पुढ्यांत येऊन ' मूकं करोति वाचालं ' किंवा

गोविंदा गोपाळा कृष्णा विष्णू मुकुंद घननीळा ।
धृतकौस्तुभवनमाळा पीतांबरधारिदेवकीबाळा ।।

अशा आर्या मुग्धमधुर बोबड्या बोलांनीं मुलें म्हणत असत त्या काळीं साहजिकच सर्व समाज जुन्या कवींच्या काव्यांत रंगून जात असे. परंतु आतां मुलें पांच सहा वर्षांचीं होतांच पोक काढून व दिव्याशीं पुस्तक धरून

' एका कोळियानें एकदां आपुलें । जाळें बांधियेलें उंच जागीं । '

अशा अप्रतिम कविता वाचण्याचा जेथें त्यांच्यावर प्रसंग येतो तेथें एकंदर शिक्षण जुन्या वाङ्मयाविषयीं खरी आत्मीयता उत्पन्न करण्यास कितपत कारणीभूत होत असेल याचें सहज अनुमान होण्याजोगें आहे. तेव्हां जुन्या कवितेला नाकें मुरडण्याची प्रवृत्ति इंग्रजी झाल्यापासून सुशिक्षितांत कां उत्पन्न व्हावी याचें बीज हें आहे. आमच्या भावना व आमची मनःस्थिति इतकी पालटून गेली कीं जुन्या काव्यांतील रस व त्यांतील माधुर्य यांचा आस्वाद घेण्याचें आमचें सामर्थ्य नष्ट झालें. आम्हांला ते कवि वेडगळ, बावळट, टाळकुटे व भाषान्तरे वाटूं लागले ! त्यांच्या कवितेनें आनंद पावण्याचें सामर्थ्य आम्ही गमाविलें तेव्हां या असमर्थतेवर पांघरूण घालण्यासाठीं व स्वकीयांविषयींची आमची विमुखता लपविण्यासाठीं निरनिराळ्या सबबी काढून आम्ही त्या कवींनाच नांवें ठेवूं लागलों. ' हे कवीच नव्हेत, भाषांतरें आहेत, हे निवळ टाळकुटे आहेत, हे मूर्तिपूजक आहेत यास्तव यांचें काव्य उच्च दर्जाचें ठरण्याच्या लायकीचें नाहीं, हे मानसिक गुलामगिरींत खितपत पडलेले होते, यांचें सर्व काव्य परपुष्ट आहे,यांची प्रतिभा केवळ भारवाही होती,

या तीन हजारांपैकीं अवघ्या २२०० लोकांनीं नेला ! दुसरा याहीपेक्षां कमी लोकांनीं घेतला व तिसरा तर अवघ्या ७०० ग्राहकांनीं घेतला ! सर्व महाराष्ट्र-कवींच्या उद्धाराकरितां निर्णयसागर छापखान्यानें 'काव्यसंग्रह' काढला. वामनराव ओकांनीं मोठा भगीरथ प्रयत्न करून त्यांच्या ग्राहकांची संख्या ६०० पर्यंत कशी बशी आणून पोंचविली. परंतु ओक वारल्यावर त्याची काय स्थिति झाली व किती हलाखीच्या स्थितींत तें उपयुक्त मासिक पुस्तक बंद करण्याची पाळी आली हें पाहिलें म्हणजे मन उद्विग्न होतें. यासंबंधीं स्वर्गवासी तुकाराम जावजी शेटजींनीं पुस्तक बंद करतांना जे हृदयद्रावक उद्गार काढले आहेत ते वाचले म्हणजे आमची उपेक्षाबुद्धि आमच्या हातून केवढे घोर अपराध करवीत आहे याची जाणीव झाल्यावांचून राहात नाहीं. " कै. ओक ह्या काव्यसंग्रहाचे संपादक असतां ह्यास ६०० वर्गणीदार होते ते त्यांच्या पश्चात् तुटत तुटत, सध्यां २३५ वर आले आहेत; त्यांतले १९० बाहेरचे आहेत; व ४५ मुंबईतले आहेत. आणि ह्या वर्षाचे सहा महिने भरत आले आहेत तरी, ह्या ४५ पैकीं अवघ्या २ वर्गणीदारांनीं आपली वर्गणी पाठविली आहे ! हाच प्रकार बाहेर-गांवच्या वर्गणीदारांचा आहे !... आम्ही आश्रयवृद्धीची वाट पाहून पाहून दमलों आहों, आणि पैशाच्या अतिशयित घर्शीनें अगदीं टेकीस आलों आहों...काव्य-संग्रह पुढें चालविणें म्हणजे कसरीच्या खाद्यास भर घालणें आणि विनाकारण खर्चाखालीं येणें आहे. तें आम्हांस आतां पुरवत नाहीं. झालें तेंच अतिशयित जीवाभारी झालें आहे....अशा स्थितीमध्यें आम्ही काव्यसंग्रह बंद करण्याचा खरोखर अत्यंत दुःखप्रद निश्चय मोठ्या संकटानें केला आहे, ह्याविषयीं आह्मांस सर्व महाराष्ट्रीय रसिकजनांची सहानुभूति मिळेल, अशी आशा आहे. " चार पैसे टाकून पुस्तकें नुसतीं विकत घेण्याबद्दलची ही सुशिक्षितांची आस्था ! मग तीं वाचून त्यांचें काळजीपूर्वक अध्ययन करून त्यांतील रसाचा आस्वाद घेणारे सुशि-क्षित वर्गांत किती नियत असतील याची सहज कोणालाही कल्पना होणार आहे. ज्ञानेश्वरी, तुकोबाचे अभंग, एकनाथी भागवत वगैरे प्रासादिक ग्रंथांच्या पुष्कळ आवृत्ति निघून ते बरेच खपत असलेले दृष्टोत्पत्तीस येतात हें खरें, पण यांचे आश्रयदाते सर्व अज्ञ मानलेल्या समाजांतील लोक असतात. सुशिक्षितत्वाचा टेंभा मिरविणाऱ्या आमच्या विद्यालयीन बांधवांचें प्रमाण पाहिल्यास तें यांतही अतिशय थोडेंच दिसून येणार आहे. परंतु या आमच्या उपेक्षाबुद्धीबद्दल विशेष प्रमाणें देत

बसण्याचेंही कारण नाहीं. आत्मनिरीक्षणानें ती गोष्ट प्रत्येकासच आढळून येणार आहे. विद्यालयीन अभ्यासक्रमांत झालेल्या वाचनाखेरीज प्रत्येक विद्यार्थ्यानें सर्व जुन्या कवींची मिळून ५००० तरी कविता चांगली वाचलेली असली पाहिजे तरच त्यास सुशिक्षित म्हणावें. स्वभाषेच्या अभ्यासाविषयीं ज्यास येवढी सुद्धां आस्था कृतींत दाखवितां येत नाहीं तो स्वत्व विसरून आपल्या मायभाषेशीं कृतघ्न बनला असेंच म्हटलें पाहिजे. स्वभाषेची अनास्था करून केलेली त्याची परधार्जिणी विद्या कशी फलप्रद होणार ?

४७. बरें, ज्यांची कास धरा असें इतक्या एकेरीवर येऊन सांगावें लागतें त्या कांहीं पारठ्या किंवा वांझ गाई आहेत काय ? तसें असतें तर जुन्या कवींची तरफदारी करणारा मनुष्य दुरभिमानी व मूर्ख ठरला असता. परंतु, त्यांचें काव्य अमृतोपम-मधुर आहे; उज्ज्वलता, सौंदर्य, अर्थगांभीर्य, उदात्तता इत्यादि गुणांत तें कोणा-सही हार जाणारें नाहीं; या गोष्टी आतां अचल आधारावर प्रस्थापित झाल्या आहेत. परंतु जगांत असें पुष्कळ वेळां घडतें कीं ज्या गोष्टी सर्वोत्कृष्ट, सर्ववंद्य म्हणून समजल्या जातात त्यांना दुरूनच नमस्कार करून बाजूला होण्याची प्रवृत्ति सर्वत्र दिसून येते. त्यांचा प्रत्यक्ष परिचय करून घेणारे फार क्वचित् व त्यांच्या अंतरंगांत शिरणारे त्याहूनही विरळा.

४८. काव्य या नात्यानें त्यांच्या उद्गारांचें सौन्दर्य अप्रतिम आहेच.परंतु आणखी एका दृष्टीनेंही त्यांची महती अलौकिक आहे. भागीरथीचें जल जसें मधुर असूनही शुभ्र आहे व शुभ्र असून पावनत्वाचा गुण त्यांत आहे त्याप्रमाणेंच आमच्या कवींची वाणी मधुर असूनही निर्मळ व पावन आहे. त्यांचें चारित्र्य निर्मळ व पवित्र, त्यांचीं मनें निष्कपट व प्रांजळ आणि त्यांचे उद्गार अत्यंत प्रेमळ व रसाळ आहेत. वाचकाला अधम वासनांपासून सोडवितील व त्यास उदात्त वातावरणांत संचार करावयास घेऊन जातील असे हे स्वर्गीय दूत आहेत. ज्यांची सुधारणेची बुद्धि दुसरीकडून उसनी घेतलेली नाहीं असे हे अत्यंत प्रभावशाली समाजसुधा-रक आहेत. परकीयांच्या अनुकरणाची काळी छाया जिच्यावर मुळींच पडलेली नसल्यामुळें खुरटून जाण्याचें जिला कधींच भय नाहीं अशी मनुष्याच्या उदात्त वृत्तींना सदैव स्फुरण देणारी शाश्वत तत्वांवर उभारलेली त्यांची सुधारणा आहे. आमच्या पंतांचेंच उदाहरण घेतलें तरी त्यांचें अंतःकरण किती उदार होतें व सर्वभूतात्मभाव त्यांच्या अंगीं कसा बाणला होता हें त्यांच्या काव्यांतील उद्गारां-

वरून रेखल्याप्रमाणें नजरेस येतें. खरोखर पाहिलें असतां आपल्या जातीचा, वर्णाचा व विद्वत्तेचा अभिमान अंगांत मुसमुसत असावा अशी त्यांची परिस्थिति होती. व तसा अभिमान त्यांचे ठायीं वागत असता तर तें कोणीही क्षम्यच मानिलें असतें. परंतु खरा प्रकार पाहिला तर त्याच्या अगदीं उलट दिसून येतो. भारतभागवतांच्या व आमच्या संतमंडळींच्या शिकवणींत ते मुरलेले असल्यामुळें सर्वांस आलिंगन देण्यास सज्ज अशी अत्यंत प्रेमळ व निरभिमान वृत्ति त्यांची झाली होती. ईशप्रसाद होण्याच्या दृष्टीनें केवळ ब्राह्मण्य हें कसें व्यर्थ आहे हें त्यांनीं अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. हरिपदविमुख ब्राह्मणापेक्षां महार बरा असें ते स्वच्छ सांगतात—

मिरविल जरि या द्वादश सुगुणमणींचा सदा परम हार
हरिपदविमुख ब्राह्मण त्याहुनि जो भक्त तो वर महार ॥
द्विजहि प्रभुपदरेणु न वाहे जोडूनि सुगुण जो गर्व ॥
शुचि न करि आपणासहि उद्धरिल स्वकुल काय तो सर्व ॥प्रल्हादस्तुति ७, ९०

ब्राह्मणजन्मामध्येंच ईश्वराविषयीं प्रेम उत्पन्न होतें इतर सर्व जन हीन आहेत, असें म्हणणें म्हणजे केवळ अन्याय आहे असें पंत आणखी ठिकाणीं सांगतात.

' हे ब्राह्मणजननींच । प्रेम शुचित्वें घडे, इतरजन नीच, ' ।
म्हणतां अन्यायाची । जोडि असे; योग्यताचि अन्या याची ॥ १०९ ॥
हेतु महत्वा चरण-।-प्रसाद हरिचा; तयास जात्याचरण ।
ज्ञानहि न हेतु; भजन । प्रभुचें केवळ, तदिच्छु सर्व शुभजन ॥ १११ ॥कृ.वि.४७.

' महत्व प्राप्त होण्यास श्रीहरीचा प्रसादच कारण आहे त्याला जातिधर्माचें आचरण अगर ज्ञान हें मुळींच कारण नाहीं ' असें वरच्यापैकीं दुसऱ्या आर्येंत सांगितलें आहे. वस्तुतः हीं मतें म्हणजे कांहीं असामान्य आहेत असें नाहीं. परंपरागत जातिनिर्बंध समाजव्यवस्थेसाठीं पाळावयाचे, उच्चनीचतेचा त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं अशीच भावना आमच्या समाजांतील समंजस लोकांची पूर्वीपासून चालत आलेली आहे. भागवतकारांची शिकवण तर याहीपेक्षां उदारतेची आहे व पंत हे तिचेच चेले असल्यामुळें त्यांनीं असे उद्गार काढावे यांत विशेष कांहींच नाहीं. परंतु या साध्या गोष्टी देखील सध्यां मुद्दाम नजरेस आणून द्याव्या लागत आहेत. भागवतधर्मांत रंगलेल्या पंतांच्या ठायीं भूतदयाही रोमरोमीं भरलेली असेल हेंही सांगावयास नको. एकच उदाहरण देणें बस होईल.

वसतो आत्मा, यास्तव सर्वां भूतीं दया करा नमुनी, ।
करिति उपाया इतरा सुखवाया या दयाकरा न मुनी ॥
ते योगयाग रुचति न, भूतदया हे जसी रुचे हरिला, ।
प्रभु तुष्ट इणें होतां, अर्थ कवण जड जना ! मनीं धरिला ? ॥ ७.८१,८२.

अशा विभूतींचें अंतःकरण कोमल, प्रांजळ व आरशासारखें निर्मळ होतें हें काय सांगावयास पाहिजे ? त्यांचें अंतःकरण बालकाप्रमाणें निष्कपट असूनही पोरकट नव्हतें, स्त्रीप्रमाणें भावनावश असून चंचळ नव्हतें, व यतीप्रमाणें उदात्त असूनही रुक्ष नव्हतें. ज्या भावनेनें त्यांचें हृदय व्याप्त झालें होतें ती त्यांनीं अगदीं मनापासून हृदयाच्या उमाळ्यासरशीं बोलून दाखविली. त्या एका भावनेनें त्यांचें हृदय कसें विरघळून टाकलें होतें हें पुढच्यासारख्या शेंकडों उद्गारांवरून दिसून येतें.

बा उद्धरीं मला, मी पापी, लटकेंचि कोण निंदुनि घे ।
मिथ्या दुःख मिरवितां, नेत्रांतुनि काय अश्रुबिंदु निघे ? ॥

४९. हें आमचें वाङ्मय निष्क्रियतेला व आळशीपणाला पोषक होणारें आहे, ही समजूतही व्यर्थ आहे. आमच्या संतकवींनीं, अर्थात् पंतांनींहीं, आपल्या काव्यांत शांति, समाधान, विरक्ति यांचा प्रसाद आम्हां महाराष्ट्रीय जनांवर उधळला आहे त्याला तें कदान्न आहे म्हणून भिरकावून देणें युक्त होणार नाहीं. आमच्या कवींनीं उपदेशिलेली शांति म्हणजे सुस्तपणा नव्हे, समाधान म्हणजे दुबळेपणा नव्हे किंवा विरक्ति म्हणजे भोगांचा केवळ बाह्यतः त्याग नव्हे. खरें समाधान व खरी विरक्ति, उद्योगपरतेला, पराक्रमाला विरुद्ध असते ही समजूतच चुकीची आहे. उलट अधम वासनांपासून मनाची मुक्तता झाली अंतर्यामींची खळमळ शांत झाली व विरक्त होऊन बुद्धि निःसंग बनली म्हणजेच कर्तृत्वशक्तीला स्फुरण येतें. आजपर्यंत जे जे प्रचंड उद्योग करणारे लोकहितकर्ते होऊन गेले त्यांच्या उद्योगाची प्रभा त्यांच्या विरक्ततेनें, समाधानी वृत्तीनें व निरपेक्षतेनें वाढविलीच होती, कमी केली नव्हती असें दिसून येतें. आमच्या वाङ्मयाचें कार्य

मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः

अशा तऱ्हेचें सात्विक कर्ते निपजविण्याचें आहे. तें कार्य त्यानें एकदां केलें आपण त्याची कास धरूं तर पुनःही करील यांत संशय नाहीं.

समाप्त.

परिशिष्ट १. कृष्णविजयाच्या कच्च्या प्रतींतील दुबार रचलेलीं पद्यें व इतर पाठभेद. (मागें पृ. १५७, १५८ पहा.)

१. पुढील आर्यागीति कृष्णविजयाच्या कच्च्या प्रतींत चोपन्नावा अध्याय संपल्यानंतर त्याच्या पुढेंच त्यांतील आर्यांचा क्रमांक पुढें चालू करून पंतांनीं लिहिलेल्या आहेत. या आर्यागीतींतील मजकूर कृष्णविजयाच्या ५५ व्या अध्यायांतील आहे. प्रसिद्ध असलेल्या श्लोकबद्ध ५५ व्या अध्यायाच्या पहिल्या ७ श्लोकांतील मजकूर या ८ आर्यांत आला आहे. ते श्लोक सर्व लांब लांब वृत्तांतील आहेत. ते या आर्यांशीं ताडून पाहिले असतां त्यांतील वर्णन कसें अधिक भरदार, विस्तृत व प्रौढ झालें आहे हें दिसून येईल.

रुद्रनयन शिखिजग्ध-। स्वाकृति पूर्वींच जो रतीश्वर दग्ध ।
तो ये श्रीच्या पोटा, । सौंदर्याचा न आकरीं ज्या तोटा ॥ ४९ ॥
वैदर्भीचा काम । स्वसुत प्रद्युम्न हें जयाचें नाम ।
त्रिभुवनचित्तहर गुणा-।-मृतनिधि लक्ष्मीपतीहुनी तो न उणा ॥ ५० ॥
वृद्धींतचि त्या कामा । जाणुनि रिपु, कामरूप शंबर नामा ।
असुर सुमंदमति हरी, । स्वार्थास्तव मायलेंकरां विघड करी ॥ ५१ ॥
उरला जळतां रुद्र-।-क्रोधज्वलनांत जो तया हा क्षुद्र ।
शंबर देवसपत्न । स्वबळें मारावयासि करितो यत्न ॥ ५२ ॥
त्यजिला बाळ समुद्रीं । कैंची सुमति त्रपा त्या क्षुद्रीं ? ।
पडतांचि तया मीनें । गिळिलें रत्नाकरोदरस्थित मीनें ॥ ५३ ॥
जेणें केला बाळ । ग्रास तयासकट अन्य मीनहि जाळ ।
पसरुनि धीवर धरिती । आश्चर्य स(म)रूप मत्स्य पाहुनि करीती ॥ ५४ ॥
भेटविला दाशांहीं । तो त्या असुरास तत्प्रसादाशांहीं ।
केला सूदाधीन । प्रेक्षुनियां शंबरेंहि अद्‌भुत मीन ॥ ५५ ॥
रांधाया जों मासा । चिरिती शस्त्रें महानसीं तों मासा ।
त्याच्या उदरीं बाल । प्रकटे मेघोदरीं जसा ग्रहपाल ॥ ५६ ॥

२. कच्ची प्रत—स्वयें मूर्ख स्त्रैण प्रभुस म्हणती, दृष्टि निवळा ।
नसे ज्यांची त्यांला धवलहि दिसे चंद्र पिवळा ॥

पक्की प्रत—स्वयें मूर्ख स्त्रैण प्रभुस म्हणती, दृष्टि निवळे ।
न ज्यांची त्यां रोग्यां दिसति दरदुग्धेंदु पिवळे ॥ कृ. वि. ६१. २०

३. कचीं प्रत—' मोहातें न धरीं,' म्हणे प्रभु तया, ' पुत्रा गृहस्थाश्रम ' ।
पक्की प्रत—हांसोनि प्रभु त्या मुनिप्रति म्हणे, ' पुत्रा गृहस्थाश्रम ' ॥
कृ. वि. ६९. ३२.

परिशिष्ट २. पंतांची कांहीं अप्रसिद्ध भागवती कविता.

मागें पृ. २५ वर पंतांच्या स्फुट भागवती प्रकरणांची जी यादी दिली आहे त्यांपैकीं ४ कलिगौरव, ८ प्रल्हादविरचित भगवत्स्तुति व १५ सुदामकथेवरील स्फुट साक्या हीं तीन अजून अप्रसिद्ध आहेत. यांतील प्रल्हादकृत भगवत्स्तुति बरीच विस्तृत असल्यामुळें ती येथें देण्याचा बेत स्थलाभावास्तव रहित करणें प्राप्त झालें आहे. बाकीचीं दोन खालीं दिलीं आहेत.

१. ' **कलिगौरव.** ' या प्रकरणाला हें नांव पांगारकरांनीं दिलें आहे व त्यांनीं आपल्या पुस्तकांत यांतील तीन श्लोक उद्धृतही केले आहेत. (मो. च. पृ. ३९४). वस्तुतः हें प्रकरण म्हणजे भागवतांतील

प्रसंगमजरं पाशमात्मनः कवयो विदुः ।
स एव साधुषु कृतो मोक्षद्वारमपावृतम् ॥ भा. ३. २५. २०.

या श्लोकावर टीका करण्याचा प्रथम उद्देश धरून लिहावयास सुरवात केल्या-नंतर जे विचार मनांत स्फुरत गेले ते ग्रथित करून बनलेली रचना होय. मूळ श्लोकाचा अर्थ पंतकृतींतील पहिल्याच श्लोकामध्यें संपूर्ण आलेला असून पुढें पंतांनीं स्वयंस्फूर्त अशीच रचना केल्याचें दिसून येतें. मुळांत कलीचा उल्लेखही आलेला नसून पंतांनीं आपल्या कृतींत कलियुगाचेंच महात्म्य मुख्यत्वेंकरून वर्णन केलें आहे. तेव्हां पांगारकरांनीं दिलेलें नांव या दृष्टीनें युक्तच आहे असेंही म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रसंगमिति० ॥ टी० ।—

ज्ञाते जे ते म्हणति विषयीं स्त्र्यादिकीं जो प्रसंग
तो तों साक्षाच्छमनकरिंचा पाश कंठीं अभंग ।
तो साधूंच्या चरणकमळीं योजितां शुद्ध भावें
कैवल्याचें प्रकट उघडें दार होय स्वभावें ॥ १ ॥

म्हणतसे जन काकरभाजन । प्रकट हा कलि पातक भाजन ।
परि गुणज्ञ रसज्ञ सभाजन । करिति या कलिचेंचि सभाजन ॥ १ ॥

कलीमाजि या पाहती याचि सारा । घडे विष्णुच्या कीर्तनें स्वार्थ सारा ।
भवाब्धी तराया न लागे प्रयास । स्वयें शांति दे दर्शन क्षिप्र यास ॥ २ ॥

तेचि या कलियुगांत कृतार्थ । स्तुत्य ते नर सभाग्य यथार्थ ।
रामनाम सतत स्मरणारे । येथ सादर जना करणारे ॥ ३ ॥

स्वयें स्मरति सर्वदा हरिसि, आणिखालाहि जे
स्मरा म्हणति, साधनें कलि तया सुखा लाहिजे ।
मुकुंदजनकीर्तिनीं रुचि जनास हे लाविती
सभाग्य किति ते म्हणों सुख तदीच हेलाविती ॥ ४ ॥

कळी या दोषांचा निधि, परि गुणज्ञीं निवडिला
असे येथें मोटा गुण, विगुण जेणें दवडीला ।
सुखें तारी सर्वां त्वरित हरिचें कीर्तन खरें
तुटेना वज्रें तो सहज तुटतो बंध नखरें ॥ ५ ॥

कृतीं विष्णुध्यानें करुनि दुसऱ्यामाजि यजनें
तिज्या ठायीं साधे उचितपरिचर्याख्य भजनें ।
अनायासें लाभे स्वपद हरिसंकीर्तनरता
कलीमध्यें ज्ञाते सकळ म्हणती धन्य नरता ॥ ६ ॥

२. सुदाम कथेवरील स्फुट साक्या—(पृ. २७ पहा.)

(१) श्रीकृष्णानें केलेल्या सत्काराचें सुदामानें केलेलें वर्णन—

धांवत आला सामोरा तों बहु दूर श्रीजानी हो ।
धरिलें मजला हृदयीं स्त्रीकुचकुंमसुभग भुजांनीं हो ॥ १ ॥
झालों धन्य भुवनीं जाये हो । लोकीं सुख न समाये हो ॥ ध्रु० ॥
स्वकरें माझे चरण क्षाळुनि त्या अवनेजनपाथा हो ॥
गंगाजनकपदांगुष्ठानें ओढविला निजमाथा हो ॥ २ ॥
कथिलें गुरुकुलवृत्त कथा बहु वदला स्वसुखें गोडा हो ॥
तुळितां त्याशीं अमृत रसातें तेथ मधुरिमा थोडा हो ॥ ३ ॥
मी लज्जेनें न दिले मग ते आपण शोधुनि पोहे हो ॥
भक्षुनि जाला फार सुखी तो प्रभु, परि उद्धत नोहे हो ॥ ४ ॥
नीजविलें मज निज पर्यंकीं केली स्वकरें सेवा हो ॥
पावित येउनि आज्ञा देतां रोदन आलें देवा हो ॥ ५ ॥

करुणाघन हरि भक्तमयूरीं फाराचि सादर आहे हो ।।
दासांच्या योगक्षेमातें आंगें आपण वाहे हो ॥ ६ ॥

——:०:——

(२) श्रीकृष्णाचें सुदामास अनुलक्षून भाषण—

बंधो, लाभ जाला मोटा हो । मिथ्या वादी खोटा हो ॥ ध्रु० ॥
सहसा तूजें दर्शन होतां प्रियसुहृदा भूदेवा हो ॥
गमलें चुकला तो सांपडला आनंदाचा ठेवा हो ॥ १ ॥
भक्ताहुनि मज दुसरें कांहीं नाहीं प्रिय या लोकीं हो ॥
माजा प्रेमा दासीं तैसा मातेचा हि न तोकीं हो ॥ २ ॥
तुझिया अंगस्पर्शें जालीं शीतल माजीं गात्रें हो ॥
तुज पाहुनि नेत्रें ही सखया परम सुखाचीं पात्रें हो ॥ ३ ॥
हे पोहे मज विश्वात्म्याला देती तृप्ति अपारा हो ॥
माजा ठायीं सखया तूजी ऐसिच भक्तिकृपा राहो ॥ ४ ॥
भक्तें अल्पहि देतां मजला प्रेमें फारचि होतें हो ॥
फार अभक्तार्पित अल्पगमे वाटे द्रव्य न होतें हो ॥ ५ ॥

——०——

परिशिष्ट ३. पंतांच्या विद्वत्तेबद्दलचीं भिन्नभिन्न मतें.

पंतांच्या विद्वत्तेविषयीं आजपर्यंत निरनिराळ्या विवेचकांनीं जीं भिन्न भिन्न मतें प्रकट केलीं आहेत तीं पाहाणें मोठें मौजेचें आहे. आधाराशिवाय केलेली निंदा काय किंवा स्तुति काय, दोन्हींही सारख्याच योग्यतेच्या होत. परंतु जुन्या कवींची विवेकशून्य निंदा करण्याचा जसा एक संप्रदाय बनून गेला आहे त्याप्रमाणें त्यांची प्रत्येक बाबतींत भरमसाट स्तुति करण्याचाही एक संप्रदायच बनू पहात आहे. खालीं उद्धृत केलेल्या कित्येक विद्वानांच्या उद्गारांवरून ही गोष्ट लक्षांत येईल. पंतांच्या विद्वत्तेच्या बाबतींत खरा प्रकार काय आहे याचें मागें मूळ ग्रंथांत (पृ० ५७–६१) विवेचन केलेंच आहे.

१. निबंधमालाकारांचीं या बाबतींत काय मतें होतीं तीं तीं सुप्रसिद्धच आहेत. व त्यांचा उल्लेखही मागें पृ. ५७, ६० वर केला आहे.

२. हंसांनीं आपल्या निबंधांत पंतकवितेची अतोनात प्रशंसा केली आहे. पंतांना ‘ कविराजमुकुटमणि ’ अशी त्यांनीं पदवी दिली आहे; व ‘ मुक्तेश्वरादि

कवि त्यापुढें अगदीं तुच्छ दिसूं लागतात. काव्यग्रंथ दृष्टीनें पंडितही पंतांची बरोबरी करणार नाहीं. मग इतर मराठी कवि तर सूर्यापुढें मशालीसारखे निस्तेज आहेत हें सांगावयासच नको. ' असा पंतकवितेविषयीं आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. पंतांच्या विद्वत्तेचेंही त्यांनीं पुष्कळच गौरव केलें आहे. तथापि ' मोरोपंत शास्त्री (पंडित) होता किंवा केवळ पुराणिकच होता याविषयीं निर्णय करण्यास आपणाजवळ बलवत्तर साधन नाहीं,' असें त्यांनाही कबूल करावें लागलें असून ' न्यायमीमांसादि शास्त्रें घोकून शास्त्रीय परिभाषेनें शब्द-नृत्य करणाऱ्यांसच पंडित म्हणणें ही चुकी होय. ज्यास तत्त्वपरीक्षण उत्तम प्रकारचें असेल तोच पंडित होय. असें तत्त्वपरीक्षण पंतांचें ठायीं उत्कृष्ट होतें. तेव्हां त्यांस पंडित म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं '--अशा कोटिक्रमानें पंतांना पंडित ठरवणें त्यांना भाग पडलें आहे.

३. परंतु श्री. पांगारकरांच्या लिहिण्यांत इतकी देखील विवेकबुद्धि दिसून येत नाहीं. पंतांच्या विद्वत्तेविषयीं निरनिराळ्या ठिकाणीं त्यांनीं काढलेले उद्गारच येथें उद्धृत केले म्हणजे त्यांनीं केलेली अतिशयोक्ति व धरसोड यांचा वाचकांस प्रत्यय येईल.

(१) ' पंतांनीं बहुतेक सारा महाराष्ट्रकाव्यार्णव उल्लंघिला होता ! पंतांच्या पश्चात पंतांच्या योग्यतेचा मराठी भाषेचा पंडित कोणीही झाला नाहीं असें मला वाटतें !' मो च. पृ. ४१. (२) ' **शास्त्राध्ययनाच्या नादीं न लागतां** आपल्या स्वभावांतला प्रेमळपणा...हे गुण लक्षांत आणून काव्यग्रथनाच्या कामीं त्यांचा आजन्म व्यय करावयाचा जो या प्रसंगीं त्यांनीं निश्चय केला तो फार शहाणपणाचा होता ! ' मो. च. पृ. २३०. परंतु याच्या उलट पुढील उद्गार पहा. (३) ' पंतांनीं संस्कृत भाषेंतच ग्रंथ रचण्याचें मनांत आणलें असतें तर त्यांना ही गोष्ट किमपि दुष्कर नव्हती......**पंत जगन्नाथपंडित अप्पया दीक्षित यांच्याच तोलाचे होते. ते कांहीं सामान्य पंडित नव्हते. किंबहुना संस्कृत भाषा पंतांइतकी त्यांनाही वाकवितां आली नाहीं**.' मो. च. पृ. २९५

४. पंतांच्या शास्त्रज्ञतेविषयीं श्री. शिवराम महादेव परांजपे यांनींही अशींच ठासून अतिशयोक्तिपूर्ण विधानें केलीं आहेत.—' मोरोपंत तर संस्कृत भाषेमधील फारच जाडे पंडित होते. काव्य, नाटक, अलंकारशास्त्र, वेदान्त, ज्योतिष,

धर्मशास्त्र, वैद्यशास्त्र वगैरे अनेक शास्त्रांमध्यें त्यांची चांगली गति झालेली असल्याचें त्यांनीं त्या त्या शास्त्रावरील स्वहस्तानें लिहून घेतलेल्या अनेक ग्रंथांवरून स्पष्ट होत आहे.... पंतांच्या अंगीं पांडित्य आणि शास्त्रज्ञत्व वसत नव्हतें, असें म्हणण्याचें धाडस कोणीही करणार नाहीं.' पराडकरी आवृत्ति, आर्याभारत, उपोद्घात पृ. ६७-६९.

५. परंतु या पोकळ स्तुतींतील खरा प्रकार पराडकरी आवृत्तीच्या संस्कृत काव्याच्या खंडास उपोद्घात लिहिणारे श्री. परशुराम लक्ष्मण वैद्य यांनीं चांगलाच चवाठ्यावर आणला आहे. त्यांचा दहा पानांचा संस्कृतांत लिहिलेला उपोद्घात पोकळ स्तुति व निराधार निंदा या दोन्हीपासून अलिप्त असून निर्भीडपणानें लिहिलेला एकंदरीनें वाचनीय आहे. पंतांच्या विद्वत्तेस व संस्कृतप्रावीण्यास अनुलक्षून त्यांनीं काढलेले उद्गार पुढें दिले आहेत:—

'गीर्वाणकाव्येषु तु बहव एव प्रयोगा आर्षाश्चापाणिनीयाश्च कविनानुकृताः किन्तु मंत्ररामायणे प्रयुक्तान्यपाणिनीयानि प्रायः सर्वाण्यपि रूपाण्यार्षाद्रामायणात्तथैवोद्धृतानीति नात्र विषये कविरयं दोषभाग्भवितुमर्हति ।......**किन्तु स्फुटकाव्येष्वेतादृशामपशब्दानां प्रयोगः कवेरस्य दोषभागितां समाविष्करोतीति मनुमहे ।** न हि तादृशानि रूपाणि केनाप्यभियुक्तेन कविना प्रयुक्तपूर्वाणि ।...किन्तु 'वत्स्यन्तु, गृहीतुकामः, गृहीतुम्,' इत्यादयः प्रयोगा नैव तत्राप्युपलभ्यन्त इति निवेदयामः ।

'**यद्यपि शब्दशास्त्रन्यायनयाद्यध्ययने नैव सन्ति प्रमाणानि** तथापि साहित्यवेदान्तशास्त्रेष्वस्य परिचयः सर्वत्र स्फुट एव सूक्ष्मदृशां सुधियाम् । **गैर्वाण्यां यद्यपि कवित्वमस्य संशय्यते** तथापि महाराष्ट्र्यां कविप्रथमपद्धतिमयमेवावातारयदिति नात्र केषामपि विशयस्यावसरः ।...... अन्तश्चेदमवश्यं प्रतिभासते विज्ञाप्यं वाचकमहाभागानां यद्यपि नायं मयूरो गैर्वाण्यां महाकविपदवीमर्हति तथापि नैतावतायं जनो विदुषां मानार्हो न भवतीति ।'

भावार्थ—'संस्कृत काव्यांमध्यें पुष्कळच आर्ष व अपाणिनीय प्रयोग या कवीनें केले आहेत. मंत्ररामायणांतील अशा तऱ्हेचीं बहुतेक सर्व रूपें वाल्मीकिरामायणांतून घेतलीं असल्या कारणानें त्या बाबतींत कवीला दोषभाक् मानतां येत नाहीं. ... परंतु स्फुट काव्यांमधील असल्या अपप्रयोगासंबंधानें मात्र हा कवि दोषी ठरतो असें आम्हांस वाटतें. कारण तशा तऱ्हेचीं रूपें कोणत्याही अभियुक्त

कवीनें पूर्वी योजिलेलीं नाहींत. ... तथापि ' वत्स्यन्तु, गृहीतुकामः, गृहीतुम्' इ. प्रयोग तेथेंही (वाल्मीकिरामायणांतहीं) आढळत नाहींत, हें सांगणें अवश्य आहे.

' जरी व्याकरण, न्याय इ० शास्त्रांच्या अध्ययनाविषयीं प्रमाणें नाहींत तथापि साहित्य व वेदान्त या शास्त्रांशीं असलेला (पंतांचा) परिचय सर्वत्र स्पष्ट दिसतो. संस्कृतांतील याच्या कवित्वाविषयीं संशय घेण्यास जरी जागा असली तथापि मराठींत ह्यानें उत्कृष्ट कवित्व केलें ह्याविषयीं कोणासही संशय घेण्यास जागा नाहीं.... सरतेशेवटीं वाचकांना आम्हांस निवेदन करावेसें वाटतें तें येवढेंच कीं, हा मयूर संस्कृतांत महाकवीच्या पदवीवर बसण्यास जरी योग्य नसला तथापि त्यामुळे तो विद्वानांच्या आदरास पात्र होत नाहीं असें मात्र नाहीं. मराठी भाषेंतील याचें कविधुरीणत्व सर्वांसच मान्य होण्याजोगें आहे. '

या वचनांचा आहेर आम्ही परांजपे पांगारकर प्रभृतींस करतों.

पंतांच्या वैद्यकशास्त्राच्या ज्ञानाविषयींही अशीच एक किंवदन्ती पांगारकर-प्रभृतींनीं पसरून ठेविली आहे. पंतांच्या उपलब्ध ग्रंथांतून अगदीं क्वचित् वैद्यक-विषयक उल्लेख आढळतात. परंतु ते अगदींच सामान्य व सर्व प्रसिद्ध गोष्टींचे असतात. जुन्या काळच्या प्रत्येक घरंदाज गृहस्थास सामान्य व्याधींचें व उपचारांचें अनुभवसिद्ध असें बरेंच ज्ञान असें. याहून वैद्यविद्येशीं पंतांचा अधिक दाट परिचय होता असें मानण्यास कांहींच आधार नाहीं.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध	शुद्ध.
१	१९	साग व	सांगावें
३	७	हेईना	होईना
,,	२३	अख्यानांत	आख्यानांत
६	२	बाहींच्या कांहींच	कांहींच्या-बांहींच
७	२	वंश वळीचा	वंशावळीचा
,,	५	अपटे	आपटे
,,	७	मता तांचा	मतामतांचा
,,	२०	अहे	आहे
,,	,,	दखविण्यांत अलें	दाखविण्यांत आलें
८	२०	पुकरा केल	पुकारा केला
९	८	झला	झाला
१०	१९	फिरविला	फिरविली
११	११	स धारणपणें	साधारणपणें
१२	१२	न थांचे	नाथांचे
,,	२५	लीहिले	लिहिलें
१३	२७	सव	सर्व
१४	६	घ लण्याची	घालण्याची
,,	१८	अवतारा मध्यें	अवतारांमध्यें
१७	२३	भाषेच	भाषेचें
२३	१०	मंत्रभागवतची	मंत्रभाग-वताची
,,	२३	श्लाकांचा	श्लोकांचा
२६	२४	यादीं	यादींत
३१	१	फसल	फसले
३२	१९	तपसून... फेब्रुवारी	तपासून... फेब्रुवारी
३४	११	होय	होय.
४२	२	त	तें
,,	५	होतो	होतें
,,	२८	जाहे	आहे
४३	२३	ग्रयांतील	ग्रंथांतलि

पृष्ठ	ओळ	शुद्ध	अशुद्ध.
४४	२		सरळ
,,	२३	सतदीपा	सप्तद्वीपा
४५	१८	आलले	आलेले
,,	२६	पंचाध्य यी	पंचाध्यायी
४६	१२	(स्कंध ९.	(स्कंध ९).
७०	१२	आह	आहे
,,	१८	दया दावी	अनुग्रह दावी
७१	५	झली	झाली
,,	७	आणिलें पुत्रशोकनें	आणिलें. पुत्रशोकानें
७२	२०	सध्या	सध्यां
,,	२५	म्हणऊनि	म्हणउनि
७७	९	लावण रें	लावणारें
८०	१	म नानें	मानानें
८२	२३	भक्तीयोग	भक्तियोग
८४	१३	सपत्नुदि	सपत्न्युदि
,,	१४	स्तण्से	स्तपसें
,,	२५	अर्गवतो	अर्णव तो
,,	२६	वर्गव तो	वर्णवतो
८६	८	अहे	आहे
८७	१७	उद्गव	उद्धव
९३	१	वनःस्थलीं	वनस्थलीं
,,	१९	अहे	आहे.
,,	२४	सा ति	प्रसूति
९४	६	शिरश्च्छेद	शिरच्छेद
९५	२७	टोंचन	टोंचून
,,	२९	जाय	ध्रुव जाय
१०५	६	सद्भावपूण	सद्भावपूर्ण
१०९	२७	मुत्तमंम्	मुत्तमम्.
११०	१२	ब्रम्ह	ब्रह्म
११४	२८	मन्वतरांचें	मन्वंतरांचें
११५	२७	मोलकरीसे	मोलकरीसे
१२१	१७	उत्तराधास	उत्तरार्धांत

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१२२	१४	मुळ स	मुळास
१२५	२४	जन्म दिनीं	जन्मदिनीं
१२७	७	इतरत्र;	इतरत्र.
,,	८	एकोणिसाव्या;	एकोणिसाव्या
१२८	३	वागर्थ विव	वागर्थाविव
१३०	२९	तीथा	तीर्थी
,,	,,	सधुनी	साधुनी
१३४	८	त रा	तारा
,,	११	म गें	मार्गे
१३५	१८	तो	ती
१३७	२	विस्तर	विस्तार
१३९	१५	केलला	केलेला
,,	२१	काव्यकलरनाचें	काव्यकल्पनांचें
,,	२५	द्द्बलच्या	बद्दलच्या
,,	२८	कला	केला
१४१	१४	(१२, २५)	(१२,१५)
,,	२४	ऋतभू०	हृतभू०
१४२	११	करूनी	करुनि
१४७	१०	शुद्र	शुद्ध
१५०	२९	वंदावनां	वृंदावनां
१५३	६	स्त्रगोपुलम्	स्वगोकुलम्
१५७	२	शिरते	शिरतें.
,,	८	आहातच	आहेतच
,,	१०	खडर्यंवर	खर्ड्यांवर
,,	१२	लिहिलला	लिहिला
,,	१७	सहा	आठ
,,	१८	लिहिण	लिहिणें
,,	२१	छरील	छापील
,,	,,	लालाट	ललाट
,,	२६	६	८
१५८	५	६	८
,,	८	प्रतींताल	प्रतींतील
१६०	१६	चालल	चाललें
१६१	२४	नसें तार्टी,	नसे, तार्टी
१६२	२३	सेन्द्र न्विवुध०	सेन्द्रान्विवुधा०
,,	२४	नापशोभन:	नोपशोभन:
,,	२९	केलल्या	केलेल्या
१६३	८	स्व मींवरि	स्वामींवरि
१६३	१५	आह	आहे.
१६४	१७	दलें व	दिलेंच
१६५	२०	पहूं	पाहूं
१६६	४	सख्येच्या	संख्येच्या
,,	५	वत्तांतील	वृत्तांतील
१६७	२४	आहे	आहे.
१६८	१८	म्ल यता	म्लायता
१६९	११	परिशिष्ट १	परिशिष्ट २
,,	१८	प्रस्तुत सुदम	प्रस्तुत सुदाम
१७०	१८	उद्वर	उद्धार
१७४	८	वसुदेवनें	वसुदेवानें
,,	२४	हाती	होती
,,	२८	आीं	अर्पी
,,	,,	के मळ	कोमळ
,,	,,	मंजरीमाला	मंजरीमाळा
१८३	२२	द्वारकानाशाच	द्वारकानाशाचें
१८४	२	आतुला	अतुला
१९०	१६	नाहीं	नाहीं.
१९१	१४	उपलव्ध	उपलब्ध
,,	,,	शोघक	शोधक
१९२	२४	आहे	आहे.
,,	२९	येते	येते.
१९४	१४	प्रतिमेचें	प्रतिभेचें
,,	२१	म्हण्वून	म्हणवून
,,	२३	लागला	लागली
१९७	१०	दूरापास्तव	दूरापास्तच

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१९७	११	and	for
१९९	२३	स धु	साधु
,,	२५	पन्हाळगडींचें	पन्हाळगडींच
,,	२६	ह	हा
२००	२०	आहे	आहें
२०२	१८	दिसते	दिसते.
२०३	१९	साधुश्रोत्रे०	साधुश्रोत्र०
२०७	२०	वत्तरचनेच्या	वृत्तरचनेच्या
२०८	११	रचन	रचना
,,	१२	हा	हीं
,,	१५	उपयुक्त	उपर्युक्त
२१२	१६	वानवासिका	नवासिका
२१२	१७	खजा	खञ्जा
२१४	२०	म्हटलेले	म्हटलेलें
२१६	२६	यणार	येणार
,,	२७	मुळाच	मुळींच
२२३	१,२	असें असें	असें
२२६	२२	परिप ठ	परिपाठ
२२८	२	मनाानें	मनानें
२२९	१५	न हींत	नाहींत
२३१	२५	पत्रव्यवहरांत	पत्रव्यवहारांत
२४३	४	रचन झोंल	रचून झालें
२४६	१२	झ लेल्या	झालेल्या
,,	२९	असन	असून
२४७	८,९	लखणीचा	लेखणीचा
२५१	१४	मांधांत	मांधाता
२५८	६	वज्र	व्रज
२६४	१५	प्रत्यायास	प्रत्ययास
२६९	३	प्रादुर्भाचीं	प्रादुर्भावीं
,,	२९	जस्तिव	जीस्तव
२७४	१	पिध्ययाच	विध्यर्थाचें
२७५	२८	स तान	संतान
२७६	७	विमळु	विमळ
२८०	५	हेऊं	होऊं
२८०	१४	प्रबधाच्या	प्रबंधाच्या
२८१	६	°सन्मनी	°सन्मनीं
,,	७	दोषपारा	दोषपरां
२८५	३	मुडतां	मुरडतां
,,	२१	पूर्वावोखेरीज	पूर्वांर्धाखेरीज
२८७	१	सभूयस्त्वम्	भूयस्त्वम्
,,	१२	दीपस	दीपसा
,,	१६	सन्यावर	सैन्यावर
२८९	१३	याचा	यांचा
२९०	२३	०ज्वलन	०ज्वलनें
२९४	१६	लिगें	लिंगें
२९४	२७	जनुसरलें	अनुसरलें
२९५	१७	घारे	घोरे
२९६	२७,२८	मम्मचार्याचें	मम्मटाचार्याचें
३०८	५	शब्दाच	शब्दाचें
३१३	१२	वर्णानम्	वर्णानाम्
,,	१४	प्रसद	प्रसाद
३१४	९	तधवां	तेधवां
३२४	८	मख्य	मुख्य
३२६	२२	उदभूट	उद्भट
,,	२८	हारादिवलंकारा	हारादिवदलंकारा
३२८	२७	काण	कोण
३३२	८	Spontaneou sover	Sponteneous over
३३३	१५	than	then
३३४	४	कवींच्या	१०. कवींच्या
३३८	८	वेध	मेध
३४२	१५	ˆ	तिच्या
३४३	२६	नाहीं	म्हणत नाहीं
३४९	४	अलें	आलें
३६५	२९	प्रोक्त	प्रोक्तः
३७६	४	अधुनिक	आधुनिक